ज्ञानदीप लावू जगी

पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

पुस्तकाचे नाव : श्यामकान्तचीं पत्रें (१९१२ ते १९२५)

संपादक : गो. स. सरदेसाई

प्रकाशक : श्रीपाद रामचंद्र टिकेकर, पुणे

प्रकाशन वर्ष : १९३४

मूळ ग्रंथ प्रत : शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प

अंकेक्षण रुपांतर - २०२२

श्यामकान्तचीं पत्रें

डॉ. श्यामकान्त—लंडन २५-९-२४

जन्म—चैत्र वद्य ११ शके १८२१]   [मृत्यु—मार्गशीर्ष शुद्ध १३ शके १८४७

श्यामकान्तचीं पत्रें

(रियासतकार **गो. स. सरदेसाई** यांच्या मुलाचीं निवडक पत्रें)

(१९१२ ते १९२५)

किंमत रु. २

१९३४

WHO KNOWS !

उशन् ह वै वाजश्रवसः नचिकेता

नाम पुत्र आस

सहोवाच पितरं कस्मै मां दास्यसीति ।

सहोवाच मृत्यवे त्वा ददामि ।

किंस्विद् यमस्य कर्तव्यं मया ।

स्वर्गे लोके न भयं किं च नास्ति

न तत्र त्वं न जरया बिभेति ।

उभे तीर्त्वाऽशनायापिपासे

शोकातिगो मोदते स्वर्गलोके ॥

—यजुर्वेदीय कठोपनिषद्

Yet Ah, that Spring should vanish with the Rose !
That Youth's sweet-scented manuscript should close !
The Nightingale that in the branches sang,
Ah, whence, and whither flown again, who knows !

—*Omar Khayyam.*

मातेचा अस्राञ्जलि

(चालः-अजि शेवटचा लाभचि०)

हा शोक अम्ही कैसा साहूं आतां । हृदय हें दुभंगुनि जातां ॥
त्या काळानें निर्दय होउनि नेला । पाहुं मी कुठें तरि तुजला ॥
तुज आठवितां कंठ भरुनियां येई । रात्रंदिन विसर न होई ॥
मनिं प्रीती ती दाटुनी विव्हल होई । शोकासी भरतें येई ॥
मी पापिणिनें जगुनी काय करावें ? । लोचनीं काय पाहावें ॥
तव वदन अतां सस्मित पाहूं कोठें । अंधार सर्वही वाटे ॥
मम उदरीं त्वां येउनि धन्यचि केलें । स्मृतिनें मन भ्रमुनी गेलें ॥
तुझि मूर्ती ती हृदयीं व्यापुनि राहे । लोचनीं अश्रुजल वाहे ॥
तव विद्वत्ता, बुद्धि, धैर्य गुण, शांती । सारी तुज शोभा देती ॥
वय सान बहू नेलें प्रभुनें तुजला । ठेविलें जगीं आम्हांला ॥
हें रत्न असें आम्हां सोडुनि न्यावें । दुर्दैव आमुचें व्हावें ॥
जणुं झाडाचें ताजें पुष्पचि जावें । धैर्य तें सर्व लोपावें ॥
तव कीर्तीनें गुणें, तसें तेजानें । आपलें करुनि लोभानें ॥
तव थोरपणा उच्च विचारहि मोठे । आठवितां कंठचि दाटे ॥
बंगाल-पुणें शेवट परदेशीं त्वां । जाउनि ग्रहण विद्वत्ता ॥
किती ज्ञान तिथें साध्य सहज त्वां केलें । श्रम अखेर निष्फल ठरले ॥
तुज ज्ञानाची हांव असे बहु मोठी । त्यासाठीं खटपट मोठी ॥
ती आस अतां सारी व्यर्थचि झाली । स्मृति केवळ त्यांची उरली ॥
तव निधनानें हृदय विदारुनि गेलें । आयुष्य फोल किति झालें ॥
बहु मानानें डिग्री ती मिळवोनी । डॉक्टर हें नांव करोनी ॥
बहु कष्टानें दुखणें तें सोसूनी । सर्वांचि रजा घेवोनी ॥
तूं आम्हांतें अखेर सोडुनि जासी । सहावें कसें आम्हांसी ॥
हे दोन तुला अश्रू अर्पण करुनी । शांतता वाटते स्वमनीं ॥
मम शोकभरें अल्प शब्द हे झाले । मन सारें गुंगुनि गेलें ॥
त्या देवाला करुणा कशि नच आली । प्रिय वस्तु हिरावुनि नेली ॥
हे लडिवाळा ! सांग कुठें रे, असशी । कधिं मजला भेटी देशी ॥
या जगताला नश्वर सोडुनि जासी । प्रभुपदीं अमर तूं होसी ॥
त्या भगवंता माता लक्ष्मी विनवी । स्वर्गीं तरि भेटचि व्हावी ॥

हकीकत

माझा पुत्र श्यामकान्त सरदेसाई परदेशांत अकालीं निधन पावल्याची वार्ता त्याच्या व माझ्या शेंकडों परिचितांस विदित आहे. आमच्या कुटुंबाचा भावी आधार व आगामी पिढीचा पुढारी असा हा विद्यागुणसंपन्न होतकरू मुलगा हरपल्यानें घरांतील सर्वच मंडळी दुःखावेगानें करपून गेली. त्याच्या मातुश्रीस व आम्हां सर्वांस कांहीं काळ सर्व जग शून्यवत् भासलें. त्यांतून वडीलकीच्या नात्यानें इतरांचें सान्त्वन करण्याचें कामही मजवरच आलें. वेळ जाण्याचें साधन म्हणून शाकुंतल व उत्तररामचरित्र या दोन श्रेष्ठ कवींच्या संस्कृत कृती हातीं घेऊन पुराणाचे धर्तीवर घरांतील मंडळीपुढें मीं त्यांचें भाषांतर सांगण्याचा उपक्रम केला. त्यांत आठपंधरा दिवस निघून गेले आणि त्यांतील उदात्त विचारांनीं आमचे मनास दुःखाचा बराच विरंगुळा पडला. शिवाय काळ हाच दुःखाचें विस्मरण पाडणारा, अतएव आपला साह्यकर्ताच होय. अशा रीतीनें पहिला उमाळा शांत झाल्यावर काळाचे व्यापारास सतत उद्योगाची जोड मिळून आमचे नेहमींचे व्यवसाय चालू झाले, आणि पुष्कळदां या मुलाच्याच प्रेमळ आठवणी काढण्यांत मन रमूं लागलें.

माझे दोघे धाकटे बंधू गणपतरावआबा व दिनकररावभाऊ हेही लहानपणापासून माझ्याजवळ अपत्यनिर्विशेषानें वाढले असल्यानें त्यांनींही पितृतुल्य भावनेची शिकस्त करून आम्हांस पुत्रशोकाचा विसर पाडला. गणपतरावआबा तर त्याचे आजाराची तार येतांच सर्व कामें टाकून धावत श्यामकान्ताचे शुश्रूषेस युरोपांत गेला. सहा महिने तो त्याचेजवळ होता. त्यालाच त्याचा अंत्यविधि उरकावा लागला. नंतर एक वर्ष यूरोपांत प्रवास करून त्यानें परत येतांना श्यामकान्ताचें सर्व सामान, कपडे, पुस्तकें, कागदपत्रें वगैरे बरोबर आणिलें. तें सर्व तपासतांना मनांत कल्पना आली कीं, गत व्यक्तीचें कांहीं तरी चिरकालीन व दृश्य स्मारक करून ठेवावें. त्याचीं सर्व

पत्रें एकत्र जुळून ठेवतांना त्यांतलीं कांहीं वाचीत असतां हीं पत्रेंच तेवढीं स्वतंत्र छापलीं तर तेंही एक प्रकारचें स्मारकच होईल असें वाटूं लागलें. खुद्द श्यामकान्ताचे स्नेही व सहाध्यायी पुष्कळ असून मला सांत्वनपर शेंकडों पत्रें आलीं. त्यांत त्याचा मृत्यु म्हणजे एक प्रकारची राष्ट्रीय हानिच होय, असा भाव व्यक्त झालेला होता. त्याचें शेवटचें निरोप घेणारें पत्र त्याच्या हस्ताक्षराच्या प्रतिकृतीसह फर्ग्युसन कॉलेज मॅगाझिनमध्यें व इतरत्र प्रसिद्ध झालें होतें. अंतःकरणांतील भावना व्यक्त करण्यास मातृभाषेचाच कसा उपयोग होतो याचा दाखला म्हणून तें पत्र साहित्यसम्मेलनाच्या अध्यक्षस्थानावरून श्रीयुत श्री. कृ. कोल्हटकर यांनीं आपल्या भाषणांत वाचून दाखविलें होतें.

श्यामकान्ताचा जन्म त्याचे मातामह मोरोपंत कीर्तने यांचेकडे अहमदनगर येथें ता. ५-५-१८९९ रोजीं झाला. पुढें त्याचें बालपण कांहीं काळ कोंकणांत माझे वडिलांजवळ व बरेंचसें बडोदें येथें गेलें. वडिलांचा त्याजवर जीव कीं प्राण असून त्याच्या मुंजीची निश्चिति करण्यासाठीं ते बडोद्यास येत असतां स. १९०७ सालीं मुंबईत वारले. नंतर त्याची मुंज कोंकणांत झाली. मराठी इंग्रजी लेखनवाचन वगैरे प्राथमिक अभ्यास माझेच जवळ घरीं बडोद्यास झाल्यावर पुढें त्यास शाळेंत पाठविण्याची जरूर भासूं लागली, तेव्हां सर जदुनाथ सरकार यांचेमार्फत श्यामकान्त व माझे मामांचा मुलगा जयराम आठल्ये अशा दोघांस ता. १-१२-१९१२ रोजीं रवीन्द्रनाथ टागोरांच्या बोलपुर येथील शान्तिनिकेतनांत दाखल केलें. तेथें चार वर्षें राहून त्यानें कलकत्ता विद्यालयाची मॅट्रिक परीक्षा दिली, आणि ता. १०-३-१९१६ रोजीं शान्तिनिकेतन सोडलें. पुढील जून महिन्यांत त्यानें पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजांत प्रवेश केला. तेथून १९१७त प्रीव्हियस, १९१८त इंटर आर्ट्स्, १९२०त बी. ए. (फिझिक्स्, केमिस्ट्री) व १९२१त बी. एस्सी. याप्रमाणें परीक्षा देऊन ता. २८-११-१९२१ रोजीं मुंबई सोडून मद्रास-कोलंबो मार्गानें नेपल्स, तूलों व पॅरिस येथें जाऊन तो ता. २५-१२-१९२१ रोजीं बर्लिनला पोंचला. तेथें

हस्तलिखित पृ. ६] श्यामकान्ताचे पितामह–श्यामकान्त–(२ वर्षांचा)–भास्करराव–नाना

त्यानें सन १९२४च्या जुलईत डॉक्टोरेटची परीक्षा दिली. पुढें तो इंग्लंडास गेला असतां मलेरियानें आजारी पडून परत बर्लिनला आला. तेथून तो स्वित्झर्लंडांत डाव्होस येथील रुग्णालयांत गेल्यावर आंतड्याची शस्त्रक्रिया होत असतां ता. २८-११-१९२५ रोजीं निधन पावला. मिळून पहिलीं चार वर्षे बंगाल्यांत, त्यांपुढील चार वर्षे पुण्यास व अखेरचीं चार वर्षे यूरोपांत अशा बारातेरा वर्षांच्या अवधींत जमलेला त्याच्या पत्रांचा संग्रह अनेक दृष्टींनीं आम्हांस बोधपर वाटतो. महाराष्ट्रीय कुटुंबांतील एक सुबुद्ध मुलगा कसकसा वाढत गेला, शिक्षणांत व परिस्थितींत त्यास कोणते अनुभव आले, निरनिराळ्या व्यक्तीं-संबंधीं व विषयांवर त्याचीं मतें कशीं बनत गेलीं, त्याच्या एकंदर संवर्धनांत गुणदोष कोणते व्यक्त झाले, इत्यादि प्रश्नांवर एक प्रकारचा अंतःप्रकाश या पत्रांत व्यक्त झालेला आढळतो.

बडोद्याच्या राजपुत्रांस शिकवीत असतांना माझ्या घरांतील मुलांस शिक्षण देण्याच्या कित्येक सोयी मला सहज शक्य झाल्या. श्यामकान्त गर्भांत असल्यापासून त्याच्या योग्य संगोपनाची काळजी आमचे मनांत अहर्निश वागत होती. बंधूंचे व मामांचे मिळून प्रथम चार समवयस्क मुलगे मज-जवळ बडोद्यास राहत असत. गोष्टींच्या रूपानें दररोज कांहीं तरी नवीन माहिती किंवा ज्ञान त्यांस देण्याचा माझा परिपाठ होता. शाळांवर किंवा शिक्षकांवर भिस्त ठेवण्याकडे माझा कल कधींच झाला नाहीं. इंग्रजी तर या मुलांस मीं लहानपणीं संभाषणरूपानें शिकविलें. तसेंच चित्रकला, गायन, पोहणें इत्यादि गोष्टींचा नाद त्यांस आरंभापासून लागला. इतिहासांतल्या व पुराणांतल्या गोष्टी ऐकण्याचा छंद श्यामकान्तास अतोनात होता. सांग-णाराचें तोंड दुखेल पण त्याची तृप्ति होऊं नये. माझेकडे कोणी गृहस्थ आले कीं, ‘ मला गोष्ट सांगा ’ ही त्याची टोंचणी त्यांना लागायची. त्याला चार वर्षे पुरीं होत आलीं असतां एक भाऊ झाला. त्या निमित्तानें कै. प्रो. जिन्सिवाले एके दिवशीं सायंकाळीं मला भेटण्यास आले. माझ्यावर त्यांचा

लोभ विशेष असे. बाहेर वडाचें झाड होतें, त्याखालीं आम्ही बोलत बसलों असतां श्यामकान्तास त्यांनीं हाक मारून जवळ बोलाविलें. नांव वगैरे विचारल्यावर तो म्हणाला, 'मला गोष्ट सांगा.' त्यावरून भगवंतांना भृगुऋषींनीं छातीवर लाथ मारल्याची गोष्ट त्यांनीं सांगितली. जिन्सिवाल्यांइतका प्रेमळ मनुष्य बहुधा दुर्लभ. त्यांतून त्यांची अप्रतिम विद्वत्ता व रसाळ वाणी यांच्या योगानें ती गोष्ट मुलास अतिशय आवडली इतकेंच नाहीं, तर ती ऐकून आमच्या सर्वांच्या चित्तवृत्ति स्तब्ध झाल्या. भक्तवत्सल प्रभु 'श्रीवत्सलांछना'ची खूण अद्यापि आपल्या वक्षःस्थलावर धारण करितो, हें सांगून जिन्सिवाले मला म्हणाले, 'आतां तुला दुसरा मुलगा झाला आहे त्याचें नांव श्रीवत्सलांछन ठेव.' पुढें बारसें झालें, तेव्हां तेंच नांव आम्हीं दुसऱ्या मुलास ठेविलें. तो साडेबारा वर्षांचा असतां ज्वर येऊन स. १९१५ सालीं वारला, त्या वेळीं श्यामकान्त शान्तिनिकेतनांत होता. पुढील ५८, ५९ व ६० या त्याच्या पत्रांत बंधूच्या मृत्यूचा करुण उल्लेख आहे. बुद्धिमत्ता, आज्ञाधारकता, जिज्ञासा व दुसऱ्याचे उपयोगी पडण्याची इच्छा या गुणांत या माझ्या दोन मुलांची बरोबरी करणारे मुलगे माझ्या पाहण्यांत क्वचित्च आले. श्रीवत्सलांछनाचे पहिल्या वाढ दिवसास माझे विद्वान् व प्रेमळ मित्र श्री० महादेव हरि मोडक यांस मीं भोजनास बोलाविलें होतें. त्या प्रसंगीं त्यांनीं आमचें अभिनंदन करून खालील संस्कृत श्लोक बोलतां बोलतां स्वहस्ताक्षरीं लिहून दिला, तो अद्यापि माझे संग्रहीं आहे:—

दंपत्योरितरेतरप्रणयिनोस्तारुण्यमुद्बिभ्रतोः
एकान्तस्थितयो रसोल्लसितयोर्विश्रब्धयोः स्निग्धयोः ।
आविर्भूय बहिः स्थितो ननु तनूं धृत्वा शुभां शैशवीं
आनन्दो युवयोर्गृहेऽस्तु सुचिरं श्रीवत्सलक्ष्माभिधः ॥

M. H. Modak. Baroda,
15–2–1904

अशा या मागच्या आठवणी काढतांना करुण रसानें हृदय भरून आल्याशिवाय राहत नाहीं. श्यामकान्त हा मुलगा गोड, मनामिळाऊ व दुसऱ्यासाठीं कष्ट सोसणारा होता. दारावर भिक्षेकरी येत, त्यांस भिक्षा घालण्यासाठीं ओसरीवर धान्याची टोपली भरून ठेवलेली असे. एखादे वेळीं श्यामकान्त तेथें एकटाच असून भिक्षेकरी आला तर तो सर्वच धान्य त्याचे पदरांत ओती आणि वर सांगे ' उद्यां ये हो ' ! लहानपणाच्या त्याच्या मनोवृत्ती व व्यवसाय उत्तरोत्तर परिणत होत गेले. मराठी व संस्कृत श्लोकांचें त्याचें पाठांतर भरपूर होतें. मुंजीचे वेळीं पंक्तींत सुंदर श्लोक व पद्यें म्हणून त्यानें जेवणारांना अत्यंत रमविलें. बडोद्याच्या वक्तृत्वसमारंभांत बक्षिसें मिळविलीं. अकरावे वर्षीं सूर-सागरांत उडी टाकून तो लीलेनें पोहत परतीरास गेला. बडोद्यास त्यानें सोबती जमवून घरामागें एक सुंदर केळीची बाग बनविली, तिच्यासाठीं माती, शेण, खत व कुंपणासाठीं बाभळींचे भारे कैक दिवस पावेतों हे सर्व मुलगे खांद्यांवरून वाहून आणीत होते. घरच्या घरीं रंगभूमि बनवून त्यानें कित्येक नाट्यप्रयोग अनेक वेळां करून दाखविले. या प्रयोगांस पुष्कळ परिचित मंडळी मुद्दाम येत असत. शांतिनिकेतन येथें असतां सुप्रसिद्ध गवई भीमराव शास्त्री हसूरकर यांचेजवळ त्यानें संगीताचा यथाशास्त्र अभ्यास केला. त्याजबद्दल रवीन्द्रनाथांना मोठें कौतुक वाटे. रवीन्द्रनाथांनीं एखादें नवीन कवन रचलें कीं, लगेच ते रात्रीं श्यामकान्तास झोपेंतून उठवून तें कवन त्याजकडून म्हणवून घेत. त्यांनीं रचिलेल्या अनेक नाटिकांत ते स्वतः अभिनयाचें काम करीत, तेव्हां बरोबर ते श्यामकान्तास घेत. अशा कित्येक खेळांचें वर्णन त्याच्या पत्रांत आहे. शांतिनिकेतनमधून जे विद्यार्थी कलकत्याच्या मॅट्रिक परीक्षेस बसले, त्यांत बंगाली भाषेंत श्यामकान्ताचा नंबर पहिला आला; आणि परीक्षा आटपल्यावर विद्यार्थ्यांचें संमेलन भरलें, त्या प्रसंगीं रवीन्द्रनाथांनीं भाषण करितांना उद्गार काढले ते असे कीं, ' पूर्वीं मराठ्यांनीं येथें येऊन बंगाल प्रांत जिंकला असें आपण इतिहासांत वाचतों,

तें अक्षरशः खरें असलें पाहिजे; कारण हा एक महाराष्ट्रीय विद्यार्थी येथें येऊन तुमची भाषा शिकतो आणि त्या भाषेंत तुमच्यावर नंबर ठेवतो. यावरून अद्यापि मराठे आम्हांस जिंकीत आहेत हीच गोष्ट दिसून येते.'

मराठी, गुजराथी, हिंदी, बंगाली व संस्कृत या एतद्देशीय भाषा आणि इंग्रजी, जर्मन व थोडेंबहुत फ्रेंच या युरोपीय भाषा श्यामकान्तास अवगत होत्या. रसायन व सूक्ष्मपदार्थविज्ञान हे त्याचे आवडीचे विषय होते. संगीत, टेनिस, पिंगपॉंग हे त्याचे करमणुकीचे व्यवसाय होते. मुंबई युनिव्हर्सिटींत लष्करी शिक्षण देण्याचा प्रयोग प्रथम सुरू झाला, तेव्हां त्यांत (I. D. F.) दाखल होऊन त्यानें प्रावीण्य मिळविलें. त्या वेळच्या अव्यवस्थेचें कांहीं वर्णन त्याचे पत्रांत आहे. कॉलेजच्या खेळांचा व वादविवाद मंडळांचा तो निवडून आलेला चालक होता. भाषा, गणित व पदार्थविज्ञान अशा सर्व विषयांत त्याची गति चालत असल्यामुळें प्रोफेसरवर्ग त्याजवर खूष असे. बहुतेक परीक्षा पहिल्या वर्गांत उत्तीर्ण होऊन एक वर्ष त्यानें फेलोचें काम केलें. त्याचें विद्येंतील प्रावीण्य, मनमिळाऊ व छाप बसविणारा स्वभाव व टेनिस वगैरे खेळांची आवड इत्यादि त्याचा दुर्मीळ गुणसमुच्चय पाहून प्रि. परांजपे यांनीं त्यास कॉलेजच्या खर्चानें युरोपीय शिक्षणास पाठविण्याची सूचना केली. पण अध्यापनापेक्षां उद्योगधंद्यांची वाढ करण्याकडे त्याचा ओढा असल्यामुळें त्यानें ती सूचना मान्य केली नाहीं. जर्मनींत चार वर्षांचा अभ्यासक्रम अडीच वर्षांत पुरा केल्यावर टर्म्स् न भरल्यामुळें परीक्षेस बसण्याची परवानगी मिळेना. तेव्हां जर्मनीच्या मिनिस्टर ऑफ् एज्युकेशनकडे अर्ज करून व स्वतः त्याची गांठ घेऊन अस्खलित जर्मन भाषेंत त्यास आपली मागणी पटवून दिली; तेव्हां त्यास एक वर्षाची माफी मिळून परीक्षेस बसतां आलें, आणि मृत्यूपूर्वीं डॉक्टोरेट मिळविल्याचें समाधान लाभलें.

श्यामकान्त शरीरानें नाजूक असला तरी प्रकृतीनें निकोप होता. वर्ण काळासावळा, शरीरयष्टि उंच, पांच फूट आठ इंचांची, गरगरीत डोळे, हास्यवदन

असा हा मुलगा जवळ आला कीं, त्रयस्थांस सुद्धां मोठें कौतुक वाटे, मग घरच्यांस त्याजबद्दल विशेष अभिमान वाटल्यास नवल नाहीं. आसाम प्रांतांत प्रवासास गेला असतां होडींतून उतरतांना पायास जखम होऊन विषदिग्धतेनें त्यास ताप आला. तो आजार त्यास सहा महिने पुरला. शान्तिनिकेतनच्या चालकांनीं तारेनें बोलवल्यावरून बंधु भाऊनें जाऊन त्यास मुंबईस आणिलें. तेथें योग्य उपचार केल्यावर तो बरा झाला आणि पुनः परत बोलपुरास शाळेंत गेला. एकंदरींत त्यानें आजारही पुष्कळ भोगले. पण कोठें कसाही असला तरी त्याचा धीर कधीं सुटला नाहीं. तो अत्यंत सहनशील व आशावादी होता. शेवटच्या क्षणापर्यंत निराशा त्याच्या मनास शिवली नाहीं. त्याचें शिक्षण सर्वांगीण होतें. ज्ञानसंपादनाची त्याची हाव अत्यंत तीव्र होती. कांहीं तरी विशेष पराक्रम करून दाखवावा याचीच काळजी त्याच्या मनास अहर्निश वाटत असे. उद्योग, स्वावलंबन, नियमितपणा, स्वतंत्र विचार इत्यादि जीवनाच्या चढाओढीस लागणारे पुष्कळसे गुण त्यानें पैदा केले होते. याचें प्रत्यंतर त्याच्या पत्रांत सांपडेल.

मुलांचें संगोपन व संवर्धन हा विषय सर्व मातापितरांस नेहमींच जिव्हाळ्याचा वाटतो. अर्थात् त्या संबंधांत त्यांना या पत्रांतून पुष्कळ उपयुक्त बोध व सूचना मिळतील असा माझा तर्क असून, **त्या दृष्टीनें हीं पत्रें म्हणजे आपल्या शिक्षणपद्धतीचा एक प्रबंधच होय असें म्हणतां येईल.** शान्तिनिकेतन, पुणें व बर्लिन येथील शिक्षणाची जी चिकित्सा या पत्रांत ओघानें आली आहे, तिच्यापासून आपणांस अद्यापि थोडेंबहुत मार्गदर्शन होणारें आहे. तसेंच सामाजिक चालीरीति, किफायतीचे उद्योगधंदे, जर्मन मार्कांची घसरपट्टी, भोजनें, खेळ, करमणुकी अशा किती तरी भिन्नभिन्न विषयांवर साधार माहिती या पत्रांत मिळत असल्यामुळें हें एक प्रकारचें मनोरम प्रवासवृत्तच होय असें म्हणण्यास हरकत नाहीं.

माझे संग्रहांत श्यामकान्ताचीं पुष्कळ पत्रें असून तीं सर्वच कांहीं छापलीं

नाहींत. पृष्ठसंख्या वाढून पुस्तक कंटाळवाणें होऊं नये याबद्दल खबरदारी घेऊन ही निवड करूं लागल्यावर टाकाऊ अशीं फार थोडीं आढळलीं. जेवढीं बहुधा कौतुकास्पद किंवा सामान्य उपयोगाचीं वाटलीं तेवढींच घेऊनही तीं माझे मतें ज्यास्तच झालीं. मराठी भाषेंत आपल्या इकडे अशा खुऱ्याखुऱ्या पत्रांचें जिवंत वाङ्मय बहुधा प्रसिद्ध झालेलें नाहीं. तेव्हां भाषेंतला हा एक नवीन प्रकार पुढें आल्यानें त्याचें वैशिष्ट्य व्यक्त होणारें असून प्रत्येक पत्र तेवढ्यापुरतें संपूर्ण असल्यानें तीं सवडीप्रमाणें केव्हांही कशाही क्रमानें पुढेंमागें वाचलीं तरी वाचनास अडथळा येण्याचें कारण नाहीं. इंग्रजी व मराठी अशीं तीं सरमिसळ असल्यानें त्यांत वाचकांस एक प्रकारचें नावीन्यच आढळणारें आहे. आरंभींच्या वयांतील इंग्रजी भाषा चुका न सुधारतां पत्रें जशींच्या तशीं ठेविलीं असून पुढील लिखाणांत देखील कांहीं बदल केलेला नाहीं. तेणेंकरून वयोमानानें मुलाचा बुद्धिविकास कसा होत गेला हें कळून येईल.

संसार असार व जग क्षणभंगुर आहे हें समाधान मला पटत नाहीं. आपण चुका करून त्यांचा दोष देव किंवा दैव यांजवर आम्ही नाहक लादतों असें मला वाटतें. मात्र अज्ञानानें केलेली चूक व समजून उमजून केलेली चूक यांचा भेद सृष्टिनियंत्याजवळ नसतो. विस्तवावर पाय चुकून पडला काय किंवा मुद्दाम टाकला काय परिणाम एकच. आपलें मानवी ज्ञान कोतें असल्यामुळें एखादी चूक आगाऊ आपल्या नजरेस येत नाहीं. पण पुढें परिणाम घडून आल्यावर नीट विचार केल्यास मागाहून ती लक्षांत आल्याशिवाय राहात नाहीं. श्यामकान्तासंबंधानें आमच्या अशाच चुका झाल्या. त्याच्या बुद्धिसामर्थ्यास तोलेल असें त्याचें शरीर बनलें नाहीं. त्याची उडी दहा हात तर आम्हां आईबापांची वीस हात. अशी आमची ऐहिक हाव त्याचे नाशास कारण झाली. मुलें भराभर परीक्षा उत्तीर्ण होऊन बुद्धीची चमक दाखवूं लागलीं कीं, आपणांस त्यांचें पराकाष्ठेचें कौतुक

वाटतें. पण हें कौतुक करितांना इतर बाबतींत आपलें कांहीं चुकत नाहीं ना, अशी साशंक वृत्ति सर्व आईबापांनीं धारण केली पाहिजे असें मला वाटतें. अत्यंत अप्रबुद्ध म्हणून समजलेलीं मुलें अंतीं पाहिजे तो पराक्रम करूं शकतात, आणि अत्यंत सुबुद्ध वाटलेलीं जीवनाच्या चढाओढींत कोठेंच नाहींशीं होतात. पुस्तकी ज्ञानाच्या उत्कृष्ट परीक्षा पास होणें हें कांहीं आपल्या तरुणांचें अंतिम ध्येय नसून, त्यांचे उद्योगास भरपूर क्षेत्र उत्पन्न करून देणें हेंच विचारवंत राष्ट्रभक्तांचें मुख्य कर्तव्य होय, असा माझा कयास आहे. संगोपनाच्या दृष्टीनें आपली राष्ट्रीय प्रजा कार्यक्षम निपजावी आणि त्या संबंधांत पालकांकडून होत असलेल्या चुका सुधाराव्या, असाही माझा एक हेतु हीं पत्रें प्रसिद्ध करण्यांत आहे. पुढच्यास ठेंच मागचा शहाणा, हें सूत्र ध्यानांत ठेवल्यानेंच राष्ट्राचें पाऊल पुढें पडणार आहे.

श्यामकान्ताचीं हीं पत्रें कौतुकास्पद वाटण्याचें आणखी एक कारण आहे. माझ्यावर आलेला प्रसंग कांहीं अलौकिक नाहीं. होतकरू तरुणांना अकालीं मृत्यु आल्याचे प्रसंग घरोघर दृष्टीस पडतात आणि जो तो आपापल्या भावनेप्रमाणें मनाची समजूत घालतो. कवींना कल्पनासृष्टींत दिसतें तें व्यवहारांत घडतच असतें. हरिभाऊ आपट्यांनीं ‘ पण लक्षांत कोण घेतो ? ’ या कादंबरींत तरी एका अभागी तरुणीचें चरित्रकथन केलें, तशाच प्रकारचा एका होतकरू तरुणाचा आयुःक्रम या पत्रांत गोंवलेला आढळेल. त्यामुळें त्यास एक प्रकारचें आत्मचरित्रही म्हणतां येईल; आणि आत्मचरित्र किंवा कादंबरी जर आपणांस मनोरम वाटत असेल तर हीं पत्रें देखील तितकींच मनोरम वाटतील; आणि प्रेमानें प्रेम वाढतें या न्यायानें अथवा ‘ स्निग्धजनसंविभक्तं हि दुःखं सह्यवेदनं भवति ’ असा अनुभव असल्यामुळें, माझ्याशीं समानशील असणाऱ्या व्यक्तींना, तसेंच त्याच्या समकालीन सहाध्यायांना व त्याचें नांव ऐकिलेल्या शेंकडों विद्यार्थ्यांना या पत्रांपासून एक प्रकारचें विशिष्ट तादात्म्य अनुभवायास मिळेल, असा माझा समज आहे. पत्रें वाचतांना नाना

प्रकारचे प्रसंग मनांत उभे राहतात आणि दोन होतकरू मुलगे आम्हांस सोडून गेले ही गोष्ट अद्यापि आम्हांस पटत नाहीं. ते आमचे सभोंवार वावरत आहेत. त्यांचीं पुस्तकें, लिखितें, छायाचित्रें व सामान अद्यापि रोज रोज आमचे दृष्टीस पडतें. बायको दुःख करूं लागली तर मी तिची समजूत घालतों कीं, ते दूर गेले असें कां तूं मानतेस? मी तर म्हणतों सर्वच प्राणी चिरंजीवी आहेत. प्रत्येक इसम आपल्या राष्ट्राचा एक घटक असून लाभलेल्या आयुर्भागांत ज्यानें त्यानें आपलें कर्तव्य यथायोग्य बजावलें कीं, त्याचा कार्यभाग संपला. पांच वर्षांचें मूल, पंचवीस वर्षांचा युवा किंवा पाऊणशें वर्षांचा जरठ यांची किंमत राष्ट्राच्या ताजव्यांत सारखीच. अल्पायुष्य हा कांहीं त्या व्यक्तीचा अपराध नव्हे. उत्कृष्ट स्वयंपाक तयार झाल्यावर तो आकस्मिक कारणानें खाणारांचे मुखांत पडूं शकला नाहीं, म्हणून कांहीं त्या स्वयंपाकाची किंमत हलकी ठरत नाहीं. माझा स्वतःचा पुनर्जन्मावर विश्वास बसत नाहीं. तर या जन्मींच आपण आपापल्या कर्मानें अमर होऊं शकतों असें मला वाटतें. निदान मी तरी श्यामकान्तासंबंधानें हीच भावना ठेवितों. माझे वडील, मातुःश्री, गुरुजन व कित्येक प्रेमळ मित्र, लौकिकी अर्थानें दिवंगत असूनही प्रसंगानुसार अद्यापि त्यांचा समागम मला घडतो. मृत्यु ही काय कल्पना आहे ती त्या भाग्यवान नचिकेतालाही उमगली नाहीं, मग माझी तर काय कथा? सारांश, माझ्या प्रिय पुत्रांच्या प्रेमळ आठवणींनीं मीं क्षणभर त्यांना जिवंत मानून मनाचें समाधान करून घेतलें, आणि त्यांत मीं माझ्या सहृदय वाचकांना संविभागी केलें तर त्यांत आत्मश्लाघेच्या किंवा अहंकाराच्या विकारास मी पात्र होतों अशी कोणाची भावना होऊं नये. जिन्सिवाल्यां-सारख्या शुचिर्भूत ब्राह्मणाचा शुभाशीर्वाद ज्यांस लाभला ते मुलगे धन्य होत.

पत्रें छापण्याची कल्पना आरंभींच मनांत आली असली तरी जास्त विचारासाठीं आठ वर्षें तशींच जाऊं दिलीं; हेंही कांहीं वावगें नाहीं. आणि इतर कामांतून थोडी निवृत्ति मिळतांच तें काम हातीं घेऊन एकदांचें पुरें केल्याबद्दल आतां मनास निश्चिंति वाटेल. शेवटीं या प्रसंगानें अनेक सन्मान्य व्यक्तींचे प्रेमोद्गार या कृतींत सामील करून घेण्याची संधी मला मिळाली हें मी आपलें सद्भाग्य मानून हा विषय पुरा करतों.

कामशेत, ता. १३ डिसेंबर १९३३. **गो. स. सरदेसाई**

गुरुदेवांची आठवण

श्यामकान्त सरदेसाई एके दिवशीं अचानक आमच्या शान्तिनिकेतनांत आला. त्या वेळीं आश्रमांत परप्रांतांतील छात्र बहुधा नव्हते. तथापि आश्रमाशीं सर्वथैव एकजीव झालेला त्याच्यासारखा दुसरा विद्यार्थी आमचे पाहण्यांत नाहीं. परीक्षेचा अभ्यास नीट करून तींत उत्तम प्रकारें उत्तीर्ण होण्याइतकी बुद्धिमत्ता आमच्या इकडे पुष्कळांच्या अंगीं असते, पण अशा असाधारण बुद्धिप्रभावाबरोबरच प्रकीर्ण चित्तवृत्तींनीं समस्त विषयांचें आकलन करण्याचें जिवंत सामर्थ्य फार विरळा आढळतें; तें श्यामकान्ताचे ठिकाणीं असल्यामुळें तो आम्हांस अगदीं आत्मीय वाटूं लागला. आम्ही परकी असें त्याला कधीं भासलेंच नाहीं. आमच्या आश्रमाला त्यानें आपल्या हृदयांत कायम स्थान दिलें, त्यांच्या जीवनास प्रतिष्ठा आणिली, आणि सर्वांचीं अंतःकरणें आकर्षून घेतलीं. अर्थात् आमचें सर्वांचें त्याजवर अत्यंत प्रेम जडलें.

बंगाली भाषेंत देखील त्याची बरोबरी करणारा दुसरा विद्यार्थी आश्रमांत कोणी नव्हता; शिवाय त्याला संगीताची नैसर्गिक आवड होती. या दोन कारणांनीं त्याचें वास्तव्य आश्रमाला आदर्शभूत होऊन त्यामुळें त्याच्या जीविताचाही विकास झाला. श्यामकान्त दूरच्या प्रांतांतून आमचेकडे आला होता, तरी आपल्या बुद्धिप्रभावानें व अंतःकरणवृत्तीनें तो आमचा निकट आप्त बनला; आणि अद्यापि तो आमच्याच जवळ आहे.

ता. ११-६-१९३३ रवीन्द्रनाथ ठाकूर

শ্যামকান্ত সর্দেশাই একদা শান্তিনিকেতন আশ্রমে প্রবেশ করেছিল অপ্রত্যাশিতভাবে, তখন আমাদের বিদ্যালয়ে অন্য প্রদেশের ছাত্র প্রায় কেউ ছিল না। কিন্তু সে যেমন সকল দিক থেকে আমাদের আশ্রমের সঙ্গে একীভূত হয়েছিল এমন অন্য কোনো ছাত্র আমরা দেখি নি। পড়া মুখস্থ করে, পরীক্ষায় ভালোরকম সিদ্ধিলাভ করবার উপযুক্ত মেধা আমাদের দেশের ছেলেদের মধ্যে দুর্লভ নয় — কিন্তু বোধশক্তির যে-চিত্তবৃত্তি বিদ্যাকে এবং চারিদিকের পরিকীর্ণ প্রভাবকে সমঞ্জসীভূত করে সজীব সত্তায় পরিণত করতে পারে তা অল্পই দেখা যায়। সেই শক্তি ছিল শ্যামকান্তের। তাই সে আমাদের অত্যন্ত আপন হয়ে উঠেছিল, — কিছুই তার কাছে বিদেশী ছিল না। সে আমাদের আশ্রমকে হৃদয়ে গ্রহণ করেছিল, জীবনে প্রতিষ্ঠিত করেছিল, এবং সে অধিকার করেছিল আমাদের হৃদয়। আমরা তাকে সকলেই ভালো বেসেছিলুম।

তার সময়কার এমন কোনো ছাত্র আমাদের ওখানে ছিল না বাংলা ভাষায় অধিকারে যে তার সমকক্ষ ছিল। তা ছাড়া আমাদের সঙ্গীতে তার অনুরাগ এবং প্রবেশ ছিল স্বাভাবিক। এই দুই পথ দিয়েই তার মন আমাদের আশ্রমের আদর্শে ও জীবনযাত্রায় নিজেকে সহজেই বিস্তারিত করতে পেরেছিল। দূর গৃহ থেকে এসেছিল শ্যামকান্ত, কিন্তু আপন হৃদয় মনের শক্তিতে সে আমাদের অত্যন্ত নিকটস্থ হয়েছিল, এবং এখনো নিকটেই আছে।

ইতি ১০ই জুন ১৯৩৩ রবীন্দ্রনাথ ঠাকুর

To the Memory of

Shyamakant Govind Sardesai, B.A., B.Sc., Ph.D.

What consolation is left to the father and mother who mourn the untimely death of a loving and beloved son — such a son as would have shed glory on his race, a son whose devotion would have made his parents laugh at sorrow and sickness, poverty and the world's injustice? What consolation save to remember the ancient Greek story which illustrates that those who are purest of heart, those whom the gods love most, die young?

"Cleobis and Biton, natives of Argos, were both alike victorious in the public games. When the Argives were celebrating a festival of Juno, their mother wanted to be drawn to the temple in a chariot. But, as the oxen did not come from the field in time, the young men, being pressed for time, put themselves beneath the yoke and drew the car in which their mother sat, and having conveyed it 45 *stadia*, they reached the temple. The men of Argos, who stood around commended the youths, and the women blessed her as the mother of such sons; but the mother herself, transported with joy, stood before the image and prayed that the goddess would grant to her sons the greatest blessing man could receive. After this prayer when they had sacrificed and partaken of the feast, the youths fell asleep in the temple itself and never awoke more." (Herodotos, I. i, 31).

Such a son was Shyamakant. I watched his growth from his childhood and the richly fulfilled promise of his education. I took him with me in my historical excursion and I mourn his loss. His last thought when in the agonising final stage of his fatal illness in a far-off foreign land, was that his father and mother might not grieve. Surely the prayer of that pure young spirit will be heard on High, and patience will be vouchsafed to his parents to endure on earth, till the day of reunion for evermore and evermore.

Jadunath Sarkar, 30 *June* 1933.

सुहृज्जनोल्लेख

—१—

श्यामकान्त सरदेसाई व मी फर्ग्युसन कॉलेजचे अगदीं समकालीन व समवयस्क विद्यार्थी; पण आमच्या ओळखीचें मैत्रींत रूपांतर झालें तें म्हणजे बी.ए.च्या शेवटच्या वर्षांत (१९१९–१९२०). त्या वर्षीं वसतिगृहांत ते खोली नंबर १२० मध्यें तर मी १२१ मध्यें असे शेजारींच राहात असूं. त्यांचा ऐच्छिक विषय सायन्स व माझा गणित. तथापि इंग्रजी सर्वांनाच आवश्यक असल्यामुळें एकत्र येण्याचे बरेच प्रसंग येत. त्या वेळच्या दोन आठवणी प्रामुख्यानें डोळ्यांपुढें येतात. ते उत्तम टेनिस खेळणारे होते म्हणून मी कैक वेळां कोर्टावर त्यांचा खेळ पाहण्यास बसत असें. दुसरी आठवण म्हणजे ते नेहमीं शेळीचें दूध पीत असत व आपल्याकरितां त्यांनीं टेनिस ' बॉय 'ला एक शेळी पाळावयास लावलें होतें. परीक्षेंत आम्ही उभयतां फर्स्ट क्लासमध्यें पास झालों व कॉलेजमध्यें दोघांचीही १९२० जूनपासून दक्षिणा फेलोज म्हणून नेमणूक झाली. १९२१च्या ऑगष्ट महिन्यांत मीं हिंदुस्थानचा किनारा विलायतेस जाण्याकरितां सोडला. आमच्या सहवास-नाटकांतील पहिला अंक येथें संपला.

*   *   *

श्यामकान्तही पुढें उच्च शिक्षणाकरितां जर्मनीला गेले. १९२२च्या उन्हाळ्याच्या सुट्टींत केंब्रिजहून मी कॉंटिनेंटवर गेलों व बॉन्, बर्लिन वगैरे ठिकाणीं राहिल्यानंतर बर्लिनमध्यें त्यांची माझी गांठ पडली. त्याच वेळीं आमचा उभयतांचा कॉंटिनेंटवर सफर करण्याचा बेत ठरला. १९२२ ऑगष्ट १९ तारखेपासून ते १९२२ सप्टेंबर ९ तारखेपर्यंत म्हणजे अवघ्या तीन आठवड्यांत आम्ही दोघे लिप्झिक, इंस्ब्रुक, व्हिएन्ना, म्युनिच, ओबरआमरगांव, ड्रेस्डेन वगैरे ठिकाणीं जाऊन परत आलों. अनेक दृष्टींनीं आमच्या आयुष्यांतील

या तीन आठवड्यांचा काल फार महत्त्वाचा असा वाटतो. या सफरीचें सविस्तर वर्णन श्यामकांतनीं फर्ग्युसन कॉलेज मॅगॅझिनमध्यें (१९२३ जुलै) “आमचा ऑस्ट्रियाचा प्रवास” या लेखांत केलें आहे. त्यांच्याच शब्दांत लिहावयाचें झाल्यास “कॉलेजांतल्या बऱ्याच वर्षांच्या समागमानें आमची जी मैत्री होती तिचीं बंधनें या प्रवासानें पूर्वीपेक्षां किती तरी जास्त बळकट झालीं.” मला पूर्ण स्मरतें – प्रवासांत असतांना दर आठवड्याला श्यामकांत आपल्या मातोश्रीकरितां सर्व हकीकतीचीं मराठींत पत्रें लिहीत असत व मला माझे वडील-मातोश्री हयात नव्हते म्हणून व कोणी बहीणहि नव्हती म्हणून अत्यंत वाईट वाटे. असो. पत्रलेखनामुळें मराठी लिहिण्याचा श्यामकांतना मोटा सराव असे. म्हणूनच प्रवासाचा वर्णनात्मक लेख लिहिण्याचें काम मीं त्यांच्याकडे सोंपविलें. वर निर्दिष्ट केलेला लेख तोच. त्याच्या प्रारंभीं असलेलें शीर्षक मात्र मीं Bacon मधून उद्धृत केलें होतें.

प्रवासानंतर सुट्टी संपल्यामुळें मी इंग्लंडला परत गेलों व आमच्या सहवासांतील दुसऱ्या अंकाची समाप्ति झाली.

* * *

विलायतेंत Wembley Exhibition झालें, त्या वेळीं श्यामकांत इंग्लंडांत आले व आमच्या वरचेवर पण ओझरत्याच अशा भेटी झाल्या. त्यांत नमूद करण्यासारखें असें आतां कांहीं आठवत नाहीं. जर्मनीला ते परत गेल्यानंतर त्यांना पोटदुखीचा आजार उद्भवला. पुढें तो साधा नाहीं, असें ठरल्यामुळें स्वित्झर्लंडमध्यें हवेकरितां Davos Platz या ठिकाणच्या आरोग्यभुवनांत ते गेले. त्यांच्या शुश्रूषेकरितां त्यांचे चुलते गणपतराव सरदेसाई आले.

आजाराची बातमी प्रथम मला केव्हां कळली याचा उल्लेख आतां मला सांपडत नाहीं. परंतु १९२५ च्या उन्हाळ्याच्या सुट्टींत श्यामकान्तला भेटण्याकरितां म्हणून मी इंग्लंडहून स्वित्झर्लंडला मुद्दाम गेलों. ता. ६।९ ते १३।९ पर्यंत केवळ एक आठवडाच मला त्यांच्या सान्निध्यांत राहतां आलें.

त्या वेळच्या त्यांच्या वृत्तींतील आनंदी व मोकळेपणाबद्दल मला अजूनहि कौतुक वाटतें. ता. १३ रोजीं सकाळीं त्यांचा निरोप घेऊन मी परत इंग्लंडला जावयास निघालों, तीच त्यांची व माझी अखेरची भेट ठरली. अडीच महिन्यांनंतर (नोव्हेंबर २८, १९२५) श्यामकान्तचा अंत झाला. माझ्या रोजनिशींत त्या वेळचे एक दोन उतारे सांपडतात:—

6th (Sunday) September 1925:—"Reached Davos Platz at 1-30 noon. Mr. Vishnu Kirloskar had come to see me at the station. After shaving, went to Krankanhouse to Shyamkant. Met there Ganpatrao Sardesai, his uncle, for the first time, himself lying in bed, suffering from jaundice."

13th (Sunday) September 1925 :—"Left Davos Platz by 9-41 train. Felt very sad when I took Shyamkant's leave in the morning."

30th (Monday) November 1925 :—"Ganpatrao's letter brought the sad news. श्यामकान्तला शनिवारीं (ता. २८) सकाळीं १० वाजून ५० मिनिटांनीं ऑपरेशन करीत असतांनाच ऑपरेशन-टेबलवर देवाज्ञा झाली!"

* * * *

श्यामकान्तला जाऊन आज आतां आठ वर्षें लोटलीं. अशीं आठच काय पण आठ हजारही वर्षें लोटणार. कालाच्या अप्रतिहत ओघांत मोठमोठालीं साम्राज्यें गडप झालीं आहेत व त्यांच्या नांवाखेरीज आतां कांहीं शिल्लक राहिलें नाहीं. पण एकच विचार, एकच प्रश्न, मनांत उद्भवल्यावांचून राहात नाहीं. तो "What is the purpose of it all?"

श्यामकान्तच्या सव्वीस वर्षांच्या चरित्राकडे पाहिलें तर असें दिसतें कीं, त्यांच्या गुणांचें, शिक्षणाचें, विधात्यानें कांहीं एक चीज होऊं दिलें नाहीं. उकळत्या पाण्यावर बुडबुडा उठावा व फुटूनही पण जावा अशाचपैकीं हा

प्रकार झाला. जगाचे व्यवहार नेहमीं चाललेच आहेत. व्यक्ति गेली तरी ते थांबत नाहींत—तिचे मित्रहि पण आपआपल्या व्यवसायांत पुढें मग्न होऊन जातात. पण श्यामकान्तच्या मातापितरांची गोष्ट मात्र निराळी पडते. श्यामकान्त म्हणजे त्यांच्या आयुष्यांतील म्हातारपणची एक काठी,—सर्वस्वच—तीच मोडून गेली. कितीहि वर्षे लोटलीं तरी त्यांच्या दुःखाची तीव्रता कायमच राहणार. दर क्षणाला श्यामकान्तची स्मृति होऊन त्यांच्या मनांत एकच विचार येत असला पाहिजे आणि तो म्हणजे—

" करुणाविमुखेन मृत्युना हरता त्वां वद किं न मे हृतम् ॥ "

फर्ग्युसन कॉलेज, ता. १०-१-१९३४ **गणेश सखाराम महाजनि**

—२—

श्यामकांतची व माझी पहिली ओळख कॉलेजमधली. त्याचा व माझा समाईक मित्र कै. माधव किर्लोस्कर याच्यामुळेंच ती घडून आली व लवकरच आम्हा तिघांची बरीच गट्टी जमली. विशेषतः श्यामकांत व माधव हे दोघेही टेनिस उत्तम खेळत व शिवाय अभ्यासांतही हुशार विद्यार्थी म्हणून गणले जात व म्हणून त्यांच्याबद्दल मला फारच कौतुक वाटे. दुःखाची गोष्ट इतकीच कीं, माझे हे विशेष जिव्हाळ्याचे असे दोघेही मित्र परदेशांत अकालीं मृत्युमुखीं पडले!

कॉलेजांतून बाहेर पडल्यावर कदाचित् इतर सहाध्यायांप्रमाणें श्यामकांतची व माझीही ताटातूट होऊन दोघे आपापल्या व्यवसायांत निमग्न झालों असतों तर त्याच्या दिलदार व सरळ स्वभावाची मला तितकीशी ओळख पटली नसती. पण जर्मनींत पुढील अभ्यासासाठीं जावयाचें त्यानें व मीं एकदमच ठरवलें. १८–२० दिवसांच्या प्रवासांत आणि बर्लिनमधील तीन महिन्यांत आम्ही एकत्रच असल्यामुळें निरनिराळ्या विषयांवरील वादविवाद

व विचारविनिमय वगैरेंमुळें त्याच्या सहृदयतेची व भावनात्मक घटनेची मला पूर्ण ओळख पटली व पूर्वीपासूनच त्याच्याबद्दल माझ्या मनांत वसत असलेला आदर दुणावला.

श्यामकांतची नवीन भाषा शिकण्याची हातोटी कांहीं विलक्षण होती. जर्मन भाषेवरील त्याचें प्रभुत्व वाखाणण्यासारखें होतें व पडद्याआडून अगर टेलिफोनवरून त्याच्याशीं बोलल्यास जर्मन ही मातृभाषा नसलेला माणूस बोलत आहे अशी शंका आली नसती. बंगालीही तो अगदीं बंगाली माणसासारखें बोले. त्याला आजारानें पछाडलें नसतें तर फ्रेंचही शिकण्याचा त्याचा उद्देश त्याला सहज तडीस नेतां आला असता.

श्यामकांत टेनिस व पिंगपाँग उत्तम खेळे. बर्लिनच्या पहिल्या ५–७ खेळाडूंत त्याची गणना होई व पिंगपाँगमध्यें तर तो जवळजवळ सर्वोत्कृष्ट खेळाडू गणला जाई. इतकें असूनही अभ्यासांत तो हुशार विद्यार्थी म्हणून प्रोफेसरांची त्याजवर अत्यंत मर्जी असे व प्रो. टॉम्स त्याच्यावर नेहमीं खूष असत.

खेळ व अभ्यास या दोन्हींत वरच्या दर्जाची कामगिरी करूनच तो केवळ राहिला नाहीं. तर संगीत व चित्रकला यांबद्दलही त्याला आवड असे. त्याचा गळा गोड असून त्याला संगीताचें ज्ञानही चांगलें होतें.

अगदीं निरनिराळ्या क्षेत्रांत असामान्य प्रावीण्य मिळविलेल्या ज्या कांहीं थोड्या व्यक्तींशीं माझा संबंध आला, त्यांच्यांत मी श्यामकान्तची गणना करीन. जर्मनींत त्याचा निरोप घेऊन परत स्वदेशीं येतांना तो मला पुन्हा भेटणार नाहीं असें स्वप्नांतही वाटलें नव्हतें.

श्यामकान्तच्या पत्रांत त्याची विचारसरणी व त्याच्या भावना वाचकांना प्रत्यक्षच दिसणार आहेत. मग त्याच्या एका मित्राकडून प्रस्तावना म्हणून वाचक यांपेक्षां जास्त काय अपेक्षा करणार ?

पुणें, ४-१२-१९३३ — दिनकर धोंडो कर्वे

अनुक्रमणिका

पृ.

प्रास्ताविक

Who Knows! ३

मातेचा अस्रांजली ४

हृद्गत ५

गुरुदेवांची आठवण (रवींद्रनाथ टागोर) १५

श्यामकान्तच्या स्मरणार्थ (जदुनाथ सरकार) १७

सुहृज्जनोल्लेख (प्रि० महाजनि व डॉ० कर्वे) १८

पत्रें पृष्ठें

खंड १ ला–शांतिनिकेतन (पत्रें १–६५) १––९४

,, २ रा–फर्ग्युसन कॉलेज (पत्रें ६६–८१) ... ९७–११८

,, ३ रा–युरोपचें प्रयाण (पत्रें ८२–८६) ...१२१–१२९

,, ४ था–राहणी व मार्कांची घसरपट्टी (पत्रें ८७–१२२)...१३३–२३५

,, ५ वा–सोबती व ख्यालीखुशाली (पत्रें १२३–१४७)...२३९–२९८

,, ६ वा–डॉक्टोरेट (पत्रें १४८–१७७)... ...३०१–३४६

,, ७ वा–अखेरचा आजार (पत्रें १७८–१८९) ...३४९–३७७

परिशिष्ट १ लें–महत्त्वाचे व्यवहार (पत्रें १९०–१९७)...३७८–३८४

,, २ रें–स्निग्धजन-संविभाग (उतारे १–४१)...३८५–३९७

चित्र-सूचि

डॉ. श्यामकान्त	मुखपृष्ठ
श्यामकान्ताची त्रयी...	६
श्यामकान्त (शांतिनिकेतन)	९
गुरुदेव ,, ,, ...	८८
श्रीवत्सलांछन सरदेसाई	८९
विमानांतून सफर	२०६
" लाइप्झिग "	२५१
" बर्लिन "	२९६
पिंगपाँगचा खेळ	३१३
श्यामकान्त व कोर्डे...	३३४
नाना–माई	३५४
रुग्णशय्या	३६८

श्यामकान्तचीं पत्रें

खंड पहिला

शान्तिनिकेतन

डिसेंबर १९१२ – एप्रिल १९१६

श्री

पत्र १ लें

बोलपूर–शान्तिनिकेतन,

ता. ४-१२-१९१२

ती. सौ. गंगूमाईस दोन्ही कर जोडून त्रिकालचरणीं मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार, वि. वि. मी बरा आहें. येथें आतां खाण्याबद्दल मुळींच पंचाईत पडत नाहीं. मधल्या वेळेस किंवा सकाळीं कधीं पुऱ्या, कधीं ब्रेड व पाक (येथेंच बनवितात), कधीं कधीं पोहे, दूध व साखर व कधीं कधीं चुरमुरे, केळीं असतात. मला येथें बऱ्याच जिनसा विकत घ्याव्या लागल्या. पहिल्या प्रथम, आम्हां दोघांस दोन लोटे व दोन वाट्या घ्याव्या लागल्या. रात्रीं पांघरावयास एक एक जाडें पांवरूण घ्यावें लागलें. मुलें आपलीं धोतरें नुसतें पाणी घालून थोडींशीं धुतात, व दर बुधवारीं धोबी येतो त्यास धुवावयास देतात. आम्हांस धोब्याकडे देण्यास तिसरें धोतर नाहीं, म्हणून दोघांत मिळून एक जोडी विकत घ्यावी लागली. शिवाय पेन्सिल वगैरे मिळून धोतरें न धरतां १० रु. झाले. मुंबईहून बांकीपुरास येईपर्यंत दिलेल्या १५० रु. पैकीं ६० रु. खर्च झाले. पैकीं येथें येईपर्यंतचें भाडें १२ रु. जातां रु. ७८ मीं मास्तरांजवळ दिले. त्यांपैकीं एक रुपया त्यांनीं आमच्या जवळ ठेवावयास दिला. आज सर्व मुलें व एक मास्तर फिरावयास गेले होते. वाटेंत पुष्कळ बोरें खालीं. येथील महिन्यांचीं नांवें वगैरे मागाहून लिहीन. येथें आम्ही ड्रिल शिकतों. गेल्या बुधवारीं सर्व मुलांचीं वजनें केलीं. माझें वजन ता. २७-११-१९१२ रोजीं, ३१ शेर, ३ छटाक भरलें व जयरामाचें ३३ शेर भरलें. आमचा अभ्यास बरा चालला आहे. येथें इयत्ता नसतात, पण क्लास असतात. पहिला क्लास म्हणजे मॅट्रिक. एकंदर ९ क्लासेस् आहेत. आम्हीं हल्लीं चवथ्या क्लासांत आहों. येथें संस्कृतचे उच्चार जरा वेगळे असल्यामुळें आमची संस्कृत शिकण्याची व्यवस्था अजून व्हायची आहे. आणखी कांहीं दिवसांनीं नवीन संस्कृत क्लास निघणार आहे, त्याबरोबर आम्ही संस्कृत शिकूं. तोंपर्यंत आम्ही संस्कृतच्या बदली बंगाली शिकतों. कारण संस्कृतचा अर्थ बंगालींत करावा लागतो व बंगाली वाक्यांचें संस्कृतांत भाषान्तर करावें लागतें. असो.

बंगाली भाषा सोपी आहे. आतां जर कोणी कांहीं बोललें तर मला समजतें. मी बंगाली पहिलें पुस्तक वाचतों, तें मला समजतें. तुम्हीं जसें पहिलें बूक धाडिलें तसेंच हेंही सोपें आहे. पुष्कळ वेळां येथें मुलांच्या सभा भरतात व नवीन नवीन नियम मुलें करितात. मला येथें राहावयास मजा वाटते. काळजी करूं नये. मी आज पुण्यास पत्र धाडीत आहें. पत्राचें उत्तर जरूर जरूर धाडावें. कळावें, ही विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र २ रें

बोलपूर–शान्तिनिकेतन,
ता. ११-१२-१९१२

ती. नाना यांस दोन्ही कर जोडून त्रिकाल चरणीं मस्तक ठेवून शिरसा. नमस्कार, वि. वि. मी बरा आहें. बरेच दिवसांत मला तुमचें पत्र आलें नाहीं. मीं येथून धाडलेलें पत्र पोंचल्याबद्दल कळवावें. मीं तुम्हांस बंगाली भाषेंत लिहिलेले कागद धाडिले त्यांबद्दल काय झालें तें कळवावें. कोणास दाखविले काय ? आज सर्वांचीं वजनें केलीं. माझें वजन आज ३१ शेर व ६ छटाक होतें, व जयरामाचें ३३ शेर व १४ छटाक होतें. मीं खालीं एक बंगाली लिपींत व मराठी भाषेंत लहानसें पत्र लिहिलें आहे व तेंच पुढें मराठींत लिहिलें आहे तें पाहवें.

मजबद्दल मुळींच काळजी करूं नये. येथें पुष्कळ वेळां मुलांच्या सभा भरतात. एका सभेंत असें ठरलें कीं, मुलांनीं पायांत बूट घालूं नये, केसांस भांग पाडूं नये व सुवासिक तेलें वापरूं नयेत. कारण हा आश्रम आहे. येथें मुलांना जें लागेल तें मिळतें. ती जिन्नस व तिची किंमत मात्र एका वहींत लिहून ठेवतात. येथें एक टेलिस्कोप म्हणजे दुर्बीण आहे. आठवड्यांतून एक-दोनदां सायन्स शिकतों. आम्ही बरे आहों. पत्राचें उत्तर जरूर जरूर धाडावें. कळावें, ही विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र ३ रें   बोलपूर,

(सबंध पत्र मोडींत)   ता. १८-१२-१९१२

ती. नाना यांस दोन्ही कर जोडून त्रिकाल चरणीं मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार, वि. वि. तुमचें ता. १० चें पत्र वाचलें. वाचून आनंद झाला. मला तें सर्व पत्र चांगलें वाचतां आलें. असो. माझें बंगाली पहिलें पुस्तक वाचून संपलें असें मागेंच मीं लिहिलें आहे असें मला वाटतें. परंतु अजून कांहीं दिवस मला थांबावें लागेल. कांहीं दिवसांनीं म्हणजे मला वाटतें पांचसहा दिवसांनीं चांगलें समजूं लागल्यावर मला सोपें पुस्तक वाचतां येऊं लागेल. हल्लीं मला जितकें समजत आहे, तितकें सोपें बुक येथें नाहीं. पण तुम्हीं ज्याप्रमाणें मागें चिमुकल्या गोष्टी म्हणून पाठविलें त्याप्रमाणें हें आहे. असो. हल्लीं आम्ही ' शिक्षा ' म्हणून एक संस्कृत पुस्तक वाचीत आहों, त्याचा मास्तर आम्हांस अर्थ सांगतात. त्यांनीं जरी अर्थ सांगितला नाहीं, तरी आम्हांस साधारण अर्थ समजतो. असो. तुम्हीं जे कागद भाषान्तर करून मागितले होते ते भाषान्तर करून झाले. त्यांच्यासाठींच मीं हें पत्र लवकर धाडलें नाहीं. ते कागद पोंचल्याचें कळवावें व येथील सर्व कांहीं त्या कागदांनीं कळलें किंवा नाहीं तेंही लिहावें. आम्ही बंगालीसाठींच खालच्या क्लासांत बसलों आहों असें नाहीं. बंगाली मात्र खालच्या क्लासांत शिकतों व बाकीचे विषय वरच्या क्लासांत शिकतों. बहुतेक विषय चवथ्या क्लासांत शिकतों. आमची व सर्व मुलांची परीक्षा ता. २८ आघ्राण (येथील तारीख) म्हणजे गेल्या शुक्रवारीं सुरू होऊन आज आटपली. आम्हीं फक्त अंकगणित, आल्जिब्रा व जॉमेटी याच विषयांत परीक्षा दिली. त्या परीक्षेंत पास न झाल्यानें 'आम्हांस इंग्लिशमध्यें परीक्षा द्यावयास नको' असें मास्तरांनीं सांगितलें. कारण येथें आलों त्या वेळेस त्यांनीं तोंडीं परीक्षा घेतली. स्तोत्रांचें पुस्तक आम्हीं आमच्या बरोबर आणलेलें नाहीं. आमच्यापाशीं जो अभ्यासाचा कागद तुम्हीं दिलेला होता तो मीं येथें आल्याबरोबर मास्तरांस दिला, त्याप्रमाणें त्यांनीं व्यवस्था केली. आम्हांस येथें पोहण्यास वगैरे मिळत नाहीं.

कारण येथें नदी किंवा हौद कांहींच नाहीं. आमची शाळा बोलपूर गांवांत नाहीं, परंतु गांवाच्या बाहेर स्टेशनपासून दीड मैल आहे. स्टेशनपासून येथें यावयाचा जो रस्ता आहे त्यावर लालवट धूळ आहे. परंतु येथें जिकडेतिकडे बारीक रान व निदान आमच्या आश्रमांत तरी रेती आहे. कारण आम्ही जेव्हां बाहेर फिरावयास जातों, तेव्हां तेथें विलेपार्ल्याप्रमाणें शेतजमीन आहे, मळे आहेत. बडोद्यासारखी येथें बहुतेक धूळ नाहीं. झाडें वगैरे तेथल्याप्रमाणें आहेत. आमच्या आश्रमांत पेरूंचीं झाडें, पांढरा चाफा वगैरे आहेत. बांबू चिवार वगैरेसुद्धां आहेत. श्रीकांताबद्दल मीं येथें विचारिलें, त्यांनीं सांगितलें कीं, त्याला येथें येण्यास कांहीं हरकत नाहीं. मी जे कागद धाडीत आहें, त्यांवरून येथें आम्ही कसे वागतों, काय करतों व हा आश्रम कसा आहे वगैरे सर्व कळेल. असो.

येथें एक साहेब शनिवारीं रात्रीं आश्रम पाहण्यासाठीं आला. तो येथें दोन दिवस होता. त्याचें नांव पियर्सन्. तो फार विद्वान आहे, असें मीं ऐकलें. त्याला थोडें बंगालीसुद्धां बोलतां येत होतें. तो येण्यापूर्वीं दोन दिवस सगळ्या मुलांनीं मिळून सबंध आश्रम झाडून साफ केला. आश्रम कांहीं लहान नाहीं. त्याची हद्द फार मोठी आहे. आश्रमांत एक मोठें मंदिर आहे व शान्तिनिकेतन म्हणून बंगला आहे. यावरूनच या आश्रमास 'शान्तिनिकेतन' हें नांव प्राप्त झालें. सर्व मुलांच्या खोल्या सुद्धां दूर दूर आहेत. येथून एक फर्लांगपेक्षां कमी अंतरावर रवींद्रनाथांच्या भावाचें घर आहे. तेथें सर्व लहान मुलें जेवण्यास जातात. मोठ्या मुलांची जेवणाची जागा दुसरीकडे आहे. मुलांस खेळण्यास एक मोठें विस्तीर्ण मैदान आहे, त्यावर बारीक रान आहे. असो.

एकदां पियर्सन्, सर्व मास्तर व मुलें लांब एका खेडेगांवांत एक रान आहे तेथें गेले. जेव्हां पुष्कळ मुलें कोठें तरी एकदम फिरावयास जातात, तेव्हां त्या मुलांच्या लहानलहान तुकड्या करून प्रत्येक तुकडीचा एक एक कप्तान नेमलेला असतो, व सर्व तुकड्यांवर मिळून एक मुख्य कप्तान असतो; ड्रिलच्या वेळेससुद्धां हेच कप्तान असतात. असो. याप्रमाणें सर्व मुलांच्या तुकड्या त्या रानांत गेल्या. तेथें आम्ही जवळजवळ संध्याकाळीं सहा वाजतां

जाऊन पोंचलों. नंतर तेथें एका मास्तरांनीं उत्तम पदें म्हटलीं. त्यांना गातां चांगलें येतें. येथें एक पेटी आहे तीसुद्धां ते फारच उत्तम वाजवितात. नंतर पियर्सन्नीं संस्कृत श्लोक ऐकण्याची इच्छा दर्शविली. तेव्हां मास्तरांनीं आम्हांस संस्कृत श्लोक म्हणावयास सांगितलें. ते आम्हीं म्हटले, ते त्यांना आवडले. नंतर साहेबांनीं एक इंग्रजी कविता म्हटली. मुलांस इंग्रजी भाषण समजणार नाहीं म्हणून साहेबांनीं बंगालींत एक लहानसें भाषण केलें. त्या भाषणाचा उद्देश सर्वांचे आभार मानण्याचा होता. नंतर साहेबांचे आभार मानण्यासाठीं एका मास्तरांनीं त्याला जबाब दिला. पुढें पियर्सन्नें सर्वांस एक पद म्हणावयास सांगितलें. त्याचें नांव “ आमादेर शान्तिनिकेतन ” म्हणजे आमचें शान्तिनिकेतन. तें पद म्हणत म्हणत सर्व मुलें परत आश्रमांत आलीं. नंतर साहेबांचें जेवण झालें. तें मोठ्या थाटाचें होतें. निवडक मुलें साहेबांबरोबर जेवावयास बसलीं होतीं. दुसऱ्या दिवशीं पहाटे आम्ही एका मास्तरांकडे जाऊन दोन संस्कृत श्लोक शिकलों व सकाळीं जेव्हां साहेबांस हार वगैरे जाते वेळेस दिले त्या वेळीं ते श्लोक आम्हीं म्हटले. नंतर सर्व मुलें साहेबांस पोंचवावयास स्टेशनवर गेलीं. जरा निघण्यास उशीर झाल्यामुळें सर्वांना पळत जावें लागलें. साहेबांच्या बरोबर कोणाच्यानें पळवेना. तरी इतक्या मुलांपैकीं निम्मी मुलें त्यांबरोबर स्टेशनवर पोंचलीं. पियर्सन् गाडींत बसले. गाडी सुरू होण्यास एकदोन मिनिटें राहिलीं. इतक्यांत मास्तर वगैरे मागची मंडळी तेथें येऊन पोंचली. याप्रमाणें दोन दिवस मजा करून पियर्सन् गेले. कळावें, ही विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र ४ थें बोलपूर,

ता. १८-१२-१९१२

ती. सौ. गंगूमाईस दोन्ही कर जोडून त्रिकाल चरणीं मस्तक ठेवून शि. सा. नमस्कार. वि. वि. तुझें पत्र पोंचलें, वाचून आनंद झाला. येथें

खाण्यास दही किंवा ताक वगैरे कांहीं नसतें. भाज्या असतात, त्या साधारण नोलकोल, फ्लॉवर किंवा बटाटे, वांगीं अशा असतात. डाळ असते ती वरणासारखी घट्ट असते. शिवाय 'झोल' म्हणून एक पदार्थ असतो, तो आपल्या पातळ व मसालेदार आमटीप्रमाणें असून आंत बटाटे, फ्लॉवर वगैरे घालतात. जेवणाचे शेवटीं एक वाटीभर दूध व साखर किंवा गुळाची वडी मिळते. गुळाच्या वडीस 'लबात' किंवा 'पटली' म्हणतात. कधीं कधीं दुपारचें दूध नसून रात्रीं खीर मिळते. कधीं खिचडी असते, ती आपल्या सारखीच पण जरा पातळ कणेरीप्रमाणें असते, तीस ते 'खिचुडी' म्हणतात. येथें आम्ही सकाळीं जवळ जवळ सहा वाजतां आंघोळ करतों. आतां चांगली संवय झाली आहे. खोकला, पडसें कांहींच नाहीं. इंदूबाईचें पत्र मला परवां आलें. माझे पाय व तोंड येथें फुटतें, म्हणून मी हॉस्पिटलमधून व्हॅसेलिन आणून लावतों. आतां पाय जरा बरे आहेत. कपाळ दुखणें किंवा दुसरा विकार कोणताही होत नाहीं. बिलिमोऱ्याहून अप्पाच्या पत्रावरून श्रीवत्स व श्रीराम बडोद्यास गेले असें कळतें. तर श्रीवत्सास मला एक पत्र धाडावयास सांगावें. मी दमणास त्याला दुसरें एक कार्ड धाडलेलें पोंचलें कीं नाहीं तें कळवावयास सांगावें. कळावें, ही विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र ५ वें

बोलपूर–शान्तिनिकेतन,

ता. २४-१२-१२

चि. श्रीवत्स यास अ. आ. विशेष. तुझें व गंगूमाईचें पत्र आज पोंचलें. वाचून आनंद झाला. येथें आम्हांस कोणालाच मध्यें खाऊं देत नाहींत. एक वाटीभर दूध मात्र दोन वेळां मिळतें. मला तुझी आठवण फार येते. केमिस्ट्री क्लासच्या वेळेस बहुधा तुझी आठवण येते. कारण तेथें पुष्कळ मजेदार जिनसा आहेत. पण तुझी आठवण येण्याचें मुख्य कारण हें कीं, तुला वाफेची लहान आगगाडी पाहिजे होती त्याप्रमाणें अगदीं लहान आगगाडी व एक विजेची

पृ. १]

श्यामकान्त (इ. स. १९१३)

ट्रॅम येथें आहे. आगगाडींत बॉयलर वगैरे सर्व कांहीं आहे. येथें वीज तयार करून एकदां ट्रॅम चालविली होती. शिवाय येथें एक गाण्याचा कंपू आहे, त्यांत सात आठ मुलें गाण्यास जातात. त्यांसाठीं पेटी वगैरे सर्व कांहीं असून शिकविण्यास मास्तरही आहेत. येथील पदें मला फारच आवडतात. तूं व श्रीराम मजेंत आहांत हें ऐकून आनंद वाटतो. येथें संध्याकाळीं कांहीं दिवस शर्यती होतात, त्यांत उड्या मारणें, पळणें, बांबूनें चालणें वगैरे कामें करितात. बांबूनें फारच उंच उडी मारतात. नेहमीं पत्र धाडीत जा. गंगूमाईचें सर्व पत्र मला लागलें. कळावें, हे आशीर्वाद.

श्यामकान्त.

श्री

पत्र ६ वें

बोलपूर,
ता. ९-१-१३

ती. नाना व सौ. गंगूमाईस दोन्ही कर जोडून त्रिकाल चरणीं मस्तक ठेवून शि. सा. नमस्कार, वि. वि. आपलेकडून आलेलीं दोन पत्रें पोंचलीं. वाचून आनंद झाला. गंगूमाई, तुला मी लिहितों तें जरी खरें वाटत नसलें तरी माझ्या मतानें मी माझ्या मनापासून सर्व लिहितों. आपण धाडिलेले पन्नास रु. पोंचले. या खेपेस पुस्तकें वगैरे घेण्यांत सात आठ दहा रु. खर्च होतील. असो. आमच्या खोलींतील सर्व मुलांनीं वर्गणी काढून काल एक वनभोजन केलें. त्यांत अंडीं, लाडू वगैरे होते. अंडीं मीं खाल्लीं नाहींत. मला व जयरामाला आतां बंगाली उत्तम लिहितां येतें. आमचें बालरामायण वाचून संपलें व महाभारत वाचीत आहोंत. बंगाली चांगलें समजतें. कांहीं शब्द अडतात ते मास्तरांस विचारतों. ज्यांचे जे विषय मागें असतात ते, ते विषय शिकण्यासाठीं एक्स्ट्रा (extra) अवरमध्यें जातात. त्या अवरांत आम्ही सुद्धां बंगाली शिकतों. जयराम आतां चांगला बरा झाला आहे.

आम्हांस क्लासच्या बाहेर वाचण्यास फारसा वेळ होत नाहीं. कारण सकाळीं उठल्याबरोबर शौचमुखमार्जन, नंतर व्यायाम, मग आंघोळ,

उपासना, खाणें, नंतर तीन तास क्लास. त्यांपैकीं पाऊण तास बंगाली आम्ही घरींच वाचतों. बाकी राहिलेल्या वेळांत गणित, इंग्लिश व संस्कृत शिकतों. क्लास झाल्यावर दहापंधरा मिनिटांनीं जेवण. नंतर पांचदहा मिनिटें सुटी. पुन्हा पाऊण तास मास्तरांचें होमटास्क (hometask) करितों. नंतर पाऊण तासांत (extra अवरांत) बंगाली शिकतों. पुन्हा तीन तास क्लास. त्या तीन तासांत गणित, केमिस्टी, भूगोल वगैरे शिकतों. क्लास आटोपल्या-वर पांचदहा मिनिटांनीं खोल्या झाडणें व खाणें. नंतर जवळजवळ दीड तास खेळणें. नंतर उपासना. उपासनेनंतर रात्रीच्या जेवणाच्या आधीं बराच वेळ असतो; पण त्या वेळीं एक दिवस गायन शिकावयास जातों व एक दिवस बंगाली गोष्टी ऐकावयास जातों. नंतर जेवण व मग झोंप. मला वाटतें गोष्टी ऐकून आम्हांस बंगाली लवकर येईल. केव्हां पांचदहा मिनिटें सांपडतात त्यांत मी बंगाली वाचतों. कधीं कधीं येथें क्रिकेटच्या व फुट-बॉलच्या मॅचिस् होतात. कधीं कधीं मला माझ्या सायकलची आठवण येते. मला येथें मराठीही थोडेंसें वाचलें पाहिजे असें मला वाटतें. कारण वाचलें नाहीं तर मराठी पुस्तकी भाषा मला चांगली यावयाची नाहीं, म्हणून चांगल्या गोष्टींचीं एकदोन मराठी पुस्तकें धाडून द्यावीं. मला थोडें श्रीवत्सास लिहावयाचें आहे तें खालीं लिहितों. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्रीवत्सास अनेक आशीर्वाद विशेष. तुझ्या वस्तूंची यादी पोंचून आनंद झाला. येथें दररोज बालड्यांच्या बालड्या भरून दूध आणतात. म्हशी व वांसरें किती आहेत म्हणून सांगूं! त्यांना पाहिलें म्हणजे तुझी आठवण आल्याशिवाय रहात नाहीं. कारण म्हशी व वांसरें तुला फार आवडतात. असो. नेहमीं पत्र धाडीत जा. कळावें, हे आशीर्वाद.

श्यामकान्त.

श्री

पत्र ७ वें बोलपूर,

ता. २०-१-१३

ती. सौ. गंगूमाईस शि. सा. न. वि. वि. तुझें पत्र आतांच म्हणजे बाराच्या सुमारास येऊन पोंचलें. वाचून फार आनंद झाला. निजण्याबद्दल जें तूं लिहलें होतेंस त्याबद्दल कांहीं काळजी करूं नये. कारण प्रत्येक खोलींत २०।२१ मुलें व एक मास्तर असतात. मास्तरांचें मुलांवर चांगलें लक्ष असतें. माझी व जयरामची खाट मास्तरांच्या खाटेजवळच असते. डिंकाचे लाडू पाठविण्याची कांहीं जरूर नाहीं असें मला वाटतें. येथें तेथून कांहीं धाडलें तरी अगदीं थोडें पाठवूं नये. कारण जें येईल तें आमच्या खोलींतील वीस एकवीस मुलांस वांटून द्यावें लागतें. आम्ही आतां बंगाली उत्तम बोलतों व लिहतों. हल्लीं रवींद्रनाथ अमेरिकेला गेले आहेत. ते ग्रीष्मऋतूमध्यें विलायतेला जातील. इकडे केव्हां येतील सांगतां येत नाहीं. येथें वर्षांतून दोनदां सुटी असते. एकदां अर्ध्या वैशाखापासून पहिल्या आषाढपर्यंत व दुसऱ्यांदा पहिल्या कार्तिकपासून मार्गशीर्षच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत. सुटींत येथें राहूं देत नाहींत. वडिलांस नमस्कार. कळावें हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र ८ वें बोलपूर,

(मूळ पत्र मोडी) ता. २७-१-१३

चि. श्रीवत्स यास अ. आ. वि. वि. तुझें पत्र आतांच बाराच्या सुमारास पोंचलें. वाचून आनंद झाला. गेल्या गुरुवार व शुक्रवारीं येथें माघोत्सव झाला. दर माघ महिन्यांत हा उत्सव होतो. त्या उत्सवांत पुष्कळ मुलें गात व नाचत होतीं. एका मास्तरांनीं देवाची दोन दिवस प्रार्थना केली. असो. गुरुवारीं आमच्या खोलींतल्या मुलांनीं एक एक आणा वर्गणी काढून खजुराचा

रस आणला होता. या आश्रमांतील सर्व मुलांस तो मिळाला नाहीं, पण आमच्या खोलींतल्यांनाच मिळाला. तो नारळाच्या पाण्यासारखा पण गोडीस जरा जास्ती होता. मला तो फार आवडला. प्रत्येक मुलास जितका पाहिजे होता तितका त्यानें घेतला. मीं दोन फुलपात्रें घेतला. शुक्रवारीं रात्रीं उत्सवानिमित्त उघड्यांत जेवण झालें. खीर होती. हें पत्र पोंचतांच जरूर हितोपदेश धाडून द्यावा. कारण बाकीच्या विषयांमुळें संस्कृतसुद्धां आम्हांस खालच्या वर्गांत शिकावें लागतें, म्हणून आम्ही वर्गांत शिकून शिवाय मास्तरांजवळ हितोपदेश वाचूं. पत्राचें उत्तर यावें. कळावें हे आशीर्वाद.

श्यामकान्त.

श्री

पत्र ९ वें बोलपूर,

ता. ३-२-१३

चि. श्रीवत्स यास अ. आ. वि. तुझें पत्र पोंचलें. पुस्तकेंही पोंचलीं. गंगूमाईचेंही मोठें थोरलें एक पत्र पोंचलें. वाचून आनंद झाला. आम्ही हल्लीं बंगाली बुकें फार भराभर वाचतों. आम्हीं वाचलेलीं पुस्तकें (बंगाली) येणें-प्रमाणें:—बालरामायण, बालभारत, भारतीय विदुषी, अरेबियन नाइट्स्, आर्य नारी वगैरे. यांपैकीं कांहीं बुकें फार मोठीं होतीं. संस्कृत वाचण्यास आम्हांस थोडासा वेळ मिळेल. या प्रदेशांत ‘ सांताल ’ नांवाचे रानटी म्हणजे आपल्या कोंकणांतील धनगरांप्रमाणें लोक राहतात. त्यांच्या लहान लहान झोंपड्या असतात. एकदां रात्रीं जेवण झाल्यावर कांहीं मुलें “ आग लागली रे ” म्हणून ओरडलीं. हां हां म्हणतां सर्व मुलें जाऊन सांतालांच्या झोंपडीची आग विझवून परत आलीं. एकदां बोलपुरांतील अशीच एक आग मुलांनीं विझविली. दोनतीन दिवसांपूर्वीं कांहीं उत्तम उत्तम धावणारीं मुलें ‘ स्यूरी ’ नांवाच्या गांवांत शर्यतीसाठीं गेलीं होतीं. तेथें दोरीवरून उड्या मारणें, धावणें वगैरे पुष्कळ शर्यती झाल्या. पुष्कळ गांवांतील मुलेंही आलीं होतीं. शान्तिनिकेतन-मधील मुलांनींच सोन्यारुप्याचीं वगैरे पुष्कळ बक्षिसें मिळविलीं. ज्या दिवशीं मुलें

परत आलीं त्या दिवशीं जयानिमित्त शाळेस सुट्टी मिळाली. असो. मला आपल्या भाषेप्रमाणेंच बंगाली भाषा आतां भराभर लिहितां येते. हें पत्र पोंचल्यावर आमच्यासाठीं पैसे धाडून द्यावे. मला वाटतें ४० रुपये धाडले तरी पुरेत. पुढें आणखी लागल्यास मागाहून कळवूं. बाकी सर्व बरे आहों. हें पत्र नानांस दाखव. आमच्या वर्गांत एक नेपाळी मुलगा शिकण्यास आला आहे, त्याला बंगाली हुबेहूब बोलतां येतें. आमच्याच वर्गांत शिकतो व आमच्याच खोलींत असतो. आतां पत्र पुरें करतों. पत्र नेहमीं धाडीत जा. कळावें हे आशीर्वाद.

श्यामकान्त.

श्री

पत्र १० वें

शान्तिनिकेतन,

(पत्र मोडी)

ता. २८-२-१३

ती. श्रीराम यास नमस्कार वि. वि. तुझें पत्र पोंचलें. वाचून फार आनंद झाला. खरेंच मी तुला पत्र लिहिण्याचें अजिबात विसरून गेलों होतों. बरी आठवण केलीस. असो. हें पत्र तूं नानांना दाखव.

नानांच्या पत्रांत मीं जें लिहिलें आहे कीं गुरुदेवांच्या पुतण्यांची स्त्री आहे, त्यांच्याशीं आम्ही पुष्कळ वेळां जाऊन बंगालींत गोष्टी बोलतों. त्यांच्या मनांत आमचीं मराठी पक्कान्नें शिकण्याची फार इच्छा आहे. त्यांना मीं श्रीखंड करून दाखविलें, तें त्यांना अतिशय आवडलें व त्यांनीं तें एका मास्तरांस खाण्यास दिलें. त्यांनाही तें फार फार आवडलें. त्यांनीं व मी मिळून एके दिवशीं पिठलें तयार केलें, तें खूप चांगलें झालें होतें. त्यांनीं नंतर लागलींच चार उनउनीत पोळ्या करण्यास एका नोकरास सांगितलें. त्या पोळ्यांस साजूक तूप लावलें आणि त्या पिठल्याबरोबर खाण्यास दिल्या. ती गरम पोळी व पिठलें तुपाबरोबर खाण्यास खूप चांगली लागली. उद्यां मी त्यांना तिखटामिठाच्या पुऱ्या करून दाखवीन. त्यासुद्धां मला बंगाली पक्कान्नें शिकविणार व दाखविणार आहेत. त्यांच्या मनांत आणखी पुष्कळ मराठी पक्कान्नें शिकण्याचीं आहेत.

त्या म्हणतात, गोडगोड पक्वान्नें मला शिकव. परंतु मला पक्वान्नें चांगलीं येत नाहींत. तेव्हां त्यांनीं बडोद्यास पत्र धाडण्यास सांगितलें. त्याप्रमाणें मी हें पत्र धाडीत आहें. गंगूमाई आल्यावर तिला कांहीं तरी लिहिण्यास सांगावें. गुरुदेवांच्या भावाचे पुत्र दिपूबाबू हे अगदीं म्हाताऱ्याप्रमाणें दिसतात. त्यांना कायसा रोग झालेला आहे. त्यांना चालतां येत नाहीं म्हणून त्यांच्यासाठीं एक लहानशी गाडी केलेली आहे. दोन मनुष्यें ती ओढतात. मी ज्यांच्याकडे जाऊन श्रीखंड करून दाखविलें त्या दीपूबाबूंच्या पत्नी. त्यासुद्धां वयानें कमी नाहींत. गंगूमाईपेक्षां मला वाटतें त्यांचें वय थोडेंसें जास्ती असेल. त्या एका सुंदर बंगल्यांत राहतात. त्या बंगल्यांत खूप नोकरचाकर असतात. या शाळेंतील सर्व लहान मुलें तेथें जेवण्यास जातात. दिपूबाबूंच्या बायकोस सगळीं मुलें ‘ बडो मा ’ म्हणतात. बडो मा म्हणजे थोरली आई. त्यांचा स्वभाव फार चांगला आहे. त्या सर्व मुलांना आल्याबरोबर कांहीं तरी खाऊ देतात. आम्हीं येथें बरे आहों. मधें मधें गरमी फार पडली होती. पण आतां पुन्हा थोडीशी थंडी पडली आहे. असो.

मला वाटतें मकरंद आतां मला अगदीं विसरून गेला आहे. पार्ल्यास असतांना माझ्यासाठीं हपापलेला होता. पण आतां तो मला मुळींच पत्र धाडीत नाहीं, याचा अर्थ तरी काय? पत्राचें उत्तर तूं लवकर धाड व मकरंदास पत्र धाडण्यास सांग. हें पत्र नानांना दाखव. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र ११ वें

बोलपूर,

ता. २१-३-१९१३

ती. सौ. गंगूमाईस दोन्ही कर जोडून त्रिकाल चरणीं मस्तक ठेवून शि. सा. नमस्कार वि. वि. तुझें पत्र पोंचलें. तूं दोघांना मिळून एक मच्छरदाणी घ्यावयास सांगितलीस पण तसें करतां येत नाहीं. त्याचें कारण हें.

एक तर हल्लीं फार गरमी असल्यामुळें दोघांना एके ठिकाणीं निजतां येत नाहीं. दुसरें, एका खाटेवर दोघांना जागा होत नाहीं. तिसरें, आश्रमाचा नियम असा आहे कीं, दोघांनीं एका जागीं निजावयाचें नाहीं. तेव्हां दोघांना दोन मच्छरदाण्या पाहिजेतच. मच्छरदाणी जर वापरली नाहीं तर भयंकर मच्छरें चावून खात्रीनें ताप येतो. शिवाय या आश्रमाचा नियमच आहे, कीं प्रत्येकाजवळ एक मच्छरदाणी असलीच पाहिजे. मीं सध्यां एक विकत घेतली आहे. तिची किंमत १ रु. ८ आ. जयराम हल्लीं दुसऱ्या एकाजवळ दोन होत्या त्याच्या जवळचीं एक घेऊन निजतो. मी बरा आहें. इंदिराराजांचें व जयसिंहरावांचें लग्न कोणाशीं झालें तें कळलें नाहीं, कळवावें. आम्ही येथें बरे आहों. पत्राचें उत्तर धाडावें. आतां पत्र पुरें करितों. कळावें, हे विनंति.

श्यामकान्त.

श्री

पत्र १२ वें

शान्तिनिकेतन,

ता. २६-३-१९१३

ती. सौ. गंगूमाईस शि. सा. नमस्कार वि. वि. ही जयरामाची आजाराची दुसरी पाळी. मंगळवारीं म्हणजे काल ताप येऊन जयराम पुन्हा हॉस्पिटलमधें गेला. म्हणण्याजोगा ताप आलेला नाहीं. काळजीचें कारण नाहीं. गंगूमाई, मी अशक्त असें सगळे जण म्हणतात; परंतु येथें आल्यापासून मी हॉस्पिटलमधें रहावयास कधींही गेलेलों नाहीं. तसा, कुठें तरी लागलें कीं औषध लावावयाला जातों. परंतु त्याला आजारपण म्हणत नाहींत. मला येथें आल्यापासून कधींही ताप आला नाहीं. कांहीं दिवस येथें राहून मग मात्र मला खेळण्याची पंचाईत पडली. क्रिकेट कोणी खेळेनासें झालें. मग कांहीं दिवस मीं बागेचें काम केलें. नंतर त्या कामाचासुद्धां कंटाळा आला. मग मी फुटबॉल खेळण्याचा प्रयत्न करावयास लागलों. प्रथम फुटबॉल माझ्या

पायास लागत असे. कालच मीं एका टीममध्यें माझें नांव घातलें. मला फुटबॉल चांगला येत नसल्यामुळें, फारशा मुलांत मी खेळत नाहीं. मी ज्या टीममध्यें खेळतों त्या टीमचा आतां मी कॅप्टिन झालों आहें. काल कांहीं मुलें मुर्शिदाबाद पहाण्यास गेलीं आहेत. विशेष आनंदाची खबर ही कीं, इंग्रजी परीक्षेंत मला ७४ मार्क मिळून मी पहिला नंबर आलों आहें. जयरामला इंग्रजींत ४७ मार्क मिळाले. तो तिसरा कीं चौथा नंबर आहे. मी आतां हळूहळू बंगाली गाणीं व कविता शिकत आहें. या आश्रमांत गाणारीं मुलें ठरलेलीं आहेत त्यांपैकीं मी एक. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

<u>पत्र १३ वें</u> बोलपूर–शान्तिनिकेतन,

(पत्र मोडी) ता. २-४-१३

ती. रा. रा. नाना यांस दोन्ही कर जोडून त्रिकाल चरणीं मस्तक ठेवून शि. सा. नमस्कार वि. वि. मी आठवड्यांतून दोनदां पत्र लिहतों. एकदां रविवारीं व एकदां बुधवारीं. गेल्या रविवारीं मीं पत्र धाडलेलें नाहीं. आज बुधवार. आज आमचें वजन झालें. माझें वजन ३३ शेर ८ छटाक व जयरामचें ३४ शेर. या वेळीं माझें वजन उतरलें आहे. मला दोन तीन दिवस कसेंसेंच वाटत होतें. असो. जयरामची प्रकृति आतां चांगली आहे. या खोलींत पुन्हा राहण्यास आला आहे. मीही आतां बरा आहें. मला आतां फुटबॉल खेळतां येतो.

काल एप्रिल महिन्यास आरंभ झाला. कालच्या दिवसास April-fool म्हणतात. काल सगळीं मुलें एकमेकांना फसविण्याचा प्रयत्न करीत होतीं. एका मुलाला मुलांनीं सांगितलें कीं, त्याचें एक पार्सल आलें आहे. तो मुलगा पार्सल उघडून पाहतो तों पार्सलच्या डब्यांत एक जोडा. त्याचप्रमाणें एका मुलास सांगितलें कीं, आज त्याला या आश्रमांतून हाकलून देतील.

त्याचप्रमाणें सर्व मास्तरांनींही सांगितलें. तो बिचारा रडत रडत जाण्यास तयार झाला. नंतर सर्व मुलें "एप्रिल फूल" म्हणून ओरडण्यास लागलीं. याप्रमाणें पुष्कळ जण फसले. आमच्या जाण्याचें वगैरे काय ठरलें आहे? आतां सुट्टीस एक महिनासुद्धां राहिला नाहीं. पुष्कळ जण मला विचारतात, कीं तुला तिकडे कोण घेऊन जाईल? मी सांगतों कीं मला त्याबद्दल कांहीं ठाऊक नाहीं. असो. हें पत्र पोंचल्यानंतर आमच्या येण्याचें काय तें लिहावें. कदाचित् मी तुम्हांला या सुट्टींत पाहूं शकणार नाहीं. कारण श्रीवत्सानें लिहलें आहे कीं, तुम्ही एप्रिल महिन्यांत विलायतेस जाणार आहांत. तुमचें जाण्याचें ठरलें आहे का? भाऊ हल्लीं कोठें असतात तें कळवावें. मी जर तिकडे गेलों तर माझी पेटीबिटी घेऊन जायला हवी कीं काय? माझे येथील सर्व कपडे वगैरे सुद्धां घेऊन जावयाला हवेत का? सुट्टीच्या आधींच पांच दिवस मुलें जाण्यास आरंभ करतील. असो. जास्ती कांहीं लिहीत नाहीं. आम्ही सर्व बरे आहों. काळजी करूं नये. कळावें, हे विज्ञपना.

श्यामकान्त.

श्री

पत्र १४ वें

शान्तिनिकेतन,
एप्रिल १९१३

ती. सौ. गंगूमाईस. तुझ्याकडून किंवा नानांकडून पत्र आलें नाहीं. आमची सुट्टी २८ एप्रिलपासून १४ जूनपर्यंत आहे. हल्लीं आमच्या आश्रमांत खाण्याची नवी व्यवस्था झाली आहे. आश्रमांत सात आठ घरें आहेत. प्रत्येक घरांत २०-२५ मुलें राहतात. रोज एक एक घराची 'परिवेशना'ची पाळी असते. ज्या घराची पाळी त्या घरांतील मुलें सर्व आश्रमास जेवावयास निमंत्रण करितात; व जेवणघरांत पाट वगैरे मांडून सर्व तयारी करितात. स्वयंपाक ब्राह्मणच करितात. सर्व मुलें येऊन बसल्यावर त्या घरांतील मुलें वाढावयास आरंभ करितात; याप्रमाणें चार वेळां खाण्याची व्यवस्था

करण्यांत येते. आम्हांला तीन वेळां एक एक वाटी Condensed milkचें ताक मिळतें. ज्या दिवशीं आमची परिवेशनाची पाळी होती त्या दिवशीं आम्हीं खूप मजा केली. दुपारीं जेवणाच्या वेळीं रांगोळ्या काढल्या. या रांगोळ्या आपल्या देशाप्रमाणें काढीत नाहींत. तांदुळाचें पीठ पाण्यांत भिजवून दुधाप्रमाणें करून त्या पांढऱ्या पाण्यानें वाटोळी नकशी काढितात. बंगालमध्यें जेवणाच्या वेळीं उदबत्त्या नसतात. पण एका मास्तरांनीं व मीं सांगितल्यावरून उदबत्त्या आणिल्या होत्या. रात्रींच्या जेवणाच्या वेळीं गुरुदेव व पियर्सन्साहेब यांना बोलाविलें होतें. खीर, सरबत वगैरे मजेदार खाणीं केलीं होतीं. पियर्सन्साहेबांनीं आफ्रिकेंत जाऊन काय काय केलें त्याची हकीगत पुढच्या खेपेस नानांना लिहीन. येथील एक मास्तर + + + + निघून गेले. त्यांनीं दोघातिघां मुलांना एका लहानशा अपराधासाठीं छडीनें खूप मारिलें होतें. त्यासाठीं सगळेच त्यांना दोष देऊं लागले व शेवटीं ते निघून गेले. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

पत्र १५ वें

Shantiniketan,
Dated 23-7-1913

My dear Nana,

I received your letter on the 22nd July. I am very glad to know that the boys are progressing fast. Only the result of the examination in mathematics is known. I have got $\frac{74}{100}$ marks and stand 2nd. Jayaram has got $\frac{64}{100}$ marks and stands the 4th. The English examiner said to our English teacher that among all the students of the 4th class my paper was the best. You had asked me to inquire something; but I have lost your card and I can't inquire it now. I am sending the Bengali Calendar to you with this letter, and our

time-table too. It will make you known how we spend our time here. The rainfall of the last Bengali month that is of आषाढ, was 7·32 inches, and the rainfall of this month that is of श्रावण, is ·66 inches to this day. There was rain for two days only. The maximum temperature here is 95° and the minimum temperature is 78°. Jayaram in my opinion, studies a little better than what he was doing before. He likes works of strength and labour more than study. Yet I will make him study well. We have a holiday to-day. You know that the Bengalies pronounce स as श. Often, I remember the following Sanskrit आर्या which we had learnt at Vilaparla.

यद्यपि बहुनाधीषे तथापि पठ पुत्र व्याकरणम् ।
स्वजनः श्वजनो मा भूत् सकलं शकलं सकृच्छकृत् ॥

Certainly this is often the case. The Bengalies pronounce सकल as शकल; and शकल and सकल have different meanings. I shall translate some other story into Marathi afterwards. The next time I shall write the account of the Tagore-family to you. I can't tell you about my promotion yet. I shall write to you how I am progressing in Bengali the next time. I am very glad to know, that the boys play cricket and foot-ball there. We play nothing but foot-ball here. Jayaram can't play foot-ball. He likes to work at gardening. Jayaram shall write to you on the Sunday next. With good wishes to you all,

I am yours obediently
Shyamakant.

श्री

पत्र १६ वें
शान्तिनिकेतन,

(पत्र मोडी)
जुलई १९१३

ती. सौ. गंगूमाईस. तुझें पत्र पोंचलें. काल रात्रीं भयंकर वादळ होऊन जोराचा पाऊस पडला. मी हल्लीं बंगाली पुस्तकें भराभर वाचीत आहें. हल्लीं अरेबियन नाइट्सचा दुसरा भाग वाचीत आहें. जयराम दररोज पाऊण तास एका मास्तरांजवळ बंगाली शिकतो. येथें जेवणांत दही किंवा ताक कधींच नसतें. एके दिवशीं ताक आलें होतें, तें दुधांत मिसळून मीं दही केलें. खाण्याबद्दल माझें येथें कांहीं अडत नाहीं. मी आतां येथील सर्व मुलांस चांगलें ओळखतों. येथें पुष्कळ सभा होतात. सभेची घंटा पडल्याबरोबर सर्व मुलें सभेस जातात. येथें प्रत्येक कामाची घंटा होते ती येणेंप्रमाणें:—

सकाळीं उठण्याची पहिली घंटा. नंतर जरा वेळानें घर झाडण्याची, नंतर व्यायामाची, नंतर स्नान करण्याची घंटा, नंतर देवाची उपासना करण्याची warning व नंतर उपासनेची. दर ४५ मिनिटांनीं मुलें निरनिराळे विषय शिकण्यास जातात. सकाळीं तीन तास अभ्यास होतो व दुपारीं तीन तास होतो. पुष्कळ विषयांत कांहीं क्लासांस सुट्टी असते. सकाळचा क्लास झाल्यानंतर खाण्याची घंटा. जेवणानंतर थोडी विश्रांति घेऊन मुलें home-task करितात. पुनः तीन तास क्लास. नंतर पुनः घर झाडण्याची घंटा. नंतर मधल्या वेळची खाण्याची घंटा व पुनः उपासना करण्याची. नंतर जवळजवळ एका तासानें रात्रींच्या जेवणाची घंटा. नंतर शेवटीं निजण्याची घंटा.

येथें एक युरोपियन गृहस्थ आले आहेत. पूर्वीं पियर्सन्‌साहेब आले होते ते बंगाली शिकले. त्यांनीं इंग्लंडहून एक बंगाली पत्र लिहिलें आहे. पण या साहेबांस बंगाली येत नाहीं. त्यांचें आज लेक्चर आहे. इंग्लिशमध्यें होईल.

तुझी मला आठवण येते, पण इतकेंसें वाईट वाटत नाहीं. कारण मी सगळ्या मुलांत खेळतों, शिकतों व मजा करितों. कळावें हे विज्ञापना.

श्यामकान्त.

पत्र १७ वें

Shantiniketan,
27th July 1913

My dear Nana,

I am very glad to inform you that I have sent the genealogical table of the Tagore family with this letter. I got these family names from Mr. Dinendranath Tagore. Find out his name from the Tagore family. Shrivatsa is very fond of the names of any such family. I suppose he will like this genealogical table very much. The last Wednesday the Bengali Literary Meeting or बंगाली-साहित्य-सभा was held. I had written an essay on Baroda and read it. All the students and teachers liked it. It is now corrected by teachers and written in one of our monthly magazines, called Prabhat. *Sahityasabha* is held twice a month and the English literary club, once in a week. I speak both in the Bengali Sahityasabha and the English literary club. I read 'The Life of David Livingstone,' with Chunilal-Babu*. Jayaram reads the History of England with him. There is a third boy, named Fanindra Bushan Gupta, who reads with Chunilal Babu. We three read with him privately. We write in short what we read. Our studies are going on well. Jayaram works well now. I try not to let him waste time. I had asked Jagadanand Babu § about my promotion. I told him five things :—

(1) "In almost every subject in the fourth class, I am strong. Here I am wasting my time in many subjects. So I should get promotion into the 3rd class.

(2) My age is 15. So I will not have to wait for the matriculation examination if I be promoted into the 3rd class.

---

* A teacher in Shantiniketan. § Superintendent just dead July 1933.

(3) I have to learn many other things, and to travel to many other countries. So I want myself to be promoted into the 3rd class, that I may pass the matriculation soon.

(4) My father has sent me in this country very long from my country and he is spending much money for me. So I must try to pass the matriculation examination as soon as I can.

(5) I can make up the subject in which I am weak, for I have plenty of time and my father is ready to pay specially for me."

To this Jagadananda Babu replied, "The annual examination shall take place within three months. It is a very difficult task for you to make up within three months. So you must learn the subjects in which you are weak in the Puja Vacation in October, when you will go home, and then if you learn the subjects thoroughly, you shall be promoted into the 2nd class at the end of the year."

I consented to what he said and I shall try to get into the higher class.

We had 1·87 inches rainfall during the last 4 or 5 days. To-day there is no rain and the sky is clear. There are plenty of guava trees here. I eat many guavas and at the same time I remember Shrivatsa and all the other boys. I am quite well. How is Gangumai now, let me know.

Yours obediently,

Shyamakant.

पत्र १८ वें

30-7-1913.

My dear Nana,

I suppose you have received the account of the Tagore family I sent you. To-day is Wednesday which is a holiday

here. Yesterday too we had a holiday, as it was the day on which Ishwar Chandra Vidyasagar died. He was one of the most learned and merciful men in Bengal. Yesterday there was very much rain. Mr. Andrews is here yet. He was the umpire yesterday at a cricket match. We are taught fire-drill here. The day before yesterday we were playing in the fields when the bell was rung. All the boys ran very fast and the Captain formed a line. Some of the older boys were ordered to climb one of the houses with sticks in their hands. They took two bamboos and climbed the house, while we were bringing water. There was no fire at all, but the boys were being taught the fire-drill. Mr. Griffith, an English gentleman, has come here to inspect our Ashram. He saw all the houses and classes and on 28th July delivered a speech. He said, "I want to tell you our English games and how the English Schools are. I shall tell you four things. Those who shall not understand me shall please raise their hands. The first thing I want to tell you is 'the paper-chase'; the second is the day on the river. The third is 'Guyfox' and the fourth is 'Christmas.'" [*The letter then describes at great length all these four subjects as explained in the speech.*]

Yours obediently,
Shyamakant.

ठाकुरवंश व रवीन्द्रनाथ

पत्र १९ वें

बोलपूर,
ता. ३०-७-१९१३

टागोर हा शब्द ठाकूर शब्दाचा इंग्रजी अपभ्रंश होय. बंगाल्यांत ठाकूर हाच शब्द सर्वत्र वापरतात. रवीन्द्रनाथ ठाकूर हे हल्लीं जगांतील राजकवि व थोर पुरुष होत. ठाकुरवंश पुष्कळ वर्षांपासून मोठा व प्रसिद्ध आहे.

त्यांतल्या त्यांत रवीन्द्रनाथांचे आजोबा **द्वारकानाथ** यांचे वेळेस ठाकुर-वंश विशेष प्रसिद्धीस आला. द्वारकानाथांचा जन्म स. १७९४ त झाला. त्या वेळीं बंगाल्यांत शाळा नव्हत्या, म्हणून ते एका साहेबाजवळ स्वतःच इंग्रजी शिकले, आणि व्यापार करूं लागले. ते अत्यंत बुद्धिमान व उद्योगी होते. सरकारी मिठागारांत एजंटचें काम पत्करून त्यांनीं पुष्कळ पैसा मिळविला. कार ऍंड टागोर कंपनी म्हणून त्यांची एक कंपनी व युनियन बँक म्हणून पेढी होती. व्यापारांत त्यांनीं इतका पैसा मिळविला कीं, त्यांची बरोबरी करणारा दुसरा कोणी नव्हता. ते श्रीमंती थाटांत राहत. मोठा दानधर्म करून गरिबांस व शाळांस मदत करीत. दरमहा एक लाख रुपये खर्च निव्वळ दानधर्माचा होता, म्हणून लोकांत त्यांची आख्या ' प्रिन्स ' अशी होती. तथापि त्यांनीं आपलें सगळें आयुष्य व्यापारांतच घालविलें नाहीं. देशाच्या उन्नतीची त्यांस अहर्निश चिंता वाटून तत्त्वज्ञान, साहित्य व संगीत इत्यादि विषयांत त्यांचें लक्ष फार होतें. गव्हर्नर जनरल लॉर्ड बेंटिंक त्यांचे घरीं भेटीस येत. राजा राममोहन राय यांचे तर ते उजवा हात समजले जात. ब्रिटिश इंडियन असोसिएशन ही सुप्रसिद्ध संस्था द्वारकानाथांनीं काढिली. त्यांनीं दोनदां यूरोपचा प्रवास केला, त्या वेळीं त्यांना इंग्लंडांत मोठा मान मिळाला. व्हिक्टोरिया महाराणीची त्यांजवर विशेष भक्ति होती. परत आल्यावर प्राय-श्चित्त घेण्याविषयीं लोकांनीं त्यांस फार आग्रह केला, पण त्यांनीं प्रायश्चित्त घेतलें नाहीं. पुनः इंग्लंडास जाऊन तिकडेच ते स. १८४६ त मरण पावले.

द्वारकानाथांचे पुत्र **देवेंद्रनाथ** यांस वडिलांची सर्व संपत्ति मिळाली; तरी त्यांनीं विरक्त राहून आपलें आयुष्य ईश्वरचिंतनांत घालविलें. त्यांचा जन्म कलकत्ता येथें सन १८१८ त झाला आणि राममोहन राय यांनीं स्थापिलेल्या शाळेंत त्यांनीं विद्याभ्यास केला; आणि विलासांत व श्रीमंती थाटांत राहत असतां त्यांची आजी वारली, तेणेंकरून त्यांस विरक्ति उत्पन्न झाली. व्यापारा-कडे दुर्लक्ष होतांच वडिलांनीं स्थापिलेली कंपनी व पेढी बुडाली. त्यांत पुष्कळ लोकांचें नुकसान झालें, तें त्यांनीं स्वतःच्या पैशांतून भरून दिलें; आणि ईश्वर-स्वरूप जाणण्याच्या उद्योगास ते लागले. ईशावास्योपनिषदांतील एक वाक्य लिहिलेला कागद त्यांना सांपडला, त्याचा अर्थ त्यांनीं 'रामचंद्र वेदान्त वागीश'

यांजकडून समजून घेतला. त्यावरून समाधान वाटून ते संस्कृत शिकले आणि वेदान्ताचा अभ्यास केला. नंतर हिमालयावर जाऊन त्यांनीं दोन वर्षे एकान्तांत तपश्चर्या केली. परत आल्यावर सन १८४२त त्यांनीं ब्राह्म धर्माची दीक्षा घेतली; आणि तत्प्रीत्यर्थ त्यांनीं अतिशय श्रम केले. ब्राह्मोंचा प्रसार होण्यास मूळ देवेन्द्रनाथांचाच उद्योग कारण झाला. दर आठवड्यास ते कलकत्ता येथें आवेशयुक्त वाणीनें लोकांस धर्मोपदेश करीत. देवेन्द्रांचे द्वितीय पुत्र **सत्येन्द्रनाथ** हे वडिलांच्या उपदेशास अनुसरून गाणीं रचीत व तीं समाजापुढें गाऊन दाखवीत. या पितापुत्रांच्या विद्वत्तेनें बंगाली भाषेचें वैभव वृद्धिंगत झालें; आणि एक प्रकारची नवीन धर्मसुधारणेची भावना देशांत उत्पन्न झाली. लोकांनीं देवेन्द्रनाथांस ' महर्षि ' अशी पदवी दिली. देवेन्द्रांनींच बोलपूरचा ' शान्तिनिकेतन ' हा आश्रम स्थापिला. ते ता. १९-१-१९०५ रोजीं दिवंगत झाले.

देवेन्द्रनाथांचे वडील चिरंजीव **द्विजेन्द्रनाथ** हेही सुशिक्षित होऊन राष्ट्रोद्धाराचे कामीं निमग्न झाले. त्यांनीं आर्यतत्त्वज्ञानाचा उत्तम अभ्यास करून इंग्रजी व बंगाली ग्रंथ लिहिले. राष्ट्रीय गाणीं बंगालींत लिहिण्याचा प्रघात यांनींच पाडिला. बंगाली साहित्याचे ते आद्य पुरस्कर्ते होते.

देवेन्द्रांचे द्वितीय चिरंजीव **सत्येन्द्रनाथ** हे हिंदुस्थानांतले पहिले आय्. सी. एस्. होत. यांनीं मुंबई इलाख्यांत अनेक ठिकाणीं न्यायाधीशाचें काम केलें; आणि मराठी चालीरीतींविषयीं बंगालींत निबंध लिहिले. तुकारामाच्या अभंगांचें बंगाली भाषान्तर त्यांनीं केलें. त्यांचे धाकटे बंधु **ज्योतिरिन्द्रनाथ** हेही एक उत्कृष्ट बंगाली लेखक आहेत. यांना गायनकला उत्कृष्ट साधली आहे. त्यांनीं स्वदेशी आगबोटीची एक कंपनी काढिली तींत त्यांस नुकसान आलें. चवथे बंधु **हेमेन्द्रनाथ** हे एक मोठ्या दर्जाचे शास्त्रज्ञ होते. यांची बहीण **स्वर्णकुमारीदेवी** ही एक श्रेष्ठ प्रतीची लेखिका असून '**भारती**' नांवाचें बंगाली मासिक चालविते.

महर्षि देवेन्द्रनाथांचे सर्वांत कनिष्ठ पुत्र **रवींद्रनाथ** यांस गुरुदेव म्हणतात. त्यांचें चरित्र सुप्रसिद्धच आहे. प्रथमपासूनच त्यांना गाणीं रचण्याचा नाद असून तीं सर्व त्यांनीं **गीतांजलि** या नांवानें एकत्र छापून प्रसिद्ध

केलीं, त्यांचें इंग्रजी भाषान्तर त्यांनीं प्रसिद्ध केल्यावर त्यांस ' नोबेल प्राईझ " मिळालें. त्यांनीं आपलें ज्ञान सर्वथा स्वतःच्या प्रयत्नानें मिळविलेलें आहे. हल्लीं ते ५३ वर्षांचे असून ते सर्वदा ध्यानमग्न असतात. त्रोटक वंशः—

- द्वारकानाथ ठाकूर
  - देवेन्द्रनाथ
    - द्विजेन्द्र
      - द्विपेन्द्र
    - सत्येन्द्र
      - सुरेन्द्र
    - हेमेन्द्र
      - हितेन्द्र
    - वीरेन्द्र
    - ज्योतिरिन्द्र
    - रवीन्द्रनाथ
      - रथीन्द्रनाथ
  - गिरीन्द्रनाथ

पत्र २० वें

Shantiniketan,
27th August 1913

My dear Shrivatsa and Makarand,

I was long expecting your letter and to my great delight I received your letter yesterday. Before 3 or 4 days every one of us got an egg while we were taking our meal. I ate one, Jayaram did not eat it. I am gladly informing you in this letter that I am promoted in mathematics too. The Puja Vacation is very near now. We are to wait one month for it. The day before yesterday I got a letter from Poona. You perhaps know that there was a heavy rainfall in Burdwan before some days and that the whole town was flooded. All the shops were washed away by the fast and strong current of the water. Many men died. Many are helping Burdwan. More than 50 Rs. are sent to Burdwan from our Ashram here. Every boy gave some money to help Burdwan. I and Jayaram

together gave Re. 1. Do you play cricket matches there? The boys here celebrated an anniversary the day before yesterday. Because that day was the birth-day of a monthly magazine named **Bithika** ‘ बीथिका ’. It means an avenue. There are many such magazines in the Ashram. They are not printed by a printing press but written by hands. We saw a curiosity in the sky yesterday. A narrow tail-shaped cloud nearly 10 feet long was seen in the sky. Our teacher told us that the cloud would make a large quantity of water fall down from the sky, upon the ground under it. I am now going to describe the surrounding part of our Asram. First of all I must tell you that our Asram is full of many kinds of trees. To the north, there are thick trees. When we go outside the Asram, we only see a plane ground having some trees upon it. When we go a few steps to the north of the Asram, we find a small sandy spring having a slow current and red soil. It is called खो आई in Bengali. When we trace the spring, we find many screw-pine-trees (केवडा) about the spring. The flowers of these trees perfume the air about the spring. We often bring many screw-pine-flowers. When we stand out-side the Asram, we can view a large plane ground covered with green grass. Our Asram is situated on a higher ground than the surrounding places. We can see many forests beyond the plane ground. To the south, there is a pond with many palm trees surrounding it. Beyond the pond are the huts of the uneducated black people, called Santals. Ah, what a beautiful scenery it is!

Yesterday another anniversary was celebrated. Because yesterday was the birth-day of another magazine named बागान. The railway fare from Bombay to Calcutta is Rs. 15, 10 as. 6 pies. Please show this letter to Nana and Gangumai. I am quite well. How is Gangumai now?

I had written to Aba to send some Marathi poems of Ramdas, Tukaram, Ekanath, Namdeo, etc. But he did not anwser my letter. One of my teachers Kshitimohanbabu wants to have the Marathi poems from me. So please send some poems of the famous Marathi poets, as soon as you can. Hoping you are quite well.

I am yours affectionately,
Shyamakant.

पत्र २१ वें

Brahmacharyasram Shantiniketan,
Bolepur Loop (*E. I. Ry.*)
1 *September* 1913

My dear Nana,

It gives me a great pleasure to have your letter on the 23rd August. I am not sorry for the मुकूट. It made you know my knowledge of Bengali. I hardly get time to write a long letter to you. I am writing a long letter today. I am sorry to inform you that I have no time to translate another story nowadays. Of course I shall do it when I shall get time. I am very glad to inform you that I am promoted in Bengali too. I am not quite weak in my new class. I always read, whenever I get time and have now nearly made up. Chunilal Babu does not get time to teach me nowadays, and I too do not read any extra book. Suren Babu teaches me the English poems which I have not learnt with my new class. I will soon make up. Revd. Andrews is gone to Delhi. On the 13th August he acted the trial scene of the Merchant of Venice. It was very good and interesting. Last Wednesday he acted some scenes from ' As You Like It; '

it also was an amusement to us all. Some boys go to Revd. Andrews to learn English with him, but I can't do so because I get no time. I was very glad to read in your letter the boys play cricket for more than two hours. I had written to you in the last letter that a young boy had come here from Bombay. His name is Ramchandra Ganti. He is a Bengali. He lives in Bombay and he cannot read or write Bengali at all. He can speak Marathi but not very well. Once I asked him in Marathi, "तुला या टीममधें कोणीं खेळायला सांगितलें ?" He answered, "तो एक माणस आला होता ना, तेन सांगितला हाय."

After उपासना, a certain number of boys go to learn Bengali songs with Dinendranath Thakur; you know who he is. You may find out the name from the table of the Tagore family. He is the best singer of this Asram now. He teaches us a drama with songs. It shall be acted before the vacation. I attend a new class. I shall learn mathematics in the vacation, and if I can do it well, I shall be placed in a higher class. But just after my placing into a higher class annual examination shall take place, and if I pass it, I shall be promoted into the 2nd class in all subjects.

You perhaps know that the Bishop College boys had come here from Calcutta before some days to play a foot-ball match with our Asram. They were defeated by one goal. C. M. S. College-team also had come here from Calcutta to play a match with our Asram yesterday. One of the players was an Englishman. The players were very gentle and they defeated our Asram by 3 goals. Of course they were not young boys, but men. I am quite well. I had forgotten to write to you our English results of the last monthly examination. I got highest marks, and they were 57. Jayaram stood 2nd in the 4th class getting 42 marks. After

the examination I am promoted. The rest of the boys of the 4th class failed. We are quite well. Hoping for an answer,

I am yours obediently,
Shyamakant.

पत्र २२ वें

कलकत्ता,
७–१०–१९१३

ती. सौ. गंगूमाईस दोन्ही कर जोडून त्रिकाल चरणीं मस्तक ठेवून शि. सा. नमस्कार वि. वि. सप्टेंबरच्या २९व्या तारखेला रात्रीं अकरा वाजतां गुरुदेव येणार म्हणून मोठा उत्सव करण्याचा बेत चाललेला होता. बोलपूरहून शान्तिनिकेतनला येण्याच्या रस्त्याच्या बाजूंना दिवे लावून व दिवाळीप्रमाणें घराच्या चारी बाजूंना दिवे लावून मुलांनीं घर व रस्ते हीं शोभायमान केलीं होतीं. गेटच्या आंतल्या बाजूस एक कुशासन केलें होतें व त्याच्या चारी बाजूंना रांगोळी काढली होती. मी व जयरामानें संस्कृत मंत्र पाठ करून ठेवलेले होते. जवळ जवळ सर्व आश्रम गुरुदेवांना आणावयास स्टेशनवर गेला होता. ते आल्यावर त्यांना कुशासनावर बसविण्यांत आलें व आम्हीं मंत्र म्हणावयास सुरुवात केली. मंत्र म्हणणें व गुरुदेवांची पूजा करणें झाल्यावर गुरुदेव म्हणाले, "मला इतक्या दूर देशांत जाऊन इतकें यश मिळेल असें स्वप्नांत सुद्धां वाटलें नव्हतें. मला जें यश मिळालें तें तुमचेंच यश. कारण हा आश्रम माझ्या यशाला कारणीभूत झाला. मीं जर हा आश्रम स्थापन केला नसता, तर मला कधींही इतकी कीर्ति प्राप्त झाली नसती. तेव्हां तुम्ही माझी स्तुति करूं नका; आणि मी सुद्धां अगदीं मनापासून असें समजतों कीं, मीं कांहींच केलें नाहीं. असें असतां जर कोणीं मला चांगलें म्हणत असेल तर ती मोठी चूक आहे."

गुरुदेव आतां म्हातारे झाले आहेत. त्यांचे केस व दाढी पिकून पांढरी झाली आहे. तथापि, ते भव्य, उंच व सुंदर दिसतात. त्यांच्या मुखचंद्रमामध्यें तेज विराजमान आहे, आणि त्यांची वाणी खूप मधूर आहे. असो.

गुरुदेवांचें भाषण

दुसऱ्या दिवशीं म्हणजे मंगळवारीं सकाळीं Oxford University Mission आणि शान्तिनिकेतन आश्रमाची मॅच झाली. कोणीच हरलें नाहीं. याच दिवशीं रात्रीं ' वाल्मीकि-प्रतिभा ' नाटक झालें. मीं लक्ष्मीचा पार्ट घेतला होता. बुधवारीं सकाळीं मंदिरांत गुरुदेवांनीं आम्हां सर्वांना उपदेश केला. जवळ जवळ तास दीड तासपर्यंत ते बोलत होते. त्यांचें भाषण फार कठीण होतें. तरी पण त्यापैकीं जेवढें माझ्या ध्यानांत आहे तेवढें मी येथें लिहीत आहें. ते म्हणाले, " देवाला शोधावयास रानांत जावें लागत नाहीं. देव आपल्या जवळच असतो. मूर्तिपूजा करण्याची जरूर नाहीं. नुसती पूजा करूनच देव मिळतो असें नाहीं. मानवजातीचें कल्याण केल्यानें, मानवजातीचा द्वेष न केल्यानें, व आपल्या जवळ जें काय आहे तें मनुष्यजातीला देऊन टाकल्यानें देव मिळतो. देवाला आकृति नाहीं. परंतु देऊन टाकणें म्हणजे काय ? आपल्या भारतवर्षांतील अनेक पुरातन ऋषि भारतवर्षासाठीं पुष्कळ वस्तू देऊन गेले आहेत. ज्याप्रमाणें रामदासस्वामी मनास उपदेश देऊन गेले. या देण्यानें सर्व जगाचा केवढा मोठा लाभ झाला आहे ! त्याप्रमाणें ऋषींनीं दिलेल्या देणग्यांचा उपयोग करून आपण जगाला आणखी कांहीं तरी दान केलें पाहिजे; नाहीं तर मनुष्याचें आयुष्य व्यर्थ आहे. मनुष्यानें जर जगाला कांहीं दान केलें नाहीं, तर शत सहस्र वर्षांच्या पुरातन ऋषींनीं दिलेल्या देणग्या मनुष्यानें व्यर्थ फुकट घालविल्यासें होईल. तेव्हां प्रत्येक मनुष्यानें जगाला कांहीं तरी नवें दिलें पाहिजे. म्हणजेच त्याला देव मिळतो." नंतर त्यांनीं हा मंत्र म्हटला:-" असतो मा सद्गमय, तमसो मा ज्योतिर्गमय, मृत्योर्मा मृतं गमय । आविराविर्मयेधि । रुद्र, यत्ते दक्षिणं मुखं ते न मां पाहि नित्यम्. " नंतर आम्ही सर्वजण घरीं गेलों.

दुसऱ्या दिवशीं मी व जयराम गुरुदेवांच्या भेटीस गेलों. त्यांनीं आम्हांला कांहीं प्रश्न विचारले व आम्ही त्यांचीं उत्तरें देऊन जरा वेळानें परत आलों.

ऑक्टोबर ता. ३ला आम्ही प्रभातबाबूंच्या बरोबर कलकत्त्यास आलों. कलकत्ता शहर जवळ जवळ मुंबईसारखेंच आहे. ता ४ला सकाळीं आम्ही वंगीय-साहित्य-परिषद् पाहण्यास गेलों होतों. तेथें बंगालच्या मोठमोठ्या

लेखकांचे फोटो पाहिले. त्याच्या नंतर ‘ पारस्य मंदिर ’ म्हणजे जैन लोकांचें मंदिर पाहिलें. तें बांधण्यासाठीं पुष्कळ खर्च आला होता. त्याच दिवशीं जेवणानंतर कलकत्त्यांतील अजब घर Museum पाहावयास गेलों होतों. पहिल्या मजल्यावर आम्हीं बुद्ध देवाच्या व इतर देवांच्या दगडी मूर्ति पाहिल्या. त्या जमिनींत खणून सांपडलेल्या आहेत. नंतर मोठीं मोठीं मेलेलीं जनावरें पाहिलीं. एक देवमासा पाहिला, तो फारच मोठा होता. याप्रमाणें पुष्कळ वस्तू पाहिल्या. नंतर मोंगल घराण्यांतील चित्रें पाहिलीं, तीं फारच सुंदर होतीं. संध्याकाळीं आम्ही घरीं परत आलों. ता. ५ ला आम्ही Botanical Garden पाहावयास गेलों होतों. पहिल्यानें ट्रॅमनें हुगळी नदीपर्यंत गेलों. नंतर हुगळी नदींत आगबोटींत बसून शिवपूर नांवाच्या एका लहान बंदरांत गेलों. तेथें एक मोठी बाग आहे, तींत फार सुंदर प्रकारानें झाडें लावलेलीं आहेत. पुष्कळ प्रकारचीं झाडें यूरोप, अमेरिका, आफ्रिका व ऑस्टेलिया प्रभृति दूर देशांहून आणलेलीं आहेत. एक वडाचें झाड आहे, त्याच्या पुष्कळ फांद्या इतक्या दूर पसरलेल्या आहेत कीं, त्यांचा विस्तार ९३० फूट आहे व लांबून हें झाड मोठ्या अरण्याप्रमाणें दिसतें. हें झाड १४० वर्षांचें जुनें आहे. बडोद्याच्या Summer House प्रमाणें पुष्कळ हिरवींगार घरें तेथें होतीं. त्यांना Green Houses म्हणजे हिरवीं घरें म्हणतात. आगबोटींतून परत येतांना थोडासा पाऊस लागला. जरा वेळानें आम्ही घरीं पोंचलों. ता. ६ ला आम्ही Zoological Garden म्हणजे बडोद्याच्या कमिटीबागेप्रमाणें एक बाग आहे, तो पाहावयास गेलों होतों. तेथें पुष्कळ प्रकारचीं दूर देशांहून आणलेलीं जिवंत जनावरें पाहिलीं. बडोद्यास साप नाहींत. येथें आम्हीं पुष्कळ प्रकारचे साप पाहिले. बागेंत जातांना प्रत्येकाचा एक एक आणा द्यावा लागला. बागेंतून परत येतांना आमच्या शाळेंतील एका मुलाच्या घरीं गेलों होतों. त्या मुलाचा चुलता आंधळा आहे. परंतु आंधळ्यांचीं लिहिण्यावाचण्याचीं अक्षरें ते शिकलेले आहेत. त्यांच्या पाशीं पुष्कळ इंग्रजी व बंगाली पुस्तकें आहेत. त्या पुस्तकांवर खिळ्यानें भोंकें पाडलेलीं आहेत. त्या भोंकांवर हात ठेऊन ते पुस्तक वाचतात. आपण जितक्या भराभर वाचतों तितक्याच भराभर ते सुद्धां वाचतात. त्यांच्या जवळ एक लिहिण्याचें यंत्र होतें.

एक खिळा हातांत घेऊन तें यंत्र कागदावर ठेवून त्यांनीं कागदाला भोकें पाडलीं. तेथें दुसरा एक आंधळा होता, त्यानें त्या कागदावर जें लिहलेलें होतें तें वाचून दाखविलें. नंतर त्यांनीं आंधळ्यांचे खेळावयाचे पत्ते, सोंगट्या, वगैरे खेळ दाखविले. आंधळ्यांचें घड्याळही आम्हीं पाहिलें. साध्या घड्याळा-वरची कांच काढली म्हणजे घड्याळावर हात फिरवून किती वाजले तें आंध-ळ्यांना सांगतां येतें. असो. कांहीं वेळ तेथें बसून जरा वेळानें आम्ही घरीं आलों. आज रात्रीं आम्ही पाटणाला* जाऊं. पत्र लिहावयाचें असल्यास तेथील पत्त्यावर लिहावें. आम्ही बरे आहों. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र २३ वें

शान्तिनिकेतन,

ता. १७-११-१९१३

ती. सौ. गंगूमाई यांस त्रि. च. म. ठे. शि. सा. न. वि. वि. तुझें पत्र पोंचलें. वाचून फार आनंद झाला. मी सुटींत जदुनाथ सरकार यांच्या येथें मजेंत होतों. त्यांच्या येथें ते मासे व मांस खात असत. मीं बरेच दिवस त्या प्रकारचें कांहींच खाल्लें नाहीं. कांहीं दिवसांनीं मी त्यांच्या येथील खाणें खाऊं लागलों. जयरामानें अद्याप खाल्लें नाहीं. सुट्टी संपल्या-वर परत आश्रमांत आलों. हल्लीं येथें क्रिकेट खेळतों. दोन दिवसांपूर्वीं सगळेजण रात्रीं जेवावयास बसलों असतां विलायतेहून दहाबारा तारा येऊन पोचल्या कीं जगांतील सर्वांत मोठ्या कवीला प्रत्येक वर्षीं बक्षिस देण्यांत येतें तें रवींद्रनाथांना आज मिळालें. बक्षिस आठ हजार पौंड म्हणजे एक लक्ष वीस हजार रुपयांचें आहे. आशियाखंडांत तें कधीं कोणाला मिळालेलें नाहीं. यावरून रवीन्द्रनाथ केवढे सन्माननीय आहेत तें समजून येतें. ते नेहमीं

* पूजेच्या सुट्टींत श्यामकांत व जयराम पाटणास जदुनाथ सरकार यांजकडे राहण्यास गेले होते.

शान्त व गंभीर असतात. हा सन्मान रवीन्द्रनाथांना मिळाला म्हणून आम्हांस चार दिवस सुट्टी देण्यांत आली आहे. सर्व मुलांना अत्यंत आनंद झाला होता. काल सकाळीं प्रार्थनेच्या वेळीं गुरुदेव म्हणाले, " देव आमच्या हातून मोठमोठीं कामें करवितो व लोक त्याबद्दल आमची प्रशंसा करतात. पण याबद्दल आपण स्वतः जर गर्व करूं लागलों तर आपला समूळ नाश होईल. सबब जेव्हां आपणांस मोठा सन्मान मिळतो, तेव्हां आपण ईश्वराची प्रार्थना केली पाहिजे कीं, हे ईश्वरा, हा जो सन्मान मला मिळाला तो माझा नव्हे, परंतु तुझें तूंच माझ्या हातून हें काम करविलेंस. " प्रार्थनेनंतर आम्ही येथून जवळच सुरूल वनांत वनभोजनास गेलों होतों.

मला कांहीं मराठी पुस्तकें पाठवून द्यावीं. मनोरंजन किंवा आनंद असें कांहीं तरी तुमचें वाचून झाल्यावर पाठवावें. कळावें, हे वि.

श्यामकान्त.

पत्र २४ वें

Bolepur, Shantiniketan,
Dated 14-12-1913

My dear Nana,

I have not of late written you a long letter. I suppose you will be pleased after reading this letter. You have perhaps got Jayaram's letter. This noon, we shall be examined in History. The day before yesterday a meeting called छात्रसभा was held.

I must tell you what छात्रसभा means. After we came back from the Puja Vacation, we were assembled in a house, where Gurudeo and the other teachers were present. Gurudeo said, " Boys, I am going to speak to you about the छात्रसभा. It would be better if the students themselves see everything of the Ashram. They should make any rules they like for their convenience: they should be given the manage-

ment in their own hands. Teachers shall not make them observe certain rules. Of course, when they make new rules, they must ask permission of their teachers. For this purpose a meeting named छात्रसभा shall be held at certain times in a month, where the students only shall be present." After Gurudeo went away, the boys elected a president from among themselves. They made an Executive Committee of 15 members. This meeting was to be held when required.

The day before yesterday this meeting was held to have some suggestions of helping the poor Indians in South Africa. The teachers were present in this meeting. Mr. Nepalchandra Roy was the president.

Mr. Pearson and Reverend Andrews started for South Africa from our Ashram, about a week ago. Firstly one of our teachers read a letter from Mr. Pearson, who was on board the ship for three days. Secondly Mr. Gokhale's letter to Gurudeo was read. Rev. Andrews had written to Mr. Gokhale before some days informing him that our Shantiniketan boys are working hard as labourers and getting wages. These wages shall be sent to South Africa. He also had sent Rs. 30, as the first instalment earned by the boys of Shantiniketan. Gokhale wrote to Gurudeo, "You are one among a million. You have brought a great glory to our country. So it is not good for you to put your life in danger We are fit for it, and we shall work hard for South Africa."

Lastly, Mr. President asked the boys to suggest some way of getting money, which shall be sent to South Africa. Nearly 7 suggestions were made by the boys. The following are the suggestions:—

(1) If the boys do not take their meal for one night, nearly 25 Rs. would be saved.

(2) If the older boys do not play and work at gardens in the evening, the subscription of the sports will be saved.

(3) In the doctor's opinion the quality of oil is as good as the ghee. If oil is used instead of ghee, nearly 2 Rs. a day shall be saved.

(4) An उत्सव is made on account of the establishment of this Ashram on 7th Poush. Many guests shall come here. If the boys, working as labourers, go to the station and bring all the goods of the guests, they can get the wages of a cooly. A paper should be hung to each boy's neck, on which will be written, "Cooly for helping the South African Indians."

(5) On the 7th Poush, many servants are required for small works. If the boys work instead of the servants, they can get the wages of the servants.

(6) Some two or three houses are to be built. If the boys work as labourers at the house, they can get the wages of the labourers.

Some did not like to use oil instead of ghee. But oil or ghee is used very little in our food and we can hardly get the smell of oil or ghee.

Lastly Nepalbabu the president began to speak. "Boys," said he, "if any one is not ready to suffer a little for his own countrymen, who are being flogged and who are working as slaves in South Africa, he shall not be compelled to do so. But in my opinion if any one has a slight part of sympathy for his country, he will certainly be ready to suffer for his country. The people of our country can hardly get food in South Africa, while you are taking ghee and many other sweetmeats here. Our countrymen outside are hardly getting food, while some of us are not ready to use oil instead of ghee. Does it look well? If you have sympathy for your countrymen, be ready to suffer for your country."

Ramsay Macdonald

All the boys were gladly ready to do what Nepalbabu told them to do. Yesterday no one except the young children took their food in the night. So nearly 20 Rs. are saved. Many of the boys go to work in the evening at the new house which is to be built.

I am quite well. I shall write a long letter after the examination. It is very hard for Jayaram to overtake me in my studies. For our class is much progressed. Are you quite well ? I am glad to hear from Shrivatsa that he likes to go to school. Tell him to try to possess the first place in his class. I work at the new house in the morning and play cricket in the evening. I am thinking how to repay Jadu Babu's kindness. I shall try to suggest one way in the next letter. Is Shrivatsa very fond of riding his bike as I was ? Has Makarand learnt to ride a bike ? I am very sorry for Shrikant's illness. I have at all forgotten to write you about Mr. Ramsay Macdonald—member of Parliament. He had come here some two or three days ago. He delivered a lecture here. I shall not write it to you in this letter. For the letter is becoming too long. He asked me some questions. First our teacher told him pointing at Jayaram, that they were two Marathi boys. He asked Jayaram, whether he lived in the City of Baroda or outside the City. Jayaram was a little confused and then I answered him, " We live in the main town. " Then he went away.

Send me *Manoranjan* or *Ananda* each month when you finish your reading. After the examination I shall try to translate Tukaram's or Namdeo's अभंग into Bengali prose, and some Bengali stories into Marathi. To translate Bengali into Marathi, I must learn Marathi language fully.

With good wishes to you all,

I am yours affectionately,

Shyamakant.

श्री

<u>पत्र २५ वें</u>

शान्तिनिकेतन,
ता. २४-१२-१९१३

ती. सौ. गंगूमाईस दोन्ही कर जोडून त्रिकाल चरणीं मस्तक ठेवून शि.. सा. नमस्कार, वि. वि. तुझें पत्र पावलें. आम्ही येथें खूप मजेंत होतों. गुरुदेवांचे वडील महर्षि देवेन्द्रनाथ ठाकूर यांनीं 'ब्राह्म' धर्माची दीक्षा घेतली होती, त्याला परवांचे दिवशीं तेरा वर्षें पुरीं झालीं, म्हणून आमच्या आश्रमांत खूप उत्सव चालू होता. सकाळीं साडेचार वाजतां उठून प्रातःकृत्यें आटोपून आम्हीं सर्वांनीं आंघोळी केल्या व नंतर सकाळचें खाणें खाऊन मंदिरांत देवाची प्रार्थना करावयास गेलों. तेथें गुरुदेवांनीं प्रार्थना केली. मुलांनींही प्रार्थनेचीं गाणीं म्हटलीं. दुपारच्या जेवणानंतर आम्ही गोंधळ पहावयास गेलों. गोंधळास येथें "यात्रा" म्हणतात. रात्र होईपर्यंत गोंधळ चालू होताच. तथापि आम्ही पांच वाजतां परत येऊन जेवावयास बसलों. जेवणही मजेचें होतें. जेवणानंतर पुन्हा देवाची प्रार्थना व देवाचीं गाणीं झालीं. तेव्हां जवळजवळ नऊ वाजले होते. नंतर आम्ही दारूकाम पहावयास गेलों. द्वीपेंद्रनाथ ठाकूर यांनीं दारूकामासाठीं २०० रुपये खर्च केले होते. जवळजवळ एक तासपर्यंत दारूकाम चालू होतें. बोलपूरहून दोन तीन हजार मंडळी दारूकाम पहावयास आली होती. आणखी एक गोष्ट सांगावयास विसरलोंच. शान्तिनिकेतनमध्यें येणाऱ्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना पुष्कळ प्रकारचीं दुकानें बसलीं होतीं. पेढे, बर्फी वगैरे पुष्कळ प्रकारच्या खाण्याच्या वस्तूंचीं व खेळण्यांचीं दुकानें लागलीं होतीं. त्यांच्याशिवाय सर्कशी, तमाशा, जादूचे खेळ वगैरे करणारे पुष्कळ लोक तंबू ठोकून खेळ दाखवीतच होते. असो. अशा प्रकारें आमचा परवांचा उत्सव आटोपला. उत्सवाच्या वेळीं कोल्हापुराहून एक मराठी कवि आले होते, त्यांचें नांव 'सुमंत'. त्यांनीं त्यांच्या कवितेचीं तीन पुस्तकें मला दिलीं. त्यांच्या कांहीं गाण्यांचा अर्थ मी येथील मास्तरांना सांगितला. येथें येऊन त्यांनीं दोनतीन गाणीं रचलीं. त्यांपैकीं एका गाण्याचें नांव 'कविप्रशंसा' —म्हणजे 'रवींद्रनाथ ठाकूर' यांची प्रशंसा. तें गाणें येणेंप्रमाणें:—

"थोर आर्यभूमिभाग्य आज उघडलें ।
अवचित विपरीत नवल हें नव घडलें ॥ ध्रु० ॥
होता रवि उदयाचलिं ।
तों प्रतीचि जलधिस्थलिं ।
पसरितां स्वकिरणावलि ।
विश्व विकसलें ॥ १ ॥
अंबर-रवि रवि केवळ ।
नाहीं त्या कविताबळ ।
हा भरवी गगन स्थळ ।
खुलवि त्यामुळें ॥ २ ॥
रविहुनि कवि थोर फार ।
दावी जगिं चमत्कार ।
रवि जो कवि उदधिकार ।
ईश्वरा कळे ॥ ३ ॥
भूदेवी ही अनाथ ।
केली द्रुत जर सनाथ ।
नाम तें रवींद्रनाथ ।
सार्थ जाहलें ॥ ४ ॥"

आतां जास्त कांहीं लिहीत नाहीं. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

पत्र २६ वें

Shantiniketan.

My dear Shrivatsa,

I received your letter the day before yesterday. Our annual examination is over. Here they do not promote any boy to a higher class, if he passes in the annual examination. But they add the marks of all the months and if he passes on the whole, he is promoted. I have 76 marks in Sanskrit, 38

in Bengali and 54 in history. The other results are not yet known. I hope I shall be promoted to the 2nd class (6th standard) and Jayaram, who is one year behind me, to the 3rd class. The boys here have earned more than 10 Rs. by carrying the luggage of the guests as coolies. They shall get 80 Rs. still, when they shall finish the work they have undertaken. I hope, I shall have letters from you every now and then. How is Shrikant? Mr. Jadunath Sarkar had come here on the 7th Paush anniversary. He showed us a magic lantern. He started for Bankipur yesterday night. To-day we are going to see the coal-mine at Jharia; 4 Rs. per head shall be required. With good regards to you all.

I am yours affectionately,
Shyamakant.

पत्र २७ वें

Shantiniketan,
14-1-14

My dear Nana,

I received your letter of 9th January. You have misunderstood me. I am not at all weaker than before, though I am weak. For I was weak even when I was at Baroda. The doctor's opinion is that it is worms which make me weak, and he has told me that he shall treat me regularly. But never think that I am weaker than before. My weight to-day is 36 s.–3 ch. So you see that I am not growing less in my weight. I take physical exercise regularly every day. Indeed, Jayaram's body has grown to be very beautiful and he is strong enough. I play cricket here, and am known as a good cricketer among the boys of my age. A new boy has come here from Sindh. His age is not more than 11 or 12. He can speak English well. I have learned a Sindhi song

from him. His name is Giridhar Lal. He is very naughty and mischievous. We play cricket matches almost every Wednesday.

I now take much interest in reading. I read many books of stories and especially of the lives of great men, such as Columbus, General Gordon, David Livingstone, etc. I have finished 'David Livingstone' and 'General Gordon'. I took one week to finish each, each containing 120 pages. Indeed, I take much pleasure in reading English and Bengali books and even some Sanskrit श्लोक from Shakuntal, and learning them by heart. I teach Marathi to Kshitimohanbabu, who in return teaches me श्लोक from Shakuntal, which I get by heart. I am very glad to inform you that I also learn drawing, with Ashitbabu. The time seems to me too short. Yet, do'nt suppose that I feel any unbearable strain in my studies. For, what I do, I do from my heart and quite willingly. I am not at all feeling tired of reading and the more I read the more my wish to read seems to be growing. I always bear in my mind, that I must make my body sound, and that if I do not try to keep my health and body well, all my studies and my reading too, will be of no use.

So do not bother yourself with all these anxieties. I am doing and feeling quite well. I translate 'रामदासाचे मनाचे श्लोक' into Bengali and give them to some monthly magazine of our Ashram. I also write essays in Bengali on the customs and anniversaries of our part of the country.

With good wishes towards you all,

I am yours affectionately,
Shyamakant.

पत्र २८ वें

Shantiniketan,
28-1-1914

My dear Nana,

I received your letter yesterday. I was going to write an answer to your and the boys' letter, but as I could not finish the letter yesterday, I shall post it to-day with this letter. I have written three letters in this envelope, one to you, one to Gangumai and one to the boys; the three letters contain different news. I had at all forgotten to write to you that all of the boys of our Ashram try to keep their houses, their seats and their clothes clean. A teacher, named Dinubabu examines all the rooms every day, and gives remarks, and publishes them in the Daily Newspaper of our Asram, which is stuck to a board on a wall. It is called दैनिक. All the news of the Ashram is published in the aforesaid newspaper. We can even know the names of the boys who are ill in the hospital and many such matters, when we read the newspaper. In the end of each month the marks of each room are added and the captain of the house, which stands first in tidiness and cleanliness, gets a garland in the छात्रसभा. O, how then the boys of that room are filled with joy! Last month our room was the first in tidiness and cleanliness. I don't know whether we shall possess the first place this month or not. The captains of all the rooms try to keep their houses in order, and each boy tries to keep his seat clean. Each house tries to be the first.

We have many Bengali magazines too in our Ashram, namely प्रभात, शान्ति, बागान, शिशु, विणापाणि, वीथिका etc. All these magazines are written by the boys and there is only one copy of each. Many boys of our Ashram are the members of some of these magazines. I am the member of both बागान

and प्रभात. I write many essays on the habits, customs and anniversaries of Maharashtra and publish them in these magazines. I also translate रामदासांचे मनाचे श्लोक and the historical facts of Maharashtra into Bengali. I help Sharitbabu in his history. I have now translated two stories from the ऐतिहासिक पोवाडे that you had sent to me some days ago. One is the death of Afzalkhan and the ballad on Tanaji. The latter is very long but interesting. I have given the list of the books you wanted in the boys' letter. We are taught Sanskrit through Bengali, and not English. So the list of Sanskrit books of grammar is useless to you. Of course higher classes such as 5th and 6th standards are taught Sanskrit books such as संस्कृत-सन्दर्भ, प्रवेशिका (containing stories from Hitopadesh, Panchatantra and many other stories) etc. I suppose this list will be sufficient for you. Sorry to inform you, that Rev. Andrews's mother is paralysed.

I have many things to write to you yet, but as I am in want of time I shall write them to you in the next letter. With all good wishes to you all,

I am yours affectionately,
Shyamakant.

पत्र २९ वें

Shantiniketan,
3-2-1914

My dear Nana,

Shall I translate some Bengali poems (by Ravindrababu) into Marathi and give them to be printed and published in आनंद ? You may see the आनंद of January 15th. On page 207 you shall see a story (तात्या पंतोजी) translated from Bengali into Marathi. I know the Bengali poem. If you permit me, I shall translate Bengali poems into Marathi prose. There

is a book named शिशु written by Gurudev, meant for young children. I have translated one piece from that book into Marathi. I am sending it to Shrivatsa with this letter. Let me know whether I shall do so.

I am yours affectionately,
Shyamakant.

श्री

पत्र ३० वें. शान्तिनिकेतन,
ता. २४-२-१४

ती. सौ. गंगूमाईस दोन्ही कर जोडून त्रिकाल चरणीं मस्तक ठेवून शि. सा. नमस्कार वि. वि. तुझें पत्र पावलें. बरेच दिवस पत्र न मिळाल्यामुळें जरा काळजी वाटत होती तीही दूर झाली. जयरामाचें वजन ३९ शेर–१२ छ. व माझें वजन ३७ शेर आहे. माझें वजन हल्लीं वाढत नाहीं. कां तें कोण जाणे! असो. आमच्या देशांत ज्याप्रमाणें लग्नाच्या वेळीं मुलीचा बाप मुलाच्या बापाला हुंडा देतो, त्याप्रमाणें बंगालमध्येंसुद्धां चाल आहे. ही चाल फार वाईट आहे. या चालीमुळें किती लोक दुःखसागरांत बुडून जातात! कांहीं दिवसांपूर्वी या दुःखामुळें कलकत्त्यास एक मुलगी* मरून गेली. कलकत्त्यास एक गरीब हिंदु ब्राह्मण राहत असे. त्याची एक मुलगी होती, ती हळू हळू मोठी होत चालली होती. लोकनिंदेच्या भीतीनें तो मुलीच्या विवाहाची खूप खटपट करीत होता. परंतु तो जेथें जेथें जाई तेथें तेथें लोक त्याच्याजवळ दोनचार हजार रुपये हुंडा मागूं लागले. दोनचार हजार रुपये ऐकतांच त्या गरीब ब्राह्मणाची छाती दडपली. बिचारा दुःखानें रडत रडत घरीं आला. शेवटीं कांहीं उपाय नाहीं असें पाहून त्यानें असें ठरविलें कीं, घरदार विकून टाकून भिकारी व्हावयाचें व मुलीचें लग्न करावयाचें. असें ठरवून त्यानें घरीं भावाला लिहून पाठविलें कीं, घरदार विकण्याची व्यवस्था कर, तोंपर्यंत मी घरीं येतों. त्याच्या भावानें सर्व तयारी करून त्या ब्राह्मणास कळविलें कीं,

---

* हें स्नेहलता प्रकरण आपल्या इकडे अविस्मार्यच झालें आहे.

आतां फक्त तुमचा येण्याचा अवकाश आहे. ब्राह्मणास पत्र मिळतांच त्याला कळलें कीं, आतां तो व त्याची स्त्री भिकारी होणार व मुलीला नवऱ्याच्या हातीं स्वाधीन करणार. हें कळल्यावर, " माझें सगळें गेलें, माझें सगळें गेलें !" असें म्हणून तो मोठमोठ्यानें रडूं लागला. हें पाहून त्याच्या मुलीला फार दुःख झालें. ती मनांत म्हणाली, " हाय हाय ! मीं कां जन्म ग्रहण केला ? माझ्यामुळें माझ्या आईबापांना भिकारी व्हायला लागणार. " तिच्यानें हें दुःख सहन करवलें नाहीं, व तिनें आत्महत्या करण्याचा विचार केला. तिनें घरांत जाऊन सर्व बंगालला म्हणून एक पत्र लिहिलें, तें असें. " **हे वंग विद्यार्थिगण, आमच्या देशांत हुंड्याच्या या मार्मिक विषानें आज हजारों लोक मरत आहेत. एकदां या देशाकडे पहा व ही खराब चाल रद्द करण्याचा प्रयत्न करा.** " असें लिहून तिनें स्वतःच्या अंगावर रॉकेल तेल ओतलें व आंगास आग लावून देऊन ती जळून मेली. परवां येथें एक सभा भरली होती, त्या सभेंत एका मास्तरांनीं सर्व मुलांस सांगितलें कीं, " ही खराब चाल दूर करण्यासाठीं तुम्ही सगळे मिळून प्रयत्न करा; जेव्हां घरीं जाल तेव्हां घरांतील सर्वांना ही चाल दूर करण्यास सांगा. तुम्ही ही चाल दूर केलीत म्हणजे देशाचें खूप कल्याण होईल." असो. मला आतां जास्ती लिहावयाचें नाहीं. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र ३१ वें

शान्तिनिकेतन,

ता. ६ जून १९१४

ती. सौ. गंगूमाईस दोन्ही कर जोडून त्रिकाल चरणीं मस्तक ठेवून शि. सा. नमस्कार वि. वि. येथें आल्यापासून तुझें एक पत्र व नानांचीं दोन पत्रें पोंचलीं. नानांचें ता. २चें बुकपोष्ट काल संध्याकाळीं पोंचलें. त्यांच्या पत्राची मी फार वाट पाहात होतों. बरेच दिवस पत्र न आल्यामुळें काल सकाळीं मी एक पत्र लिहून पोष्टांत टाकलें, पण त्या दिवशीं संध्याकाळीं नानांचें पत्र पोंचलें,

व भुलचुकीनें पोष्टांत टाकलेलें पत्रही गेलें नव्हतें, तें मीं परत आणून फाडलें आणि त्याच्या बदली हें पत्र लिहलें.

*　　*　　*　　*　　*

हल्लीं आमच्या शाळेंत पुष्कळ नवीन मुलें येत आहेत व बरींच मुलें शाळेंतून निघूनही गेलीं आहेत. एकूण एकच. माझ्याजवळ उसळ्या व सांडग्या मिरच्या व लोणचें आहे तें मी जेवते वेळीं कधीं कधीं खातों. येथील दोनतीन मास्तरांनीं, तीनचार मुलांनीं व स्वतः गुरुदेवांनीं माझ्याजवळ वहाणा मागितल्या आहेत, त्या पार्सलनें पाठवण्याकरितां मी मुंबईस लिहलें आहे. वहाणांची किंमत व पार्सलचा खर्च मला मिळेल; म्हणजे मला नऊदहा रुपये तुम्ही (किंवा आबांनीं) धाडल्यासारखेंच झालें.

हल्लीं सुद्धां आम्ही पूर्वींप्रमाणें गाणीं शिकतों. गुरुदेव आठवड्यांतून चारपांच नवीन गाणीं तर रचतात. 'गीताञ्जली'नंतर त्यांनीं जितकीं गाणीं रचलीं तीं एके ठिकाणीं छापवून 'गीतमाल्य' म्हणून एक नवीन पुस्तक केलें आहे, त्याला गीताञ्जलीचा दुसरा भाग म्हणण्यास हरकत नाहीं. हें गीताञ्जलीपेक्षां दुप्पट मोठें आहे. यांतलीं बरींच गाणीं मला माहीत आहेत. आपल्याकडे ज्याप्रमाणें एका चालीवर पुष्कळ गाणीं आपल्याला आढळतात, त्याप्रमाणें येथें नाहीं. प्रत्येक गाण्याची चाल वेगळी असते. गुरुदेव आधीं गाणें रचतात व त्याला मग एक नवीन चाल लावतात.

दोनतीन दिवसांपूर्वीं सपाटून पाऊस पडला व आतांशीं रोज मळभ असतें. आमच्या खोलीपासून एका फर्लांगावर पुष्कळसे झरे नेहमीं (उन्हाळा-खेरीज करून) वाहत असतात. एक उंचशी जागा आहे तेथून पावसांत धबधब्यासारखें जोरानें पाणी खालीं पडत असतें. पांचसहा झरे मिळून एक लहानसा ओढा व असे एकदोन ओढे मिळून एक लहानशी नदी बनली आहे. ती येथून जवळजवळ एक मैलावर आहे. तिला आम्ही 'कोपाई' म्हणतों.

नानांनीं मला फ्रेंच शिकावयास सांगितलें होतें. अँड्रूजसाहेबांना फ्रेंच येतें, पण त्यांना हल्लीं शिकवायला मुळींच वेळ नाहीं. कारण, शाळेचें व स्वतःचें काम करून शिवाय त्यांना चारपांच तास बंगाली शिकावें लागतें. पेटॅवेलसाहेब व त्यांचें कुटुंब येथून निघून गेलें, हें कदाचित् पूर्वीं सांगितलेंच

असेल. रामचंद्र गॅंटि म्हणून आमच्या येथील एका विद्यार्थ्याचा बाप मुंबई-जवळ ' मालाड 'ला असतो, त्यांच्या येथें पेटॅवेलसाहेब हल्लीं असतात.

मी ' आमच्या देशांतील चालीरीति ' यासंबंधीं कांहीं निबंध बंगालींत लिहिले होते; ते एखाद्या मासिकांत देण्याचा माझा विचार होता. म्हणून प्रभातबाबूंनीं कलकत्त्यास ' प्रकृति ' नांवाच्या मासिकाच्या संपादकाकडे एक पत्र लिहलें होतें; पण त्याचें उत्तर बरेच दिवस न आल्यामुळें प्रभातबाबूंनीं माझे निबंध दुसऱ्या एका मासिकास पाठवून दिले. पण कालच ' प्रकृती'च्या संपादकाकडून पत्र आलें आहे कीं, ते निबंध माझ्याकडे पाठवून द्यावे, म्हणून मी पंचायतींत पडलों आहें. तरी दुसरे कांहीं लेख लिहून त्यांच्याकडे पाठवावे असा माझा विचार आहे. नानांना मीं मनोरंजनाचीं प्रुफें माझ्याकडे पाठवावयास सांगितलीं तीं तपासण्यासाठीं मागितलीं नव्हतीं. मला प्रुफांची एक प्रत माझ्याजवळ ठेवायला पाहिजे म्हणून एक प्रत माझ्याकडे पाठविण्यांत येईल असें नानांनीं सांगितलें होतें. असो. तीं नसलीं तरी कांहीं हरकत नाहीं. पाठवण्याची जरूर नाहीं. मुलें मला पत्र कां लिहीत नाहींत? मला हल्लीं फारशीं पत्रेंच येत नाहींत. नानांना वेळ नाहीं तर तूं किंवा मुलें, कोणी तरी मला पत्रें पाठवावीं. मी उत्तर देण्यास विसरणार नाहीं. उत्तराची वाट पाहत आहें. हें पत्र नानांना दाखवावें. कळावें हे विज्ञापना.

श्यामकान्त.

पत्र ३२ वें

Shantiniketan,
21st June 1914

My dear Nana,

I had no letter from you since I came here. I am getting on well with my studies. I and one of my fellow-students spend half an hour daily with Mr. Pearson privately. We have a conversation class in that half an hour. I also learn some pieces of poetry and of prose with him and get them by heart. Ivanhoe is a very big book, and as I don't get more

than one hour to read extra books, I shall take at least three months to complete it. So Mr. Pearson has given me an abridged copy of Ivanhoe (abridged by Percival Wren, M. A.) containing only 160 pages. Its language is very easy. So I am reading it and hope that I shall finish it in a week or two.

Special arrangements for my Sanskrit have been made and the other arrangements for my food will be made soon. I read विष्णुशास्त्री यांचे किरकोळ लेख, भाग १ ला, regularly. I got आनंद yesterday. Mr. Mitra, the editor of मनोरंजन, has not yet sent to me the proofs of the story I have contributed to मनोरंजन. So please ask him to do so.

Two Marathi gentlemen have come here with three Gujratee boys, who will stay at this institution, one of whom will be going away to Benares, in a day or two, where he learns Sanskrit. The other shall stay here with the Gujratee boys, for a month or two, until they pick up Bengali. Jayaram knows these boys. They had once come here before to see this institution. These two guests showed us Indian exercises, when we all were taking our daily exercises in the morning. Prabhatbabu, our gymnastic teacher liked them very much and he makes us take some of these exercises with our daily Sandow exercises.

I sold two pairs of sandals, which I had brought with me, and got the price. Many boys are asking for some more pairs. They are ready to pay the cost of the parcel too. A new dining hall is being built here. Three-fourths of the students are now present in the Ashram. I have much more to write to you yet, which I shall do next time, as I have little time now to write any more. I am quite well.

Hoping that you are in good health,

I am yours affectionately,

Shyamakant.

पत्र ३३ वें

Shantiniketan,
29th June 1914

My dear Nana,

I received your letter yesterday morning and was very glad to go through its contents. I have already sent an essay about Shantiniketan to you and now I am going to write "my own impressions about Ravindranath," which I shall send to you when I write to you next. I have finished Ivanhoe yesterday. It was very interesting to me, and so I did not take much time to finish it. When I finished Ivanhoe, I took an abridged copy of Oliver Twist yesterday and read its first 50 pages. They were as interesting as anything and I am sure I will finish that book in two or three days more and take any other novel of Dickens. The language of Oliver Twist is a little more difficult than that of Ivanhoe. I have nearly finished **विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे किरकोळ लेखसंग्रह, भाग १ला.** I read 20 pages a day of that book. My studies are going on rapidly. We now get full two hours for home work in the afternoon. Besides that we get an extra hour of 40 minutes. We have lectures in the entertainment period. When we have no lecture, I take rest in that period, while all the other boys read. But I don't waste a single minute of my working hour, though I take rest in the evening as the other boys do. We shall have no monthly examination this month. I have no draw-back in my studies. Now I turn to my food.

As I have already written to you I get milk every evening. I take *chapatees* in the noon. I get ghee once in a day and I eat rice and vegetables boiled in a cooker. I have asked a servant to bring eggs for me. But he has not yet got them. He will bring them. So I shall soon manage to

take eggs every day. So I suppose I get nourishing food now.

*   *   *   *

Mr. Andrews gave a lecture about South Africa the day before yesterday. In his lecture he showed his sympathy for our Ashram. He also told us how he carried away *Shanti* from our Ashram to South Africa. The people of South Africa had no idea of India, he said, and most of the Europeans in South Africa kept a copy of Gitanjalee with them. They asked Rev. Andrews to lecture on Gurudeo and to tell them about life in India and everything of India that made Rabindranath write such poems. After Mr. Andrews had finished, Gurudeo told us how these foreigners (Mr. Andrews and Mr. Pearson) had come from England to our Ashram without caring for money, for fame, or for anything else, and he said that we must be more eager to feel the Almighty power of Him more deeply than these foreigners, as we had been in this Ashram for a longer time than they have. With this the meeting was adjourned. I don't want to describe the meeting more fully, as this letter is growing long.

*   *   *   *

I am yours affectionately,
Shyamakant.

श्री

पत्र ३४ वें   शान्तिनिकेतन,
ता. २७-७-१९१४

चि. श्रीवत्स, कमला, मकरंद, श्रीराम यांस आशीर्वाद.

आज बुधवार. आज आम्हांला सुट्टी आहे. आज पंडित ईश्वरचंद्र विद्यासागरांचा मृत्यु-दिवस. म्हणून आमच्या येथें आज एक सभा होणार आहे. काल रात्रीं आमच्या ' Debating Club 'ची सभा झाली. पियर्सन-

साहेब सभेचे अध्यक्ष होते. पुष्कळदां आमच्या Debatingची कशी मजा होते ती सांगतों. पियर्सनसाहेब म्हणाले, " हजारों वर्षांपूर्वी रानटी लोक रानांत राहात असत. त्या वेळच्या मुलांना त्रास द्यायला हल्लींसारखे मास्तर व शाळा नव्हत्या. त्या वेळचें 'लाइफ' चांगलें कीं हल्लींचें चांगलें ?" कोणीच बोलायला उठेना. शेवटीं एक मुलगा म्हणाला, "हल्लींचें चांगलें. कारण त्या वेळच्या लोकांचें Culture नव्हतें, Manliness नव्हतें." तो मुलगा बसल्यावर कोणीच बोलायला उठेना. मी पाहिलें कीं, आतां हा वाद येथेंच संपणार, म्हणून त्या मुलाला वेड्यासारखे प्रश्न विचारूं लागलों. मी म्हणालों, "Culture व Manliness काय करायचें ?" तो मुलगा म्हणाला, "आपल्यांत जर Manliness नसला तर जनावरांत व मनुष्यांत फरक काय ?" मी म्हणालों, "फरक नसला तर नसला, आपण जनावरांप्रमाणें सुखांत राहावें म्हणजे झालें." मग पियर्सनसाहेब म्हणाले, "मनुष्य आहे म्हणून जनावरें सुखानें राहतात. मनुष्य नसता तर वाघानें त्यांना खाऊन टाकलें असतें." यांशिवाय इतर पुष्कळ कारणें दाखवून त्यांनीं मला हल्लींचें लाईफ चांगलें असें समजावून सांगितलें. मींही मुद्दामच असे वेड्यासारखे प्रश्न विचारिले होते. असो. पुष्कळदां इंग्रजी डिबेटिंग क्लबांत अशी मजा होते.

मला तुमची सर्वांची फार आठवण होते. पुष्कळदां जेवतांना मला आमटीची, पिठल्याची व लसणीच्या तिखटाचीही आठवण होते. असो. कळावें हे आशीर्वाद.

श्यामकान्त.

श्री

पत्र ३५ वें

शान्तिनिकेतन,

ता. ५ ऑगस्ट १९१४

तो. सौ. गंगूमाईस दोन्ही कर जोडून त्रिकाल चरणीं मस्तक ठेवून शि. सा. नमस्कार वि. वि. तुझ्याकडून किंवा मुलांकडून गेल्या आठवड्यांत पत्र नाहीं. गेल्या आठवड्यांत मला तीन बुकपोस्टस् मिळालीं. पहिल्यानें जें मिळालें

तें खूप मोठें होतें. उघडून पाहतों तों आंत नोव्हेंबरपासून जुलैपर्यंतचे सर्व नवयुगाचे अंक आहेत. ते कोणीं व कां धाडले तें मला समजलें नाहीं. पण मीं असें ताडलें कीं, नवयुगाच्या संपादकांनीं ते धाडले असावेत. दुसरें बुकपोस्ट उषःकालचें. हें मला मिळून चारपांच दिवस झाले. हें पुस्तक इतकें मनोरंजक आहे कीं, मी आतांपर्यंत त्याचीं २६० पानें वाचलीं. एकंदर ५०० पानें आहेत. लवकरच हें पुस्तक संपेल. याच्या पुढल्या आठवड्यांत दुसरी एखादी कादंबरी किंवा हरिभाऊंचें चांगलें पुस्तक पाठवावें. तिसरें बुकपोस्ट म्हणजे नानांनीं पाठवलेली वाचनपाठमाला, महाराष्ट्राचा इतिहास व माझें तेथें राहिलेलें एक पुस्तक. हें बुकपोस्ट मला कालच पोंचलें.

मागील पत्रांत मी कदाचित् लिहलेंच असेल कीं, एक मराठी गवई काशीहून येथें येणार आहेत. ते व आमच्या ओळखीचे चिंतामणशास्त्री हे येथें आले आहेत. गाणींही झालीं. तीं मला फार आवडलीं. एकूण हल्लीं येथें दोघेतिघे मराठी बोलणारे आहेत व अर्धवट मराठी बोलणारे असेही एकदोन गुजराती आहेत. माझा अभ्यास चांगला चालला आहे. मी हल्लीं मराठीच जास्ती वाचतों. हरिभाऊंचें उषःकाल तर इतकें चांगलें आहे कीं, तें हातांतून खालीं ठेववतच नाहीं. मी बरा आहें. कळावें हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र ३६ वें

शान्तिनिकेतन,
ता. १३ ऑगस्ट १९१४

ती. सौ. गंगूमाईस दोन्ही कर जोडून शि. सा. न. वि. वि. परवांच्या दिवशीं म्हणजे ता. १०लाच मी येथें (दवाखान्यांत) आलों. त्या दिवशीं माझ्या अंगांत ताप भरला होता व माझ्या मांडीवर मागील बाजूस एक गळूंही झालें होतें. त्यामुळें मी पथारी घेऊन येथेंच इस्पितळांत आलों. आज सकाळीं माझा ताप निघाला व गळूंही कापलें आहे. आणखी दोनतीन दिवसांनीं चांगला बरा होईन. काल आणि परवां नुसत्या दूध व

लाह्यांवर होतों. आज भातभाजी वगैरे खाण्यास सुरुवात केली आहे. काळजी मुळींच करूं नये. डॉक्टर व कंपाउंडर माझी यथायोग्य काळजी घेतात.

माझ्याकडे हल्लीं पुष्कळ मराठी मासिकें येतात. त्यांपैकीं वर्गणी देऊन दोन मी घेतों, एक आनंद व दुसरें उषा. उषेची व्ही. पी. माझ्याकडे आली होती, तिला मीं रु. १ आ. १ दिला. गेल्या वर्षीं या मासिकांच्या वर्गण्या तुम्हीं दिल्या होत्या. पण या वर्षीं त्या मला द्याव्या लागल्यामुळें माझा खर्च वाढत आहे. मला वाटतें कीं, उषा मीं आतां घेऊं नये. हें मासिक फारसें चांगलें असावेंसें दिसत नाहीं. तर तुमच्या कोणाच्या तरी पत्त्यावर तें पाठवून देण्याकरितां मी लिहूं का? कोणाच्या पत्त्यावर पाठवून द्यायला सांगूं? वगैरे कळवावें.

येथें रोज युरोपांतील लढाईविषयीं आम्हांला बातम्या लागतात. त्यांवर आम्ही वादविवाद करतों. नानांचें पत्र पोंचलें. त्यांनीं लिहिल्याप्रमाणें करण्यांत येईल. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

<u>पत्र ३७ वें</u>

शान्तिनिकेतन,
२३ ऑगस्ट १९१४

चि. वत्स यास अ. आ. उपरी. बरेच दिवस तुझेकडून पत्र नाहीं. खेळण्यांत अगदीं गर्क होऊन गेला असशील नाहीं? असो. मी हें कार्ड मुद्दाम एका कामासाठीं लिहीत आहें. हल्लीं येथें भीमराव—म्हणजे एक मराठी गवई—आम्हांला गाणें शिकवितात. मृच्छकटिकांतील गाणींही त्यांच्या मनांतून मला शिकवायचीं आहेत. मला वाटतें आपल्या येथें 'मृच्छकटिक' आहे. तर हें पत्र पोंचतांच 'मृच्छकटिक' जरूर जरूर पाठवून द्यावें. विलंब करूं नये. गेल्या बुधवारीं आम्ही तिघे चवघे—आबाशास्त्री, भीमराव, मी व

जयराम वनभोजनास गेलों होतों. रानांत एका तलावांत बराच वेळ पोहलों. कळावें. हे आशीर्वाद.

श्यामकान्त.

पत्र ३८ वें

Shantiniketan,
8-9-1914

My dear Nana,

I have received the 50 Rs. you sent me. A rumour has risen in Calcutta that H. H. the Maharaja of Baroda is shot and killed in Europe. Is it true ? One of our teachers was asking me about it. I told him what you had written to me about the Maharaja and the Maharani; so please let me know whether the rumour is true or false. Gurudeo is better now. He does not come to the Ashram now-a-days, but he lives in the forest of Sunel a mile or two away. There he has a decent house where he rests.

Yours affectionately,
Shyamakant.

पत्र ३९ वें

Shantiniketan,
8*th Sept.* 1914

My dear Nana,

You already know that I am going for a trip to the Eastern Bengal and Asam, with Kshitimohanbabu. Kshitimohanbabu has friends everywhere in Eastern Bengal and many of them have invited him in the Puja vacation. So we shall not have to spend a single pie for our food on the way. There are many big rivers in Eastern Bengal. Kshiti-

mohanbabu is fond of travelling. He has travelled much in Himalayas. He also wishes to take me to Himalayas. But as we have settled to go to Eastern Bengal and Dacca, therefore, we can't do it. Another teacher namely Anil-babu was asking me whether I would go to Delhi, Agra, and Lucknow with him. But I refused to go there, as it was already decided to go to Dacca.

My body is forming now, though my weight is not increasing for the last three weeks. I learn songs from मृच्छकटिक regularly with Bhimrao. I am quite well.

Hoping you do the same,

I am yours affectionately,
Shyamakant.

पत्र ४० वें

Shantiniketan,
18-9-14

My dear Nana,

I received your letter and Rs. 20. I was very glad to read it. I am sorry, I am not going to Calcutta. I may go there while returning here, at the end of the next month. I will first go to Eastern Bengal and thence to Asam. This is the sketch of my programme :—

Leaving Bolpur............21st Sept.
Reaching Vikrampur (Old Bengal Capital)
,, Dacca
,, Rajshahi.........(26th Sept.)
,, Sara—New Ganges bridge (4th Oct.)
,, Gauhatti (कामरूप-Old Asam Capital) (6th Oct.)
,, Hafling—(Asam 9th Oct.)
,, Chandpur (17th Oct.)
Again Dacca—19th Oct.
,, Vikrampur—21st Oct.

If I get time I may go to Calcutta—29 or 30 Oct. But I may travel to many other places too. This is only a rough plan of my journey. I have a doubt whether I shall be able to meet Princess Indira Raja and her cook at Calcutta, or not. We have no class now-a-days but have rehearsals twice or thrice a day. A Bengali drama and some scenes from Midsummer Night's Dream shall be played before the vacation. I have taken the part of Quince on me. How are you ? I am very glad to know that the boys learn music at Baroda. When I will go there in the next summer vacation, we will compare our songs. I am very very glad, that I get such opportunities of seeing the distant parts of India, and I take their advantage.

With good wishes to you,

I am yours affectionately,
Shyamakant.

पत्र ४१ वें

Shantiniketan,
7th Oct. 1914

My dear Nana,

I received Rs. 50 to-day. You say that you don't know how far I am sticking to my plan of going to Darjiling. Indeed I am very anxious to visit the place. Both Mr. Jadubabu and Mr. Dhavale* have asked me to go to their places. But as I have decided to go to Darjiling, I have told both of them that I won't be able to go to their places. I have written to Mr. Dhavale that most probably I would go to Darjiling and that if I didn't go there, I would go to Purulia. I also think, it is not good to stay with the Maharani of Coochbihar. But otherwise the lodging and boarding would

---

* **Mr. S. B. Dhavale, I.C.S., Judge, Patna.**

be very expensive. However, I am trying to get a 3rd class room in the Sanitarium at Darjiling, where I shall have to pay Re. 1-8 as. daily. So lodging and boarding will be more expensive than the railway fare. The railway fare for going and coming back—(I mean to buy a return ticket)—will not exceed 20 Rs. I will get the Puja-concession and I will be able to travel by the Inter-class, paying the fare of the third class. I am just now wiring to the manager of the Sanitarium to let me know whether he would manage to keep a room for me. If I stay there for a month, I must spend at least 40 or 45 Rs. for the boarding and lodging. So I will require some 15 or 20 Rs. more.

As for my clothing, I am taking all the clothes I have with me. I have managed to borrow two rugs and a sweater from my friends. I am buying a drawer to wear inside the pant. Besides that I have bought a canvas shoe, with water-proof leather soles. It cost me Rs. 4-8 as. here at Bolpur.

My teachers and some of my friends who live at Darjiling say that these clothings will be sufficient for me.

The 20 Rs. you sent last week were given as fees for the month of August. The fees for September are not yet paid. You may not send them now if you are in want of money. I am sorry I am troubling you so much, but my curiosity to visit Darjiling is increasing. You please send the above amount of money at Darjiling (Lowis Sanitarium). I will try my best to economise the money.

I will start for Darjiling at 3-35 A.M., on the 11th inst. and reach there on the 12th. I will drop a post-card when I leave. I am quite well.

With best wishes,

I am yours affectionately,
Shyamakant.

पत्र ४२ वें

Sonarang (Dacca),
21 *October* 1914

My dear Nana,

I wrote to the editor of चित्रमयजगत् to send me back my article if he did not like it. So I have got it to-day. I do not know what to do with it. I think some editor of any other monthly magazine may take it. So I suppose, you should send it to नवयुग or any other magazine if you like. I am sending it to you to-day.

I suppose you have received my last letter. I can't tell whether I may go to Calcutta, on my way back or not. It is not yet settled. I will inform you of it when it is settled.

I am feeling cheerful here. The water has subsided a little now. We went to one of our fellowstudents this morning and returned in the evening. We are going to stay here at Kshitimohanbabu's for a week more. Our vacation is nearly at an end now.

Have the boys passed their examination ? Where are they now ? We have three fellow-students of ours here. One of them is Vijaykrishna, a Madrasi boy, who travelled with me this vacation.

I am in good health. Hoping you do the same,

I am yours affectionately,
Shyamakant.

पत्र ४३ वें

Sonarang (Dacca),
27-10-1914

My dear Srivatsa,

I am very glad to receive your letter day before yesterday. You had not written to me long. Be writing to me now and

then. You will always get a letter in reply from me. I sup pose Nana has got my translation. I would suggest he should give it to Hind Agency, or any such book-seller. I get Anand regularly. But why do I not see your contribution in it? I suppose you are very eager to hear something about my journey.

I had written to you about Hafling (हाफ्लिंग) last time. I suppose I had not written about "Naga" and "Kuki," the wild people who live in the mountainous parts of Asam These people are somewhat like our कुणबी in Konkan. But their faces look odd. Their eyes are small, just like a Chinaman's, their faces look swollen. They are not always black. They have long hair on their heads. They look strong and stout. Whenever they carry anything in a bag or any such thing, they hang a rope to the bag, and that rope they tie to their foreheads, around their heads. Their foreheads are very hard. Whenever these mountainous castes have any anniversary, they hang a branch of a certain tree at the gate of their quarters to imply to the people (who do not belong to their caste) not to enter their quarters. He who enters their quarters in spite of the warning, has to suffer seriously. The Nagas oftentimes fight the man to death. These Nagas and Kukis are innocent people, but they are strong enough to defend themselves, when they are teased by anybody. Do you know what is the delicacy of these wild people? They feed a dog sufficiently. When the dog eats enough, then they burn him alive. Thus the food in the dog's stomach becomes boiled. Then they tear his stomach and eat the boiled rice in his stomach. This is their delicacy. What a cruel thing this is! However, we must now part with these men.

You already know that in the mountains and small hills of Hafling there are innumerable springs coming out from many places of the hill's side of the house, where we

had put up with the Station Master. There is a small hill and on the other side of the mountain there is another, with a small spring flowing through the small valley between the two hills. From the spring we made a long pipe (236 ft.) out of the small branches of popaya. This pipe crossed the small hill near our house, and in the end of it a fountain jumped up high in the sky before the door of our house.

However we left Hafling on ...October and at the dawn of next day we went to Chandpur in the District of Tipara in Bengal. We met with some of our school-mates. We then left Chandpur and by crossing the river Padma (with the current) by steamer, we went to Narayan Ganj. I suppose you are introduced to this place. From this place we hired a boat and came to Sonarang. There I had written a description of this place in a letter last time. But now I see a great change in this place. The water has subsided. We can now walk by a small foot-path, which has a canal on one side of it. No doubt there are canals everywhere in the town and everyone is found to have a boat with him. Yet the fields are not covered with water. There are some places where man can walk.

Day before yesterday we went to Dacca again to see the Museum. This museum had many copper-plates and stones with various inscriptions in Bengali and Sanskrit. There are many stone images of Vishnu, Krishna, Sun-God and several other Gods. All the things in this museum are brought from Vikrampur, that is the watery part of Dacca. We had put up with Dr. Sen, Kshitimohanbabu's maternal uncle, whose son is a friend of mine in Bolpur. This Dr. P. C. Sen is a very learned and kind-hearted and pious old doctor in Dacca. Will write to you about him in another letter. We returned yesterday from Dacca. Yesterday morning I went to see the

old images in Sonarang. Dharanimohan (धरणिमोहन) Sen, Kshitimohanbabu's elder brother showed us everything in the village. He knows everything in Vikrampur and had a strong wish to know the customs and habits of every country in India. He asked me many questions about our Maratha country. I saw the stone images of the village. Then I saw a brass image of a goddess found in a tank in Sonarang before 200 years.

These images had been made many hundred or thousand years ago by many different kings of Bengal. The Hindus and Budhists kept them carefully. When the Mahomedan Kings began to persecute the Hindus, they buried these images into the ground and sank them into the tanks and canals, so that the Mahomedans may not find them. Now these images are being found out from the ground. In Vikrampur, almost every tank and canal has many images and copper plates in them. The old roads of Vikrampur too have bricks in them with many kinds of decorations on them. We saw many such bricks on our way to Dacca. Vikrampur is a place of great importance in Bengal.

Our journey is nearly at an end now. We are going to leave Sonarang and go to Bolepur within 2 or 3 days. I may go to Calcutta and see Princess Indira. It is not yet settled.

Have you ever seen a white chilly? I had never seen one before. I have seen it here. I am going to send a dried chilly, which is of course red. You can sow the seed and grow a chilly tree from it. It shall give you white chillies. How is Nana? Give my good wishes to him. Be writing to me every now and them.

I am your affectionate
Shyamakant.

Next letter should be addressed to me at the Shantiniketan.

बंगाल्यांत आपल्याकडल्यासारख्या मोठ्या मिरच्या (ज्यांची भाजी करतात त्या) मिळत नाहींत. तर तसल्या मिरच्यांचें बीं किंवा सुक्या मिरच्या मिळाल्या तर पत्रांतून एखाद दुसरी पाठवून द्यावी.

पत्र ४४ वें

Hafling,
29-10-1914

My dear Nana,

I have very little to add to what I have written to the boys. I read Bengali and English books for nearly two hours a day, but not regularly. I feel very happy to live in these mountainous parts and it is so natural here that one forgets his sickness, when he visits these places. The Hafling town is built they say after the fashion of Switzerland We shall leave this place on Saturday next. I expect a letter from you within the next 3 or 4 days. I am doing well. Hoping you to be in good health,

I am, yours affectionately,
Shyamakant.

श्री

पत्र ४५ वें

शान्तिनिकेतन,
ता. ३०-१०-१९१४

ती. सौ. गंगूमाईस शि. सा. नमस्कार वि. वि. आम्ही काल रात्रीं १२ वाजतां येथें सुखरूप येऊन पोंचलों. सोनारंगहून मीं लिहलेलें पत्र श्रीवत्साला पोंचलेंच असेल. सोनारंगहून निघणाच्या पूर्वीच्या दिवशीं रात्रीं माझ्या अंगांत चांगला ताप आला. त्याच्या दुसऱ्या दिवशीं ताप बराच उतरला,

अगदीं थोडा होता. शिवाय माझा डावा पाय ढोपराखालीं हाडावर फार सुजला. बहुतेक तेथें कांहीं तरी लागलें असावें, यामुळें मला चालतां येईना. जातांना मी होडींतूनच गेलों. ता. २९ ला सकाळीं आम्ही बहर स्टेशनवर आगबोटींत चढलों व दुपारीं १२ वाजता गोबालंद (Gooland) स्टेशन-वर आलों. तेथें मी फारच अशक्त झालों. दोन दिवसांत थोडेसे पोहेखेरीज कांहीं एक खाल्लें नव्हतें व खाण्याची इच्छाही नव्हती. माझ्या हातांत एक लाठी होती, तिच्यावर भार देऊन मला लंगड्यासारखें चालावें लागे. १ वाजतां आम्ही गोबालंद स्टेशनवर गाडींत चढून संध्याकाळीं बँडेल स्टेशनवर आलों. तेथें ८ वाजतां गाडींत चढून रात्रीं ११॥ वाजतां बोलपूरला आलों. आज सकाळीं माझा ताप अजीबात उतरला. आतां त्याबद्दल काळजी नाहीं. पाय मात्र अजून फार दुखत आहे. उद्यां सकाळीं डॉक्टर माझ्या पायाचें ऑपरेशन करणार आहेत. तेव्हां पायही लवकर बरा होईल. अशक्तता मात्र वाटते. पूर्वीं-प्रमाणें दूध वगैरे पिऊन पुन्हा तब्येत ठिकाणावर आणतों. काळजी मुळींच करूं नये.

सोनारंगला मी होडी चालवायला चांगला शिकलों. आमच्या शाळेंतील एका मुलाचें तेथें घर आहे, त्याची आई फार चांगली आहे. तिनें आम्हांला बंगालचीं सर्व हलकीं खाणीं व मिष्टान्नें खायला घातलीं. असो.

उद्यांपासून शाळा पूर्वींप्रमाणें चालू होईल. नानांची तब्येत हल्लीं कशी आहे ती कळवावी. आमची वार्षिक परीक्षा आणखी एक महिन्यानें होईल. मी मॅट्रिकमधें चढेन अशी आशा आहे. शाळेंतील सगळीं मुलें अद्यापि आलीं नाहींत. भीमराव (गवई) आमच्या आधींच १५ दिवस येथें आले आहेत. त्यांनीं घरून शाकुंतल, सौभद्र, इंद्रसभा इत्यादि नाटकें आणलीं आहेत.

वरचेवर पत्रें लिहावीं. मी बरा आहें. दुसरें कांहीं लिहीत नाहीं. कळावें, हे विज्ञापना.

आपला—शामकान्त.

पत्र ४६ वें

Bolepur, Shantiniketan,
10*th Nov.* 1914

My dear Nana,

I am very glad to have your letter after so long a period and more glad to know that you have shaken off your fever. My weakness has now gone away and I now feel healthy. I had already informed you that my foot had been operated. The wound has nearly cured, but a place beside the abscess has swollen up again and to-day the doctor has operated again that place. It will take nearly a week or so to cure my foot. Otherwise I am quite well.

Mr. Gandhi has sent here sixteen boys and two guardians from his school in South Africa. Most of the boys had not visited India before. Because they say that they have seen only one or two towns in India. The complexion of most of the boys is black. Mr. Gandhi's three sons have also come with them. Four of them read with us. You know, they are all Gujratees and none of them knows Marathi. Some of them speak English. That is, I always see them speaking English among themselves.

A meeting had been held yesterday night, where our teachers gave lectures about the famine in Eastern Bengal. Firstly Mr. Pearson told us a story about Goutama Buddha. In that story a woman was asked by Buddha to point out a house in the world, where death is not known. The woman went from house to house and asked whether the people in the house knew what death was or not. At every door she received the answer, "Yes, we know it." So if we go from town to town, village to village and house to house in Eastern Bengal, we shall get the answer from everyone, "We are distressed with famine." "I remember," said Mr.

Pearson, "when you worked hard and sacrificed yourself for your countrymen in South Africa some months ago. Now it is time for you again to help your countrymen and sacrifice yourself for them, who are distressed by famine and who are starving in Eastern Bengal.

You know, that the chief commerce in Eastern Bengal is in jute. All the men in Eastern Bengal, except the Government servants, depend upon the sale of jute. Jute has always an effect on the whole of Eastern Bengal. This jute is, every year, sent to Europe. The German, the English and other European customers buy jute and change it into many valuable things. But now a war has broken out in Europe and the jute customers are engaged in the war, for they are affected by this war and they can't buy jute now. So the whole commerce of Eastern Bengal has ceased and people there are suffering seriously from it."

After Mr. Pearson had finished, a teacher, who is a famous orator in Eastern Bengal, named Kalimohan Ghose, got up and began to describe the condition of the poor peasants and other gentlemen in every district in Eastern Bengal. "Boys," said he, "the people in Eastern Bengal are in a terrible state now. When I went back home, in the last Puja vacation, I asked many peasants who work on jute fields, how they are doing, and they answered me in sorrow that they only have one meal in the whole day. They have very little money with them and that after some days they shall have not a single pie left with them. One of the peasants said, "We sell jute every year and that money is sufficient for us to maintain ourselves the whole year long. But this year we could not sell jute. Last year jute sold at 14 or 16 Rs. a maund and now, as none buys jute, the price has been reduced to 2 or 3 Rupees. At some places it sells

$1\frac{1}{2}$ Rs. and yet none buys it. We are in such a desperate condition that I have not taken my meal for the last two days. I have not left a pie with me. I shall have to die." With this the peasant began to weep bitterly. Tears stood in my eyes at seeing the sadness of the peasant. I have also seen a gentleman (whom I saw very rich last year) in a torn cloth who asked me to employ him secretly. The man, who had never known poverty, wanted to work as a labourer secretly, because he was proud of himself. The zamindars are not getting the taxes from their subjects. These gentlemen and the zamindars are in a more terrible state than the lower caste people. Because the zamindars and higher caste people are never accustomed to labour in such low works and they are not getting taxes. So they are in a more terrible state. Many boys have left school, because they can't afford to buy books. So everyone except a government servant is terribly suffering from the great famine in Eastern Bengal. So if we can help these poor people in any way, (though I know our help is very small), do try to do it. Boys, if anyone has sympathy for his country, do help your distressed countrymen."

With this Mr. Ghose sat down. Mr. Pearson sold a golden covering of his watch and gave 25 Rs. to help Eastern Bengal and he has promised to give 7 Rs. a month. We must be astonished at seeing Mr. Pearson's sympathy for the Indians. Some boys are going to collect subscriptions from all the boys. Each boy will give money according to his power. But this is not good, in my opinion. Boys should better work and earn money. They are going to do it soon as they had done last year.

I have nothing more to write to you. I am going on well with my studies. Please send me a copy of आनंद of October. My weight to-day is 1 maund 5 chattaks. Our yearly examination will be held after a month. I hope I shall

be promoted to the matric class. I wish you to regain your strength soon. With good wishes,

I am yours affectionately,
Shyamakant.

श्री

पत्र ४७ वें

शान्तिनिकेतन,
ता. १७-११-१९१४

ती. सौ. गंगूमाईस दोन्ही कर जोडून त्रिकाल चरणीं मस्तक ठेवून शि. सा. नमस्कार वि. वि. आजच पत्र पोंचलें. वाचून फार आनंद झाला. माझी तब्येत आतां पहिल्यासारखी चांगली झाली. वजनानेंही आतां पहिल्याइतकीच आहे. पायही बरा झाला. आतां खपली पडली कीं आटोपलें. माझें ऑपरेशन म्हणजे असें कांहीं फार मोठेंसें झालें नव्हतें. एका टेबलावर मला डॉक्टरांनीं निजावयास सांगितलें. क्लोरोफॉर्म कांहीं केलें नाहीं. नंत चाकराला माझी मांडी घट्ट दाबून धरावयास सांगितली. असें केलें नसतें तर कदाचित् मी डॉक्टरांच्या तोंडावर लाथ मारली असती. असो. नंतर शस्त्र घेऊन जिथें पाय सुजला होता, तेथें लांबच्या लांब कापलें. मी मुळींच रडलों (किंवा ओ+रडलों) नाहीं. अगदीं गप्प होतों. मध्यें मात्र जरा 'उं:' असें केलें. नंतर त्यांनीं पाय बांधून दिला व रोज पाय सोडून पुन्हां बांधीत. हॉस्पिटल-मधून मी कधींच येथें आलों. पाय बांधायला तेवढा रोज दवाखान्यांत जात असें. दवाखान्यांत असतांना तुझी आठवण झाली हें सांगावयास नकोच. आतां मी अगदीं बरा झालों आहें. पूर्वीप्रमाणें व्यायाम करतों व रोज सकाळ संध्याकाळ एक कपभर निरसें दूध पितों. तेव्हां आतां काळजीचें कांहींच कारण उरलें नाहीं. कांहीं दिवसांनीं मी पहिल्यापेक्षांही चांगला होईन आणि बडोद्यास जाण्यापूर्वीं तर माझें शरीर चांगलेंच सुधारेल.

नुकतेच वॉरनसाहेब येथें येऊन गेले. येथें खेळण्याच्या टाइमांत आमच्या शाळेंतील कांहीं मुलें जवळील खेड्यांतील "संताल" रानटी लोकांच्या मुलांना शिकवण्याकरितां जातात. त्यांचें शिक्षण पाहण्यास ते

गेले होते व त्या दिवशीं तेथें एक सभा होऊन तेथल्या मुलांसाठीं बांधलेल्या एका लहानशा शाळेंत मुलांचा 'गृहप्रवेश' होऊन त्यांना साहेबांकडून बक्षिसें वांटण्यांत आलीं. वॉरनसाहेबांनीं आमच्या शाळेची प्रशंसा केली व या कामांत आम्हांला प्रोत्साहन दिलें.

गेल्या नवयुगांत माझा 'ठाकूरवंश व रवींद्रनाथ' हा निबंध प्रसिद्ध झाला होता. आमचे आबाशास्त्री रंगूनला होते, त्यांनीं तेथें तो लेख वाचला व 'त्यांत एक चूक झाली आहे ती सुधारा,' असें त्यांनीं लिहून पाठविलें. ती चूक हीच कीं, द्विजेन्द्रनाथ आहेत असें लिहिण्याऐवजीं ते होते असें मी लिहिलें होतें. यावरून असा अर्थ होतो कीं, ते हल्लीं जिवंत नाहींत. पण ते हल्लीं येथें असतात. असो. यावरून आमच्या आबाशास्त्र्यांचें किती बारीक लक्ष असतें तें दिसून येतें. असो. ती चूक आतां सुधारणें शक्य नाहीं. माझी 'रासमणीचा मुलगा' ही गोष्ट नानांना मिळालीच असेल. त्यांनीं तिचें काय केलें तें कळवावें. 'महाराष्ट्राचा सामाजिक आचार, व्यवहार व रीतिनीति' या विषयावर माझा दुसरा लेख दुसऱ्या एका बंगाली मासिकांत प्रसिद्ध झाला आहे. तो आज एकदम माझ्या पाहण्यांत आला.

पन्नास रु. पाठवले ते पोंचले. ते पुढील अडीच महिन्यांची फी म्हणून मी मास्तरांना दिले. गेल्या सुटींत माझा प्रवास चांगला झाला, पण माझा आवडता पंचा व चादर या दोन वस्तु हरवल्या.

जगदानंदराय–म्हणजे आमचे हेडमास्तर–यांना ज्योतिषशास्त्र चांगलें ठाऊक आहे. ते हल्लीं भराभर ज्योतिषशास्त्रावर पुस्तकें लिहीत आहेत. येथें आठवड्यांतून दोनतीनदां सूर्य, चंद्र, तारे, पृथ्वी, ग्रह वगैरे विषयांवर ते आम्हांला लेक्चरें देतात. त्यांतही आम्हांला ठाऊक नाहींत अशा अनेक गोष्टी कळतात व त्यांजबद्दल आश्चर्य वाटल्याखेरीज राहात नाहीं. अशा लेक्चरांनीं आमचा फार फायदा होईल यांत नवल काय?

कालच गुरुदेव कलकत्त्याहून येथें आले व त्यांनीं आमच्याकरितां एक तंबोरा आपल्या बरोबर आणला. आम्हांला तंबोरा वाजवून ते गाणीं म्हणायला शिकवणार आहेत. भीमराव आम्हांला हिंदी गाणीं शिकवतात. सर्व रागांच्या चिजा ते आम्हांला शिकवणार आहेत. ते आल्यापासून त्यांचेजवळ हिंदी संगीत

शाकुंतल, सौभद्र, मृच्छकटिक, वगैरे पुस्तकांतील मराठी पदं शिकावयास लागल्यापासून मला आतां बंगाली गाणीं आवडेनातशीं झालीं, व त्यांनाही तीं आवडत नाहींत. कारण ते म्हणतात कीं बंगाली गाण्याला राग-ताल कांहीं नाहीं व असला तर तशीं गाणीं फारच थोडीं.

सुटींत मी आपटयांची 'रूपनगरची राजकन्या' ही ऐतिहासिक कादंबरी वाचली व हल्लीं 'भयंकर दिव्य' ही सामाजिक कादंबरी वाचीत आहें. ही फारच मोठी आहे व अतिशय मनोरंजक आहे. त्यांच्या कादंबऱ्या किती चांगल्या असतात हें वर्णन करितां येत नाहीं. भाषाशैलीही फार चांगली आहे. यांशिवाय मी 'वाचन पाठमाला भाग १ ला' रोज वाचतोंच.

आमच्या परीक्षेला आणखी वीस दिवस अवकाश आहे. परीक्षा झाल्यानंतर येथें एक उत्सव होणार आहे. पुढें कांहीं मुलें एका आठवड्याच्या सुट्टींत फिरावयासही जाणार आहेत.

मी आनंदांत आहें. मुळींच काळजी करूं नये. वरचेवर पत्रें यावीं. जास्ती कांहीं लिहीत नाहीं. हो खरें. श्रीवत्साला सुट्टींत मी पांढऱ्या मिरच्यांचें बीं पाठवीन म्हणून लिहलें होतें, पण तें हरवलें; आतां पाठवतां येणार नाहीं. सुट्टींत क्षितिमोहनबाबूंस टाकळ्याची कॉफी करून दाखविली.

मजजवळच्या सांडग्या मिरच्या सरत आल्या आहेत. मुलांनाही मी त्या देतों. त्यांना त्या फार आवडतात. मीं डबा उघडला कीं मुलांची गर्दी जमते. असो. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र ४८ वें

बोलपूर,
ता. २५-१२-१४

ती. सौ. गंगूमाईस दोन्ही कर जोडून त्रिकाल चरणीं मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार वि. वि. तुझें पत्र पावलें. वाचून फार आनंद झाला. आमचा पौष महिन्याचा वार्षिक उत्सव परवांच्या दिवशीं झाला. त्या

उत्सवाच्या धांदलींत पत्राचें उत्तर लिहावयास वेळ मिळाला नाहीं. उत्सवाच्या दिवशीं म्हणजे पौषाच्या ७ तारखेस सकाळीं आबाशास्त्री मला जवळ बोलावून घेऊन म्हणाले, " माझी एक गोष्ट ऐकाल ? " मी त्यांना " होय " म्हणून सांगितलें. नंतर ते म्हणाले, " तुम्ही महाराष्ट्रीय आहांत, मीहि महाराष्ट्रीय व तुमचाच थोरला बंधु आहे. तेव्हां हे दोन रुपये तुम्ही खाऊला घ्या. नको म्हणूं नका." असें म्हणून त्यांनीं माझ्या हातावर दोन रुपये ठेवले व ते कांहीं केल्या परत घेईनात. उत्सवांत दुकानें वगैरे पुष्कळ येतात. तेव्हां मीही त्यांतील कांहीं पैसे खर्चून दगडाची एक वाटी व काळ्या दगडाचा एक लहानसा छानदार खलबत्ता घेतला. असो. उत्सवास पुष्कळ मजा आली. गुरुदेव मंदिरांत पुष्कळ बोलले. तेथें गाणींही झालीं. भीमरावांनीं बंगाली गाणीं म्हटलीं. बंगाली गाणींसुद्धां त्यांच्या तोंडचींच ऐकावींशीं वाटतात. कारण त्यांचा गळा गोड असून ते रागदारी गाण्यांच्या पद्धतीप्रमाणें ताना घेऊन तीं म्हणतात. २००।३०० रु.ची दारू उडाली. गर्दी तर इतकी होती कीं, बोलून सोय नाहीं. त्यांतून नाटकें, जादूचे खेळ, भुतांचे खेळ, सर्कशी वगैरे पुष्कळ होत्या. एकंदरींत उत्सव निर्विघ्नपणें पार पडला.

कालच इंदिराराजांकडून खाण्याचें पार्सल आलें. मला पहिल्यानें जेव्हां रिसीट मिळाली, तेव्हां त्यांत पार्सलाचें वजन बारा छटाक लिहिलेलें होतें. पण स्टेशनवर गेल्यावर असें दिसून आलें कीं, तें बारा छटाक नसून बारा शेर आहे. एका मोठ्या लांकडाच्या पेटींत एक ट्रंक होती व तींत करंज्या, अनर्से, चकल्या, शंकरपाळीं, बेसनाचे लाडू व चिवडा एवढे पदार्थ होते. चिवडा फारच चांगला झाला आहे. हें सर्व खाणें मी पंचवीस मुलें व वीस मास्तरांना वाटलें. सर्वांना चिवडा फारच आवडला. चिवड्याला ते म्हणत, ' तिखटामिठाचे मुरमुरे. ' असो. मला एक चांगली नवी छोटीशी ट्रंक मिळाली. आजच त्यांचे आभार मानण्याकरितां कलकत्त्याला इंदिराराजांच्या ए. डी. सी.कडे पत्र लिहीत आहें.

काल आणि परवां रात्रीं नाटकें व गाणीं झालीं. पहिल्या दिवशीं ' मुकुट ' नाटक व आमचीं हिंदी गाणीं झालीं. दुसऱ्या दिवशीं ' हेन्री दि फिफ्थ् ' व ' रायव्हल्स् ' मधून कांहीं प्रवेश झाले. पहिलें नाटक

आम्हीं मुलांनींच केलें असून दुसरें मास्तरांनीं केलें. त्यानंतर माझें एकट्याचें गाणें झालें. मी आतां तंबोरा वाजवून गाणीं म्हणतों. भीमराव आल्यापासून रागदारी हिंदी गाणीं व मराठी नाटकांतील गाणीं शिकण्याची मला फारच इच्छा झाली आहे. शिवाय ते आल्यापासून मी तबला, सतार, पखवाज वगैरे वाजवायलाही शिकलों. जलतरंगही शिकण्याची इच्छा आहे. आमच्या शाळेंत हल्लीं गाण्याचीं दोन मतें पडलीं आहेत. एक भीमरावचें मत–रागदारी गाणीं व दुसरें येथील पुष्कळ मास्तरांचें मत–इतर गाणीं. मला रागदारी गाण्यांचीच गोडी जास्त आहे.

येथें दत्तात्रयस्वामी म्हणून एक गृहस्थ आले आहेत, हें मीं पूर्वींच लिहिलें असेल. त्यांनीं मराठी साहित्य फार चांगलें वाचलें आहे. बहुतेक सर्व मासिकें ते वाचतात. ते हिंदुस्थानांत फार फिरलेले असल्यामुळें ते चांगले अनुभवलेले आहेत. त्यांच्याशीं मी पुष्कळदां पुष्कळ विषयांवर बोलत असतों. एकदां मीं त्यांना "मराठी कोणचीं कोणचीं पुस्तवें मला वाचलीं पाहिजेत?" असें विचारिलें. त्यावर त्यांनीं पुष्कळ पुस्तकांचीं नांवें सांगितलीं. जुनीं पुस्तकें व नवीं पुस्तकें दोन्हीही वाचलीं पाहिजेत. तुकाराम, मुक्तेश्वर चांगला वाचला पाहिजे. तुकाराम मजजवळ आहे. मी तो वाचणार आहें.

नंतर दुसरें अस कीं, बंगाली भाषेंत मराठ्यांच्या इतिहासावर फार थोडीं पुस्तकें आहेत व त्यांतही कोठें राजारामाचें चरित्र लिहिलेलें नाहीं. राजारामाचें चरित्र फार चांगलें व मजेदार असून तें कोठेंच सांपडत नाहीं. तेव्हां कांहीं पुस्तकें वाचून, त्यांतून बरीच हकीकत घेऊन आपण राजारामाचें संक्षिप्त चरित्र लिहावें असें दत्तात्रयस्वामी मला म्हणाले. छापावयाचें कीं नाहीं हा पुढचा प्रश्न आहे. तर यास्तव मराठी रियासत, प्रभुरत्नमाला व जिंजीवास नांवाची एक कादंबरी हीं पुस्तकें ताबडतोब पाठवून द्यावीं. दत्तात्रयस्वामी आणखी असें म्हणाले कीं, मराठीचें बंगालींत व बंगालीचें मराठींत भाषान्तर करण्याची संवय आतांपासून ठेवली पाहिजे व तिकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे. असो. मी बरा आहें. कळावें, ही विज्ञापना.

—श्यामकान्त.

हेच पत्रीं अप्पा यांस शि. सा. नमस्कार वि. वि. तुझें पत्र वाचून फार आनंद झाला. मलाही पुष्कळ दिवसांपासून पत्र लिहावयाचें होतें. वरील पत्रावरून सर्व हकीकत कळेलच. आमची वार्षिक परीक्षा संपली. इंग्रजीचा व गणिताचा रिझल्ट नानांना कळविलाच होता. संस्कृतांत $\frac{५३}{१००}$ व बंगालींत $\frac{६४}{१००}$ मार्क मिळाले. संस्कृतांत ३ रा व बंगालींत १ ला नंबर आला. असो. नानांना मीं मागें एकदां आपल्यांचें दुसरें एखादें पुस्तक पाठवावयास सांगितलें होतें. पण अजून मला कोणचेंच पुस्तक मिळालें नाहीं. त्यांना ‘ गड आला पण सिंह गेला ’ हें पुस्तक पाठवावयास सांग. साधल्यास मी त्याचें बंगालींत भाषान्तर करीन. पुस्तक शक्य तितक्या लवकर पाठवावयास सांगावें. उद्यां आम्हांला प्रमोशनूस् देण्यांत येतील. मी मॅट्रिकमध्यें चढेन अशी खात्री आहे. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

पत्र ४९ वें

Shantiniketan,
4th January 1915

My dear Nana,

I have received your letter and दुर्दैवी रंगु and गड आला पण सिंह गेला. I get very little time to do any extra work now-a-days. For we are now preparing for the Matric Examination next year; and I now spend little time in translating Marathi books into Bengali and Bengali into Marathi. I have finished the translation of your Maharashtra History.

My weight to-day is 1 Md. and 14 ch. I did not inform you of my fever. I had got some fever and I am now recovered. One of my fingers is swollen and it is paining. So I cannot write at all. I have written this letter with much difficulty. I spend 45 minutes specially in singing. I now go to dig with Mr. Gandhi's party and take their food, which is nourishing. I had written a letter to Shrivatsa before some

days. I get Navayuga regularly. I did not get आनंद and उषा for the last month.

I am quite well. With good wishes to you,

I am yours affectionately,

Shyamakant.

श्री

पत्र ५० वें

शान्तिनिकेतन,

ता. २७-१-१५

ती. सौ. गंगूमाईस दोन्ही कर जोडून त्रिकाल चरणीं मस्तक ठेवून शि. सा. न. वि. वि. तुझें पत्र पोंचलें. मी पांच दिवस कलकत्त्यास होतों. काल येथें आलों. तीनचार पत्रें एकदम मिळाल्यामुळें तीं वाचून फार आनंद झाला. हलवाही पोंचला. रामनें पुण्याहून एक पत्र व थोडासा हलवा पाठवला आहे. खरेंच हलवा मिळाला म्हणजे तुमची सर्वांची फार आठवण होते. मुलें खूप पतंग उडवीत असतील नाहीं ? कलकत्त्यास माघोत्सवाला आम्ही गेलों होतों. त्याबद्दलची हकीकत खालीं लिहतों.

बंगालमध्यें पुष्कळ हिंदु लोक ब्राह्मो झाले आहेत. ब्राह्म म्हणून एक नवीन धर्म आहे. ब्रह्मावर ज्यांचा विश्वास आहे ते ब्राह्म. ब्राह्म मूर्तिपूजा करीत नाहींत. ते समजतात कीं, ईश्वर एक व निराकार. माघ महिन्यांत ब्राह्म लोक एक उत्सव करितात, त्याचेंच नांव माघोत्सव. हिंदूंचीं ज्याप्रमाणें देवळें असतात त्याचप्रमाणें ब्राह्म लोकांचीं मंदिरें असतात, परंतु त्यांमध्यें देवाची मूर्ति नसते. हीं मंदिरें ख्रिश्चन लोकांच्या Church प्रमाणेंच असतात. कलकत्त्यास अशीं तीनचार मंदिरें आहेत, त्यांला ‘ ब्राह्मसमाज ’ म्हणतात. कलकत्त्यास सर्वांत मोठें मंदिर आहे, त्याचें नांव ‘ साधारण ब्राह्मसमाज. ’ येथें कलकत्त्यांतील सर्व ब्राह्म लोक प्रत्येक रविवारीं प्रार्थना करावयास जातात. गुरुदेवांचे म्हणजे रवींद्रबाबूंचे वडील, ‘ महर्षि देवेंद्रनाथ ठाकूर ’ यांनीं ब्राह्म धर्माला उत्तेजन दिलें होतें. त्याच्या आधीं ब्राह्म धर्म इतका प्रचलित नव्हता. महर्षींनीं कलकत्त्यास एक मंदिर स्थापन केलें आहे तेंच

अजून आमचे गुरुदेव चालवीत आहेत. त्याचें नांव 'आदि ब्राह्मसमाज.' याप्रमाणें तीनचार समाज कलकत्त्यास आहेत. सर्व समाजांत माघोत्सव होतो. परंतु साधारण ब्राह्मसमाजाप्रमाणें मोठा उत्सव कोठेंच होत नाहीं. तेथें पंधरा दिवस उत्सव होत असतो. आम्ही गुरुदेवांच्या आदिब्राह्म समाजांत गाणें गावयास गेलों होतों. आम्ही चोवीस पंचवीस जण होतों. तीनचार जण मास्तरही आमच्याबरोबर होते. कलकत्त्यास आम्ही गुरुदेवांच्या घरींच उतरलों होतों. तेथें त्यांचा एक मोठा थोरला बंगला आहे, त्याला 'जोडा सांको' म्हणतात. तेथें दोनतीन दिवस आम्ही होतों. गुरुदेवांचे वडील भाऊ 'द्विजेन्द्रनाथ ठाकूर' यांचे पौत्र 'दीनेंद्रनाथ ठाकूर' हे आम्हांला गाणें शिकवितात. गुरुदेवांच्या येथें आमची खाण्याची व्यवस्था फार चांगली होती. पुष्कळ प्रकारचीं पक्वान्नें आम्हांला रोज मिळत असत. लाडू, पुऱ्या, मासे, मांस वगैरे मुलांचीं पुष्कळ आवडतीं पक्वान्नेंही होतीं. माघ महिन्याच्या ११व्या तारखेस म्हणजे जानेवारीच्या २४व्या तारखेस माघोत्सव झाला. आम्ही आदिब्राह्मसमाजांत गाणीं गावयास गेलों होतों. सकाळीं जास्त मंडळी नव्हती. पण संध्याकाळीं खूप मंडळी जमली. तथापि साधारण ब्राह्म-समाजापेक्षां जास्त नव्हती. गुरुदेवांनीं सर्वांस उपदेश दिला. आमच्याशिवाय कांहीं बायकांनींही गाणीं म्हटलीं, त्यांपकीं एका मुलीनें फारच उत्तम गाणीं म्हटलीं. आमच्यापैकीं माझीं गाणीं सर्वांना आवडलीं असें समजतें. पुष्कळ गृहस्थ मला म्हणाले कीं, "तुझा गळा फार मधुर आहे व तुला चांगलें गातां येतें." गाणीं वगैरे झाल्यावर आम्हांला पुष्कळ मेजवान्या देण्यांत आल्या. नंतर आम्ही काल येथें परत आलों. आगगाडीचें आणि घोड्याच्या गाडीचें भाडें आदिब्राह्मसमाजानेंच दिलें; आम्हांला एक पैसुद्धां द्यावी लागली नाहीं. कळावें, ही विज्ञापना.

आपला श्यामकान्त.

पत्र ५१ वें

Shantiniketan,
27-1-1915

My dear Nana,

I received the हलवा sent by you and also your last letter, which was a long one, and I took interest in reading it. I am sure, you are awaiting my letter. But I am sorry, I could not write to you for so many days. On the 19th January I came here to the hospital. Before that the muscle of my foot was paining very much. Besides my tooth was paining. So I came here with my bed, and from that day I am here under the care of the Doctor here. My foot began to swell more and more and my tooth began to pain more too. The Doctor could not understand why my foot was swelling, and whether it was an abscess or not. Three or four days afterwards he was sure that it was an abscess and that very morning he operated on it. It gave me no doubt horrible pain at that time and I cried very much. Then I was stuck to bed. I cannot move my foot, and if I move it, it pains. I keep it upon some pillows. I have always to lie down on the bed. I have also a small boil on my back, and I cannot take any other food than milk. I always remember home and Gangumai and all our relatives. Now of course after the operation I am lying here four or five days. I am better now. The pain has lessened and the tooth is better. The Doctor says that wisdom-tooth is coming. I am often restless. But at the day time generally I am quite well. I do not have sound sleep yet. I had also fever, but now I have shaken it off. To-day I am feeling better, and I shall be cured soon. You should not be anxious at all. For they are taking proper care of me here. Never be anxious about me.

I am sure, by living here, at the Shantiniketan, I have had many benefits. I could see so many great men and hear their lectures and hear Gurudeo's sermons. I am sure that had I been at Baroda I could never have had this benefit. But my body is not improving here, and particularly after the last Puja vacation it is going down. Now I have become too weak. I am thinking of one plan. When I am cured, I may take leave for some months and go to our country and live in some mountainous parts, where I would be better. For I now find it useless studying hard. The climate here does not suit me, and I am sure if I return home and live at some good places, I would be better.

Boys have gone to Calcutta for Maghotsava. Through the whole of Calcutta, they are all enjoying. Here also the boys are having feasts and picnics and games and so on. But I cannot join them. I think I have nothing more to write to you. Don't mind my hand-writing, and don't be anxious for me. What do you think of my removing from this place and going home? Please let me know soon. I think you may make some arrangements for my change. I want a change. I am quite well.*

I am yours affectionately

27th January 1915. *Shyamakant.*

श्री

पत्र ५२ वें शान्तिनिकेतन,

ता. १५ सप्टेंबर स. १९१५

चि. श्रीवत्स, मकरंद, कमळो, श्रीनिवास, श्रीराम व ती. जयराम यांस,

तुमचीं सर्वांचीं पत्रें पोंचलीं. वाचून फार आनंद झाला. तुम्ही पत्र लिहिणारे

* यानंतर सहासात महिने श्यामकान्त प्रकृतीच्या कारणानें मुंबईकडे आला होता.

पुष्कळ आहांत, पण मी उत्तर देणारा एकच आहें, म्हणून तुम्हां सर्वांना वेगळीं पत्रें मला लिहितां येणार नाहींत. असो. माझी परीक्षा येत्या रविवारीं ता. १९ रोजीं होणार आहे. तीन दिवसांनीं संपेल. तुम्हीं एक हरिण आणलें आहे हें ऐकून फार आनंद होतो. तुम्ही त्याला कोठें ठेवतां? मी हल्लीं गुरुदेवांची 'गुप्त धन' म्हणून गोष्ट आहे तिचें मराठींत भाषान्तर करीत आहें. काल रात्रीं गुरुदेवांनीं एक नवीन गोष्ट वाचली, ती फार चांगली होती. आमच्या येथें 'राजंगम' म्हणून एक मद्रासी गृहस्थ आहेत. त्यांना मराठी व गुजराथी चांगलें येतें. त्यांनीं आमच्या शाळेची एकंदर व्यवस्था पाहून खाण्यासंबंधीं व इतर गैरसोयी गुरुदेवांना कळविल्या. त्यावरून आमच्या खाण्याच्या क्रमांत थोडासा फरक झाला आहे. संध्याकाळीं खाल्ल्याबरोबर आम्ही खेळावयास जात असूं. हल्लीं संध्याकाळीं दोन तास क्लास झाल्यानंतर मधल्या सुट्टींत खातों; व नंतर पुनः एक तास क्लास झाल्यावर खेळावयास जातों. रात्रीं खेळून आल्यावर व संध्याकाळचे मंत्र आटपल्यावर आम्ही जेवावयास जातों. एंटरटेन्मेंट नसते. जेवल्यानंतर ती करण्यांत येईल.

येथें हल्लीं सुहृत्कप मॅच सुरू आहे. सुहृत् म्हणून एक या शाळेचा विद्यार्थी आगगाडीखालीं चेंगरून मेला; त्याच्या आठवणीसाठीं म्हणून चांदीचा एक कप ठेवलेला आहे. प्रत्येक वर्षी मुलांच्या मॅचिस् होतात, त्यांत शेवटीं ज्याला जय मिळेल त्याला तो कप मिळतो. या वर्षी हा कप आमच्या वर्गाला मिळण्याचा संभव आहे.

काल रात्रीं ईजिप्तहून एक गृहस्थ येथें आले. त्यांचें नांव वाडी बास्तानी. आज सकाळीं त्यांचें लेक्चर झालें. पहिल्यानें त्यांनीं आपल्या देशांतील स्वदेशी चळवळीसंबंधीं माहिती सांगितली आणि शेवटीं ते म्हणाले कीं, "मी एक गोष्ट तुम्हांला सांगतों. कांहीं झालें तरी आपल्या देशाच्या स्वतंत्रतेसाठीं खटपट करा." भाषण इंग्रजींत झालें; बोलणें व हावभाव आवेशाचे होते. हे एक इजिप्शियन कवि असून गुरुदेवांच्या कवितांचें इंग्रजींतून आरबी भाषेंत भाषान्तर करितात. त्यांनीं आपल्या कांहीं आरबी कविता चालीवर म्हणून दाखविल्या. नंतर त्यांनीं इंग्रजी कवन वाचून दाखविलें.

गंगूमाईनें मला विचारलें कीं, मीं शेव व चकल्या मागितल्या तें कळलें.

पण मीं त्या मुळींच मागितल्या नाहींत व त्या मला नकोतही. पियर्सनसाहेब ह्लीं आमच्या खोलींत राहतात. आमच्या बरोबर तेही आंधळी कोशिंबीर खेळले. वाहणांचे चार जोड पोचले. अजून पुष्कळ विद्यार्थी वाहणा मागत आहेत. मी नवयुगाकरितां नानांकडे चित्रें पाठवीत आहें. मीं आमच्या देशाच्या चालीरीती म्हणून दोनतीन निबंध लिहिले असून एक 'सोपान' नांवाच्या मासिकांत दिला, तो कालच छापून आला. दुसरा एक 'प्रकृति' मासिकांत दिला आहे. मला आणखी पुष्कळ लिहावयाचें आहे तें पुढील पत्रीं लिहीन. कळावें हे आशीर्वाद.

श्यामकान्त.

श्री

<u>पत्र ५३ वें</u>

शान्तिनिकेतन,

ता. १ ऑक्टोबर, १९१५

ती. सौ. गंगूमाईस शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना. तुझें पत्र पोंचलें. तूं म्हणतेस कीं, पियर्सनसाहेब मला दिल्लीला ठेवण्याबद्दल सांगत होते. पण त्यांनीं मला जें पत्र लिहिलें त्यांत दिल्लीचें नांवही नव्हतें. ते म्हणतात कीं, मी परीक्षेनंतर एक वर्ष येथें राहावें. लांब राहावयास मी घाबरतों असें तूं मुळींच समजूं नकोस. ह्लीं तर मला पुष्कळ लांबलांब फिरावयास जाण्याचीच इच्छा आहे; आणि मोठा झाल्यावर पुष्कळ प्रवास करीन असा मीं बेत करून ठेवला आहे. लांब जाण्यास मला भीति न वाटतां उलट मजाच वाटते. मी बहुतेक ११व्या तारखेस येथून निघून १२वीला दार्जिलिंगला पोंचेन. आमच्याच शाळेंतला नरभूप नांवाचा एक नेपाळी मुलगा दार्जिलिंगच्या अलीकडे कार्शियांग गांवीं राहतो, तो व मी बरोबर निघूं. तो आपल्या गांवीं उतरेल व मी पुढें एकटाच जाईन. मजजवळ गरम धाबळी व कपडे आहेत ते पुरतील. असो. आज जास्त लिहीत नाहीं. कळावें, ही विज्ञापना.

श्यामकान्त.

पत्र ५४ वें

Shantiniketan,
9-10-1915

My dear Nana,

Your letter to hand this morning. Our result is not yet out. I think I should not go to Darjeeling this time. For there are lots of difficulties in going there. First of all I shall have to make warm clothing and many other clothes fit for staying at Darjeeling. All these clothes will certainly cost me a great amount of money. Then again the Maharani is not perhaps at Darjeeling now, for she had written to me that she lives at Darjeeling from June to November. Secondly, I don't like staying at the Maharani's palace. I don't think I shall be comfortable there. Besides if I go to Darjeeling, and stay with the Maharani, I shall have to buy many other clothes which will certainly cost me more than Rs. 50; for all my coats and other clothes are now getting smaller or rather I am growing. I generally don't use coats here except in the winter season. I, therefore, think that I should not go to Darjeeling now. I should rather go there after a year or two accompanied by you. For the Maharani has been inviting you for a long time. What do you think ? Should I go there now ? A friend of mine who reads with me lives at Kursiang near Darjeeling. I can also put up with him and visit Darjeeling.

As regards grandmother's visiting Benares I am quite ready to join her there. Our final examination will take place on 1 March 1916. As you propose, if Aba accompanies us at Benares, it would be the most pleasant journey—a journey I have never performed in my life. For there is no such misery as to travel alone, and I am quite tired of it now. If Aba does not join us, I shall have the company

of grandmother and others. However, there is plenty of time before us, and we shall think of it later on.

We now take our meals in the new dining hall, which is large and splendid. The Magho tsav is nearing now and the boys are learning songs which will be sung at Calcutta soon. I would be able to join them this year. I may only go to Calcutta to hear them. The boys are going to act *Vasantotsava*, a new play by Gurudeo. High rates are kept for the tickets, and the money thus got will be utilised for some good purpose. I think I should close here to-day. More in my next. With B. C.

I am etc.
Shyamakant.

श्री

पत्र ५५ वें | रांची,
ता. ३१-११-१९१५

ती. सौ. गंगूमाई व काकी यांस शिरसाष्टांग नमस्कार वि. वि. मी गेल्या रविवारीं ता. २४-१०-१९१५ सकाळीं पांच वाजतां येथें आलों हें तुम्हांला कळलेंच असेल. रांची ही जागा डोंगरावर आहे. मुंबईहून पुण्याला जातांना जसें डोंगरावर चढावें लागतें, तसें पुरुलियाहून येथें येतांना चढावें लागतें. पण पुण्याइतकी उंचावर ही जागा नाहीं व बोगदेही नाहींत. गाडी (Narrow guageची) बिलिमोऱ्याच्या गायकवाडी रेल्वेप्रमाणेंच असते. इकडे जंगल मात्र फार आहे. आपल्या तिकडल्या डोंगरांप्रमाणें उंच डोंगर इकडे कमीच आहेत. पण जंगल मात्र गर्द आहे. इकडलीं झाडें फार उंच असून डोंगर झाडांनीं अगदीं हिरवेगार झालेले असतात.

आम्ही दोनतीन दिवसांपूर्वीं सत्येंद्रनाथ व ज्योतिरिंद्रनाथ ठाकूर यांच्या येथें चहाला गेलों होतों. तेथें सर्वांनीं मला पुष्कळ प्रश्न विचारले. सत्येंद्रनाथ हे आपल्या तिकडे महाराष्ट्रांत पुष्कळ वर्षें होते, त्यांना गुजराथी व मराठी चांगलें

येतें. ते मला म्हणाले कीं, तुला तर बंगाली येतेंच आहे. तुझ्याशीं मराठींत कशाला बोलूं ? कलकत्याला भीमराव त्यांना भेटले होते, तेव्हां ते त्यांच्याशीं मराठींतच बोलले. असो. नंतर येथें गायनवादन वगैरे झालें. मीं कांहीं गाणीं म्हटलीं व तबलाही वाजविला. त्याच्या दुसऱ्या दिवशीं मी पी. एन्. बोस (P. N. Bose) यांच्या येथें गेलों होतों. त्यांची मुलगी चांगली गाते. येथें काशिनाथपंत नातू म्हणून एक मराठी गृहस्थ आहेत, त्यांनाही भेटलों. येथून तीस मैलांवर हुंडूघाट म्हणून एक मोठा धबधबा आहे, तो पाहण्याकरतां आम्ही परवांच्या दिवशीं गेलों होतों. पहिल्यानें आम्हांला आगगाडीनें जाना नांवाच्या स्टेशनावर रात्रीं बारा वाजतां जावें लागलें. येथील स्टेशनमास्तर मराठी होते. त्यांनीं आमची निजण्याची सोय करून दिली. पहांटे उठून आम्ही डोंगरावर चढून दहा मैलांवर हुंडू गांवांत गेलों. येथें सुवर्णरेखा नांवाची नदी डोंगराच्या एका कडयावरून दोन हजार फूट उंचीवरून खालीं पडत होती. एवढा मोठा धबधबा हिंदुस्थानांत कोठेंच नाहीं. येथें आम्हीं आंघोळ केली व साडेबारा वाजतां परत निघालों. येतांना मात्र फारच मजा झाली. आम्हीं सकाळींच साडेदहाच्या गाडीनें परत फिरूं असें ठरविलें होतें. पण आम्हांला तेथें पोंचावयास साडेदहा वाजले. हुंडूजवळ आम्ही एक मैलांचा खांब पाहिला. त्याच्यावर तेराचा आंकडा होता. जानाहून परत जायला दुसऱ्या दिवशीं पहांटे चार वाजेपर्यंत गाडी नव्हती. आम्हांला वाटलें कीं, रांची येथून तेरा मैल असावी; म्हणून चालतच जावें म्हणून निघालों. तेरा मैल चालत आल्यावर पाहतों तों तेथें दुसराच एक मोठा रस्ता लागला. येथें आम्ही संध्याकाळीं सहासात वाजतां पोंचलों. हा रस्ता म्हणजे पुरुलिया-रांची रोड असून येथून रांची सत्तावीस मैल होती. मग आम्हीं असा विचार केला कीं, येथून चालत पुढच्या स्टेशन-पर्यंत जावें व निघालों. आम्ही सगळेच अतिशय थकलों होतों. त्यांतल्या त्यांत मीच बरा होतों. आमच्याबरोबर खाणेंही पुरेसें नव्हतें. मग लोकांना विचारत विचारत पुढल्या स्टेशनवर येऊं लागलों. तेथल्या लोकांना मैल व कोस म्हणजे केवढा असतो याची कांहींच कल्पना नाहीं. कोणी म्हणत येथून 'टाटीशिलवाई' एक कोस, कोणी दोन कोस व कोणी तीन कोस म्हणत. नंतर आठ-दहा मैल चालल्यावर टाटीशिलवाई स्टेशनवर कसेबसे पोंचलों. तेथें एक धाबळी

पसरून निजलों. या बाजूला थंडी मात्र फार असते. असो. नंतर पहाटेच्या गाडीनें येथें आलों. अशितबाबूंची आई फार चांगली आहे. तिनें आम्हांला अंडीं व स्टिम्युलेटिंग डोझ दिला. दुपारीं अंगाला व पायांना तेल लावून पाय रगडून आंघोळ केली. हुंड्राघाट मात्र अति उत्कृष्ट धबधबा आहे. जगांत या धबधब्याचा दुसरा नंबर आहे म्हणतात.

मी आणखी एक दिवस येथें आहें. नंतर गिरिधीला जाऊन तेथून पुढें दरभंग्याला ढवळ्यांच्या येथें जाईन. माझी तब्येत चांगली आहे. मला दरभंग्याला—

C/o S. B. Dhavle, Esqr., I.C.S.
Laheria Sarai,
Darbhanga Dist.

या पत्यावर पत्र लिहावें. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

पत्र ५६ वें

Shantiniketan,
15th Nov. 1915

My dear Shrivatsa,

I came here yesterday morning from Barh. I had given you the description of my journey upto Darbhanga *i. e.* upto where I reached Laheria Sarai. Laheria Sarai, you know, is a very small town and the courts and offices of the Civilians of Darbhanga are at Laheria Sarai and therefore, all the civilians and the lawyers live at Laheria Sarai nearly 3 miles away from Darbhanga. I used to go to take a ride on the bike of Mr. Dhavle every evening after tea. I used to wander in the town of Darbhanga. I also saw the palace of the Maharaja of Darbhanga from outside.

On the 12th of November I and Mr. Dhavle left for Barh, a place near Bankipur. At Barh Mr. Godbole,

a Magistrate there, had invited the Lieut. Governor of Behar for a breakfast. Mr. Godbole had decorated the front of his house very splendidly. At 8 o'clock on the 13th inst., the Governor came there followed by many Civilians. Then there was a high seat made for the Governor on which he sat down. This meeting was held in a big tent where many gentlemen had assembled. Then a Mohamedan gentleman recited some Urdu pieces of poems. The Governor also visited the school and the hospital of Barh. There a gentleman read an address from a printed paper on behalf of the reception committee. Then the Governor gave a reply and the party went to breakfast with Mr. Godbole.

On that very day Mr. Dhavle and Mr. Godbole went to Bankipore where there was some such other meeting and I came back to Bolepur. I had two hour's time before me and I went round the town with some of the Barristers there in a motor-car. Then I started for Bolepur. I had to change at Mokameh and at Kiul and I reached here at 9 o'clock in the morning yesterday. However, my journey this vacation was an enjoyable one, though I had to suffer much in the train.

Our examination is drawing near and the boys are working hard. No more for the present. With good wishes to you,

I am yours affectionately,
Shyamakant.

पत्र ५७ वें

Shantiniketan,
19*th Dec.* 1915

My dear Nana,

I was awfully sorry for dear Shrivatsa's death, when I went through your letter this morning. I loved him very

much and often thought of him, here. I know that he was ill, but I did not think that it was a very serious illness. I thought he had got fever as he usually did. Indeed what a wonderful brain he possessed! He was a very very brilliant boy. May he rest in peace!

I know, I am, now, your future hope, your left leg, and I will try my best to be healthy. I have much improved in my constitution now and I feel much stronger than before.

I don't wish to stay here at Shantiniketan any more. As soon as the examination is over, I must go back. I am anxious for Gangumai. I suppose, she must have been very much affected by Vatsa's departure. I pity her.

Lastly, I want to tell you that I am all right. Don't be at all anxious about me. If you are anxious for me, your sorrow will be doubled. So don't bother yourself for me.

I then close here. With many good wishes to you,

I am yours affectionately
Shyamakant.

श्री

पत्र ५८ वें

शान्तिनिकेतन,
ता. २२-१२-१५

ती. सौ. गंगूमाईस दोन्ही कर जोडून त्रिकाल चरणीं मस्तक ठेवून शि. सा. नमस्कार वि. वि. तुझें कार्ड आज सकाळीं दहा वाजतां मला पोंचलें. शिवाय आजच सकाळीं नानांचा टेलिग्राम आला. त्यांत त्यांनीं लिहिलें होतें कीं, माझ्याकडून पत्र नाहीं. पण मी दोन मोठीं पत्रें व एक पोस्ट-कार्ड यापूर्वींच पाठविलें आहे. कदाचित् पोंचलें नसेल. काय तें कळवावें.

श्रीवत्स अतिशय आजारी असल्याबद्दल मला नानांचें पत्र आलें होतें. त्याच दिवशीं माझा मुंबईला जाण्याचा विचार होता, पण जगदानंदबाबू म्हणाले कीं, 'उद्यां काय पत्र येतें तें पहा आणि त्याप्रमाणें कर.' त्या दिवशीं

रात्रीं मी सुरुलला होतों. दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं मी सुरुलहून क्रिकेट खेळण्याकरितां येथें परत आलों. त्याच वेळीं श्रीवत्स वारल्याची खबर व त्याबद्दल नानांनीं लिहलेलें पत्र जगदानंदबाबूंच्या हातीं आलें होतें. त्या दिवशीं मी जगदानंदबाबूंकडे गेलों; तों ते म्हणाले कीं, 'आज कांहींच बातमी आलेली नाहीं, उद्यां काय होतें तें पाहूं.' त्याच्या दुसऱ्या दिवशीं सकाळीं बडोद्यास जातांना नानांनीं लिहलेलें पत्र मला पोंचलें. पण त्याच्यांत श्रीवत्साच्या तब्येतीबद्दल कांहींच नव्हतें. म्हणून मी लागलींच जगदानंदबाबूंकडे गेलों, तेव्हां त्यांनीं मला आधींच पत्र दिलें व मग सगळ्या गोष्टींचा उलगडा झाला.

तूं मला आतांच तिकडे यावयास सांगत आहेस, पण मला वाटतें तिकडे येण्यांत कांहीं अर्थ नाहीं. मार्चमध्यें आमची परीक्षा होईल. त्यानंतर दार्जिलिंगला जाण्याचा विचार आहे. मग दिल्ली, आग्रा वगैरे ठिकाणीं उत्तर हिंदुस्थानांत हिंडून दिल्लीहून थेट बडोद्यास जावें असा विचार आहे.

बिचाऱ्या श्रीवत्साविषयींची बातमी ऐकून मला पहिल्या दिवशीं अतिशय वाईट वाटलें व रडूंही आलें. तेव्हांपासून मला त्याचे गुण आठवूं लागले. मी त्याला घेऊन कोठें तरी फिरायला जाईन, असें करीन, तसें करीन, अशा पुष्कळ कल्पना मी मनांतल्या मनांत करीत असें. मी अलीकडे माझ्या नांवाचा एक शिक्का तयार केला आहे. तो फारच चांगला झाला आहे. वत्साला आपल्या नांवाच्या शिक्क्याची फार हौस होती; म्हणून मी त्याच्याकरितां एक शिक्का तयार करण्याच्या विचारांत होतों,–इतकेंच नव्हे तर करावयास लागलोंही होतों,–इतक्यांत त्याच्याबद्दल ही दुष्ट खबर आली. त्या वेळीं खरेंच मला अतिशय वाईट वाटलें व या जगांत राहूंच नये असें वाटूं लागलें.

पण ईश्वरानें मनुष्याची स्मृतिशक्ति जर नेहमीं जशीच्या तशी ठेवली तर आपण जगलोंच नसतों. सर्व सुखदुःखांचा मनुष्याला हळू हळू विसर पडतो व मनुष्य भविष्य काळाकडे डोळे लावून आपलें काम करीत राहतो.

नानांचें पत्र वाचून पहिल्यानें मला वाईट वाटलें व नंतर मी बाकीच्या माणसांचा व त्यांच्या दुःखांचा विचार करूं लागलों. सगळ्यांत मला तुझ्याबद्दल फार काळजी वाटूं लागली. कारण मला अशी खात्री होती कीं, सगळ्यांत तुलाच जास्त दुःख होणार. असो. झालें तें झालें. त्याच्याबद्दल दुःख करून

चालणार नाहीं. श्रीवत्सानंतर आतां तुमचें सर्व लक्ष माझ्याकडेच आहे व माझी तब्येत चांगली असली म्हणजे तरी तुम्हांला पुष्कळ आनंद होईल व दुःखाचा विसर पडेल. माझ्याबद्दल कांहीं एक काळजी करूं नये. माझी तब्येत आतां उत्तम आहे. माझ्याबद्दल उगीच दुःख करीत बसूं नये. मीही आतां वत्साबद्दल दुःख करीत नाहीं. विसरण्याचाच प्रयत्न करतों. असो.

काल मॅट्रिक्युलेशनच्या मुलांनीं सुरुलमध्यें वनभोजन केलें. फार मजा आली. मीं नानांना लिहलेंच आहे कीं, तीन दिवस मी सुरुलला होतों. वीरेश्वरबाबू म्हणून एक गृहस्थ तेथें व्यवस्थेला असतात. गुरुदेवांचा एक मोठा बंगला, विजेचे दिवे, पंखे सर्व कांहीं तेथें आहे. पण वर्षांतून एखादा दुसरा दिवस ते तेथें जातात. विजेकरतां मुद्दाम एक इंजिन केलेलें आहे. वीरेश्वरबाबू व मी तेथें रोज स्वयंपाक करत असूं. ते मला म्हणत कीं, मी फार कमी जेवतों. परवांच्या दिवशीं रात्रीं हिंग, हरभऱ्याचें पीठ वगैरे विकत आणून मी त्या दिवशीं पिठलें केलें व सपाटून पिठलेंभात खाल्ला. त्या दिवशींच मात्र मी पुष्कळ जेवलों. तेव्हां वीरेश्वरबाबू म्हणाले कीं, पुन्हा तूं येथें आलास कीं स्वतः तुला पिठलें भात खायला घालीन. असो. हल्लीं आम्हांला सुटीच आहे. वेळही असतो. एक दोन दिवसांनीं मी श्रीखंड तयार करणार आहें. बोलपूरहून केशर आणलें आहे. याप्रमाणें मी हल्लीं आनंदांत आहें.

जगदानंदबाबू लवकरच नानांना एक पत्र लिहिणार आहेत. मी आज येथेंच पत्र पुरें करतों. वरचेवर पत्र लिहीत जावें. कळावें हे विज्ञापना.

श्यामकान्त.

पत्र ५९ वें

Shantiniketan,
30-12-1915

My dear Aba,

I was glad to receive your letter this morning. I was very eager to know how Shrivatsa died and I got the description and all information about him yesterday from dear

Gangumai. I am really sorry for him. He was very active and brilliant, rather more brilliant than any other boy of his age. But he is gone for ever. Yet all the members of our family, as I know, are kind and good. I know, there are very few families like ours in our society at the present time. A joint family with virtuous industrious members is always full of happiness. Oftentimes when I used to get any leisure, I used to think of our Sardesai family for hours together. And at least I used to feel that our family was the best among the many that I had come across and I have often supposed myself to be fortunate to have been born in such a family, to have possessed such virtuous parents and to have thus enlisted my name among the members of the Sardesai family, which has more prosperity and more liberty than any other family. I know in our country no other guardian would dare to send his son to so far a country. No other guardian would permit his children so much liberty as you are all now giving. You know there are children of rich people who do not even dare get out of their houses without the permission of their guardians, who generally keep them in a sort of imprisonment. Oh how I thank god for being a member of such a family, for being a son of such a virtuous father.

Mai writes to me that Shriniwas has gone to Baroda. Does he attend any school ? Or does he read at home ?

You know our anniversary was over the day before yesterday. It was for Maharshi Devendranath having taken दीक्षा in Brahmoism. On that occasion Rathindranath Tagore, Gurudev's son, took a photograph of all the Marathi members of this institution with Gurudeo. He was dressed in a silk Dhoti of Nagpur pattern, a Poona turban, Poona slippers and a Poona उपरणें. He took these dresses from Bhimrao Shastri who bought them for him during the last vacation. Narayan Kashinath Deval, an ex-student of this institution,

whose father is a Maratha and mother a Burmese, who has been brought up here in this Ashram, has now turned into a Bengali and had been sent to England by Gurudeo. He was also photographed with us. I stood by Gurudeo with my cap on. Bhimrao put on his turban and stood behind Gurudeo. I will try to send a copy of the photograph for you and Nana. Please send this letter on to Nana that I may not have to write all this again to him. With best wishes,

Yours affectionately,
Shyamakant.

श्री

पत्र ६० वें

शान्तिनिकेतन,
ता. ६-१-१९१६

ती. सौ. गंगूमाईस दोन्ही कर जोडून त्रिकाल चरणीं मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार वि. वि. काल सकाळीं मी सुरुललाच होतों. तेथें भीमरावही होते. आम्हीं भात, आमटी, पोळ्या व बटाट्यांची भाजी असा दक्षिणी स्वयंपाक केला होता. बंगाली लोक स्वयंपाकांत हिंग वापरत नाहींत, म्हणूनच त्यांच्या जेवणाची चव आपणांला आवडत नाहीं. सुरुललाच वीरेश्वरबाबू जेवावयास होते. बंगाली लोकांना हिंगाचा वास मुळींच खपत नाहीं. एकंदरींत काल मजेदार जेवण झालें. संध्याकाळीं येथें आल्यावर मला तुझें पत्र पोंचलें. वाचून फार आनंद झाला. मला धीर देण्याकरतां म्हणून आबांनीं व आण्णांनींही पत्रें पाठविलीं होतीं. शिवाय आजच सकाळीं बगुताईचें पत्र आलें आहे. सर्व पत्रांत श्रीवत्साविषयींच कांहींना कांहीं लिहिलेलें आहे. तुला आतां हळू हळू बरें वाटत आहे हें ऐकून मला फार आनंद झाला. श्रीवत्साच्या भविष्याविषयीं तूं जी गोष्ट लिहली आहेस, ती वाचून फारच आश्चर्य वाटतें व ज्योतिश्शास्त्रच खरें आहे कीं काय असा संशयही येतो. यानें लिहिलेला कागद एकदां माझ्याकडे पाठवून दे. मला एकदां पहावासा वाटला आहे. मी पुष्कळदां वत्साविषयीं हजारों विचार करीत बसतों. बाकी

शान्तिनिकेतन

गुरुदेव भीमराव

पृ. ८८] देवल श्यामकान्त

श्यामकान्तचें बंगाली हस्ताक्षर

গান।

(১)

তোমারি নাম বলব আমি বলব নানা ছলে।
বলব একা বসে আপন মনে ছায়ার তলে।
বলব বিনা ভাষায় বলব বিনা আশায়।
বলব মুখের হাসি দিয়ে বলব চোখের জলে।

श्रीवत्सलांच्छन सरदेसाई

" कधीं कधीं वाटतें कीं आतां श्रीवत्स येथें
मला भेटेल आणि माझ्याशीं बोलेल-"

पृ. ८९]

मला आतां फारसें वाईटही वाटत नाहीं. पण माझ्या नेहमींच्या रीतीप्रमाणें कांहीं विचार मनांत आल्याशिवाय रहात नाहींत. कधीं कधीं पहांटे चार वाजतां शौचाला जातांना वाटतें कीं, आतां श्रीवत्स येथें मला भेटेल आणि माझ्याशीं बोलेल; असा विचार करीत मी पुष्कळदां अंधारांत सुद्धां उभा राहतों व त्या वेळीं ईश्वराच्या करणीचें आश्चर्यही वाटतें. पुष्कळदां मरण म्हणजे काय याविषयींच विचार करतों. मुंबई किंवा बडोद्याला असतांना मात्र मला पुष्कळदां जशी भीति वाटत असे, तशी मात्र येथें कधींच वाटत नाहीं. येथें मला अगदीं गाढ झोंप येते. शिवाय इतकीं मुलें आहेत कीं, त्यांच्यांत मिळून मिसळून असलें म्हणजे सर्व दुःख लांब पळून जातें. माझी तब्येत आतां उत्तम आहे. आज वजन करावयास विसरलों. पुढच्या पत्रांत वजन कळवीन. मी रोज सकाळीं व्यायाम करतों व संध्याकाळीं क्रिकेट खेळतों. येथें थंडी अतिशय असते. माझे पाय तर अतिशय फुटले होते. तूं दिलेलें रातंबेल माझ्यापाशीं होतें तें लावलें तरी कांहीं होईना. शेवटीं मी माझा रबरी बूट वापरूं लागलों. जेवतांना सुद्धां काढीत नसें. आंघोळ व निजणें या दोन वेळां फक्त काढून ठेवीत असें. असें केल्यावर तीनचार दिवसांत पाय चांगले झाले; म्हणून बूट वापरीनासा झालों, तों पुन्हा पाय फुटूं लागले. आतां पुन्हा बूट वापरूं लागलों आहें. हल्लीं आम्ही नवीन हॉलमध्यें जेवतों. स्वयंपाकाकरितां लोखंडाचीं विलायती चुलीसारखीं यंत्रें आणलीं आहेत. मला हल्लीं दिवसांतून चार वेळां पावशेर दूध मिळतें. शिवाय मी बदाम खातों, रात्रीं पोळ्या खातों. बाळाच्या आईनें बिलिमोऱ्याहून कोको पाठविला आहे. मी एक दिवा भिंतीला लावून वरती एका खुंटीला दोरीनें एक वाटी टांगून ठेवली आहे. त्या दिव्याच्या उष्णतेनें वाटी तापते व त्यामुळें मला कोको वगैरे पाहिजे तें करतां येतें. घरच्या पेक्षां येथें मी दूध जास्त पितों व जास्ती मिळतेंही. याचें कारण हेंच कीं घरीं नेमकें दूध थोडेंसें घेतलेलें असतें तें जास्त खर्चतां येत नाहीं; आणि येथें मुलांकरितां तीनचार मण दूध रोज येतें. त्यांत पुन्हा कांहीं मुलें दूध पीत नाहींत. एक दोन शेर दूध कमजास्त झालें तरी कांहीं नफातोटा होत नाहीं, म्हणून मला पाहिजे तितकें दूध घेतां येतें. खाण्यापिण्याची कांहीं एक तक्रार हल्लीं नाहीं. तक्रार

एवढीच कीं, आपल्यासारखा दक्षिणी स्वयंपाक मिळत नाहीं. बाकी खाणें पौष्टिक असतें. असो. आमच्या परीक्षेचा निकाल अद्याप लागला नाहीं, म्हणून आम्हांला अद्याप शाळा नसते. मी पास होईन यांत शंकाच नाहीं. कारण ज्या शाळेंत आम्हीं परीक्षा दिली त्याच शाळेचे हेडमास्तर म्हणतात कीं, हा जर एखाद्या सरकारी शाळेंत असता, तर याला स्कॉलरशिप मिळाली असती. आमची मोठी परीक्षा मार्चच्या १ल्या तारखेस आहे. हल्लीं आम्हांला कांहींच काम नसतें, म्हणून मी रोज कोठें तरी फिरावयास जातों. आम्ही पुष्कळदां शिंदोचा रस प्यावयास जातों हें मागें लिहिलेंच आहे. एकदां मीं रस प्यावयास गेलों असतां शिंदीचीं झाडें कशीं कापतात व त्यांतून रस कसा पडतो वगैरे सर्व पाहून घेतलें, व दुसऱ्या एका मुलाच्या साहाय्यानें जेथें पुष्कळ शिंदीचीं झाडें पडलेलीं आहेत, त्यांपैकीं एक कापलें. संध्याकाळीं सहा वाजतां रोज त्या झाडाला एक मडकें लावतों व दुसऱ्या दिवशीं पहांटे साडे-चार वाजतां तें घेऊन येतों. अशा प्रकारें मला रोज पहांटे चापून रस प्यावयास मिळतो. हा रस फार गोड असतो. याच्यापासून गूळही बनवतात. असो. आतां जास्त कांहीं लिहीत नाहीं. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

<u>पत्र ६१ वें</u>

शान्तिनिकेतन,

ता. १५-१-१९१६

ती. सौ. गंगूमाईस दोन्ही कर जोडून त्रिकाल चरणीं मस्तक ठेवून शि. सा. नमस्कार वि. वि. तुझें पत्र आज सकाळीं पोंचलें. वाचून फार आनंद झाला. दोनतीन दिवसांपूर्वीं आमच्या परीक्षेचा निकाल लागला. आनंदाची गोष्ट ही कीं, त्या परीक्षेंत इंग्रजी, बंगाली व संस्कृत या तीन विषयांत माझा पहिला नंबर आला आहे; आणि गणितांत मात्र दुसरा नंबर आला. गणितांत ज्याचा पहिला नंबर आला आहे त्याच्या पेक्षां मला एक मार्क कमी मिळाला आहे. इंग्रजींत मला दोनशें पैकीं एकशें आठ, संस्कृतांत एकशें सदतीस, बंगालींत

शंभरां पैकीं सत्याहत्तर व गणितांत दोनशें पैकीं एकशेंचवऱ्यांशीं असे मार्क मिळाले आहेत. आमची पुढची शेवटची परीक्षा आतां जवळच आली आहे. म्हणून आतां चांगला अभ्यास करीत आहें.

एक मुख्य गोष्ट लिहावयाला विसरलों. काल पहांटे चार वाजतां येथें एक भूमिकंप झाला. मला कांहींच कळलें नाहीं, पण बऱ्याच मास्तरांनीं, कांहीं मुलांनीं व स्वतः गुरुदेवांनीं आम्हांला सांगितलें कीं, पहांटे चार वाजतां खाटा, टेबलें व खुर्च्या थोड्याश्या हलल्या. असो. आणखी पांचसहा दिवसांनीं मी कलकत्यास जाईन. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र ६२ वें कलकत्ता,

ता. २८-१-१९१६

ती. सौ. मातुश्री गंगूमाईस श्यामकान्ताचे दोन्ही कर जोडून त्रिकाल चरणीं मस्तक ठेवून शि. सा. नमस्कार. वि. वि. आज सकाळीं तुझें पत्र व मुलांचीं पत्रें शांतिनिकेतनहून येथें पोंचलीं. वाचून फार आनंद झाला. तुला बहुतेक माहीतच असेल कीं मी पांचसहा दिवसांपूर्वीं येथें आलों.

*   *   *   *

आम्हांला येथें येण्याचें मुख्य कारण म्हणजे 'फाल्गुनी' नाटक गुरुदेवांनीं, मी मुंबईला असतांना रचलें आहे. गुरुदेवांच्या सर्व नाटकांत कांहीं तरी आध्यात्मिक भाग असतो. या नाटकाचा आंतला अर्थ समजणें फार कठिण आहे. यांतला मुख्य अर्थ एवढाच कीं, ईश्वराचें स्वरूप नेहमींच नवें नवें आहे. या जगांत म्हातारें असें कांहींच नाहीं, सर्वच तरुण. असो. या नाटकासाठीं जपानी, चिनी वगैरे सुतार स्टेज तयार करण्याकरितां आले होते. गुरुदेवांचा बंगला जुना असल्यामुळें पूर्वींच्या धर्तीप्रमाणें मध्यभागीं एक मोठा चौक आहे, तेथेंच नाटक होणार आहे. नाटक व्हावयाचें ठरल्यावरोबर चौकांत पुष्कळ मोडतोड करून स्टेज केलें. ठाकूर म्हणजे सरदेसाईच आहेत. अदलाबदल करायची फार हौस.

नाटकासाठीं १००, ५०, १५, १० व ५ इतक्या रुपयांचीं तिकिटें ठेवलीं आहेत. नाटक दोन दिवस होणार. दुसऱ्या दिवशीं तिकिटांचे दर २, २, १ असे आहेत. राजेरजवाडे सुद्धां नाटकाला येणार आहेत. तिकिटें आतांच सर्व खपून गेलीं आहेत. आतां हजारों लोकांना तिकिटें पाहिजे आहेत, पण जागा नसल्यामुळें जास्त तिकिटें देतां येत नाहींत. दहा हजारांपेक्षां जास्त पैसे मिळतील. हे पैसे बांकुराच्या दुष्काळांतल्या लोकांना देण्यांत येतील. गुरुदेव स्वतः पार्ट घेणार आहेत. कलकत्त्यांत जिकडे तिकडे 'डोंगर ओरडला' म्हणून एकच आरडा झाला आहे. आतां आंतून उंदीर निघतो कीं हत्ती निघतो तें पाहूं या, असा सर्वांचा विचार दिसतो.

उगीच जास्त बडबडलों. मुलांचीं पत्रें पोंचलीं, पण तीं वाचून आंत कांहीं रस नाहीं असें वाटूं लागलें. श्रीवत्साच्या पत्रांत जशी मजा असे व तो जसे मजेदार प्रश्न विचारी, यंत्रें वगैरे करण्याबद्दल मसलत घेई, त्याप्रमाणें आतां बहुतेक ऐकूं येईल कीं नाहीं संशयच आहे. आज येथेंच पुरें करतों. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र ६३ वें — शान्तिनिकेतन

ता. २-२-१९१६

ती. सौ. गंगूमाईस शि. सा. न. वि. वि. आम्ही काल संध्याकाळीं कलकत्त्याहून परत आलों. नाटक फार चांगलें झालें. आजच सकाळीं बिलिमोऱ्याहून तिळगुळाचें पार्सल आलें तें मीं सर्व मुलांना वांटून दिलें. आतां परीक्षेला सत्तावीस दिवस उरले आहेत. मी रोज दिवस मोजीत आहें. घरीं जाण्यासाठीं अगदीं उतावळा झालों आहें. काशी, दिल्ली, आग्रा, मथुरा वगैरे ठिकाणीं फिरावयाचें आहे, म्हणून त्या ठिकाणीं नानांच्या किंवा आबांच्या ओळखीचें कोणी असलें तर व्यवस्था करून द्यावी म्हणजे बरें पडेल. आज माझें वजन १ म. ७ शे. १२ छ. आहे. मी बरा आहें. कुचबिहारच्या महाराणी

After Matriculation

इंदिराराजा यांचे बंगल्यावर मी भेटीस गेलों होतों, पण त्या तेथें नव्हत्या. त्यांच्या सासूबाई होत्या, त्या नाटकास आल्या होत्या. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

पत्र ६४ वें

Shantiniketan,
21-2-1916

My dear Aba,

I received a letter from dear Nana to-day. He tells me to make my own programme of my future. He says that I need not wait for grandmother's going to Kashi and that I should make also the programme of my travelling. He says that he does not much like the present college course and that I must decide what I should do after passing the ensuing matriculation, which will be held on the 1st of March 1916. He further tells me that he would have liked to keep me at the feet of such great men as Sir Rabindranath or he would have liked that I should live with some other great person, versed in some subject as science, literature etc., had it not been for the death of poor Vatsa. He also asks me to consult with Mr. Andrews and Mr. Pearson, and I am going to do it. In this respect, I think that I should take your advice too. Please tell me what you think I should do after the examination. I must be something in the future, something good. Please, therefore, let me know your opinion on this matter. As to what I think, I should like to take up a science course after the examination, and at the same time cultivate literature privately. Calcutta, I hear, has the best college or university in the whole of India. I don't know to what extent this is true. But the Presidency College at Calcutta, they say, is the biggest one in India. Many Bengalees tell me that in respect of both science and literature Bombay is far behind Calcutta. For there are

great many scientists in Bengal working as professors in the Presidency College. J. C. Bose, P. C. Roy and others are all great scientists; so there are some, who advise me to take up a science course at Calcutta.

But I have now made up my mind to leave Bengal once for all. There are many reasons for it. I have to go through many difficulties in Bengal—difficulties of food, climate etc. Then, I think I should now live with Nana as dear Vatsa has left him. However Nana also wants me to leave Bengal I can, I suppose, take up a science course at Bombay and go to England for further course if necessary. However that's a more distant question. Now the question is, what am I to begin after the examination. Please let me know your wish.

Yours affectionately,
Shyamakant.

पत्र ६५ वें

Shantiniketan,
24-2-1916

My dear Nana,

Glad to receive your letter this morning. I now give up my plan of travelling to north India. I am not going to Calcutta for the examination, but to Suri about thirty miles from Bolpur. I think we shall be back here on March 8 and start for Baroda on 10th March via Bombay. Gurudeo is at present experimenting a new contrivance for serving food to the boys. A small wooden carriage is made to serve this purpose. In this carriage the buckets of various foods are kept and the boys get all the things at the same time. But this does not prove successful. It takes much time and is very inconvenient.

I can now play tennis fairly well and take much interest in it. I should like to play tennis at Baroda too. I close here today.

Yours affly,
Shyamakant.

खंड दुसरा

पुणें फर्ग्युसन कॉलेज

स. १९१७–१९२१

पत्र ६६ वें

Fergusson College,
Poona, 11-7-1917

My dear Nana,

We had to-day an eloquent and enthusiastic address from Hon. Mr. Madan Mohan Malaviya. Our amphitheatre was thronged with students, while crowds of people were still pouring into the grand structure. Students from the Deccan College as well as from the Engineering College all came in groups to attend the meeting. There was no room left for the late-comers who satisfied themselves with standing in the large door of the amphitheatre. As soon as the Hon. Panditji—as our Principal mentioned him while introducing him to us,—came accompanied by Prin. Paranjpe and followed by the group of our professors, the theatre was full of triumphant applause, which ended soon in silence. The sum and substance of what the Panditji told us was that the students should form their character during their whole life and should protect themselves with the strong and sharp weapons of ब्रह्मचर्य and सत्य. He quoted shlokas from Bhartrihari's poems and made such an effect upon the audience that few, I think, will forget the address. He spoke highly of the Fergussonians and still highly of our professors whom he put before us as examples. The conclusion of his lecture was followed by the hearty cheers from the students and the professors.

Kindly tender my respects to the elders and love to the children.

I am your affectionate son
Shyamakant.

पत्र ६७ वें

Fergusson College,
New Residency, 9-9-1917

My dear Nana,

I hope you will excuse me for my long silence. Gangumai and Bhau came here on Thursday morning. Bhau visited my room for some 2 or 3 hours. I reserved a Tennis court for him and had a nice game with him. We had dinner at Prof. Gune's, and then Bhau left for Bombay. On Friday night we attended the musical performance of Prof. Abdulkarim Khan, a well-known singer of Poona. We were so charmed with his own sweet performance that we forgot ourselves and were lost in music. I have determined to spare some time specially for the study of music next year. When I am promoted to the Junior B. A. Class, I shall have plenty of time to be a pupil of this Abdulkarim Khan. Our Fellow this year is a good singer and pupil of this Abdulkarim.

Tomorrow I go to Ghorpadi for my medical examination for admission into the Indian Defence Force of the University.

Your loving
Shyamakant.

श्री

पत्र ६८ वें

फर्ग्युसन कॉलेज,
पुणें, ता. १६-१०-१७

ती. सौ. गंगूमाईस शि. सा. नमस्कार, वि. वि. तुझें पत्र व वड्यांचा डबा पोंचला. ठरल्याप्रमाणें गेल्या १५ तारखेपासून आमचें लष्करी शिक्षण सुरू झालें. डेक्कन कॉलेजचे प्रोफेसर टर्नबुलसाहेब हे सर्व युनिव्हर्सिटी

कोअरचे कॅप्टन आहेत. ते सकाळीं सहा वाजतां ठरल्याप्रमाणें आले व त्यांनीं आमचें मैदान वगैरे पाहिलें व मग आम्हांला लेक्चर दिलें. त्यांत त्यांनीं असें सांगितलें कीं, आम्हांला जें शिक्षण देणार हा कांहीं खेळ नव्हे. सर्वांनीं नीट लक्ष देऊन हें शिकलें पाहिजे. नियम (Discipline) कडक रीतीनें पाळले गेले पाहिजेत. वेळच्या वेळीं सर्वांनीं हजर असलें पाहिजे. कोणाचें डोकें दुखलें किंवा कांहीं झालें तरी कोणालाही गैरहजर राहतां येणार नाहीं. फारच आजारी असलें तर डॉक्टरचें सर्टिफिकेट दाखवावें म्हणजे रजा मिळेल. त्याशिवाय गैरहजर राहिलें किंवा उशीर केला तर शिक्षा होण्यास हरकत नाहीं. हें सर्व झाल्यानंतर आम्हांला शिकविण्याकरितां जे सात हिंदुस्तानी इसम पाठवण्यांत आले होते ते आले, व त्यांनीं आमच्या सात टोळ्या करून ड्रिल शिकविण्यास सुरुवात केली. आम्ही एकंदर बहात्तर असामी आहोंत. दहादहा जणांची एक एक टोळी करण्यांत आली आहे. ड्रिलच्या वेळा सात ते नऊ व संध्याकाळीं चार ते सहा अशा ठेवल्या आहेत; पण पावणे सात वाजतां सकाळीं व पावणे चार वाजतां दुपारीं आम्हांला तेथें हजर असावें लागतें. यामुळें सकाळीं किंवा संध्याकाळीं केव्हांच आम्हांला खेळायला मिळत नाहीं. आम्ही सध्यां रेसिडेन्सींतच आहोंत व क्लबांत जेवतों. पहिल्या दिवशीं म्हणजे काल सकाळीं नऊ वाजतां आमची ड्रिल संपल्यावर मी अतिशय दमलों. उभें राहण्याची नेहमीं संवय नसल्यानें दोन तास उभें राहिल्यावर गुडघे फारच दुखूं लागले. पुन्हा साडेदहा ते दीड आमची टर्मिनल परीक्षा होती. एक पेपर आमचा झाला होता व काल दुसरा होता. शेवटीं कसें तरी करून दुसऱ्या पेपरला बसलों. अद्याप तीन पेपर बाकी आहेत. पण ड्रिल करून दमून आल्यावर पेपरला बसण्याची शक्ति राहत नाहीं, म्हणून मी आजपासून परीक्षेला बसण्याचें सोडून दिलें; त्यामुळें माझी स्कॉलरशिप चालू राहणार नाहीं एवढेंच. आम्हांला सकाळसंध्याकाळच्या ड्रिलमध्यें सकाळीं अर्धा तास व संध्याकाळीं एक तास मेहनत (Physical exercises) असते. आज संध्याकाळीं आम्हांला सडकून मेहनत मिळाली. भूक फार लागली व जेवणही चांगलें गेलें. झोंप तर अशी येते कीं, कांहीं विचारूं नका. मला वाटतें दहापंधरा दिवसांतच माझी प्रकृति फार सुधारेल. भूक व झोंप या दोन्ही गोष्टी वाढल्यानें शरीराची चांगलीच

सुधारणा होते. २० नोव्हेंबरला आम्ही कँपमध्यें रहावयास जाऊं. तेथें गेल्या-वर पत्र लिहीन.

आमच्या परीक्षा १८ तारखेला संपतात. त्याच दिवशीं सर्व विद्यार्थी आपापल्या घरीं जातील. मग आम्ही थोडीशी मंडळी तेवढी येथें रेसिडेन्सींत राहूं. आमच्या कोअरमधील नऊ मंडळी आमच्या कॉलेजकडून कमी करावयाची असें युनिव्हर्सिटीकडून लिहून आलें आहे. आमची सर्वांची परीक्षा घेऊन नऊ जणांना काढून टाकतील. असो. मागाहून जास्त लिहीन.

एव्हांस्तव तुम्ही सर्व गोंवलास पोंचलां असालच. तिकडील सर्व हकीकत कळवावी. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

पत्र ६९ वें

Platoon No. 3, University Co., Indian Defence Force,
Poona, 21-12-1917

My dear Nana,

Your letter this morning delighted me very much. I do not know whether we shall have any holidays during Christmas. If so I shall try to go to Baroda. I do not know the place of your residence at Jaleshwar. My last letter was full and I asked you in it if I may buy a second-hand bicycle, for Rs. 50 or so. We now go to the parade with our rifles. They have now given us uniforms; but they are so shabby that we wish to refuse them. Even the native soldiers use better shirts than these. I am passing a very good time here I try to study for at least two hours daily. Once a week I go to my Residency and pass some happy hours with my friends. I have one or two very dear friends, who do every thing for me. I wish to take my friend Mr. Tambekar* to Baroda

* श्री. ना. म. तांबेकर, हे सध्यां सोलापुरीं वकील आहेत.

after the examination. I had been to his place at Sholapur during the last vacation and cannot forget the kind treatment I received from him then. Anna has sent me from Bilimora some chocolates again. I must stop now as it is time for me to go to my tent.

I am yours affectionately
Shyamakant.

पत्र ७० वें

Platoon No. 3, U. C., I. D. F.,
Poona, 7-1-1918

My dear Nana,

I must give you some details of our Camp-life. We have to be ready for the parade every morning at a quarter to seven. We have to get up before then, finish the morning duties and take tea which is ready at quarter past six. I take chocolate or some eatables besides an egg. We have to fall in for the parade exactly at seven o'clock. First we are inspected in the ranks. All the leather articles provided for us must be well polished daily, the brass things well cleaned with metal polish. Then generally Capt. Steele takes the drill till a half past nine, when we are dismissed. At 11 A.M. the dinner is ready. We have refused the government rations that were supplied to us, owing to their bad quality, so that our allowance together with the money grant from the University is spent to pay the charges of our food. After the meal, it gets so hot in the tents, that we generally go to the Empress Gardens on bike and pass two or three hours in reading. At a quarter to four we have to get ready and fall in again at four. Till six o'clock we have to do rifle exercises. From this week they have made batches

of twenty men each for an extra drill of two hours. Here we are taught aiming and loading. To-day it is the turn of my batch to go for this extra training. At about 8 P.M. we take our second meal. The roll-call takes place at 9–30 and at 10 the lights are put out and we have to take to our beds. Prof. Sisson from the Govt. Elphinstone College and Prof. Turnbull from the Deccan College are our Officers. Capt. Steele stands above them both, being the Captain of 114 Madras to which we are attached. Prof. Turnbull once read to us some rules for our life in camp. A breach of these rules leads directly to court-martial and punishment. Some of us have been punished for disobedience, which is supposed to be a serious offence. A complaint was made by some students to Mr. Setalwad, the Vice-Chancellor, about our dresses being shabby and he came to visit our camp. We arranged a grand feast for him and invited Capt. Steele and Profs. Turnbull and Sisson, Paranjpe and Limaye. Steele, Setalwad and Paranjpe gave addresses to the student sepoys, as they called us.

Our Camp is guarded for all 24 hours, by 13 men selected every day for this purpose. They have a tent assigned to them, where their food is sent. I had to be on this guard duty twice up to now, and shall have one more turn of the same. The guards have to walk with rifles on their shoulders. There is also a fatigue duty for which students are selected at any spare time and asked to do any piece of work. We shall be discharged on the 27th inst. on the present occasion. It is said we shall have to practise rifle exercises even after our discharge some four hours a week, and shall be taken to a distant place in northern India in the charge of military officers for six months or so, after the war is over. There is a Y. M. C. A. recreation tent, which supplies a good amusement for us.

Tennis Tournaments

The tennis tournaments of our College have begun from to-day. I generally go to the College for practising tennis. My friend Tambekar is my partner in tennis and is expected to be a champion. You already know that I could not appear for my terminal examination on account of our military training and have consequently to lose my scholarship. Perhaps the College authorities will continue it.

I am your loving
Shyamakant.

पत्र ७१ वें

Fergusson College,
Poona, 20-2-1918

My dear Nana,

Our tennis tournaments are over. Tambekar and I were beaten by those whom we used to beat hollow in our daily practice. We both got so nervous at the multitude of people shouting around us, that we could not play our usual game. Tambekar, however, has come out the junior champion and Madhav Kirloskar* the senior one.

I received a letter from Anna asking me to go to Bombay for Shrikant's marriage, but I don't think I can afford to spend away my precious time. I am at present feeling a bit depressed owing possibly to my unexpected failure at the tennis tournament and my falling out with some of my

---

* सोलापूरचे डॉ. वा. का. किर्लोस्करांचे तिसरे चिरंजीव. हे श्यामकान्ताचे वेळीं फर्ग्युसन कॉलेजमध्यें शिकत होते. ते पुढें अभ्यासासाठीं अमेरिकेंत गेले असतां तिकडेच निवर्तले ! ! !

associates. I am eagerly longing for the vacation to commence, when I can go to you and see you all.

Yours affectionately,
Shyamakant.

पत्र ७२ वें

Calcutta,
4th *July* 1921

My dear Nana,

I got your letter yesterday and was comforted to learn that you won't be starting soon. My interview with Sir P. C. Ray has been disappointing. On the very day I came here, Jadubabu (now Sir J. N. Sarkar) took me to him at the Science College. Jadubabu took it for granted that I had made up my mind to join the Science College, and in the course of the very brief talk that he had with Dr. Ray, he urged him to try to get me admitted into the College for post-graduate studies. Dr. Ray said that he had no powers in the matter and that everything rested with Sir Ashutosh Mukarji. I myself got a little opportunity to talk. Jadubabu then deciding to take me to Sir Ashutosh took Dr. Ray's leave. While leaving I told both Jadubabu and Dr. Ray that I wanted to have a long and straight-forward talk with the latter and accordingly made an appointment with him this morning. I afterwards explained to Jadubabu that I no more wanted to go in for M. Sc. and that I wanted some technical training. This morning, therefore, Jadubabu again took me to Dr. Ray. He was very busy and had so many interviewers waiting for him, that we could see him with difficulty. This time I talked with him frankly and asked him what his research students do after finishing their course.

He said generally they work as lecturers in the College here. I said that was not my aim. He said the Science College cannot provide for any industrial training. He asked me to go to America or Japan for technical training, but urged that if I wanted to shorten my stay and hence my expenditure in America or Europe, it is better I study up to M. Sc. here. We then asked him whether he could engage me as an unpaid apprentice in the Bengal Chemical Pharmacy. This also, he said, was not possible. Jadubabu seemed to be rather displeased with him when he said that he should consult the Manager of the Pharmacy at once. So we came to no conclusion and I had scarcely talked for five minutes, when we had to take our leave as he had many visitors waiting for him. If at all I want to join the Science College for research work or for M. Sc., I shall have to apply by the end of this month, when the results of B. A. and B. Sc. examinations would be out. So before I decide anything, I have plenty of time before me and I will spend this time at Bolepur. Gurudeo is to return to Bolepur by the end of this month.

Sir P. C. Ray is a weak old man. I had quite a different idea about him. He hasn't got any separate laboratory of his own or any concern of his own. He is a saintly, unmarried man and lives in the Science College. He has no separate house even. He is living an extra-ordinary simple life. However, owing to want of time or otherwise, he could not properly guide me. I think the next thing Jadubabu is going to try is to see the Manager of the Bengal Chemical Pharmacy and to ask him whether he would accept me as an apprentice. But as Sir Ray suggested that is nearly hopeless. Jadubabu also is going to write to you to-day. He will be going back to Cuttack now. I am thinking of leaving for Bolepur to-day or to-morrow. So you can write to me there

and redirect my letters also to that place. Let me know your view as regards my future. I don't think it is possible for me to continue here. Gurudeo is to come to Bombay by about the 20th of July. He won't stay long at Bombay. That is what we learn from his letter to Mr. Andrews.

I had a good chat this morning with our teacher Prabhat-Babu. He is a scholar particularly of history and economics and is a well read man. He advised me to go to some foreign country at once if possible. Every one has his own views.

I will write to you more when I hear from you. I am doing quite well.

Yours affectionately,
Shyamakant.

पत्र ७३ वें

Shantiniketan,
7th *July* 1921

My dear Nana,

As I have informed you in my last, I haven't come to any decision after my interview with Dr. Ray. If at all I have to stay at Calcutta and study something, that will be the M. Sc. course. Generally they don't admit research students who are not M. Sc.s. There is even difficulty in getting admitted to the M. Sc. class, for there are only a limited number of seats in the laboratory. However, if I try, I can secure a seat I suppose. I am depending upon your advice. You must have heard from Jadubabu by this time. What are his views? Let me have your detailed letter. In the meantime I am discussing these points with my teacher here. Mr. Andrews says that I should wait till Gurudeo comes.

Gurudeo will guide me. He has his son with him, Mr. Rathindranath Tagore, B.Sc., who has travelled with him all over Europe and America. The Ashram is now completely changed. They have now severed their connection with the Matriculation examination altogether, and they are having their own courses. The University or the विश्वभारती, as they call it, is doing its work. The library is a very magnificent collection of books from all civilized languages, Indian and foreign. Here are books nearly in all subjects. Over 300 books have been received from France and many more from America. I never remember to have seen such a unique collection of books. I am sure if I were to stay here for any length of time I would not be tired. The climate is pleasant; even in these days it is pretty cold at night; there is a beautiful though rough tennis court here; but I am afraid there won't be sufficient players. The house in which I was staying at Calcutta was so dirty and the manners and ways of the Bengalees particularly in a crowded city like Calcutta were so disgusting that I wonder how these people live. I was, therefore, in a hurry to leave Calcutta for Bolepur. I am expecting to hear from you at Bolepur.

Yours obediently,
Shyamakant.

श्री

पत्र ७४ वें

शान्तिनिकेतन,
ता. १९ जुलै १९२१

ती. नानांस शि. सा. नमस्कार. वि. वि. तुमचें पत्र परवां पोहोंचलें. मीं माझ्या मागच्या काडांत गुरुदेव आल्याचें लिहिलें आहे. गुरुदेवांनीं या खेपेस सर्व यूरोप व अमेरिकेंत सफर केली व त्यांना बराच अनुभव आला

आहे. मला ते कांहीं सूचना देऊं शकतील म्हणून मी आज त्यांना भेटावयास गेलों होतों. माझी हकीकत ऐकल्याबरोबर त्यांनीं मला विचारलें, ' Industrial शिक्षण घेण्याकरितां तुझी फ्रान्सला जाण्याची तयारी आहे काय ? ' मीं म्हटलें, ' एका पायावर तयार आहें व माझी Industry शिकण्याची फार इच्छा असून मी परदेशास जाण्याकरतां बडोद्याच्या महाराजांकडून पैसे मिळविण्याची खटपट करीत आहें, ' वगैरे त्यांस सांगितलें. त्याबरोबर ते म्हणाले, ' महाराजासारख्यांकडे जाण्याची मुळींच जरूर नाहीं. फ्रान्समधील कित्येक व्यापारी लोकांना हिंदुस्थानांतील कांहीं होतकरू तरुण केमिस्ट शिकून तयार करावयाचे आहेत. माझ्याच सांगण्यावरून व आग्रहावरून त्यांनीं हा बेत ठरवला व सध्यां एक विद्यार्थी पाठवून देण्यास त्यांनीं मलाच सांगितलें आहे. शिक्षण संपल्यावर हिंदुस्थानांत येऊन कांहीं तरी कारखान्याचें काम केलें पाहिजे अशी अट आहे. इंग्लंडमध्यें सध्यां अर्थ नाहीं. फ्रान्सच सर्वांत उत्तम. शिवाय फ्रान्समधील शिक्षण अपुरें वाटल्यास ते व्यापारी लोक जर्मनी किंवा इतर ठिकाणीं तुला पाठवतील. तुझी तयारी असल्यास तूं मला माझ्या नांवचा एक अर्ज लिहून आणून दे. मी रेकमेंडेशन देतों म्हणजे ते तुला स्कॉलरशिप देतील !' हे शब्द ऐकतांच मला स्वर्गांतून फुलें पडल्यासारखें वाटलें. उद्यां मी अर्ज करणार आहें. गुरुदेव म्हणाले कीं, ' अर्जाचें उत्तर येईपर्यंत तूं येथेंच राहून उद्यांपासून जारीनें फ्रेंच शिकावयास लाग. तुमच्यासारख्यांना पाठ करायला वेळ लागणार नाहीं. क्रियापदें वगैरे सर्व पाठ करून टाक.'

मीं उद्यां अर्ज करून त्यांना देतों. तुम्हांला याविषयीं काय वाटतें तें ताबडतोब कळवावें. गुरुदेवांच्या इच्छेप्रमाणें मी सध्यां येथेंच राहवें असें मला वाटतें. गाण्याचा अभ्यासही चालविला आहे. उत्तर ताबडतोब यावें. घाईनें व हलगर्जीपणानें लिहल्याबद्दल क्षमा असावी. कळावें, हे वि.

श्यामकान्त.

पॅरिसची स्कॉलरशिप

श्री

पत्र ७५ वें

शान्तिनिकेतन, बोलपूर,
ता. १३-८-२१

ती. नानांस शिर साष्टांग नमस्कार. वि. वि. बरेच दिवसांत तुमचे-कडून मोठें पत्र आलें नाहीं. महाराजांकडून इतक्यांत तुम्हांला पत्र आलेंच असेल व तुमच्या जाण्याविषयीं कांहीं तरी नक्की झालें असेलच. सर्व हकीकत कळल्यास फार आनंद होईल.

सध्यां गुरुदेव त्यांच्या व्याख्यानाच्या गडबडींत आहेत. परवांच्या दिवशीं कलकत्त्यास त्यांचें व्याख्यान होणार आहे. आज संध्याकाळीं ते आम्हांला त्यांचें लिहून ठेवलेलें व्याख्यान वाचून दाखविणार आहेत. तुम्हांला वर्तमानपत्रांतून तें वाचायला मिळेलच. अलीकडे फ्रान्समध्यें जाण्यासंबंधानें मला गुरुदेवांकडे पुष्कळदां जावें लागलें व त्यामुळें मला एक नवीन गोष्ट आढळून आली ती ही, तें अतिशय भोळ्या स्वभावाचे आहेत. शिवाय त्यांचे बेत सारखे बदलत असतात. त्यांचे नुसते विचार व Ideals तेवढीं ऐकून घ्यावीं. तीं फारच उच्च दर्जाचीं असतात. पण practical असें त्यांच्या हातून फारच थोडें होईल. त्यांची घरची जमीनदारी नसती व स्वतःचें पोट जर त्यांना स्वतःला भरावें लागलें असतें, तर ते जगलेच नसते असें वाटतें. असो. आज त्यांच्याशीं माझें जें संभाषण झालें तें थोडक्यांत सांगतों. सप्टेंबर किंवा ऑक्टोबर महिन्यांत Paris Universityची Term सुरू होते, असा माझा समज असल्यामुळें पॅरिसहून माझ्या अर्जाचा निकाल येईपर्यंत Passports व Passageची व्यवस्था झाली पाहिजे असें मला वाटूं लागलें व म्हणून मी यासंबंधीं त्यांचा सल्ला विचारला. ते म्हणाले, ' त्यांचा निकाल येण्यापूर्वींच तुला फ्रान्सला जाण्यास कोणची हरकत आहे ? ' मी म्हणालों, ' स्कॉलरशिप मिळाली हें कळल्याशिवाय कसें जातां येईल? शिवाय स्कॉलरशिपमध्यें माझ्या जाण्याचा व कपड्यांचा खर्च येतो कीं नाहीं? स्कॉलरशिप मिळेल हें तरी नक्की आहे का ? ' ते म्हणाले, ' मला यासंबंधीं कांहींच माहिती नाहीं. मला पॅरिसमध्यें चहाला बोलाविलें होतें, त्या वेळीं ' राणा ' म्हणून एका

काठियावाडी व्यापाऱ्यानें 'मी अशी अशी स्कॉलरशिप देणार आहें' असें जाहीर केलें. त्यावर त्यांचें व माझें त्याविषयीं फारसें बोलणें झालें नाहीं. To be businesslike त्यांचें उत्तर येईपर्यंत स्कॉलरशिप मिळाली असें धरून चालतां येत नाहीं. कदाचित् ते नाहींही म्हणतील. पण ते बहुतेक नाहीं म्हणणार नाहींत असें मला नक्की वाटतें. कांहीं झालें तरी Passport मिळविण्याची खटपट तुला आतांपासून केली पाहिजे, म्हणजे त्यांचें पत्र आल्याबरोबर निघतां येईल. निघण्यास उशीर होऊन सप्टेंबरची टर्म नाहीं मिळाली, तरी पुढच्या टर्मपर्यंत पॅरिसमध्यें राहून भाषा चांगली शिकतां येईल.'

या सर्व संवादाचा सारांश इतकाच कीं, स्कॉलरशिप नक्की मिळेल असें धरून उपयोग नाहीं. कदाचित् स्कॉलरशिप मिळाली तरी ती तेथें गेल्यानंतर शिकण्याच्या व राहण्याच्या खर्चापुरतीच मिळेल. जाण्याचा खर्च आपल्यालाच करावा लागेल. पासपोर्टची व्यवस्था आतांपासून केली पाहिजे. तेव्हां पासपोर्ट मिळवायला काय काय करावें लागतें याची मला कांहींच माहिती नाहीं. तेव्हां काय काय केलें पाहिजे तें कळवावें म्हणजे त्याप्रमाणें मी करीन.

सध्यां सर्व कांहीं डळमळीत आहे. आज जास्त कांहीं कळविण्याजोगें नाहीं. माझी तब्येत उत्तम आहे. मी हल्लीं नियमित व्यायाम करतों व संध्याकाळीं टेनिस खेळतों. वीरेश्वरबाबूंकडे रोज मधल्या वेळच्या खाण्याला जावें लागतें. ते फार आग्रह करतात. रोज मधल्या वेळीं रसगुल्ले देतात. त्यांचे उपकार कसे फेडावे हेंच कळत नाहीं. टेनिसचा सर्व खर्च तेच करतात. शिवाय ते विशेष श्रीमंत आहेत असेंही नाहीं. त्यांना येथें फक्त तीस चाळीस रुपये महिना मिळतात.

काल दुपारीं भीमरावांच्या येथें पिठलेंभात खाल्ला. काल रात्रीं येथें एक सभा झाली, तींत गाणें वगैरे बरेंच झालें. आम्हीं सर्वांनीं तर म्हटलेंच, पण भीमराव व गुरुदेव यांनीं वेगळें म्हटलें. त्यामुळें फार आनंद वाटला. सविस्तर पत्र यावें. कळावें, ही विज्ञापना.

श्यामकान्त.

पत्र ७६ वें

Shantiniketan,
13-9-1921

My dear Nana,

I was expecting a letter from you these two days. I suppose you must have duly received my previous detailed letters. I am specially writing this letter to-day in order to communicate one or two events that are taking place here at present.

Firstly one of our past students *viz.*, Arabinda Bose who had been to England and Germany during the last 7 years, has come here temporarily and will be soon going back to Germany within about a couple of months I suppose. In Germany he was a student of Physics in one of the Universities there and, as I learn, has made a close study of the theory of relativity. We had arranged his lecture here the other day. He told us about all his experiences in Germany. He was there during war and had to suffer just like the Germans and knows many details about the war. One thing that he told us—though it would seen ridiculous to you,—was that one can at present live in Germany quite comfortably with 40 to 60 Rs. a month. If one stays in Berlin the expenses would be a bit higher—nearly 70 Rs. per month, and with 100 Rs. per month even in Berlin one can at present live *like a prince.* This is his experience, and he never lived after the fashion of Gandhi and was moreover a University student. This fact has been corroborated by Gurudeo and his son Rathibabu who lived in Berlin spending on himself only 75 Rs. per month,-and you must remember that Gurudeo and his family are known for their luxurious habits. The reason for this is the vast change in the exchange value of the mark. Formerly or normally the value of a mark was 12 as, while

at present it is 3 *pice ! !* According to Arabindababu, one Rupee at present fetches 20 marks in Germany, while formerly it fetched only $1\frac{1}{3}$ marks *i. e.*, the value of the Rupee has relatively increased nearly 15 times. You can, therefore, imagine what an enormous sum Rs. 75 means *viz.*, 75 × 15, when seen in this light. If one takes a few thousand Rupees with him and deposits them in some German bank, one will be enormously profited when the exchange value rises. Gurudeo has deposited his money in some German bank. The other day Gurudeo advised me to go to Germany with Arabinda Babu, if at all I fail to get the French Scholarship. Then again Gurudeo's recommendation is a very very precious thing. That will, perhaps help me as nothing else can.

Secondly my friend and class-fellow Mr. Surhit Kumar Mukerji has obtained 4000 Rs. from a rich Zamindar and is shortly leaving for Germany with Gurudeo's recommendation. According to his calculation which is endorsed by Gurudeo, Rathibabu, Arabindababu and others,—this much money will suffice him for three years. I, therefore, think that if this is the fact, why should I not start for Germany—which is a fit place for students of chemistry—along with my friend Mukerji, entirely with our own money ? I think you can easily spare Rs. 100 p.m. for me which is really more than ample or if you can spare a lump sum of Rs. 5000 or 6000 at once it will enable me to live in Germany *most comfortably* for 5 years. Mukerji is starting soon and Arabindababu who has decided to settle permanently in Germany, will also be leaving soon. So I think I should decide on this matter quickly and join them if possible. Of course if I obtained the scholarship from France, so much the better. But it is better not to take obligations from others when the living in Germany is so inconceivably cheap. Please think over the matter and reply

sharp. I have to talk so many things to you that I am now quite impatient to see you. I am simply waiting for the letter from Paris. Otherwise I should have run back immediately and met you.

Yours affectionately,
Shyamakant.

श्री

पत्र ७७ वें

शान्तिनिकेतन,
ता. १६-९-१९२१

ती. नानांस शि. सा. नमस्कार. वि. वि. माझें कालचें पत्र तुम्हांला मिळालेंच असेल. त्यावरून मला फ्रान्सहून स्कॉलरशिप मिळावयाची होती ती मिळाली व आतां पासपोर्ट व पॅसेज घेण्याचाच अवकाश आहे. म्हणजे मला लवकरच निघतां येईल. पण कालच्या पत्रांत तुम्हांला लिहिल्याप्रमाणें ही स्कॉरलशिप घ्यावी कीं नाहीं याविषयीं मीं अद्याप नक्की कांहींच ठरविल नाहीं. काल संध्याकाळीं मी गुरुदेवांना भेटलों व माझे सर्व विचार त्यांना कळविले. ते म्हणाले कीं, "जर्मनीला जाण्याचा तुझा विचार मला अगदीं पसंत आहे. जर्मनीला स्वतःच्या पैशानें तुला जातां येणार नाहीं, महिना साठसत्तर रु. सुद्धां तुला खर्च करतां येणार नाहींत, अशी माझी समजूत असल्यामुळें मी तुला ही स्कॉलरशिप घेऊन फ्रान्सला जाण्यास सांगत होतों. हल्लीं माकची किंमत उतरल्यामुळें महिना साठसत्तर रुपयांत किंवा फार तर शंभर रु.त तुझें जर्मनींत सहज चालेल. आतांच्या आतां दोनतीन हजार रुपयांचे मार्क येथल्या येथें विकत घ्यावेत म्हणजे जायला जरा उशीर झाला व मार्कांच्या भावांत फरक झाला तरी तुझें नुकसान होणार नाहीं. जर्मनीमध्यें माझ्या पुष्कळ ओळखी आहेत व तुझी मी तेथें सहज व्यवस्था करीन. एवढेंच नव्हे तर तेथें एक दोन कारखान्यांत सुद्धां–जेथें कधीं परकी लोकांना घेत नाहींत–माझ्या ओळखी आहेत व माझ्या विद्यार्थ्यांना तेथें घेण्याचें त्यांनीं कबूल केलें आहे. तुला ही स्कॉलरशिप नको असेल तर मला सांग, म्हणजे मी ती दुसऱ्या

एखाद्या विद्यार्थ्याला देऊं शकेन! मला हा बेत बरा वाटतो." मीं त्यांना सांगितलें कीं, मी लवकरच घरीं जातों व वडिलांच्या विचारानें ही स्कॉलरशिप घेणार कीं नाहीं तें तेथें गेल्याबरोबर कळवतों. तेव्हां आतां माझ्यापुढें हे दोन बेत आहेत. स्कॉलरशिप घेतली तर पैसे परत देण्याची जबाबदारी आपल्यावर राहते, व जर्मनीपेक्षां फ्रान्समधें सध्यां खर्च किती तरी जास्ती आहे.

तेव्हां मी पांच सहा दिवसांत तेथून निघतों व कलकत्त्यास जातों. तेथें एक दोन दिवस राहून मार्कांच्या भावासंबंधीं इतर माहिती मिळवून नंतर कालीमाटीचा* कारखाना, बांकीपूर वगैरे ठिकाणीं जाऊन दहा बारा दिवसांच्या आंतच मुंबईस व बडोद्यास येतों. कालच अन्ड्र्यूजसाहेबांकडून एक सर्टिफिकेट लिहून घेतलें आहे. ते लवकरच येथून निघून जातील. गुरुदेवांकडून सर्टिफिकेट, पत्रें वगैरे घेतों व माझे येथील दोन तीन मित्र लवकरच जर्मनीस जाण्यास निघत आहेत, त्यांच्याशीं कधीं निघायचें वगैरे सर्व कांहीं ठरवून मी येथून निघतों. मी कालच्या पत्रांत तुम्हांला तार करायला सांगितली होती; पण तसें करण्याची आतां जरूर नाहीं. मी बडोद्यास पोंचल्याबरोबर स्कॉलरशिपविषयीं गुरुदेवांना कळवलें पाहिजे. बरेच दिवसांपासून गुरुदेव मला जेवतांना कांटाचमचा वापरायला सांगत आहेत. त्यांनीं कालही तेंच सांगितलें आणि म्हणाले, " कांट्याचमच्याची संवय नसली तर तूं उपाशीं मरशील. तुला वाटतें तितकें तें सोपें नाहीं. " यापूर्वीं मीं दोनतीन पत्रें तुम्हांला लिहिलीं होतीं, त्यांचीं उत्तरें काल आज इतक्यांत येतील म्हणून वाट पाहत होतों. अद्याप तुमचें पत्र नाहीं. तुम्ही लांब असल्यामुळें तुमचें मत लवकर कळत नाहीं. माझें वजन १२१ पौंड आहे. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

---

* हल्लींचें टाटानगर येथील टाटा आयर्न अँड स्टील वर्क्स हा कारखाना.

पत्र ७८ वें

Bombay,
7th *Oct.* 1921

My dear Nana,

You must have received two letters from me by now. As I informed you, we have cabled 3000 Rs., and will get the reply soon. My friend Mukerji says everything about him is uncertain, since he hasn't yet secured the other half of the passage money. He thanks me for giving up the French scholarship which will now be given to one Mr. Bhattacharya, my friend, who would otherwise have been unable to go abroad. As regards my friend Jyotish Chandra Roy, he says he has also secured half the fare from the funds of the Society and must, therefore, leave by the B. I. S. N. Co. He intends starting soon; but I haven't yet heard anything from him and am expecting a reply from him every day. If I find that these people are starting independently, I must give up the idea of accompanying them and must go singly. Then I needn't hurry so much. Let us wait for some days until I get letters of introduction from Dr. Tagore.

Both Shankarrao Talwalkar and G. R. Paranjpe* advise me to take up the University course, secure the doctorate and then spend some years as apprentice somewhere. This means five years or a little more. They say unless one learns the art perfectly, one fails on one's return in achieving one's object. I saw Mr. Bhagwat to-day, the oil expert of the Tata Company and got some introductions from him.

Bhau examined my wound to-day, and says it is a fistula and requires an operation. This will confine me to bed for

* हल्लीं मुंबईस रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समधील प्रोफेसर.

about a fort-night. I think after coming back from Poona, I should get the operation done. I intend to start for Poona to-night and come back after 3 or 4 days. My main business is to see Mr. Paranjpe and to get his certificate or letters of introduction.

Yours affectionately
Shyamakant.

पत्र ७९ वें

Bombay,
17-10-1921

My dear Nana,

I got myself examined by Dr. Bhajekar this morning. He said that an operation was absolutely necessary. We have decided to have the operation performed on the day after to-morrow in Dr. Bhajekar's hospital. It seems that it will be nearly three weeks before I recover. I am afraid I won't be able to accompany my friend Jyotish Roy who is going to sail during the first week of November. To-day, I will go with Bhau and order my suits, which will be ready by the time I recover. You may send Mai here if you wish. Prof. G. C. Bhate came and exacted funds from Bhau (200 Rs.) for the D. E. Society.

Yours affectionately,
Shyamakant.

पत्र ८० वें

Bombay,
6-11-21

My dear Nana,

Your post-card of yesterday to hand. Karve*and myself had been to Thos. Cook, this afternoon and have applied for a passage on the Macedonia of the P. & O. which leaves Bombay on the 3rd December. But as we are told by many including Mr. Bennet that the P. & O. is never quite comfortable, I myself am thinking of going by the French liner possibly by third class, which I am assured is better than the 2nd of P. & O. The French liner is even better than the Orient. Both leave from Colombo on the 26th November. If we can't go by the French liner, we will go by the Orient or by P. & O.

[Upon this Shyamakant went to Baroda, stayed there just a few days and left back on 24th November for a voyage to Europe via Colombo.]

पत्र ८१ वें

Bombay,
27-11-1921

My dear Nana,

I am leaving for Colombo as already settled this afternoon. I have bought all the necessary things during the last two days, including an over-coat, suits, warm under-wears etc. I have spent till now, about 980 Rs. for clothing and passage. You had given me 1700 Rs, in all to spend, so I have with

* डॉ. दिनकर धोंडो कर्वे, हल्लीं फर्ग्युसन कॉलेजांतील एक प्रोफेसर.

me about 720 Rs. just now. I will get it converted into English money at Colombo.

I am very busy just now, so are you perhaps. I will write from Bangalore.

Yours affectionately,
Shyamakant.

खंड तिसरा

यूरोपचें प्रयाण

सन १९२१

श्री

पत्र ८२ वें

कोलंबो,

ता. ३ डिसेंबर, १९२१

चि. श्रीनिवास,* श्रीधर, बापू, विभु वगैरेंस आशीर्वाद. मी आज सकाळीं येथें सुखरूप येऊन पोंचलों. मद्रासला एक दिवस होतों. मद्रास-सारखें गचाळ शहर नाहीं, अशी माझी कल्पना झाली आहे. मद्रासहून निघालों तो काल संध्याकाळीं सहा वाजतां समुद्रकिनाऱ्यावर आलों. रस्त्यांत रामेश्वर लागलें होतें. तेव्हां रामेश्वराची यात्रा घडली म्हणायला हरकत नाहीं. पुढें दोन तास सीलोनपर्यंत बोटीनें प्रवास करावा लागला. मला बोट लागली नाहीं, पण जरा कसेंसेंच वाटलें. माझा मित्र ज्योतिश्चंद्र राय याला बोट फार लागली. येथें प्रो. कर्व्यांचे मित्र डी. सिल्व्हा म्हणून एक ख्रिश्चन गृहस्थ आहेत, त्यांच्या घरीं आम्ही उतरलों आहों. त्यांचें घर म्हणजे एक मोठा थोरला राजवाडाच आहे. त्यांत जिकडे तिकडे श्रीमंती थाट असून सर्व फर्निचर, पाहुण्यांच्या खोल्या वगैरे युरोपियन पद्धतीनें ठेवलेल्या आहेत. राहण्याची व जेवणाखाणाची पद्धतही युरोपियन आहे. आमचे होस्ट येथें कोण आहेत याचा अद्याप आम्हांला पत्ता लागला नाहीं. आज संध्याकाळीं व उद्यां ते आम्हांला मोटारींतून फिरायला घेऊन जाणार आहेत. येथील देखावा फारच रमणीय आहे. जिकडे तिकडे हिरवेंगार असून ओढे वगैरेही मजेदार आहेत. हवा मात्र अगदीं मुंबईसारखी आहे. थंडी मुळींच नाहीं. एकंदरींत आमचा आतांपर्यंतचा प्रवास मजेदार झाला. उद्यां सकाळीं आमची आगबोट येईल व उद्यां रात्रीं आम्ही येथून निघूं. मला आणखी बरीचशी हकीकत लिहावयाची होती, पण पुष्कळशीं पत्रें लिहीत असल्यामुळें व इतर कामामुळें वेळ नाहीं. आज आम्हीं आमचे पैसे बदलून त्याचे पौंड करून घेतले. शिवाय थोडेसें सिलोनचें नाणेंही घेतलें. माझी तब्येत उत्तम आहे.

---

*श्रीनिवास गणेश सरदेसाई. श्रीधर आठल्ये हा जयरामचा धाकटा भाऊ. बापू म्हणजे श्यामकान्ताचा आतेभाऊ. विभूतिभूषण वाजपेयी हा प्रयागचे श्रीराम वाजपेयी यांचा मुलगा. तो कांहीं वर्षें बडोद्यास होता.

बोट लागली नाहीं तर प्रवास फार मजेदार होईल असें वाटतें. नानांना व माईंना नमस्कार कळवावे. प्रो. आण्णा कर्वे तेथें येऊन गेलेच असतील. कळावें, हे आशीर्वाद.

श्यामकान्त.

तार–

Colombo Date 5-12-1921—8-15 a.m.
Sardesai Recd. 11-30
Khangi, Baroda

Sailing abroad, keeping excellent health 5-12-1921.

Shyamakant.

श्री

पत्र ८३ वें Orvieto,

ता. ६ डिसेंबर १९२१

ती. नानांस शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना विशेष.

आम्हीं ४ तारखेला दुपारीं चार वाजतां या बोटींत चढलों. बोटींत आमची मेडिकल एक्झामिनेशन झाली. मला माझें देवीचें सर्टिफिकेट व देवीचे वण दाखवावे लागले. कोलंबोहून निघतांना आमचे दोस्त डी. सिल्व्हा यांच्याजवळ मी टेलिग्राम देऊन ठेविला होता व ते तो तुम्हांला पाठवणार होते. मला वाटतें तुम्हांला तो वेळेवर मिळालाच असेल. आम्ही निघालों तो दिवस रविवार होता, म्हणून कदाचित् त्या दिवशीं तार केली नसेल. आमच्या जहाजांत ऑस्टेलियाहून आलेले बरेच तिसऱ्या वर्गाचे लोक आहेत, ते सर्व खलाशी किंवा इतर खालच्या दर्जाचे लोक असावेत. त्यांचा पोषाख व राहण्याची पद्धति अगदीं घाणेरडी असते, म्हणून आम्ही त्यांच्याशीं फारसे मिसळत नाहीं. आमच्या कल्पनेपेक्षां तिसरा क्लास बराच वाईट आहे.

गैरसोय होण्याचें विशेष कारण म्हणजे येथले लोक घाणेरडे आहेत एवढेंच. मी, कर्वे, ज्योतिषराय व B. K. Sarkar असे चवघे जण एका कॅबिनमध्यें आहोंत. कॅबिन अगदींच लहान असून आमचें चौघांचें सामान कसेंबसें त्यांत मावलें आहे. कॅबिनमध्यें निजण्याकरितां एकावर एक असे दोन बर्थस् आहेत; असे एकंदर चार बर्थस्. कॅबिनमध्यें वारा यायला बिलकूल जागा नाहीं व एंजिन-रूम जवळच असल्यामुळें कॅबिन इतकी तापलेली असते कीं, तेथें थोडा वेळ सुद्धां बसवत नाहीं. आम्ही अगदींच कामापुरते कॅबिनमध्यें जातों व सबंध दिवस डेकवर, डेकचेअरवर बसून किंवा फेऱ्या घालून काढतों. आम्हांला एकंदर दोन डेक्स् आहेत. एक वरच्या मजल्यावर आहे, तो रात्रीं १० च्या पुढें बायकांकरितां रिझर्व केलेला असतो. डेकवर वारा वगैरे फार मनोरम येतो व समुद्रही मोठा मजेदार दिसतो. आम्हांला रोज एखाद दुसरी बोट भेटते. हल्लीं समुद्र अगदीं शांत असल्यामुळें बोट बिलकूल हालत नाहीं. अद्यापपर्यंत आम्हांला कोणालाच बोट लागली नाहीं. आम्ही रात्रीं डेकवरच खुर्चीवर पांघरूण घेऊन निजतों. वारा फार मजेदार असल्यामुळें झोंप छान येते. साधारण पहांटे तीन वाजण्याच्या सुमारास थंडी वाजूं लागली म्हणजे आम्ही उठून कॅबिनमध्यें जाऊन निजतों. सकाळीं ६॥–७ च्या सुमारास उठतों. येथें आंघोळीची वगैरे व्यवस्था आहे. पण थोडीशी गैरसोय होते. उद्यांपासून मी रोज आंघोळ करणार आहें. खाण्याची सोय साधारण बरी आहे. सकाळीं ब्रेकफास्टला ब्रेड, बटर, जॅम, चहा, कॉफी, पॉरिज व मांसाचा कांहीं तरी पदार्थ इतकें असतें. दुपारीं सूप, मटन, व्हिजिटेबल बटाटे, कोबी वगैरे, कोल्डमीट व भात; व रात्रीं सपरला कोको, ब्रेड अगदीं थोडें असतें. बोटींत चढेपर्यंत आगगाडींत वगैरे आम्हांस जें खाणें मिळालें व विशेषतः कोलंबोला डी.सिल्व्हांच्या घरीं दोन दिवस जें जेवण मिळालें, त्या मानानें येथील जेवणाखाणाची व्यवस्था अगदींच गचाळ आहे. पण एकदोन दिवसांत आम्हांला संवय होईल. मला तर हळूहळू हें विलायती जेवण आवडूं लागलें आहे. मुंबईहून इंदूबाईंनीं व ताराबाईंनीं बरेंचसें फराळाचें सामान चिरोटे, बटाट्याचा चिवडा, साखरपाऱ्याच्या वड्या, अनसें वगैरे बरोबर दिलें आहे, त्याचा फार उपयोग झाला. मधून मधून आम्ही बरोबरचें फराळाचें

खातों. कर्वेनीं बरोबर लोणच्याच्या दोन बाटल्या घेतल्या होत्या, त्या फुटल्या व टाकून द्याव्या लागल्या.

माझी कल्पना होती कीं, आमची बोट एडनला थांबणार आहे, पण तसें नसून आम्ही एकदम पोर्टसेडला थांबूं. हें पत्र पोर्टसेडला पुरें करून तेथें टाकीन, म्हणजे आणखी सुमारें वीस दिवसांनीं तुम्हांला हें पत्र मिळेल.

ता. ८ डिसेंबर १९२१

आम्ही दीड हजार मैल साधारणपणें आलों आहोंत. गेले एकदोन दिवस खाण्याची गैरसोय भासूं लागली आहे. कोल्डमीट आणि चीज या दोन पदार्थांचें नांव काढलें कीं, डोकें भणभणायला लागतें. आज जरा बरेंही वाटत नाहीं. आज दुपारीं जेवतांना Rabbits व Pork होतें. आमच्यापुढें जें कांहीं आणून ठेवतील तें आम्ही मुकाट्यानें खातों. परवां रात्रीं आमच्या डेकवर पॅसेंजरचा नाच झाला. लवकरच स्पोर्टस् होणार आहेत. आमचा वेळ वाचण्यांत, गप्पांत व झोंपेंत जातो. बाकी आतां अगदीं कंटाळा येत चालला आहे. जणूं काय बरेच दिवस आम्ही या आगबोटींत आहों असें वाटूं लागलें आहे. आम्ही १४ तारखेच्या सुमारास पोर्टसेडला पोंचूं असा अंदाज आहे. ही स्टीमर नेपल्सला थांबणार आहे. पॅरिसला रामा म्हणून कर्वेंचा एक मद्रासी मित्र आहे, त्याला त्यांनीं आगाऊ लिहून ठेविलें आहे. त्यांच्याकडेच बहुतेक आम्ही पॅरिसला उतरूं. आम्हांला सध्यां हिंदुस्थानची कांहीं एक बातमी कळत नाहीं. कर्वेनीं केसरी व ज्ञानप्रकाश हीं दोन पत्रें यूरोपमध्यें मागविलीं आहेत, तीं आम्ही तेथें गेल्यावर मिळूं लागतील असें वाटतें.

९ डिसेंबर १९२१

आज दुपारीं आम्हांला सोकोत्रा बेट दिसलें. आमची बोट तासाला पंधरा मैल या वेगानें चालली आहे. आतांपर्यंत तीनचार बोटींना आम्ही मागें टाकलें. पोर्टसेडहून याच पत्राबरोबर एक चित्रांचें कार्ड पाठवीन, तें आमच्याच बोटीचें चित्र आहे. या चित्रांत डाव्या बाजूच्या टोंकाला वायरलेसच्या खांबापलीकडे जो भाग आहे तेथें आम्ही आहोंत. मध्यभागीं लांबलचक असलेला भाग, पहिल्या व दुसऱ्या वर्गांकरितां आहे. क्रिकेट खेळण्याची

सोय आमच्या बोटीवर आहे. प्रत्येक कॅबिनमध्यें काम पहावयास स्टुअर्ड असतो. त्याला सांगून बोटीवर असलेल्या लाँड्रीमध्यें आम्हीं परवां आमचे कपडे धुऊन आणले. कपडे उत्तम धुतले आहेत, पण पैसे मात्र फार घेतले. माझ्या नुसत्या एका सुती विजारीकरतां एक शिलिंग घेतला.

११ डिसेंबर १९२१

काल रात्रीं आम्ही एडनवरून पुढें लाल समुद्रांत आलों. अगोदर कळल्याप्रमाणें लाल समुद्र निदान आज तरी गरम वाटत नाहीं. कदाचित् हल्लीं हिवाळा आहे म्हणून तसें असेल. आणखी तीन दिवसांनीं आम्ही पोर्ट-सेडला पोंचूं. आज सकाळीं जेवायला Liver व Bacon होतें. मला मुळींच आवडलें नाहीं. दुपारीं Beef आहे. पाहूं या कसें काय लागतें तें. आमच्या बरोबरचें खाणें आतां अगदीं संपत आलें आहे. फार तर आणखी दोन दिवस पुरेल. जास्त आणलें असतें तर बरें झालें असतें असें आतां वाटूं लागलें आहे. बाकी, केव्हां तरी बरोबरचें संपावयाचेंच. ज्योतिषचंद्र रॉयनें बरोबर टागोरांचीं बरींच पुस्तकें आणलीं आहेत तीं मी येथें रोज वाचतों. मी मात्र बरोबर वाचायला कांहीं एक घेतलें नाहीं ही चूक झाली. मी मुंबईस वेगळें पत्र लिहीत नाहीं. तुम्हींच हें पत्र जरूर वाटल्यास मुंबईस भाऊंना पाठवून द्यावें.

आतां हळू हळू या आगबोटींत रोजचो संवय झाल्यामुळें फारसा त्रास वाटत नाहीं. सर्व कांहीं सुरळीत चाललें आहे असेंच वाटतें. एकंदरींत प्रवास मजेचा वाटला. बोटीवर यूरोपच्या वेगवेगळया ठिकाणीं जाणारे लोक भेटतात, व त्यांच्याशीं पुष्कळदां आमचें बोलणें होतें, त्यामुळें बरीच नवीन नवीन माहिती मिळते. असो. मी आजच हें पत्र पुरें करितों. पोर्टसेडला पोंचण्या-पूर्वीच बोटींतल्या टपालाच्या पेटींत टाकलें पाहिजे. याच्या पुढील हकीकत टुलॉनहून किंवा पॅरिसहून कळवीन. माझी तब्येत उत्तम आहे. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र ८४ वें Orvieto,

ता. १६ डिसेंबर, १९२१

ती. सौ. माईस शिरसाष्टांग नमस्कार, वि. वि. माझें गेल्या खेपेचें पत्र तुम्हांला याच्या आदल्या आठवड्यांत मिळालें असेल. आम्ही १४ तारखेला दुपारीं सुएजला आलों. तेथें किनाऱ्यावरून आमच्या बोटींत एक डॉक्टर येऊन त्यानें आमची तपासणी केली व संध्याकाळीं आम्ही कालव्यांत शिरलों. रात्रभर चांदणें चांगलें होतें व कालव्यांतून आगबोट फार सावकाश चालली होती, म्हणून देखावा रम्य दिसत होता. पण रात्रीं एक वाजतां धुकें अतिशय पडल्यामुळें बोट चालवतां येईना म्हणून सातआठ तास थांबावें लागलें. काल संध्याकाळीं सहा वाजतां पोर्टसेडला पोंचलों. पोर्टसेड म्हणजे भामट्या लोकांचा बाजार आहे. आम्ही तीनचार तास शहरांत भटकलों. तोंपर्यंत हजारों लोकांनीं आम्हांला सतावून सोडलें. शेवटीं बरेच दिवसांत चांगला चहा मिळाला नाहीं, म्हणून एका हॉटेलमध्यें चहा व ब्रेड घेतली. त्याचें बिल पाहतों तों प्रत्येकाला तीनतीन शिलिंग म्हणजे सव्वादोन रुपये. शेवटीं आम्हीं एक पोलीस बोलावून आणला, तेव्हां हिशेब बरोबर तुटला. नंतर लेसेप्स्–म्हणजे ज्या एंजिनियरनें सुएजचा कालवा तयार केला त्याचा पुतळा पाहयला गेलों. रात्रीं अकराला आम्हीं परत आमच्या आगबोटींत आलों व बारा वाजतां बोट पुढें भूमध्य सागरांत निघाली. आणखी तीन दिवसांनीं आम्ही इटालींत–नेपल्सला पोंचूं. तेथें हें पत्र पोष्टांत पडेल. आतां आम्हांला गैरसोय भासत नाहीं. खाण्याची वगैरे संवय झाली आहे. थंडी मात्र पडूं लागली आहे. गरम कपडे सबंध दिवस अंगांत ठेवावे लागतात. कॅबिनमध्येंसुद्धां रात्रीं थंडी वाजते. माझी तब्येत उत्तम आहे. आगबोट मुळींच हालत नाहीं, त्यामुळें समुद्राचा त्रास अद्यापपर्यंत झाला नाहीं. असो. आज जास्त कांहीं लिहावयाचें नाहीं. पुढचें पत्र टुलॉनहून पाठवीन. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र ८५ वें

On board R. M. S. Orvieto,
20th *December*, 1921

चि. श्रीनिवास यास अनेक आशीर्वाद. काल सकाळीं आम्ही नऊ वाजतां नेपल्सला पोंचलों. बोट आठ तास थांबावयाची होती, म्हणून आम्ही शहरांत भटकायला गेलों. रस्ते सर्व दगडांनीं बांधलेले असून गाड्यांना बहुतेक रबर टायर्स नव्हत्या. ट्रॅम्स् होत्या त्याही अगदीं गचाळ होत्या. आम्ही म्यूझियम पाहिला. तेथें पाँपे शहरांतून खणून सांपडलेले ख्रिस्ताच्याही पूर्वीचे दगडी पुतळे ठेवलेले होते. ते पुतळे फारच छान केलेले आहेत व अजून जवळ जवळ नव्यासारखेच दिसत आहेत. नंतर चित्रें-पेंटिंग्स्-पाहिलीं, तींही फार सुरेख होतीं. आम्ही पाँपेला जाण्याचा विचार करीत होतों. नेपल्सहून तें फक्त तेराच मैल आहे. पण पुष्कळ अडचणींमुळें आम्हांला पाँपेला जातां आलें नाहीं. नेपल्स शहर बरेंच मोठें असून समुद्राच्या कांठीं डोंगरावर उंच उंच बंगले जिकडे तिकडे पसरले आहेत. शहर मात्र बरेंच घाणेरडें दिसतें. कांहीं कांहीं ठिकाणीं आपल्या हिंदुस्थानच्या शहरांप्रमाणें रस्त्यांत घाणही दृष्टीस पडत होती. आम्ही युरोपमध्यें आहों असा आम्हांला भासच होईना. थंडी अगदीं बेताची-म्हणजे हल्लीं बडोद्यास सकाळीं असेल इतकीच-होती. लोकही कांहीं अगदीं गोरे नव्हते. अर्थात् हिंदुस्थानच्या गोऱ्या लोकांपेक्षां काळा कोणीही नव्हता; पण इतर युरोपियन लोकांपेक्षां इटालियन काळे खरे. दुपारीं एका हॉटेलमध्यें फराळ केला. त्यानें आमच्याकडून कांहींच्या कांहींच पैसे घेतले. असो. तेवढाच अनुभव आला. इटालियन नाणें लिरा हें हल्लीं फार स्वस्त असल्यामुळें जिनसा मात्र फार स्वस्त होत्या. चांगले चांगले उंची बूट साठ लिरा किंवा ऐंशीं लिरांना मिळत होते; आणि पौंडाला हल्लीं नव्वद लिरा मिळतात.

काल संध्याकाळीं पांच वाजतां आम्ही पुढें निघालों. आज जिकडे तिकडे मळभ आलेलें आहे. थंडीही बरीच आहे. उद्यां पहांटे आम्ही एकदांचे टुलॉनला पोंचूं. जणूं काय बरींच वर्षें आगबोटींत काढलीं असा भास होत आहे. बाकी अली-कडे मला आगबोटीचा कांहींच त्रास होत नव्हता. उलटी मजा वाटत होती.

बोट पहिल्यापासून अखेरपर्यंत कोठच हालली नाहीं. आम्ही आगबोटींत आहोंत असें कॅबिनमध्यें वाटत सुद्धां नाहीं. समुद्र म्हणजे एखाद्या तळ्याप्रमाणें शांत आहे. आगबोटीचा जर त्रास झाला असेल तर तो हिंदुस्थानांतून लंकेला येतांना. त्या वेळीं समुद्र फारच खवळलेला होता. मला फ्रुटसॉल्ट मात्र वरचेवर घ्यावें लागतें. असो. टुलॉनला पोंचल्यावर हें पत्र पुरें करीन व तेथें पोस्टांत टाकीन. तुम्हांला सध्यां बर्लिनमध्यें माझ्या बँकेच्या पत्यावर मला पत्र लिहायला हरकत नाहीं.

पॅरिस, ता. २२ डिसेंबर, १९२१

काल सकाळीं टुलॉनला पोंचलों व संध्याकाळीं निघून सकाळीं येथें आलों. येथें कव्यांचे मित्र मि. रामा व आमच्या कॉलेजचे प्रोफेसर व्ही. जी. परांजपे* आम्हांला घ्यायला स्टेशनवर आले होते, व त्यांच्याच येथें सध्यां आम्ही आहोंत. रा. कोर्डे यांचें पत्र व बाजपाईंचें एक पत्र आजच मिळालें आहे. दोनतीन दिवसांत बर्लिनला जाऊं. मागाहून जास्त लिहीन. कळावें, हे आ.

श्यामकान्त.

पत्र ८६ वें

C/o Mr. Rama,
Paris, 23-XII-21

ती. माईस दोन्ही कर जोडून त्रिकाल चरणीं मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना विशेष. कालच येथून तुम्हांला एक पत्र पाठवलें. घाईंत असल्यामुळें येथें आल्यावर फारसा मजकूर लिहितां आला नाहीं. व्ही. जी. परांजपे पुण्याला दोन वर्षें आम्हांला संस्कृत शिकवीत होते व पुढें तीन महिने आमच्या बरोबर I. D. F. मध्यें होते. परांजपे व रामा जवळजवळच राहतात.

---

* डॉ. वासुदेव गोपाळ परांजपे, सध्यां प्रोफेसर फर्ग्युसन कॉलेज. श्री. वामनराव कोर्डे हे श्यामकान्ताचे सहाध्यायी, राहणार बडोदें. श्रीराम बाजपेयी, (विभूचे वडील) सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटी, प्रयागशाखेचे एक सभासद, सेवासमिति बालचर मंडळाचे प्रमुख कार्यकर्ते.

रामा हे जातीचे मराठे व मॉरिशसचे राहणारे आहेत. ते कैक वर्षे येथें राहिल्यामुळें त्यांना आतां मराठी बोलतां येत नाहीं. येथें बरेच हिंदु लोक आहेत. बंगाली विद्यार्थी बरेच आहेत. काल आम्ही येथल्या बंगाली लोकांना भेटलों. मीं त्यांना बंगाली गाणीं म्हणून दाखविलीं. शिवाय प्रो. परांजपे हे रागदारी गाण्याचे भोक्ते असल्यामुळें मला बरींचशीं हिंदी पदेंही म्हणावीं लागलीं.

आज सकाळीं आम्ही जर्मन कॉन्सलकडून व्हिझा घेतला. पंचवीस फ्रँक द्यावे लागले. आज दुपारीं शहराचा नकाशा घेऊन आम्ही बरेच भटकलों. लुक्झें-बर्गच्या बागेंत गेलों होतों. सकाळीं भुयारांतून चालणाऱ्या विजेच्या गाड्यां-मधून फिरून आलों, तेव्हां फारच मजा वाटली. एकदम मोठें थोरलें फ्रेंच शहर पाहिल्यामुळें आमचे डोळे दिपल्यासारखे झाले.

बर्लिन, ता. २५-१२-१९२१

आज संध्याकाळीं साडेसहा वाजतां येथें येऊन पोंचलों. रा. कोरडे स्टेशन-वर आले होते. त्यांनीं एकदोन दिवस एका हॉटेलांत आमची राहायची सोय केली आहे. पण येथें खर्च फार येत असल्यामुळें उद्यां परवां दुसरीकडे सोय पाहिली पाहिजे. येथें थंडी फार आहे. आगगाडींतून येतांना बाहेर सारखा बर्फ पडत होता व बर्फामुळें जिकडेतिकडे पांढरें झालें होतें. स्टेशनवरून येथें येतांना सुद्धां भुरभुर बर्फ पडतच होता. बाकी माझ्याजवळ गरम कपडे बेताचे आहेत. आणखी थोडेसे घ्यावे लागतील. भाषा येत नसल्यामुळें आमची फारच फजीती होते. आगगाडींत लोक आमच्याशीं जर्मन भाषेंत बोलत. आमचें इंग्रजी त्यांना कळत नसे. शेवटीं खुणांनीं काम चालवावें लागे. आज हॉटेलमध्यें तसाच प्रकार झाला.

याच पत्रांतून मुलांकरितां पॅरिसचीं कांहीं चित्रें पाठवीत आहें. येथें एखादा आठवडा घालवल्यानंतर जास्त मजकूर लिहीन. आज पत्र पुरें करितों. माझी तब्येत उत्तम आहे. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

खंड चवथा

राहणी व मार्कांची घसरपट्टी

बर्लिन, सन १९२२

खर्चाचा अंदाज

श्री

पत्र ८७ वें बर्लिन,

ता. २८-१२-१९२१

ती. सौ. माईस शि. सा. न. वि. वि. यापूर्वीचें माझें पत्र इतक्यांत पोंचलेंच असेल. गेले दोन दिवस आम्ही राहायला जागा पाहत आहोंत; पण स्वस्त व सोइस्कर जागा कोठेंच मिळेना. विशेषतः नाताळ असल्यामुळें जिकडे तिकडे महागाई झालेली आहे. शिवाय येथें म्हणजे लंकेंतल्या सोन्याच्या विटांसारखाच बराचसा प्रकार आहे. हजामतीला दोन विटा द्याव्या लागतात. आम्हांला वाटलें होतें त्यापेक्षां येथें बराच जास्त खर्च लागतो. असो. कलकत्त्याच्या प्रो. आघारकरांकडून मीं येथील एका बाईला पत्र घेतलें होतें. तिच्याच घरीं आम्ही सध्यां आहोंत, व येथेंच पुढें राहण्याचा आम्हीं बेत केला आहे. आमच्या प्रत्येकाकडून ती दररोज ऐंशी मार्कस् घेते. यांत जेवणखाण चार वेळ, आंघोळ व कपडे धुणें व राहण्याचें भाडें इतकें येतें. म्हणजे महिना २४०० मार्क झाले. शिवाय आम्हांला आतां जर्मन शिकण्याकरितां मास्तर ठेवावा लागेल. त्याला तासाला पंधरा वीस मार्क तरी पडतील व पुढें आमचा विषय शिकूं लागलों म्हणजे ३००।४०० मार्क तरी दरमहा इतर खर्च होईल. म्हणजे सध्यां सरासरी ३००० मार्क दरमहा कमींत कमी लागतील. म्हणजे हल्लींच्या भावाप्रमाणें अदमासें चार पांच पौंड झाले. बँकमध्यें ठेवलेले माझे पैसे फारच कमी भावानें घेतलेले असल्यामुळें मी सध्यां त्या पैशाला हातच लावीत नाहीं. सध्यां माझ्याजवळ पसतीस पौंड शिल्लक आहेत, हे मला चारपांच महिने पुरतील. मग दरमहा थोडे पैसे घरून पाठवावे लागतील. कारण जोंपर्यंत मार्कांचा भाव स्वस्त आहे तोंपर्यंत बँकेंतल्या पैशांना हात लावणें चांगलें नाहीं. आजच आमच्या बँकेंत जाऊन आलों. माझे एकंदर एक लक्ष मार्क आहेत. त्यांपैकीं ७५००० मीं Fixed Deposit म्हणून सहा महिन्यांकरितां ठेवले आहेत. त्यांवर शेंकडा साडेतीन टक्के व्याज मिळेल व बाकीच्या पैशावर दीड टक्का व्याज मिळेल.

हें शहर केवढें तरी अवाढव्य आहे. वाहनें किती तरी आहेत. ट्रॅमस्,

आगगाड्या, भुयारांतल्या विजेच्या गाड्या, जमिनीपेक्षां पुष्कळ उंचावरून जाणाऱ्या आगगाड्या वगैरे अनेक प्रकारच्या गाड्या आहेत. बाकी पॅरिसइतकें हें शहर गजबजलेलें दिसत नाहीं. आणखी दोनतीन दिवसांनीं आम्ही बऱ्याच जिनसा खरेदी करूं.

आम्ही ज्या बाईच्या घरीं आहोंत तिला इंग्रजी चांगलें येत आहे व ती स्वभावानें फार मजेदार आहे. तिचें वय अठावन्न वर्षांचें आहे. तिचा एक भाऊ येथें शाळेंत मास्तर असून लॅटिन व ग्रीकसंबंधीं ते कांहीं पुस्तकें लिहीत आहेत. त्यांना इंग्रजी मात्र येत नाहीं.

ता. ३०-१२-१९२१

काल दुपारीं विनयकुमार सरकार येथें मला भेटायला आले होते. त्यांच माझें बराच वेळ बोलणें झालें. ते म्हणाले कीं, " माझा येथें राहून टेक्निकल स्कूलमध्यें जाण्याचा विचार उत्तम आहे व त्याबरोबरच युनिव्हर्सिटीचीं लेक्चर्स् ऐकावीं म्हणजे तीन वर्षांनीं डॉक्टरची डिग्रीही मिळेल. त्यांच्या मतें मी येथें पांचसहा वर्षें तरी रहावें व वेगवेगळ्या कारखान्यांत काम शिकावें. पैशाविषयीं त्यांनीं सांगितलें कीं, आणखी बरेच दिवस पांचशेंच्या खालीं मार्कचा भाव जाईल असें दिसत नाहीं व जानुवारीफेब्रुवारींच्या सुमारास भाव १५०० किंवा त्याहूनही स्वस्त होईल. तेव्हां घरून येथें पौंडांत पैसे मागवावे व भावाकडे लक्ष ठेवून थोडे थोडे मार्क लागतील तसे विकत घ्यावे. हिंदुस्थानांतल्यापेक्षां बर्लिनमध्यें मार्क फार स्वस्त मिळतील." असो. पुढच्या पत्रांत पैसे पाठविण्यासंबंधीं लिहीन. विनयकुमार केव्हां तरी आम्हांला चहाला बोलावणार आहेत. त्यांनीं आतां पॅरिस सोडलें आहे व ते आतां बरेच दिवस बर्लिनला राहणार आहेत. ते इकडे जर्मन शिकले आहेत व त्या भाषेंत त्यांचीं व्याख्यानें व्हावयाचीं आहेत. पॅरिसला आम्हीं ऐकलें कीं, त्यांनीं एका अमेरिकन बाईशीं लग्न केलें आहे. आम्हांला अद्याप नक्की माहीत नाहीं.

आजपासून आमची जर्मन मास्तरीण येऊं लागली आहे. ती रोज एक तास जर्मन शिकविणार आहे व तासाला पंधरा मार्क याप्रमाणें घेणार आहे. तिला इंग्रजी बेताचेंच येतें.

जिनसांची स्वस्ताई

येथ एक्स्चेंजच्या फायद्यामुळ सव जिनसा अगदीं स्वस्त मिळतात. जर्मन लोकांना मात्र त्या फार महाग वाटतात व हल्लीं जर्मन लोकांचे फार हाल आहेत. सर्व किंमती पूर्वीपेक्षां दसपट किंवा वीसपट वाढल्या आहेत. आम्हांला कांहीं झालें तरी सव जिनसा स्वस्तच वाटणार. चांगले चांगले ओव्हरकोट ७००।८०० मार्कला मिळतात (म्हणजे पंधरा रुपये). माझ्या ओव्हरकोटाला मुंबईंत पंचाऐंशीं रुपये पडले. कालच चॉकोलेट घेतलें. फारच चांगलें होतें आणि स्वस्त. आज एक फारच उत्तम फणी घेतली. अशी फणी बरेच दिवस मुंबईंत पाहत होतों पण तेथें ती मला मिळाली नव्हती. अठरा मार्क (म्हणजे चार आणे) किंमत पडली. माझा फाउंटन पेन होता त्याहूनही उत्तम पेन २५० मार्कला (म्हणजे चार रुपयांना) मिळतात. आमचे मित्र कोरडे म्हणाले कीं, थोड्याच दिवसांपूर्वीं १००० मार्कांला (२० रुपयांना) अगदीं नवी बायसिकल मिळत होती. असो. मला वाटतें तुम्हांला किंवा आपल्या घरीं मुलांना एखादा गमतीदार जिन्नस पाहिजे असेल तर तो रजिस्टर्ड पासलन येथून पाठवितां येईल. बाकी मीं त्याविषयीं अद्याप चौकशी केली नाहीं. मुलांना एकादा खेळाचा किंवा इतर जिन्नस पाहिजे असेल तर मला कळवावें. मी पाठविण्याचा प्रयत्न करीन.

आज संध्याकाळीं आम्ही येथल्या इंडियन इन्फर्मेशन ब्यूरोकडे गेलों होतों. तेथून आम्ही युनिव्हर्सिटीकडे आमचे अज व सर्टिफिकिट जर्मनमध्यें भाषान्तर करून पाठविणार आहों. परत येतांना सारखा बफ पडत होता व रस्त्यांतही बर्फ सांचला होता. आमचे कपडे बर्फानें अगदीं पांढरे झाले होते, व हात, कान, नाक वगैरे गारठून गेले होते. घरीं आल्यावर आमच्या गरम खोलींत बसलों तेव्हां बरें वाटलें. आमच्या खोल्या तापवलेल्या असतात. माझ्या खोलीची एक भिंत सारखी गरम असते. मला वाटत भिंतीच्या आंत विजेची तार घालून भिंत तापविण्याची व्यवस्था केली असावी.

आम्हीं येथें रोज सकाळीं व मधल्या वेळीं कॉफी घेतों व रात्रीं जेवण झाल्यावर कोको किंवा चहा (अगदींच weak) घेतों. येथें चहा पिण्याची पद्धत नाहीं. कॉफीच जास्त पितात व कोणाला चहा प्यायचा झाला तर चहाचा अर्धा कप भरून त्यांत अर्धा कप गरम पाणी ओतून दूध नांवालाच घालतात.

येथें दूध फारसें मिळत नाहीं व मिळालेंच तर तें फार महाग असतें म्हणून आमच्या बाई तें आम्हांला देत नाहींत. बाकी इतर पुष्टिकर खाणें बरेंच असल्यामुळें दुधाची जरूर आहे असें मला वाटत नाहीं.

बर्लिन, ता. ३१ डिसेंबर १९२१

आज रात्रीं बारा वाजतां जुनें वर्ष संपून नवीन वर्ष लागणार. त्या-निमित्त बर्लिनमध्यें जिकडे तिकडे रात्रीं बारा वाजतां धामधूम उडते. आपल्या दिवाळीप्रमाणें दिवे, दारू, फटाके वगैरे दृष्टीस पडतात. आम्हीं रात्रीं दहा वाजतां आंघोळ केली. एकोणिसाव्या तारखेला आगबोटींत नेपल्सला मीं आंघोळ केली, त्यानंतर ही दुसरी आंघोळ. आंघोळीची व्यवस्था मात्र इकडे फार उत्तम असते. असो. नंतर म्युलरबाईनें केक्स तयार केल्या. मीही त्या कशा करायच्या तें शिकलों. रात्रीं बारा वाजतां आम्ही नव्या वर्षा-निमित्त केक्स व बदाम वगैरे खाल्ले व म्युलर वगैरेंनीं दारू घेतली. नंतर आम्ही निजायला गेलों.

याच पत्राबरोबर बर्लिनचीं कांहीं चित्रें मुलांकरितां पाठवीत आहें. तीं त्यांना कशीं काय आवडलीं तें कळवावें.

ता. २ जानेवारी १९२२

· ती. सौ. माईस. आज आमच्या बाईंबरोबर आम्हीं खरेदीसाठीं गेलों होतों. सर्व दिवस बाजारांतच होतों. बऱ्याच जिनसा घेतल्या. मीं एक ड्रेसिंग गाऊन ६०० मार्कला (१२ रु.) घेतला, त्याप्रमाणें कर्वेंनीं हजार मार्कला (२० रु.) एक उत्तम वूलन सूट घेतला. यावरून येथें हल्लीं जिनसा किती स्वस्त मिळतात याची कल्पना होईल. बूट २००।३०० मार्कला मिळतात. एक मोठें दुकान आज पाहिलें तें पाहून थक्क झालों. त्याचें वर्णन पुढच्या पत्रांत लिहीन. माझी तब्येत चांगली आहे. आज माझें वजन सूट व बुटां-सकट ५५ किलोग्राम (१२१-२५ पौंड) भरलें. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

जर्मन भाषा शिकणें

पत्र ८८ वें

बर्लिन,

१३-१-१९२२

ती. सौ. माईस शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना विशेष......आम्ही हल्लीं अग्रिकाला स्ट्रास, ७, या ठिकाणीं राहात आहों. कदाचित् हें घरही बदलण्याचा प्रसंग येण्याचा संभव आहे. दर आठवड्यास तुमचीं पत्रें येत जातील अशी आशा बाळगतों. गेल्या आठवड्याला नानांनीं पॅरिसच्या पत्यावर मला पाठवलेलें पत्र पोंचलें. या आठवड्याला तुमच्याकडून पत्र नाहीं.

कालपासून आम्ही येथील युनिव्हर्सिटीच्या जर्मन क्लासमध्यें जाऊं लागलों आहोंत. तेथें जर्मनमधून जर्मन भाषा शिकवतात, त्यामुळें फार लवकर भाषा शिकतां येते. शिवाय आमची खाजगी मास्तरीण येथें येतेच. भाषा शिकल्याशिवाय कांहीं एक चालत नाहीं. पदोपदीं आमचें नडतें. जर्मन येत असल्याशिवाय आमचा लॅबोरेटरींत सुद्धां प्रवेश होणें शक्य नाहीं.

आजच डॉ. रवींद्रनाथ टागोरांकडून घेतलेल्या एका पत्राचा उपयोग करून मी डॉ. फ्रोन ग्लासेनाप यांना भेटायला गेलों होतों. त्यांनीं मला चहाला बोलावलें होतें व टागोरांची व हिंदुस्थानची बरीच माहिती त्यांनीं मला विचारली. ते येथल्या विश्वविद्यालयांत संस्कृतचे प्रोफेसर आहेत. त्यांचा संस्कृतचा व्यासंग चांगला आहे व संस्कृत पुस्तकांनीं त्यांचें घर भरलेलें आहे. त्यांना हिंदुस्थानीही येतें. त्यांच्या टेबलावर एक गणपतीची मूर्ति ठेवलेली होती. माझी भेट झाल्यामुळें त्यांना फार आनंद झाल्यासारखा दिसला. असो.

सध्यां जर्मन भाषा शिकणें हाच माझा मुख्य उद्योग आहे; पण शिवाय एखाद्या लॅबोरेटरींतही काम करावयाला मिळालें तर पाहावें असाही विचार करीत आहें व खटपटही करीत आहें. पाहूं या काय होतें तें.

हल्लीं थंडी फार असते. सबंध दिवस बर्फ पडत असतें व रस्ते बर्फाच्या थरांनीं झांकलेले असतात. सकाळीं रस्त्यांच्या फूटपाथवरील बर्फ खरडून काढतात व लोकांनीं घसरूं नये म्हणून त्यावर वाळू टाकतात. तरी पण आम्ही एकदोनदां घसरलोंच. येथील मुलें बर्फांत ओढायच्या गाड्या (Sledges) घेऊन खेळत असतात व बर्फाचे गोळे करून त्यांची फेंकाफेक करतात.

ता. १५-१-१९२२

कालच तुमचें ता. २३चें पत्र पोंचलें. कविताही वाचून आनंद झाला. मला हिंदुस्थानांतल्यापेक्षां हल्लीं येथें हुशारी जास्त वाटते व वेळ केव्हां कसा निघून जातो तें कळत नाहीं. मी आतांपर्यंत बऱ्याचशा जर्मन गृहस्थांना भेटलों. कोणाला भेटायला जायचें म्हणजे बर्लिनचा नकाशा पाहून जागा शोधून काढावी लागते व नंतर आगगाडीनें, ट्रॅमनें किंवा भुयारांतल्या विजेच्या गाडीनें सोयीस्कर होईल त्याप्रमाणें जावें लागतें. सर्व लोक नेहमीं आपआपल्या कामांत गर्क असतात.

माझी खाण्यापिण्याची सोय उत्तम आहे. मात्र आपल्यासारखें खाणें मिळत नाहीं. शाकाहार क्वचितच मिळतो. बाकी बटाटे रोज मिळतात. नाना प्रकारांचे चतुष्पाद प्राणी रोज आमच्यापुढें अन्नाच्या रूपानें येऊन उभे राहतात व आम्हीही त्यांचा योग्य समाचार घेतों. असो.

आतां पुढच्या पत्रांत जास्त लिहीन. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

पत्र ८९ वें

बर्लिन,

२२-१-२२

ती. नानांस शिरसाष्टांग नमस्कार. तुमचें पत्र शुक्रवारीं पोंचलें. (ता. ३०चें) आज बाजपाईंकडेही तुमचें पत्र पाहिलें. आज सकाळीं ते, मी व कर्वे असे त्यांच्या एका स्काउटबरोबर येथला म्युझियम व नॅशनल गॅलरी पाहायला गेलों होतों. मजा वाटली. त्यांच्या बरोबरच्या स्काउटला इंग्रजी जवळजवळ मुळींच येत नव्हतें. त्यांतून आतां आम्हांला जर्मन समजूं लागलें आहे व मोडकें तोडकें कामापुरतें बोलतां येतें म्हणून बरें. बाजपाईंच्या बरोबर मी येथ त्यांच्या बऱ्याचशा जिनसा खरेदी करण्याकरितां गेलों होतों. ते दोनतीन दिवसांनीं येथून ऑस्ट्रियाला जाणार आहेत.

आमची बोट एडनला थांबली नाहीं, म्हणून आम्हीं पहिलें पत्र पोर्ट-

सेडहून पाठवलें. पण तही ३० तारखेच्या आंत तुम्हांला कां पोंचूं नये कांहीं कळत नाहीं. पण इतक्यांत तुम्हांला माझीं सर्व पत्रें पोंचलीं असावींत असा अंदाज आहे. असो. या पत्रांत जास्त मजकूर लिहिण्यासारखा नाहीं. मीं युनिव्हर्सिटीकडे व केमिस्ट्रीच्या टेक्निकल स्कूलकड अर्ज पाठवले होते त्यांचीं उत्तरें नुकतींच आलीं. त्यांनीं माझीं Original Certificates मागितलीं आहेत व एप्रिलच्या पूर्वीं माझ्या अर्जाचा निकाल कळवतां येणार नाहीं असें लिहिल आहे. येथें सध्यां प्रवेश मिळायला फार मारामार पडते असें कळतें. पाहूं या आतां काय होतें तें.

गेला आठवडा आमचा पोलिसांच्या भानगडींत गेला. रोज दोन तास तरी या भानगडींत जात. आम्हांला जर्मनींत एका महिन्यापुरतीच राहण्याची परवानगी होती. पुढें ती वाढायची होती. शिवाय ज्या घरांत आम्ही राहात आहों, तेथें राहण्याकरतांही परवानगी लागते. या ऑफिसमधून त्या ऑफिसमध्यें जा, असें शेंकडों ठिकाणीं आम्हांला पोलिसांनीं हिंडवलें व आतां या घरांत राहण्याची व जर्मनींत राहायची तात्पुरती परवानगी मिळाली आहे व कायमची परवानगी आम्हांला युनिव्हर्सिटींत प्रवेश मिळाल्यावर म्हणजे आम्ही विद्यार्थी आहों हें सिद्ध केल्यावर मिळेल.

तुमच्या पत्रावरून श्रीनिवासाची तब्येत बरोबर नसून तो कोठें तरी हवा पालटण्याकरितां जाणार आहे असें कळतें. आतां तो कसा व कोठें आहे? महाराजांचें व तुमचें कांहीं विशेष बोलणें झालें का? तुम्ही यूरोपला येण्याचा संभव आहे का?

ता. २४-१-१९२२

काल पराकाष्ठेची थंडी पडली होती. टेंपरेचर उणें १२° होतें. मी माझ्या एका मित्राबरोबर अंडरग्राउंडनें एका दुकानांत चाललों होतों, त्या वेळीं गुडघ्यापर्यंत पाय इतके गारठून गेले होते कीं, मला पाय आहेत कीं नाहींं हेंच कळत नव्हतें. घावरगुंडी उडायची वेळ आली होती. पण मग दुकानांत शिरल्यावर चांगलें गरम होतें. येथील नदीसुद्धां अगदीं गोठून ठणठणीत झाली आहे. मी चापून कपडे अंगांत घालतों, दोन दोन मोजे पायांत घालतों व शक्य तेवढी

काळजी घेतों. काळजी करण्याचें कारण मुळींच नाहीं. एवढेंच कीं, हिंदुस्थानांत येथल्या थंडीची बिलकुल कल्पना आम्हांला करतां आली नव्हती.

श्यामकान्त.

पत्र ९० वें

Berlin,
29th *January* 1922

My dear Nana,

Your letter of 6th December reached me on the 26th inst. It is really a pity that the mail takes so long to reach here and one cannot get a reply to one's letters promptly.

We learnt all the details of the Congress from the Kesari and from the Dnyanaprakash which Mr. Karve receives regularly. I hope you will arrange to send me the Modern Review and the Young India as requested in one of my previous letters. Though a bit heavy the Modern Review won't require much postage as it is a printed matter and Bhau can conveniently send his copy after he has done with it. I borrowed the January number of Modern Review from Prof. Binoy Kumar Sarkar yesterday. I am sure, you will be receiving letters from him to the effect that he is doing everything here for me.

I am sorry to learn that Shriniwas is not faring well. I can't give out any view just now as regards his education abroad. Let me have some experience at the University here and there. Then I would be in a position to give you my opinion. At present, I don't know what facilities the undergraduates or non-matriculates of India could get here. So please wait for a few months before I can tell you anything on this point. I am gradually making progress in German. The language is extremely difficult and as such demands

hard labour. Before April I can't think of anything else but learning the language.

Mr. Bajpai left Berlin on Tuesday last. I don't insist on your writing to me in Marathi or in English in particular. But I myself will rather choose writing in Marathi, for otherwise Mai and others have to depend upon translation and even then lose half the charm of the letter.

I don't know whether you should buy more marks at all None can foretell what the exchange is going to be. I think you should be, instead, sending every month a few pounds, say, 5. However, I shall think over this and inform you of what to do by and by.

The following letter is for dear Mai. With profound respects.

I am yours affectionately.
Shyamakant.

पत्र ९१ वें

ता. २९-१-१९२२

ती. सौ. माईस शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना विशेष. गेल्या आठवड्यांत थंडीनें कहर केला. माझ्या गेल्या पत्रांत मीं टेंपरेचर उणें १२ (सी) झाल्याचें लिहिलें होतें. पण नंतर तें त्याहीपेक्षां खालीं गेलें. मध्यें एकदां उणें १७ पर्यंत जाऊन आलें म्हणतात. आमच्या पाहण्यामध्यें १४ पर्यंत गेलें होतें. आतां उणें १२ म्हणजे किती याची कल्पना हिंदुस्थानांत बसल्या बसल्या करतां येणें शक्य नाहीं. लोक जेव्हां मला सांगत कीं, जर्मनीमध्यें थंडी फार असते म्हणून, त्या वेळीं मला वाटे, उंः, त्यांत काय आहे? थंडी अशी कितीशी पडणार आहे? चापून कपडे घातले म्हणजे झालें! पण आतां मला थंडीची चांगली कल्पना आली. कितीही कपडे घातले, हातांत चामड्याचे हातमोजे—आंतून लोंकर लावलेले—घातले, पायांत एकावर एक दोन लोंकरीचे मोजे घातले, तरी कांहीं उपयोग होईना. घराच्या बाहेर पडलें रे पडलें

कीं, हात इतके थंड व्हायचे कीं त्यांना कांहीं शुद्धच राहात नसे. मग कांहीं वेळानें हातांतून थंडीमुळें वेग येऊं लागत. विंचू चावला असतांना ज्याप्रमाणें कळा येतात, त्याप्रमाणें अतिशय थंडी असली म्हणजे हातांतून आणि पायांतून कळा येतात. एकदां मी ट्रॅममधून चाललों असतांना गुडघ्यापर्यंत पाय इतके गार झाले कीं, मला चालतां येईल कीं नाहीं याची शंका वाटायला लागली. नद्या वगैरे सर्व थिजून गेल्या आहेत. त्यांवरून लोक चालतात किंवा स्केटिंग करतात. आम्हीं जरी सुद्दाम होऊन स्केटिंग करण्याचा प्रयत्न केला नाहीं, तरी रस्त्यावरून बर्फांतून चालतांना आमच्या इच्छेविरुद्ध कित्येकदां स्केटिंग केलें जातें. एकदोनदां चांगलेंच लागलें. असो. आज थंडी जरा कमी आहे व एकदोन दिवस ऊनही पडत आहे.

खाण्यापिण्याचें वगैरे बरें जमतें. हॉटेलमध्यें एखादे वेळीं जेवायला गेलों म्हणजे कोणता पदार्थ मागवावा याची पंचाईत पडते. कारण आमच्या-पुढें पदार्थांची यादी असते, त्यांतलें आम्हांला कांहींच कळत नाहीं आणि त्यांतूनही भाषा कळत नाहीं. मग किंमत पाहून एखाद्या पदार्थावर बोट ठेवतों व मग कधीं चांगला तर कधीं वाईट पदार्थ आमच्यापुढें येतो. पुष्कळशा प्राण्यांना आमच्या पोटांत आश्रय द्यावा लागतो, हा आमचा मोठेपणा नाहीं का ?

असो. श्रीनिवास, बापू, श्रीधर, शरत्कुमार* वगैरे मुलांना आशीर्वाद कळवावे व मला पत्रें लिहिण्यास सांगावें. माझी तब्बेत उत्तम आहे व भाषा शिकण्याकरितां माझ्याकडून शक्य तेवढी मेहनत चालू ठेवली आहे. हें पत्र ता. ३०ला मी पोष्टांत टाकीत आहें. पण तें बुधवारीं ता. १ फेब्रुवारीला येथून निघेल. सोबतचें कार्ड पोष्टांत टाकावें. हे विज्ञापना.

श्यामकान्त.

---

* भाऊ ऊर्फ डॉ. दि. स. सरदेसाई, नेत्रवैद्य, मुंबई, यांचा मुलगा, श्याम-कान्ताचा चुलतभाऊ.

What to learn?

पत्र ९२ वें

Berlin,
24-2-22

My dear Aba,

You must be getting my letters from dear Nana from Baroda and must have learnt all details regarding myself.

As regards my education I remember to have had a talk with you once. Until now I could not myself settle my future plan here. I found it extremely difficult to get a place in any of the laboratories. Admission into University here is comparatively an easy matter, but admission in a laboratory, even in a University laboratory, is a very hard job, as all the laboratories are over-crowded and German students are given a decided preference over foreign ones. I had an interview with the professor of oils and fats in the famous Technical School here, but he said I must wait for at least one term before he could admit me, since at present his laboratory is overcrowed. Finally I met a Professor of Chemistry at the Pharmaceutical Institute and he has agreed to admit me in his laboratory for the present. I know that before I get some training in general technical chemistry, or specially in oils and fats, I stand little chance of entrance into any factory, which is my final goal. I, however, saw one of the chief workers of the Indian Information Bureau, who helped us much in translating our certificates and applications to the University into German, forwarding them to the Minister of Education, whose permission we are required to secure. I asked him whether he would find a place for me in any oil factory. He said he would certainly find one, since he deals with some oil factories and imports linseed from India. Within a week he got information from an oil factory that a student could be admitted there. But I myself think it worth my while to have some training in

general analytical chemistry and to do some research work in the field of oils and fats as well, before I go to any factory. You see, there is always a difference between a mechanical worker and a real research worker. A student may enter some factory without having any knowledge of chemistry whatsoever, and after a few years' experience there, will have mastered the branch. But the utmost one can do on one's return to India is to start a similar factory and one can perhaps do no new research—industrial or pure. I, therefore, think that a higher type of a chemist is one who is initiated into real method of laboratory research. Then he can easily take up the factory work which is after all a mechanical thing. With this view I have decided to join the Pharmaceutical Institute for the present and to enter an oil factory after six months or after a year. The Bureau has promised to secure a place for me in a factory even after a year.

I have also a mind to go to Hamburg once and visit the place, since it is said to be one of the beautiful places of Germany. Most probably I will go there in March.

While talking with Mr. Chattopadhyay, the worker of the Indian Bureau I mentioned above,—I told him about the Bilimora factory and about 'Dhupa'. He seemed to be interested in the affair and is going to write to you in this connection especially for information regarding the Dhupa seed. You might be knowing that Mr. Chattopadhyay is a revolutionary and is doing anti-British propaganda work in Europe for the last 20 years. In an article in the Modern Review (December probably) there was a short description and mention of him. However, this is apart; I may only tell you that Mr. Chattopadhyay does business here, especially export and import, and would be glad to receive your help; see, if you can be benefited by any connection with him.

Where is dear Shriniwas now? Tell him that I will send him stamps by and by. If he is so very particular and serious about it, I may even buy stamps for him. For here are so many shops selling varied used up stamps to stamp-collectors.

Yours affectionately,
Shyamakant.

श्री

पत्र ९३ वें

बर्लिन,
ता. २४-२-२२

ती. नानांस शिरसाष्टांग नमस्कार, वि. वि. तुमचें ता. ३-२-२२ चें पत्र परवां पोंचलें. वाचून आनंद झाला. सोबत आबांना पत्र लिहीत आहें तें वाचून पुढें पाठवावें. त्यावरुन माझ्या येथील शिक्षणासंबंधीं माझे विचार तुम्हांला कळतील. प्रो. विनयकुमार सरकार यांनीं मला येथील फार्मास्यूटिकल इन्स्टिटयूटमधील एका मोठ्या प्रोफेसरकडे पत्र दिलें होतें व त्या प्रोफेसरांना भेटल्यावर त्यांचेंही माझ्याविषयीं बरें मत झाल्याचें दिसलें व त्यांनीं सध्यां मला आपल्या लॅबोरेटरींत जागा देण्याचें ठरवलें आहे. कालच आमच्या इंडियन असोसिएशनच्या सभेंत सरकार मला भेटले व त्यांना मीं thanks दिले. या बाबतींत मला विनयकुमारांची थोडीशी मदत झाली खरी. त्यांचें तुम्हांला पत्र येईलच. एकदोन टर्मस् लॅबोरेटरींत काम करुन पुढें कारखान्यांत जावें असा माझा विचार आहे. बाकी कारखान्याचें काम संभाळून युनिव्हर्सिटीचा विद्यार्थी होतां येतें व म्हणून पीएच्. डी. डिग्रीहि साधण्याचा मी प्रयत्न करणार आहें.

मला वाटतें, सध्यां एकदम जास्त पैसे पाठवण्याची जरूर नाहीं. मी या महिन्याच्या पहिल्या तारखेपासून रोज खर्च लिहूं लागलों आहें. या महिनाअखेर हिशेब करून साधारण महिना खर्च किती येतो याचा अंदाज करतां येईल. नंतर त्याप्रमाणें दर महिन्याला किंवा तीनतीन महिन्यांनीं किंवा

सहासहा महिन्यांनीं पौंडांत पैसे पाठवावे. मार्क मात्र हिंदुस्थानांत कधींही खरेदी करूं नये. कारण हिंदुस्थानांतला भाव फारच कमी असतो. तुम्ही जो वर्तमानपत्रांत भाव वाचतां तो लंडनचा असतो आणि लंडनचा भाव येथल्या पेक्षां शेंदीडशें मार्कांनीं तरी दर पौंडास कमी असतो. तेव्हां पौंडच पाठवणें उत्तम. हल्लीं येथला भाव जवळजवळ १ पौंड = १००० मार्क आहे.

आतां हिंवाळा संपल्यासारखा वाटत आहे. बर्फ कोठेंही दिसत नाहीं. टेंपरेचर + ५°च्या वर असतें. हातांत मोजे घालावे लागत नाहींत. एकंदरींत वसंतऋतूला लवकरच सुरुवात होईल असें दिसतें.

मला कधींकधीं घरची आठवण येऊन व सध्यांच्या एकलकोंड्या स्थितीचा कंटाळा येऊन वाईट वाटतें. पण अशा मानसिक स्थितींत मी थोडाच वेळ असतों. हल्लीं सबंध दिवस इतका कामांत गर्क असतों कीं, विचार करायला एक क्षण देखील मिळत नाहीं. सकाळीं आठ वाजतां उठतों व रात्रीं अकरा वाजतां निजतों. तोंपर्यंतचा सगळा वेळ अगदीं बांधलेला असतो. रोज दोन तास युनिव्हर्सिटींत जर्मनचा क्लास असतो व शिवाय मिस् निकोलाईजवळ खाजगी रीतीनें जर्मन शिकतों. त्यामुळें आम्हीं झपाट्यानें भाषा शिकत आहों. आतां एप्रिलपासून एकदां लॅबोरेटरींत जाऊं लागलों, म्हणजे कामाची गोडी लागून वेळ मजेंत जाईल. रा. कर्वे व मी सध्यां एकाच खोलींत राहात आहों. पण एप्रिलपासून ते लाईपझिगच्या युनिव्हर्सिटींत जाणार आहेत. मग त्यांची व माझी फाटाफूट होईल. हिंदुस्थान सोडल्यापासून ते व मी एकत्रच आहों.

खाण्यापिण्याची व्यवस्था बरी जमली आहे. येथें जवळच एका खासगी घरीं हॉटेलप्रमाणें जेवणाची व्यवस्था असते, तेथें रोज जेवायला जातों. म्हणजे खर्च कमी येतो. जेवण साधारण बरें असतें. आठवड्यांतून एक दिवस—रविवारीं—जिभेच्या तृप्तीसाठीं एखाद्या मोठ्या हॉटेलमध्यें जाऊन जरा उंची दर्जाचें जेवण जेवतों. रोज सकाळीं नियमितपणें व्यायाम करतों. मला येथें आल्यानंतर महिनाभर शौचाबद्दल तक्रार असे; पण आतां मी रोज नियमितपणें पोटाचे व्यायाम करूं लागल्यामुळें कोणत्याही तऱ्हेची तक्रार उरली नाहीं.

पुढें मागें जर या बाजूस कोणी यायचें झालें, तर त्यांचे बरोबर कांहीं खाण्याचें पाठवल्यास बरें होईल. माझा मित्र सुहृत्‌कुमार मुकरजी लवकरच

शांतिनिकेतनहून कलकत्त्यावरून येथें येणार आहे. संधि आल्यास डिंकाचे लाडू, व चिवडा, लोणचें व इतर कांहीं पदार्थ (अगोड) पाठवल्यास चालतील. मुद्दाम खर्च करून पाठवूं नये. न पाठवले तरी हरकत नाहीं. मला अगदीं पाहिजेतच आहेत असें नाहीं.

आणखी एक गोष्ट. माझ्या मनांत 'शांतिनिकेतन' मासिकपत्र घ्यायचें आहे. त्याची वर्गणी टपालखर्चासह हिंदुस्थानांत वार्षिक १॥ रु. आहे. तेव्हां जगदानंद राय यांच्याकडे जरूर ती वर्गणी पाठवून मासिक पाठवण्याची व्यवस्था करावी.

टागोरांच्या 'विश्वभारतीं'त झपाट्यानें घडामोडी होत आहेत. तुम्हांला मॉडर्न रिव्ह्यूमधून सर्व कळतच असेल. येथें हॉटेलांतल्या नोकरांपासून सगळ्यांना टागोर माहीत आहेत. हिंदुस्थानांतच ते येथल्यापेक्षां कमी माहीत आहेत. त्यांचीं जर्मनमध्यें भाषान्तरें केलेलीं पुस्तकें आम्ही सध्यां वाचीत आहों.

मिस् म्युलरकडे आम्ही दर आठवड्याला आंघोळीला व चहाला जातों. ती चहाचा (म्हणजे कॉफीचा) फारच आग्रह करते, व दर खेपेस नवीन नवीन तऱ्हांच्या केक्स् स्वतः तयार करून आम्हांला देते. त्या मला फारच आवडतात. मी तशा करायला शिकणार आहें. आपल्याकडे त्या सहज करितां येण्यासारख्या आहेत.

माझ्या मनांत एक बायसिकल घ्यायची आहे. लवकरच पुढेंमागें बर्लिन सोडणार आहें. मग सायकलचा उपयोग फार होईल; व घ्यावयाचीच झाली तर आत्तांच कां न घ्या? आमच्या शेजारच्या गृहस्थानें दोन दिवसांपूर्वी २३०० मार्कला एक उत्तम सायकल घेतली. म्हणजे हल्लींच्या येथल्या भावाप्रमाणें २½ पौंड झाले. म्हणजे कांहीं फार नाहीं. तुम्हांला काय वाटतें?

असो. आज जास्त वेळ नाहीं. सबब पत्र पुरें करतों. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

ता. क. आजच ९७५च्या भावानें ६ पौंड बदलून घेतले. सध्यां पोलिसांचे ऑफिसर्स आमच्या घरीं मधूनमधून खेपा घालतात. आम्हांला अद्याप जर्मनींत राहायची कायमची परवानगी मिळालेली नाहीं. युनिव्हर्सिटींत

प्रवेश झाल्यावर परवानगी मिळेल. कोणालाही परवानगी मिळाल्याशिवाय देशांत राहतां येत नाहीं. पोलिस ऑफिसें व ऑफिसर्स इतके आहेत व ते चौकशी इतकी करीत असतात कीं, बोलून सोय नाहीं. बाकी त्यामुळें त्रास मुळींच होत नाहीं. एखादे वेळीं आपल्याला खेपा घालाव्या लागतात इतकेंच. पोलिसांना दुसरे धंदे नसतात म्हणून या उठाठेवी करीत असावेत. अशा रीतीनें मला वाटतें बऱ्याच पोलिसांना काम पुरवलें जातें. जर्मनींत unemployment नाहीं यांत कांहीं आश्चर्य वाटायला नको!!

श्यामकान्त.

श्री

पत्र ९४ वें

बर्लिन,

ता. ६-३-१९२२

तीर्थरूप सौभाग्यवती माईस बालकें श्यामकान्ताचे दोन्ही कर जोडून त्रिकाल चरणीं मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना विशेष. तुमचें ता. ९-२-२२ चें पत्र ता. २-३-२२ला पोंचलें. आम्हीं आमचें बिऱ्हाड बदललें नाहीं. गेल्या खेपेचें तुमचें पत्र मला येथेंच मिळालें. अद्याप बिऱ्हाड बदलायचा संभव असल्यामुळें तुम्हीं नेहमीं बँकेच्या पत्त्यावर पत्र लिहावें हेंच चांगलें. संपाच्या वेळीं आमचे विशेष हाल झाले नाहींत. रोज तीन मैल चालत युनिव्हर्सिटींत जावें लागे, रात्रीं मेणबत्त्या लावाव्या लागत व चहाला दूध मिळत नसे. एवढ्याच काय त्या गैरसोयी. आतां पुन्हा सर्व सुरळीत चाललें आहे. मात्र दिवसेंदिवस महागाई होत चालली आहे. मार्कांची किंमत सारखी कमी होत चालल्यामुळें दुकानांतल्या सर्व पदार्थांच्या किंमती, त्याचप्रमाणें आगगाडीचीं, ट्रॅमचीं वगैरे भाडीं सारखीं वाढत आहेत. काल भाव पौंडाला ११३२ मार्क होता. मीं पूर्वी मार्क घेतले नसते तर किती मजा झाली असती बरें? येथें एक बंगाली गृहस्थ आहे तो मात्र हिंदुस्थानांतून येथें येतांना सर्व पौंड घेऊन आला होता. त्याचा हल्लीं फार फायदा होत आहे. असो. तुमच्या व प्रो. कर्व्यांच्या दिनकरला आलेल्या पत्रांवरून कळतें कीं, तुम्ही लवकरच

पौंडांत पैसे पाठवणार आहां. फार पैसे पाठवण्याची आतांच जरूर नव्हती. पण पाठवलेच तरी हरकत नाहीं. मात्र पौंडांत पाठवावे. कोठें व कसे पाठवणार तें कळवालच. मी गेल्या महिन्याचा जमाखर्च लिहीत होतों, त्यावरून मला गेल्या महिन्याला जेवणाचा, राहण्याचा व रोजच्या इतर जरुरीच्या जिनसांचा मिळून २५०० मार्क जवळजवळ खर्च आला. युनिव्हर्सिटींत जाऊं लागलों म्हणजे शिक्षणाचा, पुस्तकांचा वगैरे धरून महिना ३००० मार्क—म्हणजे हल्लींच्या भावाप्रमाणें तीन पौंडांपेक्षांही कमी खर्च येईल असा अंदाज आहे.

आमचा युनिव्हर्सिटींतला जर्मन-वर्ग दोन महिन्यांपुरताच असल्यामुळें त्याची मुदत आतां संपली व सध्यां आमची परीक्षा चालू आहे. पहिल्या दिवशीं शुद्धलेखन झालें. काल एक गोष्ट आमच्या मास्तरांनीं वर्गांत सांगितली व ती आमच्याकडून लिहून घेतली. एकदोन दिवसांनीं तोंडी परीक्षा होणार आहे. मी पास होईन असा अंदाज आहे. परीक्षा आटपल्यावर दहाबारा दिवसांकरितां आम्ही बहुधा हँबुर्गला फिरायला जाऊं.

तीन दिवसांपूर्वी एकदम विनयकुमार सरकारांचें पत्र आलें व त्यांत त्यांनीं अफगाण एंबसीमध्यें शनिवारीं दुपारीं तीन वाजतां आम्हांला बोलावलें होतें. कशाकरितां हें आम्हांला कांहीं केल्या कळेना. ठरल्याप्रमाणें दुपारीं तीन वाजतां तेथें गेलों. दरवाजापाशीं विनयकुमार व त्यांच्या भावी पत्नी Miss Stieler उभ्या होत्या. आम्हीं त्यांना कशाकरितां बोलावलें तें विचारलें. पण प्रथम ते मला स्वतःलाच पत्ता नाहीं असें म्हणाले व पुढें कांहीं वेळानें आम्हीं आग्रह केल्यावर ते म्हणाले कीं, आज माझें लग्न होणार आहे. त्यांना हिंदु पद्धतीप्रमाणें लग्न करायचें होतें व याला फक्त अफगाण एंबसीच येथें मदत करते व या कामापुर ते लग्न करणारे लोक अफगाणची प्रजा समजले जातात. असो. मी व कर्वे लग्नाचे साक्षी व उपाध्ये होतों. खानखोजे म्हणून येथें असलेले एक दक्षिणी ब्राह्मणही या बाबतींत मदत करीत होते. स्वतःला येत असलेल्या शांत्या, गायित्रीमंत्र वगैरेंचा आम्हीं उपयोग केला व सर्व जवळचे मंत्र संपल्यावर 'अस्ति गोदावरीतीरे विशालः शाल्मलीतरुः' हा वेदांतला (!!!) पवित्र मंत्र म्हणण्यापर्यंत पाळी आली. आमच्यापैकीं एका बंगाली गृहस्थानें

‘ ईशावास्यमिदं सर्वं...’ या उपनिषदाला सुरुवात करून ‘ मा गृधः कस्य-चित् स्वीधनं ’ असा शेवट करून विनयबाबूंना टोमणा मारला. नंतर टेबलाभोंवतीं सात प्रदक्षिणा (सप्तपदी) घालायला लावून शेवटीं नवरा-बायकोंस एकमेकांच्या गळ्यांत माळा घालायला लावून आम्हीं आमचे विधि आटोपले. होम नसल्यामुळें लोकांच्या तोंडांत असलेल्या विड्यांनाच थोडा वेळ होम म्हणून कल्पना करून घेतली. पण इतक्या सर्व खटाटोपांत खाण्याची कांहींच तयारी दिसली नाहीं. कसे झालों तरी आम्ही ब्राह्मण ! ‘ मिष्टान्न-मितरे जनाः । ’ याप्रमाणें खाण्याची सोय असल्याशिवाय ब्राह्मण आपलें कर्तव्य बजावण्यास कुचराई करतील अशी सूचना पुढें आल्यानंतर, लागलींच विनयबाबू, त्यांच्या पत्नी (पूर्वी Miss Stieler ऑस्ट्रियन) व आम्ही सर्व एका हॉटेलमध्यें चहा घेण्यास गेलों व रात्रीं पुन्हा विनयकुमारांच्या बरोबर डिनरला गेलों. त्यानंतर सरकारांच्या एका मित्राच्या घरीं आम्ही सर्व गेलों –ही जणूं काय वरातच– व तेथें हिंदी व जर्मन गाणें झालें. नंतर रात्रीं एक वाजतां आम्ही घरीं परत आलों. अशा रीतीनें एकंदरींत विनयकुमार चतुर्भुज झाले व–such is life–जीवन हें असें असतें, असें त्यांनीं आम्हांला सांगितलें.

असो. आज कांहीं जास्त लिहायचें नाहीं. ‘ क्रीम मिळतें कीं नाहीं ’ असें गेल्या पत्रांत तूं विचारलें होतेंस. क्रीमचे किती तरी सुस्वादु पदार्थ रस्त्याच्या दोहों बाजूंना असलेल्या दुकानांतून रोज आम्हांला लालूच दाखवीत असतात. आम्ही त्यांच्या या लालुचीला सहसा बळी पडत नाहीं. पण आठवड्यांतून एखादा दिवस या जिनसांचा फारच राग आल्यामुळें सूड उडवतों. पैसे दिले म्हणजे आपल्या इकडल्यापेक्षां किती तरी चांगले क्रीमचे गोड पदार्थ येथें मिळतात. माझी तब्येत उत्तम आहे. हल्लीं मी डंबेल्सचा व्यायाम करतों. थंडी अगदीं थोडी असल्यामुळें मुळींच त्रास होत नाहीं. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

German Police

पत्र ९५ वें

Berlin,
9-3-22

My dear Aba,

I got your letter dated 17-2-22 this morning along with that of Mr. C. J. Schmitz. It seems that you have misunderstood me as regards my relation with the police here. Let me tell you that in Germany the police keep themselves informed of every citizen in the town. The address and details of every man, for instance in Berlin, are always with the police and, therefore, whenever you rent a new house or leave an old one you have to inform the police of it. All this is for convenience, rather than for troubling people as in India. So we had to do this 'police business,' as we called it, for some days before we got ourselves registered in the present lodging. We then sent an application to the authorities in order to get our passport extended for 3 or 4 years. This can be obtained only when we are admitted in some University or in any Institution, which cannot be expected before the middle of April. So we are now waiting for the reply from the University to our applications. Mr. Karve has been already admitted to the Leipzig University and will join it from April. So there is no trouble whatsoever, regarding police surveillance; the police officers often come to us to ask us details, which only gives us practice in German conversation. This is how the unemployment trouble is avoided in Germany, we often remark jokingly.

As regards my education here, I have already written to you a detailed letter. Curiously enough, I had been in the enquiry office of the University here yesterday where I was told that a B. Sc. from the Bombay University is required to put in only three terms before he can get his

doctorate. If this is true—I don't believe it is—then after a year and a half, I can completely give myself up to actual training in a factory. The doctorate is quite essential here. It has a great value in Germany and I can't give it up. However, I cannot have any idea about matters here, and can't form my plans before I spend at least one term in a laboratory and get a certain amount of experience. About the cement industry I will think by and by.

By the way, you must be knowing that we had joined a German Class in the University here. After two months we were examined and we have both passed and got certificates to the effect that our knowledge of German is sufficient to enable us to follow the teachers at the University. Of course I know that our knowledge of German is still extremely poor, the language being extremely difficult. There were many European foreigners in our class; many of them being quite 'ढ's managed to fail also.

This Monday, we will be going to Hamburg, where we will stay for about a week and will see the city and come back. We hold correspondence with Mr. Schmitz friend and he is going to arrange everything for us in Hamburg. So my next letter will be from Hamburg. Please post the accompanying post-card.

Yours affectionately,
Shyamakant.

श्री

पत्र ९६ वें

बर्लिन,
ता. १२ मार्च १९२२

ती. सौ. माईस शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना विशेष. या आठवड्याला बडोद्याहून तुमच्याकडून पत्र आलें नाहीं. मुंबईहून आबांचें पत्र

आलें होतें, त्याला वेगळें उत्तर लिहिलें आहे. ते कदाचित् तें तुम्हांला दाखवितील. ठरल्याप्रमाणें उद्यां दुपारीं आम्ही हॅंबुर्गला जाऊं. तेथें साधारण आठवडाभर राहून परत येण्याचा विचार करीत आहों. हॅंबुर्गवरून परत आल्यावर बहुधा मी हल्लींचें घर सोडून बर्लिनच्या थोडेसे चारपांच मैल बाहेर डालेम म्हणून लहान गांव आहे तेथें राहायला जाईन. कारण मला ज्या फार्मास्यूटिकल लॅबोरेटरींत जागा मिळाली आहे ती डालेममध्यें आहे व रोज येथून तेथें जायचें व परत यायचें म्हणजे वेळाचा व पैशाचा अपव्यय होईल. पाहावें आतां कोठें जागा मिळते ती.

आजच मी एक उन्हाळ्यांत वापरण्याकरितां वुलन सूट विकत घेतला. मला तो फारच आवडला. मुंबईला केलेल्या सुटापेक्षां चांगला आहे. त्याला २२०० मार्क म्हणजे हल्लींच्या भावाप्रमाणें जवळजवळ पांच रुपये पडले. त्याचप्रमाणें पुढेंमागें माझ्या मनांत एक कॅमेरा व एक बायसिकल घ्यायची आहे. बराच खर्च होईल. पाहूं या घ्यायची कीं नाहीं तें. कालच रा. कव्यानीं आपल्या कॅमेरानें आमचे कांहीं फोटो काढले. ते जर चांगले निघाले तर आणखी दोन आठवड्यांनीं ते तुम्हांला पाठवीन. रा. कव्यांनीं ३००० मार्कला कालच एक नवीन कॅमेरा घेतला. फार चांगला आहे.

येथें पुष्कळदां हॉटेलमध्यें आम्ही चांगल्या चांगल्या केक्स व इतर गोड पदार्थ खातों. कांहीं कांहीं खोबऱ्याचे व क्रीमचे पदार्थ व तऱ्हेतऱ्हेचीं बिस्किटें फारच मजेदार लागतात. हे सर्व पदार्थ तयार करायला जे जिन्नस लागतात ते सर्व हिंदुस्थानांत असून देखील हिंदुस्थानांत असले पदार्थ तयार होऊं नयेत ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. खरोखर हिंदुस्थानांतील कांहीं लोक जर मनावर घेतील व केवळ उत्कृष्ट बिस्किटें, केक्स, खोबऱ्याचे व इतर नाना प्रकारांचे पदार्थ, चॉकोलेट्स् वगैरे येथें येऊन शिकून जातील तर फारच उत्तम होईल. माझ्या मतें हा धंदा फायदेशीर होऊन पुन्हा हिंदुस्थानांतल्या लोकांना बिस्किटांसारख्या साध्या पदार्थांकरितां यूरोपच्या तोंडाकडे पाहावें लागणार नाहीं. खरोखर या गोष्टीकडे कांहीं लोकांनीं तरी लक्ष पुरविलें पाहिजे.

असो. या आठवड्याला जास्त लिहायचें नाहीं. तुम्ही नेहमींप्रमाणें माझ्या बॅंकेच्या पत्त्यावर पत्रें लिहावीं. आबांच्या पत्रावरून तुम्हीं साठ पौंड

पाठविल्याचें कळतें. लवकरच मिळतील अशी आशा आहे. ते वर्ष दीडवर्ष सहज पुरतील.

मागें लिहिल्याप्रमाणें मी हल्लीं स्प्रिंग डंबेल्स्चा व चेस्ट एक्स्पांडर्स्चा व्यायाम करतों. हे व्यायाम फार फायदेशीर होतील असें वाटतें. यंग इंडिया पुढच्या आठवड्यापासून येईल असें आबांच्या पत्रावरून कळतें. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र ९७ वें

हॅंबुर्ग,

ता. १७ मार्च १९२२

ती. सौ. माईस शिरसाष्टांग नमस्कार. वि. वि. ठरल्याप्रमाणें गेल्या सोमवारीं आम्ही येथें आलों. स्टेशनवर मि. + + हे आम्हांला न्यायला आले होते व त्यांच्याच घरीं आम्ही उतरलों आहों. ते हिंदुस्थानांत वीस वर्षें होते असें ते सांगतात. त्यांची एक ऐशीं वर्षांची म्हातारी आई व ते असे दोघेच येथें असतात व घरही अगदीं जुनाट पद्धतीचें व लहानसें असें आहे. जेवायला त्यांची आईच करून घालते. त्यांना इंग्लिश चांगलें येत आहे. आम्ही सकाळचें खाणें आटोपल्याबरोबर रोज कांहींना कांहीं नवें पाहायला जातों व दुपारीं जेवायला परत येतों व दुपारीं जेवण झाल्यावर पुन्हा बाहेर पडतों ते रात्रीं जेवायला परत येतों. आतांपर्यंत आम्ही येथल्या पाहण्यासारख्या बहुतेक सर्व गोष्टी पाहिल्या. येथल्या म्युनिसिपॅलिटीच्या बैठकीची व लॉर्ड मेयरची कचेरी–जर्मनमध्यें ' रॉटहाउस '–फारच बघण्यासारखी आहे. ती बघण्याकरतां लोकांचे थवेच्या थवे येत असतात. नंतर येथील चित्रांचें प्रदर्शन, बंदर वगैरे सर्व गोष्टी पाहिल्या. या पत्राच्या सोबत येथील कांहीं देखाव्यांचीं चित्रें पाठवीत आहें तीं श्रीनिवासला व बापूला द्यावीं.

काल सकाळीं तुमचीं ता. २४-२-२२ चीं पत्रें पोंचलीं. येथें चेंबर ऑफ कॉमर्समध्यें इंग्रजी व इतर वर्तमानपत्रें वाचण्याची सोय आहे. तेथें जाऊन

आम्ही रोज लंडन टाइम्स वाचतों. त्यांत गांधींना पकडल्याची व मॉंटेग्युसाहेबांनीं राजीनामा दिल्याची बातमी कळली. केसरीही काल आला; पण त्यांत फार जुनी बातमी होती. गांधींनीं बार्डोली तालुक्याची चळवळ थांबवल्याची बातमी गेल्या केसरींत आहे. मला अद्याप यंग इंडिया मिळूं लागला नाहीं, हें कसें ?

हॅंबुर्ग, ता. १९-३-१९२२

......नानांनीं येथें मदत मिळण्यासारखीं जीं दोन पत्रें दिलीं आहेत त्यांची मदत मी येथें आल्यापासून घेतच आहें. जोगेंद्र चौधरी हे एक बंगाली गृहस्थ येथें टेक्निकल हायस्कूलमध्यें Oils and Fatचाच अभ्यास करीत आहेत व या विषयावर त्यांचें माझें बरेंच बोलणें झालें. बर्लिनला ते व आम्ही अगदीं शेजारींशेजारीं राहतों. त्याचप्रमाणें युनिव्हर्सिटीकडे अर्ज जर्मनमध्यें पाठवायचे, आमच्या सर्टिफिकिटांचीं जर्मन भाषांतरें करावयाचीं, वगैरे कामें आम्ही Indian Information Bureau कडून करून घेतलीं. त्याबद्दल आम्हांला त्यांना कांहीं तरी द्यावें लागेल. त्या ब्यूरोमध्यें चट्टोपाध्याय व खानखोजे असे दोघे गृहस्थ आहेत. त्यांना बहुधा परत हिंदुस्थानांत किंवा ब्रिटिश साम्राज्यांत कोठेंही जातां येणार नाहीं. असो. खाण्यापिण्याची माझी सोय नीट लागली आहे. त्याबद्दल काळजी करण्याचें कारण नाहीं. येथें जर्मनींत मोठें जेवण किंवा डिनर हें दुपारीं असतें व तें मी रोज घेतों. मात्र रोज फारसें थाटाचें किंवा श्रीमंती जेवण जेवीत नाहीं. आठवड्यांतून एखादा दिवस मोठ्या हॉटेलमध्यें जेवायला जातों. दूध येथें मिळत नाहीं. पण लोणी, अंडीं वगैरे सकाळीं ब्रेकफास्टच्या वेळीं मिळतें.

काल मार्कांचा भाव १२२० होता. मार्क दिवसेंदिवस स्वस्त होत चालला आहे व त्याबरोबर सर्व जिनसांच्या किंमती भराभर दिवसेंदिवस वाढत चालल्या आहेत.

आम्ही ज्यांच्या घरीं सध्यां उतरलों आहों, त्यांना माझ्याकरतां मुंबईहून एका गृहस्थांनीं पत्र लिहलें होतें व ते वाटेल तेव्हां मला मदत करतील असें त्यांनीं मला सांगितलें होतें. मीही दोनतीनदां बर्लिनहून त्यांच्याशीं

पत्रव्यवहार केला व त्यांच्या विषयीं पूर्वी माझें मत वेगळेंच होतें. पण त्यांची गांठ पडल्यापासून त्यांच्याशीं कोणत्याही तऱ्हेचा संबंध ठेवूं नये असं मला वाटूं लागलें आहे. आतां त्यांच्या घरीं उतरलों आहोंच त्याला इलाज नाहीं. एक तर हे गृहस्थ अतिशय दारू पिणारे व पुष्कळदां धुंदींत असतात. त्यांचे डोळे व चर्या दारूनें अगदीं खराब झालेली आहे. एवढ्यावरच ते थांबलेले नसतील. हिंदुस्थानांत व येथें अतिशय वाईट चालीनें ते राहात असले पाहि- जेत असें त्यांच्या बोलण्यावरून दिसलें. येथें आल्यापासून ते आम्हांला रात्रीं कॉन्सर्ट्स्, गायन वगैरे ऐकायला चला म्हणून रोज सुचवीत होते. येथील बंदरा- जवळ St. Paulis म्हणून जागा आहे तेथें सेलरस् व इतर खुशालचंद लोकां- करितां पुष्कळ काफे आहेत व आंत गाण्याबजावण्याची व्यवस्था आहे. रिकाम- टेकडे लोक रोज या ठिकाणीं येऊन या काफेंतून त्या काफेंत असे हिंडत अस- तात व वाटेल ते प्रकार येथें चालतात. आमच्या होस्टांच्या आग्रहावरून काल रात्रीं गायन ऐकण्याच्या हेतूनें म्हणून त्यांच्याबरोबर St. Paulisला गेलों. दर काफेमध्यें कांहीं तरी पेय घ्यावें लागलें. कोठें कॉफी, कोठें कोको व लेमोनेड, असें आम्ही दोघांनीं दोनतीन ठिकाणीं घेतलें व ते मात्र दर खेपेस दारू पीत होते. तेथील गाणेंबजावणें तर मला बिलकुल आवडत नव्हतें. आम्हांला झोंप यायला लागली म्हणून आम्ही घरीं जाण्याकरितां घाई करायला लागलों. पण तो दारूकरितां इतका वेडा झाला होता कीं, तो कांहीं केल्या ऐकेना. शेवटीं त्यानें इतकी दारू झोंकली कीं, त्याचा त्याच्यावर परिणाम होऊन तो हिंदुस्थानच्या राजनीतीसंबंधीं आमच्याशीं वादविवाद करूं लागला. त्याचीं मतें अगदीं अँग्लोइंडियनप्रमाणें आहेत. शेवटीं वादविवाद फारच जोरांत सुरू झाला, तेव्हां आम्ही गप्प बसलों व तो गृहस्थ बडबडत बसला. शेवटीं अति- शय आग्रह करून त्याला घेऊन रात्रीं दीड वाजतां घरीं परत आलों. असो. चांगला अनुभव मिळाला. पुन्हा म्हणून अशा काफेमध्यें आम्ही जाणार नाहीं. असो. काल संध्याकाळीं आम्ही येथून जवळ असलेल्या ब्लाकेनेझे नांवाच्या लहानशा डोंगरावर फिरायला गेलों होतों. फारच मजा वाटली. परवां येथील जनावरांची व झाडांची बाग पाहिली.

उद्यां दुपारीं आम्ही येथून निघून परत बर्लिनला जाऊं. इतक्यांतच

मला युनिव्हर्सिटीकडून कांहीं तरी जबाब येईल असें वाटत आहे. जबाब आल्यावर माझी सर्व व्यवस्था लागेल. व्यवस्था लागणें जरा कठिण असतें खरें; पण ती लागल्यावांचून राहात नाहीं. या बाबतींत गुरुदेव किंवा पियर्सन यांची विशेष मदत होईलसें वाटत नाहीं. स्वतःच खटपट करायला पाहिजे व ती मी करीत आहें.

चितळे म्हणून मुंबईच्या एका विद्यार्थ्याचें पत्र आल होतें. त्याच्या मनांत जर्मनींत कांहीं तरी धंदा शिकायला यायचें आहे व अद्यापपर्यंत तो केमिस्ट्री शिकला नाहीं. तेव्हां मी त्याला बिस्किटस्, confectionary व जॅम, प्रिझर्व्ह फ्रूटचा धंदा येथें येऊन शिकण्याबद्दल सुचवलें आहे. खरोखर माझ्या मतें हा धंदा हिंदुस्थानांत बऱ्याच लोकांनीं सुरू केला पाहिजे. कारण याला लागणारें सर्व साहित्य हिंदुस्थानांत आहे.

माझ्या मनांत वीरेश्वर नाग यांना हिंदुस्थानांतून निघण्यापूर्वी कांहीं तरी भेट म्हणून पाठवायचें होतें. पण त्या वेळीं कांहीं पाठवतां आलें नाहीं. म्हणून येथून एक दोन पौंड खर्चून त्यांच्याकरितां एखादा जिन्नस पाठवावा असा विचार करीत आहें. तुम्हांला कसें काय वाटतें ? येथून हिंदुस्थानांत परत जाणारा एखादा गृहस्थ भेटल्यास त्याच्याबरोबर मुंबईस तो जिन्नस पाठवण्याची व्यवस्था करीन व मुंबईहून पुढें शांतिनिकेतनला पोंचवावयाची सोय तुम्हीं करावी. डॉ. आठवले* येथें भेटतील असें नानांनीं लिहलें आहे. पण डॉ. आठवल्यांना जर्मनीस यायला पासपोर्ट मिळाला नसून ते लवकरच हिंदुस्थानांत परत येणार आहेत, असें मीं तेथें असतांनाच ऐकलें होतें. पुढें काय झालें माहीत नाहीं.

असो. आतां जास्त लिहीत नाहीं. हें पत्र बर्लिनला गेल्यावर टपालांत टाकीन. कारण येथून श्रीनिवासाकरितां कांहीं स्टँप पाठवावयाचे आहेत व आमचे फोटो एका लहान कॅमेरानें कर्वेनीं काढले आहेत तेही बर्लिनला गेल्याबरोबर मिळतील. बरे आले असले तर याच पत्राबरोबर पाठवीन.

कर्वे व मी अद्याप एकत्रच आहों. एप्रिलच्या पहिल्या तारखेपासून ते

* डॉ. चिं. रा. आठवले, नेत्र, कर्ण, नासिका–रोगचिकित्सक, मुंबई.

लाइपझिगला अभ्यासासाठीं जातील व मग आमची फाटाफूट होईल. फाटाफूट होण्यापूर्वी, म्यूलर, निकोलाई वगैरे आमच्या ओळखीच्या मंडळीबरोबर आमचा एक फोटो काढावा असा विचार आहे. काढल्यावर पाठवीन. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र ९८ वें

बर्लिन,

ता. २५-३-१९२२

ती. सौ. माईस शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना विशेष. तुमचें ता. ३-२-२२ चें पत्र ता. २३ ला येथें येऊन मिळालें. त्यांत माझें पत्र तुम्हांला न पोंचल्याबद्दल लिहलें आहे. बहुतेक तो आठवडा संपाचा होता व म्हणून येथून तें पत्र वेळेवर निघालें नसेल. त्यामुळें कदाचित् पोंचायला उशीर झाला असेल. माझ्याकडून मी पत्रें वेळेवर टाकीत आहें.

हॅंबुर्गहून परत आल्यावर चि. संगमलालला चित्रें पाठविलीं त्यांबरोबर एक पत्र पाठविलें होतें, तें मिळालेंच असेल. गेल्या आठवड्यांत मॉडर्न रिव्ह्यू व यंग इंडिया मिळाला. मला वाटलें यंग इंडिया आतां बंद पडला असेल. कारण पांचसहा दिवसांपूर्वी गांधींना सहा वर्षें शिक्षा झाल्याचें वाचलें. आतां सर्व हकीकत केसरींत वाचण्याची अपेक्षा करीत आहों. विशेषतः खटल्याची हकीकत कळण्यासंबंधीं फारच उत्सुकता वाटत आहे.

आमच्या खाण्याविषयीं तूं विचारलें आहेस. सध्यां आमच्या दोन खोल्या आहेत. एक बसायची व अभ्यासाची व दुसरी निजण्याची व तोंड धुण्याची. निजण्याच्या खोलींत आम्हां दोघांना दोन वेगळे पलंग आहेत व ते एकाच खोलींत आहेत.

आज दुपारीं आम्ही व्हेजिटेरियन किंवा शाकाहारी हॉटेलमध्यें जेवायला गेलों होतों. हिंदुस्थानांत शाकाहारी आम्ही,–तेव्हां म्हटलें पाहूं या तरी येथला शाकाहार कसा काय असतो तो. आम्ही जेव्हां जिना चढूं लागलों

तेव्हांच माझ्या मनांत अशी कल्पना आली कीं, आतां आपल्याला जे चेहरे दिसतील ते सौम्य व सात्त्विक असावेत व जेवीत असलेलीं सर्व माणसें स्वभावानें गरीब असावींत. आंत जों जातों तों तोच प्रकार! आंत कोणी हूं कां चूं करीत नव्हतें. कोणीही विडी ओढीत नव्हतें. आम्ही बसल्याबरोबर एक अतिशय सात्त्विक बाण्याची बाई आमच्यापुढें आली व 'काय पाहिजे?' असें तिनें विचारलें. तिची केंविलवाणी मुद्रा पाहून खरोखर आम्हांला तिची दया आली. 'गरीब बिचारी, किती दिवस तरी बिचारीला मांस खायला मिळालें नसेल,' असें आम्ही मनांत म्हणालों. नंतर समोरच्या कागदावर लिहिलेल्या यादींत पाहून आम्हीं त्यांतले कांहीं पदार्थ निवडून आणायला सांगितले, व ते येईपर्यंत इतर लोकांचें निरीक्षण करूं लागलों. प्रत्येक मनुष्य अगदीं केंविलवाणा व गोगलगाईसारखा गरीब दिसत होता. कोणांतही पाणी दिसत नव्हतें. प्रत्येकाच्या मनांत जणूं काय धार्मिक विचार चालू होते. एक 'Beg your pardon' मिशा असलेला मनुष्य जवळच होता, त्याच्या मिशासुद्धां अगदीं गळून पडल्या होत्या व एकंदरींत सर्व माणसांच्या अंगांत क्रौर्याचा, काठोर्याचा व क्रोधादि विकारांचा लोप झालेला दिसत होता. फक्त एकच मनुष्य क्रूर मुद्रेचा दिसत होता; पण त्याच्या तोंडावरही दुःखाची छटा होती. तेव्हां आम्ही असा तर्क केला कीं, बरेच दिवस गोहत्या करून त्याला पश्चात्ताप झालेला असावा व पापाचें क्षालन करण्याकरितां तो तेथें आला असावा. कारण तेथें आल्यावर पश्चाताप तरी सुचतो!! जेवण आम्हांला बिलकुल आवडलें नाहीं. आपण शाकाहारी जेवण जेवतों त्यांत व यांत बिलकुल साम्य नसल्यामुळें तें गचाळ लागलें. शेवटीं जेव्हां ती सात्त्विक वृत्तीची बाई पैसे मागायला आली, तेव्हां म्हटलें आतां किती पैसे घेते तें पाहूं या. हिशेब वगैरे करून साडेआकरा मार्क प्रत्येकाकडून घेतले. त्यावरून आमची अशी खात्री झाली कीं, हे शाकाहारी लोक इतके कमकुवत झालेले असतात कीं, पैसेसुद्धां सडकून घेण्याची यांच्या अंगांत धमक नाहीं. कारण इतर हॉटेलस्मध्यें पंचवीस तीस मार्क्स् चांगल्या जेवणाला द्यावे लागतात. तेव्हां शाकाहारी हॉटेलमध्यें जेवून आम्हांला जेवणाचें समाधान तर झालेंच नाहीं; पण पुरेसे पैसे दिल्याचेंही समाधान व्हावें तसें झालें नाहीं.

असो. आज दुपारीं आम्ही फ्रॉयलाइन स्युलर व फ्रॉयलाइन निकोलाई-बरोबर फोटो काढायला गेलों होतों. एका पंधरवड्यांत फोटो तयार होतील व मग मी ते तुम्हांला पाठवीन. त्याचप्रमाणें हॅंबुर्गला असतांना आम्ही आमच्या कमेरानें आमचे कांहीं फोटो काढले आहेत, त्यांतले दोनतीन यासोबत पाठवीत आहें. या फोटोवरून माझ्यांत थोडासा फरक झालेला तुम्हांला आढळून येईल. पाहूं या ओळखतो का तुम्हांला. आज काढलेला फोटो जर वाईट निघाला, तर 'आज शाकाहारी हॉटेलमधील जेवणानें अंगांत जोर न राहिल्यामुळें तो तसा निघाला,' अशी सबब लोकांना सांगण्याचें आम्हीं ठरवलें आहे.

आजच बाजपाईंचें पॅरिसहून पत्र आलें आहे. मागें मीं श्रीनिवासाला 'भारतवर्ष हमारा प्यारा' हें पद लिहून कळवायला सांगितलें होतें तें अद्याप मिळालें नाहीं. म्हणून पॅरिसला लिहून बाजपाईंकडून तें मागवीत आहें. त्यांना बहुधा येत असावें. मला त्याची चाल माहीत आहे, पण शब्द येत नाहींत. येथें आमच्या हिंदुस्थान असोसिएशनच्या सभेंत तें म्हणून दाखवण्यासारखें आहे.

आणखी एकदोन आठवड्यांत माझ्या युनिव्हर्सिटीच्या अर्जाचें उत्तर येईल. मग माझी सर्व सोय लागेल. बहुतेक डालेमच्या फार्मास्यूटिकल इन्स्टिट्यूटमध्यें प्रो. टॉम्सच्या हाताखालीं काम करावयाला मिळेल अशी आशा आहे. एप्रिल महिन्याच्या अखेर अभ्यासाला खरी सुरुवात होईल, तोंपर्यंत स्वस्थ बसावें लागेल. आतां तोंपर्यंत जर्मन शिकत आहें. ही भाषा कमालीची कठीण आहे. अद्याप आम्हांला विशेषसें बोलतां येत नाहीं. व्याकरणाच्या चुका किती तरी होतात. उद्यां सकाळीं डॉ. साळुंके यांनीं आम्हांला चहाला बोलावलें आहे व दुपारीं आमची मास्तरीण फ्रॉयलाइन निकोलाई इच्याकडे चहाला जायचें आहे. ('फ्रॉयलाइन म्हणजे जर्मनमध्यें 'Miss' मिस, व फ्राऊ म्हणजे 'Mrs.' मिसेस. मात्र फ्रॉयलाइन हा शब्द नपुंसकलिंगी आहे. म्हणजे कोंकणांत 'गो चेडवा, तूं कोठें गेलें होतेंस?' असें म्हणतात तें जर्मनदृष्ट्या बरोबर आहे. असो.)

काल मार्कांचा भाव १५५०–७५ होता. आज पुन्हा १४४५ आहे. परवांच मीं १४४५ला दोन पौंड मोडले. नानांनीं पाठवलेल्या पैशासंबंधानें

अद्याप कांहीं कळलें नाहीं. परवांच श्री. जोगेंद्र चौधरीनें मला सांगितलें कीं, " तुम्ही हिंदुस्थानांत घेऊन ठेवलेले मार्क खर्च न करतां दर वेळेस पौंड मोडतां हें बरोबर नाहीं, कारण मार्क पुन्हा ४००च्या जवळ जाईल अशी जर तुम्हांला आशा असेल तर ती व्यर्थ आहे. मार्क हल्लीं आहे असा नेहमीं राहील, फार तर ६००।७०० पर्यंत जाईल. पण त्यापूर्वीं कदाचित् २००० किंवा त्याहून स्वस्तही होईल. तेव्हां जसजसे दिवस जाताहेत तसतशी तुम्हीं घेऊन ठेवलेल्या मार्कांची किंमत कमी कमी होत चालली आहे, व तुम्ही आतां उगीच पौंड मोडीत आहां. आतांच जर जवळ असलेले मार्क खर्चाल तर पुढें कदाचित् २००० झाल्यावर तुमचे पौंड मोडल्यानें तुमचा फायदा होईल. मीं नुकतेंच वाचलें कीं, मार्क या नाण्याची किंमत अजिबात बदलून त्याला हल्लींची किंमत देऊन तें एक कायमचें नवीनच असें नाणें बनविणार आहेत. कारण पुढेंमागें जर मार्क पूर्वीप्रमाणें पौंडाला २० झाला, तर हल्लीं ज्या लोकांनीं लाखों मार्क विकत घेऊन ठेवलेले आहेत, त्यांचा कल्पनातीत फायदा व जर्मनीचा भयंकर तोटा होईल. असो. याविषयीं कोणालाच कांहीं अधिकारानें सांगतां येणार नाहीं. मोठमोठे अर्थतत्त्ववेत्ते सुद्धां या बाबतींत डळमळतात. तेव्हां पुन्हा मार्क ३–४ शें प्रमाणें तरी निदान होईल या आशेवर मीं माझ्या मार्कांना सध्यां हात न लावण्याचें ठरवलें आहे. तोटा झाला त्याला इलाज नाहीं व एवींतेवीं पुढें सर्व नशीबावर किंवा चान्सवर सोंपवलें पाहिजे; मग आपला हा मार्ग कां न स्वीकारा ?

असो. आज कांहीं जास्त लिहायचें नाहीं. तुमचीं पत्रें नेहमींप्रमाणें माझ्या बँकच्या पत्त्यावर यावीं. माझी तब्येत ठीक आहे. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र ९९ वें

बर्लिन,

ता. ३१ मार्च १९२२

ती. सौ. माईस शिरसाष्टांग नमस्कार. वि. वि. तुमचें ता. १०-३-२२ चें पत्र काल पोंचलें. मला धीर देण्याकरितां म्हणून मुद्दाम नानांनीं लिहिलें आहे.

पण आपण एकमेकांपासून फार लांब असल्यामुळें जेव्हां धीर पाहिजे असतो, त्या वेळीं तो मिळत नाहीं हें फार वाईट आहे. कारण बर्लिनला आल्यानंतर कांहीं दिवसांपर्यंत माझी फार निराशा होत गेली होती. बाकी आतां माझी चांगली सोय लागली आहे. दोनतीन दिवसांपूर्वी मला युनिव्हर्सिटीकडून व फार्मास्यूटिकल इन्स्टिटयूटच्या प्रो. टॉम्सकडून पत्रें आलीं. युनिव्हर्सिटीनें मला २८ एप्रिलला नांव दाखल करण्यास सांगितलें आहे व प्रो. टॉम्सनीं आपल्या लॅबोरेटरींत माझ्याकरितां एक जागा राखून ठेवल्याचें कळविलें आहे. मे महिन्याच्या आरंभापासून कामाला सुरुवात होईल असें दिसतें. कारण सध्यां मला कांहींच काम नाहीं. वेळ जवळ जवळ फुकटच जातो. कारण जर्मनचा अभ्यासही हल्लीं बंद आहे. आतां एखाद दुसरा मास्तर शोधून काढून पुन्हा जर्मनचा अभ्यास सुरू केला पाहिजे; म्हणजे वेळेचा सदुपयोग होऊन भाषाही चांगली येईल. आजच एक बिऱ्हाड बघून आलों. इन्स्टिटयूटपासून अगदीं जवळ आहे व जागा फार छान आहे. घरची मंडळीसुद्धां फार चांगली व सुशिक्षित दिसली. घरांत कोणालाही इंग्रजीचें एक अक्षरही येत नाहीं, त्यामुळें मला जर्मनमध्यें बोलणें भाग पडेल व मी जर्मन लवकर शिकेन. जेवणखाण व राहणें मिळून महिना २००० मार्क द्यायचे ठरवले आहेत. म्हणजे हल्लींच्या भावानें पंचवीस रु. होतात. इन्स्टिटयूटची व युनिव्हर्सिटीची फी व इतर खर्च मिळून महिना ३००० मार्क खर्च होतील, असा अंदाज आहे. १ मे पासून ही नवी जागा मला मिळणार आहे. तोंपर्यंत मी हल्लींच्या ठिकाणींच राहीन. हल्लीं मार्कांचा भाव साधारण १००० इतका असतो.

फोटोविषयीं मीं गेल्या आठवडयांत लिहिलेंच आहे. तुम्हीही म्हटल्याप्रमाणें आपले फोटो पाठवावेत. मीं नानांचा विलायतेंत असतांनाचा एक फोटो बरोबर आणला आहे. फ्रॉ. म्युलरला आमच्या घरच्या माणसांचे फोटो पाहाण्याची फार इच्छा असते. विशेषतः बायकांचे फोटो पाहायची तिला फार मजा वाटते. कारण आपले पोषाख त्यांना विचित्र वाटतात.

फ्रॉयलाईन म्युलरकडे दर आठवड्यांतून कमींत कमी एकदां तरी जातों व तेथें आंघोळ करतों. या शनिवारीं संध्याकाळीं तिनें बरीच मंडळी आपल्या घरीं चहाला बोलाविली आहेत व आम्हांसही बोलाविलें आहे. मला अशाच

एका प्रसंगीं गेल्या खेपेस तिनें हिंदी गाणें म्हणायला सांगितलें होतें व त्याप्रमाणें मीं एक दोन पदें म्हटलीं. जर्मन लोकांना आपली गाण्याची पद्धत मुळींच आवडत नसावी असा माझा तर्क आहे. तरी आपले ते माना डोलवतात–केवळ आम्हांला खूष करण्याकरितां. त्याचप्रमाणें गेल्या रविवारीं संध्याकाळीं फ्रॉ. निकोलाईच्या येथें चहाला गेलों होतों, तेथेंही गाण्याचा प्रसंग आला. त्याच वेळीं फ्रॉ. निकोलाईची एक मैत्रीण आपल्या लहानशा मुलाला घेऊन तेथें आली व तिनें कांहीं जर्मन गाणीं म्हणून दाखविलीं व फ्रॉ. निकोलाईनें बरोबर पियानो वाजविला. इकडे गायला सांगितलें असतां कोणीं आपल्या गवयांप्रमाणें आढेवेढे घेत नाहींत, ही एक गोष्ट मला आढळून आली. म्हणायला सांगितल्याबरोबर ज्याला येत असेल तो ताबडतोब पियानोजवळ जाऊन म्हणायला सुरुवात करतो. बरें येत नाहीं असें त्यानें सांगितलें तर कोणी त्याला म्हणायला आग्रह करीत नाहीं. दुसरी एक गोष्ट म्हणजे यांच्याकडे अशीं बरींचशीं पदें आहेत कीं, तीं प्रत्येकाला–, निदान पुष्कळांना–येत असतात व त्यामुळें पुष्कळदां तीं सर्व एकदम (कोरस) म्हणतात. शिवाय प्रत्येक पदाचे स्वर लिपीधार झालेले असल्यामुळें त्यांत गवयाला आपल्या इच्छेनुरूप फेरफार करतां येत नाहीं. त्यामुळें कोणत्याही दोन गवयांच्या गाण्यांमधला फरक म्हणजे त्यांच्या आवाजांतच काय असेल तो. म्हणण्यांत कांहीं एक फरक नसावयाचा. तिसरी गोष्ट म्हणजे गवई कोणतें गाणें म्हणणार आहे, तें प्रेम, दुःख, राग, आनंद, हास्य यांपैकीं कोणत्या रसाचें आहे, ही गोष्ट श्रोतृवृंदाला अगोदर कळण्याची फार इच्छा असते व त्याप्रमाणें ऐकण्यापूर्वी ते स्वतःच्या मनाची तयारी करतात. म्हणून मला जेव्हां येथें एखादें मराठी किंवा बंगाली पद म्हणायला सांगतात तेव्हां अगोदर त्याचा अर्थ विचारतात. त्यामुळें मी साधारणपणें खाडिलकरांचीं पदें म्हणण्याचें धारिष्ट करीत नाहीं. कारण त्यांचा अर्थ कोणीं लावावा? या लोकांना अशी कल्पना मुळींच होत नाहीं कीं, महाराष्ट्रांत हजारों लोक खाडिलकरांच्या पदांचा अर्थ मुळींच न करितां केवळ त्यांच्या चालींवरून त्यांची वाहवा करीत असतात, किंवा हिंदुस्थानांत गवई पदें म्हणतात त्यांत अर्थाचा भाग फारच थोडा असतो. खरेंच युरोपियन गाण्याच्या अर्थाची आठवण झाली कीं, परवांच

वाचलेल्या ' जिरोम के. जिरोम 'च्या पुस्तकांतल्या एका गोष्टीची आठवण होते. विलायतेंत एका सभेंत एक जर्मन गवई जातो व तेथें त्याची ओळख दोघे चावट इंग्लिश मुलगे करून देतात व त्याचें एक दुःखाचें पद म्हणायला सांगतात. इकडे श्रोत्यांना ते मुलगे असें सांगतात कीं, ' आतां हा गवई एक हास्यरसपूर्ण गाणें म्हणणार आहे, पण या गाण्यांत मजा ही आहे कीं गवई स्वतः मुळींच हंसत नाहीं व मुद्दाम दुःखी चेहरा करतो, त्यामुळें तर हास्यरस आणखी वाढतो. ' इतकें सांगून ते मुलगे निघून जातात व गवई गायला लागतो. श्रोते अगोदरपासून हसण्याकरितां तयार झालेलेच असतात. पद जर्मन असल्यामुळें तें कोणालाच कळत नाहीं व तें हास्यरसपूर्ण आहे, असें समजून सर्वजण पोट धरधरून हंसूं लागतात व गवई सारखा चिडत असतो. कारण त्याचें गाणें खरें दुःखाचें असतें. शेवटीं गवई संतापानें लाल होऊन सगळ्यांना शिव्या देऊं लागतो व मग सर्व प्रकार लोकांना कळतो. असो. पुढेंमागें माझी थोडेंसें जर्मन-गायन निदान वाद्य तरी शिकायची इच्छा आहे. पाहूं या जमतें का !

येथील बऱ्याचशा लोकांची हिंदुस्थानांतले बहुतेक लोक बुद्धधर्मावलंबी आहेत अशी कल्पना असते. पुष्कळांना तर डॉ. रवींद्रनाथ टागोर हेही त्याच धर्माचे आहेत असें वाटतें. त्याचप्रमाणें बुद्ध लोक मांसाहार करीत नाहींत, अशी सुद्धां या लोकांची समजूत असते. माझीही पूर्वी तशीच समजूत होती. पण कोलंबोला आम्हीं किती तरी बुद्ध लोक पाहिले, ते सर्व मांसाहार करीत असत.

काल आम्ही ओस्कार वाइल्डच्या एका नाटकाला गेलों होतों.

येथें एकंदरींत बायका फार काम करतात. आम्हीं आतांपर्यंत ज्या बायका पाहिल्या त्यांवरून तरी मला असें वाटतें. शिवाय पुष्कळ म्हातारपणीं सुद्धां स्वयंपाकापासून तों केर काढण्यापर्यंत सर्व कामें त्याच करतात. आतां फ्रॉ. म्युलर ५८ वर्षांची आहे. पण सारखी काम करीत असते. इतकेंच नव्हे तर तिच्या अंगांत एखाद्या तरुण बाईइतकी चपळाई आहे. पुष्कळदां ती धांवतेही. चालतांना आमच्या बरोबर चालते किंवा पळायला सुद्धां तिची हरकत नसते. त्याचप्रमाणें हॅंबुर्गला मि. श्लूटर यांची ८० वर्षांची आई आमचें जेवणखाण वगैरे सर्व पाहत असे. त्याचप्रमाणें हल्लीं आम्ही ज्या बाईच्या घरीं

आहों ती सुद्धां फार काम करते. ती विधवा आहे व तिचीं दोन लहान मुलें आहेत. तिचा नवरा लढाईंत वारला. तिनें कांहीं खोल्या भाड्यानें घेतल्या असून आमच्यासारखे आणखी दोन चार भाडेकरी तिच्या येथें आहेत. एवढ्या सगळ्यांना सकाळचें ब्रेकफास्ट व रात्रींचें सपर ती करून देते व शिवाय इतर कामें, तोंड धुण्याचें पाणी नेऊन टाकणें, बिछाने घालणें, आंघोळीची व्यवस्था करणें वगैरे सर्वांचीं कामें ती करते. यामुळें आमच्या सारख्या भाडेकऱ्यांचीही सोय होते व विधवा बायांना पैसे मिळून आपलीं पोटेंही भरतां येतात. त्याचप्रमाणें पुष्कळशा कुटुंबांत विद्यार्थी राहतात, त्यांत सुद्धां विद्यार्थ्यांचा व त्या कुटुंबाचा दोघांचाही फायदा होतो. येथें स्वयंपाक बहुतेक ठिकाणीं गॅस-वर करतात. गॅस-स्टोव्हज् कमरेइतके उंच असतात व उभें राहून सर्व काम करावें लागतें, त्यामुळें बरेंच सोईस्कर पडतें.

ता. १-४-१९२२

अलीकडे एकदोन आठवडे–म्हणजे आम्ही हॅंबुर्गहून परत आल्यापासून पुन्हा थंडी व बर्फ पडूं लागलें आहे. मी लोंकरीचे आंत अंगाबरोबर घालायचे कपडे सोडून दिले होते ते पुन्हा घालावे लागत आहेत. आतां उन्हाळा केव्हां येईल असें झालें आहे. तुमच्या पत्रावरून तुमच्याकडे उन्हाळा सुरू झाला असें दिसतें. तुम्ही एकटेच सर्व उन्हाळा घेऊन बसतां हें बरोबर नाहीं. त्यांतला थोडासा आमच्याकडे पाठवून दिल्यास बरें होईल.

आज संध्याकाळीं फ्रॉ. म्युलरनीं आम्हांला कॉफीला बोलाविलें होतें व इतर बरीच मंडळी बोलावली होती. दोन मुली होत्या, त्यांपैकीं एक येथील टेक्निकल इन्स्टिट्यूटमध्यें केमिस्ट्री शिकत असते. कॉफी वगैरे आटोपल्यावर एका मुलीनें आम्हांला जर्मन पदें म्हणून दाखविलीं. एकंदर पुष्कळ गप्पा मारायला मिळाल्या. पुष्कळदां आम्हांला जर्मन नीटसें समजत नाहीं व एखाद्या जर्मन थट्टेची किंवा कोटीची मजाही बरोबर कळत नाहीं. हळू हळू सवयीनें येऊं लागेल.

माझा मित्र ज्योतिषचंद्र रॉय सुद्धां बर्लिनमध्येंच असतो. त्याची माझी मधूनमधून गांठ पडते. असो. या आठवड्याला आणखी कांहीं लिहिण्या-

सारखें नाहीं. यंग इंडिया या आठवड्याला कसा आला नाहीं? आज मार्कांचा भाव १२९९ आहे. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र १०० वें

बर्लिन,

ता. ८-४-२२

ती. सौ. माईस शि. सा. न. वि. वि. तुमचें ता. १७-३-२२चें पत्र ५-४-२२ला पोंचलें. येथें सध्यां डॉ. नाडगीर, डॉ. आठवले आले आहेत. ते लवकरच हिंदुस्थानास परत जात आहेत. त्यांच्याबरोबर कांहीं जिनसा पाठवीत आहें. लहानशी सुंदर उत्तमपैकीं चामड्याची हँडबॅग वीरेश्वरबाबूंना देण्याकरितां खरेदी केली आहे व तीवर त्यांचें नांव घातलें आहे. ती बॅग फारच सुंदर दिसते. शक्य झाल्यास तुम्ही ती मुंबईस पाहा. तिला नांवासकट २०० मार्क पडले. त्याचप्रमाणें तांबेकरच्या बायकोकरितां एक शिवण्याच्या सामानाची पेटी घेतली आहे व तांबेकरकरितां एखादा फाउंटन पेन घेण्याच्या विचारांत आहें. या तिन्हींचा मिळून खर्च जवळजवळ ४००० मार्क (२॥ पौंड किंवा पस्तीस छत्तीस रु.) होणार आहे. हा खर्च करायला तुमची परवानगी आहे असें धरून चालतों. या वस्तू पाठवण्याची संधि पुन्हा लवकर येणार नाहीं व येथें सध्यां वस्तू चांगल्या व स्वस्त मिळतात, त्यांचा फायदाही घेतलेला बरा. तुमच्या करतांही कांहीं जिनसा घेऊन पाठवावयाचा विचार करीत आहें. पण काय घ्यावें हें अद्याप ठरवलें नाहीं. नानांनीं सुचवल्याप्रमाणें चाकू, कात्री किंवा वस्तरे वगैरे चांगले मिळाल्यास पाठवीन. येथें हिंदुस्थानांतून एक अँग्लोइंडियन आले आहेत. त्यांनीं, एक सायकल, पियानो, वस्त्रें व इतर किती तरी सामान खरेदी केलें आहे. त्यांवर कर देऊन सुद्धां हिंदुस्थानांतल्या विलायती सामानापेक्षां तें किती तरी स्वस्त पडतें.

वर लिहलेली वीरेश्वरबाबूंना पाठवलेली हँडबॅग शक्य तितक्या लवकर त्यांजकडे शांतिनिकेतनास पोंचवण्याची व्यवस्था करावी, व तिची फार काळजी

घ्यावी. चामड्यावर डाग वगैरे पडूं देऊं नये. कलकत्त्यास जाणारा कोणी तरी भेटेलच, त्याच्याबरोबर पाठवावी व आगगाडींत हरवेल किंवा चोरीस जाईल त्याबद्दल विशेष काळजी घेण्यास सांगावें.

हल्लीं थंडी साधारण असते. दिनकर कर्वे चारपांच दिवसांपूर्वी लाइप्झिगला निघून गेला. आज जरा घाईंत आहें तेव्हां जास्त लिहीत नाहीं. रा. भागवत* म्हणून एक गृहस्थ नुकतेच येथें येऊन माझ्याकडे उतरले आहेत व त्यांना माझ्याकडून होईल तितकी मदत मी करीत आहें. ते येथें कांहीं तरी धंदा शिकण्याकरितां आले आहेत. असो. मी बरा आहें. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र १०१ वें

बर्लिन,

ता. १३-४-२२

ती. नानांस बालकें श्यामकान्ताचे दोन्ही कर जोडून त्रिकाल चरणीं मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना विशेष. तुमचीं ता. २४-३-२२ चीं पत्रें आज संध्याकाळीं पोंचलीं. आज गुरुवार आहे. गेल्या मंगळवारीं माझें गेल्या खेपेचें टपाल तुमच्याकडे रवाना झालें व हें पत्र येत्या मंगळवारीं ता. १८-४-२२ला येथून निघेल.

मी बर्लिनसारख्या मोठ्या शहरांत राहूं नये हें तुमचें मत अगदीं बरोबर आहे. एक तर एवढ्या मोठ्या शहरांत आगगाड्या, मोटारी, ट्रॅम्स् यांच्या गजबजाटामध्यें अभ्यास बरोबर होत नाहीं. शिवाय बहुतेक हिंदी विद्यार्थी येथें असल्यामुळें त्यांच्याशीं जास्त मिसळण्याची व त्याबरोबर जर्मन लोकांशीं कमी मिसळण्याची संवय लागते व त्यामुळें जर्मन भाषा व आचारविचार कळावे तितके कळत नाहींत. येथें पुष्कळसे बरे वाईट हिंदी लोक आहेत व प्रत्येकाशीं जपून वागावें लागतें. कारण कोण कसा आहे, हें कांहीं एकदम सांगतां येत

---

* डॉ. भागवत, हल्लीं मुंबईस आहेत.

नाहीं. विशेषतः एवढ्या मोठ्या शहरांत मनोवेधक प्रकार (Temptations) फार आहेत व त्यांना बळी पडलेले कांहीं हिंदी विद्यार्थीही येथें सांपडतात. शिवाय, जर्मनींतील इतर कोठल्याही जागेपेक्षां बर्लिनमध्यें महागाई जास्त आहे. यांशिवाय सर्व दृष्टींनीं बर्लिन सोडणें चांगलें असा मीही विचार करीत होतों. पण प्रथम मला कोठल्याही लॅबोरेटरींत प्रवेश मिळण्यास अडचण पडूं लागली म्हणून जेथें जागा मिळेल तेथें अगोदर शिरून मग पुढच्या टर्म-पासून भाषेची माहिती झाल्यावर दुसरीकडे जावें असा मीं विचार केला व मी अगदीं निराश झालों असतांना फार्मास्यूटिकल इन्स्टिट्यूटच्या प्रो. टॉम्सनीं जेव्हां मला आपल्या लॅबोरेटरींत घेण्याचें कबूल केलें, तेव्हां दुसरा तिसरा कांहीं एक विचार न करितां मी निदान एका टर्मपुरतें सध्यां येथेंच राहण्याचा बेत केला. परंतु मी ज्या इन्स्टिट्यूटमध्यें जाणार आहें तेथें पोंचण्यास आगगाडीनें एक तास लागतो व तेथें शहराचा गजबजाट वगैरे कांहीं नसून जागा शांत व हवेशीर आहे. जवळच बोटॅनिकल बाग असून बऱ्याचशा इतर इन्स्टिट्यूटस्सुद्धां जवळच आहेत. तेथें राहिलें म्हणजे खेड्यांत राहिल्यासारखें होऊन शहर फार लांब नसल्यामुळें शहराचे फायदेही मिळण्यासारखे आहेत. अद्याप माझ्या कामाला सुरुवात झाली नाहीं. एक दोन दिवसांत प्रोफेसरांच्या पत्राची वाट पाहात आहें. मेच्या १ ल्या तारखेपर्यंत सुरुवात होईलसें वाटत नाहीं.

विनयबाबूंना तुमचें पत्र आजच पाठवलें. आतां लग्न झाल्यापासून त्यांनीं आपलें पहिलें बिऱ्हाड बदलून दोघांना राहण्याजोगी जागा घेतली आहे. लग्नानंतर त्यांना मी अद्याप भेटलों नाहीं. त्यांच्याबद्दल मी जें तुम्हांला लिहिलें होतें त्यांत विशेष वाईट असें कांहीं लिहिण्याचा माझा हेतु नव्हता. तुम्ही हिंदुस्थानांत त्यांच्याविषयीं आम्हांला जें कांहीं सांगितलें होतें, त्यावरून व त्यांच्या मॉडर्न रिव्ह्यूंतील लेखांवरून वगैरे त्यांच्याविषयीं जी आमची एक अतिशय उच्च कल्पना झाली होती, ती त्यांना भेटल्यानंतर थोडीशी बदलली एवढेंच. ते विद्वान आहेत, उद्योगी आहेत व बरेंच उपयुक्त काम करीत आहेत हें आम्ही जाणून आहोंत. त्यांची जेव्हां जेव्हां गांठ पडते तेव्हां तेव्हां ते स्वतःची जी जाहिरात करतात व त्याचप्रमाणें येथील जर्मन किंवा हिंदी पत्रां-

मध्येंही अशाच तऱ्हांचे त्यांचे जे लेख येतात, त्यांमुळें आम्हांला पहिल्यानें कसेंसेंच वाटलें व मोठ्या मोठ्या व खरोखर विद्वान असलेल्या माणसांना असें करणें शोभत नाहीं अशी पूर्वीपासून ठाम समजूत असल्यामुळें, त्यांच्याविषयीं आम्हांला जो अतिशय उच्च आदर होता तो थोडासा कमी झाला एवढेंच. याविषयीं मी व कर्वेच काय तें बोललों व आम्हीं आपआपसांत टीका केली. त्यांच्याशीं आम्हीं अगदीं अदबीनें व शिष्टाचारानें वागतों, व इतरांशीं त्यांच्याविषयीं बोलतांनाही जपूनच बोलतों, व खरें म्हटलें असतां त्यांच्याविषयीं आमचें मन कलुषित झालें आहे असें मुळींच नाहीं. असो. माझें काय म्हणणें आहे हें तुम्हांला समजलेंच असेल.

जगांत पुष्कळ स्वभावांचीं माणसें सांपडतात व मोठ्या मोठ्या विद्वान व विचारी लोकांमध्यें सुद्धां इतके मतभेद व एकमेकांविषयीं इतकी मत्सरी भावना दिसून येते कीं, कोणाचें अनुकरण करावें हेंच पुष्कळदां कळत नाहीं. सहज चट्टोपाध्यायांशीं परवां बोलतां बोलतां रवींद्रनाथांचा प्रश्न निघाला. त्याबरोबर त्यांनीं ' impotent ' वगैरे बऱ्याचशा शिव्या रवींद्रनाथांना हंसडल्या. त्या दिवशीं विनयकुमारसुद्धां रवींद्रनाथांच्या ' Post Office ' या नाटकाची थट्टा करीत होते. बाकी त्याबरोबरच त्यांच्या इतर नाटकांची त्यांनीं बरीच स्तुतिही केली. इकडे चट्टोपाध्याय व त्यांचे साथीदार खानखोजे हे विनयकुमारांवर आपलीच टिमकी वाजवीत असल्याबद्दल मनसोक्त भडिमार करीत होते. त्याचप्रमाणें गांधींचीं मतें व वागणूक हीं रवींद्रनाथांस बरोबर वाटत नाहींत. रवींद्रनाथांच्या कवितेची थट्टा करणारे लोकही बंगालमध्यें कमी नाहींत. एकंदरींत रवींद्रनाथांनीं आपल्या एका निबंधांत म्हटल्याप्रमाणें ' परनिंदा करणें व त्यापासून सुख अनुभवणें हा मनुष्याचा धर्मच दिसतो. ' असो. याविषयीं विचार करावा तितका थोडाच. सर्वांचें ऐकून घेऊन सदसद्विवेकबुद्धीस अनुसरून आपल्याला चांगलें दिसेल तें आपण करीत राहवें हेंच उत्तम.

येथें पुष्कळदां रीतीरिवाजांमध्यें आमच्या हातून चुका होतात व मागाहून त्या कळल्या म्हणजे वाईट वाटतें. परदेशांतील सगळे रीतीरिवाज अंगवळणीं पडण्यास वेळ लागेल.

गुर्जरांच्या ज्योतिषाविषयीं मला फारसा भरंवसा वाटत नाहीं. आतां-पर्यंत त्यांचीं बरींचशीं भविष्यें खोटीं ठरलीं. व्हिलेपार्ल्यास असतांना त्यांनीं आमच्याविषयीं जीं भविष्यें वर्तवलीं होतीं, त्यांकडे आतां पाहिलें म्हणजे तीं बहुतेक खोटींच ठरलीं असतील असें मला वाटतें. तें कांहीं असलें तरी त्यांनीं वर्तवलेलें भविष्य खरें करून दाखवण्याइतकी पात्रता माझ्या अंगीं येवो एवढीच माझी इच्छा आहे.

कालच आबांचें व भाऊचं पत्र आलें. त्यांत डॉ. गणपतराव किर्लो-स्कर* वारल्याचें वर्तमान कळून सखेदाश्चर्य वाटलें. ते इतक्या लवकर जातील असें स्वप्नींसुद्धां वाटलें नव्हतें. चांगलीं चांगलीं निर्दोष व सद्‌गुणी माणसें अल्पायुषी होऊन मरूं लागलीं म्हणजे ईश्वरापाशीं न्याय नाहीं असेंच वाटूं लागतें व या न्यायाचा अभाव पदोपदीं दृष्टोत्पत्तीस आल्यामुळें 'दयाळु' व ' न्यायशील ' परमेश्वराच्या अस्तित्वाविषयींसुद्धां शंका उत्पन्न होते. असें कोणीं जवळचें मेलें म्हणजे नाना तऱ्हांच्या विचारांचा कल्होळ माझ्या मना-मध्यें माजतो व त्या विचारांत जितकें जितकें खोल शिरावें तितकें तितकें जास्तच भांबावल्यासारखें होतें.

साठ पौंड पाठवल्याबद्दल तुमचें पहिलें पत्र येऊन एक महिना होऊन गेला. खरें म्हटलें म्हणजे पत्राबरोबरच पैसे मिळायला पाहिजे होते. फार तर बँकांच्या पत्रव्यवहारांमुळें एखाददुसरा आठवडा उशीर लागला असता. पण अद्याप पैशांचा कांहींच पत्ता नाहीं याचा अर्थ कळत नाहीं. Mr. Schmitz यांनीं लिहिलें होतें कीं, पोलंडच्या त्यांच्या एका फर्मकडे ते पैसे पाठवले आहेत व तेथून ते माझ्या बँकेकडे पाठवले जातील व बँकेकडून मला पत्र येईल. पण ज्याअर्थीं अद्यापपर्यंत बँकेकडून कांहीं एक पत्र नाहीं त्याअर्थीं कांहीं तरी घोटाळा झाला असावा असें मी सुचवतों. तुम्ही याविषयीं चौकशी करावी व शक्य असल्यास Mr. Schmitz यांनीं कोणत्या फर्मकडे पैसे पाठवले होते त्याचा पत्ता मला कळवावा, म्हणजे त्या फर्मला पत्र लिहून मी

---

* सोलापूरचे डॉ. वा. का. किर्लोस्करांचे द्वितीय पुत्र, अँथ्रॅक्सनें भरज्वानीत एकाएकीं वारले.

चौकशी करीन. त्याप्रमाणें कव्यांकरितांही पैसे पाठवले आहेत त्यांचाही पत्ता नाहीं.

आबांनीं Schmitzविषयीं येथें कसें मत आहे तें विचारलें होतें. Schmitzची माहिती असलेला कोणीही इसम अद्याप मला भेटला नाहीं. परवां Schmitzनीं शिफारस केलेल्या Curt von Grenberना मी भेटायला गेलों होतों, पण त्यांनाही ते व्यक्तिशः माहित नाहींत. त्यांची आमची ओळख व व्यवहार केवळ पत्रांनींच होतो असें सांगून उलटे तेच मला त्यांच्याविषयीं माहिती विचारूं लागले. एक हांबुर्गच्या Schiierची व त्यांची ओळख दिसली. पण त्यांच्याकडून फारशी माहिती मिळाली नाहीं.

जर्मनींत आपला भयंकर अधःपात झाल्याची जाणीव प्रत्येकास आहे, पण पुन्हा भाग्योदय होण्याची आशा देखील पुष्कळांना वाटते. येथले लोक फार हालअपेष्टा सोशीत आहेत व मार्कांचा भाव जसजसा कमी होत आहे तसतसा जर्मनीला जास्त जास्तच चिमटा बसत आहे. कारण मार्क खालीं जाण्याबरोबर जिनसांच्या किंमती वाढतात; पण त्याच प्रमाणांत मजुरांचे व कारकुनांचे पगार वाढवणें शक्य नसल्यानें लोकांना पुरेशा जरुरीच्या वस्तू विकत घेतां येत नाहींत. इकडे परदेशी लोक जर्मनीच्या जिवावर वाटेल तशी चैन करीत आहेत. जर्मनी पराजित देश असल्यामुळें परदेशी लोकांवर पाहिजे तसा दाब जर्मन राष्ट्राला ठेवतां येत नाहीं. नाण्याच्या भावांमधील घडामोडी आपल्या फायद्याकरितां व मित्रराष्ट्रांना फजीत करण्याकरितां जर्मनी मुद्दाम करीत आहे असा जो पुष्कळांचा समज आहे तो चुकीचा आहे. कारण मार्क स्वस्त झाल्यानें जर्मनीचा फायदा नसून उलटें नुकसानच आहे. या बाबतींत आमची बँक एक इंग्रजी मासिक व जर्मन साप्ताहिक प्रसिद्ध करते व तीं दोन्ही माझ्याकडे फुकट येतात. गेल्या महिन्याचें मासिक बुक पोष्टानें पाठवीत आहें व पुढें नियमितपणें तुम्हांला तें पाठवण्याचा इशारा आमच्या बँकेला देत आहें. जर्मन लोकांना इंग्रजी बरोबर लिहितां येत नाहीं. पुष्कळ ठिकाणीं या मासिकामध्यें तुम्हांला कदाचित् असें आढळून येईल कीं, जरी भाषा व्याकरण-शुद्ध आहे, तथापि इंग्लिश मनुष्यानें किंवा हिंदी मनुष्यानें लिहिल्याप्रमाणें ती कानाला बरोबर लागत नाहीं. भाषेचा प्रश्नच उद्भवला म्हणून येथें जर्मन

भाषेविषयीं एकदोन शब्द लिहावेसे वाटतात. जर्मन भाषेतील वाक्यांची रचनाही इंग्रजी रचनेपेक्षां अगदीं वेगळी आहे. शिवाय त्यांचीं स्पेलिंगस् सुद्धां बरींच वेगळीं आहेत. पण जसें स्पेलिंग तसा उच्चार या नियमाला मात्र अपवाद नाहीं. म्हणून जर्मन लिहितांना इंग्रजीप्रमाणें स्पेलिंगच्या चुका होण्याचा संभव नसतो. मात्र त्यामुळें आमचें इंग्रजी स्पेलिंग व आमच्या इंग्रजी वाक्यांच्या रचना यांवर बराच परिणाम होण्याचा संभव आहे. इंग्रजी बोलतांना तर सध्यां आमच्या तोंडून चुकून पुष्कळदां वाक्यरचना जर्मन-प्रमाणें होते.

ता. १४–४–१९२२

आज हवा फारच सुरेख पडली आहे. आज सकाळीं खोलीच्या बाहेर पडतांच गरम गरम हवा लागली. बाहेरच्या पेक्षां खोली थंड होती. ऊन पडलें होतें व ओव्हरकोट घालण्याची बिलकूल जरूर वाटत नव्हती. अगदीं उन्हाळ्याची हवा पडली होती. संध्याकाळीं मी व फॉ. म्युलर व तिचे बंधु डॉ. बेकेंबाख असे फिरायला गेलों होतों व त्यांच्या येथें कॉफी घेतली. अशीच हवा नेहमीं राहील तर मजा होईल.

ता. १६-४-१९२२

अलीकडे दोन तीन दिवस हवा गरम व ऊन्ह कडक पडलें आहे. काल तर जरा वाजवीपेक्षां जास्तच उकाडा भासत होता. काल संध्याकाळीं एक गवई विद्यार्थी दिलीपकुमार राय यांच्या घरीं मला चहाचें आमंत्रण होतें. तेथें बरीच मंडळी जमली होती. त्यांत येथील चट्टोपाध्याय यांचे धाकटे भाऊ (सरोजिनी नायडूंचे बंधु) व त्यांच्या पत्नी असे होते. हे चट्टोपाध्याय फारच चांगले गवई आहेत. त्यांचा हिंदुस्थानांत असतांना गाण्याचा व्यासंग असला पाहिजे. ते हैद्राबादचे असल्यामुळें तेथें मोठमोठ्या गवयांच्या सहवासानें त्यांना हा फायदा झाला. त्यांचें व रॉय यांचें गाणें ऐकून मी अगदीं तल्लीन झालों; व चट्टोपाध्याय यांचें हिंदुस्थानी गाणें मला इतकें आवडलें, कीं पुन्हा केव्हां तरी तें ऐकायला त्यांच्या घरीं जायचें मीं ठरवलें आहे. रॉय लवकरच बर्लिन

सोडून युरोपांत हिंडून हिंदुस्थानास परत जाणार आहेत. काल मींही दोन-तीन पदें म्हटलीं तीं सर्वांना आवडलीं.

ता. १७-४-१९२२

परवां आम्हीं एक रशियन कॉन्सर्ट पाहायला गेलें होतों. जवळ जवळ तेहतीस मंडळी–पुरुष व बायका–उभे राहून कोणत्याही वाद्याची मदत न घेतां (फक्त vocal music) कोरस गात होती. मला तें फार आवडलें. पण माझ्यापेक्षां किती तरी पटींनीं तेथील युरोपियन श्रोत्यांना तें आवडलें. टाळयांच्या गजरांनीं व आरोळ्यांनीं लोकांनीं गवयांचा इतका गौरव केला कीं, कांहीं बोलून सोय नाहीं. गाण्याचें इतकें appreciation आपल्याकडे नसावें असें वाटतें. इकडे गाणाऱ्यांच्या गळ्यांना विशेष तऱ्हेचें शिक्षण दिलें जातें व त्यामुळें गळे फारच तयार असतात. कंठ तयार करण्याकडे आपल्या देशांत असें लक्ष दिलें जात नाहीं.

असो. काल रात्रीं दिलीप रॉयना निरोप देण्यासाठीं म्हणून सर्व हिंदी लोकांची सभा भरली होती, तेथें रॉयचें गाणें झालें. मींही एक म्हटलें. माझा गळा त्यांच्यापुढें अगदींच कोता पडतो. विनयबाबू सस्त्रीक भेटले. त्यांनीं परवांच्या दिवशीं चहाला बोलाविलें आहे. तुमचें पत्र त्यांना दिलें. माझ्या मनांत आणखी बरेंच लिहायचें होतें, पण आतां वेळ नाहीं व पत्रही फार जड होईल म्हणून पुढच्या आठवड्यास लिहीन. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र १०२ वें   बर्लिन,

ता. १ मे १९२२

ती. सौ. माईस शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना विशेष. तुमचें पत्र गेल्या आठवड्यास वेळेवर पोंचलें. आतां परवांच्या दिवशीं तुमच्या पुढच्या पत्राची वाट पाहात आहें. मी दर मंगळवारीं पत्रें पोष्टांत टाकतों व तुमचीं पत्रें बुधवारीं येथें येतात. तुमच्याकडेही असेंच होतें.

आजपासून मी या नवीन घरांत म्हणजे डालेममध्यें राहायला आलों व येथील लॅबोरेटरींत कामाला सुरुवात करून दोन तीन दिवस झाले. ही जागा फारच छान आहे. मंडळीही बरी दिसतात. अद्याप मला त्यांचा अनुभव आला नाहीं. बाकी येथें आल्यापासून फारच एकटें एकटें व चुकल्यासारखें वाटतें. पूर्वीच्या ठिकाणीं असतांना बरेच हिंदी लोक भेटत असत व फ्रॉ. म्युलरकडे पुष्कळदां जात असें. तिच्या घरीं गेलों म्हणजे मला अगदीं घरच्यासारखें वाटत असे, इतकी ती माझी काळजी घेत असे. आतां तेथें जायला एक तास लागतो, म्हणजे जाण्यायेण्यांत दोन तास घालवावे लागतात. इतका वेळ सध्यां मला मिळत नाहीं. रविवारींच काय तो वेळ मिळेल. लॅबोरेटरींतही भाषा येत नसल्यामुळें फारच गैरसोय होते. एक तर लॅबोरेटरींतल्या कामाची मुख्य मजा इतर काम करणाऱ्या मंडळींशीं गप्पा मारणें ही असते. ही मजा फर्ग्युसन कॉलेजमध्यें असतांना आम्हांला चापून मिळाली. येथें इतर सर्व मंडळी ही मजा मारीत असतात. पण मला भाषा अगदींच थोडी येत असल्यामुळें माझें कांहीं विशेष जमत नाहीं. त्यांतून चुका होतील या भीतीनें होतां होईल तों बोलणीं टाळतों. बोलणें टाळूं नये हें मला कळतें, पण माझा स्वभाव तसा नाहीं. अद्याप लॅबोरेटरींत मीं कोणाचीच ओळख केलेली नाहीं. शिवाय–प्रोफेसरशीं किंवा डेमॉन्स्ट्रेटरशीं बोलावयाचें–विशेषतः केमिस्ट्रींतले शब्द जर्मनमध्यें वापरावयाचे–म्हणजे फारच कठिण जातें. असो. हळु हळू संवयीनें सर्व कांहीं जमेल. ही पहिली टर्म चालू असतांना मला नवीन फारसें शिकतां येईलसें वाटत नाहीं. मला काय काय येतें तें पाहण्याकरितां आमचे प्रो. रोझेनमंड यांनीं मला कांहीं दिवसपर्यंत पूर्वीं झालेल्यांपैकींच प्रयोग देण्याचें ठरवलें आहे. आठ पंधरा दिवसांनीं पुढें नवीन शिकण्याचा विचार करायचा. अद्याप लेक्चर्स कोणाचीं व कोठें ऐकायचीं त्याचा मला कांहीं एक पत्ता नाहीं. आम्हांला नेहमीं इंग्रजी पद्धतीच्या हिंदुस्थानांतल्या विश्वविद्यालयाची संवय झालेली, त्यामुळें येथल्या विश्वविद्यालयाच्या स्वातंत्र्याची आम्हांला भीति वाटते. पोपटाची गोष्ट सांगतात ना,—बरींच वर्षें पिंजऱ्यांत राहिल्यावर मग त्याला बाहेर सोडलें म्हणजे तो घाबरतो,—त्या गोष्टीचा प्रत्यय सध्यां मला येत आहे. कारण येथें दर टर्मच्या सुरुवाती-

पूर्वी लेक्चर्सच्या प्रोग्रामाचें एक पुस्तक छापतात व विद्यार्थ्यांनीं तें विकत घ्यायचें असतें. त्यांत युनिव्हर्सिटींतील विषयांवर प्रोफेसरांचीं व्याख्यानें केव्हां व कोठें व्हायचीं वगैरे सर्व छापलेलें असतें. त्यांतलीं वाटेल तीं व्याख्यानें आपण निवडायचीं. दर व्याख्यानाबद्दल पैसे द्यावे लागतात. पाहिजे तितकीं व्याख्यानें ऐकावींत व मुळींच न ऐकल्यास कोणी कांहीं बोलत नाहीं. लॅबोरेटरी नऊपासून पांचपर्यंत उघडी असते. मनास वाटेल तितका वेळ काम करावें, वाटेल तेव्हां निघून जावें. इतकें स्वातंत्र्य–अर्थात् त्याजबरोबर एक प्रकारची जबाबदारी–विद्यार्थ्यांवर टाकलेली असते. युनिव्हर्सिटींत लेक्चर्स ऐकावयाचीं म्हणजे येथून पांच मैलांवर बर्लिनपर्यंत जावें लागतें. म्हणजे वेळाचा व पैशाचा प्रश्न आला. हल्लीं खर्च असा कांहीं होतो आहे कीं बोलून सोय नाहीं. या घरीं पूर्वी महिना २००० मार्क ठरवले होते, पण महागाईमुळें आतां २२०० द्यावे लागतात. असो. पैशापेक्षां वेळेचा मुख्य प्रश्न आहे. अंडरग्राउंडच्या तिसऱ्या वर्गाच्या तिकिटाचा दर–व त्याचप्रमाणें ट्रॅमचा–तीन मार्क आहे. म्हणजे एकदां जाऊन यायला सहा मार्क खर्चावे लागतात. कांहीं व्याख्यानें येथें आमच्या इन्स्टिट्यूटमध्यें होतात,–तेवढींच कदाचित् ऐकेन. बर्लिन युनिव्हर्सिटी व शहर एवढें मोठें आहे कीं, यांतल्या सर्व इन्स्टिट्यूट्स् सबंध शहरभर पसरल्या आहेत. म्हणजे व्याख्यानाकरितां युनिव्हर्सिटीच्या इमारतींत व कामाकरितां इतर ठिकाणीं जावें लागतें. आमच्या प्रोफेसरांना विचारून कोणतीं व्याख्यानें ऐकायचीं तें ठरवीन. माझ्या मनांत या टर्ममध्यें माझ्या विषयाला (Oils and Fats) लागणारी पूर्व तयारी करायची व पुढच्या टर्मला तो विषय बर्लिनच्या बाहेर एखाद्या Technical Instituteमध्यें शिकण्यास जायचें असें आहे. दोन दिवसांपूर्वी युनिव्हर्सिटींत आमचें Immatriculation म्हणजे नांव घालणें किंवा प्रवेशन झालें. म्हणजे आतां स्टूडंटस् कार्ड मिळालें आहे, व सर्व बाबतींत आतां आम्ही युनिव्हर्सिटीच्या देखरेखीखालीं आहोंत असें समजायचें. युनिव्हर्सिटीचे रेक्टर प्रो. नर्न्स्ट हे आज फिजिकल केमिस्ट्रीमध्यें जगद्विख्यात आहेत. या विषयावर यांच्या इतकें काम आजपर्यंत अगदींच थोड्यांनीं केलें असून रसायनाच्या विद्यार्थ्यांना हिंदुस्थानांत देखील यांचें नांव माहीत असतें.

त्यांनीं आम्हांला उपदेशपर व्याख्यान दिलें व नंतर प्रत्येक विद्यार्थ्याशीं हस्तांदोलन केलें. येथील युनिव्हर्सिटीच्या प्रोफेसरांविषयीं माझ्या मनांत बरेंच लिहायचें आहे. एकंदर युनिव्हर्सिटीची येथील पद्धति आपल्या इकडल्यापेक्षां इतकी वेगळी व इतकी चांगली आहे कीं, त्यासंबंधीं मुद्दाम पुढें केव्हां तरी लिहीन. नानांनीं गेल्या पत्रांत सुचविल्याप्रमाणें मासिकांतून वगैरे यासंबंधीं मी लिहायला पाहिजे; पण मला वेळ म्हणून मुळींच मिळत नाहीं. आठवड्यांतून एक दिवस कसाबसा मी पत्रें लिहण्यास वेळ काढतों. शिवाय येथील सर्व माहिती व वस्तुस्थिति बरोबर लिहिण्यास मला येथील संस्थांचा बराच अनुभव यायला पाहिजे. लॅबोरेटरींत जायला लागून दोनच दिवस झाले आहेत. युनिव्हर्सिटीचें एकही व्याख्यान अद्याप ऐकलें नाहीं. तेव्हां मी म्हणतों, कांहीं दिवस दोन तीन महिने अनुभव मिळाल्यावर व मग वेळ झाल्यास लिहिण्याचा प्रयत्न करीन.

रा. हरींद्र चट्टोपाध्याय व त्यांच्या पत्नी श्री. कमलादेवी हे उभयतां गेल्या बुधवारीं रात्रीं इटालीला गेले व तेथून आज उद्यां इतक्यांत हिंदुस्थानाला जायला निघतील. त्यांना मुंबईस आपल्या घरीं उतरायला सांगितलें आहे. त्यांच्या गाण्याविषयीं व फोनोग्राफच्या प्लेट्स्‌विषयीं गेल्या पत्रांत लिहिलेंच आहे. खरेंच, या घरीं फोनोग्राफ आहे. आतां नुसत्या प्लेट्स् मिळाल्या कीं झालें.

असो. माझी तब्येत उत्तम आहे. पुढच्या पत्रांत जास्त माहिती लिहीन. फ्रॉ. म्युलर येत्या शुक्रवारीं ५ तारखेस माझा वाढदिवस करणार आहे. पत्रें सदोदित बँकच्या पत्त्यावर पाठवावींत. पैसे अद्याप पोंचले नाहींत. कळावें, ही विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

<u>पत्र १०३ वें</u>

बर्लिन,

ता. ७ मे १९२२

तीर्थरूप नानांस शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना विशेष. तुमचें ता. १४-४-२२ चें पत्र पोंचलें. तुम्ही पाठवलेले पैसे अद्याप पोंचले नाहींत हें आश्चर्यच आहे. मी दररोज पैशांची वाट पाहत असतों. येथें मध्यें १५७५ भाव होता. त्या वेळीं मजजवळ पौंड असते तर बरें झालें असतें असें आतां वाटतें. माझे एक लाख मार्क येथें होते, त्यांपैकीं ७५००० मीं Fixed deposit म्हणून सहा महिन्यांकरितां ठेवले आहेत. ते जुलैपूर्वी काढतां येणार नाहींत. बाकीचे २५००० Current account मध्यें आहेत, तेच सध्यां वापरीत आहें; व त्यांतले आतां फारसे शिल्लक नाहींत. कारण दहाबारा पौंड जवळ आहेत, ते अडल्या प्रसंगीं लागतील म्हणून मी सध्यां मोडीत नाहीं. अलीकडे दिवसेंदिवस जिनसांच्या किंमती अशा भराभर वाढत आहेत कीं कांहीं विचारूं नये. चांगली सायकल हल्लीं ५००० मार्क्स खालीं मिळत नाहीं. उद्यांच सायकल घ्यायचा विचार करीत आहें. त्याचप्रमाणें काल टेनिसचें सामान घेतलें, बूट, स्वेटर, खेळण्याचे शर्ट वगैरे. त्यांतच दीड हजार मार्क खर्च झाले. राहण्याचा खर्चही बराच येतो. त्यांतून मधूनमधून बर्लिनला जाण्याचा प्रसंग येतो; तेव्हां जाण्यायेण्याचा खर्च होतोच. साधारण महिना साडेतीन हजार मार्कपर्यंत खर्च यावा असा अंदाज आहे. हें घर चांगलें आहे. घरची मंडळीही चांगली आहेत. ही बाजू तर फारच छान आहे. या घरांत डॉ. झेले, त्यांची बायको, एक बारा वर्षांचा त्यांचा मुलगा, अठरा वर्षांची मुलगी–तिचें नांव क्लेरे–व माझ्यासारखाच एक जर्मन विद्यार्थी–इतकी मंडळी आहेत. सर्व चांगली आहेत व मला चांगलें वागवतात. क्लेरे ही मुलगी फार चांगली आहे. तिच्याशीं पुष्कळ बोलतों. आपल्या तिकडल्या मुलींमध्यें व इकडल्या मुलींमध्यें किती तरी फरक दिसून येतो. इकडल्या मुली सदा हंसत-मुख, पुष्कळ बोलक्या व तरतरीत असतात. खेळणें, टेनिस, पोहणें वगैरे व इतर व्यायाम मुलांप्रमाणेंच त्याही करतात. आपल्याकडे मुली जरा मोठ्या

झाल्या कीं, गंभीर व पोक्त दिसूं लागतात व जणूं काय संसाराचा सर्व बोजा एकदम अंगावर पडल्यामुळें बऱ्याचशा दुःखी दिसतात. हंसतमुख कमी. असो. लॅबोरेटरींत सध्यां काम चालू आहे. Qualitative analysis म्हणजे हिंदुस्थानांत पूर्वी केलेलेंच सध्यां प्रोफेसरांच्या सांगण्यावरून करीत आहें. माझा विषय मला केव्हां, कसा व कोठें शिकायला मिळेल याचा अद्याप पत्ता नाहीं. Technische Hochschuleमध्यें या टर्मला प्रवेश मिळाला नाहीं. तो कदाचित् पुढच्या टर्मला मिळेल. तरी पण तेथें सुद्धां आम्हांला पाहिजे त्याप्रमाणें समाधानकारक शिकायला मिळत नाहीं असें कोर्डे म्हणतात; आणि रा. कोर्डे हे एक टर्म तेथें होते, ते कंटाळून Hochschule सोडून दुसरीकडे युनिव्हर्सिटीच्या एकाद्या लॅबोरेटरींत जाण्याचा प्रयत्न करीत आहेत. विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे या बाबतींत आम्हांला सल्ला देणारा येथें कोणीच भेटला नाहीं. शिवाय किती टर्म doctorate करितां अभ्यास करायला पाहिजे, हिंदुस्थानचे graduate म्हणून कांहीं सवलत मिळेल कीं नाहीं, वगैरे गोष्टींचा उलगडा प्रत्यक्ष युनिव्हर्सिटीच्या Information Office मध्येंसुद्धां झाला नाहीं. बाकी सहा टर्म्समध्यें डिग्री मिळूं शकते ही गोष्ट खरी. सवलतीचाच प्रश्न आहे. डिग्री मिळण्यासंबंधीं तुमचें काय मत आहे? याविषयीं माझें मत पूर्वीं एकदां लिहिलेंच आहे. हिंदुस्थानची स्थिति अद्याप इतपत सुधारलेली नाहीं कीं, डिग्रीशिवाय एखाद्या सामान्य कर्तृत्वाच्या मनुष्याला तेथें मान मिळेल, व ती लवकर बदलेल असेंही वाटत नाहीं. यासंबंधीं तुम्हांला काय वाटतें तें कळवावें. लॅबोरेटरींत महिना दीड महिना गेल्यावर माझ्या पुढच्या कार्यक्रमाविषयीं आमच्या प्रोफेसरांचा सल्ला घेईन. सध्यां बऱ्याचशा गोष्टी अनिश्चित आहेत.

येथील चालीरीति अद्याप आमच्या अंगवळणीं पडल्या नाहींत. त्यांतून बऱ्याचशा चालीरीति माहीत सुद्धां नसतात, त्यामुळें पुष्कळदां आमच्या हातून चुका होतात व लोकांचें मत वाईट होतें. विशेषतः thank you (जर्मनमध्यें डांके danke) जितक्यांदां म्हणायला पाहिजे तितक्यांदां आमच्या तोंडून येत नाहीं असें कालच म्युलरच्या सांगण्यावरून कळलें. येथील लोकांना लहानपणापासून त्या शब्दाची इतकी संवय झालेली असते

कीं, पदोपदीं ते तो शब्द वापरतात. मला तर वाटतें इतक्यांदां तो शब्द वापरल्यावर त्याला किंमतच राहात नाहीं, व मनापासून आभार मानायचे असले तर दुसराच एकादा शब्द शोधून काढला पाहिजे. कारण या शब्दाला जवळजवळ अर्थच नाहीं असें झालेलें असतें. वास्तविक पाहतां नुसता शब्दच तोंडानें उच्चारायचा जेथें प्रश्न असतो, तेथें एकदां सोडून हजारदां तो म्हणायला आपलें काय जातें? आपलें त्यांत कांहींच खर्च होत नाहीं. म्हणजे थँकूसूची किंमत देऊन बऱ्याचशा वस्तु स्वस्तांत विकत मिळतात. पैसे मनुष्याजवळ कमी असूं शकतील, पण थँक्सूचा तोटा कधींही कोणाला पडायचा नाहीं. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, थँक्स् हे जर पैसे व ते जवळ बाळगणारा मनुष्य जर श्रीमंत असें धरून चाललों, तर आम्ही हिंदुस्थानचे लोक जर्मन लोकांपेक्षां किती तरी दरिद्री आहों. असो. पैशाप्रमाणें या बाबतींतही श्रीमंत होण्याचा प्रयत्न करून आभारांचा भरपूर पुरवठा केला पाहिजे. आतांपासून या बाबतींत मी विशेष काळजीनें वागेन.

हो! कारण असें झालें कीं, परवां ५ तारखेला माझा वाढदिवस होता. त्यानिमित्त फ्रॉ. स्युलरनें मला फराळाला बोलाविलें होतें व इतर मंडळीही बोलाविली होती. खूप थाटानें तिनें वाढदिवस साजरा केला. नंतर वाढदिवसानिमित्त कांहीं पुस्तकें व चॉकोलेट वगैरे तिनें व तिच्या भावानें मला बक्षीस दिलीं. मीं आपलीं बावळटासारखीं तोंडानें एकही शब्दाचा व्यय होऊं न देतां तीं मुकाट्यानें घेतलीं. थँक्स् द्यायला पाहिजे होते; पण जणूं काय त्यांत माझें भयंकर नुकसान होईल-हो, कारण हल्लीं महागाईचे दिवस आहेत. शब्दांत सुद्धां काटकसर केली पाहिजे,-अशा भावनेनेंच कीं काय मी गुपचूप राहिलों. त्यानें फ्रॉ. स्युलरचा अपमान झाला असावा. कारण माझ्या वागणुकीवर तिच्या घरीं नंतर बरीच चर्चा झाली असें मागून कळलें. मी तिला मागाहून स्पष्ट सांगितलें कीं, या बाबतींत आम्ही हिंदी लोक जन्मापासून मितभाषी आहों व म्हणून तुम्हीं क्षमा केली पाहिजे. असो. विषय फारच लांबला. जशी थँक्सूची गोष्ट त्याचप्रमाणें वांकण्याची गोष्ट, संवय नसल्यामुळें मी पुरेसा किंवा मुळींच वांकत नाहीं व जर्मन लोक वांकण्याकरितां प्रसिद्ध आहेत.

मला आणखी पुष्कळ पुष्कळ लिहायचें होतें पण वेळ नाहीं. हल्लीं वेळ कसा जातो हेंच कळत नाहीं. दिवसांत चोवीस तासांच्या ऐवजीं जास्त तास असते तर बरें झालें असतें असें वाटतें.

शिरगांवकरांच्या चिरंजीवांना येथें यायचें होतें असें तुम्ही लिहितां. त्याला यायला कांहीं हरकत नाहीं. गेल्या पत्रांत भागवत म्हणून एक Non-matriculate गृहस्थ येथें आल्याचें लिहिलें होतें, त्यांची Sugar industry शिकण्याची सोय झाली आहे. एवढें मात्र होईल कीं Under-graduateला येथें डिग्री मिळणार नाहीं. पण कांहीं तरी शिकून जातां येईल. Weavingविषयीं अद्याप तपास केला नाहीं. पण जवळजवळ कोणतीही कला शिकतां येते. प्रथम भाषा मात्र चांगली आली पाहिजे. या बाबतींत Indian Information Bureau फार मदत करते व तेथें दोघे तिघे गृहस्थ स्वार्थत्याग करून झटून काम करीत आहेत.

काल वजन केलें. आहे तितकेंच–५६ किलो–आहे. म्हणजे कांहीं फार नाहीं. कपड्यांसकट १२३ पौंड. हिंदुस्थानांतून येथें आलों त्या वेळीं आजारामुळें वजन कमी झालें होतें तें आतां पूर्वीइतकें झालें आहे इतकेंच. त्यापुढें प्रगति मुळींच नाहीं. व्यायाम नियमितपणें करीत असतों.

ता. ७-५-२२

आज सकाळीं फ्रॉ. म्युलर व तिचे बंधु डॉ. बेकेबाख हे मला भेटायला येथें आले होते. बराच वेळ बसले. खरेंच माझ्याबद्दल त्या दोघांना इतकी कळकळ कां वाटावी, कांहीं कळत नाहीं. येथें मला कधींही बरें वाटत नसलें किंवा कोणत्याही बाबतींत सल्ला घ्यायचा असला किंवा दुसरी कसलीही मदत पाहिजे असली तर मी म्युलरकडे जातों. इतकी मायाळु व परोपकारी बाई मीं कधींच पाहिली नव्हती. कोणताही जिन्नस मला खरेदी करायचा झाला तर ती माझ्याबरोबर येते व मला मदत करते. काल टेनिसचें सर्व सामान तिच्याच मदतीनें घेतलें. तिला मी ' ग्रोसमुलर ' म्हणजे ' आजी ' म्हणतों.

आज दुपारीं जेवण झाल्यावर ' क्लेरे 'बरोबर सायकलवर फिरायला गेलों होतों. तिनें होऊन माझ्याकरितां एक सायकल मागून आणली. आम्ही साधारण दोन तासपर्यंत डालेम, ग्रूनेवाल्ड (Green wood म्हणून येथील

जंगल) वगैरे बऱ्याचशा मनोहर ठिकाणीं हिंडलों व पुष्कळ बोललों. याप्रमाणें नेहमीं पुष्कळसें जर्मन बोलायला मिळालें म्हणजे भाषा चांगली येईल. इतके दिवस अशी संधि मिळाली नव्हती.

'तुमच्या आईबापांचा फोटो दाखवा–विशेषतः आईचा' असें येथें पुष्कळजण विचारतात. मजजवळ फक्त तुमचाच फोटो आहे. सबब तुम्ही पूर्वी कळविल्याप्रमाणें तुमचा दोघांचा फोटो मला लवकर पाठवून द्यावा.

बीरेश्वरबाबूंना सध्यां सुट्टी आहे व ते घरीं गेले आहेत, सबब त्यांना लिहिलेलें पत्र घरच्या पत्त्यावर पाठवावें. शान्तिनिकेतनास पाठवूं नये.

गेल्या पत्रांत फोनोग्राफच्या प्लेट्स्संबंधीं आबांना लिहिलें आहे. त्यांत गंधर्वांच्या पदांची यादी मीं स्वतः पाठवीन असें लिहिलें होतें, ती पुढें देत आहें:—

१. मम मनीं कृष्णसखा रमला०
२. सत्य वदे वचनाला नाथा०
३. किति किति सांगूं तुला–(याच्याच मागल्या बाजूस) उगिच का कान्ता०
४. नाथ हा माझा मोही०
५. मधुकर वनवन फिरत करी गुंजारवाला०
६. नका टाकोनि जाऊं०
७. मला मदन भासे०
८. अजि राधा बाला मीचि गोपाला०
९. आणखी कोणतीही एखादी भैरवी.

'उगिच कां कांता' या पदाची आठवण झाली म्हणजे भास्करबुवा बखल्यांची आठवण होते. ते वारल्याची बातमी नुकतीच केसरींत वाचली. मला फार फार वाईट वाटलें. हिंदुस्थानांत परत गेल्यावर त्यांचें गाणें ऐकण्याची आशा होती. असो. या वरच्या प्लेट्स् व बाकीच्या चट्टोपाध्यायांच्या सोईनुसार कोणी येणारा भेटल्यास पाठवाव्या. विशेष गैरसोय होत असेल तर पाठवूं नये. त्यांवांचून अडलेंच आहे असें नाहीं.

श्यामकान्त.

ता. क.:—तुम्ही फार काम करून आपल्या तब्येतीला त्रास करून घेऊं नये. तुमची दोघांची तब्बेत उत्तम राहवी व पुढील आयुष्यांत मला तुमचा सहवास सदोदित घडावा यांतच मला आनंद आहे. तसें न झाल्यास जगांतील इतर सर्व सुखें मला व्यर्थ व तुच्छ आहेत हें सांगायला नकोच. आईबाप—त्यांतून तुमच्यासारखे जितके दिवस लाभतील तितकें थोडेंच. हें सांगणें कदाचित् वाईट दिसेल, त्याबद्दल क्षमा असावी. कळावें, ही विनंति.

श्री

पत्र १०४ वें

बर्लिन,

ता. १३ मे १९२२

तीर्थरूप सौभाग्यवती माईस शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना वि. तुमचें ता. २१–४ चें पत्र येथें ता. १०–५ ला पोंचलें. म्हणजे १९ दिवस लागले. यावरून तुम्ही पत्रें वेळेवर टाकतां असें सिद्ध होतें. मला अद्याप ६० पौंड किंवा कद्यींना ३५ पौंड पोंचले नाहींत. याचा खुलासा करण्या-बद्दल पूर्वी लिहिलेंच आहे. आजच सकाळीं गणपुल्यांकडे जाऊन माझ्याकरितां पाठवलेलें फराळाचें घेऊन आलों. फार पाठवलें आहे असें वाटतें. साखर-पाऱ्याच्या वड्या मला आवडल्या. त्याचप्रमाणें बटाट्याचा चिवडाही. पण डिंकाचे लाडू मात्र चांगलेसे झाले नाहींत. त्यांत डिंकाचें प्रमाण फार थोडें आहे. मला वाटतें ते घरीं केलेले नसून बाजारांतून आणलेले असावे. फार पाठवले आहेत, कसे संपतील याची पंचाईत आहे. या घरांत राहायला आल्या-पासून चारी वेळेस घरींच जेवणखाण वगैरे होतें. त्यामुळें वेगळ्या खाण्याची जरुरी वाटत नाहीं. लोणचेंही मिळालें. आतां मात्र कोणी येणारा भेटल्यास खाण्याचें कांहीं पाठवूं नये. गणपुल्यांनीं बरोबर लसणीचें तिखट व चिवडा आणला होता, तोही खाल्ला. लसणीची घाण तोंडाला आल्यामुळें घरांत एकच गोंधळ झाला. या लोकांना लसणीचा वास बिलकूल खपत नाहीं. ‘ जिवंत ’ चीजचा वास मात्र चालतो. मीं गणपुल्यांकडून मागून आणलेलें तिखट उद्यांच परत करणार आहें.

पैशाचा व वेळाचा अपव्यय

हल्लीं फार धांदलींत वेळ निघून जातो. आठवडयांतून दोन व्याख्यानें टेक्निकल हायस्कूलमध्यें ऐकायला जातों, म्हणजे बर्लिनमध्यें जावें लागतें. अशा व इतर प्रसंगीं जाण्यायेण्यांत पैशाचा व वेळाचा अपव्यय होतो. अलीकडे दोन तीन दिवस बर्लिनमध्यें दोनचार कामांकरितां खेपा घालाव्या लागल्या, त्याबद्दल दररोज दहाबारा मार्क तरी खर्च आला. युनिव्हर्सिटीची फी, लॅबोरेटरीची फी व प्रत्येक लेक्चरबद्दल पैसे अद्याप द्यावयाचे आहेत. त्याबद्दल युनिव्हर्सिटींत जावें लागतें. त्याकरितां दोन तीन खेपा घालाव्या लागल्या. एकदां गेलों तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, येत्या बुधवारीं या. बुधवारीं त्यांचे छापील कागद तयार नव्हते म्हणून पुन्हा दोन तीन दिवसांनीं यायला सांगितलें. आज पुन्हा गेलों होतों. साधारण शंभरदीडशें विद्यार्थ्यांची ओळ लागली होती. त्यांत शेवटीं उभा राहिलों. साधारण एका तासानें मी खिडकीपाशीं पोंचलों, पण तो कारकून म्हणाला कीं, हा फॉर्म चालणार नाहीं, दुसरा घ्या. पुन्हा दुसऱ्या फॉर्मावर सर्व लिहून थोडया वेळानें तेथें आलों, तों ' ऑफिस बंद करायची वेळ झाली, आतां उद्यां या,' असें त्यानें सांगितलें. मीं मनांत म्हटलें, ' भले बहाद्दर, छळावें तर असें छळावें.' येथून युनिव्हर्सिटींत जायला एक तास लागतो व जाण्यायेण्यांत लॅबोरेटरीच्या कामाची कमताई होते. असो. पुन्हा खेप घातली पाहिजे. आम्हांला फी वगैरे चापून आहे. परदेशीयांना पांचपट द्यावी लागते. टर्मला ३००० मार्कांपर्यंत फी द्यावी लागेल असा अंदाज आहे. एकंदरींत खर्चाचें प्रमाण दिवसेंदिवस वाढत चाललें आहे. कर्व्यांजवळ सुमारें १॥। लाख मार्क आहेत. तरी सुद्धां तीन टर्म्सपेक्षां जास्त येथें काढतां येणार नाहींत अशी त्यांना धास्ती पडली आहे.

आजच एक सायकल खरेदी केली. नवीला ५००० मार्क पडतात. पण जुन्यांपैकीं राहिलेली व थोडीशी वापरलेली अशी घेतली आहे, जवळजवळ नवीच. तिला ३२०० मार्क पडले. चांगली चालते. आतां मला वाटतें बर्लिनला जायचें झाल्यास ट्रॅमची किंवा अंडरग्राउंडची फारशी जरूर पडणार नाहीं. बर्लिनमधें पुष्कळ रस्ते दगडांनीं बांधून काढलेले असल्यामुळें सायकल फार हादरते. शिवाय चोरीची फार भीति आहे असें म्हणतात. सांखळी, कुलूप वगैरे घेणार आहें.

कालच हिंदुस्थान असोसिएशनची एक सभा झाली, त्यांत मी गायलों. आतां येथील गवई रॉय व चट्टोपाध्याय निघून गेल्यामुळें मीच काय तो गवई राहिलों आहें. ' निरस्तपादपे देशे एरंडोऽपि द्रुमायते ' म्हणतात, त्यापैकींच स्थिति आहे.

येथील मंडळींशीं विशेषतः फ्रॉ. म्युलर व क्रेरे (म्हणजे आमच्या होस्टची मुलगी) बोलतांना माझ्या स्वभावाबद्दल वगैरे बरीच चर्चा चालते. सर्वांच्या मतें मी पुष्कळदां गंभीर व दुःखी दिसतों, हंसतमुख नसतों. येथें बहुतेक लोक हंसतमुख दिसतात. विशेषतः मुली. मला वाटतें लहानपणा-पासून हिंदुस्थानांत आपण वेगळ्याच वातावरणांत वाढलेले असतों व त्यामुळें हंसरेपणा पुष्कळांच्या तोंडावर दिसत नाहीं. हें साधारण लोकांचें सांगितलें. बाकी तोंडावर हंसरेपणा नसणें हा कीर्तने घराण्याचा विशेष असावा असें मला वाटतें व त्याचा परिणाम थोडासा माझ्यावरही झाला असेल. मी पुष्कळदां हंसतमुख किंवा थट्टेखोर किंवा गमती नसतों एवढें खरें. त्यांत पुन्हा ही भाषा अगदींच नवी, माणसें वगैरे नवीं व पुष्कळदां मनाची अस्व-स्थता असल्यामुळें तसें होत असेल. कुठल्याही गोष्टीबद्दल मनाला हुरहूर लावून न घेतां, पर्वा न बाळगतां व कांहीं झालें तरी मनाचा स्वस्थपणा व शांतता ढळूं न देणें, मग परिस्थिति कितीही वाईट कां असेना, त्याचप्रमाणें मनांत कधींही न जळफळणें हा एक गुण आहे. हा गुण भाऊंच्या अंगीं मीं बघितलेला आहे व त्यांनीं पुष्कळदां मनाच्या स्वस्थतेबद्दल माझ्याजवळ बोलूनही दाखविलें आहे.

ता. १५-५-२२

आज सकाळीं पुन्हा युनिव्हर्सिटींत खेप घातली. इम्मॅट्रिक्युलेशन (म्हणजे नांव घालणें) व दोन लेक्चर्स् व लॅबोरेटरीची फी वगैरे मिळून जवळजवळ ३००० मार्क खर्च आला. याशिवाय टेक्निकल हायस्कूलमध्यें एक लेक्चर ऐकत आहें, त्याचे पैसे अद्याप द्यायचे आहेत.

आज सायकलवरून युनिव्हर्सिटींत गेलों होतों. फार लांब आहे. चाळीस मिनिटें लागतात. सध्यां रा. कोर्डे हे माझ्याच बरोबर फार्मास्यूटिकल

इन्स्टिट्यूटमध्यें काम करतात. प्रो. होल्डेच्या हाताखालीं Technical High School मध्यें Oils and Fats शिकत होते, त्याला कंटाळून ते इकडे आले.

आज फार दमलों आहें व वेळही नाहीं. तेव्हां येथेंच पुरें करितों. सोबत श्रीनिवासास एक पत्र आहे. आमच्या घराचेंही एक चित्र क्रेरेकडून मला मिळालें तें पाठवीत आहें. पत्राचें वजन बरेंच झाल्यामुळें तिकिटें या खेपेस पाठवीत नाहीं. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

ता. क.:—आपल्याकडे एखादी पंगत जेवायला बसली असतांनाचें एखादें चित्र पाठवतां येण्यासारखें आहे का? या लोकांना आपण कसे जेवतों हें कळण्याची फारच इच्छा व कुतूहल आहे. तसेंच आपल्याकडे होणारा व इकडे न मिळणारा असा एखादा जिन्नस येथें कोणाला तरी बक्षिस म्हणून देण्याकरितां पाठवतां येण्यासारखा आहे काय? सहज जुळल्यास पुढें मागें उपयोग होईल म्हणून विचारीत आहें.

हल्लीं दिवस फार मोठे असतात. पहांटे चारपासून दिसायला लागतें व रात्रीं नऊ वाजेपर्यंत हल्लीं सूर्याचा उजेड असतो. यापुढें आणखी मोठे दिवस होतील. काल संध्याकाळीं आठ वाजेपर्यंत आम्ही टेनिस खेळत होतों व पुढें जेवायची वेळ झाली म्हणून—अंधार पडला म्हणून नव्हे—खेळणें बंद केलें. या पत्राला एक नवीन तिकीट लावलें आहे तें श्रीनिवासास पाठवावें.

श्यामकान्त.

श्री

पत्र १०५ वें

बर्लिन,

ता. २२-५-१९२२

ती. माईस शिरसाष्टांग नमस्कार, वि. वि. तुमचीं ता. २८-४चीं पत्रें गेल्या गुरुवारीं पोंचलीं. आज थाईत आहें व कंटाळलों आहें व टांक अगदीं गचाळ आहे म्हणून जरा हलगर्जीपणानें लिहीत आहें, त्याबद्दल क्षमा करावी. नानांनीं आपल्या पत्रांत लिहिल्याप्रमाणें मी नीतीसंबंधानें शक्य ती सर्व

काळजी घेत आहें. अनीतीनें बिघडलेले येथले कांहीं विद्यार्थीही मला माहित आहेत. तेव्हां या बाबतींत मी अगदीं काळजीपूर्वक वागत आहें. त्याबद्दल काळजी नसावी. हलीं वेळ कसा जातो कांहीं कळत नाहीं. सध्यां बर्लिन-मधील एका प्रसिद्ध टेनिस क्लबांत खेळायला जात असतों. मेंबरशिपकरितां अर्ज पाठविला आहे. आठ दिवसपर्यंत सर्व मेंबर्स माझा खेळ वगैरे पाहतील व मग माझ्याविरुद्ध कोणाची तक्रार नसल्यास मला मेंबर केलें जाईल. माझा खेळ येथें सर्वांना आवडतो. मी खेळत असतांना पुष्कळ जण–विशेषतः बायका–लक्ष लावून पाहतात व पुष्कळदां मला टाळ्या मिळतात. बाकी या क्लबांत माझ्यापेक्षां चांगले टेनिस खेळणारे किती तरी आहेत. पिंगपाँग मात्र मीच येथें सर्वांत चांगला खेळतों. अद्यापपर्यंत तरी मीच जिंकत आलों आहें. पहिल्यानें जर्मन भाषेंत स्कोअर वगैरे मोजणें शिकावें लागलें. आतां सोपें वाटतें. भाषाही आतां पहिल्यापेक्षां बरीच येते व क्लबांत पुष्कळांशीं बोलायला मिळतें. जर्मन लोकांचें अदबीकडे विशेष लक्ष असतें,–विशेषतः बायकांशीं बोलतांना किंवा त्यांना भेटतांना वगैरे. हें सर्व आतां माझ्या अंगवळणीं पडत चाललें आहे. आतां 'डांके'–म्हणजे 'थँक्स्'चा मीं सारखा भडिमार चालू ठेविला आहे. त्याची कमतरता मुळींच पडूं देत नाहीं. संध्याकाळीं खेळण्यांत एक दोन तास जातात, व्यायाम बराच होतो. त्यांतून हलीं उकाडा बराच होतो व ऊनही कडक पडतें, त्यामुळें खेळतांना घाम येतो. असो. या क्लबाचा मेंबर मला केलें जाईल अशी आशा वाटते. झाल्यावर कळवीनच.

कालच रा. जाधवांनीं मला फोन केला कीं, डॉ. जिवराज मेथा येथें आहेत व महाराजही येथें आहेत, तेव्हां त्यांनीं (मेथांनीं) भेटायला बोला-वलें आहे. मीं आज मेथांना फोन केला व लवकरच महाराजांची भेट ठरवितों असें ते म्हणाले. एकदोन दिवसांत भेटायला मिळेल असा अंदाज आहे. पाहावें काय होतें तें. पुढच्या आठवड्यास सर्व हकीकत कळवीन.

मी लठ्ठ झालों आहें किंवा होत आहें अशी चुकीची समजूत तुम्हीं करून घेतली आहे. अद्याप माझ्यांत कांहीं एक फरक झालेला नाहीं. या

शुक्रवारीं बहुधा आमच्या प्रोफेसरांबरोबर कांहीं कारखाने बघण्याकरितां निघूं व दोन तीन दिवसांनीं परत येऊं.

खरेंच, आमच्या बाई–फ्राउ डॉ. झेले–यांना हिंदुस्थानांतून चांगला चहा पाहिजे आहे. मलाही कधीं कधीं चहा पिण्याची इच्छा होते. कारण येथला चहा म्हणजे मुळींच चहा नसतो. तेव्हां शक्य झाल्यास कोणाबरोबर तरी किंवा पार्सलनें थोडासा चांगला चहा पाठवून द्यावा. ऑरेंज पीको किंवा दुसरा कोणताही चांगला चहा पाठविल्यास चालेल. त्यावर मला वाटतें थोडी जकात द्यावी लागेल. त्याचप्रमाणें काजूच्या बिया किंवा अशा तऱ्हेचे इकडे न मिळणारे पदार्थही लहानशा पिशवींतून पाठवतां आल्यास पाठवावे. काजूच्या बिया इकडे मिळत नाहींत असें वाटतें व त्या लोकांना आवडतील. असो. आज जास्त लिहीत नाहीं. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

ता. क.:—अद्याप पैसे मिळाले नाहींत. सोबतचें पत्र श्रीनिवासास द्यावें.

बर्लिन, ता. २३ मे १९२२

काल हें पत्र पुरें केल्यावर रात्रीं सुमारें साडेअकरा वाजतां डॉ. जिवराज मेहता यांचा फोन आला व आज सकाळीं साडेनऊ वाजतां महाराजांनीं भेटायला बोलाविलें आहे असें सांगितलें. त्याप्रमाणें आज सकाळीं गेलों होतों. Hotel Esplanade मध्यें उतरले आहेत. साधारण पांचसात मिनिटें बोललों. पहिल्यानें माझ्या अभ्यासासंबंधीं वगैरे त्यांनींच प्रश्न विचारले, त्यांचीं मीं उत्तरें दिलीं. पुढें मला गुजराथी येतें का? असें विचारल्यावर मी म्हणालों, ‘ नाहीं. ’ मी बडोद्यास फार दिवस नव्हतों. तेव्हां तेहून म्हणाले, ‘ हो खरें, तुम्ही बंगालमध्यें होतां नाहीं का? बंगाली Literature आपल्यापेक्षां किती तरी चांगलें आहे नाहीं? ’ बंगाली साहित्यावर थोडेंसें बोलणें झाल्यावर मीं सहज नानांच्या संबंधीं बोलणें काढलें व त्यांना रिटायर व्हावयाचें होतें त्याचें काय झालें असें विचारलें. ते म्हणाले, ‘ माझ्या मनांत आतांच त्यांनीं रिटायर होऊं नये असें आहे. I want to retain him as long as possible.’ मग मीं म्हटलें कीं, ‘ आतां त्यांना strain फार होतो. ’ ते

म्हणाले ' होय, पुढें त्यांना दुसऱ्या capacity त ठेवतां येईल.' वयाचा प्रश्न निघाला तेव्हां मीं नानांचें वय अठ्ठावन वर्षं आहे असें सांगितलें व त्यांचें विचारलें, ते म्हणाले, ' मी एखाद्या वर्षानें मोठा असेन, पण आतां माझी तब्बत अगदीं बिघडली आहे. ' मीं म्हटलें, ' आपण तरुणपणीं काम फार केलें, इतकें करायला नको होतें.' ' Overwork केलें खरें, त्याचीं फळें आतां भोगावीं लागताहेत.' अशा प्रकारें थोडा वेळ बोलणें झाल्यावर ते म्हणाले, ' बरें आहे, सरदेसाई, आतां पुन्हा केव्हां तरी भेटूं. ' नंतर मी लवून नमस्कार केला व निघून आलों. तब्येतीनें ते अगदींच थकलेले दिसले. इतके वाईट दिसत असतील अशी माझी कल्पना नव्हती. फोटोंत किती तरी चांगले दिसतात. असो. उन्ह कडक पडलें आहे. माझे सर्व कपडे लोंकरीचे आहेत त्यानें त्रास होतो. आतां सुती पातळ कपडे घेतले पाहिजेत. प्रो. विनयकुमार सरकारही आजच महाराजांना भेटायला आले होते. *क्लार्कही मला भेटले. थोडेंसें बोलणें झालें. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र १०६ वें

बर्लिन,
ता. ५ जून १९२२

ती. नानांस शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना विशेष. तुमचें व आबांचें ता. १२-५-२२ चें पत्र पोंचलें. पैसे आतांपर्यंत पोंचलेच असतील. Schmitz केबल करणार आहेत, वगैरे आबांनीं लिहिलें आहे. पण पैशांचा अद्याप कांहीं एक पत्ता नाहीं. ' तुझ्या पैशांतले कर्व्यांना पसतीस पौंड दे, ' असेंही आबा लिहितात. पण आमच्या दोघांपैकीं कोणाचेच पैसे अद्याप आले नाहींत; काय घोंटाळा झाला आहे कांहीं कळत नाहीं. बाकी सुदैवानें महाराजांनीं दिलेला

* बडोदा कॉलेजचे प्रिन्सिपॉल. महाराजांनीं या भेटीनंतर ५० पौंड श्यामकान्तास बक्षीस दिले.

पन्नास पौंडांचा चेक मजजवळ आहे ही गोष्ट वेगळी. गेल्या आठवड्याला डॉ. जिवराज मेहतांचें पत्र लिहून कळवलें होतें. या आठवड्याला पॅरिसला मीं त्यांना आभारदर्शक उत्तर पाठवलें आहे, त्याची प्रत सोबत पाठवीत आहें.

माझ्या तब्येतींत कांहीं एक फरक झालेला नाहीं. एक किलो म्हणजे बावीस पौंड. तेव्हां छप्पन किलो म्हणजे एकशें तेवीस पौंड होतात. सूट सकट हें वजन म्हणजे पूर्वीपेक्षां जास्त नाहीं. तीन पौंड कपड्यांचें वजा गेलें म्हणजे पूर्वींइतकेंच वजन आहे. फार तर एखादा पौंड जास्त. बाकी प्रकृति उत्तम आहे. मलावरोध वगैरे पूर्वीप्रमाणें मुळींच नाहीं. चेहऱ्यामध्यें वगैरे कांहीं एक फरक झालेला नाहीं. चेहरा फोटोमध्यें अशक्त दिसण्याचें कारण कदाचित् मी मिशा काढल्या आहेत म्हणून. असो. तुमच्या फोटोची वाट पाहत आहें. शामराव गायकवाडांना पूर्वी लिहिल्याप्रमाणें एकदां भेटलों. त्यानंतर भेटलों नाहीं. राणीसाहेब आल्या म्हणजे मला कळेलच. बोलावलेंच तर भेटीस जाईन.

सायकल पाठवणें पार्सलनेंच जास्त सोईचें पडेल. सध्यां उत्तम सायकलला सहा हजार मार्क पडतात. तीवर जकात, भाडें, वगैरे मिळन ३०-३५% पडतील. म्हणजे एकंदर तुम्हांला हिंदुस्थानांत आठनऊ हजार मार्कांपर्यंत म्हणजे १२०रु. (अंदाजें) पडतील. तुम्हीं सांगत असाल तर ताबडतोब पाठवतों. कदाचित् तुमच्या उत्तराची वाट न पहातांही पाठवीन. असलीच सायकल हिंदुस्थानांत २००रु. खालीं मिळत नाहीं.

येथें मी ज्यांच्या घरीं राहतों ती मंडळी मला अगदीं घरच्या माणसाप्रमाणें वाटतात. डॉ. व फ्राउ डॉ. क्लेले हे मला आपल्या मुलाप्रमाणें समजतात व त्यांची मुलगीही माझ्याशीं अगदीं मोकळेपणानें वागते व बोलते; व मला पुष्कळदां भाऊ म्हणून संबोधते. कधीं कधीं आम्ही सायकलवर फिरायला जातों. एकदां पोहायला गेलों होतों. सांगण्याचा मुद्दा इतकाच कीं, मी आनंदांत आहें. क्वचित् प्रसंगीं घरची आठवण येऊन एकटें वाटतें. पण जवळजवळ सगळा वेळ कांहींना कांहीं तरी कामांत असल्यामुळें असल्या विचारांना फारसा वेळच मिळत नाहीं. जर्मन भराभर शिकत आहें. पूर्वीपेक्षां आतां किती तरी चांगला व भराभर बोलतों असें पुष्कळांनीं मला सांगितलें.

तुम्ही आंबे खातां हें ऐकलें म्हणजे तोंडाला पाणी सुटतें. आतां हें फळ

कसें असतें त्याची या लोकांना मुळींच कल्पना नाहीं. मीं पुष्कळ समजावण्याचा प्रयत्न केला, पण फुकट. Preserved mango वगैरे पाठवितां येईल का ? किंवा एखाद्या येणाऱ्या बरोबर कच्चे आफूसचे कांहीं आंबे नमुन्यादाखल पाठवणें शक्य आहे का ? मुद्दाम त्रास करून पाठवूं नयेत. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र १०७ वें

बर्लिन,

ता. ८-६-२२

श्री. सौ. माईस शिरसाष्टांग नमस्कार, वि. वि. नानांचें ता. १९-५चें लोणावळ्याचें पत्र गेल्या आठवड्याला पोंचलें. इतक्यांत तुम्ही सर्व विमलचें* लग्न आटपून कोंकणांतून परत आलांच असाल. नुकतेंच रा. कोर्डे यांनीं आमचे कांहीं फोटोग्राफ काढले होते, ते या पत्रासोबत पाठवीत आहें. यांपैकीं जे काळे आहेत, ते पूर्वी हिवाळ्यांत काढले होते व ते आम्हांला विशेष आवडले नाहींत. पण करड्या रंगाचे जे दोन आहेत, ते माझ्या मतें चांगले निघाले आहेत. त्यांपैकीं एक मी ज्या घरांत राहतों त्या कुटुंबाचा आमच्यासकट आहे. फोटो डॉ. झेलेच्या बागेंत काढलेला आहे. दुसरा करडा फोटो हा क्रुरे व तिचा कुत्रा यांचा आहे. यावरून येथील मुली घरीं साधा पोषाख कसा घालतात तें कळेल. असो.

तुम्हीं पाठवलेलें फराळाचें जवळजवळ संपत आलें आहे. आबांनीं किंवा इंदूबाईनीं पाठवलेलें अद्याप आहे. त्यांत बेसनाचे लाडू होते हा शोध मला नुकताच लागला. ते मला फार फार आवडले व माझ्यापेक्षां येथल्या जर्मन मंडळींना जास्त आवडले. प्रथम बरेंच फराळाचें आलेलें पाहून, तें सर्व माझ्या एकट्याच्यानें सरणार नाहीं व बिघडेल या भीतीनें मीं तें वांटण्यास सुरुवात केली. गणपुले वगैरेंना कांहीं दिलें व या घरांतल्या मुलांना वगैरे

---

* विमल प्रभुदेसाई–डॉ. पंडित यांची पत्नी, हल्लीं मु. आफ्रिका.

जेव्हां भूक लागेल, तेव्हां माझ्या खोलींत येऊन खुशाल खावें असें मीं सांगितल्यामुळें ती मंडळींही रोज खात असत. शिवाय घरांत कोणी पाहुणा आला तर माझ्या खाण्याची गोष्ट निघे व त्यालाही द्यावें लागे. अशा रीतीनें तें आतां संपत आलें आहे व तें वांटल्याबद्दल आतां मला थोडासा पश्चात्तापही होऊं लागला आहे. खाणें माझ्या हातीं आलें, तेव्हां पोट चांगलें भरलेलें असल्यामुळें खाण्याची इच्छा झाली नाहीं व उगीच इतकें कशाला पाठविलें असें वाटलें व त्या वेळीं पत्रांतही मीं पुन्हा पाठवूं नये असें लिहिलें होतें. पण आतां मी तें परत घेतों. कोणीही येणारा भेटल्यास त्याजबरोबर तुम्हीं कांहीं पाठवल्यास हरकत नाहीं. विशेषतः काजूच्या बिया वगैरे इकडे मिळत नाहींत. फ्रॉ. म्युलरला व तिच्या भावालाही खाणें आवडलें. माझ्या चिवड्याला व लोणच्याला मात्र कोणीं हात लावीत नाहीं. असो.

परवांच्या दिवशीं मी व फ्रॉ. म्युलर तिच्या भावाबरोबर पॉट्स्डॅमला गेलों होतों. तेथें पूर्वींच्या जर्मन राजांचे व बादशाहांचे राजवाडे, किल्ले व बागबगीचे वगैरे आहेत. सर्व पाहायला वेळ झाला नाहीं. सृष्टिसौंदर्य पाहून थक्क झालों. जिकडेतिकडे हिरवें गार असून हजारों तऱ्हांचीं रंगीत फुलेंही होतीं. इकडे रंगीत फुलांच्या तऱ्हा किती तरी आहेत. आपल्याकडल्या सारखीं पुष्कळशीं सुवासिक फुलें मात्र आढळत नाहींत; वास असला तरी थोडा.

पैशाबद्दल व्यवस्था केल्याचें आबांनीं लिहिलें होतें, पण अद्याप पैशांचा कांहींच पत्ता नाहीं.

१०-६-२२

आज सकाळीं प्रो. विनयकुमार सरकार व त्यांचे एक व्यापारी मित्र दासगुप्त यांच्याबरोबर मी एक कारखाना पाहायला गेलों होतों. हा कारखाना मेलेल्या व इतर जनावरांच्या मांसाचा, कातड्यांचा व हाडांचा उपयोग करण्याकरितां असून, त्यांत मुख्यतः चरबी, खत, गुरांचें खाणें वगैरे तयार होतें. घाण मात्र इतकी कमालीची येत होती कीं, मोठ्या शिकस्तीनें आम्ही एक तास तेथें काढला. परत येतांना सरकार व त्यांचे मित्र यांजबरोबर कारखान्याविषयीं व व्यापाराविषयीं विशेषतः बडोदा स्टेटमध्यें काय काय करितां

येईल, यासंबंधीं बरेंच बोलणें झालें. बडोदें राज्याचा औद्योगिक रिपोर्ट किंवा अशा तऱ्हेचें कांहीं वाङ्मय पाठवितां आल्यास त्यांना पाहिजे आहे. सरकारचे मित्र येथें बरेच दिवस व्यापार करीत आहेत व सरकार त्यांचे थोडेसे भागीदार झाले असावे असा माझा तर्क आहे. सरकार येथें बऱ्याच उलाढाली करीत असतात व त्या सर्व कशा प्रकारच्या असतात याचा पत्ता मला अद्याप लागला नाहीं व मी तो लावण्याचा प्रयत्नही करीत नाहीं. येथें ते पैसे मिळवून उदरनिर्वाह करीत असावे. कदाचित् बायकोकडून कांहीं पैसे मिळाले असतील. जर्मन समाज, जातिभेद व एकंदर युरोपीय समाज व आपला समाज यांची तुलना यांसंबंधीं आज सरकारांचें माझें बरेंच बोलणें झालें. ते म्हणतात कीं, आपल्या व यांच्या समाजांत कोणत्याही तऱ्हेचा भेद नाहीं. सर्व ठिकाणीं पळसाला पानें तीनच. जातिभेद जवळजवळ आपल्याइतकाच कडक आहे. मी या घरांत राहायला आल्यापासून मलाही यांच्या जातिभेदाच्या उच्चनीच कुलांच्या कल्पना थोडथोड्या समजूं लागल्या आहेत. नैतिक विषयांत सुद्धां कोणीं पुढें मागें नाहीं असें सरकार म्हणतात. मुंबई काय, कलकत्ता काय, पॅरिस काय किंवा बर्लिन काय, सर्व या बाबतींत सारखींच. सर्व ठिकाणीं सर्व काळीं सारख्याच परिस्थितींत व हवेच्या मानानें पृथ्वीच्या पाठीवर सर्व माणसें सारखींच वागत आलीं आहेत. त्याचप्रमाणें आपण हिंदुस्थानचे लोक आपल्या आत्मज्ञानाचे गोडवे गातों तें चूक आहे. आपली अशी कल्पना झाली आहे कीं, आपण फार धार्मिक आहों व युरोपियन लोक केवळ ऐहिक विषयांचे भोक्ते आहेत. सरकार म्हणतात, पृथ्वीच्या पाठीवर सर्व काळीं— एवढेंच काय पण आपल्या व्यासमनूंच्या काळीं किंवा सत्ययुगांतही, अर्थशास्त्राच्या नियमनानें मनुष्यप्राणी वागत आहे. Man has been ever controlled by economic law pure and simple, just as matter by the law of gravitation. मोठमोठ्या बाता मात्र पुष्कळ शहाणे म्हणविणारे लोक मारतात. त्याचप्रमाणें आपण युरोपियन लोकांना उच्चनीच मानतों याचेंही कारण तेंच. आपण शरीरबलानें यांच्यापेक्षां कमी आहों, युद्धविद्येंत मागें आहों व पराधीन आहों, एवढी एक गोष्ट जर सुधारतां येईल तर आपण यांच्यापेक्षां कोणत्याही रीतीनें मागें नाहीं. या देशाला आपण वरचढ

समजण्याचें कारण, आपल्या शरीरदौर्बल्याची मनांत जाणीव असल्यामुळें आपल्या अंगीं असलेला भित्रेपणाच होय. असो. यासंबंधीं बरेंच बोलणें झालें व सरकारांचें म्हणणें कांहीं अंशीं मला पटलें. खरेंच बडोद्यास कच्चा माल उत्पन्न होतो याचीही माहिती मिळाल्यास पाठवावी. कडूलिंबाच्या बियांचा सध्यां काय उपयोग होत आहे वगैरे सर्व माहिती माझ्याकडे पाठवावी.

असो. आज जास्त लिहिण्यास वेळ नाहीं. कळावें, हे विनंति.

श्यामकान्त.

श्री

<u>पत्र १०८ वें</u> बर्लिन,

ता. ६ जुलै १९२२

ती. सौ. माईस शिरसाष्टांग नमस्कार. गेल्या आठवड्यास हिंदुस्थानचें टपालच येथें आलें नाहीं. मी गेल्या खेपेस फक्त एक कार्ड तुम्हांला टाकलें होतें तें पोंचलेंच असेल.

या खेपेस आनंदाची बातमी कळवायची म्हणजे येथील टेनिस टूर्नेमेंटमधें मला मिळालेलें यश. नुकतींच टूर्नेमेंट्स् संपलीं व मला Men's doubles मध्यें व Singles मध्यें पहिलें पदक व Mixed doubles मध्यें दुसरें बक्षिस मिळालें. अद्याप बक्षिसें हातीं आलीं नाहींत. पण चांदीचीं पदकें मिळतील असा अंदाज आहे. शेवटचा सामना झाला त्या वेळीं पाहणारांची खूप गर्दी होती. मला व मधूनमधून माझ्या प्रतिस्पर्ध्यांना टाळ्यांवर टाळ्या मिळत होत्या. माझ्या खेळाची सर्वांनीं वाखाणणी केली. माझी मास्तरीण फ्रॉ. निकोलाई ही अचानक त्या दिवशीं रस्त्यावरून चालली होती, तिनें थोडा वेळ थांबून आमची मॅच पाहिली. ती मागाहून मला सांगत होती कीं, जवळ उभी राहिलेली मंडळी माझ्याकडे बोट दाखवून म्हणत होती कीं, तो काळा मनुष्य फार छान खेळतो. सामना संपल्यावर क्लबच्या सर्व मेंबर्सनीं माझें अभिनंदन केलें व ' इतके दिवस आम्हांला तुमचा खेळ माहीत नव्हता. पण आतां यापुढें तुम्हीं आमच्या पहिल्या टीममध्यें–म्हणजे पहिले सहाजण–

खेळत जा व आमच्या क्लबतर्फे इतर क्लबशीं सामनेही खेळा, ' असें सांगितलें. पुष्कळांनीं तुम्हीं येथें किती वर्षें राहणार आहांत असा प्रश्न केला. येथेंच जास्त दिवस त्यांच्याच क्लबमध्यें रहावें अशी त्यांची इच्छा. असो. मला कल्पनासुद्धां नसतांना मला अचानक यश मिळालें, त्याबद्दल मला किती किती आनंद झाला आहे म्हणून सांगूं ? हिंदुस्थानांत मी कांहीं बक्षिसें मिळविलीं आहेत असें येथें सांगितलें, म्हणजे पुष्कळांना खरें वाटत नसे. आतां येथेंच मिळालेलीं पदकें दाखवितां येतील. हल्लीं क्लबांत मला खूप मान मिळतो. हीं टूर्नमेंट्स् केवळ आमच्या क्लबचींच नसून बर्लिनमधील सर्व खेळणारांना मोकळीं होतीं.

नानांनीं इकडे पाठविण्याकरतां जे जिन्नस सुचवले आहेत ते मला पसंत नाहींत. कारण इकडल्या लोकांना ते आवडतीलसें दिसत नाहीं. त्यापेक्षां मींच पुढें मागें कांहीं कांहीं जिन्नस सुचवीन. मला वाटतें बंगलोरच्या किंवा म्हैसूरच्या बाजूला चंदनाच्या लांकडाचें कोरीव काम केलेले पदार्थ—जसें पेले, तबकें वगैरे—हे पाठवण्यासारखे आहेत. चंदन इकडे नाहीं असें मी समजतों. कव्यांनीं असलें एक लहानसें नक्षीच्या चंदनाचें तबक प्रॉ. म्युलरला बक्षिस दिलें. तें त्यांनीं प्रो. जी. आर. परांजप्यांनीं सुचविल्यावरून बंगलोरहून बरोबर आणलें होतें. असो. इतर वस्तु सावकाश सुचवीन.

माझी प्रकृति चांगली आहे. अन्नपचनाची, शौच्याची वगैरे कोणत्याही प्रकारची तक्रार नाहीं व भूकही चापून लागते व झोंप छान येते. मात्र मी लठ्ठ झालों आहें किंवा होतों आहें अशी तुमची समजूत झाली असेल तर ती साफ चुकीची आहे. अगदीं हिंदुस्थानांत होतों तसा आहें, हें माझ्या फोटोवरून कळलेंच असेल.

हल्लीं उन्हाळा फार पडतो. घराच्या बाहेर पडायची सोय नसते. टेनिस वगैरे खेळलों म्हणजे घामानें ओलेंचिंब व्हावें लागतें. बाकी इतका उन्हाळा अलीकडे एक दोन दिवसच पडला. येथें मध्यें दोनतीन दिवस अति उकाडा तर पुन्हा चांगली थंडी पडते. मध्येंच एखाद्या वेळीं पाऊस पडतो. भाऊंच्या व नानांच्या सांगण्यावरून येथें सुती कोट कधींच लागत नाहींत अशी माझी कल्पना होती. पण हल्लीं लोंकरीचे कपडे घालण्याची सोयच उरली नाहीं. मुद्दाम

परवां सुती सूट घ्यायच्या हेतूनें फ्रॉ. म्युलरबरोबर बराच भटकलों, पण मना-सारखे सुती सूट विकत मिळेनात. सुती कपडे हिंदुस्थानांतल्याप्रमाणें येथें मिळतच नाहींत. सर्व कडकडीत व गचाळ असतात. बडोद्याच्या जेलच्या रेशमी कापडासारखें कापड तर इकडे मिळणें अशक्य. त्याचा एक सूट बरोबर आणला असता तर मजा झाली असती असें वाटतें. सध्यां उन्हाळ्यांत पांढरे किंवा पिंवळे कपडेच वापरतात. आज Laboratoryत लोंकरीचे कपडे घालून उभें राहवेना, म्हणून मी व रा. कोर्डे बाजारांत गेलों व मी एक अल-पाकचा सूट-(२२०० मार्क) व दुसरा साधा सुती सूट-(१२६० मार्क) असे दोन विकत घेतले व आतां उन्हाळ्यांत हेच घालीत जाईन. हिंदुस्थानांतून येतांना माझ्या जुन्या पांढऱ्या विजारी आणल्या होत्या म्हणून बरें त्या येथें विशेषतः टेनिस खेळतांना फार उपयोगी पडतात. कोर्डे तर जम-ल्यास पुढच्या वर्षाच्या उन्हाळ्याकरितां बडोद्याच्या जेलचें रेशमी कापड आणणार आहेत व येथें त्याचा सूट करवतील.

तारीख ८-७-२२

काल तुमचे फोटो पोंचले. साधारण बरे वाटले. नानांचे सगळे फोटो चांगले आले आहेत व ते मला फार आवडले. तुझे सुद्धां साधारण बरे आले आहेत, पण चेहरा विशेष प्रसन्न दिसत नाहीं. शिवाय दागिने-नथ वगैरे-न घालतां काढला असता तर मला जास्त आवडला असता. राजमहालाचे वगैरे इतर फोटो सुद्धां चांगले आले आहेत. ते येथें सर्वांना दाखवले व सर्वांना आवडले.

आज संध्याकाळीं फ्रॉयलाईन निकोलाईबरोबर फिरायला गेलों होतों. वांझे म्हणून येथें एक सुंदर जागा आहे, तेथें बागबगीचे, तळीं, पोहायच्या जागा, होडया वल्हवणें वगरे बऱ्याच गंमती आहेत, त्या ठिकाणीं गेलों होतों. फार मजा वाटली. मला आतां जर्मन चांगलें बोलतां येतें. फ्रॉ. निकोलाईनें तर फार तारीफ केली. मात्र त्याचा आतां इंग्रजीवर फार परिणाम होऊं लागला आहे. काल आमच्या हिंदुस्थान असोसिएशनची सभा झाली, त्या वेळीं पुष्कळांशीं इंग्रजी बोलण्याचा प्रसंग आला, तेव्हां बरेंच जड गेलें. वाक्यांची रचना जर्मनसारखी येते व बरेच जर्मन शब्दही वापरले जातात.

असो. मी येथें पुष्कळदां दुःखी असतों अशी तुमची कल्पना झालेली दिसते; पण तसें मुळींच नाहीं. एखादे दिवशीं मात्र कंटाळवाणें किंवा अस्वस्थ वाटतें. पण असा दिवस क्वचित्‌च येतो. आतां येथल्या परिस्थितीची संवय होत चालली आहे, म्हणून विशेष कसलीही गैरसोय वाटत नाहीं. हल्लीं टेनिस वगैरे पुष्कळ खेळतों व त्यांतही विशेषतः बक्षिसें मिळाल्यामुळें फार मजा वाटते व वेळ मजेंत जातो.

या पत्रासोबत विनयकुमार सरकारांनीं लिहिलेल्या नवीन पुस्तकाची जाहिरात त्यांनीं सांगितल्यावरून पाठवीत आहें.

अलीकडे किती तरी नवीन हिंदी गृहस्थ येथें आले आहेत व दररोज येत आहेत. सध्यां मार्कांचा भाव २२०० आहे. पूर्वीं पौंड मोडले नसते तर आज मी किती श्रीमंत झालों असतों ! जर्मन लोकांचे मात्र हाल आहेत. अतिशय टंचाईनें राहावें लागतें. आमच्या घरीं सुद्धां आतां हळु हळू खाणें दिवसेंदिवस साधें होत चाललें आहे. तरी जरूर वाटली म्हणजे जरूर तो जास्त खर्च करतों. त्याबद्दल काळजी बाळगूं नये.

ता. ९-७-२२

माझ्या दातांची येथें जो तो वाखाणणी करीत असतो. येथें बहुतेकांचे दांत वाईट व कृत्रिम असतात. त्यामुळें माझ्या दातांचा पुष्कळांना हेवा वाटतो. आमच्या घरीं कोणी पाहुणा चहाला आला कीं, आमच्या फ्राउ डॉक्टर मला कांहीं तरी म्हणून हंसायला लावतात व हंसलों म्हणजे माझे दांत पाहायला सांगतात. ' हिंदुस्थानांतलीं सर्व माणसें रोड असतात का ? ' वगैरे बरेच प्रश्न मला विचारले जातात. त्यांचीं प्रसंगानुसार मी उत्तरें देतों. आतां भाषा बरीच चांगली येऊं लागली आहे. त्याबद्दलही सर्वजण माझी प्रशंसा करतात.

राणीसाहेब यायच्या होत्या त्याचें काय झालें? आतां पुढें कधीं येणार आहेत? मी शामराव गायकवाड वगैरे मंडळींना भेटत नाहीं, त्यामुळें जयसिंगरावांची वगैरे माहिती मला कांहींच सांगतां येणार नाहीं.

सोबतचें पत्र श्रीपाद टिकेकरला सवडीनुसार पाठवावें. श्रीनिवासास

खोटें भविष्य

या आठवड्याला लिहायला वेळ मिळाला नाहीं. पुढल्या आठवड्यास लिहीन. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र १०९ वें

बर्लिन,

ता. १७-७-२२

तीर्थरूप सौभाग्यवती माईस शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना विशेष. नानांचें ता. २३-६चें पत्र नुकतेंच पोंचलें. महाराजांनीं ५० पौंड दिले ते फारच थोडे-निदान त्यांच्या मानानें तरी-असें मलाही वाटलें होतें. बाकी गुर्जरांच्या भविष्याचा व त्याचा मात्र संबंध नानांनीं उगीच कसा तरी जोडला आहे. द्रव्यप्राप्ति म्हणजे चापून द्रव्य मिळालें पाहिजे. माझ्या मतें याला विशेष द्रव्यप्राप्ति म्हणतां येणार नाहीं. शिवाय आम्हांला दोघांनाही ही द्रव्यप्राप्ति होऊं शकणार नाहीं. कोणाला तरी एकालाच. गुर्जरांचें मार्कांच्या भावांविषयीं भविष्यही खोटें ठरलें. त्यांनीं सांगितल्याप्रमाणें प्रथम मार्कांचा भाव पंधराशें होऊन, पुढें तो उतरत जाऊन दोनतीनशें व्हायला पाहिजे होता. पण सध्यां तो दोन हजारांच्या वर असून दिवसेंदिवस मार्क जास्तच वाईट होत जाण्याचीं लक्षणें दिसत आहेत.

आतां शाळांना व युनिव्हर्सिट्यांना सुट्टया होत चालल्या आहेत व लोक भराभर बर्लिनच्या बाहेर चालले आहेत. येथें ही एक मजा पाहिली कीं, दर सुट्टींत सर्व लोक कोठेंना कोठें तरी चैनीकरतां फिरायला जातात. गरीबांपासून तों श्रीमंतांपर्यंत, प्रत्येक जण आपल्या ऐपतीप्रमाणें लांबचा किंवा जवळचा प्रवास करतो. त्यामुळें जरूर ती विश्रांति मिळते, मनाला आनंद वाटतो, आणि देशाचा पुष्कळसा नवीन भाग पाहायला मिळतो. आपल्याकडे अशी पद्धत नाहीं. विशेषतः बायकांना वगैरे बाहेर जाणें म्हणजे जिवावर येतें. आपलें घर बरें आणि आपण बरें. बाकी इकडल्या सारख्या हॉटेलच्या वगैरे सोयीही आपल्याकडे गरीबांना व मध्यम स्थितींतल्या लोकांना नाहींत व पैशाची तर

फारच टंचाई. तरी पण श्रीमंत लोकांना किंवा इतरांना जी बाहेर फिरायला जाण्याची व स्वतःचें मनोरंजन करण्याची मनापासून इच्छा असायला पाहिजे, व जो एक प्रकारचा हुरूप पाहिजे–विशेषतः बायकांना,–कारण घरांत काम करून त्या दमलेल्या असतात व हवा पालटण्याची त्यांना अत्यंत जरूर असते, —तो आपल्याकडे दिसून येत नाहीं. सध्यां आमच्या घरच्या मिसेस डॉ. झेले, घरांतली मदतनीस बाई व मुलगा हार्स डोंगरांत प्रवासास गेले आहेत. ते परत आल्यावर डॉ. स्वतः जातील. रा. कोर्डे व्हिएन्ना व इटालीच्या बाजूला जाऊन येणार आहेत. नंतर ते व मी एखाद्या कारखान्यांत सुट्टीचे तीन महिने काम करण्याचें ठरविलें आहें. कर्वे मात्र लाइप्झिगला बसून अभ्यास करणार व जमल्यास थोडासा प्रवास करणार. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र ११० वें

बर्लिन,
ता. २३-७-२२

तीर्थरूप नानांस शिरसाष्टांग नमस्कार, वि. वि. मीं पाठविलेले येथल्या कुटुंबांतील फोटो अद्याप पोंचले नाहींत असें दिसतें. मागल्या पत्रांत पैशा-संबंधीं लिहिलेंच आहे. मला तुमचे साठ पौंड आतांच घाईनें पाहिजे आहेत असें नाहीं. कारण पन्नास पौंड जवळ आहेत. ते अद्याप कां पोंचूं नयेत हें कळत नाहीं. मी सध्यां पौंडांना बिलकूल हात न लावतां पूर्वीं विकत घेतले-लेच मार्क वापरीत आहें, व आतांपर्यंत तेच मार्क वापरायला पाहिजे होते, म्हणजे ते संपल्यावर मग पौंड मोडण्याच्या वेळीं मार्कांचा भाव आणखी चांगला मिळेल. कारण दिवसेंदिवस मार्क खालीं खालीं जात चालला आहे. फ्रान्स-कडून जर्मनीला कांहीं सूट पाहिजे होती व तीविषयीं सध्यां वाटाघाट चालू आहे. कालच वर्तमानपत्रांत वाचलें कीं, पॉंकारेनीं सूट देण्याचें नाकारलें. याचा परिणाम मार्कांच्या भावावर होणार. राथेनाउच्या खुनाचाही खूप परि-णाम झाला. राथेनाउचा खून करणाऱ्या गृहस्थांनीं आत्महत्या करून घेतल्याचें

तुम्हीं वाचलेंच असाल. एकट्या राथेनाउकरतां किती तरी माणसें मेलीं. त्याच्या खुनाच्या दुसऱ्या दिवशीं आगगाडीशिवाय दुसरीं सर्व वाहनें बंद होतीं. त्यामुळें आगगाड्या तुडुंब भरल्या होत्या. एका गाडींत बाहेरच्या फळीवर किती तरी माणसें उभीं होतीं. समोरून दुसरी एक गाडी येत होती, तिचें एक दार बाहेरच्या बाजूस उघडें होतें, त्याच्या धक्यानें फळीवर उभीं असलेल्या ५०।६० माणसांचा एकदम चेंदामेंदा झाला.

वीरेश्वरबाबंना पेटी पोंचल्याचें नुकतेंच पत्र आलें. ती त्यांना फार फार आवडली असें ते कळवितात. गुरुदेवांचीं पत्रें मला कधींच येत नाहींत, व मीही त्यांना लिहीत नाहीं. कारण त्यांना हल्लीं बोलायला सुद्धां फुरसत नसते. हिंदुस्थान सोडतांना त्यांना एक पत्र लिहिलें होतें. सध्यां ते रशियाच्या दुष्काळाकरतां पैसे जमविण्याच्या खटपटींत आहेत असें समजतें.

हल्लीं दिवसेंदिवस महागाई होत चालल्यामुळें आमच्या घरीं मांसाहार क्वचितच होतो. मी येथें आलों त्या वेळेपेक्षां हल्लीं मांसाची किंमत अडीच पटीनें वाढली आहे. बाकी हल्लीं उन्हाळ्यांत त्याची फारशी जरूरी नाहीं. हल्लीं मात्र मी रोज एक कप दूध घ्यायला लागलों आहे. बाकी खाणेंपिणें सर्व ठीक चाललें आहे.

मी आंघोळ आठवड्यांतून एकदांच करतों. ऊन पाण्याची रोज सोय नसते. बाहेर हवा जरी फार थंड नसते तरी पाणी चांगलेंच थंड असतें, त्यामुळें आंघोळ करीत नाहीं. आठवड्यांतून एकदां ऊन पाणी मिळतें व इकडच्या पद्धतीनें आंघोळ करण्यास फारच मजा वाटते. दोनतीनदां पोहायला गेलों होतों, व क्रेरे मला आणखी पुष्कळदां पोंहायला येण्याचा आग्रह करीत होती. पण पाणी मला फार थंड वाटतें त्यामुळें मी जात नाहीं.

आमची टर्म आतां संपत आली. ऑगस्टचा फार तर पहिला आठवडा लॅबोरेटरींत काम करूं. या टर्ममध्यें जर्मन भाषा शिकणें व समाजाची व लोकांची ओळख करून घेणें यापलीकडे शिकणें कांहींच झालें नाहीं. कारण येथें जें मीं काम केलें तें पूर्वीं हिंदुस्थानांत केलेलेंच होतें. सुटींत-तीन महिने एखाद्या कारखान्यांत काम करण्याचा माझा विचार आहे, म्हणजे लवकरच बर्लिन सोडून बाहेर जाईन. पत्रें मात्र नेहमींच्याच पत्त्यावर पाठवावीं.

आमच्या कॉलेजचे माझ्या बरोबरचे फेलो महाजनी* हे सध्यां केंब्रिजला गणिताचा अभ्यास करीत असतात,—ते फिरण्याकरतां येथें येणार आहेत, असें नुकतेंच त्यांचें पत्र आलें आहे. त्यांची माझी गांठ पडेल कीं नाहीं सांगतां येत नाहीं.

श्यामकान्त.

श्री

<u>पत्र १११ वें</u>

बर्लिन,

ता. ५-८-१९२२

तीर्थरूप सौभाग्यवती माईस शिरसाष्टांग नमस्कार, वि. वि. तुम्हीं पत्र लिहिलें आहे त्या वेळच्या जर्मनींतील स्थितीपेक्षां हल्लींची स्थिति कितीतरी वाईट आहे, हें तुम्हांला वर्तमानपत्रांवरून समजलेंच असेल. ज्यांच्याजवळ पौंड किंवा डॉलर्स आहेत त्यांचा भयंकर फायदा व ज्यांनीं पूर्वी मार्क घेऊन ठेवले होते त्यांचें भयंकर नुकसान असा प्रकार आहे. आतां पंधरा तारखेला मोराटोरियम संबंधानें लॉइड जॉर्ज व पॉँकारे यांची भेट होणार आहे, तिच्याकडे सर्वांचे डोळे लागून राहिले आहेत. हिंदुस्थानांतले लोकही एक्सचेंजचा फायदा घेऊन भराभर इकडे येत आहेत. परदेशी लोकांविषयींचा जर्मन लोकांचा द्वेष साहजिक वाढत आहे व त्यांतून आमचा रंग काळा असल्यामुळें आम्ही लागलींच परदेशी म्हणून ओळखून येतों व आमच्यावर पुष्कळदां रस्त्यावर वगैरे टीका होते. असो. एक्सचेंज केव्हां कशी होईल याचा कांहीं नेम नाहीं. एखादे वेळेस ऑस्ट्रियासारखीही स्थिति होईल. कांहीं दिवसांपूर्वीं माझ्याजवळ असलेले मार्क विकून पौंड घेतले असते तर बरें झालें असतें असें आतां वाटतें. बाकी हें सर्व मागून सुचतें.

ता. ५-८-२२

नुकतेच आमच्या कॉलेजचे माझ्याबरोबरचे फेलो व सध्यां विलायतेंत असलेले गव्हर्नमेंट ऑफ इंडिया स्कॉलर रा. महाजनी व त्यांचे एक मित्र

---

* हल्लीं फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपॉल डॉ. जी. एस्. महाजनी.

रा. देशमुख असे येथें फिरण्यास आले आहेत. त्याचप्रमाण पूर्वी माझ्याबरोबर I. D. F.मधें असलेले व टेनिस छान खेळणारे इ. एम्. जोशी–डॉ. नागूताई जोशी यांचे भाऊ–हेही इंग्लंडहून येथें आले आहेत. त्यांना घेऊन हिंडण्यांत बराच वेळ जातो. त्यांना भाषा येत नसल्यामुळें एकटें कोठें जायचें म्हणजे त्यांची गैरसोय होते. आज सकाळपासून सबंध दिवस येथल्या सर्वांत मोठ्या टेनिस क्लबांत घालविला. या क्लबनें आमच्या क्लबला टेनिसचे सामने खेळण्याकरितां बोलावलें होतें. आम्हीं दहा जण आमच्या क्लबकडून गेलों होतों. माझ्या क्लबांत मी चांगल्यापैकीं खेळणारा असल्यामुळें मला ही संधि अनायासें मिळून जर्मन खेळणाऱ्या लोकांचा समाज सहज पाहायला मिळाला, व त्याबरोबर पुष्कळ ओळखीही झाल्या. बाकी हा बर्लिनमधला सर्वांत मोठा क्लब असल्यामुळें तेथें अति उत्तम खेळणारे होते. त्यांच्यापुढें आमची डाळ मुळींच शिजली नाहीं. आमच्यापैकीं बहुतेकांनीं मार खाल्ला. मी एक सिंगल्स, एक Men's doubles एक Mixed doubles अशा तीन मॅचिस खेळलों. त्यांपैकीं फक्त सिंगल्सच जिंकलों. सकाळीं नऊला गेलों तो संध्याकाळीं साडेआठला परत आलों. जेवणखाण वगैरे सर्व तेथेंच झालें. त्या क्लबचा बंगलाही मोठा थोरला असून बागबगीचा, खेळ पाहणाऱ्यांना बसण्याची सोय, त्याचप्रमाणें डॅन्सिंग हॉल्स वगैरे पाहण्यासारख्या गोष्टी होत्या. बाकी सबंध दिवस अशा खेळांत घालवायचा म्हणजे वेळाचा अपव्यय आहे. पण एकदां अनुभव घेऊन पाहिला. ही वि.

श्री

पत्र ११२ वें — बर्लिन,

ता. १३-८-२२

ती. नानांस शिरसाष्टांग नमस्कार वि. वि. तुमचें ता. २१-७ चें पत्र नुकतेंच पोंचलें. माझ्या कामाविषयीं मी अलीकडे कांहींच लिहीत नाहीं, असें तुम्हीं म्हटलें आहे. पण नवीन विशेष लिहिण्यासारखेंही कांहीं नव्हतें. सध्यां नेहमींप्रमाणें ॲनॅलिसिस चालू आहे. नुसती डॉक्टरची डिग्री मिळवावयाची

झाल्यास निदान तीन वर्षें तरी अशा तऱ्हेनें येथें काम करायला पाहिजे. मध्यें दोन तीन परीक्षा द्याव्या लागतील. इतकें करून आम्हांला एखाद्या धंद्याची माहिती होईल असें मुळींच नाहीं व त्या दृष्टीनें पहायचें तर येथलें युनिव्हर्सिटीचें शिक्षण मुळींच उपयोगाचें नाहीं असें आतां मला कळून चुकलें आहे. पण माझा विचार केवळ सुट्टया धंदेशिक्षणांत व इतर वेळ युनिव्हर्सिटींत घालवावयाचा होता, व युनिव्हर्सिटीचें शिक्षण संपल्यावर पुन्हा एक दोन वर्षें स्वतंत्र धंदेशिक्षणाकरितां घालवतां येतीलच. डिग्रीलाही सध्यां किंमत आहेच. या सुट्टींत इंडियन ब्यूरोनें एका कारखान्यांत आमची सोय करण्याचें वचन दिलें होतें, पण अद्यापपर्यंत ' आज या, उद्यां या ' अशावरच वेळ गेला. ते तरी काय करणार? त्यांच्याकडून होईल ती खटपट ते करीत आहेत. सध्यां बर्लिनमधें बरेच दिवस राहून मला तर येथला अगदीं कंटाळा आला आहे. सुट्टीचे दोन आठवडे तर गेले, तेव्हां आतां कोठें तरी प्रवास करून देश तरी पहावा असा विचार करीत आहें. उद्यांपर्यंत जर ब्यूरोनें आमची कांहीं सोय लावली नाहीं, तर ऑस्ट्रियामधें टिरोल वगैरे भागांत फिरायला जाण्याचा विचार करीत आहें. रा. महाजनीही बरोबर येतील असें दिसतें. पाहूं या आतां काय होतें तें. एखादा महिना अशा रीतीनें हिंडून दुसरा महिना अभ्यास करण्यांत किंवा इतर ठिकाणीं काम करण्याचें ठरल्यास त्यांत काढावा असा विचार करूं लागलों आहें. मग पुढें ऑक्टोबर अखेर पुन्हा युनिव्हर्सिटींत कामाला सुरुवात होईल; असा एकंदर माझा बेत आहे. तीन वर्षें युनिव्हर्सिटीचा अभ्यास व पुढें डिग्री मिळाल्यावर दोन वर्षें धंदेशिक्षण असा एकंदर पांच वर्षांचा कार्यक्रम मीं माझ्यापुढें आंखला आहे. यांपैकीं सहा महिने गेले. तुमचें याविषयीं काय मत आहे तें सवडीनुसार कळवावें. सध्यां इंग्लंडहून येथें आलेले महाजनी, देशमुख, जोशी या गृहस्थांबरोबर भटकण्यांत वेळ जातो. टेनिस, बोटिंग वगैरे मधूनमधून करतों.

हल्लीं माझा मित्र ज्योतिष राय येथें आला आहे व मी येथून गेल्यावर माझ्याच खोलींत कांहीं दिवस राहणार आहे.

मला नुकताच कलकत्याहून रामानंद चातर्जींकडून ' प्रवासी ' आला.

कोणीं पाठवायला सांगितला कांहीं कळत नाहीं. माझ्याकरतां कोणीं वर्गणी भरून पाठवायची सोय केलेली दिसते. कोणीं केली तुम्हांला माहीत आहे काय? बहुतेक वीरेश्वरबाबूंचें काम दिसतें आहे. मॉडर्न रिव्ह्यू मात्र तुमच्याकडून बरेच दिवस आला नाहीं. यंग इंडिया पाठवायची जरूर आहे असें मला वाटत नाहीं.

नुकतेंच परवांच्या दिवशीं भाऊंनीं पाठवलेलें चहा, काजूच्या बिया, साटें वगैरेंचें पार्सल पोंचलें. जकात मला फक्त चार मार्कच द्यावी लागली. मला वाटतें आंत चहा आहे हें माहीत नसल्यामुळें इतकी कमी जकात माझ्याकडून घेतली गेली. असो. चहा नुकताच परवां केला होता. मला फार आवडला व इतरांनाही आवडला. जर्मन चहा इतका चांगला लागत नाहीं. इतर पदार्थही येथें सर्वांना आवडले.

ता. १४ ऑगस्ट १९२२

आजच आमच्या ब्यूरोकडून कळलें, कीं या सुट्टींत आमचा कारखान्यांत प्रवेश होणें शक्य नाहीं. तेव्हां आतां कोठें तरी प्रवास करायचा विचार केला आहे. ऑस्ट्रिया, व्हिएन्ना, टिरोल वगैरे ठिकाणीं जायचें ठरवीत आहें. साधारण महिनाभर प्रवास करण्याचा विचार आहे. तेव्हां याच्या पुढच्या महिन्यांत माझीं पत्रें कदाचित् नियमितपणें येणार नाहींत. कारण कोणत्या ठिकाणीं कोणत्या वारीं पत्र टाकायचें हें नक्की कळणार नाहीं. असो. कदाचित् माझें पुढच्या आठवड्याचें पत्र ऑस्ट्रियाहून येईल. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र ११३ वें

म्यूनिक,

ता. २०-८-१९२२

तीर्थरूप सौभाग्यवती माईंस शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना विशेष. तुमचीं ता. २७-७-२२ चीं पत्रें गेल्या आठवड्याला बर्लिनला असतांना पोंचलीं. त्यांत या आठवड्याला माझें पत्र न पोंचल्याबद्दल होतें, याचें

आश्चर्य वाटतें. कारण दर आठवड्यास मी नियमितपणें पत्रें टाकीत असतों. असो. पुढच्या आठवड्यास दोन पोंचलीं असतील.

माझा या सुट्टींत एखाद्या कारखान्यांत काम करण्याचा विचार होता हें पूर्वीं लिहिलेंच आहे. पण त्याप्रमाणें कांहीं जमेना म्हणून तो बेत रहित करून मी रा. महाजनींबरोबर दक्षिण जर्मनी व ऑस्ट्रिया या बाजूस प्रवास करण्याचें ठरवलें व त्याप्रमाणें दोन तीन दिवस बर्लिनमधील अडाणी पोलिसांकडे खेपा घालून सर्व सव्यापसव्य यथायोग्य करून ऑस्ट्रियन कॉन्सलचा व्हिझा घेतला. इतक्यांत आमच्या ब्यूरोकडून मला कळविण्यांत आलें कीं, माझ्याकरितां त्यांनीं एक केमिस्ट बर्लिनमध्यें शोधून काढला असून, त्याच्या लॅबोरेटरींत काम करण्याची तुमची इच्छा असल्यास त्याला भेटायला यावें. त्याप्रमाणें मी व कोर्डे दुसऱ्या दिवशीं त्याला भेटायला गेलों होतों. त्याची Oils and fatsची लॅबोरेटरी असून बरेच विद्यार्थी त्याच्या हाताखालीं काम करीत असावे. शिवाय त्याचा एक साबूचा कारखाना असून त्यांत आम्हांला काम करण्याची परवानगी मिळेल असें त्यानें सांगितलें. प्रथम त्याच्या लॅबोरेटरींत Oils and fats या विषयावर elementary preliminary training घ्यायचें व आपणांस वाटेल त्या विशेष special branch चा technologically अभ्यास त्याच्या लॅबोरेटरींत करायचा, व पुढें जमल्यास त्याच्याच मदतीनें कारखान्यांत वगैरे प्रवेश मिळवावयाचा. अशा तऱ्हेचें त्याचें आमचें बोलणें झालें. पुढें तुम्हांस वाटल्यास हिंदुस्थानांतलीं वेगवेगळीं तेलें किंवा बियाणीं आणवून त्यांचें analysis वगैरे करून त्याच्यावर काम करा असें त्यानें सुचवलें, व हिंदुस्थानांतल्या तेलांसंबंधीं किंवा तेलांच्या बियांसंबंधीं हिंदुस्थानांत कोणी व्यापारी माहीत असल्यास आमचे व्यापारी संबंध घडवून आणल्यासही उत्तम असें त्यानें सुचवलें. परंतु त्याची एक अट म्हणजे आम्ही प्रत्येकानें त्याला वीस हजार मार्क दिले पाहिजेत व मग आमचें काम पुरें होईपर्यंत आम्हीं तेथें राहावें. मात्र प्रश्न असा. आम्ही सध्यां युनिव्हर्सिटींत जें शिकत आहों तें सोडण्याची आमची इच्छा नाहीं; तेव्हां फक्त सुट्टींतच याच्याकडे काम करतां येईल. मीं अद्याप काय करायचें तें नक्की ठरवलें नाहीं. कोडर्यांनीं १ सेप्टेंबरपासून तेथें काम

करायचें ठरवलें आहे. मीही ताबडतोब कामास सुरुवात करायला पाहिजे होती; पण अगोदरच ऑस्ट्रियन कॉन्सलच्या व्हिझाला दहा शिलिंग खर्चले होते व सर्व ठरवलेंही होतें. बर्लिनचाही बरेच दिवस राहून कंटाळा आला होता. तेव्हां निदान सेप्टेंबरच्या मध्यापर्यंत प्रवास करावा व पुढें उरलेली सुट्टी म्हणजे महिना दीड महिना त्याच्या लॅबोरेटरींत काम करावें व तेंच पुढें दर सुट्टींत चालू ठेवावें असा विचार केला. २०००० मार्क म्हणजे माझ्या पहिल्या भावाप्रमाणें अतिशय जास्त रक्कम झाली. पण सध्याच्या भावाप्रमाणें चार पांच पौंड होतात. तेव्हां हे पैसे असे खर्चावे कीं नाहीं याचा विचार करीत आहें. फायदा झाला तर किती तरी होईल, नाहीं तर सर्व पैसे फुकट जातील. बहुतेक त्या लॅबोरेटरींत सेप्टेंबर १६ पासून जाईन असें म्हणतों. कोर्डे १ सप्टेंबरपासून कामाला लागणार आहेत.

असो. आतां आमच्या प्रवासाची हकीकत लिहितों. गेल्या एकोणीस तारखेला सकाळीं आम्ही—मी व महाजनी—एरोप्लेननें लाइप्झिगला आलों. हा एरोप्लेनचा माझा पहिलाच अनुभव. प्रत्येकीं पांचशेंदहा मार्क पडले. जेथून एरोप्लेन निघतें ती जागा बरीच लांब असल्यामुळें आगगाडीनेंच तेथें पोंचायला एक तास लागतो व आठ वाजतां एरोप्लेन निघतें. म्हणून पांच-सहा वाजतां महाजनींच्या हॉटेलमधून निघालों. लवकरच उठावयाला पाहिजे म्हणून रात्रीं महाजनींच्या घरीं निजलों. सकाळीं उठून वेळ नव्हता म्हणून आधीं कांहीं खाल्लें नाहीं. रस्त्यांत कोठें तरी खाऊं असें म्हटलें; पण एरोप्लेनची जागा शोधतां शोधतां इतका वेळ गेला कीं, पांचदहा मिनिटेंच पूर्वीं तेथें पोंचलों. त्यामुळें खायला वेळ झाला नाहीं व लाइप्झिगला पोंचेपर्यंत पोटाची कुरकूर सारखी चालू होती. पहिल्यानें अपघात वगैरे होईल म्हणून बरीच काळजी वाटत होती. कारण रस्त्यांत एरोप्लेन बिघडलें कीं, हाकणाऱ्याचा कांहींच इलाज चालत नाहीं व मग मरण हें ठेवलेलेंच. पण अलीकडे जर्मनी-मधें तरी असे अपघात फारच थोडे होतात, असें नक्की कळल्यावरूनच निघालों. प्रथम पंधरा मिनिटें हवेंत उडाल्यावर आमच्या पायलटला एंजिन बिघड-ल्याची शंका आली, म्हणून तो परत फिरला व निघाल्यापासून अर्ध्या तासानें

आम्ही पुन्हा बर्लिनलाच जमिनीवर उतरलों. म्हणजे अर्ध्या तासाचा जादा प्रवास आमच्या पदरांत पडला. नंतर एंजिन दुरुस्त करून पुन्हा निघालों. आमच्या अंगांत जाड कपडे व डोक्याला घट्ट बसणारी टोपी व डोळ्यांना जाड चष्मे लावले होते. आवाज एवढा मोठा होत होता कीं, कानासभोंवार कापड असून सुद्धां कानठळ्या बसल्या होत्या. बोलणें तर ऐकूं येणें शक्यच नव्हतें. वेग भयंकर होता, हें सांगायला नकोच. सारखे ढगांतून चाललों होतों. मध्यें पाऊस चुकविण्याकरितां एरोप्लेन वांकडें वळवून न्यावें लागलें. आम्ही जमिनीपासून सहाशें मीटर, जवळजवळ अर्धा मैल उंच होतों. निघाल्यापासून सव्वा तासांत लाइपझिगला पोंचलों. आगगाडीला साडेतीन चार तास लागतात. आम्ही अगदीं उघड्यावर असल्यामुळें सभोंवार खालीं आम्हांला मोकळेपणें पाहतां येत होतें. खालीं गांवें, घरें, नद्या, रेल्वे भराभर मागें टाकून आम्ही प्रचंड वेगानें चाललों होतों. खालचीं गांवें वगैरे चित्रांतल्या-प्रमाणें लहान दिसत होतीं. एकदोनदां विमानांतून हात बाहेर काढला तो हवेच्या जोरामुळें थाडकन मागें गेला,—तो इतका कीं, आतां हात तुटून पडतो कीं काय असें झालें. असो. लाइप्झिगला जमिनीवर उतरल्याबरोबर दिनकर कर्वे तेथें होताच. त्यानें व आम्हीं एरोप्लेनसमोर फोटो काढला. नंतर काल सबंध दिवस लाइप्झिग शहरांत कर्व्यांबरोबर हिंडून शहर पाहिलें व रात्रीं पुन्हा आगगाडीनें निघालों ते आज सकाळीं येथें आलों. येथें तीन चार दिवस राहण्याची इच्छा आहे. येथली बियर म्हणजे सबंध जर्मनींत प्रसिद्ध आहे. हें शहर फारच सुंदर आहे. राहणेंही फार महाग आहे. येथली बियर प्रत्येक मनुष्य इतकी ढोशीत असतो कीं, त्याच्या पोटाच्या पोकळीला कांहीं सीमा आहे कीं नाहीं हेंच कळत नाहीं. साधारण आपला लहान तांब्याभर होईल एवढं मोठें भांडें भरून प्रत्येकजण दर खेपेस पितो. अशीं किती भांडीं दिवसांतून आत्मसात केलीं जात असतील कोण जाणे! यांत एवढी काय जादू आहे, हें पाहण्याकरितां मींही आज एक लहानसा चंबू मागवला होता. ती इतकी कडू होती कीं, जर्मनींत क्विनाईन न घेतां मलेरिया कां होत नाहीं ही शंका माझ्या मनांतून एकदम नाहींशी झाली. वेगवेगळीं स्थळें पाहण्यांत सर्व दिवस जातो. दोन तीन आठवडे तुमचीं पत्रें मला मिळणार नाहींत.

विमानातून सफर

पृ. २०६]

महाजनी–श्यामकान्त–कर्वे

येथून पुढें ऑस्ट्रियाला जाणार आहोंत. थोडासा फाजील खर्च होत आहे खरा, पण मला वाटतें हल्लींच्या भावाप्रमाणें पाहिलें तर हा खर्च फार नाहीं. महाराजांनीं दिलेल्या पैशांचा केव्हां केव्हां असा उपयोग करावा असें ठरविलें आहे. बाकी जर्मनी ऑस्ट्रियांत म्हणून तरी हा प्रवास परवडला. स्वित्सरलंड, फ्रान्स, हॉलंड वगैरे ठिकाणीं खर्चाच्या भीतीनें इच्छा असूनही प्रवास करणें शक्य नाहीं.

असो. माझी तब्येत उत्तम असून प्रवास चांगला मानवत आहे. पुढचें पत्र ऑस्ट्रियाहून पाठवीन. प्रवासाच्या घाईंत वेळेवर पत्र पोष्टांत न पडण्याचा संभव असल्यामुळें कदाचित् एखाद्या आठवड्यास तुम्हांला पत्र मिळणार नाहीं व पुढच्या आठवड्यास दोन मिळतील असा प्रकार होईल. माझ्या प्रवासासंबंधीं व बर्लिनच्या केमिस्टच्या अटीसंबंधीं म्हणजे अर्थात् एकंदर खर्चासंबंधीं तुम्हाला काय वाटतें तें सविस्तर लिहावें. कळावें हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र ११४ वें

म्यूनिच,

ता. २८-८-१९२२

ती. नानांस शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना विशेष. सध्यां आम्ही म्यूनिचमधील ठिकाणें पहात आहोंत. हें शहर खरोखर फार सुंदर आहे व म्यूझियम्स्, प्रदर्शनें यांचा येथें बिलकुल तोटा नाहीं. आतांपर्यंत आम्हीं एक म्यूझियम् व दोन प्रदर्शनें पाहिलीं. म्यूझियममध्यें कोळशाच्या, लोखंडाच्या व इतर धातूंच्या खाणींचे लहान प्रमाणांवर केलेले नमुने व त्याचप्रमाणें खाणींतून काढलेल्या दगडांपासून धातू तयार करण्याचीं यंत्रें व त्यांचा उपयोग वगैरे लहान प्रमाणांवर दाखवलेला होता. त्याचप्रमाणें अगदीं जुन्या काळापासून सायकली व मोटारगाड्या कसकशा होत गेल्या, हेंही तेथें पहायला सांपडतें. नंतर जवळच असलेल्या मॅक्सिमिलियम या जुन्या राजवाड्याच्या

बाजूला गेलों होतों. तेथील राजवाडा अद्याप पाहिला नाहीं. पण सभोंवारची बागच इतकी उत्तम वाटली कीं, एक संध्याकाळ त्यांतच हिंडलों. काल रस्त्यानें चाललों असतांना जनरल हिंडेनबुर्ग आम्हांला पहायला मिळाले. ते सध्यां येथें येथल्या राजाच्या प्रेसिडेंटकडे पाहुणचार खात आहेत व रस्त्यानें त्यांच्या मिरवणुकी पुष्कळ निघतात. त्यांना पहाण्याकरितां लोकांच्या उड्या पडत असतात. महाहिंमती मनुष्य दिसतो. लढाईपूर्वीच्या व लढाई-तल्या आठवणी येऊन जर्मनीच्या सध्यांच्या स्थितीबद्दल त्याला काय बरें वाटत असेल! आज सकाळीं ग्लास पॅलेस–चित्रकला प्रदर्शन–पहायला गेलों होतों. पुष्कळ मोठमोठ्या चित्रकारांचीं चित्रें होतीं. पण मला खरें म्हणाल तर त्यांत विशेष मजा वाटत नाहीं. हीं प्रदर्शनें पहायचीं म्हणजे कर्तव्यबुद्धीनें व शिवाय परत गेल्यावर इतरांस तीं पाहिल्याबद्दल बढाई मारण्याकरितां एवढ्या दोनच मुद्यांनीं पहायचीं असतात. नंतर संध्याकाळीं वेगवेगळ्या धंद्यांचें प्रदर्शन पहायला गेलों होतों. तें मात्र मला अतिशय आवडलें. यांत वेगवेगळे किती तरी भाग पाडलेले असून कोठें चिनी मातीचीं भांडीं, तर कोठें रेशमी कापडें, कोठें रंग, कोठें चामड्याचें सामान वगैरे भपकेबाज रीतीनें ठेवलेलें होतें. एक भाग ऑप्टिकल यंत्रांचा होता. त्याचप्रमाणें एका हॉलमध्यें मेकॅनोप्रमाणें खेळांतलीं हजारों तऱ्हांचीं लहान प्रमाणावर पण उपयोगी यंत्रें लहान लहान लोखंडाच्या किंवा लांकडाच्या तुकड्यांपासून तयार केलेलीं असून, तीं लहानशा विजेच्या प्रवाहानें चालवलेलीं होतीं. फारच मोहक दिसत होतीं. तेथलीं कांहीं चित्रें मीं विकत घेतलीं आहेत तीं पुढें सावकाश पाट-वीन. प्रदर्शन पाहून झाल्यावर सभोंवारच्या सुंदर बागेंत हिंडलों व बँड ऐकला. नंतर जवळच एक अति भव्य आणि उंच बव्हेरिया–काल्पनिक देवी–चा पुतळा पाहिला. ही बव्हेरियाची राजधानी असल्यामुळें हा पुतळा येथें ठेवला आहे. याच्या आंत एक जिना आहे व त्यानें चढून गेलें म्हणजे या पुतळ्याच्या डोक्यापर्यंत चढतां येतें व त्याच्या डोळ्यांतून सबंध म्यूनिच दिसतें.

बव्हेरियांतील जर्मन भाषा बर्लिनच्या भाषेसारखीच असली तरी उच्चारांमध्यें वगैरे बराच फरक आहे. ही एक पोटभाषा आहे. मला चांगली समजते, पण मी स्वतः जर्मन बोलतांना मात्र बर्लिनकडची भाषा बोलतों.

जर्मन भाषा चांगली बोलतां आल्याबद्दलही येथें पुष्कळांकडून मला शाबासकी मिळते......आणखी दोन दिवसांनीं पुढें मोर्चा वळवावयाचा विचार आहे.

ता. २३-८-२२

आज नॅशनल म्यूझियम व पुन्हा जर्मन म्यूझियम पाहिला. दोन्ही छान होते. पहिल्यांत वेगवेगळ्या सुंदर शहरांचे व खेड्यांचे व त्याचप्रमाणें ऐतिहासिक प्रसंगांचे देखावे लहान प्रमाणांवर तयार केलेले होते. दुसऱ्यांत ज्योतिषांत लागणारीं जुनीं व नवीं सर्व यंत्रें, डोळ्याच्या लेन्सिस् व उजेड, आवाज, विद्युत् वगैरे पदार्थविज्ञानशास्त्राच्या वेगवेगळ्या विभागांत उपयोगांत आणण्याचीं यंत्रें ठेवलेलीं होतीं. आज पाऊस पडत आहे व अंधार पडला आहे, त्यामुळें दिवस कंटाळवाणा गेला. येथें आम्हीं पाहिले यांशिवाय म्यूझियम व पिक्चर गॅलरीज् इतक्या आहेत कीं, त्या सर्व पाहणें शक्य नाहीं व पहायची आमची इच्छा नाहीं. म्यूझियम पाहून पाहून आपण चापून थकतों मात्र; त्याप्रमाणें फायदा विशेषसा कांहीं होत नाहीं. तेव्हां आतां यापुढें म्यूझियमना आम्ही महत्त्व कमीच देत जाणार. म्यूझियमचा खरा उपयोग ज्यांना करून घ्यायचा असेल, त्यांना एखाद्या विशिष्ट विषयाची आवड व माहिती पाहिजे व त्या विषयाच्या भागांत त्यांनीं बरेच दिवस घालवले पाहिजेत.

ता. २६-८-२२

ता. २४ रोजीं सकाळीं आम्हीं म्यूनिच सोडलें व दुपारीं तीन वाजतां टिरोलची राजधानी इन्सब्रुक या ठिकाणीं पोंचलों. रस्त्यांत ऑस्ट्रियाच्या सरहद्दीवर आमचें सामान तपासणें व पासपोर्ट पाहणें वगैरे सर्व विधी नेहमींप्रमाणें झालेच. इन्सब्रुकला येतांना आल्प्स् डोंगराचा देखावा मोठा छान दिसत होता व खुद्द इन्सब्रुक हें देखील अगदीं डोंगरांतच इन्न नदीच्या कांठीं आहे. देखावा पाहून ही जागा राहण्यास अतिशय मजेची वाटेल अशी जी आशा आमच्या मनांत उत्पन्न झाली होती, ती तेथें एक दिवस राहिल्याबरोबर नाहींशी झाली. इन्सब्रुकला आल्याबरोबर आम्हांला मार्क मोडून क्रोन्स विकत घ्यावे लागले. या क्रोन्सची हल्लीं अगदीं शोचनीय स्थिति आहे हें

वर्तमानपत्रांवरून तुम्हांला माहीत आहेच. सध्यां एका पौंडाला ३,७०,००० क्रोन्स मिळतात. एका मार्कालाही सत्तरऐशीं क्रोन्स मिळत असत. पण सध्यां मजा अशी झाली आहे कीं, क्रोननें आपली खालीं उतरण्याची अगदीं पराकाष्ठा केली असें त्याला स्वतःला वाटून तो कांहीं दिवस स्वस्थ बसला. पण मार्काला तें सहन न होऊन हल्लीं तोही त्याची स्पर्धा करूं पहात आहे. त्यामुळें परवांच्या दिवशीं आम्हांला एका मार्काला साठ क्रोन मिळाले, तर आज पंचेचाळीस मिळाले. आम्हांला पूर्वी वाटलें होतें कीं, क्रोन ज्या अर्थी इतका स्वस्त आहे, त्या अर्थी ऑस्ट्रियांत रहायला आम्हांला अगदींच थोडा खर्च लागेल; पण तसें मुळींच नाहीं. पहिल्या प्रथम आम्ही इन्स्ब्रुकच्या एका गचाळ उपाहारगृहांत जेवणाचा एकच मुख्य पदार्थ जेवलों, त्याला आम्हांला प्रत्येकीं १०,००० क्रोन्स पडले,—म्हणजे म्यूनिचला आम्ही राहिलों होतों त्यापेक्षां किती तरी महाग. एक कप कॉफीला १००० क्रोन. ब्रेडच्या एका तुकड्याला ५०० क्रोन्स. इन्स्ब्रुकला तर दिवसाला २०,००० क्रोन्सच्या खालीं खोली मिळत नाहीं. म्हणजे खर्चाचें प्रमाण जवळजवळ इंग्लंडच्या सारखें झालें. तरी पण ज्यांच्याजवळ पौंड किंवा डॉलर आहेत त्यांना तें जरा स्वस्तच पडतें. पण आम्ही पुढें काय करावें या विचारांत पडलों. शेवटीं पांचसहा मलांवर हाल म्हणून एक लहानसें गांव आहे तेथें ट्रॅमनें गेलों व एक साधीशी खोली शोधून काढली. सकाळीं उठून इन्स्ब्रुकच्या बाजूला आगगाडीनें आलों, उत्तम उत्तम ठिकाणें पाहिलीं व रात्रीं पुन्हा परत गेलों. आज दुपारीं इन्स्ब्रुकहून निघून त्सेल या गांवीं आलों आहों. हें त्सिलर नदीच्या कांठीं डोंगरांत एक सुंदरसें खेडें आहे. डोंगर गर्द झाडांनीं आच्छादिलेले असल्यामुळें फारच रम्य दिसतात. टिरोलचा हा एक फारच सुंदर भाग आहे. शिवाय खेडें असल्यामुळें थोडेंसें स्वस्तही पडेल असें वाटतें. शिवाय मोठ्या शहरांतला घाणेरडेपणा येथें नाहीं. ऑस्ट्रिया दरिद्री झाल्यामुळें शहरांत कोठेंही स्वच्छता ठेवणें अशक्य झालें आहे. येथें लोकांचें दारिद्र्य पाहून अगदीं कींव येते. नाण्याचा परिणाम अति भयंकर झाला आहे. पहावें तिकडे परदेशी लोक भरले आहेत. मोठमोठालीं हॉटेलें अमेरिकन, इंग्लिश, फ्रेंच वगैरे लोकांनीं भरलीं आहेत, त्यामुळें भाषाही बऱ्याचशा ऐकूं येतात. ऑस्ट्रियाची भाषा जर्मनच

आहे ही गोष्ट पुष्कळांना माहीत नसते. यामुळें मला आतां वाटेल तेथें माझी सोय लावून घेतां येते, नाहीं तर पुष्कळदां फार कठिणच प्रसंग आला असता. ऑस्ट्रियनपैकीं चांगला पोषाख केलेला, फाटके बूट न घातलेला असा गृहस्थ रस्त्यावर क्वचितच आढळतो. भिकाऱ्यांचा तर रस्त्यावर सुळसुळाट असावयाचा, परंतु आतां भीक मागण्याची बंदी असल्यामुळें ते राजरोसपणें भीक न मागतां नुसते रस्त्यावरून फेऱ्या घालीत असतात. पोटभर अन्न कोणालाच खायला मिळालेलें दिसत नाहीं. रस्त्यावर मुलें वगैरे दिसतात तीं अगदीं हाडकुळीं दुष्काळांतल्याप्रमाणें दिसतात. माझ्याबरोबर महाजनी आहेत ते म्हणाले कीं, इंग्लंडांत गरिबांचें पोरसुद्धां रोड दिसत नाहीं. इंग्लंडांत सर्वच मुलें म्हणे गुलजार दिसतात. अशी दैन्यावस्था सर्व ऑस्ट्रियन लोकांची असतां, आम्ही परदेशी लोक यांच्या समोर हॉटेलमध्यें पक्वान्नें खातांना व छान कपडे घालून रस्त्यानें जातांना दिसलों, म्हणजे यांना किती संताप येत असेल व द्वेषानें यांचा मनांतल्या मनांत किती जळफळाट होत असेल, याची कल्पनाच करा. परवां सहज रस्त्यानें चाललों होतों, तों दोघे तरुण ऑस्ट्रियन गृहस्थ आमच्या जवळून उलट्या दिशेनें गेले व जातांना त्यांनीं सहज आमच्याकडे पाहिलें. आम्ही काळे असल्यामुळें जो तो आमच्याकडे पाहतोच; त्यांतल्या एकाचा चेहरा बर्लिनमधल्या माझ्या एका ओळखीच्या विद्यार्थ्यासारखा असल्यामुळें मींही थोडा वेळ त्याच्याकडे पाहिलें व मग आम्ही पुढें गेलों. दहाबारा पावलें गेल्यावर मीं पुन्हां मागें वळून पाहिलें, तों त्या दोघांनीं आमच्याकडे मागें वळून पाहिलें. असें दोनतीनदां झाल्यावर मग म्हटलें, यांच्याशीं बोलावें. म्हणून मी परत वळलों व टोपी काढली व त्यांना 'कसें काय?' म्हणून विचारलें. त्यांनीं 'काय पाहिजे?' म्हणून विचारल्यावर मीं म्हटलें, 'तुम्ही आम्हांला ओळखतां काय ?' त्यावर त्यांतला एक म्हणाला, 'असल्या लोकांची ओळख असण्याची मला जरूर नाहीं,' व दुसरा 'आम्हांला, फसवावयाचा विचार केला आहांत काय?' असें म्हणून शिव्यांचा भडिमार करूं लागला. आम्ही मुकाट्यानें परत गेलों. यांच्यापुढें बोलण्याची कांहींच सोय उरली नव्हती. आम्ही परदेशी–व कदाचित् काळे–म्हणून आमच्यावर त्यांचा राग दिसला. गरिबीनें हाल झाल्यामुळें – विशेषतः परदेशीयांकडून –पैसे मिळविण्या-

करितां हे लोक कांहींही करायला मागेंपुढें पाहणार नाहींत, याचा मासला आज मिळाला. आम्ही आगगाडींत चढायच्या बेतांत होतों व थोडेंसें सामान आमच्या हातांत होतें. एक मजूर आमचें सामान घेऊन आम्हांला मदत करूं लागला. त्याला नको म्हणायचीही सोय नव्हती. आम्ही गाडींत बसल्यावर त्याला मी १००० क्रोन दिले. आमच्या बर्लिनच्या हिशेबाप्रमाणें येवढें पुरें होतें. पण तो म्हणाला, ‘ आणखी ५०० द्या.’ मी म्हटलें, ‘नाहीं. मीहून तुला बोलावलाही नव्हता, पण तूं आलास म्हणून तुला हें दिलें आहे, एवढें पुरें आहे. ’ त्यावर तो डोळे वटारून म्हणाला, ‘ तुम्ही मला ५०० जास्त देणार आहां कीं नाहीं बोला. ’ मी शांतपणें म्हटलें, ‘ नाहीं. ’ त्याबरोबर आमचा कॅमेरा घेऊन तो चालूं लागला व आपल्या दारिद्र्याची कहाणी सांगूं लागला. आम्हांला काय करावें हें कळेना. त्याच्या हातून कॅमेरा हिसकावून घेण्याची शक्तिही आम्हांला नव्हती. पुन्हा असल्या अंदाधुंदीच्या आणि दरिद्री देशांत स्टेशनमास्तर, पोलीस जवळपास मिळून दाद लागणें शक्य नाहीं, हेंही आम्हांला माहीत होतें; तेव्हां त्याला ५०० क्रोन द्यायला तयार झालों. पण तो पहिले दिलेले १०००क्रोन देखील कबूल करीना व कॅमेराही देईना. शेवटीं आणखी १५०० दिले, तेव्हां त्याचें समाधान झालें. यावरून अशी आमची खात्री झाली कीं; वेळ आली तर आम्हांला लुटायला देखील हे लोक कमी करणार नाहींत. म्हणून जरा जपूनच वागत आहोंत. पैशाची अशी स्थिति असल्यामुळें हजार क्रोन खालीं जवळजवळ व्यवहारच होत नाहीं. एक क्रोनची नोट तर अद्याप मला दिसली नाहीं. स्टेशनवर तिकिटें वगैरे घ्यायच्या ठिकाणीं एक मोठा पेटारा ठेवलेला असतो. त्यांत भराभर वाटेल तितक्या नोटांचीं भिंडोळीं टाकून देतात व लागतील तेव्हां त्या नोटांचे ढीग दोन्ही हातांनीं उपसतात. एकादे वेळीं उतारू घाईनें तिकिट मागतो व हजार दोन हजार किंमतीच्या बारक्या बारक्या हजारों नोटांचें भिंडाळें देतो. तें मोजणें तर त्या वेळीं शक्यच नसतें. मग केवळ त्याच्यावर विश्वास ठेवून तें घेतलें जातें.

असो. आज इन्सब्रुकहून येथपर्यंत प्रवास फारच चांगला झाला. प्रथम मोठ्या गाडीनें येनवाखपर्यंत आलों व पुढें दोन तास धाकट्या डोंगरांतल्या

गाडीनें दऱ्याखोऱ्यांतून आलों. येथें एका हॉटेलमधें उतरलों आहों. येथें डोंगरांत दऱ्यांचा व हिरव्यागार झाडांचा देखावा फारच मजेदार आहे. दोन दिवस येथें राहूं, तोंपर्यंत खूप हिंडतां येईल. नंतर २९ तारखेला जर्मनीमधें ओबरआमरगाउला जाऊं. तेथें दर बारा वर्षांनीं एकदां एक मोठा खेळ होतो तो पाहणार आहोंत, त्याकरतां पूर्वीच तिकिटें घेऊन ठेविलीं आहेत. हा खेळ म्हणजे ख्रिस्तानें लोकांकरितां कसा प्राण दिला वगैरे सर्व बायबलाचा नाटकरूपी खेळ उघड्या मैदानावर होतो. पाहिल्यानंतर सविस्तर वर्णन पाठवीनच.

आतां जर्मनीच्या स्थितीविषयीं थोडेंसें लिहून हें पत्र पुरें करतों. जर्मनीच्या मार्कांचा भाव दिवसेंदिवस खालीं जात आहे हें तुम्हांला माहीतच आहे व हें पत्र पोंचण्यापूर्वी सध्यां आहे त्यापेक्षां आणखी किती तरी वाईट स्थिति तुम्हांला वाचायला मिळेल. मध्यें कांहीं तरी मार्क स्थिर होता व लोकांना आशा वाटत होती; पण राथेनाऊचा खून व त्यानंतर लवकरच झालेल्या कॉन्फरन्सचा निरुपयोग यांमुळें भराभर मार्क खालीं जाऊं लागला. तो रोज भयंकर वेगानें खालीं जात आहे. आज पौंडाला ९००० आहे. मागल्या पत्रांत लिहिल्याप्रमाणें मी माझ्या जवळ असलेले मार्क न खर्चतां बरेच दिवस पौंड मोडले ही चूक झाली. आतां मात्र मार्क सगळे सरेपर्यंत पौंडांना हात लावणार नाहीं; आणि जितके लवकर संपतील–विशेषतः वस्तु वगैरे खरेदी करण्यांत – तितकें चांगलें. कारण वस्तू खरेदी करून ठेवल्या म्हणजे आपल्या हातांत कांहीं तरी आल्यासारखें असतें. पण मार्कच हातांत राहिले म्हणजे पुढें त्यांची फुटक्या कवडीची देखील किंमत राहणार नाहीं. या विचारानेंच मी सध्यांच्या प्रवासास निघालों व साधारण २०,००० मार्क खर्च होतील असा अंदाज आहे. हेच २०,००० मार्क आतां खर्च न करतां ठेवून दिले तर पुढें कदाचित् एक जेवणसुद्धां होणार नाहीं. कारण सध्यां ऑस्ट्रियाची जी स्थिति आहे तीच किंवा त्याहून वाईट स्थिति जर्मनीला लवकरच येणार. पौंडाला दोन तीन लाख मार्क होणार हें आतां उघड आहे. याबद्दल कोणालाच शंका राहिलेली नाहीं. तेव्हां मी माझ्या पैशांची साधारण अशी सोय लावली आहे. बँकेंत माझे ७०,००० मार्क होते, त्यांपैकीं २०,००० सध्यां बरोबर घेतले आहेत. हे बहुतेक प्रवासांत खर्च होतील. बर्लिनच्या केमिस्ट-

विषयीं पूर्वी लिहिलेंच आहे. त्याच्या लॅबोरेटरींत गेलों तर २०,००० द्यावे लागतील. उरले ३०,०००. त्यांचे शेअर्स घेऊन टाकतों. शेअर्समध्यें हे पैसे असले म्हणजे कांहीं तरी कायम राहतील. कारण मार्कांच्या भावाच्या प्रमाणांत शेअर्सची किंमत वाढत असते. पुन्हां वाटेल तेव्हां शेअर्स विकतां येतील. म्हणजे मी पूर्वी खरेदी केलेल्या मार्कांची वाट लागलीच. आतां जवळ १२० पौंड आहेत तेवढ्यावर पुढें चालायचें.

सध्यां जर्मनीची माहिती मला वर्तमानपत्रांवरून कळते. राजकीय स्थिति सुद्धां भयंकर आहे. आतां, मी बर्लिन सोडल्या वेळेपेक्षां दसपट महागाई झाली आहे असें कळतें. मोरॅटोरियम केवळ जामीनगिरीवर देऊं असें फ्रान्सनें सांगितलें, त्यावर जामीन देण्याचें जर्मनीनें नाकारलें. आतां बहुतेक मोरॅटोरियम मिळणार नाहीं. म्हणजे मार्क भयंकर खालीं जाणार व सगळाच गोंधळ उडणार. सर्व लोक चिडलेले आहेत. परदेशी मनुष्य पाहिला कीं, त्यांची तळव्याची आग मस्तकाला जाऊन पोंचते. लोक फारच पिळले गेले आहेत. गरिबीची कमाल होत आहे. मात्र जे व्यापारी आहेत किंवा कारखानदार किंवा बँकवाले आहेत त्यांचें कांहीं एक नुकसान नसून फायदाच आहे. पण मध्यम प्रतीच्या पगारखाऊ लोकांचे हाल आहेत. पोट भरण्याची मारामार. अशा स्थितींत जुलुमाची मात्रा जरा वाजवीपेक्षां जास्त झाली तर बंड वगैरे होण्याचा संभव फार आहे. बंड झालेंच, तर पहिल्यानें परदेशीयांवर गदा येणार व त्यांतल्या त्यांत रंगावरून सहज ओळखल्या जाणाऱ्या आमच्यावर अगोदर असें मला कित्येकदां वाटतें. तरी शक्य तितक्या काळजीनें मी राहत आहें. गणू पंडित* सध्यां इकडे येतो म्हणत आहे त्याचें येणें कितपत बरोबर आहे याची सुद्धां शंकाच वाटते. त्याला गेल्या आठवड्याला पत्र लिहिलेंच आहे. सर्व जग हल्लीं अगदीं अशांतिमय झालेलें दिसतें. अशांतीच्या लाटेवर मनुष्याचा प्राण केवळ फेसासारखा तरंगतो आहे, म्हणजे त्याला शाश्वती किंवा सुरक्षितता मुळींच नाहीं. काय काय होईल तें पाहावें. सृष्टि निर्माण करण्यांत आणि मनुष्य प्राण्याला त्यावर नाचवण्यांत विधात्याचा काय उद्देश असेल कळत नाहीं!!

---

* डॉ. ग. वा. पंडित, हल्लीं किर्लोस्करवाडी इंडस्ट्रियल वर्क्सचे चालक.

असो. ही जागा फारच रम्य आहे. त्यामुळें मन प्रसन्न होतें, आणि एकंदरींत आमचा प्रवास सुखकर झाला असें वाटूं लागतें. या प्रवासानें अनुभवही चापून आला तो आम्ही कधीं विसरणार नाहीं. माझी प्रकृति उत्तम आहे. बर्लिनला परत गेल्यावर वजन करून कळवीन. तुम्ही माझ्या-बद्दल कोणत्याही तऱ्हेची काळजी करूं नये. तुमची प्रकृति वगैरे कशी काय आहे हृ वरचेवर कळवीत जावें. आम्ही जेथें जेथें जातों तेथें तेथें चित्रांचीं कार्डें विकत घेतों. तीं पुढें बर्लिनला परत गेल्यावर एकदम सगळीं मुलांना पाठवूं. आज सबंध दिवस डोंगरांत गर्द झाडींत खूप उंच गेलों, दमलोंही खूप, आणि जेवणही छान जेवलों. या ठिकाणचे एक दोन दिवस फारच मजेंत गेले. कळावें, हे विज्ञापना. ता. २७-८-२२.

श्यामकान्त.

श्री

पत्र ११५ वें

व्हिएन्ना,

२-९-१९२२

तीर्थरूप सौभाग्यवती माईस शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना विशेष. गेल्या आठवडयास टिरोलहून लिहिलेलें माझें पत्र पोंचलें असेल असें मी समजतों. मला मात्र बर्लिनला पोंचेपर्यंत तुमचीं पत्रें पोंचणार नाहींत. टिरोलच्या सृष्टिसौंदर्याचें वर्णन तुम्हांला गेल्या पत्रांत दिलेंच आहे. त्सेलला दोन तीन दिवस राहायला आम्हांला फारच मजा वाटली व डोंगरांतलें तें एक लहानसें खेडें असल्यामुळ खर्चही त्या मानानें कमी आला. खर्चाची ओरड त्या वेळींही आमची चालूच होती, पण आतां येथें आल्यापासून व येथलें खर्चाचें प्रमाण पाहिल्यापासून पूर्वीं आम्ही स्वस्तांत राहात होतों असेंच वाटूं लागतें. असो. टिरोलला शेवटल्या दिवशीं डोंगरांतल्या लहानशा गाडीनें मायरहोफेन या ठिकाणीं गेलों व तेथें असलेले मजेदार धबधबे पाहिले. याच धबधब्यांच्या मदतीनें वीज उत्पन्न केलेली आहे व तेथून डोंगरांतील जवळ-पासच्या खेड्यांत ती खेळवलेली आहे. म्हणजे पहा, अगदीं लहानशा खेड्यां-

तूनसुद्धां इकडे विजेच्या दिव्यांशिवाय दिवे नाहींत. कोठेंही धबधबा फुकट जाऊं दिलेला नाहीं व सुंदर डोंगराळ खेड्यांत विजेसारख्या कृत्रिम सौंदर्याची जोड दिलेली आहे. असो. २८ तारखेला त्सेलहून पुन्हां इन्सब्रुकला आलों. थर्ड क्लास उतारूंची या ठिकाणीं गैरसोय पाहिली म्हणजे हिंदुस्थानांतल्या तृतीय वर्गीयांची आठवण होते. बाकी आपल्या पुणें स्टेशनाच्यावर ताण करणें कोणालाच शक्य नाहीं. लढाईनंतर देश दरिद्री झाल्यामुळें अशी गैरव्यवस्था येथें होते. असो. तेथून पुढें विजेच्या गाडीनें 'गारमिश' या ठिकाणीं बव्हेरियामध्यें गेलों. तेथून लागलीच आगगाडीनें व मोटारगाडीनें 'ओबरआमरगाउ'ला २९ तारखेला संध्याकाळीं ७॥ वाजतां जाऊन पोंचलों. ही जागा बव्हेरियामध्यें एका बाजूला असल्यामुळें येथें यायला सोइस्कर गाड्या नाहींत व त्या फार ठिकाणीं बदलाव्या लागतात. पुन्हा एकीला एक जोडून वेळेवर गाड्या नाहींत, त्यामुळें वेळ फार जातो. कोणत्या गाडीनें केव्हां कोठें जायचें हें कोणालाच माहीत नसतें व कोठें गाडी बदलायला पाहिजे याचाहि कोणाला पत्ता नसतो व ही माहिती देणारीं पत्रकेंही स्टेशनवर पुष्कळदां नसतात. स्टेशनच्याच अधिकाऱ्यांना विचारलें तर एकजण जी माहिती देतो ती दुसरा देत नाहीं, अशी स्थिति! शेवटीं असें वाटूं लागतें कीं, एंजिन हांकणारालाच जाऊन विचारावें कीं, "बाबा, तूं कोणच्या दिशेला गाडी हांकणार आहेस?" आणि त्याला स्वतःही जर त्याची माहिती नसेल तर त्याला म्हणावें, "तुला कोठें तरी गाडी न्यायचीच आहे तर आम्हांला जायच्याच ठिकाणीं घेऊन चल ना!" असो. ओबरआमरगाउच्या खेळासंबंधीं उल्लेख पूर्वीच्या पत्रांत केलाच आहे. या खेळाकरितां ३० तारखेला आम्ही तेथें गेलों होतों व त्याकरतां ऑस्ट्रिया सोडून आम्हांला परत जर्मनीस यावें लागलें. पूर्वी सतराव्या शतकांत एकदां या गांवांत दुष्काळ पडला त्या वेळीं गांवच्या लोकांनीं नवस केला कीं, या दुष्काळांतून सुटलों तर आम्ही दर दहा वर्षांनीं एकदां येशु ख्रिस्ताच्या दुःखाच्या कहाणीचा खेळ करून दाखवूं. त्याप्रमाणें आतांपर्यंत या गांवचे लोक तो खेळ करीत आले. लढाईमुळें १९२०मध्यें तो करतां आला नाहीं, म्हणून या वर्षी पुष्कळ अडचणी असतांनाही तो करण्यांत आला व आम्हांला सहज तो पाहण्याची संधि मिळाली.

खर्च चापून झाला. पण या खेळामुळें एक तर बायबल न वाचतां बायबल-मधील बऱ्याच गोष्टी कळल्या व अति उत्कृष्ट अशी नाट्यकला पाहण्यास मिळाली. हा खेळ म्हणजे नेहमींच्या नाटकासारखा नसून याला बरेंच नैसर्गिक स्वरूप देण्यांत आलें आहे. एक तर रंगभूमि म्हणजे अगदीं उघड्यावर आकाशाखालीं मोकळी जागा आहे व जे लोक काम करतात, त्यांनीं दाढी-केस वगैरे मुद्दाम तसेंच वर्षानुवर्ष ठेवले आहेत; म्हणजे बनावट थोडेंच असतें. दर दहा वर्षांनीं त्याच गांवच्या नवीन माणसांना काम करावें लागतें व माणसें तर ख्रिस्ताच्या वेळच्या ज्यूंसारखीं दिसलीं पाहिजेत. पुन्हा रंगभूमीवर सबंध गांवचीं माणसें दाखवावीं लागतात, म्हणून तीनचारशें तरी माणसें लागतात, यासाठीं गांवांतल्या सर्वच माणसांनीं लांब केस ठेवलेले असतात. हा खेळ पाहण्याकरतां लांबलांबचे लोक येतात. अमेरिकेहून तर फार लोक आले होते. त्यामुळें अमेरिकन एक्सप्रेस, टॉमस् कुक् व इतर कंपन्यांचा सुळसुळाट होता. प्रत्येकाची राहायची सोय गांवच्याच एका गृहस्थाच्या घरीं करण्यांत आली होती. खेळ अर्थात् जर्मन भाषेंतच सकाळीं ८ ते १२ व दुपारीं २ ते ६ असा एकंदर आठ तास झाला. शेवटीं ख्रिस्ताला क्रॉसवर चढण्याचा वगैरे हृदय-द्रावक देखावा व त्याचप्रमाणें मरणानंतर ख्रिस्ताचें आकाशगमन वगैरे दाखवलें होतें. असो. खेळ आम्हांला फार आवडला. अशी संधि आणखी दहा वर्षेंपर्यंत कोणाला मिळणार नाहीं! दुसऱ्या दिवशीं जवळच आठ दहा मैलांवर बव्हेरियाचा पूर्वीचा राजा दुसरा लुड्विग् यानें उन्हाळ्या-करितां बांधलेला ' लिंडरहोप ' नांवाचा राजवाडा पाहिला. सभोंवारची बाग व पाण्याचा खेळ फार छान होता. जवळच एक पॅरिसमधें तुर्कस्थानच्या पद्धतीवर तयार केलेला चहा पिण्याचा हॉल होता तो फार रमणीय होता. या सर्व ठिकाणचीं चित्रें मुलांना बर्लिनला परत गेल्यावर पाठवीन. असो. ३१ तारखेला संध्याकाळीं तेथून निघून पुन्हा म्यूनिचला आलों. रात्रीं फार त्रास न पडतां निजायला एक खोली एका बाईच्या घरीं सांपडली. सकाळीं उठून आम्ही पुन्हा ऑस्ट्रियाला यायला निघालों. माझा पासपोर्ट पूर्वीं एकदां ऑस्ट्रियांत आल्यामुळें रद्द झाला होता. त्यामुळें झाल्सबुर्गला थोडा त्रास झाला. पण थोडेसे पैसे दिल्यावर काम झालें. कालचा सबंध

दिवस झाल्सबुर्गला होतों. ह शहर जुनें आहे व साधारणपणें बरें आहे. काल रात्रीं तेथून निघालों तो आज सकाळीं व्हिएन्ना येथें म्हणजे ऑस्ट्रियाच्या राजधानीला आलों.

येथें राहायला खोली वगैरे मिळणार नाहीं, अशा तऱ्हेची भीति आम्हांला पुष्कळांनीं पूर्वींच घातली होती. पण आम्ही तिला कोठले दाद देणार? येथें आल्यावर मात्र अशी खोडकी जिरली आहे कीं, आयुष्यभर याद राहील. सकाळचा फराळ करून खोली शोधायला बाहेर पडलों. शहर एवढें अवाढव्य आहे कीं विचारूं नये. खासगी खोली किती वेळ हिंडलों तरी मिळेना. हॉटेलें सुद्धां सर्व भरलेलीं होतीं. तेथें एका खोलीचें एका दिवसाचें भाडें चाळीस पन्नास हजार क्रोन असें होतें. म्हणजे हल्लींच्या भावानें ७०० मार्क झाले. जर्मनींत सध्यां खोलीला हॉटेलमध्यें साधारण १०० पासून ३०० पर्यंत पडतात. हल्लीं क्रोनची किंमत कस्पटाप्रमाणें झाल्यामुळें परकी लोकांचा भरणा येथें इतका झाला आहे कीं, खोल्या येथें मिळणेंच कठिण झालें आहे. शेवटीं कर्मधर्मसंयोगानें आम्ही यायला व या हॉटेलमधली खोली रिकामी व्हायला एकच गांठ पडली व सकाळीं आठ वाजल्यापासून दुपारीं चार वाजेपर्यंत हिंडल्यानंतर एकदां खोली मिळाली. येथें सुद्धां आम्हांला दिवसाचें खोलीचें भाडें २८,००० क्रोन आहे. आज संध्याकाळीं शहरांत बरेच भटकलों व उद्यां आणखी जास्त पाहूं. इतक्या सुंदर व जंगी दगडी व संगमरवरी इमारती येथें आहेत कीं, या देशाच्या एका वेळच्या ऐश्वर्याचें आश्चर्य करावें तितकें थोडेंच. म्यूझियम्स् किती! राजवाडे, बागा, पुतळे, टाउन हॉल, युनिव्हर्सिटीची इमारत व इतर हजारों टोलेजंग व आकाशाशीं स्पर्धा करणाऱ्या इमारती पाहिल्या, म्हणजे मनुष्य प्राण्याच्या करामतीची आणि या देशाच्या वैभवाची तारीफ करावी तितकी थोडीच. टाउन हॉलची अति कुशल कारागिरीनें भरलेली जंगी इमारत – तिचा राक्षसी आकार – पाहिली तेव्हां तर अगदीं गार होऊन गेलों. येथल्या विश्वविद्यालयाच्या इमारतीएवढे राजवाडेसुद्धां क्वचितच असतील. आंत सर्व संगमरवरी दगडाचे कठडे, जिने वगैरे आहेत. जुन्या वेळेपासूनचे प्रसिद्ध प्रोफेसरांचे सुंदर पुतळे ठेवलेले आहेत. आमच्या बर्लिनच्या युनिव्हर्सिटीसारख्या किती तरी इमारती यांत मावतील. रस्ते सगळे दगडी

बांधलेले आहेत, हें एका अर्थी बरें आहे. कारण हल्लींच्या दरिद्री स्थितींत ते सुधारणें शक्य नव्हतें व दगडी असल्यामुळें सुधारणेची जरूरही पडत नाहीं. एकंदरींत व्हिएन्ना शहर पाहून खुष झालों. मात्र शहराचे सर्वच भाग असे नाहींत. शहराचा मध्यभाग तेवढा असा सुंदर व वैभवशाली आहे. बाकी घाणेरडे, अरुंद रस्ते असलेले गचाळ भागही पुष्कळ आहेत.

ता. ३-९-२२

आज सकाळीं शहरांतील सर्व देखावे पाहायला निघालों. प्रथमच 'आर्ट गॅलरी' व 'निसर्गशास्त्रा'चें पदार्थसंग्रहालय पाहिलें. हे दोन्ही समोरासमोर असून मध्यें मोठे पुतळे ठेवलेले आहेत. या इमारतींचा अवाढव्य आकार व त्याबरोबर बांधण्याच्या कौशल्याचें सौन्दर्य यांची तारीफ करावी तितकी थोडीच. आजपर्यंत इतके म्यूझियम्स् पाहिले पण याची सर कोणालाच येणार नाहीं. आंत झूलॉजी, बायॉलॉजी, मिनरॉलॉजी वगैरे शास्त्रांचे संग्रह होते. झूलॉजीचाच भाग आज पाहायला मिळाला. यांत लहान लहान किडे, पांखरें यांपासून तों थेट हत्ती, वाघ यांप्रमाणें मोठमोठया जनावरांचा भरणा होता. इमारती आंत संगमरवरी, एखाद्या राजवाड्याला देखील लाजवतील अशा होत्या. अशा इमारती व्हिएन्नाला किती असतील याचा पत्ता नाहीं. राजवाडा तर भयंकर अवाढव्य आहे. त्याचप्रमाणें पूर्वींच्या सम्राटांच्या वापरण्याच्या आणखी किती तरी इमारती आहेत. त्यांचा आतां ऑफिसें वगैरे इतर कामांकरितां उपयोग केला जातो. खरोखर व्हिएन्नामध्यें पूर्वी वैभव नुसतें आणून ओतलें असलें पाहिजे. आतांची व्हिएन्नाची दैन्यावस्था पाहिली म्हणजे मात्र कींव येते. सध्यां ५०० क्रोन म्हणजे जवळजवळ एक पैसा होतो. आमचा रोजचा राहण्याचा खर्च एका लहानशा हॉटेलमध्यें एक लाख क्रोनच्यावर आहे. असो. हे म्यूझियम्स् पाहून बाहेर पडतों तों अचानक आमचे मित्र – ज्यांच्याशीं आमची ओळख झाली होती व जे इंग्लंडला बॅरिस्टरचा अभ्यास करीत असत ते – समोरून म्यूझियमच्या बाजूस येतांना दिसले. या प्रवासांत त्यांनीं आमच्याबरोबर यावें अशी आमची फार इच्छा होती; पण पुढें त्यांना आमचा व आम्हांला त्यांचा पत्ता माहीत नसल्यानें तें जमलें नाहीं. पण येथें अचानक गांठ पडल्यानें आम्हीं इतके आश्चर्यचकित झालों

कीं, प्रथम कांहींच बोलतां येईना. मग ते व आम्ही मिळून आणखी एक खोदीव कामाचा म्यूझियम् पाहिला व मग एकत्र जेवून पुढें संध्याकाळीं जवळच असलेल्या एका सुंदर डोंगरांत गेलों व तेथें एका प्रसिद्ध हॉटेलमध्यें चहा घेतला. तेथून डॅन्यूब नदीचा व सर्व व्हिएन्ना शहराचा देखावा छान दिसला. संध्याकाळीं परत आलों. आतां उद्यां येथून कांहींसा लांब असलेला सम्राटाचा एक राजवाडा व त्यासभोंवारची बाग पाहायला जाणार आहों. त्यांची आतां-पर्यंत फारच ख्याति ऐकली आहे. पण आतां यापुढें कांहींच वर्णन मी देणार नाहीं. कारण तें देणें अशक्य आहे. बर्लिन शहर या शहरापुढें सौंदर्यानें व वैभवानें कांहींच नाहीं असें म्हणावें लागतें. लंडन शहराच्याही हें शहर थोबा-डींत मारील असें आमचे विलायतचे मित्र म्हणतात.

असो. उद्यां सकाळीं हें पत्र पोष्टांत पडेल. उद्यांचा व परवांचा दिवस आम्ही आणखी येथें आहों. परवां संध्याकाळीं येथून निघून तेरवां सकाळीं बर्लिनला पोंचूं. नंतर तुमचीं गेल्या तीन आठवड्यांचीं पत्रें वाचायला मिळतील व त्यांचीं उत्तरें याच्या पुढच्या आठवड्यास पाठवतां येतील. बर्लिनला गेल्याबरोबर पूर्वीं लिहिल्याप्रमाणें ठरवलेल्या केमिस्टच्या हाताखालीं काम करायला सुरुवात करीन. कसें काय जमतें पाहावें. त्याला २०,००० मार्क द्यावयाचें ठरवलें आहे हें धाडसच केलें म्हणायचें. कारण त्यांचा उपयोग कितपत होतो हें अद्याप प्रत्ययास यायचें आहे. However, I have risked this much and hope to get something out of it. If not, I must blame my fate. Through such means alone can I succeed in attaining my goal.

माझी प्रकृति उत्तम आहे. प्रवासांत कांहीं वेळां थोडी बहुत दगदग झाली खरी; तरी पण एकंदरींत प्रवास सुखावह झाला व बरेच नवीन प्रदेश पाहायला मिळाले. तुमचीं पत्रें बर्लिनला गेल्याबरोबर वाचण्याची उत्सुकता लागून राहिली आहे. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

पत्र ११६ वें बर्लिन,

ता. १०-९-२२

ती. सौ. माईस शिरसाष्टांग नमस्कार. वि. वि. माझें गेल्या खेपेचें व्हिएन्नाहून टाकलेलें पत्र पोंचलें असेल. गेल्या सहा तारखेला सकाळीं येथें आलों. एकंदरींत प्रवास मोठा मजेदार झाला. व्हिएन्नाला राजाचा राजवाडा व त्याच्या सभोंवारची बाग आहे अशी बाग–एवढी मोठी व सुंदर–मी जन्मांत कधीं पाहिली नव्हती. येथें आल्याबरोबर माझी व्यवस्था फ्राउ डॉक्टरनीं फारच छान ठेवली होती, म्हणून आल्याबरोबर पुन्हा घरच्यासारखें वाटूं लागलें. परवांपासून येथें ठरवल्याप्रमाणें डॉ. डेव्हिड्सनूच्या हाताखालीं त्यांच्या तेलाच्या लॅबोरेटरींत कामाला सुरुवात केली. सकाळीं ९ ते सायंकाळीं ५ पर्यंत काम करतों. बरोबर ब्रेड, लोणी वगैरे घेऊन जातों व संध्याकाळीं परत आल्यावर मोठें जेवण जेवतों. त्यांची लॅबोरेटरी अगदीं गचाळ आहे. अगदींच लहान व सोयही मुळींच नाहीं. पण मला तेथें फारच फायदा होतो. तेला-संबंधीं वगैरे जें शिकायला पाहिजे होतें–व जें शिकल्याशिवाय कोणत्याही कारखान्यांत मला कांहींही शिकतां येणें शक्य नाहीं,–तें बरोबर येथें मला शिकायला मिळतें. त्या गृहस्थाला माहितीही चांगली आहे, त्यामुळें विषय वगैरे समजावून फारच छान सांगतो. एकंदरींत सुट्टीचा उपयोग चांगला होत आहे. सुट्टीच्या सुरुवातीपासूनच ही लॅबोरेटरी मिळती तर बरें झालें असतें. आतां नोव्हेंबरपासून पुन्हा युनिव्हर्सिटीच्या लॅबोरेटरींत जाऊं लागेन व पुढच्या सुट्टींत पुन्हा या लॅबोरेटरींत काम करीन असें म्हणतों. या गृहस्थांना वीस हजार मार्क दिले. दर सुट्टींत याप्रमाणें दोन तीन वर्षेंसुद्धां येथें काम करायला हरकत नाहीं.

असो. सध्यां रॉय माझ्याच खोलींत असतो. तो आपल्या कॅमेरानें सारखे फोटो काढीत असतो. आतांपर्यंत या घरांतील प्रत्येकाचे किती तरी फोटो त्यानें काढले आहेत. ते आतां पाठवीत नाहीं. सध्यां महाजनी, देशमुख, वगैरे इंग्लंडची ओळखीची मंडळीही येथें आहेत. तें पुष्कळदां जेवायला बोला-वतात; म्हणून आज मी त्यांना जेवायला बोलावलें व संध्याकाळीं बंगलोरहून

आलेल्या आगटे,* अधिकारी,† कोर्डे या मंडळींना चहाला बोलावलें. प्रथम कोठें तरी हॉटेलमध्यें जाणार होतों; पण हल्लीं हॉटेल्स म्हणजे कल्पनातीत महाग झालीं आहेत. तेव्हां फ्रॉऊ डॉक्टरनीं आपल्या घरीं चहाची व रात्रीं जेवणाची सर्व व्यवस्था केली होती. सर्व कांहीं फारच उत्तम जमलें. एका वेगळ्या खोलींत आमच्याकरतां टेबल मांडलें होतें. चहा तुम्हीं पूर्वीं पाठविल्यापैकीं वापरला होता. जेवण अतिशय उत्तम व चमचमीत झालें. कॉलीफ्लॉवरची भाजी, बटाटे व इतर पदार्थ, त्याचप्रमाणें टामेटोचें सूप, लिंबाचें सरबत व शेवटीं फळांचा एक पदार्थ असें होतें. सर्वांना हॉटेलमधल्या जेवणापेक्षां कितीतरी आवडलें व मला खर्चही हॉटेलपेक्षां कमी आला. सर्व स्वयंपाक फ्राऊ डॉक्टरनीं स्वतः केला होता. त्यांनीं माझ्याकरितां फारच मेहनत घेतली.

सध्यां आमच्या घरच्या बागेंत सफरचंदें व पेयर्स किती तरी झालीं आहेत. घडच्या घड लागलेले असतात. आम्हांला रोज खायला मिळतात. येत्या हिवाळ्यांत जरा पंचाईत दिसत आहे. कोळशाची टंचाई पडणार असा रंग दिसतो. ज्यांना शक्य आहे ते आतांच कोळशांचा भरणा करून ठेवणार आहेत.

मला काल बरेच दिवसांनंतर टेनिस टूर्नमेंटबद्दलचीं बक्षिसें मिळालीं. एक चांदीचें पदक आहे, दुसरें, मोठ्या लाकडी फ्रेममध्यें ब्रॉंझची चौकोनी मोठी प्लेट बसवलेली असून तीवर बरेंच नक्षीकाम व विजयमाळ हातांत घेतलेला एक मनुष्य काढला आहे. तिसरें बक्षिस अद्याप तयार झालें नाहीं. एकंदरींत माझा वेळ आनंदांत जात आहे. आतां जरा अभ्यासाकडे जास्त वेळ दिला पाहिजे. इतके दिवस भाषा शिकण्यांत वगैरे गेले असें म्हणतां येईल; पण आतां वाचायला पुष्कळ पाहिजे. शहर अवाढव्य मोठें असल्यामुळें जरा कोठें जायचें म्हणजे भयंकर वेळ मोडतो त्याला इलाज नाहीं.

दिनकर कर्वे कांहीं दिवसांकरितां बर्लिनला येणार आहे असें कळतें. येथें आल्यावर रा. शहा‡ भेटले. त्यांनीं आणलेले खाण्याचे डबे अद्याप मी आणले नाहींत. उद्यां आणीन. त्यांचें वर्णन पुढच्या पत्रांत. माझ्याकरितां मुंबईस दोन चहाचे डबे त्यांनीं विकत घेतले होते पण ते इटालीस जप्त झाले!

---

* श्री. आगटे, इलेक्ट्रिकल इंजिनियर, मुंबई. † डॉ. अधिकारी, मीरत खटल्यांतील एक दोषमुक्त आरोपी. ‡ डॉ. शहा, हल्लीं राजाराम कॉलेजमधील प्रोफेसर.

असो. आज जास्त वेळ नाहीं. राजकीय घडामोडी रोज चालू आहेत. पण नक्की असें कोणीच:कांहीं ठरवीत नाहींत. जर्मनीची स्थिति दिवसेंदिवस खराब होत चालली आहे. मध्यें मार्क अगदींच १०,०००च्या खालीं गेला होता तो आतां जरा सुधारला आहे, म्हणजे सुमारें ६००० आहे. सायकली अद्याप पाठवल्या गेल्या नाहींत हें सांगायला फार वाईट वाटतें. इतके दिवस export ची परवानगी मिळाली नाहीं. लवकरच रवाना होतील. Export permission ला हल्लीं फार वेळ लावतात. असो. माझी तब्येत उत्तम आहे. तुमचीं दोन तीन पत्रें येथें आल्यावर एकदम मिळालीं. पण या आठवड्याचें अद्याप आलें नाहीं. कळावें ही विज्ञापना.

श्यामकान्त.

पत्र ११७ वें

Berlin,
17-9-22

My dear Nana,

I have nothing more particular to tell you this time. Mai's letter dated 23-8 reached me on the 12th inst I was rather relieved not to have received a modi reply for my modi letter, as I had with anxiety anticipated. I successfully played some friendly tennis matches on behalf of my club at one of the biggest clubs here, where we spent the whole of yesterday, Sunday. The weather is very warm and enjoyable. It is the same the whole day. Mai writes about your having paid a visit to Abbas Tayabji. I am interested and curious to know what changes have been brought about in his household owing to his non-co-operation. I still remember his remark about me at the Baroda Station before I came off, "You have much more to do here than in Europe," he said. Is he still a staunch orthodox non-co-operator? No changes as yet in the political condition

have taken place here. There is a talk about gold currency. I have no more cough now and am feeling quite healthy. Namdev Bhate* saw me yesterday; he is finding the language very hard to learn. Korde returned from Austria yesterday.

With best respects,

Yours affectionately
Shyamakant.

श्री

पत्र ११८ वें

बर्लिन,
ता. १८-९-२२

तुमचें गेल्या आठवड्याचें ता. २५-८-२२चें पत्र बँकेच्या चुकीमुळें वेळेवर पाठवलें गेलें नाहीं तें कालच मिळालें. त्याच्या पूर्वीच्या आठवड्यास तर पत्रच नव्हतें. आतांपासून मला येथल्या पत्त्यावरच पत्र पाठवावें. जर्मन पद्धतीनें माझा पत्ता असा लिहायचा:—

Berlin Steglitz
Arndt Str. 3 F.
bei Dr. Selle
Germany.

टीप—हा पत्ता इंग्रजी पद्धतीच्या उलट आहे.

डॉ. झेलेची मुलगी क्लेरे इच्या मनांत बरेच दिवस तुला पत्र लिहायचें होतें; पण भाषेच्या अडचणीमुळें राहिलें. आज तिनें तुला जर्मनमध्यें एक पत्र लिहिलें आहे, त्याचें इंग्रजी भाषांतर याच पत्राच्या मागल्या बाजूस मीं केलें आहे; तें तुला कोणी तरी वाचून दाखवतील. तिनें स्वतः लिहिलेलें जर्मन पत्रही मजेचें म्हणून सोबत पाठवीत आहें. त्याचप्रमाणें आम्ही विमानानें लाइप्झिगला गेलों त्या वेळीं तेथें आम्हीं काढलेल्या फोटोच्या दोन प्रती पाठवीत आहें. त्यांतली एक श्रीनिवासला पाठवावी व एक घरीं ठेवावी. गणू पंडितचीं हल्लीं पत्रें येत असतात. त्याला आतांपर्यंत दोन स्वतंत्र पत्रें लिहलीं. या

---

* Brother of late Prof. G. S. Bhate of Patna College.

पत्रासोबत एक त्याला पत्र लिहिलें आहे तें वाचून पुढें भाऊंच्या पत्त्यावर मुंबईस पाठवून द्यावें. कारण तो सध्यां मुंबईस असतो. त्या पत्रांत इकडे येतांना येथें चांगल्या न मिळणाऱ्या कोणत्या जिनसा बरोबर आणाव्या तें लिहिलेंच आहे. माझ्याकरितां दोनचार जोड लोकरीच्या मोज्यांचे व दोनचार सुती जमल्यास पाठवून द्यावे. कारण विलायती मालासारखा चांगला माल इकडे मिळत नाहीं. दुसरी गोष्ट येथें पुष्कळदां कोणाला तरी कांहीं तरी भेट म्हणून द्यायचे प्रसंग येतात हें पूर्वीं लिहिलेंच आहे. त्याकरितां हिंदुस्थानांतून कांहीं वस्तु पाठवण्यास पूर्वीं लिहिलें होतें. नानांनीं सुचविलेल्या वस्तु मात्र मला मुळींच पसंत नाहींत. मीं चंदनाचा एखादा पदार्थ जमल्यास पाठवायला लिहिलें होतें. जमल्यास पंडितबरोबर पाठवणें. शक्य झाल्यास एखादें लहानसें चंदनाच्या लांकडाचें तबक किंवा एखादी लहानशी पेटी किंवा डबी–वर थोडें नक्षीकाम केलेली–किंवा दोन्ही पाठवावीं. हे पदार्थ म्हैसूरच्या बाजूला बंगलोरला वगैरे चांगले व स्वस्त मिळतात. पंडित जर कोलंबोवरून जात असेल व माझ्याप्रमाणें बंगलोरला उतरण्याचा त्याचा विचार असेल तर त्याला सुद्धां ते तेथें घेतां येतील.

नुकताच प्रो. विनयकुमारांकडे चहाला गेलों होतों. त्यांचें नवीन पुस्तक बाहेर आलें आहे. मला विकत घेऊन बडोद्यास पाठवण्यास सांगत होते. पण तें हिंदुस्थानच्या जुन्या म्हणजे तेराव्या शतकाच्या पूर्वींच्या अर्थशास्त्रासंबंधीं असल्यामुळें त्याची तितकीशी नानांना जरूर आहे असें मला वाटत नाहीं, म्हणून पाठवीत नाहीं. त्यांचीं पुस्तकें येथेंच लाइप्झिगला छापत असतात. त्यांनीं एक व्यापारी मासिक पत्रही इंग्रजीमध्यें काढलें आहे. ते कांहीं व्यापारही करीत असतात. त्यांची बायकोही बरी आहे आणि तिची त्यांना फारच मदत होते. सध्यां कलकत्त्याचे सर आशुतोष चौधरी येथें आले आहेत. विनयकुमारांच्या सल्ल्यानें ते आपल्या सतरा वर्षांच्या मुलाला इंग्लंडला ठेवण्याऐवजीं येथेंच ठेवणार आहेत. माझ्याकडून होईल ती मदत त्याला करण्यासंबंधीं मला त्यांनीं सुचविलें.

परवां रात्रीं येथें सर्व हिंदी लोकांची तुर्कांच्या जयाबद्दल त्यांचा जयजयकार करण्याकरतां सभा भरली होती. येथील कांहीं हिंदी वाटेल तें फटकळ

बोलले, तें सर्व लिहिणें शक्य नाहीं. पण अशा बोलण्यानें खरा फायदा कांहीं एक होत नसून उलटें नुकसान होतें, व आपलें दौर्बल्य दिसून येतें असें मला वाटतें. राजकारणाच्या भानगडी करणारे पुष्कळ हिंदी लोक येथें आहेत. ते काय काय करतात याचा आम्हांला पत्ता नाहीं. त्यांचा आमचा विशेष संबंधही येत नाहीं. असो. मला नुकतींच माझ्या क्लबाकडून बक्षिसें मिळालीं. मागें मीं टूर्नमेंट जिंकल्याबद्दल लिहिलेंच आहे. त्याचीं बक्षिसें आतां मिळालीं. माझें खासगी लॅबोरेटरींत सकाळीं ९ ते संध्याकाळीं ५ पर्यंत काम चालू असतें व हें काम मी आवडीनें करतों; कारण मला पाहिजे तें येथें शिकायला मिळतें. आमचा डॉक्टरही चांगला अनुभव घेतलेला मनुष्य आहे. माझी तब्येत उत्तम आहे. कळावें, ही विज्ञापना.

श्यामकान्त.

Dear Mother,

I cannot call you otherwise; for I have your dear son as my brother and I know also that he loves me as his younger sister. He thus tries to help me to get over the loss of my dear elder brother and I always take care not to let him be homesick. I know, it must be very hard for you to know your only son to be so far away from you and I think my writing to you will relieve you.

We all like your son very much and we look upon him as a member of our own family. We will miss him very much in future.

My respects to your husband.

With kind regards
Your Claire Selle.

P. S.—I thank you for the nice things that you always send to Shyam. He always shares them with me and I like them very much. I must once come to India in order to see how these things taste when they are fresh. The Indian

ladies must be quite competent and able ones, since they can prepare such beautiful articles.

श्री

पत्र ११९ वें

बर्लिन,

ता. १३-१०-२२

ती. सौ. माईस शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना विशेष. या आठवड्याला तुमचें पत्र नाहीं. तुम्हीं लिहिलें नसेल, किंवा उशीरां टाकलें असेल किंवा आमच्या बँकेनें घोटाळा करून बरोबर पाठवलें नसेल. मध्यें एका आठवड्याला आमच्या बँकेनें पत्रें माझ्या जुन्या पत्त्यावर पाठवून दिलीं होतीं व मीं तपास करण्याकरितां पत्र लिहिलें असतां तुमचीं या आठवड्यास पत्रें नाहींत असा जबाब पाठवला होता. असो. आतां तुम्ही माझ्या येथल्या पत्त्यावर पत्रें लिहूं लागलांच असाल; तेव्हां आतां तसा कांहीं घोटाळा होणार नाहीं असें समजतों.

गेल्या गुरुवारीं पुन्हा एकदां नृत्य शिकायला गेलों होतों. आमच्या मास्तरांनीं सांगितलें कीं, "तुम्हांला वेळ होईल तर दर गुरुवारीं तुम्ही येत जा. मी तुमच्याकडून वेगळे पैसे घेणार नाहीं." त्याप्रमाणें वेळ झालाच तर मी जातों. तेथें पुष्कळ बायका व पुरुष जातात व वेगवेगळ्या लोकांबरोबर नृत्य करायला मिळतें. आतां बरोबरच्या वाद्यांचीही थोडीथोडी गोडी लागूं लागली आहे. सध्यां सुट्टी आहे म्हणून हें शिकून घेतां आलें. आतां लवकरच पुन्हा आमची इन्स्टिट्यूट उघडेल. तुम्हांला कदाचित् नृत्याची कांहीं कल्पना नसेल. निदान हिंदुस्थानांत असतांना मला तरी नव्हती. प्रथम आगबोटीवर नृत्य पाहिलें, तेव्हां तर कसेंसेंच वाटलें. आपण अगदीं वेगळ्या वातावरणांत वाढलेले असल्यामुळें असें होतें. दुसऱ्या एखाद्या स्त्रीचा स्पर्श आणि त्यामुळें मनावर होणारे परिणाम यांविषयीं प्रथम पुष्कळ विचार येत असत, पण प्रत्यक्ष आतां शिकल्यावर ते पहिले विचार व त्या कल्पना गेल्या. आपल्याला वाटतें तसें त्यांत कांहीं विशेष नसतें. बरोबर चालू असणारें वाद्य व त्यावा

ताल याचीच खरी मजा असते व त्याकडेच विशेष लक्ष असतें. असो. मला नृत्याची विशेष आवड उत्पन्न झाली आहे अशांतला प्रकार नाहीं. पण पुष्कळदां मंडळीमध्यें विशेषतः आमंत्रणाला गेलें असतांना असे प्रसंग येतात कीं, जेव्हां इतर सर्वजण नृत्य करीत असतांना स्वतःला वेगळें बसून राहावें लागतें, व त्यामुळें जरा एकलकोंडें वाटतें. आतां तसें होणार नाहीं.

आतां थंडी जोरांत सुरू झाली आहे. कपडे चांगलेच घालावे लागतात. हातांत हातमोजेही घालावे लागतात. सध्यां टेंपरेचर ५-१०सो पर्यंत असतें. इतर ठिकाणीं खोल्या तापवायला सुरुवात झाली आहे. आमच्या घरीं थोडी नादुरुस्ती असल्यामुळें अद्याप झाली नाहीं, लवकरच होईल. पुढें भरथंडींत कदाचित् कोळशांचा तोटा येईल, निदान कोळसे अतिशय महाग होऊन ते पुष्कळांना विकत घेतां येणार नाहींत अशी भीति आहे.

येथें ज्योतिषराय माझ्या खोलींत होता तो नुकताच हायडेलबर्गला गेला. आमच्या कॉलेजचे प्रो. वैद्यही पॅरिसला अभ्यासाकरितां गेले.

मला सध्यां अतिशय पडसें झालें आहे. एकदम थंडी पडल्यामुळें असें असेल. दोन दिवस झाले. आज जरा बरें आहे. उद्यांला साफ बरें होईल असें वाटतें. मी व्यायाम वगैरे नियमित करतों व दूधही पितों.

तुमचें पत्र नसल्यामुळें मला विशेष लिहिण्यासारखें कांहीं नाहीं. सध्यां खाजगी लॅबोरेटरींत Soap analysisचें काम चांगलें चाललें आहे. त्यावर पुस्तकेंही वाचीत असतों, अर्थात् जर्मन. आणखी एकदोन आठवड्यांनीं या लॅबो-रेटरींतलें काम बंद करून पुन्हा फार्मास्यूटिकलमध्यें जाऊं लागेन. हें पत्र टाका-यला थोडा उशीर झाला व मग टाकून काय उपयोग? तें पुढच्या आठवड्या-लाच जाणार असें समजून टाकलें नाहीं. आतां आज हें पत्र व पुढच्या आठवड्याचें अशीं दोन्ही एकदम पाठवतों. म्हणजे तुम्हांला पूर्वीच्याप्रमाणें एखादे वेळीं एकाच आठवड्याला दोन पत्रें मिळत असत, त्याचप्रमाणें हा प्रकार होईल. एकाच पाकिटांतून दोन्ही पत्रें येतील एवढेंच. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

<u>पत्र १२० वें</u>

बर्लिन,

ता.२१-१०-२२

तीर्थरूप नानांस शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना विशेष. तुमचें ता. २९-९-१९२२चें पत्र पोंचलें. गेल्या आठवड्याचीं तुमचीं पत्रें हरवलीं असें दिसतें. कारण या पत्रांत गेल्या आठवडयाच्या पत्राचा उल्लेख आहे व गेल्या आठवडयाला मला पत्रच नव्हतें. मलाही पुष्कळदां तुम्हांला लिहायला विशेष हकीकत नसते. तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें आपल्याकडे थोडे दिवसांकरितां प्रवासास जाणें फार अडचणीचें असतें खरें. मला वाटतें तुम्हीं खाण्याचे पदार्थ वगैरे पार्सलनें पाठवण्याची मुळींच जरूर नाहीं. एक तर फार मेहनतीचा व खर्चाचा प्रश्न आहे. दुसरें, पार्सल हरवण्याचा किंवा चहासारखा कांहीं पदार्थ आंत आहे अशी शंका आल्यास जप्त होण्याचा संभव आहे. तिसरें, तुमचा पदार्थ येथें पोंचण्यास अतिशय उशीर लागतो, त्यामुळें तो असावा तितक्या चांगल्या स्थितींत येत नाहीं. तेव्हां या सर्व दृष्टींनीं तुम्हीं कांहींएक न पाठविलेलेंच चांगलें. येथें पुष्कळ चांगले चांगले पदार्थ घेऊन खातां येतात व तसें मी खातोंही. माझ्याबद्दल तुम्हीं कोणतीही काळजी बाळगूं नये. मार्कांचा भाव जरी दिवसेंदिवस उतरत चालला आहे व जर्मनीची आर्थिक स्थिति दिवसेंदिवस खराब होत चालली आहे, तरी धोका होण्याचीं कांहीं एक चिन्हें अद्याप दिसत नाहींत. पैशाच्या बाबतींत मला वाटतें, पूर्वी घेतलेल्या मार्कांच्या नुकसानीचा प्रश्न सोडला, तर आतांच्या भावाप्रमाणें मला फार पैसे लागणार नाहींत. पूर्वीचे सगळे पैसे मात्र पाण्यांत गेले असें समजलें पाहिजे. सध्यांच्या परिस्थितीप्रमाणें दरमहा मला येथें राहण्यास तीन एक पौंड खर्च येईल असा अंदाज आहे. याशिवाय इतर अवांतर खर्च, प्रवास वगैरे धरून वर्षाचे पन्नास पौंड धरूं या. मी आणखी चार वर्षें येथेंच राहिलों व बाहेरच्या दुसऱ्या देशांत प्रवास केला नाहीं तर चार वर्षांला दोनशें पौंड लागतील. पैकीं शंभर पौंड आतां मजजवळ आहेत. म्हणजे आणखी फार तर शंभर पौंड लागतील. इंग्लंड, फ्रान्स वगैरे देशांत हिंदुस्थानला परत येण्यापूर्वी सफर करण्याचें

मनांत आहे. पण त्याला अद्याप पुष्कळ अवकाश आहे व तोंपर्यंत एखादी संधि मिळून मला कदाचित् स्वतः खर्च केल्याशिवायही जातां येईल. कदाचित् येथला डॉक्टोरेटचा कोर्स संपल्यावर मला कांहीं थोडे पैसेही मिळूं लागतील. निदान मी तरी मिळवण्याचा प्रयत्न करीन.

माझे पैसे सध्यां सर्व पौंडांत असून ते येथील बँकेच्या एका शाखेंत आहेत. त्यावर व्याज मिळत नाहीं. रा. गणपुले व येथील Indian Information Bureau मिळून सध्यां येथें व्यापार करीत आहेत. गणपुल्यांनीं मला माझे पैसे त्यांच्या ब्यूरोमधें ठेवायला सांगितले. म्हणजे त्यांनाही मदत होईल व मला व्याज वगैरे बँकेप्रमाणेंच त्यांच्याकडून मिळत जाईल. तेव्हां कसें काय जमतें तें पाहण्याकरितां मीं सध्यां पन्नास पौंड त्यांच्यापाशीं ठेवले आहेत व आणखी पन्नास एक पौंड बँकमधें आहेत. मला लागतील त्याप्रमाणें एकएक दोनदोन पौंड मोडीत असतों. मार्कांचा भाव दिवसेंदिवस खालीं जात आहे म्हणजे mark is depreciating, त्याच प्रमाणांत सर्व जिनसांच्या किंमतीही चढत आहेत.

रा. कोर्डे व मी एकत्र काम करीत असतों हें तुम्हांला माहीत आहेच. ते स्वभावानें फारच चांगले व सज्जन आहेत. त्यांची ओळख व सहवास यांनीं मला बराच फायदा झाला. आजच त्यांनीं व मी आपल्या खासगी प्रयोगशाळेंतील काम बंद केलें. दोनतीन दिवसांनीं पुन्हा फार्मास्यूटिकलमध्यें काम सुरू करूं. प्रो. टॉम्सला पुन्हा काल भेटायला गेलों होतों. आमच्यावर त्यांची विशेष मर्जी आहे असें दिसलें. प्रो. विनयकुमार व आम्ही यांवरून एकंदर हिंदी गृहस्थांविषयीं त्यांचें चांगलें मत झालेलें दिसतें. येत्या महिन्यापासून रा. कोर्डे टॉम्सच्या घरीं राहण्यास जाणार आहेत.

मी येथें आल्यापासून आजारी पडलों नाहीं व तब्येत उत्तम वाटते. इतकेंच नव्हे तर डोकेंसुद्धां कधीं दुखलें नाहीं. एखाद्या वेळीं पडसें येतें, तें सुद्धां क्वचित्च. वजन मात्र फारसें वाढलें नाहीं, तरी शरीर सुधारलें आहे असें मला वाटतें. मिस् क्रेरे झेले हिची टेलिफोनमधील नोकरी आतां सुटली. सध्यां ती बर्लिन सोडून मजेकरितां प्रवासास जात आहे. दीडदोन महिन्यांनीं परत येईल. मला जरा एकटें वाटेल; कारण माझ्याबरोबर बोलायला,

फिरायला जायला वगैरे इतके दिवस तीच असे. इतर माणसें वयानें फार मोठीं किंवा फार लहान असल्यामुळें तितकें जास्त मिसळतां येत नाहीं. असो. पूर्वी एकदां फोनोग्राफच्या प्लेट्स् पाठवायला सांगितल्या होत्या त्या अद्याप पाठवल्या नसल्या तर पाठवूं नयेत; कारण मला इतके उद्योग असतात कीं, स्वतःच्या अभ्यासाला आणि कामालाच पुरेसा वेळ मिळत नाहीं. तेव्हां हें आणखी एक लटांबर उगीच मागें लावून व्याप मात्र वाढायचा. येथें त्या प्लेट्स् वाजवण्याचा प्रसंगही क्वचित्‌च यायचा; आणि जेथें जाईन तेथें बाळगायला नसतें ओझें मात्र होणार!

यासोबत गणू पंडितला व आबांना पत्र लिहीत आहें तें वाचून मुंबईस आबांकडे पाठवून द्यावें.

आतां पत्र पुरें करतों. एवढें एकच आणखी सांगायचें आहे कीं, तुम्ही नेहमीं आनंदांत व चैनींत राहून आपली प्रकृति व मन सुखांत ठेवा. कोणत्याही बाबतींत त्रास करून घेऊं नका. पेन्शन घेतल्यासही उत्तम. मला तरी आतां फार पैसे नकोत. तुमच्या उभयतांच्या शारीरिक व मानसिक सुखांतच मला आनंद आहे; आणि तुमचा सहवास जितका जास्त मिळेल तितकें माझें आयुष्यही सुखावह होईल. कळावें हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र १२१ वें   बर्लिन,

ता. २२-१२-२२

ती. नानांस शिरसाष्टांग नमस्कार, वि. वि. तुमचें ता. १ डिसेंबरचें व त्याचबरोबर माईचें आजव्याच्या प्रवासाच्या वर्णनाचें पत्र वगैरे वाचून फार समाधान वाटलें.

मागील पत्रांत लिहिलेंच होतें कीं, अलीकडे मी जरा गडबडींत आहें व या आठवड्यास मोकळा होऊन सविस्तर पत्र लिहीन म्हणून. सर्व हकीकतीचा उलगडा आतां देतों. आम्हांला ' फेर्‌बॉंड्स् एक्झामेन ' म्हणून एक परीक्षा

द्यावी लागते–ती पास झाल्यावर रिसर्चला सुरुवात करतां येते–ती देण्याच्या गडबडींत होतों. तीन दिवस प्रॅक्टिकल–रोज सकाळीं ९ ते संध्याकाळीं ५–व एक तास तोंडी परोक्षा झाली व मी सर्व विषयांत पास झालों. विशेषतः तोंडी परीक्षा आटोपल्यावर आमच्या परीक्षकांनीं, प्रो. टॉम्सनीं, मला विशेष compliments दिले. आपल्या इकडल्यासारख्या लेखी परीक्षा येथें नसतात. ही पद्धत फार छान आहे. लेखीमध्यें ठरीव ४-५ प्रश्नांच्या उत्तरांवर विद्यार्थ्यांचें नशीब अवलंबून असतें. त्यांत पुष्कळ चांगले विद्यार्थी नापास तर पुष्कळ वाईट पास होऊं शकतात. तोंडीमध्यें शेकडों प्रश्न विचारून विद्यार्थ्यांच्या साधारण माहितीची कल्पना परीक्षकांस करतां येते. परीक्षा जर्मन भाषेंत झाल्यानें आमचें भाषेचें ज्ञानही चांगलें कसास लागलें. एकंदरींत पास झाल्यानें फार मजा उडाली; मला व त्याचप्रमाणें आमच्या घरच्या सर्वांना फारच आनंद झाला. सध्यां आतां स्वस्थपणांत व विश्रान्तींत व त्याचप्रमाणें थोडी चैन करण्यांत वेळ घालवीत आहें. अलीकडे अभ्यास बराच करावा लागला होता. कोर्डेही माझ्याच बरोबर पास झाले.

सध्यां जिकडे तिकडे क्रिस्टमसची धामधूम आहे. जो तो आपल्या मित्राकरितां भेटी खरेदी करण्यांत गुंतलेला आहे. काल परीक्षा आटपल्या-बरोबर प्रथम काम म्हणजे क्रिस्टमसच्या भेटीकरितां पुष्कळसे जिन्नस खरेदी केले. कोणाला पुस्तकें तर कोणाला कांचेच्या फुलांचीं भांडीं, कोणाला चॉकोलेट तर कोणाला दारुची बाटली वगरे—हो, दारूच्या बाटलीचें महत्त्व या लोकांना फार वाटतें आणि विशेषतः क्रिस्टमसमध्यें तिचें महत्त्व फार असतें.

ता. २४-१२-२२

आज संध्याकाळपासून नाताळच्या सणाला सुरुवात झाली. नाताळा-करतां एक ठरीव झाड असतें तें एका खोलींत श्रृंगारलें होतें व त्यावर जिकडे तिकडे मेणबत्त्या जळत ठेवल्या होत्या. एका टेबलावर खाण्याचे पदार्थ पुष्कळशा बशांत सजवून ठेवले होते. त्यांतली एकएक बशी प्रत्येकानें आपआपल्या खोलींत न्यायची असते. नंतर एका टेबलावर सर्वांनीं दिलेलीं बक्षिसें किंवा भेटी जुळवून ठेवल्या होत्या. हीं बक्षिसें काय आहेत हें अगोदर कोणाला माहीत नसतें. एकदम लोकांना चकित करायचें असतें. मला प्रत्येकाकडून

कांहींना कांहीं लहानसें बक्षिस मिळालें. कोणाकडून कॅलेंडर तर कोणाकडून चॉकोलेट वगैरे. आज दुपारीं आमची पूर्वींची मास्तरीण फ्रॉ. निकोलाईकडे गेलों होतों. तिला एक टागोरांचें पुस्तक दिलें. तिनें मला पुस्तकांत ठेवण्याची एक रेशमी खूण दिली. नंतर तिला तिचें नाताळचें झाड सजवायला जरा मदत केली. कॉफीही घेतली. उद्यां संध्याकाळीं फ्रॉ. म्युलरकडे आमंत्रण आहे. मी परीक्षा पास झाल्याचें आतां सर्वांना कळवलें त्यामुळें लोकांकडून अभिनंदनें येत आहेत. माझें सर्व ठीक चाललें आहे व प्रकृति उत्तम आहे. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र १२२ वें

'रिझेन' डोंगर, जर्मनी,

ता. ३०-१२-२२

तीर्थरूप सौभाग्यवती माईस शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना विशेष. गेल्या पत्रांत लिहिल्याप्रमाणें गेल्या ता. २६ रोजीं सकाळीं आम्ही बर्लिनहून निघून संध्याकाळीं येथें आलों. आमच्या अगोदर आलेल्या मंडळींनीं आमची सर्व व्यवस्था करून ठेवलीच होती. आमच्यांतल्या एक बाई व शंभोराव* असे स्टेशनवर आम्हांला घ्यायला आले होते. तेथून घोड्याच्या घसरगाडींतून या ठिकाणीं–म्हणजे ब्युकेनबर्गला आलों. सध्यां डोंगर जिकडे तिकडे चांगला ३-४ यार्डांच्या खोलीपर्यंत बर्फानें आच्छादलेला असल्यामुळें गाड्या चाका-शिवाय नुसत्या घसरणाऱ्या असतात. त्या गाडीनें येथें यायला साधारण एक तास लागला. सध्यां चापून फिरणें, चापून खाणें व चापून निजणें अशा तीन मुख्य उद्योगांत आमचा वेळ जातो. दूध तर ताजें इतकें प्यायला मिळतें कीं, कांहीं विचारून सोय नाहीं. बरेच दिवसांत इतकें दूध प्यायला मिळालें

---

* किर्लोस्कर बंधूंच्या कारखान्यांतील श्री. म. वा. ऊर्फ शंभोराव जांभेकर.

नव्हतें. गणपुले, कोर्डे, शंभोराव व मी असे तुमच्या ओळखीपैकीं चौघेजण आम्ही येथें आहों. शिवाय इतर कांहीं जर्मन मंडळी आहेत. हिंवाळ्यांतले बर्फांतले वेगवेगळे खेळ येथें मंडळी खेळत असतात. त्यांत घसरगाड्यांवरून उंचीवरून, बर्फांतून घसरत येणें, व '...शी' (Skie)—(म्हणजे लांकडाच्या दोन पातळ लांब फळ्यांना पाय बांधून त्यावरून घसरणें) हेंच मुख्य. त्यांतल्या त्यांत हा दुसरा खेळ फार कठिण व जरा धोक्याचा आहे. यावरून पुष्कळदां डोंगराच्या उंच कड्यावरुन खूप खोल उड्या मारतात. फिरायला रोज पुष्कळ जातों. पायाखालीं गुळगुळीत बर्फ असल्यामुळें पुष्कळदां पडायला होतें. संध्याकाळीं बरेचदां एखाद्या हॉटेलमध्यें कॉफीला जातों. आमच्या बरोबर एक जर्मन बाई आहेत त्याच बहुतेक रोज स्वयंपाक करतात. बाजार वगैरे सर्व आम्हीच करतों. उद्यां आम्ही हिंदी बेत जेवायला करणार आहोंत. मी, कोर्डे व शंभोराव वगैरे मिळून स्वयंपाक करूं. बेत असा आहे:–कांदेबटाट्याची भाजी, भात, तांदुळाची खीर, वाटाण्याची उसळ वगैरे. पाहूं या उद्यां कसें काय जमतें तें. जेवल्यानंतर मग सर्व लिहीन. मिरचीची पूड येथें विकत मिळाली. दिसायला लालभडक आहे, पण किती घातली तरी तिखट मुळींच लागत नाहीं. तिखटाचें काम बरेंचसें मिरपुडीवरच भागवावें लागतें.

आज दुपारीं जेवण झाल्यावर जवळच्या एका डोंगराच्या टोंकावर एक कॉफी पिण्याची जागा आहे तेथें गेलों होतों. जायला दोनतीन तास लागले. तेथें बराच वेळ बसलों, कॉफी वगैरे प्यालों व परत यायला निघालों. पुष्कळजण 'शी'वरून किंवा घसरगाडीवरून भराभर घसरून खालीं आले. आम्ही चालतच आलों. येतांना चांदणें चांगलें होतें. परत आल्यावर भूक फारच लागली. मग संध्याकाळच्या जेवणाचा बेत उत्तम जमला. बाईनीं भात केला होता. चांगलें घट्ट दहीं होतें. कच्चे कांदे, तिखट वगैरे. मग काय विचारतां ! आपल्या घरच्या दहींभातासारखा हुबेहूब लागला. मला तर इतका जोर आला कीं, मीं चमचे कांटे ठेवून देऊनच हातानें भात चांगला कालवून खायला सुरुवात केली. आम्ही ज्यांच्या येथें राहतों ती मंडळी शेतकरी आहेत. घरचें दूधदुभतें आहे. आजच कर्मधर्मसंयोगानें त्यांनीं लोणी काढलें होतें. आम्हांला सुगावा लागतांच आम्ही त्यांच्याकडून ताक विकत घेऊन प्रत्येकजण

चांगले दोनदोन कप, मीठ, मिरपूड घालून ताक प्यालों. आपल्याकडच्या अगदीं गोड ताकासारखें लागत होतें. यामुळें अगोदरच चांगल्या लागलेल्या जेवणानंतर आणखी आनंद झाला. एकंदर आमचे दिवस फारच आनंदांत जात आहेत. तब्येतीवरही चांगला परिणाम होईल. सुट्टी फार नाहीं एवढेंच वाईट आहे.

ता. १-१-२३

काल ठरल्याप्रमाणें आमचा स्वयंपाक झाला. सर्व कांहीं नीट जमलें. काल वर्षांतला शेवट दिवस. रात्रीं बारा वाजतां जुन्या वर्षाची व नव्या वर्षाची भेट होते त्या वेळीं जिकडेतिकडे धामधूम असते. या धामधुमीची खरी मजा बर्लिनलाच पहायला मिळते. गेल्या वर्षीं याच उत्सवाला मी बर्लिनला होतों. एकंदर येथें आल्यापासून आतां एक वर्ष पुरें झालें. आज नवीन वर्षाचा पहिला दिवस म्हणून वर्षाचे सर्व बेत मनांत ठरवीत आहें. पुष्कळशा गोष्टी नवीन हुरुपानें सुरू करणें, गेल्या वर्षाच्या चुका सुधारणें वगैरे पुष्कळसे निश्चय करून ठेवले आहेत. कळावें, हे विज्ञापना.

ता. क.—येतें नवीन वर्ष तुमचें उभयतांचें सुखांत जावो अशी इच्छा करतों.

श्यामकान्त.

खंड पांचवा

सोबती व ख्यालीखुशाली

बर्लिन, सन १९२३

रूर प्रांतांतील जुलूम

पत्र १२३ वें बर्लिन,

२१-१-२३

तीर्थरूप सौभाग्यवती माईस शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना विशेष. तुमचीं ता. २९-१२चीं पत्रें पोंचलीं. घरांत आजार व इतर दुःखें आहेत हें कळून वाईट वाटलें.

हलीं जिकडे तिकडे जर्मनींत हाहाःकार उडाला आहे. मार्कांचा भाव चारपांच दिवसांखालीं पौंडास १,०६,००० झाला होता तो सध्यां ऐशीं-पंच्याऐशीं हजारांपर्यंत आहे. म्हणजे मार्क अगदींच कवडीमोल झाला आहे. आतां साधारण पन्नास मार्कांखालच्या नोटा वापरतांच येत नाहींत. ट्रॅमला १०० मार्क पडतात. हिंदुस्थानच्या पत्रांना १५० मार्क व त्याच प्रमाणांत इतर सर्व पदार्थ महाग झाले आहेत. बाकी भावही खालीं गेल्यानें आम्हांला अद्याप सर्व स्वस्तच आहे. एकदम मार्क पडल्याचा फायदा घ्यावा म्हणून गेल्या गुरुवारीं दोन पौंड मोडले. २१२००० मार्क मिळाले; लागलीच एक सूट करायला देणार होतों, पण मनाजोगें कापड अद्याप सांपडल नाहीं. लवकरच उद्यांपरवां करायला टाकीन. साधारण तीन लाख मार्क म्हणजे पन्नास-साठ रुपये पडावेत असा अंदाज आहे. सध्यां फ्रेंचांनीं जर्मनीचा रूर नदीवरचा प्रदेश व्यापला असून तेथें काय पाहिजे तो जुलूम चालवला आहे. त्यामुळें सर्व लोक चिडले आहेत. फ्रेंच व बेल्जियन लोकांना येथें थारा नाहीं. कोणी म्हणतात रशिया व जर्मनी पुन्हा लढाई करणार. काय होईल कोणालाच सांगतां येत नाहीं. पण येथल्या लोकांची स्थिति सध्यां पराकाष्ठेची वाईट झाली आहे हें खरें.

असो. आज जास्त कांहीं लिहायचें नाहीं; येथेंच पुरें करतों. माझी तब्येत चांगली आहे. कळावें हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र १२४ वें — ता. २९-१-२३

तीर्थरूप सौभाग्यवती माईस शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना विशेष. तुझें ता. ५-१ चें मुंबईहून लिहिलेलें पत्र गेल्या मंगळवारीं सकाळीं पोंचलें व पुढच्या आठवड्याचें पत्र उद्यांपरवां इतक्यांत येईल. सर्व हकीकत कळली. कमळीला कन्यारत्न झालें हें ऐकून आनंद वाटला. मी हिंदुस्थानांत येईपर्यंत आणखीही पुष्कळ रत्नें कदाचित् मला पहायला मिळतील, नाहीं?

माझें नेहमींप्रमाणें सुरळीत काम चाललें आहे. या आठवड्यास मुख्य कळविण्याची गोष्ट म्हणजे जर्मनीची शोचनीय राजकीय स्थिति. फ्रेंचांनीं व्यापलेल्या मुलखांत वाटेल तसा धुमाकूळ चालवला आहे, त्यामुळें मार्कवर भयंकर परिणाम होऊन तो दिवसेंदिवस खालीं जात आहे; आणि आतां मार्कांच्या उड्या म्हणजे पाव लाख, अर्धा लाख एवढया मोठ्या आहेत. आज पौंड दीड लाख मार्क आहे. मला गेल्या वर्षीं हिंदुस्थानांत तीन हजार रुपयांला (२१५ पौंडांना) एक लाख व ५० मार्क मिळाले होते. देशांत जिकडेतिकडे भयंकर अस्वस्थता, परदेशीयांना विशेषतः फ्रेंच व बेल्जियन लोकांना अटकाव, वगैरे चालू आहे. आम्ही अद्याप सुरक्षित आहोंत. लुटालूट किंवा बंड वगैरे कशाचींच चिह्नें नाहींत. पुढें काय होईल तें कळत नाहीं. अमेरिका वगैरे इतर राष्ट्रें आतां हात घालतात काय पहावें. कांहीं झालें तरी आम्हांला कोणत्याही तऱ्हेचा धोका नाहीं. विशेषतः वर्षभर येथल्या इन्स्टिट्यूटमध्यें काम केल्यामुळें तिचे डिरेक्टरही कोणत्याही अडचणीच्या प्रसंगीं आमचा कैवार घेतील. माझ्या पत्रांतून ही सर्व हकीकत कळण्यापूर्वींच वर्तमानपत्रांवरून तुम्हांला बरीच माहिती मिळत असेल. पण वर्तमानपत्रांतल्या सगळयाच बातम्या विश्वसनीय नसतात. एवढेंच काय, पण येथल्या वर्तमानपत्रांत देखील पुष्कळदां सत्याचा अंश पुरेसा नसतो.

महागाईमुळें हल्लीं कोळसे फार वापरतां येत नाहींत. जर्मन लोकांना म्हणून आमच्या घरीं सध्यां आंघोळीला महिन्यांतून एकदांच ऊन पाणी असतें. पण मी दर आठवड्यास एकदां आंघोळ करतों. गेल्या रविवारीं—म्हणजे परवांच्या दिवशीं—फ्रॉ. म्युलरच्या घरीं आंघोळ केली. आतां पूर्वींप्रमाणें तिला वरचेवर

भेटायला वेळ होत नाहीं; पण सुट्टीच्या वगैरे दिवशीं तिला भेटतों. फार ममताळू बाई आहे. मी तिला आजी म्हणून हांक मारतों हें मागें लिहिलेंच होतें. गेल्या नाताळच्या मुहूर्तावर ती व मी – जर्मन आजीनातवंडांच्या पद्धती-प्रमाणें – एकमेकांना ' तूं ' म्हणायला सुरुवात केली.

हल्लीं देशाच्या शोचनीय स्थितीमुळें सरकारानें सर्व ऐषआराम बंद केले आहेत. रात्रीं अकरा वाजण्याच्या पुढें नाच, संगीत किंवा कोठल्याही तऱ्हेच्या सार्वजनिक सभा कायद्यानें बंद आहेत. एका अर्थीं मला हें सध्यां बरें वाटतें. वाचायला वेळ तरी जास्त मिळतो. नाहीं तर कोठेंही कोणीं आमंत्रण दिलें म्हणजे जावें लागत असे. आतां सर्वच बंद झालें.

पंडितची राहण्याची वगैरे सर्व सोय लागून तो सध्यां जर्मन शिकत आहे. त्यांनीं नुकतेच माझ्याकरतां घेतलेले नेकटाय व मोजे मला आणून दिले. मोजे चांगले आहेत पण जरा मोठे होतात. टाइज् साधारणच आहेत. कापड चांगलें आहे, रंग विशेष नाहीं. काल संध्याकाळीं तुम्हीं मला पाठव-लेल्या बदामखारकांपैकीं निम्मा हिस्सा नानांच्या पत्राप्रमाणें शहांना दिला. मला त्या इतक्या आवडल्या होत्या कीं, तो निम्मा हिस्सा मीं मोठ्या नाखुषीनें त्यांना दिला. असो. त्यांत मोठेंसें कांहीं नाहीं.

तुम्हीं पाठवलेलें हलव्याचें व सुपारीचें पार्सल पोंचलें. मीं नुकतेंच विलायतेंत महाजनींना चहा पाठवण्याविषयीं पत्र लिहिलें होतें, त्याप्रमाणें आजच तीन पौंड लिप्टनचा चहा आला. चांगला आहे. आज आम्ही सगळे जण तोच चहा करून प्यालों. मी रोज चहा घेत नाहीं. जर्मन चहाला तर मी कधींच हात लावीत नसें. आतां कधीं कधीं दमून आल्यावर हा चहा घेतों. नाहीं तर दररोज कॉफी व दूध घेतों.

आमच्या गेल्या सुट्टींतल्या ऑस्ट्रियाच्या प्रवासाचें वर्णन महाजनींनीं सांगितल्यावरून आमच्या कॉलेज मॅगॅझिनला पाठवीत आहें. तें फेब्रुवारीच्या अंकांत प्रसिद्ध होण्याचा संभव आहे. तुम्हांला जर कोणाकडून तो अंक मिळाला तर वाचायला मिळेल.

मला सध्यां ' प्रवासी ' व ' मॉडर्न रिव्ह्यू ' हीं दोन्ही मासिक पत्रें नियमितपणें मॉडर्न रिव्ह्यू ऑफिसमधून येतात. त्यांपैकीं ' प्रवासी 'ची वर्गणी

वीरेश्वरबाबूंनीं भरून तें पत्र मला पाठवण्याची व्यवस्था केली होती. पण मॉडर्न रिव्ह्यू कोण पाठवतो कांहीं कळत नाहीं. एक तुम्ही तरी वर्गणी भरून पाठवण्याची व्यवस्था केली असेल, नाहीं तर वीरेश्वरबाबूंनीं तरी केली असेल. तुम्ही केली असल्यास कळवावें. शिवाय कव्यांकडून दर आठवड्याला मला केसरी व ज्ञानप्रकाश हीं साप्ताहिक पत्रें येतात. त्यामुळें एकंदर हिंदुस्थानची हकीकत उशीरां पण बरीच कळते. त्यांवरून हल्लीं हिंदुस्थानांत राजकीय प्रगति विशेष होत नाहीं असें दिसतें. वेगवेगळ्या पक्षांचीं भांडणें होऊन विनाकारण दुफळया मात्र पडत आहेत. खरोखर, आपल्या देशाच्या स्थितीचा विचार केला म्हणजे पुष्कळदां उदास झाल्याशिवाय राहवत नाहीं. वर्तमानपत्रांतून आपल्या देशबांधवांविषयींचे जे पुष्कळसे निंद्य प्रकार वाचायला मिळतात, त्यांवरून मनांत किती संताप येतो तें सांगणें अशक्य आहे. पण तो मुकाटपणें गिळून टाकून भावी चांगल्या दिवसांची वाट पाहण्यापलीकडे सध्यां तरी कांहींच इलाज दिसत नाहीं. जर्मनीच्या लोकांना हिंदुस्थान देशाची व आपल्या लोकांची फारच थोडी माहिती आहे.

आमच्या इन्स्टिट्यूटमधील एका प्रोफेसरांच्या हाताखालीं एक इजिप्शियन विद्यार्थी, स्ट्रिक्नीन(Strychnine) वर गवेषणा (research work) करीत आहे. स्ट्रिक्नीन काजऱ्याच्या किंवा कुचल्याच्या बियांपासून तयार करतात आणि हें एक जालीम विष आहे. हा विद्यार्थी बॉटनीचा अभ्यासक असून काजऱ्याच्या नवीन झाडाची त्याला फार जरूर आहे. तेव्हां त्याच्या प्रोफेसरांनीं मला हिंदुस्थानांतून एक पौंड चांगल्या काजऱ्याच्या बिया आणावयाला सांगितल्या आहेत. मात्र त्या चांगल्या रुजल्या पाहिजेत. कारण त्यांच्यापासून येथें झाड झालें पाहिजे. तेव्हां बडोद्यास किंवा इतर ठिकाणीं या बियांचा तपास करून चांगल्या बिया एक पौंडभर पाठवून द्याव्या. शिवाय किती दिवसांत बिया रुजतात त्याचा तपास करतां आल्यास तें ही कळवावें. तुम्हांला जो कांहीं खर्च येईल तो कळवावा, म्हणजे तो ते प्रोफेसर त्या विद्यार्थ्याकडून वसूल करून देतील. म्हणजे मी तो येथें मार्कांत वसूल करीन. तो इजिप्शियन असल्यामुळें त्याला किंमत देणें मुळींच जड जाणार नाहीं.

त्याचप्रमाणें श्रीनिवासाला सांगावें कीं, त्याला मीं जीं तिकिटें

पाठवलीं त्यांचा मोबदला म्हणून त्याच्याकडून मलाही कांहीं हिंदी तिकिटें पाहिजेत. माझ्याकडे येथें पुष्कळ लोक हिंदुस्थानच्या संस्थानांचीं जुनीं तिकिटें, त्याचप्रमाणें ब्रिटिश हिंदुस्थानचीं तिकिटें व हलींचीं जास्त किंमतीचीं – १२ आ., १ रु. व २ रु. वगैरे – मागतात. त्यांच्या बदली येथील कांहीं दुर्मीळ तिकिटें ते मोबदला म्हणून पाठवायला तयार आहेत. पण मला त्यांतली कांहींच माहिती नसल्यामुळें व विशेषतः श्रीनिवासाजवळ कोणचीं आहेत, कोणचीं नाहींत तेंही माहीत नसल्यामुळें त्यांच्याकडून कोणचीं घ्यावीं हें मला कळत नाहीं. ते देतील तीं मी त्याला पाठवीन व त्यानें वरील हिंदी तिकीटें त्यांच्या बदली पाठवावीं.

आज जास्त कांहीं लिहायचें नाहीं. माझी प्रकृति उत्तम आहे. कळावें, ही विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र १२५ वें

बर्लिन,

ता. ४-२-२३

ती. नानांस शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना वि. तुमचें ता. ५-१चें व ता. १२-१चें अशीं दोन्ही पत्रें गेल्या आठवड्यास मला मिळालीं. म्हणजे पहिल्या आठवड्याचें पत्र जरा उशीरां पोष्टांत पडलें असलें पाहिजे. तुमचा एक पौंड चहा पोंचला; तो आम्हीं लागलीच करून पाहिला, फारच छान लागला. आतां मजजवळ एकंदर तीन पौंड चहा आहे. यांतला दोन पौंड महाजनींनीं इंग्लंडहून पाठवला आहे. हा चहा मला किती तरी दिवस पुरेल, तेव्हां आतां पुन्हां मागेपर्यंत पाठवूं नये. शिवाय मी चहा असा क्वचित्च पितों. आठवड्यांतून एखादा दिवस फार झालें तर पितों. तुमचा चहा येईपर्यंत तर बिलकूल पीत नव्हतों. कारण येथला चहा मला मुळींच आवडत नाहीं.

मी व कोर्डे जर्मन फॉर्मास्यूटिकल सोसायटीचे मेंबर झालों. प्रत्येकाची

वर्गणी वर्षाला आठ शिलिंग आहे. आतां आम्हांला या सोसायटीच्या सभांना जातां येईल व शिवाय दर महिन्यास केमिस्ट्रीचीं व फॉर्मसीचीं मासिक पत्रें येत राहतील, त्यामुळें या दोन्ही विषयांची आम्हांला जास्त दाट ओळख होईल. आतां आम्हांला रसायनशाळेंतल्या कामालासुद्धां बरीच मजा वाटते व लवकरच आमची (रिसर्च–वर्क) गवेषणा सुरू व्हायची असल्यामुळें कामाला हुरूपही वाटतो. मागें कळविल्याप्रमाणें फेब्रुवारीच्या अखेर आमची पुन्हा एक तोंडी परीक्षा होणार आहे व पुढच्या टर्मला मेपासून गवेषणेस डॉ. प्रो. टॉमसच्या हाताखालीं सुरुवात करूं असा अंदाज आहे. केमिस्ट्रीच्या रिसर्चमध्यें एक प्रकारचा उच्च दर्जाचा आनंद असतो. पुष्कळदां हा रिसर्च इंडस्ट्रियल नसून नुसता शुद्ध शास्त्रीय असतो, तेव्हां त्याचा आर्थिक उपयोग असा फारसा नसतो. तरी पण त्यानें एकंदर रसायनशास्त्राला मदत होऊन आपल्याला स्वतःलाही रसायनाच्या गर्भांतलीं झाकलेलीं रहस्यें अनुभवायला मिळतात.

येथें येऊन धंदा शिकून परत जाणें ही गोष्ट फार कठिण आहे. कारण कोठल्याही कारखान्यांत परदेशीयांना बंदी आहे. कालच माझे मित्र डॉ. लाखमान यांच्या बरोबर एका ग्रामोफोन प्लेट्सच्या कारखान्यांत गेलों होतों. तेथें जगांतील सर्व भाषांच्या प्लेट्स् तयार होतात. डॉ. लाखमान यांना कांहीं हिंदी प्लेट्स् घेऊन दिल्या. कारण ते सध्यां हिंदी गायनाचा अभ्यास करीत आहेत. त्यांना डॉक्टरची पदवी गायनावरच मिळाली. हिंदी प्लेट्स् फार जुन्या काळच्या होत्या. त्या गवयांचीं नांवें सुद्धां आम्हांला माहीत नाहींत. कांहीं मराठी प्लेट्स् होत्या, पण ते गवईसुद्धां इतके जुने होते कीं आमच्या ओळखीचे नव्हते व तें गायनही विशेष आवडलें नाहीं. बालगंधर्वानें म्हटलेलीं पदें दुसऱ्या एखाद्या जुन्या गवयानें म्हटलीं तर तीं मला कशीं आवडतील ? असो. प्लेट्स् घेतल्यावर मीं प्लेटचा कारखाना पहायची गोष्ट काढली. त्याला कारखानदारानें साफ नकार दिला. कारण विशेषतः प्लेट्सूला लागणारा कच्चा माल–शेलॅक–हा हिंदुस्थानांतून येतो. तेव्हां हिंदुस्थानाला हा धंदा मुळींच कळतां कामा नये. तो म्हणाला, " जपानी लोकांनीं असेच कारखाने पाहून आमचा जपानमधील धंदा बुडविला. कांहीं जपानी

लोकांनीं आमच्याकडून प्लेटी विकत घेऊन त्यांची बरोबर कॉपी केली. तेव्हां आतां आम्ही जपानी लोकांना प्लेट्स् विकायलासुद्धां कचरतों. ”

सांगण्याचें तात्पर्य सध्यांच्या स्थितींत तरी धंदा शिकणें अशक्य नसलें तरी कठिण आहे. त्यांतूनही बरेच हिंदी लोक शिकत आहेत. या बाबतींत हिंदुस्थाननें खरी प्रगति करावयाची म्हटली म्हणजे मोठमोठ्या भांडवलवाल्या लोकांनीं इंडस्ट्रियल रिसर्चच्या भरभक्कम लबोरेटरी काढून शिष्यवृत्त्या देऊन चांगल्या विद्वान रसायनिकांना तेथें रिसर्च चालू ठेवायला लावायचें व त्यांचे शोध मोठमोठे कारखाने काढून अंमलांत आणायचे. परदेशी मालाचें चांगलें ॲनॅलिसिस करून त्यांचें अनुकरण करायचें व शिवाय शिष्यवृत्त्या देऊन, व्यापारी वजन खर्च करून परदेशी कारखान्यांत शक्य तेवढे विद्यार्थी तयार करावयाचे. असे तयार झालेले विद्यार्थी पुन्हां हिंदुस्थानांतल्या भांडवलवाल्यांना मदत करूं शकतील. अशा रीतीनें धंदेशिक्षणाची प्रगति झाली म्हणजे आपोआपच देशांत एक प्रकारची जागृति होईल. पण याला मुख्य अडचण सांगतात ती भांडवलाची. आपल्याकडे राजे, महाराजे व शर्यतींत पैशांचा चुराडा करणारे व्यापारी यांनीं मनावर घेतलें, तर हें होण्यासारखें आहे. असो. यांत मला माहीत नसलेल्या पुष्कळ अडचणीही असतील. मला सहज विचार सुचले ते कळविले.

माझ्या तब्यतीविषयीं सविस्तर माहिती कळविण्यास तुम्हीं लिहिलें आहे. पण मी वजन बरेच दिवसांत केलें नाहीं. परवां सुट्टींतल्या प्रवासानंतर येथें आलों; तेव्हां अठ्ठावन किलोग्राम–अंगांतल्या सुटासकट–म्हणजे एकशेंसत्तावीस पौंड होतें. आहार हिंदुस्थानांतल्यापेक्षां थोडा वाढला असेल असें वाटतें. बाकी येथें अद्याप तसा फरक पडला नाहीं. झोंप मात्र हिंदुस्थानांतल्यापेक्षां किती तरी जास्त घेतों. मी रोज अकराबारा वाजतां रात्रीं निजतों व सकाळीं साधारण आठ वाजतां उठतों. आठ तासांपेक्षां कमी झोंप कधींच घेत नाहीं. रविवारीं चांगली दहाअकरा तास घेतों. कामही तसेंच चापून पडतें. शनिवार रविवार कमी असतें. माझी वृत्ति नेहमींच आनंदी असते असें नाहीं. साधारण रोज घडणाऱ्या गोष्टींचा किंवा इतरांशीं बोल-

लेल्याचा वगैरे परिणाम माझ्या मनावर ताबडतोब होत असल्यामुळें कधीं वृत्ति आनंदी असते तर कधीं नसतेही. पण पुष्कळदां आनंदी असते एवढें खरें.

आज जास्त लिहिण्यासारखें नाहीं. श्रीधरच्या पत्रावरून मॉडर्न रिव्ह्यू पाठवायची व्यवस्था भाऊंनीं केलेली आहे असें कळतें. श्रीधरला सांगावें कीं, आमच्या फोटोच्या सहा प्रतींना १२००० मार्क पडले व मार्कांचा भाव त्या वेळीं वीस ते तीस हजार होता. म्हणजे जवळजवळ अर्धा पौंड पडला. हिंदुस्थानांतल्यापेक्षां स्वस्त आहे हें खरें, पण त्यानें ठरविल्याप्रमाणें एक रुपाया पडला नाहीं. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र १२६ वें

बर्लिन,

ता. १२-२-२३

तीर्थरूप नानांस साष्टांग नमस्कार, वि. वि. तुमचें ता. १०/-१ चें पत्र व चिवड्याचें पार्सल गेल्या मंगळवारीं पोंचलें. चिवडा फारच आवडला. दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं कोर्डे व येथील फिजिऑलॉजिकल इन्स्टिटयूटमध्यें काम करीत असलेले सबनीस* असे दोघे माझ्याकडे चहाला आले होते, त्या वेळीं हिंदुस्थानचा चहा व चिवडा असा बेत केला होता. मजा वाटली. पुन्हा शहांनीं काल थोडासा चिवडा व कांहीं पापड आणून दिले. काल रविवारीं दुपारीं आम्हांला गणपुल्यांनीं जेवायला बोलाविलें होतें. कोर्डे, शंभोराव व मी असे होतों. पुलाव केला होता. तांदूळ तुम्हीं पूर्वी मला एक शेर पाठवले ते वापरले होते. भात फार चांगला झाला होता. तिखटाचीच काय ती कमतरता होती. असो. आज माझा पिंगपॉंग खेळण्याचा दिवस आहे. गेल्या आठवड्यास माझे मित्र डॉ. लाखमान यांच्याबरोबर पिंगपॉंग खेळायला गेलों होतों. तेथें कांहीं उत्तम खेळणारांची ओळख झाली. त्यांतले कांहीं माझ्यापेक्षां चांगले खेळत होते. त्यांना मीं आज माझ्या क्लबमध्यें खेळायला बोलावलें आहे.

* हल्लीं मुंबईत व्यापार करीत असलेले डॉ. सबनीस.

माझ्या परीक्षेचा खुलासा विचारला आहांत तो असा. येथें जर्मनींत ज्या ज्या विद्यार्थ्यांना पुढें डॉक्टर व्हायचें असतें त्यांना प्रथम एक प्रवेश-परीक्षा द्यावी लागते. येथील कारखानदार व विश्वविद्यालयांचे अध्यापक अशांचा एक संघ आहे; आणि या संघाकडून ही परीक्षा घेतली जाते; म्हणून हिला जर्मनमधें फेर्‌बाँडस् एक्झामिन म्हणजे संघाची परीक्षा असें म्हणतात. केमिस्ट्रीमधें इन्‌ऑर्‌गॅनिक व ऑर्‌गॅनिक असे दोन मुख्य भाग असतात. गेल्या खेपेस आमची इन्‌ऑर्‌गॅनिकची परीक्षा झाली आणि या महिन्याच्या अखेर ऑर्‌गॅनिकची होईल. म्हणजे या परीक्षेंतून आम्ही मोकळे होऊं व पुढल्या टर्मपासून – कारण या महिनाअखेर टर्म संपेलच – आम्हांला डॉक्टरेटकरतां रिसर्च-वर्कला सुरुवात करायला मिळेल.

विनयकुमार सरकारांकडून बरेच दिवसांत कांहींएक बातमी कळली नाहीं. सध्यां ते येथेंच आहेत असें मी समजतों. आमची परीक्षा आटपल्यावर एकदां त्यांना भेटायला जाईन म्हणतों.

मार्च महिन्यांत लाइप्झिगला एक मोठी व्यापारी जत्रा असते, ती पहायस मी जाणार आहें. बहुतेक कर्वेकडेच उतरेन असें वाटतें. शंभुरावही येणार आहेत. त्याचप्रमाणें गणपुले वगैरे ब्यूरोची मंडळीही येणार आहेत.

सध्यां चट्टोपाध्याय वगैरे मंडळींनीं social studies म्हणून एक क्लब काढला आहे. तेथें आठवड्यांतून एकदां Sociology वगैरे विषयांवर वाद-विवाद किंवा विद्वान लोकांचीं व्याख्यानें वगैरे करण्याची व्यवस्था केली आहे. वर्गणी महिना दोन शिलिंग आहे. मी त्या क्लबाचा सभासद झालों आहें.

आमच्या बँकेकडचें त्रैमासिक आतां तुमच्याकडे कां येत नाहीं तें कळत नाहीं. आतां माझे पैसे त्या बँकेंत नाहींत म्हणून पाठवीत नसतील. पण तसें करण्याचें खरें म्हटलें असतां कांहीं कारण नाहीं. माझे पैसे सध्यां बहुतेक इंडियन ब्यूरोमधें व कांहीं डॉइच्चे बँकमधें असे आहेत. पैशाविषयीं पूर्वी तुम्हांला लिहिलेंच आहे. त्यांतून पाठवायचेच झाल्यास मला वाटतें विलायतेस लंडनला पैसे ठेवतां येतील, म्हणजे सुरक्षित राहून व्याजही मिळेल. तुम्हांला वाटेल तसें करावें. पण येथें ठेवणें धोक्याचें आहे. तेव्हां मला वाटतें एक तर तुमच्यापाशींच पैसे राहूं द्यावे किंवा मला चेकनें किंवा ड्राफ्टनें

पाठवावे म्हणजे मी ते विलायतेस एखाद्या बँकेंत जमा करीन. परस्पर विलायतेस पाठवणें शक्य असेलसें मला वाटत नाहीं. मला वाटतें विलायतेस Eastern Bank of London मध्यें ठेवावे. तुम्हींच काय तें ठरवावें.

कोर्डे व मी जोडीनेंच काम करीत असतों. त्यांचा व माझा विषय एकच असल्यामुळें सर्व काम बरोबरच करीत असतों. त्यामुळें सोबतही होते. पंडित व विष्णु किर्लोस्कर* कधीं कधीं भेटतात. अद्याप त्यांना भाषा विशेष येऊं लागली नाहीं. नव्या माणसाला फारच कठिण आहे. महिना दोन महिन्यांनीं कधीं कधीं सवडीप्रमाणें बाजारी चिवडा पाठवतां आल्यास गेल्या आठवड्याप्रमाणें पाठवावा. गेल्या आठवड्याचा चिवडा मला फार आवडला. टीकाच करायची तर साखर जरा जास्त होती आणि तिखट जरा जास्त होतें. त्यांत विशेष कांहीं नाहीं.

आज एकदम खूप थंडी पडली आहे. टेंपरेचर उणें –७° पर्यंत गेलें होतें. रस्त्यावरून चालतांना कान ठणकूं लागतात. मी सकाळीं उठलों कीं, खोली तापवलेली असल्यामुळें बाहेर किती थंडी असेल याचा अंदाज नसतो. मग बाहेरच्या बाल्कनींतील थर्मॉमिटर खिडकींतून पाहतों व टेंपरेचर असेल त्याप्रमाणें अंगांत कपडे घालून मग बाहेर पडतों.

सध्यां क्लेरेची मोठी बहीण येथें माहेरीं आली आहे. नवऱ्याकडून रोज एक पत्र तिला येतें व त्याशिवाय एकदोन दिवसांनीं एक तार येते. तिचेंही त्याला रोजच्या रोज पत्र जातें. मधें एकदां पूर्वी दोघांचें खूप भांडण होऊन काडी मोडण्याची पाळी आली होती. मजा आहे झालें एकंदरींत! मी खुशाल आहें. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

---

* श्री. विष्णु रामचंद्र किर्लोस्कर, हल्लीं जर्मनींत वैद्यकीचा उच्च अभ्यास करीत आहेत.

श्री

पत्र १२७ वें

बर्लिन,

ता. १९-२-२३

तीर्थरूप नानांस शिरसाष्टांग नमस्कार, वि. वि. तुमचें ता. २६-१ चें पत्र व त्या सोबतचें आबांचें पत्र पोंचलें.

बरेच दिवस इंग्रजी लिहिण्यावाचण्याचा किंवा बोलण्याचा प्रसंग न आल्यामुळें व इंग्रजीशीं बरीच जुळती अशी दुसरी युरोपीय भाषा शिकल्यामुळें साहजिकच इंग्रजी थोडेंसें विसरल्यासारखें होतें. विशेषतः येथें एखाद्या हिंदी गृहस्थाशीं इंग्रजी बोलण्याचा प्रसंग आला कीं, फारच तारांबळ होते. पुष्कळदां शब्द आठवत नाहींत, मग बरेचसे जर्मन शब्द तोंडांत येतात आणि वाक्यांची रचना जर्मनप्रमाणें होते. हें मोठेंसें भूषण नव्हे हें खरें; पण त्याला इलाज नाहीं. माझी खात्री आहे कीं, पुन्हा हिंदुस्थानांत परत आल्यावर इंग्रजीचा फिरून व्यासंग सुरू झाला कीं पूर्वीप्रमाणें येऊं लागेल. अलीकडे माझीं सर्व पत्रें नेहमीं मराठींतूनच जातात व बंगाली मित्रांना बंगालींतून. तेव्हां साहजिकच इंग्रजीचा संबंध सुटत चालला आहे, निदान तात्पुरता तरी. तेव्हां क्वचित् प्रसंगीं माझें एखादें इंग्रजी पत्र तुमच्या हातीं आलें असतां त्यांतल्या चुका दुरुस्त करून मला पाठवल्यास बरें वाटेल. बाकी त्यांत कांहीं मोठेंसें नाहीं. पत्राच्या भाषेसंबंधीं मी विचार करूं लागलों कीं, आपण हिंदी लोकांनीं एकच भाषा जाणणाऱ्या दुसऱ्या हिंदी इसमास इंग्रजींत पत्र कां लिहावें हें मला कळत नाहीं. शिवाय उत्तम इंग्रजी लिहिण्यांत पुष्कळजण भूषण समजतात; पण तितकेंच उत्तम मराठी लिहिण्यांत ते कां भूषण समजत नाहींत? ही सुद्धां आपल्या राष्ट्रीय दास्याचीच एक खूण आहे असें मी समजतों. तुम्हांला काय वाटतें यासंबंधीं?

नुकताच मी येथल्या Sexualityच्या प्रसिद्ध डॉक्टर Hirshfeld यांच्या व्याख्यानाला त्यांच्या इन्स्टिट्यूटमधें गेलों होतों. त्यांचें प्रथम homo-sexuality संबंधीं व्याख्यान झालें. त्याबरोबर चित्रें व नकाशे वगैरे दाखवले व नंतर homo-sexuality व त्यामुळें होणारी आत्महत्या यांसंबंधीं सिनेमाची

माची फिल्म त्यांनी दाखविली. आतां या विषयावर त्यांचीं व्याख्यानें वरचेवर व्हायचीं आहेत. तीं ऐकायला मी जात जाईन म्हणतों. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र १२८ वें

बर्लिन,

ता. १०-३-२३

ती. नानांस शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना विशेष. तुमचीं ता. १६ फेब्रुवारीचीं पत्रें पोंचलीं. गेल्या आठवड्याला तुम्हांला माझ्याकडून पत्र मिळालें नसेल. माझी परीक्षा आटपून मी लाइप्झिगला जाण्याच्या गडबडींत होतों, त्या वेळीं घाईघाईनें एक कार्ड लिहून टाकलें होतें, पण त्याच सुमारास पोष्टाचे दर चढले होते व नव्या दराप्रमाणें तिकिटें न लावल्यामुळें तें कार्ड येथें परत घरीं येऊन पडलें. तें काल मी लाइप्झिगहून परत आल्यावर पाहिलें. एकूण गेल्या आठवड्यास तुम्हांला माझ्याकडून पत्र किंवा कार्ड कांहींच गेलें नाहीं.

असो. सोमवार ता. ५ मार्चला आमची ऑर्गॅनिक केमिस्ट्रीची तोंडीं परीक्षा झाली. मी व कोर्डे चांगले पास झालों. आज पुन्हा आमच्या प्रोफेसरांना भेटायला गेलों असतांना त्यांनीं आमची फार वाखाणणी केली. मंगळवार ता. ६ला पहांटे उठून मी व कोर्डे लाइप्झिगची व्यापारी जत्रा पहायला गेलों. तेथें कर्वे आम्हांला भेटले, व आमच्याच बरोबर हिंडत असत. शंभोराव, पंडित, किर्लोस्कर वगैरे मंडळीही त्याच वेळीं तेथें आली होती. एकंदरींत तेथें तीनचार दिवस फार मजेंत गेले. जत्रा पाहण्यासारखी होती. कोट्यवधि लोक तेथें जमतात. शहरभर जिकडेतिकडे आणि शहराबाहेरच्या पटांगणांत सर्व तऱ्हांच्या लहानमोठ्या वस्तूंचें व यंत्रांचें प्रदर्शन मांडलेलें होतें. शंभोरावांनीं तेथें कांहीं यंत्रांच्या ऑर्डरी दिल्या. आम्ही प्रथम दोन दिवस टेक्निकल प्रदर्शनांत हिंडून सर्व यंत्रें व रासायनिक कारखान्याची सामग्री पाहिली, व ज्यांत आम्हांला विशेष महत्त्व वाटलें त्यांच्या जाहिराती व पत्रेंही घेऊन

लाइप्ज़िग

पृ. २५१] श्यामकान्त कवें

ठेवली. जगांतल्या मोठमोठ्या ठिकाणचे व्यापारी येथें व्यापाराला येत असतात. त्यामुळें या तीनचार दिवसांत महागाई मात्र सपाटून होते. अगोदर एकदम पौंड पडल्यामुळें आम्हांला महागाई वाटत होती. त्यांतून जत्रेमुळें ती वाढली. आमचा रोजचा राहण्याचा व जेवणाखाणाचा खर्च बराच होत असे. एकंदर चार दिवसांत पंचवीस एक रुपये खर्च आला. कर्व्यांनीं एके दिवशीं संध्याकाळीं आम्हांला आपल्या घरीं कॉफीला बोलावलें होतें. तेथें ते ज्यांच्या घरीं राहतात त्यांची सर्व मंडळी व कोर्डे, शंभोराव, मी, पंडित, किर्लोस्कर वगैरे मंडळी जमलों होतों. मग फ्लॅशलाइटनें कर्व्यांनीं आमचा फोटो काढला.

दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं कर्व्यांनीं काढलेल्या इंग्रजी वर्गांत इंग्रजींतच गप्पा मारण्यास गेलों होतों. तेथें कांहीं जर्मन मुली कर्व्यांजवळ इंग्रजी शिकत असतात. चांगल्या शिकल्या आहेत. नंतर एके दिवशीं संध्याकाळीं एका विनोदी नाटकाला गेलों होतों. हसून हसून पुरेवाट झाली. फारच मजा वाटली. भाषा अगदीं मराठी भाषेइतकी चांगली समजत होती. शिवाय अभिनय इतके चांगले होते, कीं बोलून सोय नाहीं. इकडल्या अभिनयाशीं आपल्याकडल्या अभिनयाची तुलनाच करतां येत नाहीं. आपले अभिनय म्हणजे यापुढें पोरखेळ वाटतो. पुन्हा प्रत्येक जण आपआपलें काम इतकें छान करतो कीं, सर्व नटांपैकीं कोण चांगला हें क्वचितच सांगतां येतें. तर आपल्याकडे एखाद दुसऱ्या नटाच्या अभिनयावर सबंध कंपनी चाललेली असते, आणि त्या नटाला जमेल असें नाटक नाटककर्ते लिहीत असतात.

असो. याप्रमाणें लाइप्झिगचा प्रवास संपवून काल संध्याकाळीं येथें परत आलों. बरेच दिवस अभ्यासाच्या व कामाच्या दाबामुळें जो थोडासा त्रास झाला होता तो दूर होऊन पुन्हा ताजातवाना झालों. सध्यां आम्हांला सुट्टी आहे व एप्रिलला पुन्हा कामाला सुरुवात करीन. तोंपर्यंत येथेंच राहून वाचन वगैरे कांहीं व्यवसाय करावेत असा विचार आहे. प्रवास वगैरे फारसा या सुट्टींत करणार नाहीं म्हणतों. कारण एकदां लॅबोरेटरींतलें काम सुरू झालें म्हणजे जर्मन-साहित्य किंवा इतर विषयांवर स्वतंत्रपणें वाचणें किंवा लिहिणें यास बिलकूल वेळ मिळत नाहीं. तेव्हां या सुट्टीचा त्याकडे उपयोग करावयाचा असें ठरवलें आहे. एप्रिल महिन्याच्या आरंभापासून पुन्हा टेनिस

सुरू होईल. मग खेळण्यास सुरुवात करीन. माझ्या मनांत एक चांगली टेनिस रॅकेट घ्यावयाची होती, पण सध्यां फार महाग आहे. हल्लीं मजा अशी झाली आहे कीं, पूर्वीं पौंडाची किंमत अडीच लाख मार्क झाली होती, त्या वेळच्या प्रमाणें किंमती ठरल्या गेल्या आहेत. पण सध्यां पौंड पुन्हा पडून ऐशींनव्वद हजारच झाला आहे, तरी किंमती तशाच आहेत. येथल्या सरकारी बँकेंत सध्यां पुष्कळ पैसे-सोनें वगैरे जमवून-मार्कला स्थिरता आणली आहे. पण असा भाव किती दिवस राहील याची शंकाच आहे. त्यामुळें जर्मन व्यापारास धक्का बसतो असें कोणी कोणी म्हणतात. सध्यां मी कोणत्याही तऱ्हेच्या खरेदीच्या भानगडींत पडत नाहीं. पुढें कदाचित् किंमतीही उतरण्याचा संभव आहे. तुम्हाला वर्तमानपत्रांवरून रोजच्या रोज मार्काची किंमत वगैरे कळत असेलच व त्याचप्रमाणें येथल्या इतर हालचालीही कळत असतील.

तुमचें चहाचें पार्सल पोंचलें. आतां मजजवळ किती तरी चहा झाला आहे. तेव्हां यापुढें आतां पाठवूं नये; कारण तो विनाकारण खर्चही होईल, आणि मलाही ओझें होईल. मी चहा अगदीं क्वचितच पितों; आठवड्यांतून एखादे वेळीं किंवा कोणी पाहुणे बोलावले तर. आतां मजजवळ तीन पौंड चहा आहे, तो मीं सध्यांच्या बेतानें वापरल्यास एक दोन वर्षें सुद्धां पुरेल. लोकांना दिला तरच जरा कमी होईल. किर्लोस्कर वगैरेनाही पार्सलनें चहा आलाच आहे. तेव्हां त्यांनाही आतां देण्यांत अर्थ नाहीं. सबब आतां मी पुन्हा सांगेपर्यंत जास्त चहा किंवा सुपारीही पाठवूं नये. बाजारी चिवडा एखादे वेळीं पाठवल्यास चालेल. त्यांत होतां होईल तों साखर नसावी. पूर्वीं एका पत्रांत मी थोडेसे पापड किंवा पापड्या पाठवण्यास लिहिलें होतें, तें तुम्ही विसरलांत असें दिसतें. सवडीनुसार पाठवावे. फार जास्त मात्र सध्यां पाठवूं नये. मी लाइप्झिगला असतांना माझ्या जुन्या बँकेकडून येथें फोन आला कीं 'माझ्याकरतां एक पार्सल तेथें येऊन पडलें आहे तें घेऊन यावें,' म्हणून ! आतांपर्यंत मला वेळ झाला नाहीं. उद्यां रविवार. सोमवारीं घेऊन येईन. म्हणजे तें कोणाकडून व काय आहे हें याच पत्रांत कळवीन.

माझ्या सध्यांच्या अभ्यासाविषयीं तुम्हांला आतांपर्यंत विशेष कल्पना आली नसेल ती या पत्रांत देतों. येथें केमिस्ट्रींत रिसर्च वर्क-म्हणजे जर्मन

भाषेतल्या शब्दांत ' डोक्टोर आर्बाइट ' किंवा ' Doctor's Work ' सुरू करण्यापूर्वीं विद्यार्थ्यांचा पाया चांगलाच भक्कम असण्याची खबरदारी घेतात. तो आमच्या हिंदुस्थानांतील शिक्षणानें पाहिजे तितका भक्कम झाला नव्हता, म्हणून आम्हांला इतके दिवस आमच्या या इन्स्टिट्यूटमध्यें काम करून या दोन परीक्षा द्याव्या लागल्या. आतां आमची पूर्व तयारी झाली आहे व ही सुट्टी संपतांच आम्ही Doctor's Work करायला लागूं. त्याविषयीं आजच आमच्या प्रोफेसरांशीं आमचें बोलणें झालें. आमचे प्रोफेसरही आमच्या केमिस्ट्रीच्या माहितीची व आमच्या काम करण्याच्या उमेदीची व उद्योगशीलतेची तारीफ करून म्हणाले कीं, असेंच मेहनतीनें आम्ही काम केलें तर, आम्ही आणखी दोन टर्म्सूनीं Doctor's Work संपवून आमचा निबंध (थीसिस) विश्वविद्यालयाकडे पाठवूं शकूं व पुढें दोन चार महिने इतर विषयांच्या तोंडी परीक्षांस लागतील व सर्व विषयांत पास झाल्यावर आम्ही डॉक्टर होऊं. तेव्हां आणखी वर्ष दीड वर्षांत आमचें विश्वविद्यालयाचें शिक्षण पुरें होईल. पुढें काय करावयाचें याविषयींचे विचार अद्यापि अनिश्चित आहेत. पण वर लिहिलेल्यासंबंधीं आणखी कांहीं महत्त्वाचें लिहायचें आहे तें आतां लिहितों. एप्रिलच्या शेवटल्या आठवड्यापासून आम्ही आमच्या Doctor's Work ला सुरवात करणार. पण तें काम कोणतें असावें यासंबंधीं प्रो. टॉम्सशीं बोललों. पूर्वींपासून आमची इच्छा होतीच, कीं Oils and Fats या विषयावर एकादा प्रश्न–Problem घेऊन त्यासंबंधीं काम करायचें व ती इच्छा आम्हीं पूर्वींच प्रो. टॉम्सना सांगितली होती. तेव्हां त्यांनीं आज आम्हांला सांगितलें कीं, एखाद्या तेलावर जर तुम्हांला काम करावयाचें असेल तर तें तेल अगदीं नवीन म्हणजे येथें युरोपांत ज्याच्यासंबंधीं अद्याप शोध झालेले नाहींत असें एखादें हिंदुस्थानांतलें असल्यास फार चांगलें. म्हणजे आमच्या हातून एक नवीन तऱ्हेचें काम होऊन तें सोपेंही जाईल. जर्मनींत किंवा यूरोपमध्यें माहीत असलेलीं जर तेलें घेतलीं तर इतकी माहिती अगोदर केमिस्ट लोकांना आहे कीं, नवीन कांहीं करायला कठिण जाईल. अर्थात् अगदींच करतां येणार नाहीं असें नाहीं. हा विचार आम्हांलाही पटला, व आतां हिंदुस्थानांतून कांहीं तेलें आणण्याकरितां आम्हांला

तुमची मदत पाहिजे. खरें म्हटलें असतां एप्रिल महिन्याच्या शेवटल्या आठवड्यांत जेव्हां आम्ही कामास पुन्हां सुरुवात करूं, त्या सुमारास हीं तेलें आम्हांला मिळालीं असतीं तर फारच उत्तम झालें असतें व आमचा वेळही फुकट गेला नसता. पण याविषयीं आमचें यापूर्वीं बोलणें झालें नसल्यामुळें तुम्हांला अगोदर लिहितां आलें नाहीं. अद्याप सुद्धां तुम्ही ताबडतोब पाठवल्यास एप्रिल महिन्याच्या अखेरीस आम्हांला तीं मिळणें शक्य आहे. हें पत्र तुम्हांला साधारणपणें रविवार एक एप्रिलच्या सुमारास पोंचेल; आणि लागलीच येत्या आठवड्यास शुक्रवार तारीख ६ एप्रिलच्या आंत जर तुम्ही मला पार्सल पाठवलेंत, तर तें मला येथें सुमारें २५ एप्रिलला मिळूं शकेल; व त्याच सुमारास आमचें काम सुरू व्हायचें आहे. या बाबतींत तुम्हांला बरोबर माहिती नसेल व सहज रीतीनें मला लागणारी सामग्री मिळणार नाहीं, म्हणून मी आबांना स्वतंत्र पत्र लिहीत आहें, व आणखीही कदाचित् एकाद्या माहितीच्या गृहस्थाचें नांव आठवल्यास त्याला लिहीन. आबांना लिहिण्यांत आणखी फायदा असा कीं, तुम्ही त्यांना पुन्हा पत्रानें कळवण्यांत किंवा विचारण्यांत जे दोन तीन दिवस जायचे ते वांचतील व तेवढाच वेळ आबांना हें सामान गोळा करण्यास मिळेल. पण बडोद्यास जर तुम्हांला याविषयीं कांहीं माहिती मिळूं शकली आणि मला पाहिजे तीं तेलें किंवा बिया मिळूं शकल्या, तर तुम्हीसुद्धां परस्पर पाठवाव्या. शिवाय आबांच्या येतीलच. आतां मला खरोखर काय पाहिजे तें खालीं इंग्रजींत लिहितों:—

I want to work on any oil. Now oils can be mainly divided into two big classes, Fat oils (*i. e.*, the glycerides of the fatty acids) such as are obtained from the various seeds *viz.*, Mahua, Groundnuts, Sesame etc., and the ethereal oils with a peculiar strong smell, obtained generally from the leaves or flowers of strong smelling trees, such as turpentine oil, eucalyptus, ajman (ओंवा) oil, and the like. I should like to have any obscure oil belonging to any of these two classes, or different samples of such oils belonging to both the classes. Of course the examples quoted above are quite known and

not obscure; they have been quoted only to give you an idea of the two types. Now there are fatty oils or seeds (containing such oils) like Dhupa—which, as I had been informed by Aba and others, was quite obscure, since no research has been done upon it in western countries. Dhupa belongs to the fatty type, and obscure ethereal oils are perhaps even now employed by peasants in our villages as medicines etc. Do they extract any essential oil from पुदिना or सबूजा or तुळस or any such strong smelling plant ? If so, please consult some chemist if these were obscure enough and if so try to send them on. You yourself must be knowing some obscure oils from Konkan *e. g.* जांभिच्या बियांच्या साळीचें तेल, बिम्भा, नरटीचें तेल इ०. I know there would be difficulty in securing these and sending them immediately. But do try and if not quite the next week, send them as soon as possible. Each oil should be at least one lb. in weight, should bear the name मराठी and English if you know it. If you know only the seeds–whose oil cannot be extracted there, then send them on, we shall extract the oil here; only they must be much more than one lb. If you know any oil chemist or any industrial chemist in general he may help you. Please realize the importance of the matter to me at this moment and excuse the trouble which I could not but have avoided. I was going to cable. But that would have cost tremendously and moreover you would have got no idea. One word to be telegraphed to India costs now 10,000 marks *i. e.*, about 2 Rs. Of course if you can't send the required articles, you needn't, since I am writing especially to Aba at Bombay for that purpose, asking him to consult the chemists Pandit, Talwalkar and others. My friend Korde will be writing to his friends similarly. If you send 3–4 oils all together in one parcel, there is a likelihood of its coming late. If you, on

the other hand, send each small parcel separately, there is at least possibility of some of them coming to me earlier.

असो. हें झालें माझ्या सध्यांच्या हातीं घेतलेल्या कामासंबंधीं. वर सांगितल्याप्रमाणें आणखी वर्ष दीड वर्षांत माझें हें काम संपेल. पण यामुळें माझ्या आयुष्यांतील धंदा नक्की झाला असें मुळींच होत नाहीं. त्याचा पुनः विचार केलाच पाहिजे. सध्यां यूरोपमध्यें आहें तोंपर्यंत विश्वविद्यालयांत आणि पुढं कारखान्यांत वगैरे जेवढा धंदा शिकतां येईल तेवढा शिकून घ्यावा, मग पुढें पुष्कळ संधि येण्याचा हिंदुस्थानांत संभव आहे. हळुहळू दिवसेंदिवस या गोष्टी ठरल्या पाहिजेत व आतांपासून हिंदुस्थानांत संधीसाठीं टपून बसलें पाहिजे. हिंदुस्थानांत पुष्कळ मोठमोठे कारखाने उभारले जात असतील किंवा जातील, त्यांत केमिस्ट या नात्यानें काम करतां येईल व पुढें हिंदुस्थानांतल्या परिस्थितीचा कांहींसा अनुभव आल्यानंतर स्वतंत्र उद्योग करतां येईल. हें सर्व परिस्थिति व संधि यांवर अवलंबून आहे. सध्यांचा माझा येथला उद्देश म्हणजे theoretical and practical असा technical oil chemist होण्याचा संभव आहे. यावरून तुम्हांला आतां माझ्या येथल्या शिक्षणाची व माझ्या उद्देशाची चांगली कल्पना येईल. तुम्ही मागल्या एका पत्रांत माझ्या विषयीं पुष्कळसे प्रश्न विचारले आहेत. त्यांचीं उत्तरें सावकाश प्रत्येक पत्रांत थोड थोडीं देत जाईन. या खेपेस आतां जास्त लिहीत नाहीं. कारण बरेच दिवसांत पुष्कळांना पत्रें लिहायचीं राहिलीं आहेत, तीं या आठवड्यास लिहायला घेतलीं आहेत. आबांनाही माझ्या वरील तेलांसंबंधीं सविस्तर पत्र लिहायचें आहे. आतां सुट्टी असल्यामुळें मला स्वस्थपणें बरेंच लिहायला वेळ होत जाईल. मीं आतां मधें बंद पडलेला व्यायाम पुन्हा करण्यास सुरुवात केली आहे. क. ही विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र १२९ वें

बर्लिन,

ता. १९-३-१९२३

ती. सौ. माईस शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना विशेष. तुझें ता. २१-२ चें पत्र व नानांचें मुंबईचें ता. २३-२ चें व श्रीनिवासचें अशीं तीन्ही एकत्र गेल्या आठवड्यास मला पोंचलीं. माझ्या गेल्या एकदोन पत्रांत लाइप्झिगविषयीं हकीकत होती व गेल्या आठवड्याच्या पत्रांत कांहीं बियें व तेलें पाठविण्याविषयीं लिहलें आहे तें तुम्ही ताबडतोब कराल असें समजतों. तेलें सुचवलीं आहेत त्यांत आणखी एक तेल सुचवायचें आहे. तें म्हणजे करंजीचें तेल. याचें इंग्रजी नांव वगरेही पाहिजे.

सध्यां मला सुट्टी असून मी मोकळाच असतों. बरेंचसें वाचन या सुट्टींत करण्याचा बेत आहे. पण सुटी होऊन एक आठवडा झाला, तरी अद्याप सुरुवात केली नाहीं. कांहींना कांहीं फालतु कामें असतात. परवां संध्याकाळीं मी माझ्या घरीं रा. कोर्डे, आगटे, अधिकारी व शंभोराव जांभेकर अशा मंडळींना चहाला बोलावलें होतें. मिसेस फ्राऊ डॉक्टर श्लेलेनीं माझ्याकरितां केक्स विकत आणून ठेवल्या होत्या. दूध मिळालें नाहीं म्हणून कंडेन्स्ड मिल्कचा डबा आणला होता. चहा हिंदीच होता. कोर्डे यांनीं मला कांहीं पापड दिले होते ते मीं तळले होते. मिळून सर्व बेत छानच जमला. आणखी याला भर म्हणजे मी डॉ. लाखमान यांच्याकडून ग्रामोफोनच्या हिंदी प्लेट्स् मागून आणल्या होत्या; त्या आमच्या घरच्या ग्रामोफोनवर मंडळी चहा पीत असतांना व नंतर वाजवल्या. असा सर्व बेत थाटांत झाल्यावर रात्रीं सर्वजण नाटकाला गेलों व उशीरां घरीं परत आलों. खरेंच, तुम्ही नुकताच जो शेवटीं चहा पाठवला होता,—ज्याच्यावर गुजराथी भाषेंत बरेंचसें छापलें होतें—तो इतकासा चांगला नव्हता. विशेषतः त्यांत भुगाच जास्त आहे. असो. बाकी सध्यां मुद्दाम दुसरा पाठवायची जरूर नाहीं. मजजवळ दुसरा पुष्कळ आहे. पुन्हा पाहिजे असेल तेव्हां मी लिहीनच.

गेल्या आठवडयास तुमचें खव्याच्या वडयांचें एक व नारळ व Brazil nuts चें दुसरें अशीं पार्सलें पोंचलीं. त्यांतलें पहिलें पार्सल मला

विशेष आवडलें. भुइमुगाच्या शेंगा पाठवणार होतां असें लिहिलें आहांत, त्या अद्याप आल्या नाहींत हें बरें आहे. कारण एक तर तुला माहीतच आहे कीं, मला भुइमुगाच्या शेंगा किंवा दाणे विशेष आवडत नाहींत. शिवाय पूर्वी पाठवलेल्या पैकीं पुष्कळ शिल्लक आहेत; आणि येथें सुद्धां पाहिजे तर विकत मिळतात. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र १३० वें

बर्लिन,
२५-३-२३

तीर्थरूप सौभाग्यवती माईस शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना विशेष. या आठवड्यास तुमच्याकडून पत्र नव्हतें. मुंबईहून फक्त आबांचें ता. २-३चें एक कार्ड आलें.

आतां हिंवाळा संपून वसंत ऋतूला सुरुवात झाली आहे. थंडी बिल्कूल नाहीं. उन्ह छान पडतें. टेंपरेचर १० डिग्री असतें. टेनिस खेळण्यास सुरुवात झाली आहे. मी काल व आज येथें असलेल्या जव्हेरी नांवाच्या एका पार्शी विद्यार्थ्याबरोबर टेनिस खेळलों. हे पूर्वी बडोदा कॉलेजमध्यें होते व शहाबरोबरच येथें आले. यंदा मात्र टेनिस गुदस्तापेक्षां किती तरी महाग झालें आहे. मीं एक नवीन टेनिस बॅट घेतली, तिला दीड लाख मार्क म्हणजे पंचवीस एक रुपये पडले. आमच्या क्लबची वर्षाची वर्गणी ५०,००० मार्क आहे. सध्यां मार्कांचा भाव कायम ९७,७५५ आहे. असो. एकंदर सुंदर हवा, उष्णता, झाडें, फुलें, खेळ वगैरेंनीं आतां येणारे तीनचार महिने म्हणजे येथले अगदीं चैनीचे आहेत व ते चांगले उपभोगण्यास मिळतील. आजच संध्याकाळीं मी व कोर्डे सायकलवर फिरायला जाणार आहोंत.

आतां तुमच्याकडे हळूहळू आंब्याचे दिवस येत चालले असतील. येथें कोणाला आंबा हें फळ माहीत नसतें. तुम्हांला चारपांच आफुसचे आंबे पार्सलनें पाठवणें शक्य आहे का? मला वाटतें चांगले कच्चे पाहून एका महिन्यानें

पिकतील अशा तऱ्हेचे आंबे जर चांगले पॅक करून पाठवले तर मला येथें चांगल्या स्थितींत मिळण्यास जड जाणार नाहीं. अशा रीतीनें हिंदुस्थानांतून विलायतेस आंबे पाठवतात हें मला माहीत आहे. आणि असे कच्चे आंबे आतां एप्रिलमध्येंच मिळूं शकतील. मात्र जात उत्तम पाहिजे. पहा जमल्यास पाठवतां आले तर; त्याचप्रमाणें काजूच्या बिया, पिस्ते, चारोळ्या, खारका वगैरे कांहीं पदार्थ वेळ होईल त्याप्रमाणें पाठवावे.

काल आपल्या हिंदुस्थान असोसिएशनची एक सभा झाली. तींतील सर्व हिंदी लोक आतांपर्यंत आपआपसांत भयंकर भांडत असतात. लहान-सहान मुद्यांवर भांडून आतांपर्यंत या असोसिएशनचें अस्तित्व डळमळीत झालेलें आहे. एवढेसे जर मूठभर लोक एक होऊं शकत नाहींत, तर हिंदुस्थान एक होणें किती कठिण आहे!

हिंदी विद्यार्थी हल्लीं इकडे बरेच आले आहेत. त्यांतल्या कांहींचें हिंदुस्थानांतील विश्वविद्यालयांत शिक्षण पुरें झालें आहे. पण पुष्कळांचें हिंदुस्थानांत शिक्षण बेताचेंच झालेलें आहे. धंदेशिक्षण घेण्याकरतां येथें बरेच जण येतात. त्यांतल्या त्यांत बहुतेकांनीं त्या धंद्याचें शिक्षण हिंदुस्थानांत बिलकुल घेतलेलें नसतें. अशा रीतीनें शिक्षण घेण्यास येणें बरोबर नाहीं असें मला वाटतें. रसायन शिकण्याकरतां येथें जे लोक येतात, त्यांनीं त्या विषयाचें शिक्षण पूर्वीं हिंदुस्थानांत जरूर घेतलें पाहिजे. पूर्वीं एकदां एका पत्रांत नानांनीं मला असा प्रश्न विचारला आहे कीं, मुलें मॅट्रिक झाल्यावर त्यांना ताबडतोब इकडे शिक्षणाकरतां पाठवावें कीं नाहीं? माझ्या मतें त्यांना जर उच्च प्रतीचें विश्वविद्यालयाचें शिक्षण द्यायचें असेल, तर त्यांना ताबडतोब पाठवूं नये. याचें कारण असें कीं, इकडल्या आधुनिक शास्त्रीय शिक्षणाप्रमाणेंच आपल्या हिंदुस्थानची जी एक संस्कृति किंवा Culture आहे त्याचप्रमाणें हिंदुस्थानच्या राजकीय, सामाजिक, नैतिक वगैरे स्थितीचें परीक्षण या सर्व विषयांचें ज्ञान आपल्याला झालें पाहिजे. याच्या योगानें हिंदुस्थानच्या प्रत्येक गोष्टीकडे पहायला लागणारा ‘ दृष्टिकोण ’–Indian point of view–आपल्यामध्यें येतो आणि हा दृष्टिकोण नसला आणि नुसतें शास्त्र आपण शिकलों, तर तें कामास लावतांना आपण चुकूं. ही संस्कृति किंवा हें

हिंदी बाबतीचें ज्ञान मिळण्यास योग्य वय म्हणजे मॅट्रिक झाल्यानंतरचीं ४।५ वर्षें व त्या वेळांत एखाद्या हिंदी विश्वविद्यालयांत अभ्यास करणें व वेगवेगळ्या हिंदी चळवळींच्या वातावरणांत राहणें हें हितावह आहे. शिवाय सोयीच्या दृष्टीनेंही इंग्रजीसारखी कठिण भाषा एकदां शिकल्यावर रसायना-सारखे विषय त्या भाषेंतून न शिकतां जर्मन भाषेसारख्या त्याहून कठिण व मुळींच येत नसलेल्या भाषेंतून शिकणेंही चुकीचें होईल. त्यापेक्षां इंग्रजींतून एकदां तो विषय शिकल्यावर फक्त भाषेचाच प्रश्न राहतो; आणि येथें भाषा शिकल्यावर मग पुढें फारसा त्रास पडत नाहीं. ज्याला इकडे यायची अगदींच घाई आहे त्यानें निदान इंटर-सायन्सपर्यंत म्हणजे दोन वर्षें तरी हिंदुस्थानां-तल्या एखाद्या विश्वविद्यालयांत घालवावीं. हा झाला विश्वविद्यालयाचा प्रश्न. पण प्रत्येकानें येथें येऊन येथल्या विश्वविद्यालयांत शिकून डॉक्टर झालेंच पाहिजे असें नाहीं. धंदेशिक्षण हेंही सध्यां फार महत्त्वाचें आहे आणि विश्व-विद्यालयाचें शिक्षण बिलकूल न घेतां येथें धंदेशिक्षण घ्यायला सुद्धां लोकांनीं आलें पाहिजे. येथें वेगवेगळ्या धंद्यांच्या शिक्षणाकरतां संस्था आहेत. मात्र सध्यां परदेशीयांकडून या संस्था भयंकर पैसे घेतात. कोठें शिक्षणक्रमासाठीं साठ पौंड, कोठें १०० पौंड, तर कोठें याहूनही जास्त घेतात. तर हे पैसे खर्चून आणि आणखी जास्त पैसे देऊन एखाद्या कारखान्यांत काम करण्याची ज्याची तयारी असेल त्यानें येथें धंदेशिक्षणाकरतां यावें. पुष्कळदां कार-खान्यांत वगैरे फुकट संधि मिळते. Confectionaries म्हणजे खाऊचे किंवा मिठाईचे पदार्थ वगैरे तयार करण्याची कला शिकणें हेंही फार महत्त्वाचें आहे. उदाहरणार्थ, बिस्किटें, चॉकोलेट्स्, साखरेचे पदार्थ वगैरे. तेव्हां ज्यांचें शाळेंत शिक्षण वगैरे बेताचें झालेलें आहे किंवा जे फक्त मॅट्रिकपर्यंत शिकलेले आहेत, अशांना हा धंदा इकडे येऊन शिकण्याकरतां उत्तेजन द्यावें.

असो. आज जास्त कांहीं लिहायचें नाहीं. नुकताच फ्रॉ. स्युलरकडे आंघोळीस गेलों होतों. तेथेंच रात्रीं जेवलों. कळावें, ही विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र १३१ वें   बर्लिन,

ता. ७-४-३३

ती. सौ. माईस शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना विशेष. तुमचीं ता. १६-३ चीं मुंबईहून लिहलेलीं पत्रें पोंचलीं. त्याचप्रमाणें तीन पार्सलें—एक काजऱ्याच्या बियांचें, दुसरें मनुकांचें व तिसरें बडोद्याहून चिवड्याचें अशीं पोंचलीं. काजऱ्याच्या बिया आणखी मागाहून जास्त पाठवतों असें तुम्हीं लिहिलें आहां तें काय म्हणून? जास्त मीं मागितल्या नव्हत्या. मीं अद्याप त्या बिया ज्यांना पाहिजे आहेत त्यांना दिल्या नाहींत. दिल्यावर ते काय म्हणतात तें पाहूं. असो. मनुका मला फार आवडल्या. चिवडा मिळाल्या-बद्दल तर अतिशय आनंद वाटला. कारण चिवडा खाल्ला म्हणजे कांहीं तरी तिखटामिठाचें खाल्ल्यासारखें वाटतें व त्यामुळें तो फार आवडतो. तुम्हांला त्रास न होतां पंधरावीस दिवसांनीं एकदां एक चिवड्याचें लहानसें पार्सल तुम्हीं मला पाठवलें तर फार आनंद होईल. गेल्या दोन्ही खेपांच्या चिवड्यांत साखर होती ती नसती तर बरें झालें असतें. त्याचप्रमाणें कांदे घातलेला चिवडा पाठवतां आल्यास चांगलें. बाकी मग तो टिकण्यांत कमी असला तर मात्र मला माहीत नाहीं.

नानांच्या पत्रांत माझ्या लायकीबद्दल व एकंदर माझ्या हातून होणाऱ्या भावी कामगिरीबद्दल बरेंच होतें. मला वाटतें कीं, माझ्याबद्दल एकंदरींत तुम्हांला जेवढी भावी आशा वाटते तेवढें माझ्या हातून होईल कीं नाहीं याची शंका आहे. झालें तर चांगलेंच. त्याला संधिही यावी लागते. पण कदा-चित् इतर हजारों लोकांप्रमाणें स्वतःच्या उदरनिर्वाहापलीकडे माझ्या हातून कांहींच होणार नाहीं. कोणीं सांगावें? बाकी इच्छा व उद्योग माझ्याकडून आहे.

मधें हवा बरीच गरम पडली होती ती आतां पुन्हा थंड झाली आहे. टेंपरेचर ५° सी म्हणजे तुमचें ४१ F असतें. पुन्हा नुकतीच घरांतील तापव-ण्याची सोय बंद झाल्यामुळें खोलींतही केव्हां केव्हां त्रास होतो. त्यांतून आम्ही टेनिस खेळतों. खेळायला लागलों म्हणजे चांगलें गरम वाटतें.

मागाहून कपडे मात्र चांगले गरम घालावे लागतात. आजच गांवांतून आंघोळ करून आलों. आंघोळ दर आठवड्यास एकदां करतों.

हल्लीं फ्रेंचांनीं जर्मनींत रूर प्रदेशांत वाटेल तो धुमाकूळ माजविला आहे, त्याची सर्व माहिती तुम्हांला वर्तमानपत्रांतून मिळतच असेल. येथें वर्तमानपत्रांत रोज, आज इतक्या लोकांना गोळ्या घालून ठार केलें, आज काय अमक्या बँका लुटल्या, आज काय अमक्या कारखान्यावर हल्ला केला व तेथलें सामान जप्त करून मालकांना तुरुंगांत टाकलें, अशा बातम्या वाचीत असतों. रोज किती तरी लोकांचे प्राण आणि रक्त या जुलमाला बळी पडलें नाहीं असें कधींच होत नाहीं. पण हे लोक तरी निःशस्त्र स्थितींत काय करणार? मुकाट्यानें सर्व सहन करून भावी सुडाच्या संधीची वाट पहात आहेत. तुम्हांला साहजिकच माझ्याविषयीं काळजी वाटणार. मी याविषयीं खूप विचार केला. असें वाटतें कीं, जेथें हजारों लोक नुसत्या कांहीं माणसांच्या लहरीवर पटापट मरत आहेत, किंवा जेथें हजारों लोकांचें नशीब या जुलमी लोकांच्या लहरीवर अवलंबून आहे, आणि जेथें किती तरी लोक कांहीं एक संबंध नसतां—कारण नसतां—एकदम प्राणाला मुकत आहेत, तेथें माझ्यासारख्या एका यःकश्चित् जीवाची मला कां काळजी वाटावी? बाकी असें म्हणून मी मुळींच काळजी घेऊं नये असें मी म्हणत नाहीं. पण विचार करूं लागलें म्हणजे वर लिहिल्याप्रमाणें वाटल्याशिवाय राहत नाहीं. पुष्कळदां पुन्हा वाटतें कीं, जें व्हायचें असेल तें होत असतें. आपली इच्छा असलेल्या किती तरी चांगल्या गोष्टी कित्येकांना तरी अनपेक्षित रीतीनें एकदम मिळतात. जीव बचावण्याकरतां पळून जात असलेला एखादा शिपाई कोठें तरी गोळी लागून मरतो; तर जीविताला कंटाळून मरण्याच्या इच्छेनें लढाईंत गेलेला एखादा इसम हजारों गोळ्यांच्या वर्षावांत सुद्धां मरत नाहीं. अर्थात् आपल्याकडून होईल ती काळजी घेत राहणें किंवा उद्योग करीत राहणें हें मात्र आपलें कर्तव्य आहे. तें सोडून द्यावें असें म्हणणाऱ्यांपैकीं (fatalist) मी नाहीं. सध्यांच्या स्थितींत तरी बर्लिनमधें आम्हांला कोठल्याही तऱ्हेचा धोका नाहीं. असो. आज येथेंच पुरें करतों. कळावें हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र १३२ वें

बर्लिन,

ता. १४-४-२३

ती. नानांस शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना विशेष. तुमचें ता. २३-३चें मुंबईचें पत्र मला येथें ११-४ रोजीं पावलें. त्यांत तुमच्या बदली-शिवाय इतर विशेष कांहीं मजकूर नव्हता. तुमची प्रकृति वगैरे ठीक आहे हें वाचून आनंद झाला. गेल्या पत्रांत मी घोड्यावर बसायला शिकायला लागल्याबद्दल उल्लेख केलाच आहे. प्रथम तीन दिवस बसलों व नंतर आंग थोडें दुखायला लागल्यामुळें अलीकडे दोनतीन दिवस विश्रांति घेतली. आतां लवकरच पुन्हा जाऊं लागेन. घोड्यावर बसण्याकरतां येथें पुष्कळ ठिकाणीं चांगल्या व्यवस्था आहेत. मोठमोठ्या पागा बांधलेल्या असून तेथें उत्तम घोडे भाड्यानें घेऊन जातां येतात. टियरगार्टनसारख्या फिरायला जाण्याच्या सुंदर सुंदर जागाही आहेत. तेथें मास्तरही असतात व पाहिजे त्याला शिकतांही येतें. आम्ही ७५,००० मार्क देऊन शिक्षकासहित दहा तास घेण्याचें ठरवलें आहे. म्हणजे बारा रुपये झाले. एवढ्यानें आम्हांला साधारण घोड्यावर बसायला येऊं लागेल. मग एखादे दिवशीं चैनीकरतां एखादा तास घोडा भाड्यानें घेऊन फिरायला जातां येईल. एक तास भाड्यानें घोडा घेण्यास या देशांत रुपया सव्वा रुपया पडतो. घोड्यावर बसण्याचा व्यायाम–आणि विशेषतः येथल्यासारख्या सुंदर थंड हवेंत–फारच चांगला. मात्र हल्लीं फार महागाई असल्यामुळें फारसा घेणें परवडणार नाहीं. पण पूर्वीं मार्क स्थिर झाला नव्हता, तेव्हां किती तरी स्वस्तांत होऊं शकलें असतें. पण त्या वेळीं आम्हांला सुचलें नाहीं. शहासुद्धां घोड्यावर बसायला जातात. पुन्हां घोड्यावर बसायचें म्हणजे पोषाकापासून सर्व तयारी करावी लागते. शक्य तितकें सामान भाड्यानें घेऊनच सध्यां काम चालवतों. विजार तेवढी घेतली.

Circle of Social Studies या नांवाच्या आमच्या साप्ताहिक सभेंत गेल्या गुरुवारीं Miss Emma Goldman या अमेरिकन विदुषीचें 'The Modern School' किंवा 'Education' या विषयावर इंग्रजीमध्यें

व्याख्यान झालें तें फारच ऐकण्यासारखें होतें. शिक्षण सध्यां जगांत किती वाईट स्थितींत आहे आणि त्यांत काय सुधारणा व्हायला पाहिजेत वगैरे मोठमोठ्या लोकांच्या उदाहरणांसहित त्यांनीं सांगितलें.

हल्लीं हवा बेताची उष्ण असते. आज खूप पाऊस पडत आहे. हवा चांगली असली म्हणजे आम्ही टेनिस खेळतों.

कालच दिनकर कर्वे लाइप्झिगहून येथें आला आहे. तो फ्रॉ. म्युलरकडे उतरला आहे. आज सकाळीं माझ्याकडे आला होता. आतां आमची सुट्टी संपत आली. आणखी बरोबर दहा दिवसांनीं कामास सुरुवात होईल. त्या सुमारास तुमच्याकडून मागवलेल्यांपैकीं कांहीं तेलें येतील असा अंदाज आहे.

तुम्हांला साधल्यास थोडासा हिंग व थोडा काळा मसाला पाठवावा. आम्ही एकदां स्वयंपाक करणार आहों. माझी प्रकृति नेहमींप्रमाणेंच चांगली आहे. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र १३३ वें बर्लिन,

ता. ५ मे १९२३

तीर्थरूप नानांस शिरसाष्टांग नमस्कार, वि. वि. तुमचीं पत्रें पोहोंचलीं. त्याचप्रमाणें तुम्हीं पाठवलेलें करंजाचें तेल पोंचलें. त्याच्या पूर्वीच्या आठवड्यास चोल मोगऱ्याचें तेल पाठवलें आहे असें आबा लिहितात, तें मात्र अद्याप पोहोंचलें नाहीं. कोठें तरी रस्त्यांत गहाळ झालें असावें. बाकी आतां पुन्हां पाठविण्यांत अर्थ नाहीं. कारण मला लवकरच माझें काम नक्की करून हातीं घेतलें पाहिजे. आतांपर्यंत तुमच्याकडून फक्त करंजाचें तेल मिळालें. त्यावरही थोडेंच काम झालें असल्यामुळें मी सध्यां त्यावर कांहीं प्रयोग करीत आहें. बरेंच मजेदार काम आहे. कोर्डे यांना बडोद्याहून त्यांच्या बंधूंनीं कांहीं बियें पाठविलीं, त्यांपैकीं ‘ रतनज्योत ’ म्हणून सोनगड जंगलांतलें एक आहे, तें त्यांनीं सध्यां हातीं घेतलें आहे. यापुढें तुमचीं जास्त तेलें एकदोन आठवडेपर्यंत येत राहतील असा अंदाज आहे.

महाराजांची भेट

सध्यां बडोद्याचे महाराज, महाराणी येथें आहेत. परवां आमच्या इन्स्टिट्यूटच्या डायरेक्टर टॉम्सनीं ते लॅबोरेटरी पहावयाला येणार असें आम्हांला सांगितल्यावरून ते येथें आहेत हें कळलें. मग ताबडतोब टेलिफोन करून संध्याकाळीं जीवराज मेहता व नानावटी यांना भेटलों. नानावटी विशेष कांहीं बोलले नाहींत. मग लागलीच महाराजांना व त्यानंतर महाराणींना (हॉटेल एस्प्लनेडमधें) भेटलों. विशेष लिहिण्यासारखें असें कांहीं बोलणें झालें नाहीं. आमच्या अभ्यासाविषयीं व तेथें आम्हांला कसें वागविलें जातें या-विषयीं बोलणें झालें. असो. त्यानंतर दुसऱ्या दिवशीं सकाळीं ठरल्याप्रमाणें महाराज आमची इन्स्टिट्यूट पहावयाला आले होते. डिरेक्टर टॉम्स यांनीं त्यांना ठिकठिकाणीं हिंडवून सर्व दाखविलें व मग आम्ही काम करतों त्या ठिकाणींही आले. आमच्यासंबंधीं महाराज टॉम्सना म्हणाले कीं, " यांना चांगलें मेहन-तीनें काम करूं द्या. " असो. महाराणींच्या बरोबर एक मराठा जातीची स्वैंपाकीण असते. तिचें घर बडोद्याला कोडयांच्या घराशेजारीं असल्यामुळें त्यांची तिची चांगली ओळख आहे. ती उद्यां आम्हां दोघांना हॉटेल एस्प्लनेडमध्यें मराठी जेवण करून घालणार आहे. जेवल्यानंतर लिहीनच.

सध्यां काम बरेंच असल्यामुळें टेनिस खेळावयाला वेळ मिळत नाहीं. फक्त शनिवार-रविवारच खेळतां येतें. रविवारीं बहुतेक दुसऱ्या एखाद्या क्लबशीं सामने होतात. आमच्या क्लबच्या बाजूनें खेळणाऱ्या मंडळींपैकीं मी बहुतेक एक असतों.

आम्ही बोटॅनी या नवीन विषयाचा अभ्यास करूं लागल्याचें पूर्वीं लिहिलेंच असेल. आमच्या इन्स्टिट्यूटच्या शेजारींच बोटॅनीची बाग आहे. तेव्हां तेथें जाणेंही सोईस्कर पडतें. बोटॅनी या विषयाची आम्हांला जरूर माहिती असायला पाहिजे.

इंग्रजी तारखेप्रमाणें आज माझा वाढदिवस. आज मला चोवीस वर्षें पुरीं झालीं. या देशांत वाढदिवसाचें फारच माहात्म्य असतें. ओळखीच्या मंडळींकडून अभिनंदनें भेटी वगैरे मिळाल्या.

ता. ६ मे १९२३

आज दुपारीं ठरल्याप्रमाणें जेवणाकरितां हॉटेल एस्प्लनेडमध्यें गेलों

होतों. खालीं लोकांच्या बसण्याच्या मोठ्या हॉलमध्यें कोर्डे यांची वाट पहात बसलों होतों. इतक्यांत वरून राणीसाहेब, डॉ. मोडक, मणिलाल नानावटी वगैरे मंडळी येऊन जेवणाच्या हॉलमधें जाऊं लागली. मी उठून उभा राहिलों. मला मासाहेब म्हणाल्या, "तुमच्या करतां वर कोंडुबाईनें खाटी डाळ वगैरे केली आहे ती खा. आम्हांला तर कांहीं नको आहे. पण थोडी मणिलालकरतां ठेवायला सांगा." असो. लवकरच कोर्डे आले व आम्ही वर कोंडुबाईच्या खोलींत जेवायला गेलों. बेत असा होताः–भात, घडीच्या पोळ्या, खाटी डाळ, कॉलिफ्लॉवरची भाजी, कांद्याचीं भजीं, करंजी व कोंबडी. जेवण खूप मसालेदार व तिखट होतें. खाटी डाळीला इतका कांहीं खमंग मसालेदार वास येत होता कीं, मला ती अतिशय आवडली. अशी हिंदुस्थानांतसुद्धां क्वचित्च खाल्ली असेल. बाकी बरेच दिवसांनीं मराठी जेवण मिळाल्यामुळें तसें वाटत असेल. मराठ्यांचा स्वयंपाक बाकी चांगलाच असतो. असो. जेवण झाल्यावर तासानें चहा घेतला. मग राणीसाहेबांनीं पुन्हा आपल्या खोलींत बोलावलें. तेथें त्यांची सून शकुंतला राजे व एक म्हाताऱ्या मानकरीणबाई (माने) होत्या. माझी त्यांची कांहीं ओळख नव्हती, पण त्या म्हणाल्या तुम्ही त्यांना चांगले ओळखतां. असो. थोडेंसें बोलणें झाल्यावर मग आम्ही तेथून गेलों. नंतर ऑफिसरूममध्यें फणसळकर व डॉ. मोडक भेटले. तेथें एक तासभर बसलों. परवांच्या दिवशीं डॉ. मोडकांना कांहीं सामान घेऊन द्यायला त्यांच्याबरोबर जायचें आहे व संध्याकाळीं त्यांनीं जेवायला बोलावलें आहे.

असो. आज सबंध दिवस हॉटेल एस्प्लनाडमधेंच मोडला. किती तरी मंडळी महाराजांच्या व राणीसाहेबांच्या तैनातीला असतात. त्यांपैकीं कांहीं चांगल्या विद्वान मंडळींचा वेळ व शक्ति कशी फुकट जात असते याबद्दल वाईट वाटतें. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र १३४ वें बर्लिन,

ता. १७-६-१९२३

ती. नानांस शिरसाष्टांग नमस्कार, वि. वि. गेल्या आठवड्यास तुमच्याकडून कांहीं एक पत्र नाहीं. काजूच्या बियांचें व पापडांचें मिळून एक पार्सल व करंजाच्या बियांचें दुसरें एक पार्सल अशीं दोन मात्र पोंचलीं. मुंबईहून रा. वीरकर यांचें चार डझन आंबे पाठवल्याबद्दल पत्र आलें आहे. आंबे कॉक्स अँड को० कडून पाठवले असून ते प्रथम विलायतेस जाऊन नंतर येथें येतील असें कळतें. शिवाय येथ आल्यावरही कदाचित् कांहीं वेळपर्यंत ते येथल्या जकातीच्या ठिकाणीं पडून राहतील. तेव्हां ते मला चांगल्या स्थितींत मिळतील कीं नाहीं याची शंकाच वाटते. पाहूं या काय होतें तें. आम्हां सर्वांना फारच उत्सुकता लागून राहिली आहे. बाकी चार डझन इतके पाठवण्याची कांहीं जरूर नव्हती. उगीच आपले नमुन्याला येथें दाखवण्यापुरते पाहिजे होते. चार डझनाला खर्चही चापून आला असेल! वीरकर आपल्या पत्रांत लिहितात कीं, ' फणसाचीं साटें मिळाल्याबरोबर पाठवून देतों.' यासंबंधीं मी पूर्वीं लिहिलेंच आहे. मला स्वतःला साटें फारशीं आवडत नाहींत, शिवाय येथें दुसरे कोणी वाटेकरीही त्याला मिळत नाहींत. त्यामुळें तीं फुकट जाण्याचा संभव आहे. सबब अद्यापपर्यंत पाठवलीं नसल्यास यापुढें न पाठवायला सांगावें.

गेल्या आठवडयास तुमच्या पत्रांत मॅट्रिकचा निकाल कळायचा होता. माझ्याकडे ज्ञानप्रकाश आला त्यांत सर्व परीक्षांचे निकाल होते. त्यांत फक्त श्रीनिवासचें नांव मला सांपडलें. श्रीधरचें सापडलें नाहीं, त्यावरुन तो नापास झाला असावा असें वाटतें. नक्की तुमच्या पुढच्या पत्रांत कळेलच.

हल्लीं हवा अगदीं चमत्कारिक असते. पाऊस सारखा पडतो. उन्ह कधीं नसतें. त्यामुळें उन्हाळ्याची सर्व मजा गेली आहे. आमच्या टेनिसक्लबमधली मंडळीसुद्धां ओरड करीत असतात. आज बरेच दिवसांत पावसाळ्यामुळें कोणाला खेळायलाच मिळालें नाहीं. परवांपासून टूर्नमेंट्स् सुरू आहेत. मीं नांव दिलें आहे. बाकी यंदां फारसा न खेळल्यामुळें मी पुढें येईन असें

वाटत नाहीं. शिवाय असाच जर सारखा पाऊस पडत राहिला तर खेळतांच येणार नाहीं.

मी कालच वजन केलें, ५८॥ किलोग्रॅम (129 lbs.) आहे. (किलोग्राम = २·२ पौंड) जवळ जवळ आहे तितकेंच आहे. एखादा पौंड वाढलें म्हणायचें. हल्लीं मी दूध जरा जास्त म्हणजे १ लिटर घेतों. आधींच गाईचें दूध, त्यांतून भेसळ असतें, त्यामुळें तें अगदींच पाणचट लागतें.

सध्यां मार्कांचा भाव पौंडास पांच सव्वापांच लाख आहे. कोठल्याही दुकानांत आतां ठरीव किंमती ठेवण्याची सोयच उरली नाहीं. कारण दररोज मार्क भराभर पडत आहे. जर्मन मजूर, कामकरी लोक व व्यापारी यांचें मुळींच नुकसान नाहीं. कारण त्यांना त्या प्रमाणांत मार्क जास्त मिळतात. पण ठरीव पगार मिळणारे कारकून वगैरे लोक व पूर्वींच्या पैशांच्या व्याजावर राहणारे म्हातारे लोक यांचे मात्र हाल आहेत. देशांत गरिबी अतिशय वाढली आहे. याचा परिणाम नीतीवर सुद्धां फार होतो. कारण पुष्कळशा मुली पैशाकरितां परदेशी लोकांबरोबर हिंडतांना रस्त्यानें आढळतात; आणि यांची संख्या या दरिद्रतेबरोबर वाढत असावी असें वाटतें. गरिबीमुळें कदाचित् लुटालूट, दंगे वगैरे होण्याचा संभव आहे. लढाई होणार अशाही बातम्या ऐकूं येतात, पण सध्यां या देशांत तरी लढाईला कोणाच्या अंगांत जोर उरलेला नाहीं. रूर प्रांतांतला फ्रेंचांचा धुडगूस दिवसेंदिवस वाढतच आहे. अशी ही डळमळीत स्थिति आणखी किती वेळ टिकणार हा प्रश्नच आहे. इतर राष्ट्रांच्या मध्यस्थीची हे लोक केंवीलपणें वाट पहात आहेत.

गेल्या पत्रांत माझी उंची मी श्रीनिवासला कळविली आहे ती बुटाशिवाय, पायांत नुसते मोजे घालून आहे असें त्यास सांगावें. त्याला एक पत्र या पत्रासोबत लिहीत आहें तें द्यावें. आतां तो सांगलीला वुइलिंग्डन कॉलेजला गेला असेल. त्याच्या शिक्षणाचा प्रश्न कठिण आहे खरा. विशेषतः सायन्सची गोडी नसल्यास आपल्याकडील युनिव्हर्सिटींतल्या शिक्षणांत फारसा अर्थ नसतो. सायन्स हा विषय म्हणजे थोडासा Solid असल्यामुळें आपल्याकडे कांहीं तरी शिकतां येतें. शिवाय पुढें शिक्षण संपल्यावर काय करावयाचें हा प्रश्न आहेच. कॉमर्सची जर त्याला आवड असेल तर त्यानें

मुंबईच्या कॉमर्स कॉलेजचा कोर्स घ्यावा हेंच उत्तम असें मला वाटतें. बाकी मुंबईंत राहणें हें चांगलें नाहीं. त्यानें शरीरस्वास्थाची हानि तर होतेच, पण शिवाय नेहमीं गजबजलेल्या व कोंदट अशा शहरांत राहिल्यामुळें त्याचा मनावर व विचारांवरही वाईट परिणाम होऊन शारीरिक व मानसिक वाढ खुंटत असावी असें मला वाटतें. कॉलेजच्या कोर्समध्यें प्रत्यक्ष रोजच्या वर्गांत जें शिकविलें जातें तेवढेंच शिक्षण असें नसून, एकंदर आपल्या विचारांची वाढ होऊन व मनाचें पोषण होऊन आपल्या देशाच्या सामाजिक, नैतिक व राजकीय स्थितीचाही आपण न कळत अभ्यास करीत असतों. त्या दृष्टीनें आपल्याकडचें कॉलेजचें शिक्षण मला हितकर वाटतें. बाकी पुढील बेत नक्की नसतां उगीच कॉलेजमध्यें शिकत राहिलेंच पाहिजे असें माझें म्हणणें नाहीं. आतांपासूनच व्यावहारिक (practical) कामांत पडून एका दृष्टीनें अनुभव मिळविण्याची त्याची इच्छा असल्यास तसें केल्यासही हरकत नाहीं. हा बराचसा आवडीचा प्रश्न आहे. व्यापाराची आवड असल्यास तो विषय अगदीं मुळापासून चांगला शिकून त्यावर प्रभुत्व मिळवून पुढें उत्तमपैकीं व्यापारी झाला तर सर्वांत चांगलें.

शंभुराव जांभेकर अद्याप येथेंच आहेत. केव्हां केव्हां मला भेटतात. ते लवकरच अमेरिकेला जाणार आहेत असें म्हणत होते. त्यांनीं येथें राहून बरीच खरेदी केली व पुष्कळ फायदा मिळविला.

डॉ. भाजेकर इतक्यांत येथें येणार आहेत असें ऐकतों. तेव्हां आंबे पार्सलनें न पाठवतां त्यांच्याबरोबर पाठविल्यास बरें झालें असतें असें वाटतें. बाकी उगीच त्यांना त्रास दिल्यासारखें झालें असतें हेंही खरें. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र १३५ वें   बर्लिन,

ता. २४-६-२३

ती. सौ. माईस शिरसाष्टांग नमस्कार, वि. वि. तुमचीं ता. २५-५चीं व ता. २९-५ चीं अशीं दोन्ही पत्रें येथें गेल्या आठवड्यास मला मिळालीं. त्यावरून २५ ता. चें पत्र उशीरां पोस्टांत पडल्यामुळें मला गेल्या आठवड्यास मिळालें नाहीं असें दिसतें. असो.

तुम्हीं आंबे पाठविण्यासंबंधीं जो भयंकर खर्च केला तें योग्य झालें नाहीं. मीं उगीच नमुन्यादाखल २,४ आंबे पाठविण्यास सांगितले होते आणि ते नसते पाठवले तरीही कांहीं हरकत नव्हती. ऐशीं नव्वद रु. इतका खर्च म्हणजे अपव्यय आहे असें मला वाटतें. येवढ्या पैशांत उपयोगाच्या इतर पुष्कळ गोष्टी विकत घेतां आल्या असत्या. शिवाय ते आंबे चांगल्या स्थितींत आले तर इतक्या खर्चाचें आणि श्रमाचें चीज. तुमच्या पत्रांवरून आंबे पाठवून कमींत कमी महिना होऊन गेला. दोन चार दिवसांपूर्वी मला लंडनहून एक कार्ड आलें कीं, आंब्यांची पेटी हांबुर्गला पाठवली आहे. आतां तेथून येथें यायला आणखी किती दिवस लागणार आहेत कोण जाणे ! माझ्या मतें हा व्यर्थ खर्च झाला. असो. पुढें अशा खर्चानें कोणत्याही जिनसा मीं सांगितल्याशिवाय पाठवूं नयेत.

मोहाचे नारळ, साटें वगैरेही पाठविण्याची जरूर नाहीं. तूर्त कांहीं एक पाठवूं नये असें माझें मत आहे. नानांकरतां नखांची कात्री लवकरच घेऊन पाठवितों.

सध्यां आमचीं टेनिस टूर्नमेंट्स् चालू आहेत, त्यांच्या गडबडींत मी असतों. इतके चांगले चांगले खेळणारे लोक आले आहेत कीं, आम्हांला रोज वेगवेगळे गमतीदार सामने पहावयाला मिळतात.

Agricultural ledger मला मिळाला नाहीं. पण नानांच्या एका पत्रांत तेलांच्या बोटॅनिकल नांवांची यादी होती ती मिळाली. कळावें हे विज्ञापना.

अखेर आंब्यांचें पार्सल आल्याची खबर मला स्टेशनवरून आली. त्याप्रमाणें जकात ऑफिसांत गेलों. किरकोळ खर्चाबद्दल पैसे भरून पेटी घेतली.

उघडून पाहतां तों एका कोपऱ्यांत कोया तेवढ्या होत्या. सर्व कुजून गेले. असो. झालें त्यास इलाज नाहीं. ता. १४-७-१९२३.

श्यामकान्त.

श्री

पत्र १३६ वें

हांबुर्ग,

ता. २३-८-२३

तीर्थरूप सौभाग्यवती माईस शिरसाष्टांग नमस्कार, वि. वि. मी प्रवासांत असल्यामुळें गेल्या दोन आठवड्यांचीं तुमचीं पत्रें मला मिळालीं नाहींत, तीं बर्लिनला गेल्यावर मिळतील.

येथें आल्यानंतर विशेष गोष्ट केली म्हणजे येथले प्रसिद्ध टेनिसचे सामने पाहिले. वेगळ्या वेगळ्या देशांचे प्रसिद्ध खेळाडू आले होते. कांहीं सुंदर खेळणाऱ्या बायका सुद्धां होत्या. काल टूर्नमेंट संपलें. काल सकाळीं आम्हीं ओम्निबसमधून गांवांत २ तासांचा चक्कर घेतला. त्या वेळचा फोटो सोबत पाठवीत आहें. त्यांत एका ओळींत आम्ही तिघे-मी, आगटे व पूर्वी बडोद्याला कॉलेजांत प्रोफेसर असलेले भागवत,—हे सध्यां मँचेस्टरहून प्रवासास येथें आलेले आहेत,-असे आहोंत. नंतर एक तासाचा चक्कर आगबोटीनें बंदरांत घेतला व मोठमोठ्या बोटी व गोद्या पाहिल्या.

येथें आम्ही पंड्या म्हणून एक गुजराथी व्यापारी आहेत त्यांच्या घरीं उतरलों आहों. ते फार सज्जन आहेत. त्यांची आम्हांला फार मदत झाली. मजजवळ येथें पुरेसे पैसे नव्हते तेही त्यांनीं दिले. नंतर पैसे मोडण्याच्या बाबतींत हल्लीं फारच त्रास पडतो,-कारण जर्मन पैसा कोणत्याही बँकेजवळ पुरेसा नाहीं,-त्या बाबतींतही त्यांची मदत होते. येथें डॉ. सबनीस म्हणून बरींच वर्षें इंग्लंडला असलेले एक डॉक्टर आहेत, ते लवकरच हिंदुस्थानास परत जाणार आहेत. ते, पंड्या, आगटे व मी असे आम्ही एकत्र असतों. काल रात्रीं आम्ही सर्वजण नाचायला गेलों होतों. फार मजा आली.

उद्यां सकाळीं ८ वाजतां बोटीनें निघून आम्ही 'नॉर्डनॉय'ला उत्तर समुद्राच्या कांठीं जाणार आहोंत. तेथें २ दिवस राहून मग बर्लिनला जाऊं. तेथली हकीकत बर्लिनला गेल्यावर लिहीन. कोर्डे काल बर्लिनला परत गेले व आतां ते आमच्या बरोबर नाहींत. माझी प्रकृति चांगली असून मी खुषींत आहें. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र १३७ वें बर्लिन,

ता. २८ ऑगस्ट १९२३

तीर्थरूप नानांस शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना विशेष. हें पत्र पोष्टांत पडण्यास अजून जवळजवळ एक आठवडा आहे. पण मागाहून घाई होते व सध्यां वेळ आहे म्हणून आतांपासूनच लिहायला घेतलें आहे.

आमची उत्तर समुद्राची सफर संपवून काल सकाळीं येथें आलों. येतांना वाटेंत ब्रेमेन शहरीं पांचसहा तास होतों व तेथें ओमनिबसनें गांवांत एक चक्कर मारून पाहण्यालायक सर्व पाहिलें. तेथें रात्रीं तेथल्या 'राट हाउस'(= Town-Hall)च्या तळघरांत जेवलों व नंतर सोळासतराव्या शतकापासून त्या तळघरांत जपून ठेवलेलीं दारूचीं पिपें पाहिलीं.

आतां जिकडे तिकडे जर्मनींत एकंदर सर्व बाबतींचे खर्च सोन्याच्या मार्कांत मोजण्याबद्दल चळवळ चालली आहे. याचा अर्थ असा कीं, मार्काच्या चढउताराबरोबर त्याच्या किंमतींत होणाऱ्या फरकानुसार पदार्थांच्या किंमती न ठरवतां, लढाईपूर्वीं मार्क जेव्हां चांगल्या स्थितींत होता, तेव्हांच्या किंमतींनुसार, अर्थात् गोल्डमार्कमधें किंमती ठरवल्या जाणार. उदाहरणार्थ, मी आज एका टेनिस बॅटची किंमत विचारायला गेलों, तेव्हां त्याची किंमत चोवीस गोल्ड मार्क अशी मला सांगितली. अर्थात् विकत घेण्याच्या दिवशीं एका गोल्ड मार्कचा जो भाव असेल त्या भावाप्रमाणें कागदी मार्क घेतले जाणार. सध्यां एका गोल्ड मार्कची किंमत–म्हणजे एका इंग्रजी शिलिंगाची किंमत–

कारण एक गोल्ड मार्क पूर्वी एक शिलिंगाइतका असे—जवळजवळ पंधरा लाख कागदी मार्क आहे. सध्यां दुकानांत सर्व पदार्थांच्या किंमती सोन्याच्या मार्कांत किंवा डॉलर्समध्यें लिहिलेल्या असतात. रोजच्या भावाप्रमाणें कागदी मार्कांचा हिशेब करण्याकरतां एक प्रमाण (इंडेक्स) ठरवलेलें असतें व या इंडेक्सनें गोल्ड मार्कांना गुणलें म्हणजे त्या दिवशींच्या कागदी मार्कांतली किंमत झाली. म्हणजे गोल्ड मार्कांतल्या किंमती साधारणपणें कायम राहून इंडेक्स मात्र कागदी मार्कांच्या दराप्रमाणें बदलत जाईल. याचा अर्थ असा कीं, मार्कांच्या भावामुळें आम्हांला येथें जी इतके दिवस स्वस्ताई भासत होती ती आतां बंद झाली. आतां येत्या पहिल्या तारखेपासून आगगाडीचीं भाडीं व पोष्टाचे दरसुद्धां गोल्ड मार्कच्या हिशेबानेंच घेतले जाणार आहेत. येत्या महिन्याच्या टपालाच्या दराप्रमाणें या पत्राला दोन लाख मार्कांचें तिकिट लावावें लागणार. याचप्रमाणें मजुरांचे, नोकरांचे व ऑफिसरांचे पगार देखील सोन्याच्या मार्कांच्या हिशेबानें दिले जाणार. सध्यां एकदम किंमती इतक्या वाढल्या आहेत कीं, पुष्कळशा पदार्थांना इतर देशांतल्यापेक्षां येथें जास्त किंमत पडते. सध्यां एखादा सूट विकत घ्यावयाचा झाल्यास तो येथल्यापेक्षां इंग्लंड-मध्यें स्वस्त पडतो. लोण्याची किंमत येथल्या इतकी सध्यां कोणत्याही देशांत नसेल. स्ट्रेझेमान (Stresseman) हे नवीन मंत्री आले आहेत. यांच्या कारकीर्दीत आतां येथल्या आर्थिक व त्याबरोबरच राजकीय स्थितींत बऱ्याच घडामोडी होतील असा अंदाज आहे. आतांपर्यंतचे जर्मन मंत्री फारसे जोरदार नव्हते, पण तेसुद्धां बराचसा कारभार स्ट्रेझेमानच्या तंत्रानेंच चालवीत असत. कारण यांचें त्यांच्यावर नेहमीं वजन असे. आतां ते स्वतः मंत्री झाले आहेत. तेव्हां काय काय घडामोडी होतात पाहाव्या. ‘ राइश बँक ’ म्हणून बँक ऑफ इंग्लंडप्रमाणें जर्मन राष्ट्राची बँक आहे. तिच्यांत सुद्धां आतां घडामोडी होतील. मार्कांच्या भावाच्या घडामोडींत या बँकेचेंच मुख्यत्वेंकरून अंग असे. आतां तिचे प्रेसिडेंट हाव्हेनस्टाइन—लिहिल्याप्रमाणेंच या नांवाचा उच्चार करतात—यांना बहुतेक आपली जागा सोडावी लागेल. त्यासंबंधीं ‘ राइश्‌स्‌टाग ’ म्हणजे येथल्या पार्लमेंटमध्यें वाटाघाट होणार आहे. हाव्हेनस्टाइन गेले म्हणजे अर्थात् बँकेचें धोरणही बदलणार. असे कांहीं प्रकार येथें चालू आहेत.

ता. २९ ऑगस्ट १९२३

आज सकाळीं तुमचीं ता. १०-८ चीं पत्रें पोंचलीं. भाऊंचें व आबांचेंही मुंबईहून पत्र आलें व सोबत पौं. ९।३।९ चा चेक आहे तोही मिळाला. भाऊंच्या मनाजोग्या वस्तू त्यांना मिळाल्या व थोड्या स्वस्तही पडल्या हें कळून समाधान वाटलें. त्यांनीं मागितलेल्या Cataract knife चा तपास लवकर करीन. सध्यां मला सुट्टी असल्यामुळें वेळही आहे.

हल्लीं माझा दिवस वाचण्यांत व टेनिस खेळण्यांत जातो. संध्याकाळीं पांच वाजल्यापासून तों आठपर्यंत टेनिस खेळतों. फार मजा वाटते. सध्यां आमच्या क्लबांतल्या मेंबरांचे खेळण्यामध्यें नंबर लावण्याकरतां रोज सामने चालत असतात. मला पहिला नंबर येण्याची मोठी उमेद आहे आणि आशाही आहे.

काल संध्याकाळीं बरेच दिवसांनीं हिंदी चहा करून प्यालों. फारच मजा वाटली. येथें मी चहा कधीं पीत नाहीं. कारण जर्मन चहा इतका गचाळ असतो कीं, तो बिलकुल पिववत नाहीं. एखादे वेळीं मात्र मजजवळ असलेल्या पैकीं हिंदी चहा शक्य झाल्यास क्रीम घालून पितों. मग तो इतका आवडतो कीं कांहीं विचारूं नका. मग अंगांत तरतरी येते.

गुरुवार ता. ३० ऑगस्ट १९२३

या महिन्याला मॉडर्न रिव्ह्यू न आल्यामुळें बरीच निराशा झाली. मी येथें आलों तेव्हां मॉडर्न रिव्ह्यू ऑफिसचें एक कार्ड येऊन पडलें होतें कीं, " जुलै महिन्यापर्यंत तुम्ही भरलेली वर्गणी संपली असून, पुढच्या वर्षाची १५ शिलिंग पाठवा !" तेव्हां पुढच्या वर्षाची वर्गणी भरून जमल्यास मला पुन्हा ऑगस्ट महिन्यापासूनचे अंक पाठवण्याची व्यवस्था करावी. मला वाटतें तुम्हीं तेथें वर्गणी भरली म्हणजे कदाचित् १५ शिलिंग न भरतां हिंदुस्थानांतल्याच वर्गणीनें काम भागेल. नाहीं तर मला तुमचा वाचलेला अंक पाठवला तरी चालेल.

आज संध्याकाळीं ' आल्ट हायडेलबर्ग ' या नाटकाला गेलों होतों. मजेदार वाटलें. आतां भाषा समजण्याविषयीं बिलकूलच पंचाईत पडत नाहीं.

सोबत भाऊंना पत्र लिहिलें आहे तें त्यांना पाठवण्याची व्यवस्था करावी. हें पत्र खरें म्हटलें असतां सोमवार ता. ३ सप्टेंबरला पोस्टांत पडायचें. पण

पहिल्या तारखेपासून पोस्टाचे दर चौपट वाढणार असल्यामुळें उद्यांच हें पत्र पोस्टांत टाकीन.

माईंनीं विचारलें आहे, मी कधीं गातों कीं नाहीं? खोलींत असलों म्हणजे मी नेहमीं गातों. मात्र मोठ्यानें नाहीं. एखाद्या हिंदी मित्राकडे चहाला वगैरे गेलों म्हणजे मात्र मोठ्यानें म्हणण्याचा प्रसंग येतो. परवां प्रवासांत-सुद्धां संध्याकाळीं खोलींत बसून गाऊन मी पुष्कळदां माझें स्वतःचें व माझ्या मित्रांचें मनोरंजन करीत असें. मात्र या देशचा एखादा मनुष्य ऐकायला आला म्हणजे म्हणावेंसें वाटत नाहीं; कारण त्यानें जरी कितीही वाहवा केली, तरी त्याला आपलें गाणें आवडणें शक्य नाहीं ही माझी खात्री आहे.

आतां आज येथेंच पुरें करतों. माझी तब्येत उत्तम. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र १३८ वें

बर्लिन,

ता. ७ सप्टेंबर १९२३

ती. नानांस शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना.

रेवड्या व पोह्याचें पार्सल काल रॉय चहाला आला असतांना फोडलें. त्यांतले पदार्थ आम्हांला फार आवडले. डॉ. मित्र मजजवळ लोणचें (आंब्याचें) मागत होते. मलाही खायची इच्छा झाली होती. पण मजजवळ नव्हतें.

शंभुराव हिंदुस्थानास परत जाणें लांबणीवर टाकणार आहेत असें दिसतें. त्यांचे नक्की बेत अद्याप मला कळले नाहींत. येथें येऊन आतां ते बरेच युरोपियनासारखे झाले आहेत असें दिसतें. बाहेर फिरून लोकांशीं बोलणें व प्रवास या गोष्टींमुळें येथली परिस्थिति त्यांच्या सारख्यांच्या बाबतींत लवकर अंगवळणीं पडूं लागते.

गेल्या पत्रांत आबांनीं काइसर बादशहासंबंधीं येथल्या लोकांचें मत विचारलें आहे. त्यांच्याविषयीं फारसें चांगलें मत किंवा तो गेल्यामुळें वाईट

वाटणें वगैरे येथल्या लोकांत मुळींच नाहीं. तो राजपदावर असतांना राजा या नात्यानें त्याला मान द्यावाच लागत असे. पण तो पुन्हा परत यावा अशी कोणाचीच इच्छा नाहीं. त्यांतल्या त्यांत सध्यांच्या उतार वयांत त्यानें हॉलंड-मध्यें पुन्हा लग्न केलें ही गोष्ट पुष्कळांना पसंत नाहीं. देशाच्या नुकसानीची पर्वा न बाळगून स्वतः चैन करीत आहे असेंही पुष्कळांना वाटतें. राजपुत्र, जो सध्यां येथें जर्मनींत आहे तो, लोकांना जरा जास्त आवडत असावा असें वाटतें. शिवाय येथले यहुदी लोक आहेत त्यांना तर राजाविषयीं फारसा आदर व प्रेम असणेंच शक्य नाहीं. एक तर त्यांना राष्ट्रीय भावनाच नसते व शिवाय राजापासून तों मजुरापर्यंत सगळेच त्यांचा द्वेष करीत व छळीत असतात. यहुदी लोकांत बरेच दोष आहेत ही गोष्ट खरी आहे, पण त्याच्या उलट त्यांच्या विरुद्ध द्वेष फारच अविचारीपणाचा व अत्यंत कळसाला नेऊन पोंचवलेला आहे. त्यांच्या नाकावरून व केसांच्या रंगावरून ते केव्हांही ओळखूं येतात. असो. आज येथेंच पुरें करतों. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र १३९ वें

बर्लिन,

रविवार ता. २१-१०-१९२३

तीर्थरूप नानांस शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना विशेष. तुमचीं या आठवड्याचीं पत्रें पोंचलीं. ज्योतिषचंद्ररायची आई भेटली वगैरे हकीकत वाचून आनंद वाटला. मात्र माई व त्या हिंदी कशा बोलल्या असतील याची कल्पना करवत नाहीं. मी ऐकायला तेथें पाहिजे होतों. राय सध्यां येथेंच बर्लिनमध्यें आहे व मला रोज भेटतो. आज तो व मी एका नाटकाला जात आहों.

काल रात्रीं येथें हिंदी लोकांची सभा झाली. हालदार म्हणून एका गृहस्थानें ॲटहोम दिलें. हिंदी जिन्नस केले होते. पुऱ्या, बटाटे व कॉलीफ्लॉवरचा रस्सा, मोहनभोग व चहा असा बेत होता. पदार्थ हिंदुस्थानांतल्या-

सारखे चांगले झाले होते. फारच चांगले लागले. त्याला लागणारा सर्व मसाला येथेंच दुकानांत विकत घेतला होता. प्रोफेसर सरकार व त्यांची बायको हे दोघे आले होते. सरकारशीं बोलतांना सहज मी तुम्ही कळविलेल्या टाइम्समधल्या त्यांच्याविरुद्ध लिहिलेल्या लेखाविषयीं बोललों. तो लेख जर तुमच्याजवळ असेल किंवा तुम्हांला मिळवतां येईल तर त्यांना पाहिजे आहे.

मागें लाइप्झिगच्या व्यापारी प्रदर्शनांत तेलाच्या यंत्राच्या एका कारखानदाराशीं आमची ओळख झाल्याबद्दल लिहिलेंच होत. त्यांच्याशीं आमचा बरेच दिवस पत्रव्यवहार चालू होता. आमची मशीनरी घ्याल तर तुम्हांला कारखान्यांत काम शिकवतों असें वचनही त्यांनीं दिलें होतें. त्यांनीं जर्मनीमध्यें व हॉलंडमध्यें बरेचसे हायड्रोजनेशनचे (Hardening of Oils) कारखाने आपल्या यंत्रांनीं सुरू करून दिले आहेत. दक्षिण जर्मनींतला एक Hardening चा कारखाना–जो अर्थात् त्यांनींच प्रथम चालवून दिला,–पहाण्याची व्यवस्था त्यांनीं नुकतीच करून दिली व पुढेंमागें हिंदुस्थानच्या व्यापारांत आमची त्यांना मदत होईल अशी आशाही व्यक्त केली. मात्र अद्यापपर्यंत आम्हीं कोणतीही मशीनरी खरेदी केली नसल्यामुळें जाण्यायेण्याचा वगैरे खर्च आमचा व त्यांच्या एंजिनियरचा आम्हांलाच द्यावा लागला. खर्च बराच आला. कारण प्रवास लांबचा होता. पण कारखाना फार छान पहायला मिळाला व त्यापासून आम्हांला फारच फायदा झाला. त्यांच्या एंजिनियरना आम्हीं–मी व कोर्डे–हानोव्हरला भेटलों व तेथून ते व आम्ही बरोबरच सेकंड क्लासनें हानाउला गेलों. सकाळीं दहा वाजतां निघालों ते संध्याकाळीं साडेचारला पोहोंचलों. दुपारचें जेवण वगैरे गाडींतच झाल. गाडींत Hydrogenation विषयीं त्यांच्याशीं आमचें पुष्कळ बोलणें व वादविवाद झाला. ते फारच अनुभवी असल्यामुळें आम्हांला पुष्कळ माहिती मिळाली. हानाउला तिथे आम्ही एका हॉटेलमध्यें उतरलों. संध्याकाळीं साडेसात वाजतां कारखान्याचे डायरेक्टर आम्हांला भेटायला आले आणि ते व आम्ही जेवायला गेलों. जेवण झाल्यावर लागलीच आम्ही सगळे कारखाना पहायला गेलों. तास दीडतास कारखाना चांगला पाहिल्यावर घरीं येऊन निजलों. दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठून जवळच अर्ध्या तासाच्या रस्त्यावर असलेल्या

फ्रॅंकफुर्टला गेलों. थोडेंसें शहर पाहिलें. दुपारीं तेथेंच जेवलों व संध्याकाळीं चारला परत हानाउला कारखान्यांत आलों. थोडासा भाग पहायचा राहिला होता तो पाहिला. Fish Oil पासून घट्ट (Hardened) तेल किंवा मेण तयार करतात. हें मेण ते साबूच्या कारखान्याला विकतात. शेजारीं असलेला दुसऱ्या एका कंपनीचा साबूचा कारखानाही आम्हीं पाहिला. नंतर रात्रीं आम्हीं कारखान्याच्या डिरेक्टरांना जेवायला बोलावलें. त्यांची आमची चांगली ओळख झाली व पुढेंमागें कोणत्याही तऱ्हेची मदत किंवा माहिती लागल्यास ते आम्हांला पुरविणार आहेत. मी त्यांना येथून मजजवळ असलेलें करंजाचें थोडेंसें तेल घट्ट करण्याकरतां पाठवलें आहे. तें घट्ट करून व त्याची घाण घालवून ते माझ्याकडे परत पाठविणार आहेत. नंतर त्याचा साबूला उपयोग करतां येईल. रात्रीं नऊ वाजतां आमच्या एंजिनियरनीं आमची रजा घेतली व ते ब्रेमेनला निघून गेले. आम्ही आणखी एक तासभर डायरेक्टरांबरोबर कॉफी पीत गप्पा मारीत बसलों व मग ते आम्हांला पोंचवायला स्टेशनवर आले होते. दुसऱ्या दिवशीं सकाळीं येथें येऊन पोहोंचलों. आम्हांला खर्च साधारण पंचवीस तीस रुपये आला. पण Hydrogenationची पुष्कळ बारीक सारीक माहिती मिळाली व बरेच दिवस मनांत असल्याप्रमाणें कारखाना पहायला मिळाला. या बाबतींत यासोबत आबांना एक पत्र लिहीत आहें तें त्यांना पोंचवावें.

उद्यां आमच्या सुटीचा शेवटचा दिवस. आमच्या खाजगी लॅबोरेटरींतलें कांचेचें सामान आमच्या इन्स्टिट्यूटमध्यें आणून टाकणार आहों. उद्यां प्रो. सरकारांनीं चहाला बोलाविलें आहे. येत्या बुधवारीं Calcutta University Science Collegeचे एक प्रो. सेन येथें आहेत, त्यांनीं मला जेवायला बोलावलें आहे. त्यांच्यापासून मला पुष्कळ गोष्टींची माहिती मिळेल.

आतां एका पौंडाची किंमत जवळ जवळ १०० अब्ज म्हणजे एक निखर्व मार्क आहे. जिकडे तिकडे हाहाःकार उडाला आहे. दारिद्र्य वाढत आहे. लोकांनीं गडबड करण्याचा थोडासा प्रयत्न केला, पण सरकार आपल्या मिलिटरीनें लोकांना चांगलेंच दाबांत ठेवीत आहे. तेव्हां आतांपर्यंत जिकडे तिकडे शांतता आहे. आतां अलीकडे घाटत असलेलें नवीन नाणें बाहेर पडल्यास

व्यवहार सुरळीत चालूं लागेल असें वाटतें. देश अगदींच मोडकळीस आला आहे. लोकांत एकी मुळींच नाहीं. बव्हेरिया प्रांत जर्मन राज्यापासून वेगळा होऊं पहात आहे. ख्रिस्ती लोकांना यहुदी लोक पहावत नाहींत, तेव्हां ती एक चुरसच आहे. जे परदेशी लोक येथल्या स्वस्ताईमुळें चैन करण्याकरतां येथें आले होते ते नाहींसे झाले. कारण येथली महागाई फारच वाढली. पुढें काय होणार हा प्रश्नच आहे. मी शक्य ती काळजी घेत आहें.

पाऊस पडत आहे. थोडी उष्णता पडली आहे. उद्यां इन्स्टिटयूट उघडणार. डॉलरची किंमत आज चाळीस अब्जांवर आहे. काल सतरा होती. जर्मन लोकांची उपासमार होत आहे. आम्हांला अद्याप कोणतीही भीति किंवा काळजी नाहीं. तसें वाटल्यास हा देश सोडून फ्रान्सलाही जातां येईल. माझा पासपोर्ट मला लवकरच रिन्यू करून घेतला पाहिजे. सत्तावीस नोव्हेंबरला दोन वर्षें पुरीं होतात. येत्या शनिवारीं आम्ही हिंदी विद्यार्थी आमच्या प्रोफेसरांना At home देणार आहों. त्याची माहिती पुढच्या पत्रांत लिहीनच. आमचे प्रोफेसर टॉम्स येथें नाहींत म्हणून वाईट वाटतें. आम्ही त्यांच्या हाताखालच्या दुसऱ्या प्रोफेसरांना आमंत्रण देणार आहों. आज लिहायला वेळ नाहीं. लिहिण्याचाही कंटाळा आला आहे. माझी तब्येत चांगली आहे. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र १४० वें बर्लिन,

रविवार ता. २८-१०-२३

ती. नानांस शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना विशेष. याच आठवडयास भाऊंना पाठवलेलें सामान पोंचल्याविषयींचें पत्र यायला पाहिजे होतें. कदाचित् येत्या आठवडयास येईल. मागच्या पत्रांत लिहिल्याप्रमाणें मॉडर्न रिव्ह्यू पुन्हां पाठवण्याची व्यवस्था तुम्हीं इतक्यांत केलीच असेल.

काल संध्याकाळीं येथें गवेषणा करीत असलेल्या आम्हीं हिंदी विद्या-

त्यांनीं आपआपल्या अध्यापकांना एडन हॉटेलमधें फराळाला बोलावलें होतें. बर्लिनमध्यें असलेले सर्व मोठमोठे प्रोफेसर आले होते. रिलेटिव्हिटि थिओरीचे आइन्स्टाइन, लाउब्रे, पोल्मर, पौर्वात्य साहित्याचे संशोधक मायर, फिलॉसफीचे अध्यापक श्मिट्, रासायनिक हेस्लोंग, रोझेनमुंड, झाबा, लिचका वगैरे वगैरे मंडळी एकंदर ६०।७० आली होती. आमचे प्रो. टॉम्स येथें नाहींत म्हणून आम्हांला फार वाईट वाटलें. चहा झाल्यावर आमचीं व नंतर जर्मन प्रोफेसरांचीं भाषणें झालीं. एकंदर समारंभ फार चांगला झाला व त्यामुळें आमच्या प्रोफेसरांचें व आमचें दळणवळणही जास्त होऊं लागलें. प्रो. विनयकुमार सरकार आपल्या पत्नीसह तेथें आले होते. त्यांचेंही भाषण झालें. ते दोघे आतां तब्येत सुधारण्याकरतां स्विट्झरलंडला जात आहेत. २।३ महिन्यांनीं परत येतील.

आमचे प्रोफेसर टॉम्स जपानहून परत यायला निघाले असें कळतें. वाटेवर हिंदुस्थानास जाण्याचा त्यांचा विचार होता. पण जर्मन म्हणून अद्याप त्यांना हिंदुस्थानास जाण्यास परवानगी मिळेल कीं नाहीं याबद्दल शंका होती. जर परवानगी मिळाली असेल तर ते एव्हांना हिंदुस्थानास गेलेही असतील व तुम्हीही कदाचित् भेटलां असाल. सर्व हकीकत कळण्याची फार इच्छा आहे.

माझें डॉक्टरेटचें काम केव्हां संपणार हें कळण्याची तुम्हांला फार इच्छा असेल. आम्हीं गेल्या टर्मला तेलाचें काम हातीं घेतलें ही आमच्या डॉक्टरेटच्या दृष्टीनें थोडीशी चूक झाली. कारण, एका टर्मनंतर तें काम सोडून द्यावें लागल्यामुळें ती टर्म एका अर्थी फुकट गेली. बाकी अनुभव मिळाला ही गोष्ट वेगळी. नवीन काम [फेनोल ईपारससंबंधीं] घेतल्याला अर्धी टर्म झाली. हें काम केव्हां आटोपेल हें अद्याप नक्की सांगतां येत नाहीं. कदाचित् या टर्म अखेरही संपेल किंवा कदाचित् आणखी एक वर्षही लागेल. पुष्कळदां या गोष्टी प्रसंगाप्रमाणें लवकर किंवा उशीरां आटपतात. I mean a matter of chance. कर्वेचें काम संपत आलें आहे असें ऐकतों. येथें कांहीं विद्यार्थी आहेत त्यांना आपल्या कामांत चांगलें यश अपेक्षिल्याप्रमाणें आल्यामुळें त्यांचें काम एक टर्ममध्येंसुद्धां आटपलेलें आहे, तर कांहींना दोनतीन वर्षेंही

लागलीं आहेत. तेव्हां आतां मला नक्की मुदत सांगतां येत नाहीं. आणखी एक-दोन महिन्यांनीं कदाचित् मी जास्त निश्चित सांगूं शकेन.

येथें कलकत्ता विश्वविद्यालयाच्या सायन्स कॉलेजचे अप्लाइड केमिस्टीचे प्रोफेसर सेन येथल्या कायझर–विल्हेम–इन्स्टिट्यूटमधें काम करीत आहेत. त्यांची माझी परवां हिंदुस्थान असोसिएशनच्या एका सभेंत ओळख झाली. त्यांनीं रंगूनच्या एका तेलाच्या कारखान्यांत काम केलें असून आपल्या लॅबोरेटरींत हायड्रोजनेशनवर बरेच प्रयोग केलेले आहेत व त्यांना बराच अनुभवही आहे. त्यांनीं मला गेल्या आठवड्यास आपल्या घरीं जेवायला बोलावलें होतें. त्यांचें माझें या तेलाच्या धंद्याविषयीं बरेंच बोलणें झालें. फ्रांकेच्या हायड्रोजनेशनच्या मशिनरीच्या कारखान्याविषयींही मीं त्यांना सांगितलें. फ्रांकेच्या मदतीनें नुकताच दक्षिण जर्मनींत एक कारखाना आम्हीं पाहिला. आतां हायड्रोजनेशनची वेगवेगळी मशिनरी पाहण्याकरितां एकदां ब्रेमेनला जावें अशी इच्छा प्रो. सेननीं व्यक्त केली. कदाचित् आपल्या कॉलेजकरतां लहानसहान यंत्रें ते विकत घेतील. तेव्हां त्याप्रमाणें मीं फ्रांकेना लिहिलें आहे व लवकरच आम्ही ब्रेमेनला फ्रांकेचा कारखाना पहायला जाऊं असें वाटतें. फ्रांकेच्या एंजिनिअरनीं नुकतेंच मला पत्र लिहून टाटा कंपनीचा पत्ता विचारला आहे. कारण कोचीनला टाटा हायड्रोजनेशन करणार आहेत असा त्यांना सुगावा लागला आहे. तेव्हां आपलीं यंत्रें खपविण्याची ते खटपट करीत आहेत. मी त्यांना 'नवसारी बिल्डिंग, फोर्ट, बाँबे' हा पत्ता दिला आहे. करंजाचें तेल मजजवळ थोडेंसें उरलें होतें तें मी हानाउच्या कारखानदारांना पाठवलें होतें. त्यांनीं तें हायड्रोजनेट करून त्याचे दोन नमुने आज माझ्याकडे पाठवले आहेत. तेलाचा वास अजीबात निघून गेला आहे. पण तें व्हावें तितकें घट्ट झालें नाहीं व काळें झालें आहे. या तेलावर आणखी प्रयोग करून पाहिले पाहिजेत व त्याकरितां आणखी पुष्कळ तेल पाहिजे असें वरील कारखानदाराचें म्हणणें आहे. पण सध्यां तिकडे लक्ष देण्याला मला फुरसत नाहीं.

मला शांतिनिकेतन पत्र सध्यां नियमित येतें. त्याचप्रमाणें मधून मधून शांतिनिकेतनहून वीरेश्वरबाबूंचीं पत्रें येतात. केसरी व ज्ञानप्रकाश मला कर्वेंकडून नियमित मिळतात.

मी माझी जुनी बायसिकल अडीच पौंडांना विकून पांच पौंडांना नवी घेतल्याविषयीं पूर्वी लिहिलेंच असेल. काल माझा जुना विजेचा दिवा मोडला. आतां मी एक नवीन कारबाइडचा दिवा घेतला आहे. सहा गोल्ड-मार्क (= ६ शिलिंग) पडले. माझा जुना विजेचा आहे तो दुरुस्त करून विकीन. अर्धा पौंड तरी येईल असें वाटतें. आतां सर्व कांहीं नीट जमलें आहे. सध्यां थंडी अगदीं बेताची असल्यामुळें मला अजून कोठेंही सायकलवर जातां येतें. ट्रॅम्स् हल्लीं बऱ्याच कमी केल्या आहेत, त्यामुळें कोठेंही ट्रॅमनें जायला फार वेळ लागतो. हल्लीं ट्रॅमच्या तिकिटाला दीड अब्ज मार्क (= १$\frac{१}{४}$ आणा) पडतो. पत्राचे दर पुन्हा लवकरच वाढतील असें वाटतें. आतां २-३ दिवसांत नवीन नाणें निघणार आहे व तें डॉलरच्या हिशेबानें बनवलेलें आहे, म्हणजे युद्धापूर्वी एका डॉलरची किंमत ४-२ मार्क होती (म्हणजे ४२० फेनिंग, १ मार्क = १०० फेनिंग) तेव्हां आतां २१० फेनिंगचें नाणें (= $\frac{१}{२}$ डॉलर), १०५ फेनिंगचें नाणें (= $\frac{१}{४}$ डॉलर) व ४२ फेनिंगचें नाणें $\frac{१}{१०}$ डॉलर अशीं निघणार आहेत व हें नवीन नाणें व जुने कागदी पैसे दोन्ही चालू राहतील. याचा अर्थ असा होईल कीं, डॉलरचे लहान लहान भाग आम्हांला जवळ बाळगतां येतील व लागतील तसे कागदी पैशांत जरूर लागल्यास मोडतां येतील. पण हें नाणें तरी कायम राहून याचा भाव पडणार नाहीं असें कोणीं सांगावें ? याचा भाव जर यांना कायम ठेवतां येईल तर यापूर्वीच कागदी मार्कांचा भाव ऑस्ट्रियाप्रमाणें यांना कायम ठेवतां आला असता. आतां काय होतें तें पाहावें. याचा राष्ट्राच्या आर्थिक स्थितीवर बराच परिणाम होणार आहे.

बायकांत मिसळणें, नाचणें वगैरेसंबंधीं काळजी घेण्याविषयीं माईनें लिहिलें आहे. प्रथमच येथें आलें म्हणजे येथल्या अशा तऱ्हेच्या उच्छृंखल राहणीचा मनावर परिणाम झाल्याशिवाय रहात नाहीं ही गोष्ट खरी आहे. विशेषतः आमच्यासारख्या तरुणांच्या मनावर तर हटकून परिणाम होतो. पण येथल्या राहाणीची सवय झाल्यानंतर त्याचें मोठेंसें कांहीं वाटेनासें होतें. विशेषतः विद्याभ्यास किंवा इतर नियमित व्यवसाय असले म्हणजे अशा गोष्टींचा त्रास होत नाहीं, व तसेंच आमचें होतें. असे प्रसंग आम्हांला

क्वचितच येतात व आतां येथें बरेच दिवस राहिल्यानें त्याचें कांहीं वाटत नाहीं.

शामराव गायकवाडांनीं माझ्याविषयीं स्तुतिपर हकीकत सांगितली असें तुम्ही लिहतां. पण त्यांची माझी सारी एकदोनदांच गांठ पडली असेल, आणि तीही दरखेपेस ५-१० मिनिटें. तेव्हां माझ्याविषयीं त्यांना काय माहिती असणार? तुम्हीं विचारल्यावर ते स्तुतिपरच सांगणार. म्हणजे त्यांच्या सांगण्यांत विशेष हंशील नाहीं एवढेंच माझें सांगणें. मी बरा आहें. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकांत.

श्री

पत्र १४१ वें

बर्लिन,

ता. ५-११-२३

तीर्थरूप नानांस शिरसाष्टांग नमस्कार, वि. वि. तुमचीं ता. १२-१० चीं पत्रें पोंचलीं. या आठवडयाला मुख्य गोष्ट कळवायची म्हणजे मी खोली बदलली. म्हणजे याच घरांत पण दुसरी एक मोठी, गरम व फर्निचर जास्त असलेली खोली घेतली. पूर्वीच्या खोलींत बऱ्याच गैरसोयी असल्यामुळें मला तिचा अगदीं कंटाळा आला होता. पुस्तकांना कपाट, लिहिण्याचें टेबल वगैरे गोष्टी पाहिजे तशा नव्हत्या. आतांच्या खोलींत जमिनीवर चांगला गालिचा (Caryhey), लांकडी रुंद पलंग—(पूर्वीचा पलंग तारेचा होता म्हणून गैरसोय होत असे)—पलंगाजवळ उशाशीं रात्रीं निजून वाचण्याकरतां दिवा, रायटिंग टेबल,-ड्रॉवरसकट-टेबलावर पुन्हा सुंदर विजेचा दिवा, दुसरें एक लहानसें टेबल, एक लहानसें आरशाचें कपाट, कपडे ठेवायचें आरशाचें मोठें कपाट, तोंड धुण्याकरितां संगमरवरी दगडी टेबल वगैरे वगैरे सामान आहे. म्हणून मनाला प्रसन्नता वाटते. शिवाय या खोलीच्या खालीं ऊन पाण्याचे नळ नेले असल्यामुळें येथें थंडीचा त्रास होणार नाहीं.

येथें सध्यां किंमती सोन्याच्या मार्कांत मोजतात हें पूर्वी लिहिलेंच आहे. पण हल्लीं मजा अशी आहे कीं, सोन्याच्या मार्कांतल्या किंमती देखील

युद्धापूर्वीच्या किंमतींपेक्षां किंवा सध्यांच्या इतर देशांतल्या किंमतींपेक्षां जास्त झाल्या आहेत. पूर्वी या देशांत लोकल आगगाडीच्या तृतीय वर्गाच्या तिकिटाला १० फेनिंग (१ मार्क = १०० फेनिंग, १ मार्क = १ शिलिंग = १२ आणे) पडत. आतां १५ फेनिंग पडतात. त्यामुळें हल्लींच्या स्थितींत कांहीं खरेदी करण्याची सोय उरली नाहीं. पूर्वी आम्ही प्रवास अगदीं स्वस्त करीत असूं. आतां भयंकर महाग झाला आहे. थोडक्याच दिवसांच्या पूर्वीची गोष्ट म्हणजे आम्ही हानाउला गेलों—दहा तासांचा प्रवास—तेव्हां द्वितीय वर्गाला जवळ जवळ दीड डॉलर (पांच रु.) पडले. आतां आगगाडीचीं भाडीं सुद्धां दररोजच्या दराप्रमाणें सोन्याच्या मार्कांत घेतात. आमच्या मनांत ब्रेमेनला–म्हणजे येथून पांच तासांच्या रस्त्यावर–एक कारखाना पहायला जायचें आहे. त्याला द्वितीय वर्गाला अडतीस मार्क (= जवळ जवळ तीस रु.) पडतात. म्हणजे वरच्यापेक्षां निम्मा प्रवास करून ६ पट भाडें. आम्ही गेलोंच तर तृतीय वर्गानें जाऊं आणि त्याला भाडें बारा रु. पडेल.

गेल्या महिन्याला मी या घरीं राहण्याचा व जेवणाखाण्याचा खर्च मिळून बारा डॉलर दिले. लॅबोरेटरी, बाहेर खाणें, थिएटर्स वगैरेचा खर्च वेगळा. सर्व मिळून मला गेल्या महिन्याला बावन्न डॉलर खर्च आला. पैकीं जुनी सायकल विकून नवी घेतली त्याला बारा डॉलर व हानाउच्या प्रवासाचे आठ डॉलर. हे वीस सोडले म्हणजे मला एकंदर खर्च गेल्या महिन्यास ३२डॉलर (= १०५ रु.) आला. या महिन्यास जिकडेतिकडे महागाई वाढल्यामुळें आमचें भाडें, राहण्याचा खर्च वगैरे वाढला व या महिन्यास मला येथें घरीं अठरा डॉलर द्यावे लागले. १२:१८ या प्रमाणांत हिशेब केल्यास गेल्या महिन्याच्या दिढीनें म्हणजे दीडशें रु. खर्च येईल असें वाटतें. पूर्वींचे येथले स्वस्ताईचे दिवस गेले. ही एकंदर येथल्या खर्चाची हकीकत तुम्हांला साधारण कल्पना येण्याकरतां दिली.

ज्ञानप्रकाशांत पियर्सनसाहेब इटालींत अपघातानें मरण पावल्याचें वाचलें. फार वाईट झालें. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

पत्र १४२ वें

Berlin,
10th *November* 1923

My dear Nana,

Your letters of the 19th October reached me on the 8th inst. On Friday last I undertook a trip to Bremen in order to visit the Franke Works which produce oil-machines. Prof. Sen—Professor of Applied Chemistry at the Science College, Calcutta,— who is carrying on research work at the Kaiser-Wilhelm Institute here, was with me. Prof. Sen has got vast experience in the field of pure and industrial research as well as directly in various industries. He has set up and worked some sulphuric acid plants in India, and has also worked in oil factories in Rangoon. On the laboratory scale he has made many experiments on hydrogenation of different oils and is quite conversant with its details. As I have already written in a previous letter, he had invited me once to dinner, where I had a talk with him on the oil industry and on the work I am at present doing in my laboratory. I got a great many hints from him re. my work. To tell you more about him, he is a B.A., M.Sc. of the Calcutta University, a D.Sc. of the London University and has come here with a year's leave to carry on research work with Prof. Neuberg in biochemistry. We left here for Bremen at 8 o'clock in the morning and reached there at about 2. We then went direct to the factory where the Engineer Mr. Grau, who had already once been with us in Hanaw, was expecting us. We had a talk with him about different plants. Prof. Sen asked him to make an estimate of a hydrogenating plant working 5 tons of oil per day, and also the cost of labour etc. Then we went round the factory, saw the different parts of the machines which were under construction and then went out with

Mr. Grau. We engaged a room in a hotel,—for which we had to pay one dollar each,—and went to dinner with Mr. Grau. Then we went to a cinema and then Mr. Grau invited us to coffee in a cafe at about 11 o'clock. Then we took leave of Mr. Grau and went to sleep. Next morning we started back and at 2 o'clock I was at home for lunch. Our journey was very comfortable, though it cost us a lot owing to the new high gold prices. We travelled 3rd class, and each ticket cost us about 13 Shillings, *i. e.*, 26 Sh. in all. Prof. Sen said I was his guest and in spite of my desire to divide the expenses he paid almost all the expenses for me except the railway fare. Our trip was a successful one and we are hoping that something will come out of it. Prof. Sen will be returning to India after about a couple of months and will try to find out capitalists for these machines. As soon as the Frankes are sure that they have a customer, they would give us an opportunity to work in some factory. Let us wait and see how the matter evolves itself.

By the way Prof. Sen would be going back to India after a couple of months, and it will be of interest to you to make his acquaintance. I have requested him to put up with Aba in Bombay on his way to Calcutta. I will inform you of the exact time of his arrival later on.

12-11-1923

Please send some dry fruits बदाम, पिस्ते, खारका, etc., so that I may be able to use them as Christmas presents. You will get this letter about the beginning of December and if you send something *the same week*, I will get it a couple of days before Christmas. Thus I may save expenses for buying costly presents here.

I got the chiwda and other sweets from you this week. I liked them; only the chiwda got mixed with sweets and

that was not a very good combination. Otherwise I relished the chiwda and the plaintain cakes very much.

I wonder why Bhau has not as yet received the cataract-knife I sent him. I am enjoying sound health. Jyotish Ray gives you his Pranamas.

With profound respect,

Yours affectionately,
Shyamakant.

पत्र १४३ वें

Berlin,
13th *November* 1923

My dear Nana,

I was expectantly waiting for your letter, as I came home somewhat exhausted this evening and to my delight I got it just now. It is written on the 26th October. Various affairs including my laboratory work were worrying me and I was in a gloomy state of mind. The tone of your letter this time was also a bit gloomy and harmonised with my dejected mood. There are in life so many troubles that try us, that it requires a man of strong mental cast to despise and conquer them. Then again in the case of married people the feelings of both the souls have got to harmonise, which is very seldom the case. I know my mother's drawbacks and pity her for them. I think in such cases where already a great part of life has been spent together, and no more changes in the nature are possible, toleration is the only way.

Life is getting very costly day by day. All things now cost decidedly higher than the normal prices and everybody, be a foreigner or not, has got pecuniary cares. The mark is being artificially pressed down here in Germany, while in foreign countries it is awfully falling every hour. One gets

over double the amount in a foreign country for a dollar than here. The natural result is that everything has become tremendously dear. The causes are clear. The foreign raw materials and goods that are bought here have got to be paid in foreign coin, which has to be bought in foreign land against the mark at a high price. Thus while the rate of mark in foreign lands determines the prices of things here, one has to buy those things with the paper money which one gets at a much lower rate. However, this state of affairs will not exist long. The new so-called stable money has appeared though it is not yet abundant. The notes bear printed value in dollars. One is not, however, sure that, when the old paper money is out of circulation as planned by the government, the new stable money will remain really stable. Besides people are getting awfully poor salaries in this new money and it is to be seen whether they will be better off. For my own part I am compelled to pay higher payments for lodging and boarding even in dollars. Poverty has driven the Germans to an incredible extent of greediness. Most of the talk in the house concerns money matters—dollars, and obviously human relations are determined by payments, perhaps in a more pronounced manner than usual. You never feel that there is any friendly being helping you disinterestedly. Everything appears mercenary and that wounds my feelings so often. That sympathising loving heart which I would have enjoyed in India is wanting, and this makes me feel very often lonely and uneasy. However let me also tell you, I have had moments of happiness here and I don't always feel gloomy like that.

15th *November* 1923

We had to-day the funeral ceremony of one Mr. Surendranath Sarkar,—a leading Indian revolutionary here,—who

died suddenly of pneumonia. Almost all the Indians had assembled for the ceremony, since he was considerably popular and serving his country with a great self-sacrifice and sincerity according to his own ideals and suffering many privations. He was short of funds and we had to collect subscriptions to pay off the expenses for his funeral. His body was electrically cremated at the crematorium.

Jyotish Ray gave me to-day a letter from his mother, which describes her visit to you. It seems she had also been at Bilimora at my uncle's, where she received a cordial hospitality.

The day before yesterday I was invited to tea by Mr. Chhatto's sister (or Mrs. Sarojini Naidu's sister) Mrs. Nambiar* and her husband. It was a happy evening. There were some other friends including Chhatto, Naidu, Pillay, Ganpuley and others.

I am adding some words below in Marathi for Mai. With deepest regards,

Yours affectionately,
Shyamakant.

हेच पत्रीं सौभाग्यवती माईस शिरसाष्टांग नमस्कार, वि. वि. तुमचें तारफेण्यांचे व खव्याच्या वड्यांचें पार्सल पोंचलें. पण वाटेंत दुसऱ्या एखाद्या पार्सलाच्या सहवासानें कीं काय, त्याला जिकडून तिकडून लाल रंग लागला होता. तारफेण्या निम्या लाल झाल्या होत्या त्या मला टाकून द्याव्या लागल्या. कारण लाल रंग विष असण्याचा संभव होता. बाकीच्या निम्या व खव्याच्या वड्या हे दोन्ही पदार्थ फार चांगले लागले व मीं मोठ्या आवडीनें खाल्ले. हल्लीं बरीच थंडी असते. बाहेर जातांना हातांत मोजे घालावे लागतात. बाकी माझें एकंदरींत चांगलें चाललें आहे. तब्येत उत्तम आहे. कळावें, हे विज्ञापना

श्यामकान्त.

---

* सौ. सुहासिनी नंबियार, हल्लीं मुंबईंत मजूर चळवळींत काम करितात.

श्री

पत्र १४४ वें

बर्लिन,

रविवार, ता. २-१२-१९२३

तीर्थरूप नानांस शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना विशेष. तुमचीं दोन आठवड्यांचीं पत्रें ता. २-११ व ९-११चीं एकदम या आठवड्याला मला मिळालीं. दुसऱ्या आठवड्यास केवळ बापूचेंच पत्र बडोद्याहून आलें आहे, व मुंबईहून भाऊंचें एक आलें आहे. भाऊंनीं बदाम, पिस्ते, खारका वगैरेंचें एक पार्सल पाठवल्याविषयीं लिहिलें आहे, पण तें वाटेंत गहाळ झालें असलें पाहिजे असें वाटतें. कारण त्या पार्सलावर पत्ता म्हणून लिहिलेला जो कागद होता तेवढाच मजकडे आला व पार्सल मधल्यामध्यें कोणीं लांबवलें. पत्ता लिहिलेल्या कागदावर मागल्या बाजूस येथल्या पोस्टानें हा रिकामा कागद आल्याबद्दल साक्षीसहित लिहिलें. असो. झालें त्याला इलाज नाहीं. मला वाटतें बदाम, पिस्ते यांसारखे नामी पदार्थ पाठवावयाचे झाल्यास पार्सल रजिस्टर करावें हें बरें. चिवडा, वड्या वगैरे पदार्थ असल्यास साधेंच सँपल पोस्ट पाठवावें.

भाऊंनीं लिहिलें आहे कीं, मी येथल्या राजकीय हालचालींविषयीं फारसें लिहीत नाहीं. येथें आम्हांला सुद्धां बहुतेक बातम्या वर्तमानपत्रांतूनच कळतात. प्रत्यक्ष दिसणाऱ्या गोष्टी म्हणजे पैशांच्या घडामोडी, देवघेवी, लोकांची गरिबी, वगैरे. त्यांसंबंधीं मी लिहीत असतोंच. रूर प्रांतांत वगैरे जे अत्याचार घडत आहेत त्यांची माहिती येथल्या वर्तमानपत्रांत किती तरी असते, तशी ती तुमच्या तेथल्या वर्तमानपत्रांत सुद्धां असेलच. येथें मला अगदीं स्वतः अनुभवायला अशा थोड्याच गोष्टी मिळतात. म्हणून मीं जास्त कांहीं आतां-पर्यंत लिहिलें नाहीं. येथें शांतता नांदत नाहीं ही गोष्ट खरी आहे, व तुमच्या वर्तमानपत्रांतल्या गोष्टी अगदींच खोट्या असण्याचेंही कारण नाहीं. दुकानें लुटालुटी, गोळीबार वगैरे येथें बर्लिनमध्येंही झाले होते, पण हें सर्व आम्हांला वर्तमानपत्रानेंच कळतें. मी शहराच्या बराच बाहेर आहें, त्यामुळें येथें कोणतीही अशांतता भासत नाहीं. एवढेंच काय पण १९१८ सालीं लढाईंत येथें बंड

झालें, त्या वेळीं सुद्धां स्टेग्लिट्सच्या या भागाला कांहींच भासलें नाहीं असें म्हणतात. सध्यां राजकीय प्रश्न म्हणजे प्रधान मंडळाचा आहे. स्ट्रेझेमानचें प्रधान मंडळ मोडलें आहे व आतां नवीन मार्क्सचें घाटत आहे. अद्याप नक्की कांहींच नाहीं. रेंटेन मार्क म्हणून नवीन पैसा काढला आहे; आणि सध्यां तरी तो डॉलरप्रमाणें चढत आहे. शिवाय पूर्वी काढलेले जर्मन डॉलर्स चालू आहेतच. लोकांना जर्मन डॉलर्सची अद्याप शाश्वती वाटत नसल्यामुळें ते कमी किंमतीला विकून अमेरिकन डॉलर विकत घेण्याकडे लोकांचा खूप ओढा आहे. मला परवां युनिव्हर्सिटींत चाळीस डॉलर फी जर्मन डॉलरांत भरावी लागली. त्याकरतां मी अशाच रीतीनें (खासगी) अमेरिकन डॉलर विकून जर्मन डॉलर मिळवले. मला एक अमेरिकन डॉलरला पावणेदोन जर्मन डॉलर मिळाले. बँकेंत सरळ मोडले असते तर एक डॉलरला एक डॉलरच मिळाला असता. अशा रीतीनें चाळीस डॉलर्सच्या ऐवजीं माझें तेवीस डॉलरांत काम झालें. अशी पैशांची लटपट येथें नेहमीं करावी लागते. न केली तर येथें राहणेंच कठिण होईल. कारण नाहीं तर येथें इंग्लंडपेक्षांही जास्त खर्च येईल. येथें कागदी मार्कांचा भाव सध्यां पौंडाला अठरा बिल्यन मार्क आहे, इंग्लंडमध्यें तोच पौंडाला चाळीस बिल्यन आहे. याचा फायदा घेऊन मीं नुकताच इंग्लंडमध्यें माझ्या बँकेकडून एक पौंड मोडवला व ते जर्मन पैसे येथें आणवले, व लागलींच त्याचें सामान खरेदी केलें. येथें किंमती पौंडाला अठरा बिल्यन या भावानें लावल्या असल्यामुळें मला निम्म्या किंमतीला जिनसा मिळाल्या व माझी थंडीची बेगमी झाली. परवां वामन कोर्डे यानें असे दोन पौंड विलायतेंत मोडून येथें माल खरेदी केला. पण यांत धोकाही असतो. विलायतेहून येथें पैसे येईपर्यंत पौंड चढणेंही शक्य असतें, व तसें झाल्यास नुकसान होतें. मी फार काटकसर करतों असा माझ्यावर एक आरोप आहे, असें माईच्या गेल्या पत्रांत होतें. पुष्कळशी काटकसर अगदीं जरूर आहे; ती न करणें म्हणजेच मूर्खपणा आहे आणि ती मी करतों. खाण्यापिण्याच्या बाबतींत मी हाल करून घेतों असें मात्र मुळींच नाहीं. माझें खाणें चांगलें पुष्टिकारक असतें. नुसतें उत्तम खाणें खाल्लें म्हणजेच मनुष्य लठ्ठ होतो असें नाहीं. माझा तरी कधींच असा अनुभव नाहीं. मध्यें सुटींत महिनाभर

स्वीनेम्युंडेला खाण्यापिण्याची आम्हीं नुसती चंगळ चालवली होती, पण त्यामुळें माझें वजन वाढलें अशांतला मुळींच प्रकार नाहीं. पुण्याला असतांना किंवा प्रत्यक्ष बडोद्याला खाण्यापिण्याच्या दूधतुपाच्या बाबतींत कांहींच कमी पडत नसे; मग त्या वेळीं तरी कोठें माझ्या अंगावर एकदम मांस आलें? तेव्हां चित्रावरून अशा तऱ्हेची समजूत करून घेऊं नये. माझी अंगकाठीच तशी आहे आणि ती तशीच राहणार असें मला वाटतें.

हल्लीं टेंपरेचर उणें २·३ सी असतें. रोज चापून बर्फ पडतो. जिकडे तिकडे बर्फानें पांढरें सफेद झालें आहे. रस्त्यानें चालतांना पाय घसरतात. चढ-उतार जेथें जेथें आहेत, त्यांचा फायदा घेऊन मुलें घसरगाडयांवरून जोरानें घसरत असतात. अशा मुलांचे थवेच्या थवे रस्त्यांत दिसतात व त्यांचा तो आरडाओरडा ऐकून कौतुक वाटतें. स्केटिंगूलाही सुरुवात झाली आहे. मी शिकेन शिकेन म्हणतों पण अद्याप कांहीं जमलें नाहीं.

काल संध्याकाळीं मी, वामन व त्याची एक मैत्रीण एक ऑपरा पहायला गेलों होतों. तेथलें संगीत (ऑर्केस्ट्रा) फारच मनोहर होतें आणि नाटक अत्यंत हास्यरसपूर्ण होतें. हसून हसून पुरेवाट झाली. नंतर आम्ही एका रेस्टारॉंमध्यें कॉफी पिऊन परत आलों. आठवडयांतून एकदां किंवा दोनदां पिंगपॉंग खेळायला जातों. या खेळांत मीं सध्यां खूपच प्राविण्य मिळवलें आहे. सध्यां बर्लिनमध्यें एक दोघेच आहेत कीं ते माझा पराभव करतात.

मला येथील थंडीचा त्रास होतो असें मुळींच नाहीं. माझी खोली फार छान तापवलेली असते. त्यांतून माझ्या खोलीच्या खालून भिंतींतून गरम वाफेच्या नळ्या गेल्या असल्यामुळें माझी खोली बाहेरून न तापतांही आंत चांगली गरम असते. बाहेर मात्र थंडी कडक असते. त्याप्रमाणें घराबाहेर पडतांना गरम ओव्हरकोट, मफलर वगैरे गरम कपडे घालतों. हातांत हातमोजे घालतों. तेव्हां कोणताही त्रास होत नाहीं. मला तर येथला हिंवाळा आवडतो. कदाचित् येत्या नाताळांत गेल्या वर्षीप्रमाणें कोठें तरी बर्फाच्या डोंगरांत जाईन. अंग फुटण्याची तक्रारही येथें नसते. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

<u>पत्र १४५ वें</u>

बर्लिन,

ता. ९-१२-१९२३

तीर्थरूप सौभाग्यवती माईस शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना विशेष. तुझें ता. १५-११ चें पत्र व नानांचें गोवीलहून लिहिलेलें पत्र नुकतेंच पोंचलें. त्याचप्रमाणें अनसें करंज्यांचें एक व चकल्यांचें एक अशीं दोन पार्सलें पोंचलीं. सर्व नासल्याशिवाय चांगल्या स्थितींत आलें. मी येथें त्यांतलें कांहीं थोडें कोर्डे व अधिकारी यांना दिलें. कोर्डे मार्चमध्यें परत येणार ही गोष्ट खोटी आहे. पुढच्या डिसेंबरच्या सुमाराला फार तर त्याला जातां येईल. डॉक्टरेटचें काम दोघांचें एकदमच चारसहा महिन्यांत संपेल असें वाटतें. मला येथें पोटांत बरें वाटत नव्हतें म्हणून काल संध्याकाळीं सँटोनिन व आज रेचक घेतलें. सबंध दिवस घरींच होतों. पोट साफ झालें, पण जंत वगैरे नव्हते. तेव्हां त्याविषयीं आतां खात्री झाली. काल संध्याकाळीं रा. अधिकारी यांच्या घरीं चहाला गेलों होतों. वेळ चांगला गेला. पुढच्या आठवड्यास सविस्तर पत्र लिहीन. बाकी सर्व ठीक चाललें आहे. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

<u>पत्र १४६ वें</u>

बर्लिन,

ता. १६-१२-२३

तीर्थरूप नानांस शिरसाष्टांग नमस्कार, वि. वि. तुमचें ता. २३-११चें बडोद्याहून लिहलेलें पत्र येथें ता. ११-१२ ला संध्याकाळीं पोंचलें. त्याचप्रमाणें एकंदर सहा पार्सलें आलीं. त्यांपैकीं तुमच्याकडून आल्याच्या वड्यांचें एक, चिवड्याचें एक व लिप्टनच्या चहाचें एक अशीं तीन, व मुंबईहून रा. वीरकरांकडून चिवड्याचीं दोन व पेढ्यांचें एक अशीं तीन आलीं. एकंदर खूप बेगमी व चंगळ झाली. सर्व पदार्थ चांगल्या स्थितींत आले आणि मला फार आवडले. मी, कोर्डे, आगटे, शहा इत्यादि मंडळींना चहाला बोलावून त्यांतले

कांहीं दिले. वीरकरांनीं पाठवलेला चिकडा व पेढे दोन्ही चांगल्या प्रतीचे होते.

मला आतां मॉडर्न रिव्ह्यू पुन्हा नियमितपणें येतो. भाऊंचें सामान पोंचल्याचें उत्तर त्यांच्याकडून मला आलें.

येथें आतां जर्मन मार्क हा चांगला कायम झाला आहे. तो आतां पहेलसें वाटत नाहीं. शिवाय जर्मन डॉलर्स व नवीन जर्मन गोल्ड मार्क वगैरे पैसेही सर्व कायमच्या दराचे असल्यामुळें सर्व व्यवहार आतां सुरळीत चालले असून हळहळू सांपत्तिक स्थिति सुधारत आहे असें वाटतें. पदार्थांच्या किंमती आतां साधारण शांततेंतील वेळें इतक्या आहेत. घराचीं भाडीं कमी होतीं तीं आतां सरकारानें एकदम चढवलीं व आणखीही चढवण्याच्या संभव आहे. आजच पैशाच्या देवघेवींविषयीं माझें व डॉ. झेलेचें बोलणें व नवीन करार झाला. त्याप्रमाणें जेवणाखाणाचे मिळून एकंदर ७० मार्क, अंडीं वेगळीं घेतों त्यांबद्दल सध्यांच्या किंमतीप्रमाणें ८ मार्क व खोलीचें भाडें तूर्त २० मार्क मिळून एकंदर महिना ९८ मार्क म्हणजे जवळजवळ ७५ रु. देण्याचें ठरलें. त्यांपैकीं खोलीचें भाडें ही बाब कायमची नसून दर महिन्यास जशीं नवीं भाडीं ठरवलीं जातील त्याप्रमाणें ती बदलेल. याशिवाय माझा लॅबोरेटरींतला व बाहेरचा सटरफटर खर्च मिळून ५० एक रु. मला आणखी खर्च यावा असा अंदाज आहे. म्हणजे कपडेलत्ते वगैरे सामान विकत न घेतल्यास मला सध्यां महिना १२५ रु. खर्च येतो असें म्हणतां येईल.

काल संध्याकाळीं आगटे व मी एका कॉस्च्यूम बॉलला (Costume-ball) नाचायला गेलों होतों. तेथें बायका पुरुष विचित्र कपडे घालून आले होते. आम्ही फक्त रंगीबेरंगी उंच गंमतीच्या टोप्या घातल्या होत्या. एकंदर मजा आली. रात्रीं उशीर झाल्यामुळें आगट्यांच्या घरीं निजलों व सकाळीं न्याहारी तेथेंच घेऊन परत आलों.

माझें प्रयोगशाळेंतलें काम आतां चांगलें होत आहे आणि माझ्या अटकळीप्रमाणें जर मला यश आलें तर येत्या एप्रिलपर्यंत माझें काम आटपेल व पुढें तीनचार महिन्यांत परीक्षा आटपून मोकळा होईन असा अंदाज आहे. पण आमचे प्रोफेसर परत येईपर्यंत मला नक्की असें कांहींच लिहितां येणार

नाहीं. कारण माझ्या कामाविषयीं त्यांचें मत काय होईल त्यावर बरेंच अवलंबून आहे. ते फेब्रुवारींत येणार आहेत असें ऐकतों.

हल्लीं थंडी बरीच असते. आणखी एक आठवड्यानें आम्हांला नाताळची रजा होईल. मग १०-१२ दिवसांकरतां कोठें तरी डोंगरांत फिरायला जाण्याचा विचार आहे. तुमच्या येत्या पत्रांत महाराज बडोद्यास आल्याची व त्यांची एकंदर हकीकत बहुतेक कळेल. तुम्हीं त्यांना भेटायला गेलांच असाल. येथें मी त्यांना भेटायला गेलों होतों, त्यासंबंधीं काय म्हणाले? यूरोप, अमेरिका वगैरे ठिकाणच्या प्रवासाकरतां त्यांच्याकडून मला कांहीं मिळण्याची आशा आहे काय? उगीच गंमत म्हणून विचारलें, त्यांत कांहीं अर्थ नाहीं. मी खुशाल आहें. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

पत्र १४७ वें

Oberschreibfehau.

30-12-1923

तीर्थरूप सौभाग्यवती माईस शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना विशेष. तुमच्या गेल्या आठवड्याच्या पत्राची व माझी चुकामूक पडली. कारण हिंदुस्थानचें टपाल येण्याच्या वेळेस मी निघण्याच्या घाईंत होतों. त्या वेळीं फक्त चारपांच पार्सलें आलीं. तीं अद्याप बर्लिनलाच आहेत, उघडलीं नाहींत. पत्र कदाचित् नंतर आलें असेल; तें एक दोन दिवसांत मला येथें मिळेल.

कोंडे, राय व मी असे आम्ही आमच्या लॅबोरेटरींतल्या एका जर्मन सहाध्यायाबरोबर गेल्या २७ तारखेला येथें आलों. आमच्या जर्मन मित्रानें येथें राहण्याची वगैरे सोय करून ठेवली होती. कारण त्याचें घर येथेंच आहे. पूर्वीं खोलीची वगैरे व्यवस्था केली नसती तर फार त्रास झाला असता, कारण येथें फार गर्दी आहे.

बर्लिनला नाताळचे दोन सणाचे दिवस फारच मजेंत गेले. पहिला दिवस कुमारी म्युलरकडे आमंत्रण होतें; आणि दुसरा दिवस आमच्या घरीं बरीच मंडळी रात्रीं जेवायला बोलाविली होती. जेवण झाल्यावर गप्पागोष्टी,

गाणेंनाचणें, कोट्या करणें व सांगणें, अभिनय वगैरे गोष्टींची मजा झाली. रात्रीं दोन वाजेपर्यंत जागलों. त्या दिवशीं शहा आमचेकडे आले होते, ते रात्रीं पुढें मजकडेच निजले. दुसऱ्या दिवशीं सकाळीं नऊ वाजतां मी घरून निघालों व संध्याकाळीं साडेपांच वाजतां येथें आलों.

आम्ही राहतों हें एक लहानसें भोजनालय (Pension) असून येथें पंधरा-वीस मंडळी राहतात. जेवायला आम्ही सर्व एकत्रच असतों. त्यामुळें सर्वांशीं खूप गप्पागोष्टी होऊन ओळखी चांगल्या झाल्या. आम्ही परदेशी असल्यामुळें साहजिकच लोकांचें लक्ष आमच्याकडे वळतें. येथें याकोबसोन म्हणून एक साधारण बरेंच वय झालेलें जोडपें आहे. त्यांची एक मुलगी व एक मुलगा (म्हणजे आमचा मित्र), दुसरी एक तरुण मुलगी, एक डॉक्टर, आणखी एक यहुदी जोडपें व आम्ही इतकी मंडळी आहेत. आम्ही सकाळीं ८॥-९ वाजतां उठतों व दहांच्या सुमारास न्याहारीला जातों. अकरांच्या सुमारास आम्ही सर्व मंडळी डोंगराच्या कोणत्या तरी एखाद्या शिखरावर फिरायला जातों. डोंगर जिकडे तिकडे बर्फानें भरलेला आहे. दीड दीड यार्ड जाड बर्फ आहे. रोज सकाळीं आणखी बर्फ पडतच असतो. उष्णतामान फारच कमी असल्यामुळें बर्फ मुळींच वितळत नाहीं. टेंपरेचर साधारण उणें ७° पासून उणें २२-२३°C इतकें असतें. म्हणजे कडकडीत थंडी असते. म्हणून आम्हीं बर्फांत घालण्याचे गरम कपडे आणले आहेत. पायांत उंच बूट, (दोन किंवा तीन एकावर एक पायमोजे) वर ब्रीचिस, अंगांत खूप गरम कपडे, वर पुन्हा स्वेटर, डोक्याला कानटोपी व हातांत जाड लोंकरी हातमोजे. इतकें करूनही चालतांना जरा थांबलें कीं हात व पाय गारठून जातात. हात गार-ठले कीं शुद्धच नाहींशी होते; पण जोरानें चाललें म्हणजे किंवा डोंगर चढतांना चांगलें गरम वाटतें व मोकळया हवेंत खूपच मजा वाटते. आज आम्हीं एका अत्युच्च पर्वतशिखरावर सहल केली. (उंची १४०० मिटर आहे.) साडेदहा वाजतां निघालों ते दोन वाजतां तेथें पोंचलों. तेथें पुन्हा तापवलेलें एक घर होतेंच. अशा डोंगरांतल्या सार्वजनिक घरांना " Bavade " बावडे म्हणतात. तें तापवलेलें असून आंत संगीत वगैरे चालू होतें. तेथें जेवलों. नंतर बाहेरचा सभोंवारचा रम्य देखावा पाहिला. मग थोडी फोटोग्राफी केली व

"बर्लिन"

पृ. २९६] कोर्डे टिळक श्यामकान्त जोशी

परत आलों. येतांना बहुतेक लोक skie वरून किंवा घसरगाड्यांतून येतात. चढायला तीन तास लागतात, तेथें घसरत यायला पंधरा मिनिटें पुरतात. आम्ही चालतच आलों. पांचला येथें पोंचलों. बर्फाच्या डोंगरांतील खेळांविषयीं (sports) गेल्या वर्षी सविस्तर हकीकत लिहिलीच आहे. तेव्हां या वर्षी आणखी जास्त लिहीत नाहीं. गेल्या वर्षी आम्ही याच डोंगरांतील दुसऱ्या एका ठिकाणीं होतों. येथें डोंगराच्या कोठल्याही कोनाकोपऱ्यांत किंवा कोठ-ल्याही उच्च शिखरावर जा, तेथें विजेचे दिवे, टेलिफोन, पोष्ट वगैरे सर्व सोयी असतात. अशा सोई आपल्याकडे कोंकणांत वगैरे कधीं होतील!

येथें आम्ही खाण्यापिण्याची चैन करतों. राहणें व खाणें मिळून रोजचे प्रत्येकीं ७ मार्क (= ५। रुपये) पडतात. शिवाय अंडीं, दूध, इतर पदार्थ आम्ही घेतों, त्यांची किंमत वेगळी. त्याचप्रमाणें बाहेर कोठें काफेंत वगैरे गेलों तर तेथला खर्च वगैरे मिळून प्रत्येकीं २।३ मार्क रोज वेगळा खर्च होतो. येण्याचें भाडें तृतीय वर्गाचें १२ मार्क (१ मार्क = १ शिलिंग) पडलें. आतां जर्मन मार्क हे नवीन पैसे झाल्यामुळें व्यवहार पूर्वीप्रमाणें सुरळीत चालले आहेत व नवा मार्क हा सध्यां तरी युद्धापूर्वीं चांगल्या स्थितींत होता तसा आहे.

जेवतांना गप्पागोष्टींची व वेगवेगळ्या खेळांची खूप मजा येते. रॉयनें कांहीं कोडीं सांगितलीं होतीं, त्याचप्रमाणें हात पाहून भविष्य सांगणें वगैरे तो करतो त्याची मजा येते. आज त्यानें आपल्या भुताटकीनें टेबल हलवून दाखवलें; पण त्यांत कोणाची तरी लबाडी असावी असें आम्हांला वाटतें. आम्हांला हसून हसून पुरेवाट झाली. येथें चांगल्या ओळखी झाल्यामुळें वेळ मजेंत व आनंदांत जातो व आणखी एक आठवड्यानें बर्लिनला गेल्यावर विश्रांति मिळाल्यामुळें शरीर सुधारून कामाला दुप्पट हुरूप येईल. आतां रात्रींचे साडेबारा वाजले आहेत. झोंप येत आहे. पण हें पत्र उद्यां सकाळीं पोष्टांत पडलेंच पाहिजे म्हणून आतां जागून लिहिलें. पुढच्या आठवड्याला जास्त लिहीन.

आम्ही ज्या गांवाला आज गेलों होतों, त्याचें एक चित्र पाठवीत आहें. आज सकाळीं हेर याकोबसोन यांनीं कालच्या भुताटकीच्या प्रयोगांत स्वतः मुद्दाम टेबल हलवल्याची कबुली दिली. हसून हसून पुरेवाट झाली. आतां

त्या गृहस्थांना वगळून आम्ही पुन्हा एकदां तो प्रयोग करूं. आज रात्रीं बारा वाजतां नवीन वर्षाला सुरुवात होणार. त्या वेळीं हे लोक एक उत्सव करतात. आम्ही सर्व मंडळी एके ठिकाणीं जमून हा उत्सव मध्यरात्रीं साजरा करणार आहों. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

ता. क.—नववर्षानिमित्त शुभ चिंतितों.

खंड सहावा

डॉ क्टो रे ट

बर्लिन–सन १९२४

Stomach Complaint

पत्र १४८ वें

Berlin,

6th *January* 1924

My dear Nana,

Your letter dated 12-12-1923 as well as Aba's from Bombay to hand. I have also received the draft for £ 40, which Aba had sent, and have already credited it in my London Bank. I also recently received £ 10 from Mr. Korde, who had borrowed them from me. I have about £ 75 to my credit in the Bank to-day.

I have been knocking about for work in some soap-factories and haven't settled yet where to work. But I am sure to start work within a day or two. Of course, this vagueness and uncertainty about my future makes me sometimes uneasy, as you can well imagine. Dr. Karve also doesn't seem to have got any good job as yet. He is, I learn, working at the Bangalore Institute as an assistant on Rs. 150 per month. I wonder, whether Korde has got any working job as yet.

I am keeping good health. A couple of days back I had again a little pain in the stomach, but it is over now. I feel quite hungry and don't suffer from constipation either. Only I have got windiness of stomach, and the lower part of it (from outside at any rate) below the naval is a little enlarged and sounds hollow. I had got myself thoroughly examined by different doctors before I go to England, and although the doctors had confirmed a little enlargement of stomach, they said there was nothing serious and the complaint was only nervous. I am not feeling unwell in any way at all. Still if I again feel pain, which I don't expect, I will surely get myself examined by some specialist.

Vishnu Kirloskar told me the other day, that Shankar rao* has improved much and one of his lungs has been restored completely. So there is nothing to be feared.

There is a ping-pong tournament, taking place here from to-morrow, for the championship of Germany. As the German players are very weak, I have succeeded in bringing an Indian Mr. Nanda from London here, who has been also a London champion and who will surely win the championship and show the Germans a good game and win credit for India. I came to know Mr. Nanda from London. He is a nice gentleman and comes from Punjab, studies medicine in London. As the Germans are appreciators of good play and since I have good influence here, we have arranged to put him up here as the guest of the club, during his stay in Berlin. All papers are applauding him and people invite him and me along with him for dinners and games. He will go back next week.

You can show this letter to Aba. I don't write to him separately. I could not write to Mai in Marathi. Give her my loving Namaskars.

Yours affectionately,
Shyamakant.

श्री

पत्र १४९ वें — बर्लिन,

ता. १४-१-१९२४

तीर्थरूप नानांस शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना विशेष. तुमचें ता. २१ डिसेंबरचें पत्र नुकतेंच पोंचलें. त्याचप्रमाणें हलव्याचें पार्सल व इतर कांहीं वीरकरांनीं पाठवलेलीं पार्सलें पोंचलीं. हलवा फारच चांगला झाला आहे.

---

* श्री. शं. वा. किर्लोस्कर, किर्लोस्कर व स्त्री मासिकांचे संपादक.

इतका चांगला वरीं होईल अशी कल्पना नव्हती. मला तर आवडलाच, पण येथल्या हिंदी व जर्मन मंडळींना सुद्धां आवडला. हलवा आला त्याच दिवशीं संध्याकाळीं आम्हीं 'रीझेन गे बिर्ग '(राक्षसी डोंगर)ला असलेली सर्व मंडळी रॉयच्या बोलावण्यावरून त्याच्या घरीं जमलों होतों. तेथें मीं सर्वांना थोडथोडा हलवा दिला. तो सर्वांनीं अति आवडीनें खाल्ला. बर्लिन सोडण्यापूर्वी, सोडल्यानंतर व परत आल्यावर मिळून एकंदर पंधरासोळा पार्सलें माझ्याकडे येऊन पडलीं होतीं. इतकीं उघडून पदार्थांची सोय लावायची म्हणजे थोडासा त्रासच नाहीं का? मला वाटतें तुम्ही एकदम फार पार्सलें पाठवूं लागलां. त्यानें तुमची व माझी थोडीशी गैरसोयच होते; आणि तुम्हांला विनाकारण खर्च फार येतो. मला पुष्कळसे जिन्नस वांटूनच संपवावे लागतात. तेव्हां माझ्या मतें तुम्हीं इतकीं पार्सलें पाठवूं नये. मधूनमधून दोनतीन आठवड्यांनीं एखादें चिवडयाचें पार्सल पाठवावें म्हणजे पुरे. चहा-कॉफीच्या वेळेला येथें ताज्या केक्स किंवा टोस्ट खातों, त्याच्या ऐवजीं तिकडचे पदार्थ नेहमींच खातां येणार नाहींत; आणि ते तितके ताजेही नसतात. सध्यां मजजवळ एकंदर खारका, बदाम, बेदाणा, पिस्ते, काजूगर, भुइमूग, पेढे, डिंकाचे लाडू, चिवडा, जरदाळू, आलें इतके जिन्नस भरपूर आहेत. त्यांतले बहुतेक वीर-करांकडून आलेले असावेत. तुम्हीं यादी पाठवली आहे तींतला कोणताही जिन्नस तूर्त नको; कारण आहेत हे जिन्नस आणखी किती तरी दिवस मला पुरतील.

डोंगरांत असतांना तुमचीं जीं पत्रें आलीं त्यांत तुमच्या व गुरुदेव रवींद्रनाथांच्या भेटी झाल्याची हकीकत होती ती सर्व वाचून आनंद झाला. माईची सुद्धां त्यांच्याशीं भेट झाली हें फारच चांगलें झालें. विशेषतः श्रीवत्साची वगैरे आठवण सुद्धां तुमच्याजवळ गुरुदेवांनीं काढली, त्यावरून ते किती बारीकसारीक गोष्टी लक्षांत ठेवतात व दुसरें माझ्याविषयीं त्यांना कशी काळजी व प्रेम आहे हें व्यक्त होतें. त्यांना महाराज काय देतात पाहावें आतां.

मागच्या खेपेस पाठवलेल्या चित्रांत माझ्या शेजारीं व आज पाठवणार आहें त्या चित्रांत कुमारी गोएत्स (Goets) आहेत. चित्रें इतकींशीं चांगलीं आलीं नाहींत. अगोदर बर्फांत छायाचित्रें काढणें कठिणच असतें. कारण पांढऱ्या बर्फामुळें फार उजेड पडतो; आणि थंडीमुळें कॅमेरा फोकस करण्याची

शक्ति व स्थिरता हातांत नसते. आज पाठवीत आहें याशिवाय एकदोन चित्रें आम्हीं काढलीं आहेत; पण तीं अजून पाठवायला तयार झालीं नाहींत. आजच्या चित्रांत रा. कोर्डे, रा. आगटे, कु. गोएत्स व मी असे आहोंत.

कु. क्रेरे ज्या पोस्ट ऑफिसांत टेलिफोनचें काम करते त्याचें काल रात्रीं एक सम्मेलन (Gathering) होतें. तेथें टेलिफोनच्या सर्व मुली आल्या होत्या. मी, कोर्डे व आगटे पाहुणे म्हणून क्रेरेबरोबर गेलों होतों. खूप नाचलों. संगीताची मजा आली.

अलीकडे कांहीं दिवस मधूनमधून माझ्या पोटांत थोडेंसें दुखतें. फार दुखत नाहीं, पण दिवसांतून केव्हां तरी एकदोनदां दोनतीन मिनिटेंच दुखतें. म्हणून मी एका आठवड्यापूर्वी एका डॉक्टराकडे गेलों होतों. त्यांनीं मला तपासलें व एक आठवडाभर पथ्य करून मग पुन्हा यायला सांगितलें. मांसाहार किंवा मत्स्याहार करावयाचा नाहीं व गोड पदार्थ खायचे नाहींत, त्याचप्रमाणें तळलेले पदार्थ खायचे नाहींत असें त्यांनीं बजावलें. आज एक आठवडा पुरा झाला. उद्यां पुन्हां डॉक्टरकडे जाईन व मग बरा झालों असें त्यांनीं सांगितल्यास हळुहळू पूर्वीचा आहार घेऊं लागेन. डॉक्टरांनीं सोडा, मॅग्निशिअम ऑक्साइड व बिस्मथ मिळून एक औषधही दिलें आहे. असो. मला तसा त्रास कोणत्याही तऱ्हेचा होत नाहीं. पण काळजी घेण्याकरितां म्हणून जपत असतों. काळजी करण्यासारखें मुळींच कांहीं नाहीं.

लॅबोरेटरींत माझें काम झपाट्यानें चाललें आहें. आमचे प्रोफेसर फेब्रुवारींत येतील असें ऐकतों. ते येण्याची वाट पाहात आहें. या टर्मअखेर काम संपावें असा माझा अंदाज आहे.

येथें टेलिफोन असल्यामुळें किती सोय होते तें तुम्हांला लिहून व्यक्त करणें शक्य नाहीं. बर्लिन शहर अवाढव्य आहे व मोठमोठ्या अंतरावर माझे मित्र पसरलेले आहेत. पण वाटेल तेव्हां एका मिनिटांत टेलिफोननें काम होतें. अर्थात् प्रत्येकाच्या घरीं टेलिफोन असला पाहिजे. बाहेरच्या गांवांहून सुद्धां घरीं बसल्या दुसऱ्या गांवीं फोन करितां येतो. परवां डोंगरांत असतांना वामन कोर्डेला कांहीं कपडे बर्लिनहून घरून मागवावयाचे होते. त्यानें पटकन् येथून बर्लिनला आपल्या घरीं फोन करून कळवलें. येथें एकदां टेलिफोनमधून

बोलायला पंधरा फेनिग=दोन आणे पडतात. पूर्वी कागदी मार्कांत अगदींच स्वस्त पडत असे. ट्रॅमलाही पंधरा फेनिग पडतात व परदेशच्या पत्रांना तीस फेनिग पडतात.

गेल्या शनवारीं माझ्या बँकेकडून पैसे व हिशेब मागवला होता तो आला. माझ्या नांवानें आतां ६४ पौंड शिलक आहेत. दर महिना १२ पौंड खर्च धरला तर आणखी पांच एक महिने मला पैसे पुरतील. ते संपायच्या पूर्वी किंवा जमल्यास आतांच आणखी कांहीं तुमच्या सोयीप्रमाणें पाठवावे. एखादा सूटही मला करावयाचा आहे. परस्पर विलायतेस ईस्टर्न बँकच्या पत्त्यावर माझ्या हिशेबीं पाठवावे. **जर्मनींत पाठवूं नयेत.** डॉलर्स घेण्याची जरूर नाहीं असें मला वाटतें. कारण एक तर इंग्लिश बँकमध्यें डॉलर्स ठेवीत नाहींत; आणि दुसरें, पूर्वी आम्हांला वाटल्याप्रमाणें पौंड उतरला नाहीं. तेव्हां पौंडांतच पैसे पाठवावे. मला लागतील तसे पौंडांत किंवा डॉलरांत मी ते येथें मागवीत जाईन.

तुमचें मोडी पत्र चांगलें वाचतां आलें. मला वाटतें माझ्याकरितां म्हणून मुद्दाम स्पष्ट लिहिलें असावें. असें नेहमीं लिहिल्यास माझी मुळींच हरकत नाहीं. कळावें ही विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र १५० वें   बर्लिन,

रविवार, ता. २०-१-१९२४

ती. सौभाग्यवती माईस शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना विशेष. तुमचीं ता. २८ डिसेंबरचीं पत्रें, सोबत आबांचें व श्रीनिवासाचें अर्शी नुकतींच पोंचलीं. त्याप्रमाणें वड्यांचें व अडकित्याचें मिळून एक पार्सल पोंचलें. अडकित्ता मला फार आवडला. तुम्हीं मध्यें एकदां पाठविल्यापैकीं थोडीशी सुपारी मजजवळ आहे. सवडीनुसार आणखी थोडीशी केव्हां तरी पाठवावी. घाई नाहीं. महाराजांच्या कामांत नाना हल्लीं आहेत व कदाचित् त्यांच्या-

बरोबर बनारस, शांतिनिकेतन वगैरे बाजूंच्या प्रवासास जातील असें आबांच्या पत्रावरून कळलें.

मला परवां वामन कोर्डेनें अशी बातमी कळवली कीं, मार्चअखेर लंडनला भरणाऱ्या साम्राज्य प्रदर्शनाकरितां बडोद्याच्या कौन्सिलनें कांहीं विद्यार्थ्यांची निवडणूक केली होती व ती यादी महाराजांच्या पसंतीकरितां त्यांच्याकडे पाठवली होती. त्यावर हुकूम लिहितांना 'माझ्याकडे ही यादी पाठविण्याचें कारण नव्हतें, पण माझी इच्छा समजून घेण्याची असेल तर रा. कोर्डे व सरदेसाई यांचीं नांवें मी सुचवतों,' असें महाराजांनीं लिहिलें आहे. लंडनला बडोद्याच्या कामाकरितां 'धोतीवाला' म्हणून जे गृहस्थ नेमलेले आहेत त्यांच्यावर साम्राज्य प्रदर्शनांत बडोद्याच्या वस्तूंच्या व्यवस्थेची जबाबदारी आहे असें कळतें. ही विद्यार्थ्यांची यादी अर्थात् त्यांच्याकडे पाठवली गेली व त्याची एक प्रत–महाराजांच्या मतासहित–त्यांनीं एका पत्रांत कोर्डेना पाठवली व त्यांना लिहिलें, कीं 'मला जर तुमची मदत लागलीच तर मी तुम्हांला लंडनला येण्याविषयीं कळवीन; व तुम्हांला येण्याला खर्च व अलावन्स वगैरे जो कांहीं खर्च लागेल त्याकरतां आतांच तुम्ही अर्ज करावा.' माझ्याविषयीं अर्थात् त्यांत कांहीं एक उल्लेख नव्हता व मला धोतीवाल्यांचें पत्रही आलें नाहीं. पण कोर्डे यांनीं दाखविलेल्या यादींत महाराजांनीं माझें नांव सुचविलेलें मीं पाहिलें. कोर्डेबरोबर माझीही जाण्याची अत्यंत इच्छा आहे. कारण पदरचा पैसा खर्च न होतां इंग्लंडला जाणेंही होईल, नवीन देश पाहणें होईल; शिवाय कोर्डे व मी आज दोन वर्षें कोठल्याही प्रवासांत नेहमीं बरोबर होतों. तेव्हां या खेपेस विलायतची सफर आम्ही दोघांनीं केल्यास आम्हां दोघांस सुखावह होईल व आमच्याकडून कामाची जी कांहीं मदत लागेल ती आम्ही जोडीनें मेहनतीनें करूं. कोर्डेनीं धोतीवाला यांस उत्तरांत माझें नांव सुचवलेंच आहे; पण मला जायला मिळेल कीं नाहीं तें सांगतां येत नाहीं. या बाबतींत बडोद्याहून तुम्हांला, मला मदत करतां येईल का? मला जायला मिळालें तर किती आनंद होईल याची कल्पना तुम्हांला करितां येईलच. पुन्हा ज्या वेळीं हें प्रदर्शन सुरू होणार, त्या सुमारास आम्हांला सुट्टी होणार व मग माझ्या कामाचेंही मुळींच नुकसान होणार नाहीं. इंग्लंडला कॉलेजांत माझ्या

बरोबर असलेली ' महाजनी ' वगैरे किती तरी स्नेही मंडळी आहेत, त्यांचीही अनायासें गांठ पडेल. तर जमल्यास या बाबतींत खटपट करावी. धोतीवालांची व नानांची ओळख आहे का ?

मी, डॉक्टरनीं सांगितल्याप्रमाणें एक आठवडाभर वनस्पतिआहाराचें पथ्य केल्यावर पुन्हा त्यांच्याकडे गेलों होतों. आतां मला बरेंच चांगलें वाटत आहे. पण डॉक्टरनीं आणखी चारसहा आठवड्यांपर्यंत पथ्य करायला सांगितलें आहे. (Stomach catarrh) आहे असें त्यांचें म्हणणें आहे. इतर कांहीं भानगडी नाहींत, याची खात्री करून घेण्याकरितां डॉक्टरनीं माझ्या पोटांतले क्षार (acidity of the stomach) तपासले व माझ्या पोटांत ॲसिड जास्त आहे असें ते म्हणतात. त्याचप्रमाणें ' क्ष ' किरणांनींही त्यांनीं माझें पोट तपासलें. त्यांत त्यांना पोटांत इतर कोणताही वाईट विकार नाहीं असें आढळून आलें. मात्र पोट जरा जास्त खालीं झुकलें आहे. मला स्वतःला सुद्धां सर्व पाहायला मिळालें. याच संधीला ' क्ष ' किरणांनीं हृदय आणि लंग्ज् मीं तपासून घेतलीं, व तीं उत्तम स्थितींत आहेत असें डॉक्टरनीं सांगितलें. तूर्त पथ्यावरच राहायला सांगितलें आहे. गोड पदार्थही फारसे खायचे नाहींत. शिवाय त्यांनीं सोडा, बिस्मथ, मॅग्निशिअम ऑक्साइड यांची पूड पोटांत घ्यायला दिली आहे आणि आठवड्यांतून दोनदां डॉक्टरकडे जाऊन पोट आंतून धुऊन घ्यायचें असें ठरलें आहे. हें ते कसें करणार माहीत नाहीं. बहुतेक घशांतून नळी पोटांत घालतील. माझ्या कामाला किंवा इतर कशालाही यानें अडथळा येत नाहीं; आणि दोन वर्षें सारखा मांसाहार घेतल्यावर मधें महिनाभर वनस्पतिआहार घेतला तर तें प्रकृतीला चांगलेंच. कारण पुन्हा मांसाहार घेतल्यावर त्याचा शरिरावर चांगला परिणाम होईल.

नानांनीं मागितलेल्या पुस्तकांचा तपास चालविला आहे. लवकरच त्यांच्याकडे यादी पाठवीन.

अलीकडे एकदोन दिवस बरीच उष्णता पडूं लागली आहे. टॅंपरेचर शून्याच्या वर ४।५° असतें. रस्त्यावरचा बर्फ वितळून जिकडे तिकडे चिखल

झाला आहे. सोबत श्रीनिवासला एक लहानसें पत्र पाठवीत आहें तें त्याला पोंचतें करावें.

सोमवार, ता. २१ जानेवारी १९२४

आश्चर्याची गोष्ट म्हणजे आज सकाळींच या आठवड्याचें हिंदी टपाल–म्हणजे नानांचें ४-१ चें पत्र मिळालें. साधारण टपाल बुधवारीं येतें. पण हें पत्र आजच मिळालें. त्यांत उल्लेख केलेलीं पार्सलें संध्याकाळीं कदाचित् येतील. महाराजांच्या बरोबर बनारस, कलकत्ता वगैरे बाजूला नाना प्रवासास जाणार ही गोष्ट चांगलीच आहे. म्हणजे प्रवासानें हवापालट होऊन प्रकृतीला चांगलें वाटेल व शिवाय शांतिनिकेतन वगैरे पाहायला मिळेल.

डॉ. जिवराज मेहेतांच्या लग्नाची बातमी ऐकून फार आनंद वाटला. त्यांना अभिनंदनपर पत्र या पत्रासोबत लिहीत आहें तें त्यांना पोंचवावें.

आज संध्याकाळीं नेहमींप्रमाणें पिंगपाँग खेळायला क्लबमध्यें जाणार आहें. दर सोमवारीं रात्रीं आम्ही पिंगपाँग खेळत असतों. पुष्कळ मजा येते. असो. माझ्याबद्दल कोणत्याही तऱ्हेची काळजी बाळगूं नये. कारण मी प्रकृतीला नीट जपत असतों. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र १५१ वें

बर्लिन,

ता. ४-२-१९२४

ती. सौ. माईंस शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना विशेष. तुमचीं गेल्या खेपेचीं पत्रें पोंचल्याचा उल्लेख मागल्या पत्रांत केलाच आहे. या आठवड्याला अद्याप टपाल आलें नाहीं. उद्यां येईल असें वाटतें. गेल्या आठवड्याला पार्सलही पोंचलें. त्यांत बेसनाचे व तिळाचे लाडू होते. दोन्ही आवडले. बेसनाचे जास्त आवडले.

शंभुरावांना परत येण्याविषयीं कारखान्याचीं पत्रें येत आहेत. पण येथें बरींच देवघेवीचीं कामें असल्यामुळें त्यांचा तूर्त परत जाण्याचा विचार

नाहीं. त्यांच्या बायकोला ते येथें आणण्याचा प्रयत्न करीत आहेत आणि तो माझ्या मतें स्तुत्य आहे. गोदूताईंची* थोडीशी इच्छा असावी असें वाटतें. त्यांना दोघांना तेथें राहण्यास जो खर्च येतो तितक्याच खर्चांत येथें बिऱ्हाड करून राहिल्यास राहतां येईल. कारखाना संपन्नावस्थेंत असतांना आपल्या-कडल्या बायकांना अशा दूर देशांत पाठवून इकडच्या चालीरीति, भाषा, लोक-समाज या गोष्टींची माहिती करून घेण्याची व त्या योगें आपल्या ज्ञानांत व विचारांत भर घालण्याची संधि कारखानदारांनीं फुकट घालवूं नये. खर्च थोडा-बहुत कमजास्त झाला, तरी त्याचें हल्लींच्या त्यांच्या संपन्नावस्थेंत त्यांना कांहीं वाटूं नये. ज्याप्रमाणें कारखाना भरभराटीस येऊन, आपल्या कुटुंबाची, देशाची औद्योगिक व आर्थिक स्थिति सुधारण्याची कारखानदारांची महत्त्वाकांक्षा असते, त्याचप्रमाणें त्यांनीं हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, देशाची सामाजिक स्थिति व आपल्या कुटुंबाची, घरांतील सर्व माणसांची व संसाराची एकंदर स्थिति सुधारून संसार सुखावह करावयाचा असेल तर कुटुंबाचे व समाजाचे आधारस्तंभ अशा ज्या आपल्या बायका त्यांनीं या देशांत येऊन अनुभव घेतला पाहिजे. पुरुषांच्या उन्नतीप्रमाणेंच व समाजाच्या औद्योगिक उन्नतीप्रमाणेंही आपल्या समाजाची बायकांकडून आंतून उन्नति करण्याची जरुरी आहे व तिला मी तरी जास्त महत्त्व देतों. त्यांतून गोदूताईंना येथें नवरा बरोबर आहे अशी उत्तम संधि आहे. भाषाही कांहीं दिवसांत थोडी-बहुत येऊं लागेल. इंग्रजी उत्तम आलें पाहिजे असें कोठें आहे? पार्वतीबाई आठवल्यांना कोठें पूर्वी इंग्रजी येत होतें? या बाबतींत मी स्वतः गोदूताईंना पत्र पाठवणार होतों. पण मला सध्यां वेळ नाहीं. तुम्हींच शक्य असल्यास हे विचार त्यांना कळवावे.

माझें पोटांत दुखणें आतां जवळ जवळ बरें झालें आहे. तरी आणखी एक आठवडाभर पथ्य चालू ठेवणार आहें. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

---

* श्री. सौ. गंगाबाई (गोदूताई) जांभेकर, शंभुरावांची पत्नी, ही श्यामकान्ताची आतेबहीण.

श्री

<u>पत्र १५२ वें</u> बर्लिन,

ता. ९-३-१९२४

तीर्थरूप नानांस शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना विशेष. तुमचें ता. १३-२चें दिल्लीहून लिहिलेलें व आबांचें व माईचें ता. १५।२ ला बडोद्याहून लिहिलेलें अशीं पत्र गेल्या आठवडयास पोंचलीं व सविस्तर माहिती कळून समाधान झालें. आमच्या इंग्लंडला जाण्यासंबंधानें बडोद्यास रा. पगारांना धोतीवालांनीं लिहिलें आहे व कोर्डेनींही परस्पर पगारांना लिहिलें आहे. तेव्हां त्याची व्यवस्था नीट लागेल असें समजतों. मात्र आमच्या परीक्षेचें लफडें कितपत आड येईल एवढाच प्रश्न आहे. टर्म संपून लॅबोरेटरी बंद झाल्यामुळें मला तूर्त दीड महिन्याकरतां काम बंद ठेवावें लागत आहे. आमचे प्रोफेसर अद्याप आले नाहींत, त्यामुळें पुढचें नक्की कांहींच सांगतां येत नाहीं. त्यांच्या पूर्वीच्या ठरलेल्या बेतांप्रमाणें ते जानेवारींत येथें यावयास पाहिजे होते व अशाच समजुतीनें आम्हीं प्रयोगशाळेंत आमचें काम चालू ठेवलें होतें. त्यांना यायला इतका उशीर होईल ही कल्पना अगोदर असती तर सुरुवातीपासूनच दुसऱ्या एखाद्या लॅबोरेटरींत दुसऱ्या प्रोफेसरांच्या हाताखालीं कामाला सुरुवात केली असती. एकंदर या इन्स्टिटयूटमध्यें आल्यामुळें वेळाच्या दृष्टीनें आमचें फार नुकसान झालें. पण त्याला इलाज नाहीं. आतां कांहीं झाल तरी फार तर दोनचार महिन्यांचाच प्रश्न आहे. टॉम्स आज येणार अशी रोज वदंता असते आणि ते इतक्यांत आलेच, आणि कांहीं एक बदल न सुचवतां त्यांनीं आमचें काम पसंत केलेंच, तर आणखी दोन महिन्यांनीं मी डॉक्टर होण्यास हरकत नाहीं.

माझ्ा येथें लग्न झालें अशी बातमी XXX पसरीत आहेत हें कळून फारच आश्चर्य वाटतें. कारण एक तर लग्न झाल्याची शंका येण्यासारखी माझ्या हातून अद्याप येथें कोणतीच गोष्ट घडली नाहीं, आणि घडली असल्यास ती XXX ना कळण्याचा संभव तर मुळींच नाहीं. कारण माझा त्यांचा पत्रव्यवहार मुळींच नसतो. असो. या गोष्टी ऐकाव्या आणि सोडून द्याव्या. एकंदरींत इतके दिवस

येथली राहणी व लोकांचे स्वभाव निरीक्षण करून माझें तर दिवसेंदिवस असें ठाम मत होत चाललें आहे, कीं या देशांत लग्न करून आपण सुखी होऊं शकणार नाहीं. बाकी हिंदुस्थानांत तरी मुली बघून नेहमींच्या पद्धतीनें लग्न करण्याच्या संबंधीं माझी बरीच हरकत आहे. कारण त्यांत प्रेमाचा भाग कमी असतो. तेव्हां एकंदरींत लग्न हा एक मोठाच प्रश्न माझ्यापुढें आहे. कांहीं झालें तरी पाश्चात्य देशांतील मुलीशीं लग्न करण्याचा माझा विचार कधींही झाला नाहीं व होईलसें मला वाटत नाहीं.

माझ्या पोटाचें दुखणें साफ बरें झालें असें मला वाटलें होतें, पण पुन्हा मधून मधून मला त्रास होऊं लागला. माझा मित्र रॉय याच्या खटपटीनें त्याच्या मेडिकल कॉलेजच्या हॉस्पिटलमध्यें त्याच्या मुख्य प्रोफेसरांच्या देख-रेखीखालीं मीं पुन्हा मला तपासून घेतलें. यापेक्षां मोठ्या डॉक्टरांकडून येथें बर्लिनमध्यें तपासून घेणें शक्य नाहीं. कारण ते म्हणजे येथल्या सर्वांत मोठे समजले जातात. शिवाय त्यांच्या हाताखालीं आणखी एक प्रोफेसर व २।३ डॉक्टर होते. X-ray examination, stomach acidity, blood examination, stool examination वगैरे सर्व त्यांनीं केलें. प्रोफेसरांचें असें मत आहे कीं, मी इतर बाबतींत normal आहें. पचन चांगलें होतें, अवरोध नाहीं, हार्ट, लंग्ज् उत्तम स्थितींत आहेत, भूक चांगली लागते. फक्त पोट जरा वाढलें असून पोटांत गॅसिस होतात. मग कांहीं दिवस त्या डॉक्टरांचें औषध घेतलें. मजा अशी कीं चारपांच दिवस अगदीं चांगले जातात, व मग मध्यें एखादे दिवशीं पोटांत दुखूं लागतें. हें दुखणें फार थोडेंच म्हणजे सहज सहन करण्यासारखें असतें व त्यामुळें माझ्या इतर व्यवसायांत बाध येत नाहीं. शिवाय सबंध दिवसांत एखादे वेळेस दोनतीनदांच (दर खेपेस दहापंधरा मिनिटें) दुखतें. एखादे वेळेसच जास्त वेळ दुखतें, तर कांहीं दिवस मुळींच दुखत नाहीं. काल पुन्हा मेडिकल कॉलेजमध्यें प्रो. हिस यांजकडे गेलों होतों. त्यांनीं आतां त्यांच्या एका मेडिकल हॉस्पिटलमधें पोटाला मालिश (massage) करून घेण्यास सांगितलें आहे. त्याप्रमाणें मीं कालपासून सुरुवात केली आहे. पाहावें आतां काय होतें तें. एकंदरींत माझ्या पोटाचें दुखणें जरी फार काळजी करण्यासारखें व भीतीचें नसलें, तरी मला बरेच दिवस त्रास झाला हें खरें.

डॉक्टोरेट

सोमवार, ता. १०-३-२४

गेल्या शनिवारीं संध्याकाळीं आमचे प्रोफेसर टॉम्स बायकोसह येथें आले. संध्याकाळीं सहज मीं त्यांच्या घरीं टेलिफोन करून पाहिला तों ते घरीं होते. त्यांना भेटायला आज सकाळीं इन्स्टिट्यूटमधें गेलों होतों. आपल्या प्रवासाची हकीकत ते सांगत होते. जपानच्या धरणीकंपांतून थोडक्याच चुकामुकीनें पार पडून ते चीनला गेले. तेथें महिनाभर होते. तेथें त्यांचीं व्याख्यानें झालीं. मग जपानमधें जाऊन तेथेंही त्यांनीं व्याख्यानें दिलीं. तेथून फिलिपाइन्स, जाव्हा, सिलोन वगैरे ठिकाणीं जाऊन मग एका जर्मन जहाजानें परत येत असतांना त्या जहाजाचा हिंदुस्थानावरून जाण्याचा विचार झाला. मुंबईला ते पांच दिवस होते. इतक्यांत बनारसहून बडोद्याच्या महाराजांनीं त्यांना बडोद्यास येण्यास आमंत्रण दिलें. पण त्यांनीं केलेली तार इंग्रज सरकारानें दहा दिवस अडकवून ठेवली व त्यांचें जहाज मुंबई सोडून कराचीला पोंचल्यावर तेथें त्यांना ती तार देण्यांत आली. त्यानंतर तिचा कांहीं उपयोग झाला नाहीं. एकंदरींत बडोद्यास जातां न आल्यामुळें त्यांना फार वाईट वाटलें. इंग्रज सरकारच्या त्रासामुळें त्यांना हिंदुस्थान पाहतां आलें नाहीं असें ते म्हणाले. सध्यां त्यांना येथें फार कामें आहेत. तेव्हां पुढच्या आठवड्यांत माझ्या कामासंबंधीं आपण बोलूं असें ते म्हणाले. बाकी तूर्त सुट्टीच आहे.

हिंदुस्थान असोसिएशनच्या वतीनें येथें आजपासून हिंदी लोकांचें एक पिंगपाँग टूर्नमेंट आहे, त्यांत मी खेळणार आहें. येत्या शनिवारीं तें संपेल. बहुतेक मीच जिंकीन असें मला वाटतें. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

पिंगपाँगचा खेळ



पृ. ३१३] श्यामकान्त

श्री

<u>पत्र १५३ वें</u> बर्लिन,

ता. १७-३-१९२४

ती. नानांस शिरसाष्टांग नमस्कार, वि. वि. तुमचें ता. २२-२चें बडोद्याचें पत्र पोंचलें व तुमच्या प्रवासांतील वगैरे हकीकत कळली. त्याचप्रमाणें मुंबईहून भाऊंचें पत्र व ५० पौंडांचा चेक पोंचला. पत्रावर अडीच आण्यांचीं तिकिटें असल्यामुळें तीस फेनिग दंड भरावा लागला. भाऊंनीं मला येथें जर्मनींत पैसे पाठवल्यामुळें माझी थोडीशी गैरसोय होईल. येथून सरकारच्या परवानगीशिवाय परदेशीं पैसे पाठवावयाची बंदी असते. परवानगी मिळणें फार जड जातें. बरें परस्पर पत्रांतून चेक इंग्लंडास पाठवला तर तें पत्र जर येथें फोडून पाहिलें तर पैसे जप्त करण्याचा हक्क सरकारास आहे; आणि रजिस्टर्ड पत्र असलें तर बहुतेक फोडून पाहतात. येथें बँकेंत पैसे ठेवावे तर ते जर्मन मार्कांत मोडतांना बँकेंत भाव वाईट मिळतो व शिवाय व्याज मिळत नाहीं तें नाहींच. नाहीं तर आम्ही इंग्लंडहून पौंडांच्या नोटा आमच्या बँकेकडून मागवतों.—येथें पौंडाच्या नोटा मिळत नाहींत, व त्या न मोडतां तशाच व्यवहारांत वर्तमानपत्रांत दिलेल्या भावानें चालतात, किंवा मग खाजगी रीतीनें चांगल्या भावानें मोडतों. असो. आतां मी जाईन तेव्हांच तो चेक इंग्लंडला घेऊन जाईन.

इंदुबाईचें पत्र पोंचलें. त्यांना पुढच्या आठवड्यास उत्तर लिहीन. प्रो. टॉम्स हल्लीं माझें काम वाचून पाहात आहेत. त्यासंबंधीं पुढच्या आठवड्यास लिहीन.

गेल्या आठवड्याला ‘ हिंदुस्थान हाउस ’मध्यें हिंदी लोकांकरितां एक पिंगपाँग टूर्नमेंट झालें. त्यांत मीं जिंकून पहिलें बक्षिस मिळवलें. आज पुन्हा आमच्या जर्मन क्लबांत एक पिंगपाँग टूर्नमेंट आहे. त्यांतही मी खेळणार आहें. बहुतेक तेथेंही मीच जिंकीन असें वाटतें.

आज मला फारच घाई आहे म्हणून जास्त लिहीत नाहीं. इंग्लंडला जायची वाटाघाट धोतीवालांशीं करीत आहों. डॉक्टोरेट आटपून मगच जावें

अशी इच्छा आहे. पहावें कसें काय जमतें तें. पगारांचे धोतीवालांना पत्र आलें व मला बोलावलें आहे. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र १५४ वें बर्लिन,

ता. २४।३।१९२४

ती. सौ. माईस शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना विशेष. तुमचीं ता. २९।२ चीं पत्रें पोंचलीं.

माझा परीक्षेचा प्रबंध मी टाइप करून आणला व तो सध्यां माझे प्रोफेसर वाचून पाहत आहेत. दुसरी एक अडचण आम्हांला आतां आली आहे. माझा येथें अभ्यास फक्त चार टर्म झाला आहे व कोर्डेचा पांच टर्म झाला आहे. परीक्षेला सहा टर्म पाहिजेत असा येथला नियम आहे. पण आम्ही आमच्या हिंदुस्थानांतल्या टर्म भरीस घेण्यास सांगत आहों; किंवा निदान त्याचा एखादा अंश तरी मोजावा. त्याकरतां फॅकल्टीकडे आम्हीं एक अर्ज पाठवला आहे, त्याचा निकाल फॅकल्टीच्या मे महिन्याच्या सभेंत होईल व निकाल चांगला झाला, तर आमचा निबंध स्वीकारला जाऊन आम्हांला परीक्षेला बसायची परवानगी मिळेल. प्रो. टॉम्सनीं आम्हांला आश्वासन दिलें आहे व जूनमधें परीक्षेला बसतां येईल असें त्यांचें मत आहे. टॉम्स फॅकल्टींत आहेतच. तोंपर्यंत घरीं बसून अभ्यास करीत राहूं व परीक्षेची तयारी करूं.

कोर्डेच्या डोळ्यांविषयीं एका पत्रांत नानांनीं विचारलें आहे. मागें दीड वर्षांपूर्वी आम्ही दोघे लॅबोरेटरींत असतांना कोर्डेच्या हातून एक मोठा स्फोट झाला व त्याच्या एका डोळ्याला थोडी इजा झाली. मग तो डॉक्टरकडे कांहीं दिवस जात होता. त्याचा एक डोळा थोडासा अधू झाला व त्या डोळ्यानें कांहीं कमी दिसतें, म्हणून त्याला चष्मा वापरावा लागतो. पण तो क्वचित्च चष्मा लावतो. इतर लोकांना त्याच्या डोळ्यांत विशेष कांहींच दिसून येत नाहीं. फक्त त्याला स्वतःलाच दिसण्यांत जो कांहीं फरक वाटतो तेवढाच.

अजीबातच आंधळा व्हायचा तो थोडक्यांत बचावला. ज्या प्रयोगांत त्याच्या हातून स्फोट झाला तोच प्रयोग पुढें मीं पुन्हा करून पाहिला. त्या वेळीं लॅबोरेटरींतले इतर विद्यार्थी मात्र पळून गेले. मी खूप काळजी व खबरदारी घेऊन तो प्रयोग चांगल्या रीतीनें पार पाडला. अर्थात् पुढच्यास ठेंच, मागचा शाहणा. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

<u>पत्र १५५ वें</u>

बर्लिन,

ता. ३१-३-१९२४

ती. नानांस शिरसाष्टांग नमस्कार, वि. वि. तुमचीं ता. ७-३-२४ चीं पत्रें मला ता. २५-३ रोजीं पोंचलीं, व सविस्तर मजकूर समजून समाधान वाटलें. माझ्या पोटांत दुखण्याचा विकार विशेष काळजी करण्यासारखा नाहीं हें मीं पूर्वीं लिहिलेंच आहे.

मी गेल्या गुरुवारीं युनिव्हर्सिटीच्या डीनला भेटायला गेलों होतों. मीं मुंबई विश्वविद्यालयाच्या बी.ए. आणि बी. एस्सी. अशा दोन परीक्षा दिल्या असल्यामुळें माझ्या टर्मसंबंधानें कांहीं एक अडचण होणार नाहीं असें ते म्हणाले. फक्त नियमाप्रमाणें मला फॅकल्टीकडे अर्ज करावा लागेल. त्याचा निकाल मेमध्यें होईल आणि ताबडतोब मला माझा प्रबंध देतां येईल, व मग जूनच्या सुमारास परीक्षेस बसतां येईल. माझा प्रबंध छापून तयार आहे. आतां कोणत्याही तऱ्हेची पंचाईत नाहीं. परीक्षेची तयारी करीत आहें. परीक्षा आटोपल्याबरोबर लंडनला जाईन. तोंपर्यंत कोर्डे तेथें असेल. तो आणखी दोनतीन दिवसांनीं येथून लंडनला जाईल. मी परीक्षा आटपून मग तेथें जाऊन त्याची सुटका करीन कीं, तो लागलींच येथें येऊन परीक्षेला बसेल. असा आमचा बेत आहे. माझें लबोरेटरींतलें काम संपल्यामुळें बरीच काळजी आणि बोजा हलका झाला. आतां त्याहीपेक्षां कठिण परीक्षेचें काम आटपल्या-

वर अगदींच हलकें वाटेल. मला वाटतें ही माझी विश्वविद्यालयांतील शेवटली परीक्षा. यापुढें मी कोठल्याही परीक्षेस बसणार नाहीं. बाकी ही परीक्षा आटपली कीं, पुढें काय हा प्रश्न पुनः पुढें उभा राहणार!

हल्लीं हवा थोडी थोडी गरम पडूं लागली आहे. टेंपरेचर सध्यां शून्यावर पांचसात डिग्री असतें. घरांतली कृत्रिम उष्णता बंद केली आहे; तरी अद्याप हिंवाळ्याचा ओव्हरकोट घातल्याशिवाय बाहेर जायची सोय नाहीं. हातांतही पातळ हातमोजे घालावे लागतात. जेथें इतके दिवस बर्फ व स्केटिंगची जागा होती, तेथें आतां टेनिस कोर्टें तयार होऊं लागलीं आहेत. येत्या रविवारपासून आमचा क्लब टेनिस खेळूं लागेल. मला अभ्यासामुळें टेनिस खेळायला फारसा वेळ मिळणार नाहीं. तरी थोडेंबहुत खेळेन म्हणतों. कांहीं दिवसांपूर्वीं मला एका अनोळखी मुलीचें पत्र आलें कीं, " तुम्ही माझ्याबरोबर उन्हाळ्यांत माझ्या घरीं आमच्या कोर्टावर टेनिस खेळायला याल का? " मला थोडेंसें आश्चर्यच वाटलें. तिनें मला कोठें तरी टूर्नमेंट खेळतांना पाहिल असल पाहिजे. मीं तिला " सध्यां मला अभ्यासामुळें फारसा वेळ होणार नाहीं, पण जमल्यास केव्हां तरी खेळायला तुमच्याकडे मोठ्या आनंदानें येईन. " असें उत्तर लिहिलें आहे.

असो. येथें मे महिन्यांत पार्लमेंटचीं नवीन इलेक्शनें आहेत. वेगवेगळे पक्ष मतांकरितां खटपट करीत आहेत. कांहीं थोडे कॉम्युनिस्ट व डेमोक्रॅट आहेत. पण जर्मन लोकांचा कल हिट्लरच्या नॅशनल पार्टीकडे आहे. नॅशनॅलिस्ट लोक अर्थात् कॉम्युनिस्टांच्या विरुद्ध व यहुद्यांचे द्वेष्टे आहेत. त्याचप्रमाणें फ्रेंच लोकांशीं नमून वागण्यास ते तयार नाहींत. पाहावें आतां काय निकाल होतो तो.* कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

---

* हल्लीं हिट्लर पुढें आला, त्याचा उद्योग तेव्हांपासून सुरू होता.

श्री

पत्र १५६ वें

बर्लिन,

ता. १४-४-१९२४

ती. नानांस शिरसाष्टांग नमस्कार, वि. वि. तुमचें व माईचें ता. २१-३चें पत्र व एक डिंकाच्या लाडूंचें पार्सल पोंचलें.

कोर्डे याचें नुकतेंच इंग्लंडहून पत्र आलें. वेंब्ले प्रदर्शनाच्या तयारीची धामधूम चालू आहे. हिंदुस्थानचा भागच सर्वांत मोठा व सुंदर आहे असें तो लिहितो.

परवां शंभुरावांना संध्याकाळीं मीं चहाला माझ्या घरीं बोलावलें होतें. पुष्कळ वेळ गप्पा मारीत बसलों होतों. ते माधव किर्लोस्करची वाट पाहात बसले आहेत. बर्लिनला जाऊन येऊन असतात. काल रात्रीं ते व मी येथें नवीनच निघालेल्या एका हिंदी रेस्टारॉंमधें जेवावयास गेलों होतों. डाळ, भात, चपात्या, कॉलीफ्लॉवरची व बटाट्याची भाजी होती. भाजीखेरीज बाकीचे पदार्थ वाईटच झाले होते; तरी आणखी कांहीं दिवसांनीं येथें हिंदी जेवणसुद्धां मिळूं लागेल असें वाटतें.

आज सकाळीं गणू पंडित व नामदेव भाटे असे मला भेटायला आले होते. त्यांना हल्लीं सुट्टी आहे. सुट्टीकरितां पंडित येनाहून येथें आले आहेत. त्याचप्रमाणें काल सकाळीं अधिकारी म्हणून माझे एक मित्र येथें आले होते. ही सर्व मंडळी अगदीं काटकसरीनें व हाल करून राहतात. कारण ज्याला त्याला पैशाची टंचाई आहेच व येथें महागाई तर फारच झाली आहे. अधिकारी, भाटे वगैरे तर हातानेंच स्वयंपाक करून जेवतात. पंडितनीं डॉक्टोरेटचा कोर्स घेतला आहे. येत्या टर्मला रिसर्च वर्कला सुरुवात करतील. म्हणजे बहुतेक आणखी दीड वर्षानें डॉक्टर व्हावेत.

माझा पुढचा बेत अद्याप कांहींच नक्की नाहीं. तरी तूर्त चारपांच महिन्यां-पर्यंतचा तरी बेत ठरलेला आहे. इंग्लंडला गेल्यावर कदाचित् आणखी पुढचे कांहीं बेत करितां येतील.

सध्यां टेंबे म्हणून एक विद्यार्थी येथें नुकतेच हिंदुस्थानांतून आले आहेत. त्यांना याच घरीं दुसऱ्या एका खोलींत घेतले आहेत. माझी तब्येत आतां चांगली आहे. कळावें, ही विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र १५७ वें

बर्लिन,

ता. ३-५-१९२४

ती. नानांस शिरसाष्टांग नमस्कार, वि. वि. तुमचीं ता. ४-४ व ११-४ चीं अशीं दोन्ही पत्रें येथ या आठवड्याला येऊन पोंचलीं व समाधान वाटलें. माझ्या पोटांत आतां मुळींच दुखत नाहीं. इंजेक्शनेंही बंद केलीं. डॉक्टर म्हणतात त्याप्रमाणें नर्व्हचा त्रास होत होता. अभ्यास वगैरे फार न करून कांहीं दिवस स्वस्थ बसून विश्रांति घेतल्यास अगदीं बरा होईन असें ते म्हणाले होते. असो. आतां परीक्षा झाल्यावर मग विश्रांतीचा विचार करीन. आतां एकदोन महिन्यांचाच प्रश्न आहे. डॉक्टरचें बिल मात्र मला बरेंच आलें. असो. आजच सकाळीं युनिव्हर्सिटीच्या डीनला माझा प्रबंध दिला. मध्यंतरीं फॅकल्टीची सभा होऊन आमच्या अर्जाचा विचार केला गेला व आम्हांला प्रबंध द्यायला परवानगी मिळाली. आतां हा प्रबंध परीक्षकांकडे जाईल व तेथून परत यायला महिनाभर लागेल; म्हणजे मग तोंडी परीक्षेला आम्ही मोकळे होऊं. प्रबंधाबरोबर २०० मार्कांची फी द्यावी लागली. तोंडी परीक्षा केमिस्ट्री, फिजिक्स, बोटॅनी व फिलॉसॉफी या चार विषयांत होणार आहे. पैकीं पहिल्या मुख्य विषयाची परीक्षा अर्धा अर्धा तास होईल. तोंडी परीक्षा बरीच कठिण असते, असें म्हणतात.

तुम्हीं प्रो. टॉम्सना लिहिलेलें पत्र पोंचलें. तें मी त्यांना पाठवलें व त्याचें उत्तरही त्यांनीं पाठवलें. बडोद्यास जातां आलें नाहीं व महाराजांना व तुम्हांला भेटतां आलें नाहीं याबद्दल त्यांना अतिशय वाईट वाटत आहे असें

ते लिहितात. मागें कळवल्याप्रमाणें महाराजांची तार त्यांना फार उशिरां देण्यांत आली.

तानुकाकांच्या* कठिण आजाराची बातमी ऐकून फार वाईट वाटतें. इतके दिवस आजारी पडायला कारण काय झालें असावें हेंच कळत नाहीं. तारुण्यांत प्रकृतीवर कितीही अत्याचार झाले असले तरी तेंच आजारपणाचें कारण असें म्हणतां येणार नाहीं. मला त्यांची फार कींव येते.

चहा अद्याप आला नाहीं. पुढच्या आठवडयांत बहुतेक येईल. येथें नुकताच सेनगुप्त नांवाचा एक बंगाली विद्यार्थी क्षयरोगानें वारला.

ता. ५-५-१९२४

आज माझा वाढदिवस. पंचवीस वर्षें वयाचीं संपलीं. येथील घरांतल्या मंडळींनीं त्यांच्या पद्धतीप्रमाणें माझें अभिनंदन करून लहानसहान बक्षिसें दिलीं. फ्रॉ. म्युलरकडूनही पोष्टांतून पत्र व बक्षिस संध्याकाळीं येईल अशी अपेक्षा करीत आहें.

हल्लीं हवा बरी पडते. ऊन पुष्कळदां पडतें. तरी खोलींत थंडीचा त्रास अद्याप थोडाबहुत होतोच. कोर्डेचें पत्र नुकतेंच लंडनहून आलें. त्यानें प्रदर्शनाची हकीकत लिहिली आहे. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र १५८ वें बर्लिन,

ता. ५-१२-१९२४

ती. सौ. माईस शिरसाष्टांग नमस्कार, वि. वि. तुझें, नानांचें, आबांचें व श्रीनिवासाचें अशीं ता. १८-४ चीं पत्रें गेल्या आठवड्यास मिळालीं. त्यांत तानुकाकांच्या मृत्यूची हकीकत होती. ते गेल्याबद्दल मला फारच वाईट वाटतें. मला ते विशेष आवडत असत. असो. झालें त्याला आतां इलाज नाहीं आणि

* श्री. भास्कर सखाराम सरदेसाई, हे श्यामकान्ताचे कनिष्ठ चुलते.

शोक करीत बसण्यांतही अर्थ नाहीं. संसारांत वाटेल त्याच्या मृत्यूची बातमी ऐकण्याकरतां व ती सहन करण्याकरतां आपण तयार असलें पाहिजे. नाहीं का ?

' चहा मुंबईहून गेलाच असेल,' ' चहा मुंबईहून पाठवल्याचें कळतें,' वगैरे तुमच्या गेल्या एक दोन पत्रांत होतें. परंतु चहाचा अद्याप कांहीं पत्ता नाहीं. मजजवळ सध्यां हिंदी चहा मुळींच नाहीं. येथें चांगला मिळत नाहीं. कोर्डेला विलायतेहून पाठवायला लिहिलें होतें, त्याप्रमाणें त्यानें तो आठवड्या-पूर्वी पाठवला, पण मला तो अद्याप मिळाला नाहीं. मध्येंच जप्त झाला, कीं जकातीच्या ठिकाणीं पडला आहे कांहीं कळत नाहीं. त्याला मी पुन्हा तपास करायला लिहिलें आहे. मी जुलै अखेरपर्यंत येथें राहीन व पुढें इंग्लं-डला जाईन. तेव्हां जून महिन्याच्या अखेरपर्यंत तुम्हांला पार्सलें पाठवतां येतील. जुलैच्या सुरुवातीपासून पार्सलें पाठवणें बंद करावें.

चिवडावजा चुरमुऱ्यांचें एक पार्सल गेल्या आठवड्यास पोंचलें. बहुतेक घरीं केलेला चिवडा असावा आणि त्या दृष्टीनें पाहतां कांहीं वाईट नव्हता.

प्रो. द. वा. पोतदारांनीं विचारलेल्या मोगल चित्रांविषयीं तपास करण्याकरतां लाइप्झिगला कर्वेला पत्र लिहिलें होतें. त्याला थोडीशी माहिती मिळाली. ती अशीः—The firm "Harrasswitz" in Leipzig had once formerly a collection of such pictures, which, however, are already since long sold off. The place of publication etc., it was not possible for me to find out.

खरेंच. कर्वेची परीक्षा आटपून तो डॉक्टर झाला. तो लवकरच येथें येईल व नंतर इंग्लंडला जाईल. तेथून पुन्हा येथें येऊन मग तो जुलैमध्यें आफ्रिकेस आपल्या भावाकडे जाईल व तेथून पुढें हिंदुस्थानास जाईल.

हल्लीं हवा चांगली असते. ऊन चांगलें पडतें. थंडी फार नसते. काल रविवारीं आमच्या टेनिस क्लबकडून दुसऱ्या एका क्लबशीं सामना खेळावयास गेलों होतों. मी स्वतः सिंगल्स आणि डबल्स असे माझे दोन्ही सामने जिंकलों. पण आमचा क्लब जिंकला नाहीं. कारण माझ्याशिवाय बहुतेकांनीं मार खाल्ला.

मी रोज चारपांच तास नियमित रीतीनें अभ्यास करून परीक्षेची तयारी करीत आहें. जूनअखेर परीक्षा देण्याचा विचार आहे. असो. आज जास्त कांहीं लिहिण्यासारखें नाहीं. माझा फोटो मागितला आहां तो परीक्षा झाल्यावर पाठवीन. सोबतचें पत्र तिकीट लावून पोष्टांत टाकावें. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

पत्र १५९ वें

Berlin,
21st *June* 1924

My dear Nana,

I have been having difficulties regarding my examination from the ministerial quarters. I didn't write to you of this, since they hadn't assumed such a serious appearance until now. After some difficulty the Faculty of Philosophy recognised a part of our Indian terms, accepted our dissertations and allowed us to appear for the oral examination. The foreigners have, however, additionally to get the permission of the Minister of Education to appear for the examination and this permission is being refused to us on the ground of the want of a sufficient number of terms having been put in. The Faculty has, however, sent a recommendation and consequently we were called for an interview yesterday by the Minister. After much discussion, he left the case for final decision on Monday, when our fate is going to be decided. During all this jumble I have lost the next chance (26th June) of examination and can now appear at the earliest on the 17th July, if at all. However, I must wait and see the result. I will complete and post this letter on Monday and will be able to inform you of the decision in this letter.

I had taken part in a tennis tournament here. I played

a nice game yesterday and was beaten in the 2nd round both in singles and doubles. I have now to play mixed doubles. After I left India, I have improved my game to a great extent. I like the atmosphere of a tournament very much. Sometimes I am beaten in a match in spite of my superiority owing to want of bodily energy. One is required to play a number of matches without rest, and whereas the Germans can play for any length of time without the feeling of fatigue, I can't stand it. Perhaps it is also due to want of constant practice in tournaments.

The weather is very hot now, rather unpleasant. The sun is quite strong and piercing. I think, we could now enjoy swimming.

Monday, 23rd *June* 1924

We had been to the Minister's office again and we have been informally informed by the Minister that they have granted our terms and have allowed us to appear for the examination as a special case; although the papers will have to go through different hands still, until we finally get the official reply. This has now relieved us and we will most probably appear for the examination on the 17th of July, that is, after three weeks.

I am now playing mixed doubles in the tennis tournament and have come up to the semi-finals. To-morrow we shall play the semi finals and, if we win, also the finals. To-day I played a nice game.

I have had no pain in stomach for over a fort-night and take it that it is now away for good. Mai's letter and Aba's post-card dated 7th June, during your stay at Kamshet, to hand to-day. A parcel has also reached me.

Yours affectionately,
Shyamakant.

श्री

पत्र १६० वें

बर्लिन,

ता. १४-७-२४

ती. नानांस शिरसाष्टांग नमस्कार, वि. वि. गेल्या आठवड्याच्या तुमच्या पत्राचें उत्तर गेलेंच आहे. माझी दोन विषयांची परीक्षा होऊन दोन्हींत मी पास झालों. केमिस्ट्रीची परीक्षा (तोंडी) एक तास होती, तींत मला " From good to better " व फिजिक्सच्या परीक्षेंत " Good " असे शेरे मिळाले आहेत. आतां बॉटनी व फिलॉसॉफी हे विषय राहिले आहेत. त्यांची परीक्षा येत्या गुरुवारीं होऊन मी मोकळा होईन. म्हणजे पुढच्या आठवड्यास मी डॉक्टर झाल्याची बातमी तुम्हांला कळेल. मग आणखी दहाबारा दिवस येथें राहून इंग्लंडला जाईन. जाण्यापूर्वी येथील बऱ्याच मंडळींना भेटी, आमंत्रणें वगैरे द्यावीं लागतील. माझी प्रकृति उत्तम आहे. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र १६१ वें

बर्लिन,

ता. २१-७-१९२४

ती. सौ. माईस शिरसाष्टांग नमस्कार, वि. वि. या आठवड्यास कळवण्यासारखी गोष्ट म्हणजे माझी परीक्षा आटपून मी पास झालों. कोर्डेही पास झाला. गुरुवारीं परीक्षा आटपली व शुक्रवारीं सकाळीं आम्हीं येथून बडोद्यास कोर्डेच्या घरीं आम्ही दोघे पास झाल्याबद्दल तार पाठवली ती लागलीच पोंचली असेल व ती बातमी कोर्डे यांनीं लागलीच तुम्हांला कळवली असेल असें समजतों. आतां आम्ही डॉक्टर झालों.

येथल्या परीक्षा म्हणजे हिंदुस्थानांतल्या किंवा इंग्लंडमधल्या परीक्षांसारख्या मुळींच नसतात. सगळे विद्यार्थी एकदमच परीक्षेला बसत नाहींत. प्रत्येकाची परीक्षा एकट्याची व तोंडी असते. दर पंधरवड्याला एकदां परीक्षेचा

दिवस असतो. आपल्या तयारीप्रमाणें वाटेल तो दिवस आपण ठरवावा. परीक्षक आपणच निवडावयाचे असतात. परीक्षा प्रत्येक विषयाची तोंडी घेऊन निकाल तावडतोब तेथल्या तेथें सांगतात. प्रत्येक विषयाच्या परीक्षेला, वाईट, चांगलें, अति चांगलें असे शेरे असतात. मार्क वगैरे नसतात. सर्व शेऱ्यांची बेरीज होऊन मग एकंदर परीक्षेचा शेरा मिळतो. मला केमिस्ट्रींत 'चांगलें व कांहीं अंशीं चांगलें' व फिजिक्समधें 'चांगलें' असे शेरे होते. पण 'बॉटनी' व 'दर्शन' या विषयांत 'पुरेसें' असेच शेरे मिळून मी एकंदरींत साधाच पास झालों. कोर्डेचेंही असेंच झालें.

आतां परीक्षा झाली म्हणून किती तरी लोकांना भेटायचें आहे. कितीकांना जेवायला बोलवायचें आहे. पत्रें किती तरी लिहायचीं पडलीं आहेत. वेळच काय तो नाहीं. परवां व काल शनिवार रविवार मी क्रेरेबरोबर जवळच एका सुंदर ठिकाणीं भ्रमणाला गेलों होतों, तो काल रात्रीं परत आलों. त्या ठिकाणाचें नांव सारोर्पास्को. तेथें एक मोठा तलाव आहे, त्यांत आम्हीं मोटार बोटींतून पुष्कळ हिंडलों व जंगलांत फिरायचीही मजा आली.

आम्ही एकदोन दिवसांत डिग्री घेणार आहों. पण त्यापूर्वी रिसर्चचें त्रोटक वर्णन छापवायचें वगैरे बऱ्याच खर्चाच्या भानगडी आहेत. पण त्या केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. दोन दिवस छापखान्यांत वगैरे खेपा घालीत आहों.

येत्या सोमवारीं ता. २८ रोजीं इंग्लंडला जायचा बेत केला आहे. एक तारखेपासून प्रदर्शनांत काम करायला लागूं. म्हणजे बांधाबांध करण्याची घाईच होणार. हें घर आतां कायमचें सोडणार. सामान कांहीं बरोबर घेईन, बाकीचें फ्रॉ. म्युलरकडे तूर्त टाकीन. पुढचा बेत अद्याप अनिश्चितच आहे. त्यासंबंधीं विचार व बेत करून लवकर लंडनहून तुम्हांला लिहीन.

काल संध्याकाळीं मिसेस स्मिटकडे चहाला गेलों होतों. आम्ही नवीन झालेले डॉक्टर–चौधुरी, कोर्डे व मी–यांना जातांनाचा निरोप म्हणून गाणीं रचलीं होतीं. रात्रीं पुन्हा कोर्डेच्या येथें जेवणाचें आमंत्रण होतें. तेथें त्याच्या घरची मंडळी–Dr. Stolze–व अधिकारी, आगटे, किर्लोस्कर, राय अशी आणखी मंडळी होती. रात्रीं १॥ला घरीं परत आलों. आज संध्याकाळीं पांच

वाजतां चट्टोची बहीण-म्हणजे सरोजिनी नायडूंची बहीण-व तिचा नवरा मि. नंबियार यांच्या येथें चहाचें आमंत्रण आहे व रात्रीं किर्लोस्करकडे हिंदी जेवणाचें आमंत्रण आहे. परवां रात्रीं मीं माझ्या येथें बरीच मंडळी जेवायला बोलावली आहेत. मेजवान्यांचा सुकाळ आहे.

आज जास्त कांहीं लिहावयाचें नाहीं. तब्येत उत्तम आहे. पैसे तुम्हीं पाठवलेच असाल. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

पत्र १६२ वें

London. N. W. 3.
7th *August* 1924

My dear Nana,

Last week I got your letter redirected to me from Berlin. This week I haven't yet got the Indian mail.

Here there are many Indian acquaintances and friends and I am always together exclusively with Indians. At the Exhibition I have not much work, except that I have got to be present 6 hours every day. I have as yet seen nothing of the Exhibition. Even the Indian department I haven't seen minutely. The Baroda Court is very small. There are carpets of different kinds, wooden carved and lacquered things, metal pots etc., and embroidery work kept as exhibits. Formerly they used to sell a lot; now there is very little sale, since most of the things are already sold off. The amusement park is always crowded. I have simply passed by it but not yet taken part in it. The Exhibition is a huge affair and I don't know whether I can give you even a brief description of it. But I will try to do it by and by in my letters. London is very big and crowded, quite different from Berlin. Amusements and enjoyments for the public here are not so

many as in Germany. They enjoy life much more on the continent.

I am now free from study and other cares and feel, therefore, very light. Only my future is still quite dark and I see no way through it. I saw Mr. Shirgaonkar the other day. I had also written a letter to Dr. Modak requesting him to inform H. H. of my success at the examination. I have received a reply from him.

The other day, I was introduced to Hon. Samarth, Member of the India Council here, by his son, who is spending his vacation with us here. He is a nice gentleman and received me cordially.

I am eagerly awaiting money from you and I am sure you have despatched it immediately. My allowance from the Baroda State will be given to me at the end of this month. As you know, I have borrowed £ 30 from Mr. Shah.

I am getting one or two suits made here. I weighed myself the other day. My weight with suit and without overcoat or hat etc., is 123 lbs. Let me see now whether I am going to change here. I am keeping good health.

Yours affectionately,
Shyamakant.

ब्रिटिश साम्राज्याचा भपका

श्री

<u>पत्र १६३ वें</u> लंडन,

ता. १३-८-२४

ती. नानांस शिरसाष्टांग नमस्कार, वि. वि. अद्याप तुमचें या आठवड्याचें पत्र आलें नाहीं.

गेल्या रविवारीं सकाळीं मी कांहीं मित्र मंडळीबरोबर समुद्रावर ब्रायटनला गेलों होतों. तेथें सोमवार संध्याकाळपर्यंत होतों. फार मजा वाटली. सोमवारीं सकाळीं समुद्रांत पोहलोंही. पियरवर हिंडायला व तेथले वेगवेगळे खेळ खेळायला मजा वाटली. येत्या शनवारीं सुद्धां कदाचित् असेच कोठें तरी जाऊं. ब्रायटनला समर्थ, मुळगांवकर व मी अशा तिघांचा एक गमतीदार फोटो काढवला होता, तो या पत्रांत पाठवीत आहें. दुसरा फोटो येथें लवकरच एक काढून तुम्हांला पाठवायचा विचार करीत आहें.

काल रात्रीं मी मावळणकरांकडे* जेवायला गेलों होतों. ते वॉड्स्वर्थला —म्हणजे येथून फारच लांब—राहतात. घर सांपडायला आणि तेथें पोंचायला बराच वेळ लागला. त्यांची बायको व मुलगी घरीं होत्या. त्यांचें माझें बोलणें बेताचेंच झालें. ते फारसे बोलले नाहींतच. घर वगैरे चांगलें केलें आहे. स्वतःची बाग आहे. भाजीपाला, विलायती व हिंदी चांगला केला आहे. स्वयंपाक बायकोच करते. जेवण हिंदीच जेवतात. काल लसणाची चटणीही केली होती, ती मला फार आवडली.

प्रदर्शनांत माझा नेहमींप्रमाणें क्रम चालू आहे. अद्याप येथलें फारसें पाहिलें नाहीं. परवां एकदां संध्याकाळीं Empire Pageant पाहायला गेलों होतों. असे रोजच्या रोज उघड्या पटांगणावर स्टेडियममध्यें pageants होतात. त्यांत हजारों बायकापुरुष काम करतात. ब्रिटिश साम्राज्य एकंदर कसें उभारलें गेलें तें हप्त्याहप्त्यानें दाखवतात. म्हणजे एकंदरींत परदेशीयांना व परकीयांना आपल्या साम्राज्याचा महिमा दाखविण्याचाच त्यांचा हेतु दिसतो. हिंदुस्थानचा भाग अगदीं थोडा होता. जहांगीर बादशाहाचा दरबार व सर

---

* श्री. केशवराव मावळंगकर, लंडनमधील व्यापारी, कांहीं काळापूर्वी वारले.

टॉमस रोचें आगमन व मिरवणूक दाखवली होती. त्यांत उंट, हत्ती, घोडे सुद्धां होते.

एकदां फिरत फिरत प्रदर्शनांत माल्टा बेट, शांवाय, सयाम वगैरे ठिकाणीं गेलों होतों. तेथें चिनी उपहारगृहांत चहा घ्यालों. वेटर्स चिनी होते. चहांत साखर किंवा दूध नव्हतें. पैसे मात्र चौपट. चांगलीच खोड मोडली.

शहा आजच गोएटिंगहून येथें प्रदर्शन पाहण्यासाठीं आला आहे. तुमचे पैसे यायची वाट पाहात आहें; ते आल्याबरोबर त्याचे तीस पौंड त्याला परत द्यायचे आहेत. शिवाय आतां मजजवळ बँकेंत कांहीं पैसे नाहींत. माझा पगार महिन्याच्या अखेर मिळेल.

मीं एक सूट करवला आहे. चांगल्यापकीं आहे. सहा गिनी पडले· दुसरा आणखी एक चारपांच पौंडांपर्यंत करवणार आहें. आणखीही शर्ट्स्, कॉलर्स् वगैरे बरेंच सामान घ्यायचें आहे. बर्लिनला चांगलें आणि स्वस्त मिळत नाहीं म्हणून असल्या सामानाची खरेदी मुद्दाम बरेच दिवस येथें येईपर्यंत लांबणीवर टाकली होती.

मी आतां पुढें काय करावयाचें याचा अजून मला कांहींच अंदाज नाहीं. येथलें काम नोव्हेंबरच्या सुरुवातीला आटपणार. त्यानंतर इतक्यांतच हिंदुस्थानास परत जावें असें मला वाटत नाहीं. कारण जाऊन तरी काय करायचें हा प्रश्न आहेच. हिंदुस्थानांत काय करायच, कोठें काम करायचें हा प्रश्न येथूनच शक्य झाल्यास ठरविला पाहिजे. शिक्षकाचें काम माझ्या मनांत करायचें नाहीं. तसें असतें तर हिंदुस्थानांतल्या एखाद्या प्रोफेसराच्या जागेकरतां येथेंच आतांपासून खटपट करूं लागलों असतों. बरें, शिक्षकाचें काम करायचें नाहीं एवढें ठरवल्यावर धंद्याच्या दृष्टीनें युरोपांत येऊन मी अद्याप कांहींच शिकलों नाहीं असें म्हणावें लागतें. येथें धंदा शिकायला मिळणें कठिण. हिंदुस्थानांतल्या एखाद्या कारखान्याची मदत असती तर सोपें गेलें असतें. बरें, धंदा येत असल्याशिवाय हिंदुस्थानांत तरी कारखान्यांत शिरकाव कसा होणार ? अशा या दोन गोष्टी परस्पर एकमेकींवर अवलंबून आहेत. मि. धोतीवालांनीं मला असें सांगितलें कीं, बडोद्याच्या इंडस्ट्रीच्या

खात्यामधें जर्मनीच्या कांहीं कारखान्यांची यादी आहे. या कारखान्यांशीं बडोद्याचे कांहीं करार आहेत व त्याप्रमाणें बडोदें संस्थानाला कांहीं विद्यार्थ्यांना या कारखान्यांत शिक्षणाकरितां पाठवतां येतात. माझ्या उपयोगी पडण्यासारखा कारखाना यांत आहे कीं नाहीं माहीत नाहीं. पण या बाबतींत बडोद्याच्या डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीजशीं पत्रव्यवहार करावा असें धोतीवाला म्हणतात. मी त्यांनाच ही माहिती काढायला सांगणार आहें. कारण ते स्वतः ॲसिस्टंट डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज आहेत. संस्थानाकडून कांहीं मदत झाली नाहीं तरी खासगी रीतीनें मी जर्मनींत तेलें, चरबी(Oils and Fats)च्या धंद्यांत कोठें तरी शिरकाव झाल्यास पहाणार आहें. मला कांहीं तरी धंदा परत जाण्यापूर्वी शिकलाच पाहिजे. कारण येथें त्या उद्देशानें येऊन केवळ पुस्तकी ज्ञान घेऊन कोरें परत जाणें म्हणजे वेडेपणाचें होईल. माझा आणखी कांहीं दिवस फ्रान्सला राहण्याचा विचार आहे. फ्रेंच भाषा मला शिकलीच पाहिजे. मी पुन्हा टागोरांना पत्र लिहून पूर्वी मला देऊं केलेली पॅरिसची कर्जाऊ शिष्यवृत्ति मिळविण्याची खटपट करीन. पॅरिसच्या व्यापाऱ्यांकडून ती शिष्यवृत्ति असल्यामुळें त्यांच्या मदतीनें माझा त्या देशांत कोठें तरी धंद्यांत शिरकाव होईल असें मला वाटतें. मला वाटतें ती शिष्यवृत्ति अद्याप कोणाला दिलेली नसावी. टागोर सध्यां चीनला आहेत. त्यांना तूर्त माझ्याकडे लक्ष देण्याला सवडही होणार नाहीं कदाचित् . पहावें. इकडे हिंदुस्थानांतून सरकारी शिष्यवृत्त्या घेऊन आलेले किती तरी लोक मला भेटतात. त्यांतल्या पुष्कळ लोकांची मुंबई युनिव्हर्सिटींतील लायकी (करियर) वगैरे माझ्यापेक्षां वाईटच आहे. मला वाटतें मीं योग्य वेळीं एखाद्या टेक्निकल स्कॉलरशिपकरितां प्रयत्न करायला पाहिजे होता. मुंबई सरकाराकडून दरसाल चारपांच शिष्यवृत्त्या धंदेशिक्षणाकरितां असतात. त्याचप्रमाणें मंगळदास नथुभाईंची स्कॉलरशिपही मिळाली असती. पण त्याचे अर्ज फेब्रुवारीच्या सुमारास करावे लागतात. म्हणजे या वर्षी आतां फार उशीर झाला. स्कॉलरशिपकरतां वशिला ही गोष्ट मुख्य आहे. परांजपे शिक्षणमंत्री असतांना तरी मीं खटपट करायला पाहिजे होती. कदाचित् त्याच शिष्यवृत्तीनें जर्मनींत सुद्धां टॅपररी म्हणून राहतां आलें असतें. येथें प्रदर्शनांत व्यापारी किंवा इतर वजनदार गृहस्थ भेटतील व मला

त्यांची मदत होईल अशी माझी कल्पना होती. पण प्रदर्शन पाहायला हिंदी लोक असे थोडेच येतात व त्या दृष्टीनें येथें कांहीं उपयोग नाहीं.

कोर्डे दिवाळीच्या पूर्वी हिंदुस्थानास परत जाणार आहे. तो बडोद्यास तुम्हांला भेटेलच. त्याला केव्हां जेवायला, फराळाला वगैरे बोलवावें. तो माझी सर्व हकीकत सांगेल. आज सारखीं दोन अडीच वर्षे तो व मी बरोबर होतों व एके ठिकाणीं काम करीत होतों. येथें युरोपमध्यें तोच माझा सगळ्यांत जवळचा मित्र होता. तो स्वभावानें फारच चांगला आहे व बोलायलाचालायलाही फार चांगला आहे. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

<u>पत्र १६४ वें</u> १९ किंग हेन्रीज् रोड, लंडन N. W. 3.

ता. २०-८-१९२४

ती. सौ. माईस शिरसाष्टांग नमस्कार, वि. वि. तुझें ता. २८-८चें पत्र गेल्या सोमवारीं सकाळीं पोंचलं. विशेष कांहीं मजकूर नव्हता. मलाही या आठवड्याला विशेष मजकूर कळवण्यासारखा नाहीं.

सध्यां धोतीवाला लंडनच्या बाहेर कांहीं दिवस कारखाने पाहणेकरितां गेले आहेत. तेव्हां प्रदर्शनाचें सर्व काम मीच पाहात असतों. माझ्या मदतीला चिटणीस व आणखी एक नोकर असतो. काल संध्याकाळीं आम्ही 'पॉपी' या एका गंमतीच्या संगीत नाटकाला गेलों होतों. त्यांतला नाच व संगीत फारच छान होतें. अभिनयही फार चांगला होता. पैसे मात्र बरेच पडले. प्रत्येकाला पांच शिलिंग नऊ पेन्स.

या आठवड्याला आबांचें पत्र येईल व बिलिमोरा येथील कारखान्याच्या घडामोडी पुढें काय झाल्या तें कळेल याची वाट पाहात होतों. पण त्यासंबंधीं कांहींच पत्र आलें नाहीं. आतां येत्या सोमवारीं येतें काय पाहावें. तांबेकरचीं व वीरेश्वरनागचीं पत्रें पुष्कळदां येतात. हल्लीं मला बर्लिनहून क्रेरचीं पत्रें वरचे-

वर येतात. मीही तिला लिहितों. ती फार चांगलीं व गोड पत्रें लिहते. तिच्या गेल्या पत्रांत तिनें तुम्हां उभयतांना नमस्कार कळवण्यास लिहिलें आहे.

शंकरराव किर्लोस्कर इतक्यांत इंग्लंड सोडून स्वित्सरलंडला जायचे होते. गेलेही असतील कदाचित. शंभुराव येथें येणार आहेत असें कळतें. मला तुम्हीं पार्सल वगैरे कांहीं पाठवण्याची जरूर नाहीं. कारण येथें पाहिजे ते हिंदी पदार्थ आम्हांला मिळतात. चटण्यालोणचीं सुद्धां मिळतात. काल दुपारीं एका चिनी उपहारगृहांत जेवलों. तेथें हिंदी जेवण करीत असतात. मसाल्याचा भात व प्रॉन करी अशी मसालेदार व छान लागली कीं, अशी हिंदुस्थानांत सुद्धां मिळेल कीं नाहीं शंकाच. असो.

माझी तब्येत उत्तम आहे. आतां पोटांत कधींच दुखत नाहीं. लवकरच नाना आणखी पैसे पाठवतील असें समजतों. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र १६५ वें

लंडन,

ता. ४-९-२४

ती. नानांस शिरसाष्टांग नमस्कार, वि. वि. तुमचें ता १५चें पत्र व त्याबरोबरचें दुसरें एक मोठें पत्र व शिवाय आबांचें एक वेगळें पत्र अशीं पत्रें गेल्या सोमवारीं पोंचलीं. आबांचें सविस्तर मिळून आनंद वाटला. या सोबत आबांना एक वेगळें पत्र लिहीत आहें तें वाचून त्यांना द्यावें.

प्रदर्शनाचा बराच भाग आतां मीं पाहिला. कॅनडा फार चांगला सजवला आहे. धान्य, शेतकी, दूध, लोणी वगैरे जिन्नस व त्याचप्रमाणें फळफळावळ हीं मोठ्या शिताफीनें दाखविलीं आहेत. लोण्याच्या प्रदर्शनांत तर प्रिन्स ऑफ वेल्सचा त्याच्या घोड्यासहित एक पुतळा, त्याचें घर आणि बाग सर्व लोण्याचें केलेलें आहे. फळांची जणूं काय खरोखरीच बाग आहे असें दाखविलें आहे. न्यूझीलंड, ईस्ट व साउथ ॲफ्रिका, सीलोन, माल्टा, ब्रिटिश ग्वाना वगैरे सर्व देशही पाहिले. पोल्ट्री व डेयरीचें प्रदर्शनही पाहिलें.

ऑस्टेलिया अद्याप पाहायचा आहे. Palace of Industries व Palace of Engineering हीं विशेष पाहण्यासारखीं आहेत. Amusement Park ही मजेदार आहे. नाचायच्या जागा छान आहेत. एकदां नाचायला गेलों होतों. चैनी इतक्या आहेत कीं, बोलून सोय नाहीं. मात्र पैसे भयंकर खर्च होतात. हिंदुस्थानचा भाग बरा आहे, पण प्रदर्शनाच्या दृष्टीनें कांहींच नाहीं. ताज-महालाच्या धर्तीवर एक मोठी इमारत बांधली आहे, त्यांत हिंदुस्थानच्या वेगवेगळ्या इलाख्यांचें व संस्थानांचें प्रदर्शन मांडलें आहे. पण हिंदी कार-खान्यांच्या व व्यापाराच्या वृद्धीकरितां खटपट करण्याऐवजीं हा एक बाजारच होऊन बसला आहे. मुंबईहून भराभर माल आणवून तो चौपट किंमतीला विकून कित्येक लोक अतोनात फायदा करीत आहेत. मुंबईचे बर्वे* यांची नुकतीच गांठ पडली. जरीचा फेटा वगैरे बांधून पुष्कळ लोक जमवून त्यांना ते माल विकीत असतात. त्यांना चापून फायदा मिळतो असें ऐकलें. आमच्या बडोदें संस्थानांत मात्र विकण्याचें काम बेताचेंच आहे. सामानही थोडेंच आहे आणि कोणाही व्यक्तीला फायद्याची आशा नसल्यामुळें तितक्या कळकळीनें तेथें कोणी काम करीत नाहीं.

एकंदर प्रदर्शन इंग्रज सरकारला फायद्याचें होईल असें दिसत नाहीं. शिवाय तें व्यापारी दृष्टीनें परिणामकारक होईल असेंही दिसत नाहीं. आपल्या साम्रा-ज्याची मिरवणूक व आपलें ऐश्वर्य दाखवायचें एवढाच सरकारचा उद्देश दिसतो. परवां सबंध दिवस प्रदर्शनांत शंकरराव किर्लोस्कर व मी मिळून Palace of Arts पाहिला. तेथें हिंदुस्थानच्या भागांत इतर चित्रकारांमधें नारायण-राव सरदेसाई‡ यांचींही एकदोन चित्रें पाहिलीं. माझी प्रकृति उत्तम आहे. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

---

* श्री. द. बा. बर्वे, B.A., हल्लीं संयुक्त प्रांताच्या औद्योगिक खात्यांत आहेत.

‡ चित्रकार नारायणराव सरदेसाई, मुंबई स्कूल ऑफ आर्टमधील एक शिक्षक.

श्री

पत्र १६६ वें लंडन,

ता. १५-९-१९२४

ती. नानांस शिरसाष्टांग नमस्कार, वि. वि. तुमचें ता. २९।८चें पत्र सकाळींच पोंचलें. आज श्रीपाद टिकेकराचें एक पत्र आलें आहे. त्यानें इकडली तिकडली खूप हकीकत लिहिली आहे. लग्नाचाही प्रश्न त्यानें काढला आहे आणि आतां माझें शिक्षण पुरें झाल्यामुळें हिंदुस्थानांत आल्यावर तुमच्या सर्वांच्या पुढेंही माझ्या लग्नाचा प्रश्न कदाचित् उभा राहील. हा फार बिकट प्रश्न आहे खरा. त्यासंबंधीं मीं बराच विचार केला, पण मला वाटतें मीं या बाबतींत मुळींच घाई करणार नाहीं. आपल्या पद्धतीप्रमाणें मुली बघायला जाणें वगैरे तर मला अगदीं आवडणार नाहीं. एकंदरींत मुलगी पसंत करून तिच्याशीं लग्न करण्याचें कबूल करणें हे मुलाचे मोठे उपकार आहेत, असें जें नेहमीं मुलीच्या बापास वाटत असतें, त्याचें मला आश्चर्य वाटतें. दुसरें, मुलाला मुलगी मिळाली नाहीं तर तो जसा बरेच दिवस अविवाहित राहूं शकतो, तशीच मुलगी सुद्धां मनाजोगा नवरा मिळेपर्यंत अविवाहित राहायला काय हरकत आहे? पण तसें नाहीं! कसाहि नवरा कां मिळेना, पण कुठल्या तरी एखाद्या माणसाच्या गळयांत मुलगी बांधल्याशिवाय बापाला चैन पडत नाहीं. अशी कांहीं मजा असते आपल्याकडल्या लग्नांची. कधीं या बाबतींत आपण सुधारूं कळत नाहीं. लग्न होण्यापूर्वी प्रेमाचा अंश तर मुळींच नसतो. मी तर म्हणतों पूर्वी थोडेंबहुत तरी प्रेम जडल्याशिवाय लग्न करण्यापेक्षां कांहीं दिवस अविवाहित राहिलेलें बरें. बाकी माझा असें म्हणण्याचा मुळींच हेतु नाहीं कीं, पाश्चात्य पद्धतिच चांगली आणि तीच आपण घेतली पाहिजे. आपली पद्धत आपण सुधारली पाहिजे एवढेंच. आपण स्वातंत्र्य मिळविलें पाहिजे. समाजांत व्यक्तिस्वातंत्र्य पाहिजे. राष्ट्रीय परतंत्रतेपेक्षां सामाजिक परतंत्रताच आपणांत जास्त आहे आणि तिची आपल्याला जास्त लाज वाटायला पाहिजे, असें मला वाटतें. शिवाय स्वावलंबी झाल्याशिवाय तर कोणींही लग्न करूं नये असें माझें मत आहे!

माझ्या मतें आल्यासारखें आणखी कांहीं महिने तरी धंदेशिक्षण थोडेंसें घेतल्याशिवाय मीं परत जाऊं नये. बाकी त्याचा खूप उपयोग होईल अशांतला भाग नाहीं. कारण शेवटीं मनुष्याला प्रत्यक्ष अनुभव आल्याशिवाय इतर शिक्षणाचा उपयोग होत नाहीं हेंच खरें. अद्यापपर्यंत तरी पुढच्या शिक्षणाची मीं कांहींच सोय केली नाहीं. खरेंच, कोर्डे महाराज राणीसाहेबांना पॅरिसला भेटले. विशेष बोलणें झालें नाहीं. तो तुम्हांला सांगेलच.

जव्हेरी म्हणून एक पार्शी विद्यार्थी माझ्या ओळखीचे जर्मनींत होते, ते आजारी पडल्यामुळें त्यांना शिक्षण सोडून द्यावें लागलें. ते येत्या २१ तारखेला येथून हिंदुस्थानास परत जात आहेत. ते बडोद्याचेच आहेत. बडोद्यास गेल्यावर तुम्हांस कदाचित् भेटतील. त्याचप्रमाणें प्रो. श्रॉफही त्यांच्याच बरोबर बडोद्यास जात आहेत. ही सर्व मंडळी माझी हकीकत तुम्हांला सांगतीलच.

परवां डॉ. घुमे म्हणून एक इतिहास व अर्थशास्त्राचे गृहस्थ येथें भेटले. ते इतिहासकार सरदेसाई यांचे चहाते (admirer) आहेत, व त्यांचें माझें कांहीं नातें आहे का असें मला ते विचारीत होते. त्यांना मीं नातें सांगितल्यावर ओळख झाल्याबद्दल त्यांना अतिशय आनंद झाला. ते तुमच्या ' रियासतीं 'ची फारच तारीफ करीत होते. आतां ते बर्लिनला कांहीं विशिष्ट अभ्यासाकरितां जात आहेत.

येथें प्रदर्शनांत बादशाही इमारत (His Majesty's Government Building) पाहण्यासारखी आहे. मीं तिचे एकदोन भागच पाहिले. बॉटनी, शेतकी व Physics या शास्त्रांचे शोधविभाग (Research Sections) पाहण्यासारखे आहेत. त्याचप्रमाणें पोस्ट ऑफिस व टेलिफोन वगैरेंचा भाग पाहिला. मध्यभागीं एक मोठा चौक असून त्यांत दगडी जगाचा नकाशा पसरला आहे; सभोंवार समुद्राच्या ठिकाणीं पाणी असून ब्रिटिश साम्राज्याच्या वेगवेगळ्या ठिकाणीं आगबोटी खरोखर चालतांना दिसतात. मोठें मजेदार केलें आहे.

जास्त कांहीं तूर्त लिहिण्यासारखें नाहीं. माझें वजन येथें आल्यापासून चार पौंड वाढलें. सध्यां एकशें सत्तावीस पौंड आहे. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

लंडन (सप्टेंबर १९२४)



पृ. ३३४]　　　　श्यामकान्त　　　　कोर्डे

पत्र १६७ वें

London,

25-9-1924

My dear Nana,

Your letter of 5th September. My next move will now be to go back to Germany and try to get entrance into some oil or soap factory, or at least to visit a number of factories and obtain a general idea of the subject. Excepting an elementary oil and soap analysis in the laboratory, I have as yet had no experience of the oil industry, and it will ultimately be the practical experience in India, which will teach me these things. In France also I think there is a good field for this industry and, as I learn, the French people have more sympathy towards Indians than others, and so it will be worth my while to spend a little time in France. I have also to learn the French language.

I will be here till the beginning of November and will then leave for Paris and Berlin. A considerable amount of money may be required for my industrial training in Germany if I get opportunities.

You will get my photographs along with this letter. Kindly let me know how you find them. I met Shankarrao Kirloskar yesterday. He is leaving England shortly for Switzerland. Mr. Korde left yesterday for Paris and will proceed to India via Marseilles.

I have made acquaintance of two German officers from Munich. They invited me for dinner and we had a talk about Indian culture, politics, religion and philosophy which they revere much. I have also come to know a German

merchant who deals in the industry of imitation silk. I interpreted for them at the Wembley Exhibition, and thus was able to make their acquaintance.

Yours affectionately,
Shyamakant.

श्री

पत्र १६८ वें

लंडन,
२-१०-१९२४

तीर्थरूप सौभाग्यवती माईस शिरसाष्टांग नमस्कार, वि. वि. तुमचें ता. १२।९चें पत्र गेल्या सोमवारीं सकाळीं पोंचलें. विशेष मजकूर नव्हता. मलाही या आठवड्यास कळवण्यासारखा मजकूर नाहीं. येथें प्रदर्शनांत केव्हां केव्हां जर्मन लोक भेटतात व भारी माल खरेदी करतात. माझी अशी दोघांतिघांशीं ओळख झाली. कांहीं दिवसांपूर्वीं दोघां जर्मन गृहस्थांनीं जेवायला बोलावलें होतें. त्यासंबंधीं मीं पूर्वीं लिहिलेंच असेल. हल्लीं हवा वाईट असते. मधें एक-दोनदां बरी होती; तेव्हां टेनिस खेळलों. येथें मी चांगला टेनिस व पिंगपॉंग खेळणारा समजला जातों. येथें आतां थंडी पडूं लागली आहे. प्रदर्शनांत उष्णता उत्पन्न करण्याची कांहीं व्यवस्था नाहीं, त्यामुळें संध्याकाळचें काम असलें म्हणजे थंडीचा थोडा त्रास होतो. आतां मी कामावरच आहें. पावणेदहा वाजतां (रात्रीचे) आमची प्रदर्शनाची खोली बंद करून जेवायला जाईन. शांतिनिकेतनहून माझे एक मास्तर प्रभातबाबू यांचें मला एक अभिनंदनपर पत्र आलें आहे. पॅरिसची शिष्यवृत्ति दुसऱ्या एका मुलाला दिली व तो लवकरच टागोरांच्याच बरोबर पॅरिसला येईल असें ते कळवितात. टागोरांना दक्षिण अमेरिकेहून आमंत्रण आलें आहे. तेव्हां ते युरोपला येऊन पुढें तिकडे जातील. कोर्डेचें आज पॅरिसहून एक कार्ड आलें आहे. तो उद्यां मार्सेलसहून निघेल. मी नोव्हेंबरमधें येथून फ्रान्सला व तेथून पुढें जर्मनीस जाईन. फ्रान्सला बरें वाटलें तर थोडे दिवस राहून फ्रेंच भाषा शिकेन. आतांपासूनच मीं येथें फ्रेंचचा अभ्यास चालविला आहे.

परवां 'डिप्लोमसी' या गद्य नाटकाला गेलों होतों. त्यांत प्रसिद्ध अभिनेत्री ग्लॅडिस कूपर काम करीत होती. फारच सुंदर काम करते. एके ठिकाणीं तर मला रडूंच कोसळलें. इतर पात्रेंही चांगलीं कामें करीत होतीं.

शंकरराव किर्लोस्करांचें पॅरिसहून कार्ड आलें आहे. ते स्वित्झर्लंडला लवकरच जातील. जर्मनींत गेल्यावर मी धंदेशिक्षण घेण्याचा प्रयत्न करणार आहें. प्रथम दोनतीन महिने एखाद्या संस्थेमध्यें तेलाच्या धंद्याचा एक शिक्षणक्रम पुरा करीन व पुढें दोनतीन महिन्यांनीं जमल्यास एखाद्या कारखान्यांत काम करीन असें म्हणतों.

श्यामकान्त.

पत्र १६९ वें

9th *October* 1924

My dear Nana,

You letter dated 19 September to hand. I have got a cold and am suffering from it for a couple of days. The weather has changed suddenly. It is very chilly. I will be all right soon.

As soon as I get money from you, I will go for some trips in England and then go back to Germany. I have a mind to spend a few days in Paris and learn French. Mr. Mahajani will soon be coming back from India. Next Saturday I will go to Cambridge. With profound respects,

Yours most affectionately,
Shyamakant.

श्री

पत्र १७० वें

लंडन,

ता. १५-१०-२४

ती. नानांस शि. सा. न. वि. वि. मला एक दोन दिवस थोडासा मलेरियाचा ताप येत आहे. थोड्याच दिवसांत चांगला बरा होईन असें वाटतें. क्विनाइन घेत असतों. विशेष काळजी करण्यासारखें मुळींच नाहीं.

हल्लीं हवा फारशी चांगली नसते. ऊन क्वचितच पडतें. लवकरच ऑक्स-फोर्ड, केंब्रिजला जाऊन येणार आहें. मँचेस्टरला कदाचित् जाऊन येईन. मग लवकरच पॅरिसवरून बर्लिनला जाईन म्हणतों. तेथें पुढें शिकतां येण्यासारखें असेल त्याप्रमाणें शिकेन. कारखाने वगैरे पाहून घेईन. कळावें, हे वि.

श्यामकान्त.

श्री

पत्र १७१ वें

लंडन,

ता. २३-१०-२४

तीर्थरूप सौभाग्यवती माईस शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना विशेष. तुमचीं ता. ३-१०चीं पत्रें गेल्या सोमवारीं पोंचलीं. आतां तुम्ही बडोदें सोडून प्रवासास गेलां असाल. माझी प्रकृति अद्याप चांगली बरी झाली नाहीं. ताप थोडा येतो. बहुतेक संध्याकाळीं सातआठ वाजतां थोडासा म्हणजे नव्याण्णवशंभर इतका ताप येतो व सकाळीं पुन्हा जातो. रात्रीं खूप घाम येतो. असें दहाबारा दिवस चाललें आहे. म्हणून मीं अलीकडे प्रदर्शनाला जाण्याचें सोडलें आहे. जवळच्या एका डॉक्टरांचें औषध घेतों. क्विनाइन देतात. बाकी तसें मला चांगलें बरें वाटतें. अशक्तता वगैरेही वाटत नाहीं. अलीकडे दोनतीन वर्षांत मला ताप आला नव्हता. मला भूक चांगली लागते व कोठाही चांगला आहे. ताप मलेरियाचा आहे. लवकरच बरा होईन असा अंदाज आहे. काळजी बिलकूल करूं नये. कारण तसें काळजी करण्यासारखें कांहीं नाहीं. ......कोर्डें सध्यां बडोद्यांत असेल. असो. पुढच्या आठवड्यास जास्त लिहीन. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

पत्र १७२ वें

लंडन,

ता. ३०-१०-२४

तीर्थरूप सौभाग्यवती माईस शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना विशेष. तुझें व नानांचें ता. १०-१०चीं पत्रें पोंचलीं. त्याचप्रमाणें आबांचें व श्रीनिवासाचें पत्र व ६० पौंडांचा ड्रॅफ्ट पोंचला. आतां चारपांच महिने पैशाची तरतूद झाली.

माझा आजार बरेच दिवस रेंगाळत चालला होता. रोज संध्याकाळीं ताप येई व सकाळीं जाई. मग येथल्या कांहीं मित्रांच्या मदतीनें डॉ. भाटिया या एका हिंदी डॉक्टरांना आणलें. त्यांचें औषध गेले चारपांच दिवस घेत आहें. त्यांनीं चापून क्विनिन दिलें आहे. बहिरेपणा खूप आला आहे. पण काल ताप आला नाहीं व आतां ताप येणार नाहीं असें दिसतें. अशक्तता आली आहे. पण आतां आणखी २-३ दिवसांत मी हिंडूं फिरूं लागलों म्हणजे व भूक चांगली लागली म्हणजे खाण्यापिण्यानें पुन्हा शक्ति यायला मुळींच उशीर लागणार नाहीं.

बरा झाल्यावर कांहीं दिवस येथें राहून मग बर्लिनला जाईन म्हणतों. पॅरिसला वाटेवर कदाचित् जाईन व तेथें दोनचार दिवस राहीन कदाचित्. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

पत्र १७३ वें

London,
5-11-1924

My dear Nana,

Shrinivas' letter of 17th October to hand. I have mproved much since last week and feel much stronger. But unfortunately I still get a temperature up to 99·4° in the evening. The doctor, Mr. Bhatia from Bombay, who is

kindly helping me as a favour to one of our common friends, is giving me 40 grs. of quinine every day. Now he has advised me a change of climate. I may shortly go for a week to the sea-side. The Doctor promises that the change will relieve me completely of the slight temperature that I am getting and that there is nothing to worry about. I think after about a fortnight I will go back to Germany. I may spend a week in Paris. Perhaps Mr. Dotivala will accompany me to Berlin, where he wishes to take a course in alcoholic fermentation for the Alembic Works.

The Empire Exhibition is over. I could not go there during the last month owing to fever. I think I have acknowledged the receipt of the 60 £ in my last letter. In addition I have some 15 £ which together will suffice me for 4 or 5 months.

Yours affectionately,
Shyamakant.

पत्र १७४ वें

Hastings,
11th *November* 1924

My dear Nana,

You see I am still in England at the sea-side. My doctor advised me to come here for a change. I could not get any company and had to come alone. I am enjoying the sea-breezes, the open air and the lonely though pleasant life. I get no fever now and am recouping my health. I still take a lot of quinine according to the doctor's advice. By the end of this week I will go back to London and soon afterwards to Berlin via Paris.

It is very very unfortunate that I should have fallen ill just at this moment and lost some very precious time.

Although there was nothing very serious about the illness, I had been confined to my room for a month, a very unpleasant experience of such a long illness in this country. I wish I had been at home where I could have been better attended to. I am not now thinking of going to different parts of England, as I intended to, as it would mean an unnecessary waste of time and money.

What do you think about the new British Government? It seems India is going to have a hard time.

Yours affectionately,
Shyamakant.

श्री

पत्र १७५ वें

पॅरिस,
ता. २०-११-१९२४

ती. सौ. माईस शिरसाष्टांग नमस्कार, वि. वि. तुझें सोलापुराहून लिहिलेलें पत्र तीन चार दिवसांपूर्वी लंडनला पोंचलें. हेस्टिंग्ज़हून समुद्रावरून परत आल्यावर माझी तब्येत चांगली बरी झाली; व मग धोतीवाला व रेगे पॅरिसला येत होते त्यांच्याबरोबर मी येथें आलों. बरा झाल्यावर लंडनला दोनतीन दिवसच असल्यामुळें घाई फार झाली. इंग्लंडचे इतर भाग बघायचे तर लांबच राहिले; पण लंडनही पुरतें बघून झालें नाहीं. येथें आज आमचा दुसरा दिवस. गेले दोन दिवस येथें खूप भटकलों व येथल्या पाहण्याच्या जागा पाहिल्या. अद्याप कांहीं भाग पाहायचे राहिले आहेत. काल दुपारीं व्हर्साइचा राजवाडा पाहिला. फारच भव्य होता. त्याचें वर्णन मी येथें देत नाहीं. नानांनीं पाहिलाच असेल. आज नेपोलियनची छत्री, म्यूझियम वगैरे पाहिलें. महाराज व डॉ. मोडक येथेंच आहेत. उद्यां सकाळीं डॉ. मोडकांना भेटायला जाणार आहों. पुढें महाराजांची भेट झाल्यास कळवीन. मी भेटीची विशेष खटपट करणार नाहीं.

लंडनला टागोरांचे चिरंजीव, बायको, मुलगी व इतर मंडळी बरोबर आहेत. ते मी आजारी असतांना मला भेटायला आले होते. येथें येण्यापूर्वी त्यांच्याकडे गेलों होतों. त्यांच्या हॉटेलमधें ते व त्यांच्या बायकोबरोबर जेवलों. त्यांची बायको तेथें एका आर्ट स्कूलमध्यें पॉटरी-पेंटिंग शिकत असते. मुलगी तीन वर्षांची आहे, फार गमती आहे. ते आतां इतक्यांत दक्षिण अमेरिकेंत वडिलांकडे जायचे होते. तेथें चारपांच महिने राहून परत येतील.

लंडनला मिसेस मावळंकरांचें कार्ड आलें होतें व जाण्यापूर्वी त्यांनीं जेवणास बोलावलें होतें. पण मला वेळ थोडा असल्यामुळें व त्या लंडन शहराबाहेर बऱ्याच लांब राहात असल्यामुळें मला जातां आलें नाहीं.

हें शहर टोलेजंगी व भव्य आहे. इमारती खूप मोठ्या व मोटार-गाड्यांचा सुळसुळाट आहे. येथलें जेवण फारच चांगलें असतें. मला येथल्या इतकें जेवण पाश्चात्य देशांत दुसरीकडे कोठेंही आवडलें नाहीं. पण भाषा येत नसल्यानें फारच गैरसोय होते. मी मोडकें तोडकें बोलतों, नाहीं तर इंग्रजी किंवा जर्मनवर काम भागवतों. फ्रेंच भाषा फार गोड वाटते. ऐकायला आवडते. शिवाय आम्हांला केमिस्ट्रीलाही लागते; तेव्हां ती शिकण्याची माझी इच्छा आहे. येथें त्याकरतां कांहीं दिवस जास्त राहण्याचा विचार होता. पैशांच्या भावामुळें येथलें राहणेंही इंग्लंड किंवा जर्मनीपेक्षां स्वस्त आहे. पण माझ्याबरोबर धोतीवाला आहेत; त्यांना बर्लिनला जायची घाई आहे. मलाही वेळाच्या दृष्टीनें जर्मनीस लवकर गेलें पाहिजे. आजारांत बराच वेळ फुकट गेला आहे. तेव्हां आम्ही लवकरच बर्लिनला जाऊं.

कोर्डेचें हिंदुस्थानहून एक पत्र आलें होतें. तो आतां नोकरीच्या वगैरे शोधांत व त्रासांत आहे. तो तुम्हांला भेटलाच असेल. माझी तब्येत आतां चांगली आहे. डॉक्टरांनीं सांगितल्यावरून सध्यां फेलोज सिरप टॉनिक म्हणून घेत आहें. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

पत्र १७६ वें

Berlin,
1st *December* 1924

My dear Nana,

Your letter dated 7-11-24 to hand. I haven't written to you a detailed letter for some time. As you know, we were at Paris for about a week and then a day at Brussels and a day at Cologne. We enjoyed the trip very much notwithstanding the inconveniences we were put to, owing to ignorance of the French language. I am going to start French lessons, as soon as I am settled.

Mr. Dotivala has come with me and is working in a laboratory on alcohol fermentation. On the first day in Berlin we went to a restaurant where we accidentally met Vishnu Kirloskar. He showed me your cable and I at once cabled you back. He didn't know my whereabouts at all since I was on the continent and never corresponded with him. He had phoned up at Dr. Selle's, whom I used to write from England and learnt that I was ill.

I am now doing quite well, excepting windiness of the stomach, which has now grown into a habit with me. But I am suffering in no way and keeping good health.

My future is very uncertain and vague now. It is not very difficult to get entrance into a soap factory ; only money is demanded. It will cost at least 6 to 10 pounds a month. Germany has become very dear now. The Germans themselves are becoming ruder. The programme of life is the first consideration and it worries me sometimes as you can well imagine. I saw Prof. Godbole this morning. He has been working in a soap factory and recommends me to go there. He is himself working with Prof. Holde on Oils and Fats to secure the doctorate, but he has a lot of difficulties.

His work is progressing very slowly and his University which has been extending his periods of stay in Germany from time to time, wants him back immediately. So he is in a dilemma. There are many young Indians here getting training in different lines and all are confronted with the difficulty of making a programme for their life. Many have losses to repay. Shambhurao Jambhekar has returned to India. He has profited a great deal by his stay here, on account of his previous experience in India, and I am sure, he will be now still more indispensable to his factory. Mr. Ogle of Ogalewadi has now come here and stepped into Jambhekar's rooms. He is also extra-ordinarily experienced, having already spent two years in England and America, some years ago, working in different factories. These men have many years' experience in their own factories, and have the backing of money and influence. Messrs. Ogle and Jambhekar have seen in Germany at least 100 factories, as Mr. Ogle told me, and each factory has taught them something. They had to use many tactics for visiting these factories and never hesitated to spend any amount and to buy even unnecessary things to effect their purpose.

So I am quite unsettled and it will take some time before I start proper work. In Paris I came to know a young Bengalee gentleman, who owns his own soap factory at Calcutta, and has come with some technical problems to France. I will remain in touch with him, since he may come to Germany and I may go to France and we may thus help each other.

Mr. Namdeo Bhate is living with hardship and working hard at an Engineering College. He is living in a small room and having poor food, as I heard, owing to want of funds. I wonder at his perseverance.

How is it you haven't written, whether you received my photos from England and how you found them ?

My friend Mr. Rege (Bar-at-law) who was a boarder with me in London and who helped me a lot during my illness, is now in Baroda and must have seen or will see you. I have got a letter from Korde.

I have nothing more to communicate just now. More in my next.

Yours most affectionately,
Shyamakant.

श्री

पत्र १७७ वें

बर्लिन,
ता. ९-१२-२४

ती. नानांस शिरसाष्टांग नमस्कार, वि. वि. तुमचें व माईचें ता. १४-११ चें पत्र पोंचलें. माईच्या पत्रांतून बडोद्याची, पुण्याची वगैरे बरीच हकीकत कळली.

माझी प्रकृति सध्यां उत्तम आहे. वजनही सत्तावन किलोग्राम म्हणजे एकशें पंचवीस पौंड आहे. येथें आल्यानंतर येत्या सात आठ दिवसांत दोन पौंड वजन वाढलें. भूक वगैरेही चांगली लागते व मला येथलें जेवणखाण इंग्लंडपेक्षां किती तरी जास्त आवडतें.

अजून माझी कोठेंच सोय झाली नाहीं. एका कारखान्यांत (Soap) आज जाऊन आलों, तेथें जमलें नाहीं. कोठेंही गेलें तरी बरेचसे पैसे लागणार. डाव्हिडसोन म्हणून माझ्या ओळखीचे साबू व तेलें यांच्या कृतीचे रासायनिक आहेत. त्यांनीं मला एका चांगल्या साबूच्या कारखान्यांत सोय करण्याचें कबूल केलें आहे. पण तेथें तीन महिन्यांना ३०० मार्क (= १५ पौंड) व सहा महिन्यांला ५०० मार्क असे पडतील. पैसे दिल्याशिवाय कारखानदारांनीं तरी फुकट शिक्षण कां आम्हांस द्यावें ? कारण त्यांच्या दृष्टीनें आम्ही शिकून तयार होईपर्यंत तरी आम्हांला घेऊन त्यांना कांहींच फायदा नाहीं; उलट तोटाच. कोठें दुसरीकडे सोय झाली नाहीं तर या ठिकाणीं जाईन. इतर ठिकाणीं स्वस्त मिळाल्यास पाहात आहें. ड्रेस्डेनला ज्या कारखान्यांतून बिलिमोऱ्याचीं यंत्रें खरेदी केलीं तो व इतर कारखाने पाहण्यासंबंधीं मीं तेथें पत्र लिहिलें

आहे, त्याचें उत्तर काय येतें तें पाहावें. झेकोस्लोव्हाकियामधील गृहस्थांनाही मदतीकरितां पत्र लिहिलें आहे. एकंदर जम बसायला थोडा अवकाश लागेल. लवकरच ख्रिसमस येणार. त्याच्या अगोदर सर्व ठरवून जानेवारीपासून कामाला सुरुवात करीन असें म्हणतों. सध्यां फ्रेंच भाषाही शिकायला सुरुवात केली आहे. तूर्त मला काम थोडें असल्यामुळें पुष्कळदां वेळ जात नाहीं. इतर सर्व ओळखीच्या मंडळींपैकींही जो तो आपआपल्या कामांत असतो.

मला केव्हां केव्हां तुमची सर्वांची फार आठवण होते व हिंदुस्थानला यावेंसें वाटतें; पण हिंदुस्थान सोडून प्रथम येथें आलों, तेव्हां वाटत होतें तितकें आतां वाटत नाहीं. सध्यां मला विशेष माझ्या भावी आयुष्यासंबंधीं विचारच जास्त येतात व त्याची तुम्हांलाही कल्पना करितां येईल.

सध्यां मी माझ्या नवीन खोलींत आहें. या खोलीची मालकीण एक सभ्य बाई आहे. तिला एक मुलगा आहे. नवरा नाहीं,—म्हणजे मेला तरी असला पाहिजे किंवा काडीमोड झाली असली पाहिजे. मीं विचारलें नाहीं. येथें मी नवीनच आल्यामुळ मला अद्याप घरच्यासारख वाटत नाहीं. अजून मी पुष्कळदां माझ्या जुन्या घरच्या (झेले) मंडळींना भेटतों. बँकेकडून माझीं पत्रें आतांपर्यंत तेथेंच येत होतीं. झेले(Miss Selle)ची माझी अद्याप पूर्वीसारखीच दोस्ती आहे. एखादे वेळीं मी तिच्याबरोबर सिनेमाला वगैरे जातों. बाकी तिलाही आपला उद्योग आहेच. फोटो पोंचल्याचें तुमच्या पत्रावरून कळलें. या घरांत रोजची आंघोळीची सोय आहे. गरम पाणी नेहमीं असतें. या देशाची स्थिति आतां सुधारत चालल्यामुळें जिकडे तिकडे सदोदित गरम पाण्याची सोय होत आहे.

असो. तूर्त जास्त लिहिण्यासारखें नाहीं. तब्बेत उत्तम आहे. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

खंड सातवा

अ खे र चा   आ जा र

डाव्होस्-स्वित्झर्लंड स. १९२५

श्री

पत्र १७८ वें

बर्लिन,

ता. २० जानेवारी १९२५

ती. नानांस शि. सा. नमस्कार, वि. वि. तुमचीं तारीख २६ डिसेंबरचीं पत्रें पोंचलीं. या आवठड्यास विशेष कळवण्यासारखी गोष्ट म्हणजे माझें पोटाचें दुखणें. वरचेवर माझ्या दुखण्याची बातमी ऐकून तुम्हांला फार वाईट वाटेल व कदाचित् काळजी वाटेल. मला स्वतःलाही त्यामुळें वाईट वाटतें. कारण त्यामुळें पैशाचा व वेळेचा विनाकारण नाश होतो. पण त्याला माझा नाइलाज आहे. परवां येथें पिंगपाँगचे सामने चालू असतां मला दोन तीन दिवस पोटांत दुखण्याचा फार त्रास झाला. विशेषतः रात्रीं पोटदुखीमुळें झोंप येत नसे. पोटाचा खालचा भाग बराच फुगून त्यांत गुरगुर असा आवाज येई. आतांपर्यंत मी कोणाही पोटाच्या तज्ज्ञाकडे गेलों नव्हतों. तेव्हां हें दुखणें असेंच चालू ठेवल्यापेक्षां पुन्हा एकदां डॉक्टरांकडून तपासून घ्यावें असा मीं निश्चय केला. माझा मित्र राय हा येथें मेडिकल विद्यार्थी आहे. त्याच्याकडून त्याच्या प्रोफेसरांकडून येथल्या एका प्रसिद्ध पोटाच्या तज्ज्ञाचा तपास करविला. गेल्या शुक्रवारीं प्रथम त्यांच्या घरीं भेटायला गेलों होतों. त्यांचें नांव प्रो. एर्मान. माझ्या पोटाच्या दुखण्याविषयीं चांगलें एक तास त्यांचें माझें बोलणें झालें. आतांपर्यंत डॉक्टरांनीं बरोबर चिकित्सा न करतां उगीच माझे हाल केले; प्रथमच त्यांचेकडे आलों असतों तर लवकर बरा झालों असतों, असें ते म्हणाले. या दुखण्याच्या बाबतींत मी निष्काळजी होऊन मुळींच चालायचें नाहीं. आतांच्या आतां अगोदर पोट तपासलें पाहिजे व चिकित्सा झाल्यावर पुढें उपचार ठरवितां येईल. त्याप्रमाणें मी काल सकाळीं या हॉस्पिटलमध्यें आलों. येथें तृतीय वर्गांत एक खोली मला दिली आहे. येथें मला दोन आठवडे तरी राहावें लागेल असें डॉक्टर म्हणाले. कारण प्रथम कांहीं दिवस पोटाच्या वेगवेगळ्या तपासण्या करून मग कांहीं दिवस कदाचित् पथ्यावर ठेवतील. तपासणी पुरी झाल्यावर मग काय करायचें तें पुढें कळेल. याप्रमाणें अनिश्चितता असल्यामुळें मीं माझी जुनी खोली सोडली. सध्यां मी हॉस्पिटलमधेंच आहें.

येथें रोजचे सहा मार्क खाणेंपिणें सर्व मिळून पडतात. द्वितीय वर्गांत गेलों असतों तर रोजचे दहा मार्क पडले असते. तेथें तैनातीस माणसें जास्त असतात इतकेंच. बाकी फारसा फरक नाहीं. मला पत्रें वगैरे लिहायचीं झाल्यास पूर्वींच्या डॉ. झेलेच्या पत्त्यावर लिहावीं. कारण त्यांच्या येथें माझें जाणें येणें नेहमीं असतें; व त्यांच्या मुलीची व माझी मैत्रीही चांगली आहे. येथें येण्यापूर्वी एक दिवस मी त्यांच्या घरींच होतों. क्लेरे व तिची आई येथें मला भेटायला येत जातील.

हें पत्र वाचून उगीच काळजी करूं नका. मला स्वतःला अशक्तता किंवा आजार मुळींच वाटत नाहीं. भूकही चांगली लागते. फक्त केव्हां केव्हां पोटांत दुखतें एवढेंच. डॉक्टर म्हणाले कीं, काळजी न घेतल्यास परिणाम वाईट होईल. म्हणूनच मी आतांच्या आतां या हॉस्पिटलमधें आलों. हें हॉस्पिटल सरकारी आहे व येथले मुख्य डॉक्टर प्रोफेसर एर्मान पोटाचे तज्ज्ञ आहेत. इतके दिवस फुकट गेल्यावर व पुन्हा कामाला सुरुवात करणार इतक्यांत पुन्हा हें विघ्न उपस्थित झालें याबद्दलच काय तें मला फार फार वाईट वाटतें. शिवाय आतां पुढें उपचार काय घ्यावयाचे त्या मानानें खर्चही थोडाबहुत होणार. तूर्त मला आजाराच्या चिकित्सेसंबंधीं जास्त कांहींच लिहितां येत नाहीं. पुढच्या आठवड्यास जास्त कळवीन.

तुम्हीं सोबत पाठविलेलें आशुबाबूंचें पत्र पोंचलें. वेगवेगळ्या प्रांतांच्या सरकारांकडे तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें लवकरच अर्ज करीन. पण माझी इच्छा धंद्यांत पडण्याची आहे; आणि येथें कांहीं दिवस धंदेशिक्षण घेतल्यावर धंद्यांत पडणें कांहीं अंशीं सोपें जाईल. येथून परत येण्यापूर्वी थोडेबहुत पैसे मिळवण्याचाही मी प्रयत्न करीन आणि तें अशक्य नाहीं. बरा झाल्याबरोबर मी साबूच्या कारखान्यांत पूर्वी ठरल्याप्रमाणें कांहीं दिवस काम शिकेन. सर्वच कार्यक्रम थोडासा पुढें ढकलला गेला याबद्दल मला फार वाईट वाटतें.

जास्त काय लिहूं? माझ्या प्रकृतीची जितकी काळजी घेणें शक्य आहे तितकी मी घेत आहें. तेव्हां चिंता बाळगूं नये. मधें एकदां हिंदुस्थानांत परत येण्याचा बेत करीत होतों; पण मग विचार केला कीं, येथें चिकित्सा

व उपाय होईल तसा हिंदुस्थात होण शक्य नाहीं. तेव्हां येथेंच राहणें चांगलें. कळावें, हे विज्ञापना.

स्यामकान्त.

पत्र १७९ वें

Berlin.
3rd *February* 1925

My dear Nana.

No letter from you last week. I am expecting the next Indian mail redirected from my English Bank to-morrow.

You will be surprised to find me still here in this hospital. I have been forced to stay here longer. The doctor wants me to stay here for at least 6 weeks more. During the first two weeks I was thoroughly examined here and the doctors could not get definite and solid proofs of my disease. My intestines have been X-rayed twice. They saw my lungs in X-ray and found them quite in order; but the professor told me recently they are also going to photograph the lungs. I was rather uneasy about the diagnosis, since I knew nothing about it, and therefore, I recently wrote a letter to the head doctor of this hospital, Dr. Ehrmann, requesting him to see me alone for a confidential talk. He came accordingly and I had a talk with him. He said, he had a lot of experience in these matters and although he had obtained no definite proofs, he was suspecting tuberculosis of the peritoneum. It wasn't much advanced, but I must be very careful and take the proper treatment in order to avoid worse consequences. My malady had not been recognised until now, and I would have done better to come to the professor at the very outset, said he. He now wants me to stay here at this hospital for 6 weeks more. I have always to lie in bed, and avoid movement and exercise. He is giving me a special fat diet.

I am gradually increasing in weight, and I must increase 18 to to 20 lbs., before I can be cured, says the doctor. I have to eat 150 grams of butter daily. Potatos and milk are excluded. The bodily stamina also increases with the weight and one becomes strong enough to subdue the disease. The expenses are very moderate—beyond my calculations. The professor was kind enough not to charge me anything as his private bill. Prof. Ehrmann has a very good private practice in Berlin. Even the X-ray photos, which are very dear, will be done free of charge. Only I have to pay for my lodging and boarding at this hospital, which comes to 6 marks a day (third class). It is not bad at all, and I am not at all uncomfortable. Only I am very lonely. The hospital being very far from the main parts of Berlin, very few friends can come to me; and if they come, not very often. But I have got a lot of books with me. I study French through a correspondence course. I read newspapers and chemical magazines to which I subscribe. Then I read novels etc. I also write a lot of letters; so that I am always well occupied.

This news, I am sure, will be very unpleasant and rather shocking to you. I myself have been putting up with my stomach-trouble for over a year and this year I was feeling worse than the last year. So in a way, it is better that my malady has been detected and steps are being taken against it; otherwise I would have gone on in the same way for a further period of time, until at last it would have been too late to cure the disease at all. As I take it, even after these 6 weeks, some more rest, say a couple of months, may be necessary somewhere outside Germany. At the present moment, working (physically) means a great deal of harm, says the doctor.

As father, this will rather be painful to you, that I have

to waste a further amount of time and money without any prospects of settling in life. I can well imagine it. I myself feel sometimes rather ashamed to be dependent even on the father at this age. I was quite sure of maintaining myself in a very short time, had not this illness come in my way. Now to avoid worse results I have to take complete rest until I am cured, and there is no way out of it.

So please don't worry about the matter. Let us be glad that I have still come to this doctor quite at the beginning of the trouble and that there is no danger whatsoever, of course, proper treatment being taken.

I am feeling quite normal excepting the stomach pain I now and then feel. The pain is really not in the stomach but in the intestines somewhere. I am gradually increasing in weight which is a very good sign. Since I came here I have gained $3\frac{1}{2}$ lbs.

My friend Jyotish Chandra Ray, who is a medical student here, is very kind to me and I have to be thankful to him for the treatment I am getting here. He says he has also informed his father about my illness. I know his whole family. His father Dr. Baroda Kanto Ray is now a retired I. M. S. at Purulia, Behar. You know his mother, who had visited you at Baroda last year.

I have nothing more to write to you than to request you not to be upset and take this very easily as you have always been doing. I am sorry, I have written in English ; because Mai will require a translation now. But I couldn't have expressed this matter equally well in Marathi and hence the recourse.

With profound respects,

I am,
Yours most affectionately
Shyamakant.

P. S. I do not think it necessary to send you a cable now, since this letter will clear every thing. A cable may besides cause unnecessary anxiety for which, at present, there is no room.

Shyamakant.

पत्र १८० वें

City Hospital, Berlin,
24-2-1925

My dear Nana,

I got your letter dated 30-1-25 last week and your letter dated 6-2-25 this morning.

It is really a misfortune that I should have fallen a victim to this disease, but one has to put up with one's own lot without complaining and I am quite confident that, I will overcome this illness as I have overcome so many in my life until now. I think so often of you,—I mean my parents and especially you, Nana !—and feel so grateful for all the kind care you have been bestowing on me. One could find few fathers like you, who give their children best opportunities of education they can, and work themselves hard to bring them up. I could never love and revere a person with such a depth of feelings as I do you ! !

As regards the main part of your letter dealing with my future I will say a few words. I have long since given up hopes of the Bilimora works and am not at all counting upon it. Apart from the present adverse circumstances, I think it is always wise not to work permanently with relatives in such affairs. Service is the only choice left and it can be sought either in private industrial concerns or in government quarters. I think one should not hold before one's self the

नाना

गो. स. सरदेसाई

माई

सौ. लक्ष्मीबाई सरदेसाई

[पृ. ३५४]

ambition of amassing wealth; because this is hardly ever fulfilled. As I have no debts and as I am not married and I am not thinking of marrying at least in the immediate future, I shall be content with a small salary. Although one should have aspirations, one should not be actuated by absurd ambition thinking one'sself to be always superior to others and hence looking down upon others as many young enthusiastic Indians do. At the same time one must have self-confidence. At examinations also I have had the ambition of topping the list and it was to a certain extent fulfilled. But when I now look back upon it, I laugh at it and find that ambition foolish. Surely, I should have so much confidence in my own knowledge and study, that I should expect and demand say 90% marks. But at the same time I should not expect to get more marks than Mr. X and beat him. I think, that is an unhealthy spirit, existing in the Indian (and perhaps English) examinations. One does not find this here, since the system is quite different in Germany and as I think healthier. However, this was all by the way.

I should be applying for certain posts at factories and so on. But any way getting some practical experience in factories here at least for a short time would have been of much use; *e. g.*, had I not fallen ill, I would surely have worked say 3 months at the soap factory. I could have also got a chance of working as a chemist in some laboratory with some small salary, I mean, here in Europe, since it brings responsibility and consequently useful experience along with it. The President of my tennis club, who is an influential person is even now negotiating for a job for me. If he succeeds, that would be very nice. Of course I am not sure how long this wretched disease is going to confine me and worry me. That will decide all. I am not very impatient to go back to India or homesick as you perhaps think. I am not tired of

Europe. Only I wish to be established in life as soon as possible as you are also advising. I haven't much faith in the High Commissioner—in Governmental quarters in London for that matter. I know how Korde was disappointed by his visit to Hon. Mr. Samarth and India Office and the High Commissioner's Office etc. Although at that time the High Commissioner himself was ill and on the point of retiring,—the authorities in London tell us, that posts are now filled up by the Government of India and not in London.

I am not very much inclined to take up the teaching profession.

However, let me first be cured of my illness and then we shall settle all plans. Mr. Dotivala, who has finished his research is sailing for India from Italy on the 1st April. Shankarrao Kirloskar sails by the same steamer. Dotivala saw me last Saturday here and used to see me every week. He will see you and tell you all about me. I haven't got as yet your वर्याळी etc., parcel, but it will hardly help me. The हलवा parcel was brought to me by my friend Miss Clare Selle; but I gave it without opening to Mr. Ganpule, who was also here then. Please don't worry about my health. We are doing everything possible. With profound respects,

Yours affectionately,
Shyamakant.

श्री

पत्र १८१ वें बर्लिन,

ता. २४-३-१९२५

ती. नानांस शि. सा. नमस्कार, वि. वि. तुमचें व आबांचें अशीं ता. २७ फेब्रुवारीचीं पत्रें गेल्या बुधवारीं पोंचलीं. या आठवड्याचें टपाल अद्याप मला मिळालें नाहीं. बहुतेक उद्यां मिळेल. माझें पत्र अचुक आयत्या व जरुरी-

च्या बातमीचें तुम्हांला कसें मिळालें नाहीं याचें आश्चर्य वाटतें. मी मंगळवारीं हिंदुस्थानचीं सर्व पत्रें एकदम येथील कोणा नोकराजवळ टाकायला देतों, तेव्हां कोर्डेचें व तुमचें पत्र येथें एकदमच टाकलें गेलें पाहिजे. पुढल्या आठवड्यास तरी तें तुम्हांला मिळालें कीं नाहीं हें उद्यांच्या तुमच्या पत्रावरून कळेल. माझ्या रोगाची चिकित्सा कळून तुम्ही घाबरून गेलां नाहीं हें पाहून समाधान वाटतें. मी अद्याप या रुग्णालयांतच आहें. अद्याप माझ्या पोटांत दुखणें आहे. संध्याकाळीं थोडा तापही अजून असतो. टेंपरेचर ३७·४ च्या सुमारास असतें (= तुमचें Fahrenheit ९९·३); कधीं थोडें जास्त तर कधीं थोडें कमी असतें. सकाळीं निजून उठल्यावर मात्र उष्णतामान नैसर्गिक असतें. वजन मात्र चांगलें वाढत आहे. गेल्या आठवड्यास आणखी एक पौंड वाढला; म्हणजे एकंदर येथें आल्यापासून बारा पौंड वाढलें. वीस एक पौंड तरी वाढावें अशी डॉक्टरांची इच्छा आहे. तुम्ही ताबडतोब परत यायला लिहतां, तशी माझी देखील इच्छा आहे. पण डॉक्टरांनीं टेंपरेचर गेल्याशिवाय कोठेंच जाण्याची बंदी केली आहे. आणखी एक भानगड अशी कीं, डॉक्टर दीड महिन्याच्या रजेवर गांवाला गेले आहेत. त्यांनीं आपल्या ॲसिस्टंटकडे माझी व्यवस्था सोंपवली आहे. अर्थात् ते सुद्धां डॉक्टरच आहेत आणि येथें बरींच वर्षें काम केलेले आहेत. मला तर या हॉस्पिटलचा असा कंटाळा आला आहे कीं, बोलून सोय नाहीं. सबंध दिवस एकटा पडलेला असतों. येथें येऊन मला दोन महिने होऊन गेले. डॉक्टर कांहीं म्हणोत, मला तर असें वाटतें कीं, या ठिकाणाहून दुसरीकडे कोठें तरी डोंगरांत वगैरे मी गेलों म्हणजे मला बरें वाटेल व तापही जाईल. डॉक्टर जाऊन दोन आठवडे झाले. जातांना ते म्हणाले होते कीं, आणखी चार आठवड्यांनीं ताप जाईल व मग मीं इटालीस जावें. मी या महिना अखेरपर्यंत वाट पाहीन व तरी सुद्धां ताप नच गेल्यास तसाच इटलीस जायचा विचार करीत आहें. कदाचित् कोणाला तरी बरोबर घेऊन जाईन. तेथें थोडे दिवस राहिल्यावर ताप जाईल व मग हिंदुस्थानास परत येण्यास हरकत नाहीं. म्हणजे अद्याप त्याला महिना दोन महिने अवकाश आहे. त्या सुमारास पावसाळा सुरू होईल व जहाजांत कदाचित् त्रास होईल. पाहूं या. डॉक्टरांच्या पुढें मी सुरुवातीपासूनच हिंदुस्थानास जाण्याची गोष्ट

काढीत आहे, पण ते म्हणतात हिंदुस्थानच्या हवेची त्यांना माहिती नाहीं व शिवाय इटलीस गेल्यास मी लवकरच पूर्वीसारखा चांगला बरा होऊन येथें कामास लागूं शकेन.

माझ्या पोटांत केव्हां केव्हां दुखतें. बहुधा रात्रीं दुखतें. मध्यें दोन चार दिवस अजिबात दुखल्याशिवाय जातात. अलीकडे मीं फारसा अभ्यासही केला नाहीं. फ्रेंचचा अभ्यास हळू हळू चालला आहे, पण पॅरिसला कांहीं दिवस राहिल्यानें जसें शिकतां आलें असतें तसें घरबसल्या थोडेंच येणार? भगवद्गीता मीं येथें बसल्या बसल्या अर्थ लावून सारी वाचून टाकली. बरोबर ॲनी बेझंटचें इंग्रजी भाषांतरही वाचलें. त्यांत कितपत तथ्य आहे हें मला कळत नाहीं. कोणीं पाहिलें आहे आत्मा आहे कीं नाहीं, "निर्वाण" आहे कीं नाहीं? आजपर्यंत "असंख्यात ते जन्मले आणि मेले," त्यांनीं कोठें आम्हांला परलोकच्या बातम्या सांगितल्या आहेत? आतां व्यवहारदृष्ट्या "कर्मण्येवाधिकारस्ते–", सात्त्विक रहावें, राजस वाईट, तामस त्याहून वाईट, इन्द्रियार्थांपासून इन्द्रियें आकुंचित करून ठेवावीं, मन आपल्या ताब्यांत ठेवावें, वगैरे वगैरे जो उपदेश गीतेंत आहे तो अगदीं बरोबर आहे. तो एखाद्या नास्तिकाला सुद्धां पटेल; व तेवढेंच त्यांतलें ग्राह्य आहे असें मला वाटतें. Superstition आणि देवधर्माच्या कोत्या कल्पना त्यांत बऱ्याच असाव्या असें माझ्या कोत्या बुद्धीला तरी वाटतें. आतां मीं गीतेचा अभ्यास केलेला नाहीं हेंही खरें. पण एकदां वाचून मला जें वाटलें तें मीं लिहिलें. मला पुष्कळदां अलीकडील विज्ञाना(Science)च्या पुरस्कर्त्यांचें म्हणणेंच पटतें. विज्ञानाच्या योगानें आपली प्रगति होऊं शकेल आणि आत्मा वगैरे असेल तर तो विज्ञानाच्या योगानेंच सांपडेल. नुसती गीता वाचून व श्रीकृष्ण म्हणतात म्हणून नाहीं.

In the last number of "*Young India*," Gandhi challenges the reality of the permission the 'Qoran' gives certain people to be stoned to death and he (Gandhi) is prepared to disobey and challenge the Qoran if it doesn't appeal to reason. Strangely, however, Gandhi tries to prove that untouchability is never advocated by the Hindu *Shastras*.

as if, we should welcome untouchability if sanctioned by the *Shastras*, and maintains that untouchables should be considered as the fourth class *viz.*, शूद्र, like the other touchable शूद्रs. But why stick to *Shastras* at all if they don't appeal to reason and why have the classes at all? It's all very funny.

असो. तूर्त जास्त लिहिण्यासारखें नाहीं. म्हातारी म्युलर गेले दोन आठवडे आजारी असल्यामुळें माझ्याकडे आली नाहीं. रविवारीं आगटे, अधिकारी व प्रो. रॉय आले होते. शनिवारीं गणपुले येऊन गेले.

असो. पत्रें नेण्याकरितां मोलकरीण वाट पाहात उभी आहे. तेव्हां पुरें करतों. काळजी करण्यासारखें कांहीं एक नाहीं. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

पत्र १८२ वें

City Hospital, Berlin,
28th *April* 1925

My dear Nana,

I have passed through a great crisis during my illness, as Dr. Ray's letter last week,—which I had partly dictated,—must have told you. I suffered for about two weeks from a sudden inflammation of the intestines, which caused purging and vomitting stopping the admission of any nourishment. It is now no use giving you a detailed description of my trouble and I am not going to do it, since it is now a matter of the past. Suffice it to say that I have overcome the crisis and have begun to progress towards normal health, although it will not be very soon before I recover my usual strength; you can of course imagine that I have grown considerably weak. The doctor is giving me light semi-liquid food cautiously. Gradually and step by step I will take to normal food. I now feel appetite and there is no nausea. Curiously

enough I have stopped getting temperature for over a week now and it is quite likely that I will have shaken off the temperature altogether. The doctor says that this crisis in my illness may prove an end of the whole disease, which is very often the case with abdominal troubles and I myself feel the same. Somehow or other after standing this last crisis I have begun to feel that I am now nearing the end of my Illness. I am quite confident about it. As soon as I take the normal solid food, I will rapidly recover all the weight I have lost, and as soon as I am strong enough to move about, I will at once go to Switzerland, where I will be perfectly well. The Head-Doctor Prof. Ehrmann will be coming in a couple of days and I will settle my plans with him.

Our last letter must have caused you a great anxiety and worry. You will get this letter on 9th May and in order to relieve you I will cable you my condition on that day This letter again should mean a complete relief to you. You need not worry at all. I am in best hands. I have very good friends here, who do everything for me. I admire gratefully my friend Jyotish Chandra Ray who kept me company and helped me throughout the whole trouble. The nurses also nurse me wonderfully.

There is absolutely no necessity for any of you coming over here for my sake. The arrangement in the hospital is so perfect that you can't expect to do anything better except giving me company; and as I am quite confident that I will soon regain health and be amongst you, there is no necessity of your or Bhau's coming. Please keep yourself quite composed. I only want to bring home to you the fact that everything is being done for me and that you should not be anxious about me. I won't be sparing money wherever health requires it. I am now longing to go back to India. Europe seems to me

somehow so dry and without soul. However, I must have patience. I have written this letter in English, as it is more convenient to write just now as I am weak.

Please convey my profound नमस्कार to Mai and bless

Your affectionate son

Shyamakant.

श्री

<u>पत्र १८३ वें</u>

Park Sanatorium, Davos Platz,

Switzerland

ता. २-६-२५

ती. नानांस शि. सा. नमस्कार, वि. वि. आम्हीं ता. २६ मे रोजीं संध्याकाळीं बर्लिनहून निघून ता. २८ रोजीं दुपारीं येथें सुरक्षित येऊन पोंचलों. वाटेंत विश्रांतीकरितां एक दिवस झ्यूरिचला मुक्काम केला होता. बर्लिनला माझी तब्येत बिलकुल न सुधारतां दिवसेंदिवस वाईटच होत होती व खाण्यापिण्याचा व तृतीय वर्गाच्या हॉस्पिटलमधील व्यवस्थेचा अतिशय कंटाळा आल्यामुळें मी येथें येण्याचा निश्चय केला. येथील डॉक्टरांना पूर्वीं पत्र लिहलें होतें; त्यांनींही येथें ताबडतोब येण्याचा सल्ला दिला. बर्लिनच्या प्रोफेसरांची इच्छा मी आणखी कांहीं दिवस तेथेंच राहावें अशी होती. प्रवास धोक्याचा आहे, असें त्यांचें म्हणणें. पण अखेर त्यांच्या इच्छेविरुद्धच मीं येण्याचें ठरल्यावर मात्र प्रवास कसा करावा, वाटेंत कोठें विश्रांति घ्यावी, खाणेंपिणें कसें असावें यांविषयीं प्रोफेसरांनीं सल्ला दिला. एवढेंच नव्हे तर हॉस्पिटलमधून शहरांत गणपुल्यांच्या घरीं प्रोफेसरांनीं स्वतःच्या मोटारींतून मला पोंचवलें. मग ३।४ दिवस माझा मुक्काम गणपुल्यांच्या घरीं बर्लिनला होता. त्यांनीं माझी चांगली व्यवस्था ठेवली. हिंदी पदार्थ, पोळी, भाजी, सांजा (गोडा व तिखटामिठाचा) गणपुले स्वतः मला करून घालीत असत. एक दिवस मीं माझ्या मित्रमंडळींना चहाला बोलावलें होतें. एकंदरींत वेळ बरा गेला. बाकी मी हांतरुणांत निजूनच असें. उठण्याची शक्ति नव्हती. तापही सारखा असे.

वर लिहिल्याप्रमाणें रॉय व मी गेल्या २६ तारखेला बर्लिनहून निघालों. सेकंड क्लास निजण्याचा डबा (Sleeping car) घेतला होता. एका डब्यांत (Compartment) आम्ही दोघेच होतों. स्टेशनवर हिंदी व जर्मन कांहीं मंडळी मला पोंचवायला आली होती. दुसऱ्या दिवशीं सकाळीं स्टुटगार्ट स्टेशनवर गाडी बदलावी लागली. त्यामुळें मला बरेंच चालावें लागलें व त्रास झाला. दुपारीं दोन वाजतां झ्युरिचला पोंचलों. तेथें आमचे शांतिनिकेतनचे मित्र अरविंद बोस आम्हांला भेटले व आम्हीं जवळच्या एका हॉटेलांत दुसऱ्या दिवसापर्यंत मुकाम केला. मी निजूनच होतों. संध्याकाळीं ७ वाजतां एक टॅक्सी घेऊन तळ्याभोंवतीं व डोंगरांत थोडें फिरलों. ता. २८ ला सकाळीं ९च्या गाडीनें तेथून निघालों व एके ठिकाणीं पुन्हा गाडी बदलून दुपारीं १॥ वाजतां येथें आलों. येथें सॅनिटोरियमच्या लोकांना तार केली होती, तेव्हां ते स्टेशनवर आले होते. येथें डोंगरांतल्या लहान गाडींतून चढतांना बाहेरचा देखावा पाहून फार मौज वाटली. पण गाडीच्या स्प्रिंग वाईट असल्यामुळें धक्के बसून पोटांत दुखण्याचा त्रास झाला. गाडी विजेनें चालली होती.

आल्यावरोबर डॉक्टरही आम्हांला भेटले व दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्यांनीं माझी परीक्षा केली. त्यांनींही Peritoneum T. B. हीच चिकित्सा केली व रोग मुळींच असाध्य नाहीं, येथल्या सुंदर हवेनें, पौष्टिक खाण्यानें व सूर्यकिरणांच्या प्रभावानें मी कांहीं महिन्यांतच अजीबात बरा होईन असें आश्वासन दिलें. सध्यां रोज सकाळीं ११ ते संध्याकाळीं ६ पर्यंत माझा पलंग ओढून बाहेर सज्जांत आणून ठेवतात व तेथें मोकळ्या हवेंत मी सबंध दिवस असतों. सूर्यकिरणांचा उपयोग करण्यास अद्याप सुरुवात केली नाहीं. कारण त्यापूर्वीं मला येथल्या हवेची चांगली सवय झाली पाहिजे. नाहीं तर जास्त ताप येण्याचा संभव आहे.

येथें येऊन चारपांच दिवस झाले, पण तेवढ्यांतच मला प्रकृतींत किती तरी फरक वाटूं लागला आहे. बर्लिनला अलीकडे माझा ताप निघतच नसे. येथें सकाळीं ताप मुळींच नसतो. संध्याकाळीं असतो तोहि बर्लिनपेक्षां किती तरी कमी असतो. भूक बर्लिनपेक्षां जास्त लागते, (म्हणजे दगडापेक्षां वीट मऊ !) शिवाय येथें खाणें इतकें चांगलें व लोभ उत्पन्न करणारें असतें कीं, ' हा काय नवीन प्रकार आहे ' हें पाहण्याकरितां म्हणून तरी खण्याची इच्छा

होतेच. येथें मला सकाळीं व संध्याकाळीं एक एक ग्लास कच्चें दूध देतात. दुध घट्ट व फारच चवदार असतें. हा देश दुधाकरितां प्रसिद्ध आहे. सकाळीं व संध्याकाळीं चहा पितों. चहा अगदीं मनाजोगा हिंदुस्थानांतल्याप्रमाणें येथें मिळतो. तेव्हां आतां तुम्हांला चहा पाठवण्याची जरूर नाहीं. येथली हवा चांगली थंड असते. बर्लिनमध्यें उकाडा फार होत असे. चहूंकडे डोंगर आहेत व गर्द झाडी आहे. डोंगराचीं शिखरें अद्यापि उन्हाळ्यांत सुद्धां बर्फानें आच्छादलेलीं आहेत. येथें बाल्कनींत बसून ही सर्व शोभा पाहून मनाला उल्हास वाटतो. पुन्हा नोकरचाकर वगैरे व्यवस्था उत्तम असल्यामुळें गैरसोय मुळींच होत नाहीं. येथें लायब्ररी आहे. तेथून मी जर्मन व इंग्रजी पुस्तकें मागवितों. तीं वाचण्यांत थोडाबहुत वेळ जातो. रॉय सकाळीं व संध्याकाळीं माझ्याकडे येऊन एक दोन तास बसून जातो. येथें खर्च जास्त म्हणून तो बाहेर एका लहानशा भोजनगृहांत राहतो. तेथें सुद्धां त्याला दोन वेळांचा खाण्याचा व राहण्याचा रोजचा १० फ्रँक खर्च येतो. तो आणखी कांहीं दिवस राहून माझी तब्येत सुधारत आहे असें पाहून मग बर्लिनला परत जाईल.

येथें माझ्या एकट्याचा दरमहा खर्च ४० पौंड होईल असा अंदाज आहे. हा खर्च म्हणजे कांहीं थोडा नव्हे. तेव्हां शक्य तितक्या लवकर बरें होण्याची इच्छा आणखी दुणावते. हिंडण्याफिरण्याची शक्ति आल्यावर कदाचित् मी स्वतंत्र एखाद्या हॉटेलमध्यें राहीन व मधून मधून येथल्या डॉक्टरना प्रकृति दाखवीत जाईन म्हणजे खर्च वांचेल. तुम्हीं ६० पौंड पाठवल्याचें गेल्या ३-४ पत्रांतून लिहिलें, पण त्यांचा पत्ता नाहीं. तेव्हां तुम्हीं पाठवलेला ड्राफ्ट वाटेंत गहाळ झाला असावा. यासंबंधीं मीं बँकेला लंडनला त्यांच्याकडे डुप्लिकेट आला कीं नाहीं विचारलें आहे. तुम्हीही जेथून पैसे पाठवले त्या ठिकाणीं तपास करावा. मजजवळ आतां ९० पौंड शिल्लक आहेत. तेव्हां लवकरच मला जास्त पैसे लागतील.

मला येथें तार करावयाची झाल्यास Parksanatorium Davosplatz या **दोन शब्दांतच** पत्ता लिहावा. जर्मन भाषेप्रमाणें हा प्रत्येक एकेकच शब्द आहे. तेव्हां Sardesai Parksanatorium Davosplatz हे तीन शब्द पुरत. आम्ही येथें पोंचल्याची तार दोन तीन दिवसांपूर्वीं मुंबईस केली आहे.

अखेरचा आजार

स्वित्झर्लंडच्या या भागाची भाषा जर्मन आहे. मात्र शुद्ध जर्मनपासून येथली बोलण्याची भाषा थोडी वेगळी आहे. तरी शुद्ध जर्मन सर्वांना समजतें व बोलतां येतें. त्यामुळें मला भाषेची मुळींच अडचण पडत नाहीं. मला वाटतें किर्लोस्करांना भाषेची थोडीबहुत गैरसोय झाली असावी. जर्मननंतर येथें फ्रेंच शिकण्याची माझी अत्यंत इच्छा आहे. मी आजारी पडलों नसतों तर मुद्दाम पॅरिसला एक दोन महिने राहून फ्रेंच शिकण्याचा माझा बेत होता कारण खोलींत बसून नुसती पुस्तकी भाषा शिकून लवकर येत नाहीं. आतां येथें थोडें बरें वाटूं लागल्यावर फ्रेंच शिकण्याचा माझा बेत आहे. येथें पुष्कळांना फ्रेंच येतें. नोकरचाकरांना सुद्धां येतें.

पूर्वीं आबांनीं मि. श्मिटकडून ज्या एका झेकोस्लोव्हाकियाच्या गृहस्थांचा मला वशिला दिला होता, त्यांचा माझा बरेच दिवस पत्रव्यवहार चालू होता. येथें येण्यापूर्वीं दोनतीन दिवस मला बर्लिनला त्यांचें पत्र आलें. त्यांत ते म्हणतात, ‘ Schicht Co च्या मोठ्या साबूच्या कारखान्यांत काम मिळत आहे, अर्ज पाठवा, ’ वगैरे. आजारी नसतों तर ही चांगली संधि होती. पण आतां ती आशा तूर्त तरी सोडलीच पाहिजे.

तुमचें ता. ८-५ चें पत्र ता. २८-५ ला मला येथें मिळालें. सोबत माईचें व श्रीनिवासचें पत्र होतें. पत्राच्या वजनासंबंधानें तुमची चूक नसेल, पण मला दंड द्यावा लागला ही गोष्ट खरी. ही चूक हिंदुस्थानच्या पोष्टाचीच असावी. १९२६ एप्रिलच्या सरदेसायांच्या उत्सवाला मला हजर राहतां येईल अशी आशा करतों.

मला झोंप चांगली लागते. पहांटे केव्हां केव्हां पोटांत दुखून झोंपमोड होते. पोटांत दुखण्याचा खाण्यापिण्याशीं मुळींच संबंध नाहीं. खाणें सर्व खातों (मांसाहार). शौचास साफ होतें. जुलाबाची वगैरे आतां भीति वाटत नाहीं. येथल्या चांगल्या हवेनें व पौष्टिक खाण्यानें व संपूर्ण विश्रांतीनें लवकरच बरा होईन अशी माझी पूर्ण खात्री आहे व तुम्हीही बाळगा. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

ता. क. कोंकणांतून श्रीनिवासाचें व श्रीपाद टिकेकराचें वगैरे पत्रें पोंचलीं. स्कॉलरशिप मिळाल्याबद्दल श्रीनिवासास माझें अभिनंदन कळवावें. त्याच्या पत्रास उत्तर लिहायला या आठवड्यास झालें नाहीं. त्याला सांगावें कीं, पत्राच्या उत्तराच्या मजकुरासंबंधीं अलीकडे बराच विचार करीत असतों. मजकूर बराचसा जमला कीं ताबडतोब उत्तर लिहीन.

पत्र १८४ वें

Park Sanatorium, Davos Platz,
Switzerland,

My dear Aba, 3rd *June* 1925

Just received your letter dated 15th May wherein you say you are starting for Berlin in any case. Just after we received your telegram declaring your voyage, I had asked Ganpule to request you telegraphically not to come for my sake since I thought it to be waste of money. You must have received this telegram before you were to leave, and I do not know whether you have dropped your plan or still proceeded. Taking that you have started I am writing this n order to intimate to you my where-abouts.

I recovered from the dangerous attack in Berlin and was gradually gaining strength when I decided to come to Switzerland to join this Sanatorium where Shankarrao Kirloskar was. Accordingly accompained by Mr. J. C. Ray I came here last week and am already feeling a change for the better. If you are coming to Europe, you must come to Davos Platz and not go to Berlin. Mr. Ray is still here keeping me company.

You shall have to inquire at Marseilles how you travel to Davos. More when we meet.

Yours affectionately,
Shyamakant.

श्री

<u>पत्र १८५ वें</u> **Davos,**

ता. ७-७-२५

ती. नाना व ती. सौ. माईस शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना विशेष. आतां दुपारचें खाणें आटोपून मी माझ्या खोलीच्या बाल्कनींत उघड्या हवेंत बिछान्यांत पडलेलों आहें. माझ्या तब्येतींत हळू हळू सुधारणा होत आहे यांत शंका नाहीं. पण जखम भरून यायला अद्याप किती तरी अवकाश लागेल. अद्याप मला सारखें पाठीवर पडून राहावें लागतें आणि निजल्या-निजल्यासुद्धां – जरासुद्धां – बिछान्यांत मदतीशिवाय इकडेतिकडे हालतां येत नाहीं. शरीराचा सगळा भार हाडांवर असल्यामुळें हाडें अगदीं दुखून आलीं आहेत. पडल्यापडल्या वेळ जात नाहीं म्हणून हें पत्र हळु हळू निजूनच लिहीत आहें. बाकी सविस्तर हकीकतीचें आबांचें पत्र सोबत आहेच. अलीकडे दोन-तीन दिवस जखमेची फार आग होत आहे. आंतून पोटांतली घाण – कारण शस्त्रक्रिया करितांना आंतड्यांना एक भोंक पडलें होतें – सारखी जखमेंतून बाहेर येत असते त्यामुळें आग होते. डॉक्टर आंतड्याचें भोंक आपोआप भरून येण्याची वाट पाहात आहेत आणि तशी त्यांना जवळजवळ खात्री वाटते. पण तसें न झाल्यास पुन्हा शस्त्रक्रिया करून आंतडें शिवून टाकावें लागेल. पण ही दुसरी शस्त्रक्रिया करावी लागल्यास पहिल्यासारखी धोक्याची नसून खात्रीची आहे. पण तो प्रसंगच येणार नाहीं असें आम्ही समजतों. लवकरच मला आंघोळी-च्या टबमधें पाण्यांत निजवून वाहत्या पाण्यांत रोज जखम धुतील. अद्याप मी फार अशक्त आहें. खाणेंपिणें अगदीं थोडें जातें. चहा, कॉफी, सूप, एग्-मिक्श्चर, टोस्ट, भात व थोडें बहुत मांस मला देतात. पण खाण्याच्या मेहन-तीनें सुद्धां मला दम लागतो. समाधानाची गोष्ट म्हणजे गेल्या ५-६ दिवसांत मला मुळींच ताप आला नाहीं; आणि अशी स्थिति बरेच दिवस – म्हणजे जखम बरी झाल्यावर सुद्धां – राहिली तर काय मी कायमचाच बरा होईन. जखम आंतड्यापर्यंत खोल व रुंद अशी उघडीच असल्यामुळें पेरिटोनियम उघडाच पडलेला आहे. त्यामुळें बाहेरच्या मोकळ्या हवेनें पेरिटोनियमचा रोग

आपोआप भरून जाण्याचा संभव आहे, असें डॉक्टर म्हणतात; आणि असे दाखले त्यांच्या पाहण्यांत आलेले आहेत; आणि तशीच आम्ही आशा करीत आहों. तूर्त मात्र माझे जे हाल व यातना चालू आहेत त्यांचें वर्णन न करणेंच बरें.

आबा आहेत म्हणून मला बरीच मदत होते. त्यांचा मात्र वेळ कंटाळवाणा जात असेल. येथें डोंगर आणि गर्द झाडी जिकडे तिकडे आहे त्यांत ते पुष्कळ फिरायला जातात. येथल्या सुंदर हवेनें व पौष्टिक खाण्यानें त्यांच्या प्रकृतीलाही फायदा होईल. मला ते सांजा वगैरे करून देतात. आज त्यांनीं माझ्या पाठीचीं हाडें टरपेंटाइननें चोळून रगडून दिलीं. ते सकाळीं ८॥-९ वाजतां उठतात व न्याहारी वगैरे आटपून १०-१०॥ च्या सुमारास माझ्याकडे येतात. तितक्यांत माझ्या जखमेचें ड्रेसिंग झालेलें असतें. मग १२ वाजतां ते घरीं जेवायला जातात व थोडी विश्रांति घेऊन पुन्हा ४ वाजतां येतात ते ६ पर्यंत बसून मग फिरायला जातात किंवा पुष्कळदां ७ पर्यंत बसतात. सात वाजतां त्यांच्या घरीं संध्याकाळचें जेवण असतें. जेवून पुन्हा माझ्याकडे येतात किंवा न जमल्यास येत नाहींत. असा क्रम चालतो. त्यांना येथें थंडीचा थोडासा त्रास होतो. सध्यां माझाच ओव्हरकोट, हातमोजे वगैरे ते वापरतात.

मी रात्रीं ९॥-१०च्या सुमारास निजण्याची तयारी करतों, त्या वेळीं मला मॉर्फियम इंजेक्शन देतात. मग जखमेचें दुखणें व झोंबणें बंद होऊन पांच सहा तास झोंप लागते. पांच वाजतां पहाटे बहुतेक जागा होतों व मग जखम जोरानें झोंबूं लागते. सकाळ होऊन ६॥ वाजतां नर्स येईपर्यंत माझा वेळ फार अस्वस्थतेंत जातो. सकाळीं जखम पुन्हा स्वच्छ करून बांधतात तेव्हां बरें वाटतें. त्याचप्रमाणें चेहरा, हात वगैरे नर्स साबूनें धुवून देते.

ज्योतिष रॉय बर्लिनला परत जाऊन पोंचला. तो ज्यांच्या घरीं रहात होता त्या घरचा मालक फारच सज्जन गृहस्थ आहे. मला नेहमीं फुलें वगैरे घेऊन भेटायला येतो. परवां बायकोला व लहान मुलाला घेऊन आला होता. आबांची त्याची चांगली दोस्ती झाली आहे. फिरायला वगैरे बरोबर केव्हां केव्हां जातात. बरोबर जर्मन-इंग्लिश डिक्शनरी घेतात. कारण आबांना जर्मन येत नाहीं आणि

त्याला इंग्रजी येत नाहीं. काल रात्रीं आबांना त्याच्या येथें जवणाचें आमंत्रण होतें.

कधीं बरा होऊन येथल्या डोंगरांत फिरायला जाईन असें झालें आहे. कळावें, हे विज्ञापना.

श्यामकान्त.

पत्र १८६ वें

Davos platz (Switzerland)
२३-९-२५

ती. नाना व ती. सौ. माईस श्यामकान्ताचे त्रिकालचरणीं मस्तक ठेवून शि. सा. नमस्कार, वि. वि. तुमचें गेल्या खेपेचें पत्र बरेंच निराशापूर्ण आहे. त्यावरून माझ्या आजाराविषयीं तुमची थोडी तरी गैरसमजूत झाली आहे असें वाटतें. माझ्या मतें आबा जीं पत्रें तुम्हांला लिहितात तींही थोडीं-बहुत वाजवीपेक्षां जास्त निराशाजनक असतात. मला अजून उठून बसतां येत नाहीं व बरें वाटत नाहीं. अशक्तता असते म्हणून मीं स्वतः दर खेपेस लिहीत नाहीं, त्याचा भलताच अर्थ करूं नये. माझ्या आजाराविषयीं डॉक्टरांचें व माझें जें बोलणें होतें तें जर्मनमध्यें असल्यामुळें आबांना मुळींच कळत नाहीं व अशक्ततेमुळें सगळें भाषान्तर करून मी आबांना पुष्कळदां सांगत नाहीं. यामुळें आबांचाही केव्हां गैरसमज झाला असल्याचा संभव आहे.

वर आबांनीं जी हकीकत दिली आहे ती बरोबर आहे. जखम रोजच्या रोज थोडी भरत आहे यांत शंका नाहीं. जखमेबरोबरच आंतड्याचें भोंक बंद व्हावें असा अंदाज आहे. ऑपरेशन बहुधा करावें लागूं नये. आंतड्याला भोंक (fistula) असून पोटाची जखम उघडी असली – आणि तशी ती ठेवावीच लागते – म्हणजे ती भरायला फार वेळ लागतो. त्यांतून पेरिटो-नियमचा विकार असल्यामुळें त्यांत भर पडते. तेव्हां हा केवळ वेळाचाच प्रश्न आहे. दुसरी कांहीं भीति नाहीं असें डॉक्टर सांगतात. ऑपरेशनमुळें आंतडीं अज्न आपल्या नैसर्गिक स्थितींत आलीं नाहींत. म्हणून वायु, उलट्या वगैरेचा थोडाबहुत त्रास व्हावयाचाच. हळु हळू तीं आपला नित्यक्रम पूर्वीसारखा

" रुग्ण शय्या "

पृ. ३६८] श्यामकान्त [ज्योतिष रॉय

श्यामकान्तचें इंग्रजी हस्ताक्षर

I am feeling a keen desire of seeing you & of staying with you. I had so many things to tell you; I cant write all.

Expecting a speedy reply,

I am
yours affly.
Shyamakant.

करूं लागतील व जखम बरी होऊन हिंडायला फिरायला लागल्यावर मी चांगला बरा होईन असा अंदाज आहे. सांगण्याचा मुद्दा इतकाच कीं, घाबरून जाण्याचें किंवा माझ्या जीविताची आशा सोडून देण्याचें मुळींच कारण नाहीं. मला तर पूर्ण आशा वाटत आहे.

शिक्षणांत किंवा लहानाचे मोठे करण्यांत आपली कोठें चूक झाली असेल अशी शंका येण्याचें देखील माझ्या मतें कारण नाहीं. शरीरानें बळकट व निरोगी (robust) असा मी लहानपणापासूनच नव्हतों, त्याला तुमचा इलाज नाहीं. T. B. हा रोग असा आहे कीं तो कोठेंही कोणालाही त्याचे जंतू जाऊन होऊं शकतो, आणि विशेषतः अशक्त प्रकृतीच्या लोकांना तो होण्याचा संभव जास्त. इतर रोगांप्रमाणेंच केवळ chanceनें तो कोणालाही होतो व त्याप्रमाणें तो मला झाला; याशिवाय मला या बाबतींत दुसरें कांहीं वाटत नाहीं. पूर्वजन्मींच्या पापाचें प्रायश्चित्त किंवा अशा तऱ्हेच्या इतर समजुतींवर माझा विश्वास नाहीं. निसर्गानुसार माणसें, जनावरें, कीटक वगैरे ज्या जीवांच्या जाती (species) आहेत त्या मात्र अक्षय चालू रहाव्या अशी निसर्गाची योजना दिसते. पण त्या जातींतील एखादा विशिष्ट प्राणी (individual) नष्ट झाला तर निसर्गाला त्याचें दुःख नाहीं; एवढेंच नव्हे तर दुर्बल असतील ते नष्ट व्हावे अशीच निसर्गाची व्यवस्था असते. दुसरे नवीन निर्माण झाले म्हणजे झालें. त्याच प्रमाणें चुकून मी या रोगाच्या चक्रांत सांपडलों. आतां मनुष्य सर्वश्रेष्ठ व बुद्धिमान म्हणून ह्या आपत्तीशीं झगडण्याचे उपाय व साधनें हीं त्याच्या जवळ आहेत. आणि हल्लींच्या वैद्यकशास्त्राच्या कुशलतेनें यांतून नक्की पार पडेन अशी माझी खात्री आहे. तुम्ही जी माझे संवर्धनाची व शिक्षणाची वगैरे व्यवस्था केली त्यांत कोठेंही चूक झाली असल्याचें मला तरी वाटत नाहीं. आपलें कर्तव्य करीत रहावयाचें; परिणाम नेहमींच आपल्या मानवांच्या हातात असतात कोठें ? आतां जास्त लिहवत नाहीं. अखेरच्या ह्या कांहीं ओळी थकल्यामुळें आबांच्या कडूनच लिहवाव्या लागल्या.

मी स्वतः दर आठवड्यास कांहीं मजकूर लिहीनच असें नाहीं, परंतु त्याचा अर्थ मी जास्त आजारी आहें असा घेऊं नये. कळावें, सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

श्यामकान्त.

श्री

<u>पत्र १८७ वें</u>

डाव्होस् प्लात्झ,

ता. १२-१०-२५

ती. नाना व तो. माईस श्यामकान्ताचे त्रिकालचरणीं मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना विशेष. आतां सोमवार सकाळ आहे. नुकताच माझा सकाळचा चहा आटपून मी स्वस्थ अंथरुणांत पडलों आहें. आज बरेच दिवसांनीं पुन्हां चार ओळी लिहिण्याची हौस वाटत आहे. म्हणून हें पत्र लिहावयास घेतलें. आतां सकाळचे नऊ वाजण्याचा सुमार आहे. हळु हळू थंडी पडूं लागली आहे. दरवाजांतून बाहेर नजर फेकली म्हणजे जमिनीवरच्या गवतावर जिकडे तिकडे बर्फाचे बारीक कण पडून पांढरेंच पांढरें झालें आहे, आणि डोंगरांच्या पाठीमागून तरुण सूर्य हळु हळू आपल्या तांबूस किरणांचें ऐश्वर्य चोहोंकडे फेकीत जमिनीवरचें हें पांढरें आच्छादन दूर करून हिरवें गार गवत उघडें करीत आहे. सकाळच्या प्रहरच्या ताजेपणाच्या या देखाव्यानें कोणाच्या मनांत मोठमोठ्या उच्च आकांक्षा व काम करण्याचा उत्साह उसळणार नाहीं ? माझ्यासारख्या पांगळ्या दुबळ्या आजाऱ्याला सुद्धां आशा व उत्साह वाटून निरोग अवस्थेंतील भावी सुखाचे देखावे दिसूं लागतात. सकाळच्या प्रहरीं या कोमल उन्हांत हळु हळू फिरून किंवा सृष्टीच्या शोभेंत कोठें तरी एका कोपऱ्यांत बसून निसर्गाच्या सौंदर्याचा भरपूर उपभोग घेणें सध्यां तरी माझ्या नशिबांत नाहीं. आज चार महिने झाले, मी बिछान्यांत खिळे मारल्यासारखा जखडलों आहें तो आहें. तेव्हां अखेर शेवटीं दुखण्याचे व आजाराचेच विचार डोकें भणाणून सोडतात; आणि पत्रांत तरी माझ्या दुखण्याचीच रडकी कहाणी मी लिहिणार आणि दुसरें तिसरें मला आतां लिहिण्यास सुचणार कसें ? व तुमची तरी दुसरें काय करण्याची या वेळीं इच्छा असणार ? बाकी आज उठल्यापासून आतांपर्यंत तरी जखम फार झोंबत नाहीं म्हणून हें पत्र लिहिणें तरी शक्य होत आहे.

गेले दोन आठवडे माझे फार हालांत गेले. पोटांत आंतड्यांत कांहीं तरी गडबड होऊन एकाएकीं धरण फुटल्याप्रमाणें जखम जोरांत वाहूं लागली.

इतकी कीं केव्हां केव्हां बिछाना सुद्धां घाणीनें खराब होई. त्याबरोबरच उलट्या सुरू झाल्या, आणि पोटांत कांहींच ठरेना. त्यामुळें अशक्तता आणि अस्वस्थता वाढत चालली. पण सगळ्यांत वाईट म्हणजे जखमेंतून जें पित्त बाहेर पडे त्यानें जखमेची भयंकर आग होऊन भडका उडे. अगदीं दे माय धरणी ठाय होऊन जाई. मी म्हणें, कांहीं नाहीं तर आग तरी थांबवा व मला स्वस्थपणें पडूं द्या. जखम धुणेंही कठिण झालें होतें. कारण प्रवाह थांबतच नसे. तरी जखम धुतल्याबरोबर पोटांतल्या घाणीनें (intestinal sap) बाजूची चामडी खाऊं नये म्हणून चापून मलम (boric ointment) सगळीकडे चोपडून ठेवीत होते. पण घाणीचा प्रभाव इतका कीं ती मलमाला बाजूला ढकलून बाजूची चामडी खात सुटत असे. त्यामुळें आग भयंकर होई व जखम भरायची बाजूला राहून थोडीबहुत वाढतच होती. अखेर आग तरी भासूं नये म्हणून अफूच्या अर्काचीं (Panto-pone) इंजेक्शनें देत असत व त्यानें मला आराम पडे.

तुम्हीं पूर्वीं तांदूळ पाठवले होते त्यांचें आटवल, थोडी मसुरांची उसळ वगैरे आबा करून घालीत. तेवढें पोटांत राही. डॉक्टर म्हणत, पोटांत कांहीं तरी घोटाळा झालेला आहे. आंतड्यांच्या भोंकाजवळ गळूं किंवा त्यासारखें कांहीं झालें असेल व तें फुटलें असेल. सर्व घाण निघून गेल्यावर आंतड्याचें भोंक आपोआप पुन्हा पूर्वींसारखें बारीक होऊं लागेल व तें एकदां बंद झाल्यावर मग झपाट्यानें प्रकृति सुधारेल. पोटांतला खरा प्रकार प्रत्यक्ष डोळ्यांनीं दिसणें किंवा नक्की कळणें शक्य नाहीं. हे सर्व नुसते अंदाज आहेत. बरें, जखमेच्या खालचा भाग घाणीनें व पुवानें भरला असतां शस्त्रक्रिया करून आतड्याचें भोंक बंद करणें शक्य नाहीं. कारण शस्त्रक्रिया करतांना पोटांत घाण चहूंकडे पसरणार व मग infection होणार. मग तर जगण्याची आशाच नाहीं. पण डॉक्टर मुळींच घाबरले नव्हते. फक्त प्रगति होण्याचें तितकें लांबणीवर पडलें असें ते म्हणाले. अशा स्थितींत कसा तरी जीव मुठींत धरून मी होतों. मला आराम पडायला मदत म्हणजे काय ती एक अफूच्या इंजेक्शनची. त्यानें मात्र काय आराम पडतो म्हणून सांगूं! आणि फारच मजा वाटते. त्याची संवय मात्र फार वाईट. कालच पहिला दिवस, जखम कमी

वाहिली, आग बिलकुल झाली नाहीं, म्हणून मीं इंजेक्शन घेतलें नाहीं. पण तें न घेतल्यामुळें अशी अस्वस्थता व अशक्तता वाटली कीं कांहीं विचारूं नका. रात्रीं निजतांना पुन्हा इंजेक्शन घेतलें तेव्हां पुन्हा स्वस्थता आली. नाहीं तर मरणाशिवाय दुसरा विचार नव्हता. उलट्याही अलीकडे दोन तीन दिवस बंद आहेत; त्यामुळें पुन्हा अन्न जाऊं लागलें आहे, आणि सुधारणेच्या पंथाला लागलों आहें. जखमेच्या बाजूची लाल झालेली चामडी पुन्हा चांगली होत आहे. असें करतां करतां केव्हां तरी भोंक बंद होईल व मला शक्ति येऊं लागेल. या गेल्या दोन आठवड्यांत माझें वजन बरेंच कमी झालें असलें पाहिजे. परवांच्या दिवशीं माझें वजन केलें तें ३५ किलो (७७ पौंड) भरलें. यावरून मी किती खालावलों आहें हें तुम्हांला कळेल. ५४-५५ किलो तरी माझें वजन असे. आतां हें सर्व गेलेलें वजन भरुन यायला किती वेळ लागेल याची तुम्हीच कल्पना करा. पण मला पूर्ण आशा आहे. केवळ जखम बरी होण्याची वाट पहात आहें. यापुढें ईश्वराची इच्छा.

आतां हात दमून आला. जास्त लिहवत नाहीं. भाऊंना प्रेमपूर्वक नमस्कार कळवावे. मागें तांदूळ पाठवलेत त्या वेळीं तुरीची डाळ कां पाठवली नाहीं? पाठवायला आम्हीं लिहिलें होतें. मागलीं पत्रें चाळून पुन्हा वाचावीं म्हणजे असा विसरलेला पदार्थ पुन्हा पाठवतां येतो. उडदांची डाळ, मुगांची डाळ थोडी थोडी पाठवीत जावी. तुरीची डाळही थोडी थोडी वरचेवर पाठवावी. अशा वस्तू अगदीं साध्या शिजवून भात किंवा पोळीबरोबर खाल्ल्या तरी बऱ्या लागतात व मनाचें समाधान होतें. येथलें खाणें अगदीं नाखुषीनें खातों. आमच्या जवळची मोहरी व हळद संपत आली आहे तीही पाठवावी. हिंग पुरेसा आहे. याशिवाय दुसरें सामान आम्ही स्वयंपाकांत वापरीतच नाहीं. कारण तिखट किंवा मसाले मला मुळींच खायचे नाहींत. भाज्यापालेही सध्यां खायच्या नाहींत. तिखटाचे पदार्थ पाठवूं नयेत. सवडीनुसार केव्हां तरी चांगले ताजे डिंकाचे लाडू व थोडेसे बेसनाचे लाडू पाठवावे. उगीच भाराभर मात्र पाठवूं नयेत. बाकी आबाही कांहीं खातील म्हणा. पार्सलें लहान व चांगलीं बांधलेलीं सुटसुटीत असावींत; कारण तीं पुष्कळदां वाटेंत जकातीच्या ठाण्यावर उघडलीं जातात. कसल्याही वड्याबिड्या पाठवायच्या भानगडींत पडूं

नये. येथें येईपर्यंत त्यांची चव जाते व त्या फुकट जातात. वर लिहिलेल्या डिंकाच्या लाडूंत भुइमूग किंवा असले वायुकारक पदार्थ घालूं नयेत. इंदुबाई आम्हांला डिंकाचे लाडू खायला संधि देतील त्याला अजून बराच अवकाश आहे. बाकी इतक्यांत नव्या काकीकडून (कृष्णाबाई) मिळण्यासही हरकत नाहीं.

आतां जास्त मजकूर आबा लिहितील. कळावें हे विज्ञापना.

श्यामकान्त.

... उघड असल्यामुळे हा शस्त्रक्रियेचा प्रयत्न धोक्याची होईल व निकालासंबंधीं आतां काहीच अंदाज बांधतां येणार नाहीं. मरणाची तयारी करूनच ही शस्त्रक्रिया हातीं घेत आहोत व परमेश्वरापाशीं यशाची प्रार्थना करीत आहो. तुम्हींसुद्धां बऱ्यावाईट सर्व परिणामास तयार असावें म्हणून मुद्दाम हे पत्र मोठ्या मेहनतीनें लिहीत आहें. बहुतेक २/४ दिवसांतच शस्त्रक्रिया होईल.

शस्त्रक्रियेंतून जर सुखरूप पार पडलों नाहीं तर या जगांत तुमची आमची पुन्हा गांठ नाहीं!! परमेश्वराची जशी इच्छा असेल त्याप्रमाणें सर्व बऱ्यावाईटास तोंड देण्याची आपली तयारी पाहिजे — त्याशिवाय दुसरा मार्गच नाहीं. आजपर्यंत लहानपणापासून तुम्हीं उभयतां मला मोठ्या काळजीनें व प्रेमानें लालन पालन केलें; उत्तमपैकीं शिक्षण दिलें; मला केव्हांही कांहींही कमी पडूं दिलें नाहीं. आईबापांपासून मुलांना जितकें म्हणून मिळणें शक्य असतें त्यांत तुम्ही केव्हांही न्यूनता दाखवली नाहीं. ~~तु~~ तुमच्यासारखे आईबाप लाभणें म्हणजे माझें भाग्य होय आणि तें मला लाभलें हा केवढातरी मोठा लाभ मी समजतों.

अशा स्थितींत तुम्हांला उभयतांना स्वदेशीं परत जाऊन भेटून केव्हां एकदां ~~सुखी~~ सुखी करीन अशी उत्कंठा मला लागून राहिली होती! आपण दोघांनींही भावी सुखाचे मनोरे मनांत बांधले असले तर त्यांत नवल नाहीं. पण ईश्वरी योजना तशी नसेलही!

नाना, माई! माझी एवढीच विनंति आहे कीं जर मला मृत्यूनें गांठलेंच तर शोक किंवा दुःख करीत बसूं नका. तुमच्यासारख्याच किंवा त्याहूनही ज्यास्त दुःखी लोकांकडे दृष्टि फेंका. तुमच्या दुःखाची कल्पना माझ्या मनापुढें आली म्हणजे असह्य होतें. 'उदारचरितानां तु वसुधैव कुटुंबकम्' असेंच मानून चाला.

पण याही शस्त्रक्रियेंतून मी पार पडेन व पुन्हा चांगला बरा होईन याचाही संभव थोडा नाहीं. तशीच आपण दृढ आशा मनांत बाळगूं या आणि तशीच ईश्वराची प्रार्थना करूं या. मी अद्याप आशा सोडली नाहीं.

ती. भाऊंना आतां वेगळें लिहीत नाहीं. त्यांची मदतही मी कधीहीं विसरणार नाहीं. ईश्वर त्यांना यश देवो! ती. आबा तर माझ्यासाठीं केवढा [illegible] करून येथें माझी शुश्रूषा करीत आहेत. त्यांचाही मी चिरऋणी आहें.

आपल्या घरीतल्या(?) सर्व माणसांनीं आपापल्या परीनें मला अत्यंत मदत केलेली आहे. आतां क्षीणतेनें हात दुखून आल्यामुळें त्या सर्वांची वेगवेगळी रजा घेववत नाहीं. सर्व लहानमोठ्यांस यथोचित आशीर्वाद नमस्कार कळवा.

हेंच पत्रीं ती. सौ. माईस चि. ब. म. ठे. शि.सा.(?) न. वि. वि. वरील पत्र दोघांनाही आहे. तुम्हां उभयतांस अत्यंत, प्रेमपूर्वक व श्रद्धापूर्ण प्रणाम वरचेवर सांगून हा तुमचा आज्ञाधारी व आवडता मुलगा रजा घेतो. तुमचा शुभ आशीर्वाद सतत माझ्यापाशीं आहे.

कळावें हे विज्ञापना.

तुमचाच — श्यामकान्त.

ता. क.
माईनें पाठवलेलें
गाणें पोंचलें. चांगलें
आवडलें.

श्री

<u>पत्र १८९ वें</u>

मुंबई,

ता. ४-१२-२५

चिरंजीव गणपतीस अनेक आशीर्वाद. एकूण सर्व कारभार आटोपला. आमची पुण्याई खलास झाली. तुमचे प्रयत्न विफल ठरले. परमेश्वरी कृपेस आम्ही पात्र नाहीं, असा प्रसंग सर्वांवर आला. आपल्या कौटुंबिक नाटकाचा एक एक अंक संपून पुढील अंकांस सुरुवात होत आहे. आणखी काय काय खेळ पाहयचें आमच्या नशीबीं आहे कोणास ठाऊक. आजपर्यंत थोडाबहुत आशातंतु बाळगून दिवस कंठीत होतों, इतकाच आपला ऋणानुबंध. तूं, भाऊ, श्रीनिवास सर्व माझीं मुलेंच आहां. मला कांहीं एक कमी नाहीं. मी अत्यंत सुखांत आहें. खातोंपितों, निजतों सर्व कांहीं आमचें उभयतांचें यथास्थित चाललें आहे. कशास कांहीं कमतरता नाहीं. कितीही शोक केला तरी देहधर्म आहेत ते चाललेच पाहिजेत. शोक कांहीं गेलेली वस्तु परत आणून देत नाहीं.

हा शेवट ऐकण्याची तयारी आज सहा महिने हळु हळू होतच होती. परंतु मन वेडें, पुन्हा पुन्हा वाटे तुमचे प्रयत्नांस यश येईल आणि श्यामकान्त पुन्हा भेटेल. परंतु चांगली वस्तु ईश्वरालाच जास्त प्रिय वाटल्यामुळें त्यानें आपल्याजवळ नेली. ता. २८ नोव्हेंबर सन १९२१ रोजीं जर्मनीस जाण्यासाठीं त्यानें मुंबई सोडिली; आणि बरोबर चार वर्षांनीं २८ नोव्हेंबर रोजींच तुझे सांनिध्यांत त्याचा अंत झाला. सन १९१५ सालीं याच सुमारास १४ डिसेंबर रोजीं वत्स आम्हांस सोडून गेला. त्याचे पश्चात् दहा वर्षें आम्हांस पुत्रवान म्हणवून घेण्याचा योग लाभला. ईशेच्छा बलीयसी. शनिवार ता. २८ नोव्हेंबरची दोनप्रहरची तुझी तार रविवारीं सकाळीं भाऊस मिळून ते दुपारचे गाडीनें मजकडे कामशेतला आले. रात्रीं ८॥ वाजतां आम्हांस वर्तमान कळलें. कळून करणार काय! रडण्याचें सुद्धां त्राण नाहीं. सर्व स्नेही मंडळींस व आप्तेष्टांस असेंच दुःख होत आहे. लगेच दुसरे दिवशीं सोमवारीं भाऊ मला व माईला घेऊन मुंबईस आले. हल्लीं येथें आहों. बडोद्याचे महाराज व महाराणी यांची तार दुःखप्रदर्शनाची आली आहे. असो. अस्वांधतेनें कांहीं लिहवत नाहीं. आला दिवस जातो, तो कांहीं थांबत नाहीं,

व कोणाची वाटही पहात नाहीं. फुकट आम्ही माणसें! फुकट आमचा गर्व व फुकट आमचें ज्ञान. परमेश्वराजवळ इतकेंच मागतों कीं आतां तरी तुमच्या सर्वांच्या देखत आमचे दोघांचे डोळे मिटावे. परंतु नशीबीं आणखी काय काय भोगायचें असेल तें खरें. आतां तूं येऊन भेटशील तोच सुदिन मानूं. प्रकृतीस जपावें. आज सहा महिने तुला अपरंपार कष्ट झाले. तुझे मांडीवर कुटुंबांतले किती तरी प्राणी गेले. कदाचित् याकरितांच तुझा जन्म कीं काय कळत नाहीं. परंतु हेंही तुझें पुण्य कांहीं लहान नाहीं. व्याधिग्रस्त रोग्यांची शुश्रूषा व अखेरची यात्रा करण्याचें पुण्य तुझ्याइतकें दुसरे कोणास लाभलें नाहीं. आतां तूं जास्त हव्यास धरूं नको. तुझी बायको व तूं आमचेच जवळ कामशेतला रहा. होईल तो शेतीभातीचा उद्योग तब्येतीपुरता करूं. निदान एकत्र राहूं. जास्त हाव व आकांक्षा धारण करून त्या तुझ्या माझ्या हातून सिद्धीस नेणें परमेश्वरास मानवत नाहींसें दिसतें. बाकी यांत परमेश्वराचा तरी कितीसा संबंध आहे कोणास ठाऊक! सर्व ग्रह, सर्व ज्योतिष, सर्व पूजा व भजन, सर्व कांहीं व्यर्थ आहे. आम्हां मानवांस या विषयांचें यत्किंचित् ज्ञान नाहीं. आपण सर्व अज्ञानांत गुरफटलेले आहों.

खर्चासाठीं तूं आपले हाल करूं नकोस. आतां फुरसत आहे तर देश पाहणें वगैरे ज्या ज्या गोष्टी करितां येतील त्या सर्व सावकाशीनें व शांत चित्तें कर. प्रकृति सांभाळ. जास्त काय सांगूं. जीव राहीना म्हणून या चार ओळी कशा तरी खरडल्या आहेत. तुझा सर्वथैव विजय असो, हाच आशीर्वाद.

गो. स. सरदेसाई.

परिशिष्ट पहिलें

महत्त्वाचे व्यवहार

पत्र १९० वें

Shantiniketan, Bolepur,
24th *January* 1913

Dear Sir,

Please accept our hearty thanks for the *Makar-Sankranti* presents which we accept as a token of your sincere good wishes for the *Ashram.* Both Shyamakant and Jayaram are quite well and they seem to be happy here. We have made special arrangement for their Bengali and Sanskrit; in all other subjects they are reading with the boys of the *Ashram.* Both the boys are exceptionally good in their conduct; we are really proud in getting them as in-mates of the *Ashram.* I do not know how to thank you for sending your boys here for the benefit of learning Bengali specially. Prof. Kshiti-Mohan Sen, M.A., who is now teaching Shyamakant and Jayaram Bengali, is learning Marathi from the boys. Your literature is on equal footing with our Bengali and in some respects superior. If Prof. Kshiti Babu can manage to master Marathi we shall open a Marathi class here some day. This will do much good to the *Ashram* ; the beauty of your precious literature must not remain unrevealed to us. I wrote to Babu Rabindranath Tagore, who is now in America, about your boys and in reply he has expressed great satisfaction and has congratulated us in getting the boys among the in-mates of the *Ashram.*

Welcome Transformation

Shyamakant and Jayaram are quite well. Hoping all well with you.

I remain, sincerely yours,
Jagadanand Roy.
(Superintendent.)

<u>पत्र १९१ वें</u>

To

G. S. Sardesai, Esqr., Baroda.

Muradpur,
9-2-14

Dear Mr. Sardesai,

I spent a couple of days at Bolepur on the eve of Christmas last and was surprised agreeably at the marked improvement in the health, physical appearance and spirits of both your boys. Even Jayaram showed a welcome transformation. He is no longer morose and brooding, but has entered fully into the life of the school. Both can sing beautifully and write Bengali. If they stay there above the age of 16, there is a chance of their minds being won over to Brahmoism. Thanks for your letter throwing light on the topography of the Akbar Kavi-kalash correspondence. I accept **सालरपें** for **शंकरपेठ.**

Yours sincerely,
Jadunath Sarkar.

पत्र १९२ वें

To

G. S. Sardesai, Esqr.

Shantiniketan,
12th *May* 1914

Dear Sir,

Please accept our hearty thanks for your kind letter, which I have shown to Dr. Tagore. I can not adequately express how glad we are all here to learn that Sriman Shyamakant has satisfied you. *Sriman seems to us now in every respect a best boy amongst two hundred Brahmacharies who are being educated here.* He decidedly possesses literary and musical taste and a sweet spotless character, which when fully developed are sure to make him a remarkable man. May God grant him a long life and a perfect health.

We are sorry owing to some changes in teaching staff of the *Ashram*, special arrangement for Shyamakant's Sanskrit could not be made. Yes, his health does not look altogether what it should; it seems to us he is not a strong boy constitutionally. However, I shall make necessary arrangements to give him more substantial food and milk. Games like foot-ball and cricket, I am afraid, are likely to do him more harm than good; a game like tennis will suit him best. I shall see that he plays tennis regularly. Our classes are held in the open air and the dormitories are well ventilated, and even in the cold months of December and January all doors and windows are kept wide open day and night. To sleep in a room like this, is something like sleeping in the open air; it will not be difficult to make necessary arrangements, so that he may spend most of his time in the open air when he comes back here.

A Happy Evening at Bombay

Please communicate my *ashis* to Shyamakant and Jayaram. Hoping you to be in good health with the boys.

I remain, sincerely yours,
Jagadanand Roy,

पत्र १९३ वें

Bombay,
23-9-1915

My dear Shyamakant,

We spent last night at your uncle's house, and met the whole of your family. We had such a happy evening together and it will form a very pleasant memory for us to take with us on our journey. We had dinner and then after dinner met your mother and grandmother and your young brother gave us some English recitations, and he and your cousin sang together some songs including a Bengali one which you had taught them.

They all made us feel one of the family and we felt very comfortable in our *dhoties.* I had a long talk with your father about your future and he is willing that you should stay on at the *Ashram* for another year, after you have passed the Matriculation and read English and Bengali. If we can only manage to get two or three boys to read like that without any idea of passing the Matriculation, it would be very good. Mr. Andrews could take a class in advanced English. When we come back we must see what can be done.

With love,
Yours affectionately,
W. W. Pearson.

Mr. Andrews will write from Colombo.

पत्र १९४ वें

Laharia Sarai,
18th *November* 1915

Dear Mr. Sardesai,

Shyamakant accepted my invitation to follow me here from Purulia and we parted company last Saturday at Barb where Mr. Godbole, the Sub-divisional Officer, entertained the Lieut. Governor after a public reception. He writes that he enjoyed his holiday and I am very pleased to hear it. He was rather in a hurry to get back to Bolpur, because the test examination was drawing so near.

We talked about many subjects, English, Sanskrit, Mathematics and so on. He takes an intelligent interest in them all but requires practice. I should have thought that nothing could be more appropriate for your son than to learn Persian and acquire the methods of historical research followed by Professor Jadunath Sarkar: Shyamakant seemed to have a leaning towards science possibly after one of his uncles.

I hear you are now engaged in bringing out a second edition of your histories. It must be engrossing work to digest the vast amount of recently unearthed materials and give the results in a popular form. But I have no doubt of the event.

Yours sincerely,
S. B. Dhavle.

पत्र १९५ वें

Manchester,
1st *February* 1920

My dear Shyamakant,

I have only obtained your address recently from Shantiniketan and I feel I must write to you and send you my love.

You have perhaps heard that I have been ill for some time and for this reason have been unable to return to India. I am glad to say that I am much better now and hope to be able to return to the motherland in October. I do not expect to go *via* Bombay but *via* Colombo ; so I am afraid I shall not be able to see you on my way to Shantiniketan.

I am at present teaching at a school in the Isle of Wight where the climate is mild, good scenery and I find it suits my health very well. But all the time I long to return to the *Ashram* where I can feel at home and at peace. Mr. Andrews I have not heard from except by cable since he left for South Africa. I am hoping that he will return to India *via* England so that I can see him and talk with him. I have felt like an exile for the last three years.

I hope you are well and happy and that you will write to

Your affectionate friend,
W. W. Pearson.

श्री

पत्र १९६ वें   पुणें,

ता. ६-५-२१

सप्रेम अनेक नमस्कार, वि. वि. कित्येक माणसांना कारणाशिवाय कुरकुरण्याची संवयच असते. खरेंच, श्यामकान्त, तुझ्या रडगाण्यावरून तूं खरेंच दुसऱ्या वर्गांत येणार असें मला वाटूं लागलें होतें. या ठिकाणीं अनुमान चुकल्यानें आनंदच होत आहे हें सांगायला नकोच. पण अशानें तुझ्या शब्दांवर विश्वास बसणार नाहीं हं! काय बेटे परीक्षक मूर्ख तरी! पेपर्स वाईट गेले तरी चापून मार्क देतात!

आतां तुझा ताप कसा आहे? तापांत प्रॅक्टिकल करण्याची पाळी आली असतांना देखील तूं इतक्या उत्तम तऱ्हेनें परीक्षेंतून पार पडलेला पाहून सकौतुक आनंद वाटतो. पुढला विचार काय ठरेल तें कळवशीलच. अमेरिकेला

जाण्यापूर्वीच चतुर्भुज होऊन शृंखला अडकवून घ्यावी म्हणजे बेताल बहकून पळून जाण्याची भीति नको असा इरादा दिसतो एकंदरींत. लग्न पुण्यांतच करून घे हो, म्हणजे आम्हांला सहज लाडूपोळ्या मिळतील.

आक्काचा मावस भाऊ ढवळे येथें विजापूराहून आला होता व त्याच्या सांगण्यावरूनच मीं तुला मागलें पत्र लिहिलें होतें. प्रो. आजरेकरांच्याकडे आम्ही कालपर्यंत ही मंडळी आली कीं काय याच्या चौकशीला जात होतों, पण त्यांचा पत्ता नाहीं. आज कदाचित् आली असतील. आक्काचा फोटो आतां मला मिळाला आहे. तूं तिला आतां प्रत्यक्षच पाहशील. मग मी कशाला पाठवून देऊं तुझ्याकडे मला आयता मिळालेला फोटो? श्रीनिवास गेला का इंग्लंडला? बाळू कीर्तने व कमळी व त्यांच्याकडचीं सर्व माणसें सुट्टींत पुण्याला येतील असें दिसतें. नवल विशेष नाहीं. ती. नाना व माई यांना नमस्कार. कळावें, ही विनंति.

गोदू धोपेश्वरकर.

पत्र १९७ वें

Hotel Esplanade, Berlin,
28-5-1922

Dear Shyamakant Sardesai,

His Highness the Maharaja has been pleased to ask me to send you the enclosed cheque for the sum of fifty pounds (£. 50) as a present to you from him. His Highness wishes you accept it as a token of his appreciation of the long faithful and devoted service of your father to the State and he sends you his good wishes for your success in your career abroad. Kindly send a line acknowledging the receipt of this letter and the cheque enclosed in it.

Yours sincerely,
Jivraj N. Mehta.

परिशिष्ट दुसरें

स्नि ग्ध ज न-सं वि भा ग

[ज्याप्रमाणें श्यामकान्ताचीं पत्रें मला आपला बहुमोल ठेवा वाटतात, त्याचप्रमाणें त्याच्या निधनसमयीं अनेक पूज्य, विद्वान् व जिव्हाळ्याच्या व्यक्तींनीं आम्हांस धीर देऊन बोध केला, ते त्यांचे शब्द सुद्धां आम्हीं अद्यापि हृदयांत सांठवून ठेविले आहेत; आणि ज्या अर्थीं पितृवात्सल्यानें हें पुत्राचें वाङ्मयश्राद्ध मी आचरीत आहें, त्या अर्थीं माझ्या प्रेमळ बंधूंचे हे तिलांजली त्यांत समाविष्ट करून त्यांनाही एक प्रकारचें चिरकालीन स्वरूप प्राप्त करून देणें अयुक्त नाहीं. संसारांत सुखदुःखें सर्वांचेच वांट्यास कमी-अधिक प्रमाणांत येतात; आणि तशा प्रसंगीं वाणी कुंठित होऊन काय बोलावें व काय लिहावें हें सुचत नाहीं. सबब तशा प्रकारचा कांहीं अल्प मासला सर्वांस उपलब्ध व्हावा यासाठीं मीं त्यांच्या सांत्वन-पत्रांचे कांहीं थोडे उतारे पुढें दिले आहेत.—गो. स. स.]

[१] श्री. सौ. चिमणाबाई महाराणीसाहेब, बडोदें, २६-१२-२५

...... कथापुराणांत, देवादिकांवर सुद्धां पुत्रशोकाचा कहर गुजरल्याचीं उदाहरणें सांपडतात. या गोष्टी काल्पनिक म्हणून जरी सोडून दिल्या तरी तुम्ही स्वतः इतिहासकार असल्यानें इतिहासांत असे प्रसंग तुमच्या वाचण्यांत कमी आले असतील असें नाहीं. त्याचप्रमाणें नेहमीं जगामध्यें असे दुःखाचे प्रसंग कित्येकांवर कोसळल्याचें आपण पाहतों किंवा ऐकतों. प्रत्यक्ष आमच्यावर असे प्रसंग आल्याचें तुम्हांस माहीत आहेच. या सर्वांकडे लक्ष देऊन सध्यां आपल्या स्वतःवर जो दैवी कोप झाला आहे, तो निमुटपणें सोसल्याशिवाय आतां दुसरा मार्गच उरला नाहीं.

...बिचाऱ्या सौ. लक्ष्मीबाईंच्या दुःखाची नुसती कल्पना आली तरी चमत्कारिक वाटतें. परंतु त्यांना सुद्धां तुमच्याकडे पाहून स्वतःचें दुःख

आवरून धरावें लागत असेल; अशा स्थितींत तुम्हीं तुमच्या दुःखास आळा घालून सौ. लक्ष्मीबाईंसच धीर दिला पाहिजे. उभयतांनीं एकमेकांस अशा रीतीनें धीर देणें योग्य होय.

तुम्हांस आलेल्या तुमच्या मुलाच्या शेवटल्या पत्रांतील हृदयद्रावक मजकुराविषयीं मला समजलें. अंतकाळच्या दोनचार दिवसांपूर्वीं त्याच्याच्यानें असें करुणाजनक पत्र लिहवलें तरी कसें, याचें आश्चर्य वाटतें, व त्याच्या थोर मनाची तारीफच करावीशी वाटते. मला स्वतःला त्याचा थोडासा परिचय झाला होता व त्यावरून त्याच्या भविष्याची उज्ज्वल अशी आशा वाटली होती. परंतु परमेश्वराची करणी अगाध आहे हेंच खरें.

[२] सेक्रेटरी, महाराजा ऑफ बरोडा, ३०-१-२६

...... आपणांस पुत्रविरहजन्य दुःखाचा जो जबरदस्त धक्का बसला त्या-बद्दल श्रीमंत सरकार महाराजसाहेब यांस अतिशय वाईट वाटत आहे. त्या दुःखाचा अंशतः तरी विसर पडावा म्हणून आपण चार दिवस बडोद्यास सरकारी पाहुणे म्हणून यावें अशी श्रीमंत सरकार महाराजसाहेब यांची इच्छा आहे.

[3] *Indira Raje (Maharani Kuchbihar), Baroda*

...... Words fail me but, my dear master, my heart is full of sympathy for you and your wife. God only can give you two courage and strength to bear such a calamity. 31–1–26

[4] *G. S. Bhate, Berlin,* 1–12–25

...... I am glad I paid Shyamakant a visit before his death. If I had not done so, I would have regretted it all my life. His sufferings were too great to be endured and he is now free from pain. But what shall I say to you and the mother ? Words fail me. The loss cannot be made up. The void in life cannot be filled. I can only send you both my sincerest and deepest condolences.

[५] न. चिं. केळकर, पुणें, २२-१-२६

...... आज सहज फर्ग्युसन कॉलेजच्या त्रैमासिकाचा अंक वाचावयास हातीं घेतला. त्यांत प्रथम तुमचे मृत सुपुत्राचें चित्र पाहिलें. त्यास मीं पूर्वीं पाहिल्याचें स्मरेना, तरी तें बराच वेळ पाहिलें. पण पुढें पान उलटतांच त्याचें तुम्हां मातापितरांस लिहिलेलें अखेरचें पत्र दिसलें तें वाचलें. तें वाचतांना माझ्या डोळ्यांतून पाणी कसें जात होतें तें लिहीत नाहीं. त्या मुलाची प्रेमळ वृत्ति, मृत्यु समोर उभा असतां दाखविलेलें धैर्य व तुम्हांस आश्वासन देऊन धैर्य धरण्याविषयीं काढलेले उद्गार वाचून मला असें वाटलें कीं, असा मुलगा मृत्युमुखीं पडल्याचें आठवून मला जर रडूं आलें, तर तुमची स्थिति काय झाली असेल ? मी तुम्हांस मुंबईस त्याच्या मृत्यूनंतर भेटलों, तेव्हांही मला वाईट वाटलें. पण तुम्हांस पाहूनही डोळ्यांतून पाणी आलें नाहीं, तें याचें पत्र वाचून आलें. असो. याहून अधिक लिहिण्याचा हेतुही नव्हता व लिहीतही नाहीं. इतिहास हा तुम्हीं आपला मुलगा मानिलेला आहे व तो अमर आहे.

[6] *Dr. V. K. Kirloskar, Sholapur*, 2-12-25

...... I know it is the bitterest draught to which human flesh can be subjected, that you will be drinking in company with your amiable wife for the rest of your life. All the philosophy in the world is but a poor instrument to blunt the sharpness of the affliction you are suffering. With all the tall talk of religion it is yet a mystery why such calamities should befall persons with a purity of heart and action like you. I have nothing else but invoke the aid of *Time* and pray that He may use His blunting and effacing property on you with redoubled force.

[७] श्री. लक्ष्मणशास्त्री लेले, पुणें, १४-१-२६

‘ गुणवदपत्यवियोगक्लेशासि जगत्त्रयीं नसोचि तुला ’ । —मोरोपंत.

...... आपला मुलगा अगदीं शिक्षण संपून तयार झालेला, शिक्षणांत लौकिक संपादन केलेला व आपल्या थोर मातापितरांस, आपल्या कुलास

किंबहुना देशासहि भूषण होण्याच्या योग्यतेस चढलेला होता. तेव्हां अशा सत्पुत्राचा वियोग म्हणजे साक्षात् सर्वस्वनाशच होय. आपण अत्यंत उद्योगी व व्यासंगी असल्यानेंही आपलें मन लेखनव्यवसायांत गुंतण्यासारखें आहे. किंबहुना आपला इतिहासलेखनप्रयत्न हाच आपला खरा, प्रेमळ, होतकरू व चिरंतन पुत्र आहे असें आपण समजावें, व शांत चित्तानें त्याचें संगोपन करून आनंद व समाधान मानावें. यापेक्षां अधिक काय लिहूं ?

[८] वि. ल. भावे, ठाणें, १७-१२-२५

...... सकाळीं ती अत्यंत शोककारक, उद्वेगजनक आणि हृदयविदारी अशी निधनवार्ता कळली.......या प्रसंगांत दुखवट्याचे कोणतेही शब्द निरुपयोगी आहेत, हें मी जाणतों. ज्यांनीं उत्तरी गळ्यांत घालून आम्हांस पाणी द्यावें, त्यांची उत्तरी गळ्यांत घालून त्यांना उलट पाणी देण्याचा प्रसंग यावा याहून दुसरें विपरीत काय असणार ?

[9] *Jadunath Sarkar, Moradpur*, 6–12–25

...... So, this is the end for which we toil all our lives. And it is thus that we are left alone when we are in sight of the grave! As old Edmond Burke said, on the premature death of his youthful son, "I live in an inverted order. They who ought to have succeeded me, have gone before me. They who should have been to me as posterity, are in the place of ancestry."

After such a catastrophe, life can have hardly any relish left for us, and continued existence becomes a mechanical process like the movement of a clock-work doll. Even the literary work which has been so long our life's stimulant and joy, henceforth turns into a sort of narcotic or drug for temporarily deadening the feelings and making us forget the real world around us.

But even that temporary relief is denied to your wife. I do not know how she will bear this second shock. If you

had a married daughter she could have been some sort of consoler and nurse to her aged mother. Even a last look was denied to you all.

[१०] विष्णु गोविंद विजापूरकर, तळेगांव, ९-१२-२५

...... आपल्या उतारवयांत पुत्रशोकाचा प्रसंग अगदीं हातातोंडाला आलेल्या पुत्रासंबंधानें यावा यासारखें ऐहिक संकट दुसरें कोणचें? परंतु ईश्वरी करणी अगाध! आम्हांस काय बोध देण्यासाठीं असें घडलें कळत नाहीं. युरोपांत शिकावयास गेलेल्या तरुणास हवाच मानत नाहीं कीं काय न कळे! प्रो. घाटे, प्रो. गुणे हे तरी परत आल्यावर फारच थोडे जगले. अमेरिका व इंग्लंड व स्कॉटलंडमध्यें गेलेली मंडळी बरी टिकली. कांहीं असो, आज आम्हांवर आलेल्या संकटानें छाती दडपून जाणें मात्र सुटत नाहीं.

[११] द. ब. पारसनीस, सातारा, २-१२-२५

...... आपल्या प्रियकर चिरंजीवाचें पत्र फारच हृदयद्रावक आहे. सदर पत्रांतील विचार-उद्गार आपल्या चिरंजीवाचें खरें चित्र नेत्रांपुढें ठेवितात. अशीं सुसंस्कृत, प्रेमळ, विनयशील व मातृपितृभक्त मुलें फार क्वचित् दृष्टीस पडतात. खरोखर तुम्ही भाग्यवान कीं असलें सुंदर अपत्य आपणांस मिळालें. परंतु अत्यंत दुःखाची गोष्ट ही कीं, तें आपणांस लाभलें नाहीं. खरोखर विधात्याची ही किती निष्ठुरता!

[१२] माधवबोवा अन्याबोवा त्रिंबककर, बडोदें, १६-१२-२५

...... आपल्याला या वयांत हा काय दुःखद प्रसंग आला? शिव! शिव!... मनाला या विषयाकडे न जाऊं देतां इतर विषयांत व ईश्वरभक्तींत नियुक्त केलें असतां बरें पडेल. मीं लिहावें असें नाहीं.

[13] *Surendra N. Sen, London, 30–12–25*

...... You are a wise man and know very well the helplessness of man. This is the tragedy of life. We suffer and yet

we do not know why we suffer and in our misery and helplessness, we lean upon the mercy of God.......All that I can do and want to do is to weep with you and mingle my tears with yours.

[१४] चिं. गं. भानु, यवतमाळ, १४-१२-२५

...... कुटुंबांतील प्रियतम जीव जाणें दुःखद आहे हें तर खरेंच. तथापि आपण आपलें सर्व उत्तम आयुष्य मराठ्यांस पुनः सजीव करण्यामध्यें खर्च केलें आहे. परमेश्वरापाशीं प्रार्थना ही आहे कीं, महाराष्ट्रेतिहासाचें काम आपण पहिल्या नेटानें, उमेदीनें, उत्साहानें चालवाल असा धीर त्यानें आपणांस द्यावा.

[15] *G. K. Devadhar, Bombay*, 13–12–25

...... Kindly accept my hearty condolences and sympathy in your great bereavement caused by the death of your now only son. I knew the boy and he was the gem of your family.

[१६] द. वि. आपटे व द. वा. पोतदार, पुणें, २-१२-२५

......आपणांवर अशनिपातप्रसंग आला! आम्हीं प्राकृत जनांनीं ईश्वरी कोप असें समजावें आणि अंगीकृत कार्यें पुढें चालवावीं. सांगणें सोपें, आचरणें कठिण. आपलें उतारवय आणि त्यांत हा प्रसंग ईश्वरें दाखविला. परंतु इतिहासाच्या गोष्टी श्री आपणांकडून लिहवीत आहे. विश्वासराव-मृत्यु आणि नानाभाऊंचा शोक आपण वर्णिला, तोच शोकसागर आज तुम्हां नानाभाऊंवर उचंबळला!

[१७] नाथ माधव, मुंबई, ८-१२-२५

...... आपल्या संसारिक मनानें – 'हा हंत हंत नलिनीम्' – असेच दुःखोद्गार काढले असतील, किंवा स्नेही मंडळींनीं 'आपली ग्रंथरचना हीच आपलीं चिरंजीव अपत्यें आहेत,' असें सांगितलें असेल. या दोन्ही गोष्टी खऱ्या

आहेत. मी अधिक तें काय सांत्वन करणार? तरीही संसारी दृष्टीनें स्नेही म्हणून आपल्या दुःखाचा वांटेकरी असलेला --

नाथ माधव.

[18] *K. K. Lele, Dhar*, 14-12-25

...... The whole of Baroda - nay - the whole of Maharashtra and much beyond it commiserates with you. The loss of such a soul is a national calamity. At this moment I am reminded of the simple prayer of Ramdas, a copy of which you gave me at Baroda beginning with :—

पावन भिक्षा दे रे राम । दीन दयाळा दे रे राम ॥

[१९] वि. ग. केतकर, पुणें, १७-१२-२५

...... आपल्या चिरंजीवाच्या निधनाची हकीकत वृत्तपत्रांत वाचून व विशेषतः त्यांची बुद्धिमत्ता अलौकिक असून ते हिंदुस्थानास निदान आपले समाजास भूषणभूत खास झाले असते, परंतु तें काळास पाहवलें नाहीं हें वाचून अत्यंत वाईट वाटलें. Those whom the gods love die young एवढें खरें.

[20] *Setu Aiyar, Coimbatore*, 14-12-25

...... The mother's heart is made of the softest material known only to our Creator and she must resign herself to Him and Him alone......such is *Samsara* and nobody within its clutches escapes its bites. ... The advice given in our *Sastras* is " Don't think that your son is dead but do think that he is living in every boy or girl that you see."

[२१] श्री. व्यं. केतकर, पुणें, १०-१२-२५

...... मला काय वाटलें हें लिहून सांगूं शकत नाहीं. मिसेस केतकर यांना देखील हें वर्तमान कळून आपल्या संबंधानें फार वाईट वाटलें. कमी वयाच्या मनुष्यानें जास्त अनुभव घेतलेल्या मनुष्यास सांत्वनाचे शब्द लिहिणें मला वेडेपणा वाटतो.

[२२] ग. वा. मावळंकर, अहमदाबाद, ११-१२-२५

...... डोंगर आपणांवर जरी विशेष जोरानें पडला असला तरी त्याचे खालीं आम्हीही चिरडलों आहोंतच. असो. आपणांस हें दुःख सहन करण्यास परमेश्वर शक्ति देवो. यापेक्षां या वेळीं अधिक काय लिहूं ?

[23] *M. R. Bodas, Bombay*, 6-12-25

...... It must be a great blow to you and the mother in after-life. It seems God willed his final home to be in Germany. Your literary work ought to absorb your whole attention now.

[२४] कुवलयानंद, लोणावळें, ४-१-२६

...... वृद्धपणीं पुत्रशोक होणें हें फारच कष्टप्रद असतें; तथापि आपण केलेल्या देशसेवेमुळें व आपल्या चिरंजीवांच्या विद्वत्तेमुळें आपल्या दुःखांत सर्व महाराष्ट्र वांटेकरी झाला आहे ! माझ्यासारख्या आपल्या प्रेमांतील लोकांना तर किती वाईट वाटलें असेल हें परमेश्वर जाणे !

सरस्वती-सेवकांचें व सुखाचें वैर आजकालचें नाहीं ! तें तसेंच कायम असल्याचें मात्र आपल्या उदाहरणानें सिद्धच होत आहे !

[२५] त्रिं. भि. हर्डीकर, पुणें, ३-१२-२५

...... कोणी कसाही विवेकी व वैराग्यशील असला तरी असल्या अतिशय कठोर आघातानें त्याची अवस्था कांहीं वेळ वेड्यासारखी झाल्याशिवाय राहणार नाहीं. आपल्या उभयतांच्या दुःखास पारावार नाहीं. आपल्यासारख्या सज्जनांवर देव इतका कां कोपला कळत नाहीं. इतका सद्‌गुणी व बुद्धिवान् मुलगा परमेश्वरानें आपणांस दिला, त्याच्यावर आपण आपलें तन-मन-धन-सर्वस्व खर्च केलें, त्यानें आपल्या अपेक्षेबाहेर त्याचें चीज केलें, व एकाएकीं दैवानें आपल्या सर्वांच्या तोंडांतील घांस दुष्टपणें काढून नेला !!........ महाराष्ट्रांतला एक अत्यंत बुद्धिमान तेजस्वी मोहरा हरपला यांत शंका नाहीं.

[26] *Gustel Muller, Charlottenburg (Germany),*
22-2-26

...... My thoughts were always with you. I can imagine how hardly the blow struck you and Mrs. Sardesai, and how heavily you have suffered. But the Almightly who did it will give you the strength to bear it. Dear Shyamkant is gone, our eyes will never meet but he will live in our hearts for ever. I loved my dear Shyamkant from the beginning he came into my house, and I was proud of my black boy. To me, the German Grandmother, he came with his little sorrows and life-affairs, and I did my best to help him. And afterwards when his sickness began, I went to the hospital to chatter away the long lonely hours. Often, he talked over his plans and objects and thoughts of what was to be his future life. How his brain stopped working, his hand fell lifeless, and his loving honest heart ceased to beat! Dear boy! how thankful he has been for every little thing I brought him. How I liked his sparkling eyes, his kind smiling. And how often, sitting at his bed-board caressing his thin hand and cheek, I saw his pain, and kissing his forehead, comforted him. O, he suffered awfully, but he bore it like a hero. He departed out of the world's fight and struggle, and being in the eternal bliss, he is waiting for us. Please excuse me, that I tell this all, but I do it only to show you, that your dear son found a heart to feel with him so far away from home.

[27] *K. N. Sane, Kalyan,* 10-12-25

I am extremely sorry to hear of your bereavement. God is great and His will be done here as in the next world.

[२८] सौ. कमला कीर्तने, सोलापूर, २-१२-२५

...... जगांतील व्यसनें किंवा यत्किंचितही पापाचरण कान्तराजांचे हातून अखेरपर्यंत झालें नाहीं. शुद्ध, सत्त्वशील स्थितींतच या पापी जगाचा अधिक अनुभव न घेतां त्यांनीं लवकरच ही यात्रा संपवली. जणूं काय आतां अधिक दिवस जगते, तर त्यांना या पापी जगाबरोबर मिसळावें लागलें असतें. तेंच त्यांनीं टाळलें......... माझ्याजवळ अधिक शब्द नाहींत पण मन सर्वस्वीं तुमच्या बरोबरच तीच स्थिति अनुभवितें आहें. जास्त काय लिहूं ?

[२९] रा. ज. गोखले, पुणें, १२-८-२६

...... आपणांवर जो प्रसंग आला तो अशा प्रकारचा आहे कीं, तो पाहून परमेश्वराच्या दयाघनत्वाबद्दल शंका अत्यंत आस्तिक बुद्धीच्या मनुष्यासही उत्पन्न व्हावी. पांडवांसारख्या श्रीकृष्ण परमात्म्याच्या अत्यंत प्रिय स्नेह्यांनाहि अशी आपत्ति चुकली नाहीं, मग इतर सामान्य मानवांची कथा काय ?

[३०] गो. स. सरदेसाई, कोल्हापूर, ६-१२-२५

...... आपल्या दुःखाची परम सीमा झाली. आम्ही सर्वजण सदरच्या दुःखांत अंशभाक् आहों, यापेक्षां या प्रसंगीं काय लिहिणार ? ता. ३०-११-२५च्या आपल्या पत्रांत इतक्या दिवसांत प्रथम चिंताजनक उद्गार आले आणि त्यापूर्वीच कारभारही सर्व आटपला ! !

[३१] महादेवशास्त्री दिवेकर, वांई, ५-१२-२५

...... आपले चिरंजीव युरोपांत वारल्याचें ऐकून मनाला फार वाईट वाटलें. निर्दय काळानें हिंदुस्थानांतल्या राष्ट्रीय बुद्धीवर झडप घातली आणि राष्ट्राचें नुकसान करून आपणांस वृद्धपणीं अतिशय दुःख दिलें याबद्दल काय करावें हें सुचत नाहीं.........राष्ट्रांतील बुद्धिमान् तरुण गेल्याबद्दल आम्हांलाही हळहळ वाटत आहे.

[३२] वा. दा. मुंडले, इस्लामपूर, २८-१२-२५

...... आपलें पत्र व चिरंजीवाचे पत्राची फॅक्सिमिली वाचून डोळ्यांतून अश्रु सहज आले ! त्यावरून आपल्या हृदयास केवढी खोल जखम झाली असेल याची बरोबर कल्पना आली.........असला समंजस पुत्र असण्याचें भाग्यही हल्लींच्या काळीं फार थोड्यांच्या वांट्यास येतें......अशा मुलाचें आकस्मिक निधन व्हावें हें तुमचेंच केवळ नव्हे तर देशाचेंहि दुर्दैव आहे असें मला वाटतें.

[३३] बा. ना. देव, इंदूर, ३-१-२६

...... चिरंजीवाचें अंतकाळापूर्वीचें अस्सल पत्र व त्याचा फोटो......पाहून व वाचून ज्याचा हृदयभेद होऊन तें द्रवणार नाहीं त्यास " स योगी अथवा पशुः " या कोटींतच गणला पाहिजे. मला तर त्यामुळें फारच वाईट वाटलें. भर्तृहरीच्या " अहह कष्टमपंडितता विधेः " या श्लोकाची आठवण झाली...

[३४] शं. वा. किर्लोस्कर किर्लोस्करवाडी, १४-१२-२५

...... आपणांस काय लिहावें व कसें लिहावें हें सुचत नाहीं. आपल्यावर गुदरलेला प्रसंग इतका हृदयद्रावक आहे कीं, आमच्यासारख्या जिव्हाळ्याच्या माणसाचें तर राहोच, पण एखाद्या अपरिचित माणसालाही तो ऐकून पराकाष्ठेची हळहळ वाटेल ! ती. सौ. माईंच्या दुःखाला तर सीमाच नाहीं. प्रत्यक्ष दगडाला पाझर फुटेल अशी त्यांची स्थिति आहे. त्यांचें सांत्वन करणें शब्दांच्या आटोक्यांत नाहीं.......आपणांसारख्या थोर व मला पितृस्थानीं असणाऱ्या विवेकी सत्पुरुषाला मी अधिक काय लिहिणार ?

[३५] गणेश अनंत लेले, बडोदें, १-१२-२५

...आपल्या दोघांच्याही काळजांस घरें पडण्यासारखी हकीकत आपल्यापासून बऱ्याच अंतरावर घडून आली. हा घाला आपणांवर पडला हें खरें. परंतु अशा होतकरू सुस्वभावी मुलाचा घात ही सार्वजनिक आपत्तीच समजावयाची आहे.......हा घाला इतर सर्वांवरही आला आहे असें मी

समजतों. या समजुतीनें प्रत्यक्ष मातापितरांच्या दुःखाचें परिमार्जन होतें असें नाहीं. तथापि आपल्या दुःखाचे अंशतः तरी वांटेकरी दुसरे आहेत, अशा विचारानें त्या दुःखाचा भार किंचित् तरी कमी भासेल.

[36] *Dr. G. B. Paranjpe, Baroda,* 2-12-25

...... The Lord of death seems to have avenged himself on you all and the victim to his utmost relentless cruelty. Tantalus was hardly ever more vindictive than in the case of Shyamakant. If forgetfulness of the past is ever a blessing, it is so in your present condition.

[३७] वि. स. वाकसकर, बडोदें, १-१२-२५

...जन्मभर न्यायानें, सचोटीनें, परोपकारवृत्तीनें व कर्तव्यपरायणतेनें वागल्याचें फळ वृद्धापकाळीं आपणांस असें मिळावें यांत परमेश्वराचा न्यायीपणा दिसतो कीं क्रूरपणा दिसतो ! ! आपल्या या वयाला हें दुःख वाढून ठेविलेलें पाहून 'अपि ग्रावा रोदित्यपि दलति वज्रस्य हृदयम्' ही भवभूतीची उक्ति मूर्तिमंत डोळ्यांपुढें उभी राहते. आपल्या दुःखाची कल्पनाच आमच्या डोळ्यांतलें पाणी खळूं देत नाहीं. मग आपली अवस्था काय झाली असेल ?

[38] *R. R. Shirgaokar, Mudhol,* 19-2-26

...... He struck me as a promising young man. His loss is a loss to us all. He would have certainly done his best to uplift India. We badly need young men like him. You have my sincere condolence.

[39] *Nandnath Kedarnath Dixit, Baroda,* 5-12-25

......Feeble words of consolation can hardly lessen the burden of grief which you two must have been experiencing at the heavy loss you have suffered.

[40] *M. R. Paranjape, Poona,* 3–12–25

... I can well imagine the heaviness of the blow. I hope the hand that dealt it will also give you the strength to bear it.

[41] *Sampatrao Gaikwad, Baroda,* 2–12–25

...... Please accept and convey to the members of your family my very heartfelt sympathy in your sad bereavement.

— प्रकाशक —
श्रीपाद रामचंद्र टिकेकर
टिळकरोड, पुणें २

— मुद्रक —
स. रा. सरदेसाई, बी.ए., एल्‌एल्‌.बी.
नवीन समर्थ विद्यालयाचा 'समर्थ भारत'
छापखाना, ९४७ सदाशिव, पुणें २

रा. केशव भिकाजी ढवळे

गिरगांव – मुंबई,

यांजकडे पुस्तकाच्या

प्रती विक्रीस

आहेत.

डॉ. भ. म. व आ. [illegible]
ग्रंथ संग्रह